# ''समर्थ रामदासांचे मठ आणि महंत – एक अभ्यास''

साहित्य आणि ललितकला अभ्यास मंडळांतर्गत
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
पीएच.डी. (मराठी) या पदवीसाठी
सादर केलेला प्रबंध


संशोधक
सौ. प्राची हेमंत पाटेकर
( नोंदणी क्र. १३६११००११५६ )

मार्गदर्शक
डॉ. जया जितेंद्र कदम

श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत व भारतीयविद्या अध्ययन केंद्र


२०१८

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सौ. प्राची हेमंत पाटेकर यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी विषयातील पीएच. डी. पदवीसाठी **''समर्थ रामदासांचे मठ आणि महंत – एक अभ्यास''** या विषयांतर्गत प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांचे हे संशोधन स्वतंत्र व नवे असून त्यात ज्या लेखांचा, ग्रथांचा उल्लेख केला आहे, त्यांची संदर्भ म्हणून नोंद केली आहे.

**दिनांक : ऑक्टोबर २०१८**

**मार्गदर्शक**

**डॉ. जया जितेंद्र कदम**

# प्रतिज्ञापत्र

मी सौ. प्राची हेमंत पाटेकर निवेदन करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास मराठी विषयातील पीएच. डी. पदवी साठी, **''समर्थ रामदासांचे मठ आणि महंत – एक अभ्यास''** ह्या विषयावर मी सादर केलेला शोधनिबंध हा माझ्याच अध्ययनाचा परिपाक आहे. हा शोधनिबंध मी संपूर्ण स्वतंत्रपणे लिहिला आहे. हे मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते.

**दिनांक : ऑक्टोबर २०१८**

**सौ. प्राची हेमंत पाटेकर**

**संशोधक**

# ऋणनिर्देश

आपल्या जीवनाचा प्रवास असा असतो की तो एकट्याने करता येत नाही त्यासाठी अनेक जणांची संगत, मदत लागते. तसेच प्रत्येक ध्येय गाठण्यासाठीही आपल्याला अनेकांचे सहाय्य लागते आणि जेव्हा आपण ध्येय गाठतो, तेव्हा तर त्या यशात अनेकांचे आपण ऋणी असतो. त्यात आपले कुटुंबीय, नातेवाईक, जिवलग मित्र–परिवार, हितचिंतकांचा समावेश असतो.

मी आज पीएच. डी. च्या ध्येयाकडे वाटचाल करत आहे आणि आता अंतिम टप्पा लवकरच गाठत आहे. सर्वप्रथम मी ऋणी आहे ती परमेश्वराची, त्याने मला या पृथ्वीतलावर एका धार्मिक, सुसंस्कृत, आध्यात्मिक आई–वडिलांच्या पोटी जन्माला घातले. दुसरी ऋणी आहे ती आई–वडिलांची ज्यांनी मला जन्म देऊन चांगले संस्कार केले आणि तिसरी ऋणी आहे ती माझ्या दोन्ही मोठ्या भावांची, ज्यांनी माझे उत्तमरीत्या पालनपोषण, संगोपन केले. आज मला माझ्या आई–वडिलांच्या जागी ते आहेत. माझे महाविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच माझा विवाह झाला, तेव्हा माझे सासरे कै. नारायण पाटेकर यांनी मला पुढील शिक्षणासाठी खूप प्रेरित केले. 'कायम काहीतरी शिकत जा.' हा त्यांचा सल्ला मोलाचा ठरला. त्यांची मी सदैव ऋणी राहीन. अर्थातच घरातील सर्व सदस्यांनी मला प्रोत्साहन दिले आहे.

एम. ए. मराठी करताना मला 'समर्थ रामदास आणि शिवाजी महाराज' अभ्यासात असल्याने, तो विषय मनावर ठसला. एम. ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयातील एका प्राध्यापकांशी पीएच. डी. करण्याचा मानस बोलून दाखविला आणि संत, अध्यात्म अशाच प्रकारचा विषय निवडायचा आहे असे सांगितले. त्यावर लगेच म्हणाले,'जे संत मनाला खूप भावले, स्पर्श करून गेले, त्यांचाच विषय घे.' अर्थातच नजरेसमोर 'समर्थ रामदास'च आले आणि तेव्हाच मनात पक्के झाले. त्या प्राध्यापक संभाजी मलघे सरांचे मी आभार मानते. नंतर पत्राद्वारा दासबोधाचा अभ्यास करण्यासाठी ज्या मैत्रिणीने मला पुढच्या वाटेवर नेऊन सोडले ती जिवलग मैत्रिण सौ. सुप्रिया घमंडे हिचे माझ्यावर असे ऋण आहेत. पीएच. डी. करणार आहे

यावर माझ्या दोन जिवलग मैत्रिणींना वाटणारा माझा अभिमान नेहमीच मला आधार देतो. त्या म्हणजे सौ. मेधा वैद्य आणि सौ. क्षमा देशपांडे. यांचे प्रोत्साहन मला खूप प्रेरणादायी ठरले आहे.

विषय निवडीच्या टप्प्यावर आल्यावर मला योग्य विषय सुचवून त्यासाठी मार्गदर्शन करणारे श्री. सुनील चिंचोलकर यांची मी खूप ऋणी आहे. ते मला कायम वंदनीयच आहेत.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून पीएच. डी. करायचे ठरविले, कारण एक तर लोकमान्य टिळकांविषयीचा अभिमान आणि पुण्यातील केसरीवाडा अत्यंत जवळचा आणि तेवढाच जिव्हाळ्याचा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर विद्यापीठाचे डीन प्रा. डॉ. श्रीपाद भट यांच्या अतिशय चांगल्या सहकार्यामुळे, समजावण्यामुळे माझ्या अभ्यासात येणाऱ्या अडचणींवर मी मात करू शकले आणि इथपर्यंत येऊ शकले. आज मी त्यांची खूप ऋणी आहे. तसेच विद्यापीठाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. सौ. सुनंदा यादव यांच्या प्रभावी व्यक्तीमत्वामुळे नेहमीच माझा आत्मविश्वास कायम राहिला आणि त्यांनी वेळोवळी मला आलेल्या अडचणींच्या वेळी सहाय्य केले, त्यांची मी खूप ऋणी आहे. तसेच विद्यापीठातील सर्व कर्मचारी वर्गाला धन्यवाद.

आता मुख्य, माझ्या मार्गदर्शक प्रा. डॉ. जया कदम यांनी मला उत्तम मार्गदर्शन केले आहे. काही वेळा अभ्यासात जाणवणारी क्लिष्टता त्यांनी नेहमी सोपी केली आहे. कोणताही मानसिक ताण न देता अगदी सहजपणे अभ्यासातील समस्या सोडवण्यास मदत केली आहे. त्यांच्याकडे कोणत्याही वेळेला गेले तरी त्यांनी हसतमुखाने मार्गदर्शन केले आहे, योग्य दिशा दाखविली आहे. त्यांनी मला या अंतिम ध्येयापर्यंत पोहोचविले आहे. त्यांची मी ऋणी आहे.

प्रत्यक्ष अभ्यास करीत असताना मला अनेक समर्थभक्तांचे सहाय्य झाले आहे. मला वेळोवळी ग्रंथ उपलब्ध करून दिले आहेत. समर्थांच्या मठांबद्दल ऐतिहासिक, भौगोलिक माहिती दिली आहे. मठांना भेटी देतानाही ते माझ्याबरोबर आले आहेत. सर्वप्रथम मी नाव घेईन ते सज्जनगड मासिकाचे सहसंपादक श्री. मधुसुदन नेने यांचे. त्यांच्या वाई येथिल निवासस्थानी मी अनेकवेळा राहिली आहे. अनेक ग्रंथ अभ्यासले आहेत, त्यांनी माझ्या अनेक शंकांचे निरसन केले आहे. अभ्यास आणि माहेरपण या दोन्ही गोष्टी एकाचवेळी त्यांच्या घरी साधल्या जात होत्या. त्यांचा स्नेह न विसरता येण्यासारखा आहे. त्यांची मी शतशः ऋणी आहे. दुसरी समर्थभक्त म्हणजे कीर्तनकार सौ. वृषाली कुलकर्णी ‘पत्राद्वारा दासबोध’ शिबिरात एका क्षणात झालेली

मैत्रिण, सर्वतोपरी लगेच माहिती देणारी अशी ती आहे. तिच्याकडून मठ, मठाधिपती यांची वेळोवळी खूप माहिती मला मिळाली. तिची मी अत्यंत ऋणी आहे. आत्तापर्यंत मी दोन वेळा मठाधिपती संमेलनाला उपस्थित होते. तेव्हा तिथे आलेल्या मठाधिपतींनी माझ्या अभ्यासाचा विषय कळल्यावर सर्वतोपरी माहिती उपलब्ध करून दिली. अशा समर्थभक्तांमध्ये अजून काहींचा समावेश आहे. तो म्हणजे श्री. रमण चितळे, श्री. प्रमोद संत, श्री. सचिन जहागिरदार, श्री. सुनील चिंचोलकर, श्री. दिवाकर देशपांडे, अशा अनेक समर्थ भक्तांनी मला ग्रंथ अभ्यासायला देऊन मार्गदर्शन केले आहे. त्यांची मी आभारी आहे.

या सर्व प्रबंधाचे टंकलेखन वेळेत, सुबक व आकर्षकरित्या आणि वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल सौ. नीरजा पेंडसे यांचीही मी आभारी आहे, शिवाय त्यांनी हे काम अतिशय मनापासून केले आहे.

या सर्व अभ्यासक्रमाच्या काळात मुख्य सहकार्य असते ते घरातील लोकांचे, त्यांच्या सहकार्यानेच आपण येथपर्यंत पोहोचू शकतो. माझ्या या ध्येयपूर्तीत माझे पती श्री. हेमंत पाटेकर यांची मी जन्मभर ऋणी राहीन. आर्थिक आणि सांसारिक विवंचना त्यांनी माझ्यापर्यंत फिरकूच दिल्या नाहीत, तसेच खूप प्रोत्साहनही त्यांनी दिले आहे. तेही माझ्या या ध्येयाचा अभिमान बाळगून आहेत. माझी मुलगी ऋचा पाटेकर हिला तर आपल्या आईचा सार्थ अभिमान आहे. तिने लहान वयातही खूप समजूतदारपणा दाखविला आहे. तिने माझ्या अभ्यासात कधी व्यत्यय आणला नाही उलट अनेक वेळा चहा, नाष्टा, जेवण जागेवर आणून दिले आहे. तिला धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. या दोघांचाही माझ्या यशस्वी वाटचालीत मोलाचा वाटा आहे.

वर उल्लेख केलेल्या सर्व जणांचे आणि चुकून उल्लेख करायचा राहून गेला त्यांचे मनःपूर्वक आभार मानते. माझ्या मनात त्यांनी केलेल्या सहकार्याची जाणीव कायम जागृत राहील.

सौ. प्राची पाटेकर

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रमाणपत्र | | I |
| २. | प्रतिज्ञापत्र | | II |
| ३. | ऋणनिर्देश | | III |
| ४. | अनुक्रमणिका | | VI |
| **प्रकरण पहिले : प्रस्तावना** | | | १–८ |
| १.० | | भूमिका | १ |
| १.१ | | विषयाचे महत्त्व आणि बैठक | २ |
| १.२ | | विषय निवडीचे कारण | ४ |
| १.३ | | संशोधन समस्या | ५ |
| १.४ | | संशोधनाची ध्येये आणि उदिष्टे | ६ |
| १.५ | | संशोधनाची गृहितके | ७ |
| १.६ | | संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा | ८ |
| **प्रकरण दुसरे : संशोधनाचे सर्वेक्षण** | | | ९ |
| **प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती** | | | १०–११ |
| **प्रकरण चौथे : समर्थ रामदासांचे मठ आणि महंत** | | | १२–३१७ |
| ४.० | | प्रस्तावना | १२ |
| ४.१ | | समर्थांचा जन्म, बालपण, पुरःश्चरण आणि तीर्थाटन | १३ |
| | ४.१.१ | समर्थांचे सामाजिक कार्य | ५७ |
| | ४.१.२ | समर्थांचे महानिर्वाण | ५९ |
| ४.२ | | समर्थांचे वाङ्मय | ६० |
| ४.३ | | मराठीतील प्रमुख संप्रदाय आणि त्यांचे कार्य | ७७ |
| | ४.३.१ | नाथ संप्रदाय | ७७ |
| | ४.३.२ | महानुभाव संप्रदाय | ८१ |
| | ४.३.३ | वारकरी संप्रदाय | ८५ |
| | ४.३.४ | दत्तसंप्रदाय | ९३ |
| | ४.३.५ | रामदासी संप्रदाय | ९८ |
| ४.४ | | समर्थ रामदासांचे सामाजिक कार्य | १२१ |
| | ४.४.१ | समर्थांचे बालपण, पुरःश्चरण आणि तीर्थाटन काळातील सामाजिक जाणीव | १२१ |
| | ४.४.२ | कृष्णातीरी कार्याची मुहूर्तमेढ | १२९ |
| | ४.४.३ | चाफळच्या श्रीराममंदिराची स्थापना | १३४ |
| | ४.४.४ | समर्थांचे स्वप्न शिवराज्याभिषेक | १३८ |
| | ४.४.५ | समर्थांच्या कार्याची चतुःसूत्री | १४४ |
| ४.५ | | समर्थ रामदासांचे महंत आणि मठनिर्मिती | १५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.५.१ | समर्थ रामदासांचे महंत | १५३ |
| | ४.५.२ | समर्थांचे महंतांबद्दलचे आडाखे आणि त्यांचे आवश्यक गुण | १५४ |
| | ४.५.३ | समर्थांची मठनिर्मिती आणि मठाचे कार्य | १६१ |
| | ४.५.४ | मठस्थापनेचे प्रमुख हेतू | १६२ |
| | ४.५.५ | मठांचे कार्य | १६३ |
| ४.६ | | समर्थ रामदासांचे प्रमुख मठ आणि मठाधिपती | १६९ |
| | ४.६.१ | वेणास्वामी – मिरज मठ | १६९ |
| | ४.६.२ | दिनकर स्वामी – तिसगाव मठ | १९७ |
| | ४.६.३ | कल्याणस्वामी – डोमगाव आणि परंडा मठ | २०८ |
| | ४.६.४ | उद्धवस्वामी – टाकळी व इंदूरबोधन मठ | २२९ |
| | ४.६.५ | दिवाकर गोसावी – महाबळेश्वर मठ | २४३ |
| | ४.६.६ | दत्तात्रयस्वामी शिरगांवकर, शिरगाव मठ | २५० |
| | ४.६.७ | भीमस्वामी – तंजावर मठ | २५६ |
| | ४.६.८ | अंबिकाबाई – राशिवडे व वाळवे मठ | २६० |
| | ४.६.९ | सीतारामबुवा – चिपळूण मठ | २६२ |
| | ४.६.१० | बाजीगोसावी – शिरवळ मठ | २६५ |
| | ४.६.११ | वासुदेव गोसावी – कण्हेरी मठ | २६५ |
| | ४.६.१२ | देवदास महाराज – दादेगांव मठ | २७३ |
| | ४.६.१३ | आण्णाप्पा निलंगेकर – आण्णाप्पा गोसावी उर्फ आनंदस्वामी, नीलंगे मठ | २७७ |
| | ४.६.१४ | त्रिंबकराज – भालगांव मठ | २८१ |
| | ४.६.१५ | बालकराम उर्फ रामठेंगा – कारंजा मठ | २८३ |
| | ४.६.१६ | रोकडाराम – कारंजा मठ | २८७ |
| | ४.६.१७ | अनंतबुवा मेथवडेकर – मेथवडे मठ | २८९ |
| | ४.६.१८ | रंगनाथ गोसावी – पाली मठ | २९१ |
| | ४.६.१९ | सतीबाई कुलकर्णी – शहापूर मठ | २९२ |
| ४.७ | | समारोप | २९५ |
| ४.८ | | संदर्भ | २९९ |
| **प्रकरण पाचवे : उपसंहार** | | | ३१८–३३० |
| ५.० | | प्रस्तावना | ३१८ |
| ५.१ | | संशोधन अभ्यासाचे फलित | ३१९ |
| ५.२ | | निष्कर्ष | ३२५ |
| ५.३ | | संशोधनाची पुढील दिशा आणि आधुनिक काळातील त्याचा उपयोग. | ३३० |
| **संदर्भग्रंथसूची** | | | ३३१–३३४ |
| **परिशिष्ट** | | | ३३५–३३७ |
| अ) | | मुलाखत : कौस्तुभबुवा रामदासी, मिरज मठ | ३३५ |

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.० भूमिका

'समर्थ रामदास' हे राष्ट्रीय संत म्हणून ओळखले जातात याचे कारण म्हणजे त्यांनी आध्यात्माबरोबरच राष्ट्रीय कार्यावर भर दिला. प्रत्येक संतांनी त्या त्या काळच्या गरजेप्रमाणे कार्य केले. लोकांना भक्तीचे योग्य मार्ग दाखविणे अतिशय जरूरीचे होते. धार्मिक अंदाधुंदी सर्वत्र माजल्यामुळे त्यांनी समाजाला भक्ती मार्गावरून चालण्यास सहाय्य केले. समर्थांच्या काळातही धर्मसंस्थापना महत्त्वाची होतीच, परंतु सामाजिक परिस्थितीची घडी पूरती विस्कटली होती, कारण तेव्हा मुस्लिम राजवटींचा विळखा होता. त्यातून बाहेर पडायचे असेल तर आध्यात्माच्या मार्गावरून अजून पुढे जाणे गरजेचे होते. सामाजिक स्थिती पलटण्याकरता आणि मुस्लिमसत्ता झुगारण्यासाठी महत्त्वाचे होते ते म्हणजे स्वराज्याची निर्मिती आणि शिवरायांना ह्या कार्यात मोलाची मदत झाली ती म्हणजे समर्थांच्या राष्ट्रीय कार्याची, त्यांच्या मार्गदर्शनाची. त्यामुळेच समर्थांचे हे मठ आणि महंतांचे कार्य अभ्यासण्याची इच्छा प्रबळ होते.

समर्थांची मठनिर्मिती आणि त्यांचे महंत ह्याचे स्थान समर्थांच्या सामाजिक कार्यात उच्च आहे. ह्या दोन्ही गोष्टी केवळ सामाजिक दृष्टीकोन ठेवूनच ते बघत होते. समर्थांचे महंत हे सगळे समर्थांच्या हाताखाली, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तेवढ्याच शिस्तीखाली, सर्वच बाबतीत निपुण, प्रत्येक कार्यात तरबेज व तत्पर होते. वक्तृत्व, लेखनकला यामुळे हे महंत लोकांच्या मनाचे अंतरंग जाणून घेत होते. निर्भयता, निस्वार्थीपणा, कणखरपणा समर्थांच्या अंगात पुरेपूर भिनल्याने समाजात राहून त्यांना लोकांची मानसिकता बिघडत चालली होती, तिच्यात बदल करण्यासाठी महंतांना हाताशी धरून, त्यांच्याकडून सामाजिक कार्य करवून घ्यायचे ठरवून एका विशिष्ट ध्येयासाठी अक्षरशः झटले. त्यामुळे बदलत्या काळातही यांचा अभ्यास करणे आवश्यक वाटतो.

आता अशी परिस्थिती आहे की, काहीच मठ सध्या अस्तित्त्वात आहेत, तर काहींचा फक्त उल्लेखच आहे. तरीसुध्दा ह्या संशोधनामुळे समर्थांच्या संप्रदायात पुन्हा एकदा चैतन्य येईल.

या संप्रदायाचे कार्य पुन्हा एकदा प्रकाशझोतात येईल. त्याकाळानुरूप मठांचे, महंताचे कार्य झाले असले तरी याही काळात तेवढेच त्यांचे महत्त्व आहे. या काळात हे महंत, त्यांचे कार्य, एक सामाजिक केंद्र म्हणून स्थापन झालेले मठ, त्यांचा अभ्यास, समाजाला एक नवीन दृष्टीकोन नक्कीच देईल, नव्याने जनजागृती होईल. संशोधनात्मक अभ्यास झाल्यावर पुन्हा एकदा नव्याने या मठांकडे बघितले जाईल. समाजाची आध्यात्मिक घडी तशीच कशी ठेवता येईल ह्याकडे लक्ष देता येईल. समर्थांच्या काळाला इतकी वर्षे झाली तरीसुध्दा त्यांचाच सामाजिक दृष्टीकोन ठेवण्याची गरज तर प्रत्येक काळात आहेच. मुख्य म्हणजे अनेक मठांचा जीर्णोध्दार करणे महत्त्वाचे आहे. ह्या मठांमध्ये उपासना, उत्सव याद्वारे त्यांची ओळख लहान मुलांच्या पिढीलाही व्हायला हवी. प्रौढ वयातील लोकांना ह्यातून मनोबल मिळून त्यांचे मानसिक स्थैर्य जपले जावे, समर्थांनी केलेले संस्कार, मनाची जडण–घडण, आध्यात्माची लावलेली गोडी, शिस्तबध्दता, नियोजनबध्दता तर अगदी दैनंदिन जीवनातील आचार–विचार पुन्हा एकदा जनमानसात रूजायला हवे आहेत, म्हणून समर्थ, त्यांचे मठ, महंत समजून घेऊन प्रत्येकाची उत्तम जडण–घडण होणेही महत्त्वाचे आहे. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर मठांचे पुनरूज्जीवन करण्याचा मानस आहे.

### १.१ विषयाचे महत्त्व आणि बैठक

आपल्याकडे जे पाच प्रमुख संप्रदाय आहेत, त्यात 'समर्थ संप्रदायाचा' म्हणजेच 'रामदासी' संप्रदायाचा एक वेगळाच ठसा उमटला आहे. सर्व संतांनी काळानुरूप कार्य केले आहे. त्या त्या वेळी जशी गरज होती तसेच त्यांचे आचार–विचार होते. तसेच समर्थ संप्रदायाचे कार्यही त्या काळाच्या गरजेप्रमाणेच झाले आहे. समर्थ रामदास 'समर्थ संप्रदायाचे' प्रवर्तक होते. त्यांचे आध्यात्म कार्य, सामाजिक कार्य हेही त्या काळात म्हणजेच परकीय आक्रमणांना तोंड देण्यासाठी सामाजिक दृष्टीकोनच ठेवून राजकारण करण्यासाठी घडले. अनेक बाबतीत त्यांचे वेगळेपण जाणवते. समाजहित, धर्मसंस्थापना आणि स्वराज्य निर्मितीतील सहाय्य मूलभूत गोष्टींकडे त्यांनी वास्तवतेतून पाहिले. हे कार्य त्यांनी मठांद्वारे, महंतांद्वारे केले त्यामुळे ह्या विषयाला एक प्रकारचे वेगळेपण प्राप्त झाले आहे. समर्थांनी वयाच्या बाराव्या वर्षी घर सोडले ते पुढील समाजकार्याकरीताच. त्यांनी जे भारतभ्रमण केले त्यात परकीय, सुलतानी आक्रमणांमुळे समाजाची दयनीय अवस्था त्यांच्या लक्षात आली. त्याच काळात ह्या परकीय सत्ता झुगारून

देण्यासाठी काय करायला हवे याचाही अभ्यास समर्थांनी केला. त्यांची दूरदृष्टी वाखाणण्याजोगी होती, म्हणूनच ते नियोजनबध्द कार्य करू शकले. त्याचवेळी स्वराज्याची निर्मिती व्हावयास हवी ह्याची त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली. त्यासाठी समर्थांनी समाजप्रबोधनावर प्रथम भर दिला. समाजाची मानसिक जडण–घडण, शारिरिक तंदुरूस्ती ह्याकडे खूप लक्ष दिले. खऱ्या अर्थाने त्यांनी ह्या सामाजिक कार्याचा विडा उचलला.

तीर्थाटनाच्या काळात अनेक बाबींचा त्यांनी अभ्यास केला आणि तीर्थाटनाचा बारा वर्षाचा काळ संपविल्यावर शहाजीराजे भोसलेंच्या बरोबर झालेल्या मसलतीतून समर्थांनी कृष्णातीरी आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. राष्ट्रीयकार्यासाठी लोकांत राहून अनेक शिष्य त्यांनी तयार केले, त्यांची योग्य पारख करून आपल्या संप्रदायात समाविष्ट करून योग्य मार्गदर्शन केले. ह्या शिष्यांना त्यांनी अगदी तावून–सुलाखून घेतले, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले, प्रत्येक बाबतीत तरबेज केले आणि मठ स्थापून देऊन त्यांची मठाधिपती म्हणून नियुक्ती केली. अशा रितीने सामाजिक भान असलेल्या समर्थांनी आपल्या या महंतांकडून राष्ट्रकार्य करवून घेतले.

समर्थांनी भारतात अनेक ठिकाणी मठस्थापना केली, परंतु शहाजीराजांकडे असलेला परगणा आणि शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीसाठी जो पाठिंबा देणे गरजेचे होते, त्यासाठी महाराष्ट्र आणि कृष्णातीरावरील प्रदेशच अत्यंत महत्त्वाचे होते, त्यामुळे महाराष्ट्रातील मठांवर जास्त प्रकाश पडतो. चाफळ, सज्जनगड, शिवथरघळ म्हणजे हे मठच होते, परंतु त्यांना एक सामाजिक कार्यासाठी असलेल्या केंद्रांचा दर्जा दिला गेला होता. त्या मध्यवर्ती ठिकाणांतूनच समाजकारण, राजकारण यांचे संयोजन होऊन ते यशस्वीपणे घडत होते. त्यामुळे महाराष्ट्रातील मठ आणि महंत हे सर्वात जास्त महत्त्व प्राप्त झालेले आहेत.

त्या राष्ट्रीयकार्यात ह्या मठांनी आणि महंतांनी मोलाचा वाटा उचलला आहे. कीर्तन, प्रवचन, लेखन ह्यातून त्यांनी समाज घडविला. स्वतः निर्भय, कणखर राहून आपले अवघे आयुष्य समर्थचरणी, समर्थांच्या उद्दिष्टाला वाहून घेतले. त्यामुळे त्या महंतांना आणि मठांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले.

## १.२ विषय निवडीचे कारण

सर्व संतांचा अभ्यास करताना, त्यांचे कार्य समजून घेताना समर्थांचे प्रत्येक बाबतीतील वेगळेपण मनाला भिडते. आध्यात्माची कास ही महत्त्वाची बाब असून सामाजिक जाणीव व भान ठेवून त्यांनी केवळ समाजकार्यावर भर दिला. समर्थांनी संपूर्ण भारतभ्रमण हे फक्त तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यासाठी केले नाही तर समाजाची परिस्थिती अभ्यासण्यासाठी केले. तेव्हाच त्यांच्या कार्याचे नियोजन ठरत होते. समर्थांनी त्यांचे समाजकार्य केवळ एके ठिकाणी बसून कार्यकर्त्यांकडून म्हणजेच शिष्यांकडून करवून न घेता स्वतः समाजात राहून केलेले आहे. समर्थांनी अनेक वेळा महाराष्ट्र आणि आजूबाजूच्या प्रदेशात भ्रमण केले आहे. शिवराय आग्र्याच्या अटकेत असताना सर्व मंदिरे, मठ बंद करून स्वतः समर्थ जनजागृती करायला पुन्हा बाहेर पडले. सर्व शिष्यांना, महंतांनाही त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी पाठविले.

कृष्णातीरी राहून समर्थांनी आपल्या कार्याचा प्रारंभ केला तोही अगदी नियोजनबध्द. केवळ एके ठिकाणीच राहून ते मार्गदर्शन करीत नव्हते तर जातीने ते सर्व मठांचा कारभार जवळून बघत होते. समर्थांनी ज्या विश्वासाने, ज्या जाणीवेने आपल्या महंतांवर जबाबदाऱ्या टाकल्या त्या जबाबदाऱ्या त्या महंतांनी योग्य रीतीने पार पाडल्या. मठांची स्थापना करून दिल्यावर केवळ एक उदरनिर्वाहाचे साधन न बनता समाजप्रबोधनालाच प्रथम प्राधान्य दिले. शिष्य परिवार वाढविला, त्यातून पुन्हा मठांची निर्मिती केली. या मठ–महंतांच्या जाळ्यामुळे, त्यांच्या कार्यामुळे धर्मसंस्थापना, स्वराज्यनिर्मिती झाली, जी केवळ अनन्यसाधारण आहे. या मठांचे, महंतांचे कार्य मनाला खूप भावते म्हणूनच या विषयाचा अभ्यास करायची प्रबळ इच्छा निर्माण झाली. अनेक महंतांचे चरित्र, कार्य जाणून घ्यावेसे वाटले. पुन्हा एकदा या मठांकडे वेगळ्या दृष्टीकोनातून पाहून त्यांचे कार्य पुढे नेण्याची जाणीव उत्पन्न झाली.

अगदी लहानपणापासूनच माझे मन कथा–कीर्तन–प्रवचन यात रंगत असे. माझ्या आई–वडिलांना आध्यात्मात खूप गोडी असल्यानें मी त्यांच्याबरोबर नेहमी अनेक आध्यात्मिक कार्यक्रमांना जात असे. यातूनच मला आपल्या संतांची ओळख व्हायला लागली, त्यांच्या कथा, अभंग मला खूप आवडायचे, म्हणजे हे बाळकडू मला घरातूनच मिळाले.

पुढे वाणिज्य शाखेतील पदवी घेतली, नोकरीसाठी इतर व्यावसायिक शिक्षण घेऊनसुध्दा मन नेहमी मराठी भाषा, साहित्य, संतचरित्रे याकडे आकर्षित व्हायचे. तेव्हा कालांतराने मराठी विषयात एम.ए. पूर्ण केले. त्या अभ्यासक्रमात 'शिव–समर्थ' हा आवडीचा विषय अभ्यासला गेला. तसेच नंतर 'श्री ग्रंथराज दासबोध' या विषयाचा पत्रद्वारा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मात्र 'समर्थ रामदास' यांचे चरित्र, वाङ्मय आणि कार्य याचा ठसा मनावर उमटला आणि तेव्हाच मनोमन ठरविले की पीएच.डी. करावे आणि विषय 'समर्थांचाच' असावा.

## १.३ संशोधन समस्या

समर्थांची मठनिर्मिती आणि त्यांच्या महंतांचे कार्य हे समाजप्रबोधन यासाठी सामाजिक दृष्टीकोन ठेवूनच केले होते. त्यांचे कार्य म्हणजे समर्थांच्या नियोजनबध्द सामाजिक कार्याचाच महत्त्वाचा भाग आहे. या कार्याला स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण अशा 'रामदासी' संप्रदायाची बैठक होती. स्वतः समर्थांनीही इतर प्रमुख संप्रदायांचा अभ्यास केला होता. त्यातील चांगले, योग्य तत्त्वज्ञानही अंगिकारले होते.

समर्थांचे मठ आणि महंत यांचा अभ्यास करताना ज्या समस्या घेतल्या त्या अशाप्रकारे :–

- आपल्या महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले, त्यात संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि समर्थ रामदास हे पाच प्रमुख संत होते. प्रत्येक संतांचे जीवन वेगळे होते. त्यात समर्थ रामदासांचे चरित्र कसे आहे?
- चार प्रमुख संतांनी वाङ्मयनिर्मिती केली. त्यांची ग्रंथसंपदा, अभंगरचना अतिशय उत्कृष्ट आहे. समर्थांचे वाङ्मय सामाजिक दृष्टीकोनातूनच लिहिलेले आहे ते कसे आहे?
- समाजपरिवर्तन सातत्याने होत असते, ते तत्कालीन परिस्थितीमुळे. आपल्याकडील पाच प्रमुख संप्रदायाचा काळ होता नववे शतक ते सतरावे शतक. या सर्व संप्रदायाचे कार्य, तत्त्वज्ञान, वाङ्मय काय आहे?
- समर्थांची सामाजिक भूमिका, सामाजिक कार्य हे तत्कालीन परिस्थितीनुसार होते. त्यांच्या कार्यामागचे हेतू काय होते?

- समर्थांच्या मठांचे कार्य, महंतांच्या भूमिका, त्यामागचा दृष्टीकोन यात वेगळेपणा कसा आहे?
- त्या काळात झालेल्या त्या मठांचा आता कशाप्रकारे उपयोग होईल. आताच्या काळातील परिवर्तनासाठी त्यांचा उपयोग होईल का?

## १.४ संशोधनाची ध्येये आणि उद्दिष्ट्ये

आपल्याकडील सर्व प्रमुख संप्रदायांची केलेले कार्य उत्कृष्ट्च आहे. अर्थातच ती काळाच्या गरजेनुसार होती. तसेच त्यांचा प्रभावही बदलत्या समाजामुळे कमी–जास्त झाला. जसे प्रमुख संप्रदायाचे तत्त्वज्ञान, कार्य होते, तसेच प्रमुख संतांचेही तत्त्वज्ञान, कार्य होतेच. त्यांनीही काळाच्या गरजेनुसार कार्य केले. आध्यात्म, भक्तीमार्ग, आचारधर्म वगैरे गोष्टींवर त्यांनी भर दिला तर समर्थ रामदासांनी आपल्या संप्रदायातून महंतांच्या सहाय्याने राष्ट्रीय कार्याचा दृष्टीकोन ठेवून समाजप्रबोधन केले.

अत्यंत वाकबगार झालेल्या महंतांना हाताशी धरून समर्थांनी सामाजिक दृष्टीकोनातून सामाजिक चळवळ उभी केली ती काही विशिष्ट ध्येये ठेवूनच. तेव्हा समर्थांच्या कार्याचा, मठांचा, महंतांचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले.

- समर्थांनी आपल्या कार्याला काही बैठक असावी, काही तत्त्वांवर कार्य चालावे यासाठी 'समर्थ' म्हणजेच 'रामदासी' संप्रदायाचे प्रवर्तन केले. त्याचा अभ्यास करण्यासाठी मराठीतील प्रमुख संप्रदााय नाथ, महानुभव, वारकरी आणि दत्त संप्रदायाचाही अभ्यास करण्याचे उद्दिष्ट ठेवले.
- रामदासी संप्रदायाचे कार्य, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट ठेवले.
- समर्थ रामदास हे प्रमुख संत, तेही राष्ट्रीय संत म्हणून ओळखले जातात. तेव्हा महाराष्ट्रातील इतर प्रमुख संत म्हणजे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतांनाही जाणून घेण्याचे उद्दिष्ट ठेवले.
- रामदासी संप्रदायाचे कार्य, तत्त्वज्ञान, वाङ्मय, संप्रदायाची वैशिष्ट्ये अभ्यासणे हे उद्दिष्ट ठेवले.

- त्या काळात स्थापन झालेल्या मठांचा अभ्यास करून, आताच्या काळातील समाज परिवर्तनासाठी त्यांचा उपयोग करून घेता येईल हे उद्दिष्ट ठेवले.

## १.५ संशोधन गृहितके

समर्थ रामदासांनी सतराव्या शतकातील केलेले सामाजिक कार्य अतिशय उल्लेखनीय आहे. त्यांची स्वधर्मसंस्थापना आणि स्वराज्यनिर्मितीसाठी केलेले सहाय्य, ही भूमिका केवळ अद्वितीय आहे. समर्थांचे व्यक्तिमत्व, चरित्र प्रभावी होते. त्यांची वाङ्मयसंपदा अतिशय समृद्ध आहे. समर्थांच्या संप्रदायाच्या वैशिष्ट्यांमध्ये वेगळेपणा आहे. समर्थांचे मठ त्यांच्या सामाजिक भूमिकेत अत्यंत महत्त्वाचे होते, तसेच त्यांचे महंत समर्थांएवढेच कर्तृत्ववान, कणखर, निर्भय, विवेकी असेच होते आणि त्यांचेही कार्य उल्लेखनीयच होते. या सर्व गोष्टींचा अभ्यास करून आत्ताच्या समाजासमोर मांडला जावा हा उद्देश ठेवून खालील गृहितके मांडली आहेत.

- समर्थांचे रामोपासक घराणे, समर्थांचा जन्म, बालपण, पुरःश्चरण, तीर्थाटन त्यातून त्याची झालेली जडणघडण, त्यांचे कृष्णातीरी प्रारंभ झालेले कार्य, समर्थ आणि छत्रपती शिवराय एकरूप होऊन त्यांचे स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न कसे साकारले गेले हे अभ्यासणे.
- मराठीतील पाच प्रमुख संप्रदायांचे आणि रामदासी संप्रदायाचे वेगळेपण अभ्यासणे.
- समर्थांची सामाजिक भूमिका काय होती, त्याची बैठक, तसेच कसे कार्य पूर्णत्वास नेले ते अभ्यासणे.
- समर्थांनी केलेली महंत आणि मठनिर्मिती, त्यामागील उद्देश, महंतांचे आवश्यक गुण, त्यांच्या जबाबदाऱ्या, मठांनी एक सामाजिक चळवळीचे केंद्र म्हणून कसे कार्य केले हे अभ्यासणे.
- स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न साकारण्यासाठी छत्रपती शिवरायांच्या मुलुखात अनेक ठिकाणी सामाजिक चळवळीच्या उद्देशाने निर्मिलेले मठ, मठाधिपतींचे चरित्र, कार्य आणि वाङ्मय अभ्यासणे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

समर्थांची प्रत्येक कृती ही सामाजिक जाणीवेतूनच केलेली होती. धर्मसंस्थापना आणि स्वतंत्र राज्याचे स्वप्न त्यांनी पाहिले, त्यासाठी त्यांनी आध्यात्माचा मार्ग समाजाला दाखविला, पण त्याचबरोबर धर्मसंस्थापना आणि स्वराज्याचे महत्त्व आणि त्याची गरज समाजाला पटवून दिली, त्याची बीजे लोकांच्या मनात रूजवली. अर्थातच धर्म जगला आणि स्वराज्यात प्रत्येक जण मोकळेपणाने श्वास घेऊ लागला आणि सुखी झाला.

समर्थांच्या या कार्यात मोठी आणि महत्त्वाची भूमिका बजावली ती त्यांनी स्थापन केलेल्या मठांनी, अर्थातच मठाधिपतींनी. महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना होणार होती कारण शहाजीराजे महाराष्ट्रात त्याची स्थापना करू पहात होते. मात्र त्यांना परकीयांकडे चाकरी करायला लागत होती. त्यामुळे त्यांचे स्वप्न पूर्ण होत नव्हते. मात्र त्याचे बीज त्यांचा पुत्र शिवाजी याच्यात त्याच्या बाळपणीच रूजविले आणि पत्नी जिजाई व पुत्र शिवाजी यांनी स्वराज्यस्थापनेचा विडा उचलला. शहाजीराजे आणि समर्थ यांच्यात संपूर्ण कार्याची योजना ठरली आणि पुरःश्चरण संपल्यावर समर्थांनी या कार्याच्या अभ्यासासाठी देशभर तीर्थाटन केले, जे त्यांना महाराष्ट्रात धर्मसंस्थापना आणि स्वराज्य स्थापनेस उपयुक्त ठरले. समर्थांनी देशभर मठस्थापना केली, शिष्य तयार केले. त्यामुळे या कार्याच्या अभ्यासाची व्याप्ती मोठी आहे. त्या त्या ठिकाणी त्या त्या मठांचे कार्य चालूच होते, परंतु त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू महाराष्ट्र आणि त्यातूनही स्वराज्यस्थापनेच्या दृष्टीने महत्त्वाच्या कृष्णातीरीच होता. कारण याच परिसरापासून शिवरायांच्या कार्याची बीजे रोवली जात होती आणि इथूनच त्याला खतपाणी मिळणार होते.

समर्थांनी म्हणूनच देशात इतर ठिकाणी मठस्थापना केली तरी त्यांनी कृष्णातीरीच हनुमंतांची मंदिरे बांधून आणि मठस्थापना करून आपले लक्ष केंद्रित केले. स्वराज्याच्या पूर्तीसाठी सर्वप्रथम कृष्णातीरापासून कार्य चालू झाले. हे मठ आणि त्यांचा कार्यविस्तार यामुळे स्वराज्याची पायाभरणी होऊन स्वराज्यस्थापना झाली. म्हणूनच ही संशोधनाची मर्यादा कृष्णातीर आणि महाराष्ट्राचा काही मध्यवर्ती भागातील मठ आणि महंत असा आहे. समर्थांच्या कार्यविस्तारात हे लक्षात येते की समर्थांनी आपल्या कार्याचा केंद्रबिंदू या परिसरातच ठेवला उदा. चाफळ आणि सज्जनगड. त्यामुळे त्यांचे कार्य, मठस्थापना, मठाधिपती यांचा अभ्यास याच परिसरातील मठ आणि महंतांवर केंद्रित केला आहे.

## प्रकरण दुसरे

# संशोधनाचे सर्वेक्षण

# प्रकरण दुसरे

## संशोधनाचे सर्वेक्षण

समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव, श्री. सेतूमाधवराव पगडी, श्री. सुनील चिंचोलकर या लेखकांनी समर्थांचे चरित्र, समर्थ संप्रदाय, समर्थांचे शिष्य यांचा अभ्यास करून अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यातून त्यांनी समर्थांचे सामाजिक कार्य, वाङ्मय, समर्थ संप्रदाय याची तपशीलवार माहिती दिली आहे. तसेच श्री. शंकर देव यांनी समर्थ शिष्यांच्या वाङ्मयाचीही भरपूर माहिती प्रसिद्ध केली आहे. श्री. सेतूमाधवराव पगडी यांनी महाराष्ट्रातील समर्थ शिष्यांबरोबरच ग्वाल्हेर, तंजावर वगैरे महाराष्ट्राबाहेरील मुख्य शिष्य, त्यांची शिष्य परंपरा, साहित्य यावर प्रकाश टाकला आहे.

समर्थ भक्त श्री. प्रमोद संत यांनी रामदासी मठांवर विशेष अभ्यास केला आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील समर्थांच्या मुख्य शिष्यांची, प्रशिष्यांची ओळख करून दिली आहे. तसेच त्यांनी अनेक मठांना भेटीही दिल्या आहेत. श्री. रत्नाळीकर यांनीही अनेक मठांना भेटी दिल्या आहेत आणि तिथे दासबोध पारायण वगैरे साजरे केले आहेत, जेणे करून मठांमधील उपासना पुन्हा चालू होण्यात प्रेरणा मिळेल.

समर्थभक्त श्री. र. रा. गोसावी यांनीही समर्थ संप्रदायाबरोबरच इतर प्रमुख संप्रदायांवर आधारीत ग्रंथ प्रसिद्ध केला आहे, तसेच 'समर्थ आणि समर्थ संप्रदाय' यावर विशेष अभ्यास केला आहे. समर्थभक्त श्री. सुनील चिंचोलकर हे 'समर्थव्रती' म्हणूनच ओळखले जातात. त्यांनी समर्थांच्या अनेक शिष्यांच्या कथा प्रसिद्ध केल्या आहेत. तसेच अनेक प्रवचने, व्याख्याने यातून ते समर्थ चरित्र, वाङ्मय, समर्थ शिष्यांच्या व चरित्रकथा ते लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत.

धुळे येथील 'सत्कार्योत्तेजक सभेने' समर्थ, समर्थ शिष्यांची अनेक हस्तलिखिते, बाडे प्रसिद्ध केले आहेत, तसेच या सभेच्या 'श्रीगिरीधरकृत समर्थप्रताप' या प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात अनेक समर्थशिष्यांची नावे दिली आहेत.

## प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

# प्रकरण तिसरे

## संशोधन पध्दती

समर्थांच्या मठांचा आणि महंतांचा अभ्यास करण्यापूर्वी समर्थांचे चरित्र, कार्य, त्यांचे वाङ्मय अभ्यासायला लागले. त्यांचा सामाजिक दृष्टीकोन सतत नजरेसमोर ठेवून समर्थांच्या भूमिकेला समजून घ्यावे लागले.

रामदासी संप्रदाय, त्यांचे उद्दिष्ट, कार्य हे समजून घेतानाच इतर चार प्रमुख संप्रदाय म्हणजेच नाथसंप्रदाय, दत्तसंप्रदाय, महानुभाव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांचाही अभ्यास केला, कारण त्यातून समर्थांच्या सांप्रदायिक वेगळेपणाची, कार्याची ओळख झाली तसेच त्या त्या प्रमुख संतांबरोबर समर्थांचे वेगळेपणही लक्षात आले.

सज्जनगड संस्थानतर्फे मासिक प्रसिद्ध होत असते. त्यातील लेखांतून खूप माहिती मिळाली. तसेच त्या मासिकाच्या कार्यकारी संपादकांकडून अनेक ग्रंथाची माहिती मिळविली. याशिवाय 'सज्जनगड मासिक सेवा परिवार' हा एक व्हॉट्सअॅप समूह आहे. त्यातूनही बरीच माहिती उपलब्ध होते. आतापर्यंत अनेक शंकांचे निरसनही त्या माध्यमातून केले आहे.

समर्थांच्या कार्याची चाफळ, शिवथरघळ आणि सज्जनगड ही प्रमुख ठाणी होती, केंद्रे होती. त्यामुळे या स्थळांना भेटी देऊन तिथे मिळणारे साहित्य अभ्यासले, त्यांच्या अनेक शिष्य–महंतांची यादी मिळाली. तेथील सेवकांकडून खूप कथा ऐकायला मिळाल्या. समर्थस्थापित मठांच्या भौगालिक माहितीबरोबरच, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व, त्या मठनिर्मितीचा हेतू अभ्यासला त्यांच्या अनेक मठांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथे असलेल्या तत्कालीन मठाधिपतींकडून माहिती मिळविली. त्यांच्या बरोबर केलेल्या चर्चेतून खूप माहिती मिळाली आणि संशोधनाला योग्य दिशा मिळत गेली.

आत्तापर्यंत या संदर्भात झालेले संशोधन कार्य माहित करून घेतले. वर्षातून एकदा सज्जनगड संस्थेतर्फे समर्थ संप्रदायातील मठाधिपतींचे संमेलन होते. त्या संमेलनांना उपस्थित राहून अनेक मठांची माहिती मिळविली. मठांचे तत्कालीन मठाधिपतींची व्याख्याने ऐकून, त्यांच्याबरोबर चर्चा करून फक्त मठांची, महंतांची चरित्रे समजून न घेता त्यांच्या निर्मितीची

पार्श्वभूमी समजून घेतली. त्या मठांच्या निर्मितीचे समर्थांचे असलेले धोरण, नियोजन, मठांचे कार्य समजावून घेतले यामुळेच लेखनात एक प्रकारची जाणीव निर्माण करता आली.

## प्रकरण चौथे

# समर्थ रामदासांचे मठ आणि महंत

# प्रकरण चौथे

# समर्थ रामदासांचे मठ आणि महंत

## ४.० प्रस्तावना

समर्थ रामदास यांचा ठोसर या ऋग्वेदी आणि जमदग्नी गोत्र असणाऱ्या घराण्यात जन्म झाला. सूर्याजीपंत आणि राणूबाई या सात्विक, धार्मिक दांपत्याच्या पोटी त्यांच्या विवाहानंतर अनेक वर्षांनी मारूतीयांच्या अंशाने प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांच्या आशीर्वादाने समर्थांचा म्हणजेच नारायणाचा जन्म झाला. त्यांचे कर्तृत्व त्यांच्या लहानपणी खेळातून, खोड्यातून जाणवले. प्रत्यक्ष प्रभूरामचंद्रांनीच त्यांना लहानपणीच अनुग्रह दिला. स्वतःच्या विवाह मंडपातून पलायन करून थेट नाशिकला टाकळी येथे ते आले आणि पुढे बारा वर्षे खडतर तपःश्चर्या केली. त्या काळात त्यांची जडणघडण सुरू झाली. पुढील बारा वर्षे समर्थांनी संपूर्ण देशात तीर्थाटन करून देशाची स्थिती जाणून, त्यानंतर कृष्णातीरी राहून आपल्या सामाजिक कार्याला सुरूवात केली. मठ–महंत निर्मितीला सुरूवात करून, छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यसंस्थापनेच्या कार्यात सहाय्य केले. छत्रपतींच्या निर्याणानंतर दोन वर्षांनीच समर्थांनी आपला अवतार संपवला. समर्थांचे वाङ्मयसुद्धा अफाट आणि परिपूर्ण आहे.

मराठीतील प्रमुख संप्रदायांचे नाथ, महानुभव, वारकरी, दत्त यांचे तत्कालीन परिस्थितीनुसार प्रवर्तन झाले आणि त्यांनी कार्यही केले परंतु काही कारणांमुळे त्यांचा प्रभावही कमी होत गेला. सतराव्या शतकात समर्थांनी 'रामदासी संप्रदायाचे' प्रवर्तन करून आध्यात्म, भक्तीमार्गाबरोबरच सामाजिक कार्य केले. इतर चारही संप्रदायामध्ये हा संप्रदाय वेगळा ठरला.

श्रीरामचंद्रांच्या आज्ञेप्रमाणे आणि शहाजीराजे भोसले यांच्या सल्ल्याप्रमाणे समर्थांनी महाराष्ट्रात कृष्णातीरी स्थिर होऊन सामाजिक कार्याला सुरूवात केली. चाफळ हे त्यांचे सामाजिक चळवळीचे प्रमुख केंद्र होते. समर्थांचे राजकारण, समाजकारण हे चतुःसुत्री कार्य होते. स्वधर्मसंस्थापना आणि स्वराज्यसंस्थापना या कार्यात समर्थांच्या कार्याचे मोठे सहाय्य होते.

स्वधर्मसंस्थापना आणि स्वराज्यस्थापना यामध्ये समर्थांनी केलेले सामाजिक कार्य आव्हानात्मक होते. समाजात बदल करण्यासाठी त्यांनी जी चळवळ उभी केली त्यात

मुख्यत्त्वेकरून मठ आणि महंतनिर्मिती होती. गुणवंत शिष्यांना त्यांनी महंती देऊन मठस्थापना करून त्याचे अधिपतीपद दिले. त्यावेळी देशाची सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती उध्वस्त झाली होती, तेव्हा या महंतांनी मठांद्वारे मोठे समाजकार्य करून समाजस्थिती बदलली.

मसूर परगणा, कृष्णतीरावरील प्रदेश हा शहाजीराजे भोसलेंच्या अखत्यारीत होता आणि आजूबाजूचा प्रदेश शिवरायांच्या स्वराज्यात यायला सुरूवात झाली होती. त्यामुळे हा सर्व प्रांत समर्थांनी मठनिर्मितीसाठी निवडला. सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, लातूर, सोलापूर तर तामिळनाडूमध्ये, आंध्रमध्ये समर्थांनी मठस्थापना केली. या मठांचे अधिपतीही अत्यंत हुशार, सद्गुणी, आध्यात्मिक हाते. त्यामधे वेणाबाई, दिनकरस्वामी, कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, दिवाकर गोसावी, दत्तात्रयस्वामी, भीमस्वामी वगैरे महंतांनी केलेले सामाजिक कार्य, वाङ्मयीन कार्य उल्लेखनीय आहे.

## **४.१ समर्थांचा जन्म, बालपण, पुरःश्चरण आणि तीर्थाटन**

'समर्थ रामदास' या नावावरूनच दोन थोर अर्थ दिसतात. 'रामदास' म्हणजे प्रत्यक्ष प्रभू श्रीरामचंद्रांचा दास आणि 'समर्थ' म्हणजे अर्थातच समर्थ. हा श्रीरामांचा दास सर्वार्थाने समर्थ असणार यात कणमात्र शंका नाही. प्रत्यक्ष श्रीरामच अवतारी असून पूर्ण पुरूष, सर्वगुणसंपन्न होते, मग त्यांचा हा शिष्य सर्वार्थाने समर्थ म्हणला गेला यात नवल नाही. मग अशा समर्थांचे पूर्वजही काही सर्वसाधारण नसणार, तर ते सुध्दा अतिशय सदाचारी, गुणसंपन्न आणि आध्यात्मिकच होते.

समर्थांचे संपूर्ण नाव 'नारायण सूर्याजीपंत ठोसर' या ठोसर घराण्याचा सुपत्र हा 'नारायण' आणि ठोसर घराण्याचे मूळपुरूष श्री. कृष्णाजीपंत ठोसर. हे ठोसर कुल देशस्थ ऋग्वेदी आणि जमदग्नी गोत्राचे होते.

कृष्णाजीपंत ठोसर कर्नाटकातील बीदर प्रातांत स्थायिक होते. पण त्या काळी यवनांची आक्रमणे होत होती आणि यवनांच्या अघोरी अत्याचारांमुळे तेथील प्रजा अत्यंत त्रासली होती. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' या ठोसर कुटुंबाची दुष्काळामुळेही वाताहात झाली. इ.स. ९६२ मध्ये कृष्णाजीपंत आपल्या सर्व परिवारासह महाराष्ट्रात आले. ''[१] या

घराण्याने कर्नाटक प्रांत सोडला तो कायमचा. मराठवाड्यात येऊन गोदावरी नदीच्या उत्तरेस मौजे हिवरे येथे ते स्थायिक झाले. कृष्णाजीपंत जसे सदाचारी होते तसेच ते खूप कर्तबगारदेखील होते. बीड येथे आल्यावर त्यांनी स्वत:च्या हिकमतीवर अठ्ठेचाळीस गावांची वसाहत केली आणि या गावाचे कुलकर्णीपण व ज्योतिषीपण स्वत:कडे घेतले. पुढे आपणही आपल्या कतृत्त्वाने स्वत:च्या हिकमतीवर नवीन गावांची वसाहत करून आपली नवीन वृत्ती संपादन करावी असे त्यांचा धाकटा पुत्र दशरथपंतांना वाटले. त्यानंतर त्यांनी मौजे हिरवे सोडले. गंगेच्या उत्तर तीरावर पुढे जवळच पडपांढरी येथे आले या ठिकाणी फक्त गवळ्यांची वस्ती होती. तेथील प्रमुख लखमाजी गवळी चांगला होता. नवीन वसाहत, नवीन गाव वसविण्याची हिम्मत दशरथपंतांमध्ये अजून वाढली. त्या गावाला त्यांनी 'मौजे जांब' असे नाव दिले, त्याचबरोबर जांब शिवाय इतर अकरा गावे वसविली. दशरथपंतांनी लखमाजीच्या मदतीची जाण ठेवून त्यांस पाटीलकी दिली. अर्थात कुलकर्णीपण आणि ज्योतिषीपणाची वृत्ती स्वत:कडे ठेवली. यावरून दशरथपंतही काही सामान्य नव्हते याची पूर्ण जाणीव होते.

ठोसर घराण्याचे मूळपुरूष कृष्णाजीपंत ठोसर यांच्यापासून समर्थ हे तेविसावे पुरूष. ठोसर घराण्याची वंशावळ अशी आहे. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' १)दशरथपंत, २)रामाजी दशरथ, ३)हरि रामाजी, ४)नीराजी हरि, ५)शिवाजी निराजी, ६)विष्णू शिवाजी, ७)बहणाजी विष्णू, ८)आत्माराम बहाणाजी, ९)गणेश आत्माराम, १०)धोंडो गणेश, ११)आत्माराम धोंडदेव, १२)गुंडो आत्माराम, १३)नीराजी गुंडो, १४)आत्माराम नीराजी, १५)शिवाजी आत्माराम, १६)विष्णू शिवाजी, १७)केसो विष्णू, १८)रामाजी केसो, १९)भानजी रामजी, २०)सूर्याजी भानजी, २१)त्र्यंबक सूर्याजी, २२) सूर्याजी त्रिंबक ''[२]

सूर्याजी त्रिंबक

गंगाधर उर्फ श्रेष्ठ उर्फ रामीरामदास     नारायण उर्फ समर्थ रामदास

## ठोसर घराण्याची उपासना

समार्थांसारख्या असामान्य पुरूषाच्या घराण्याची उपासनाही असामान्य अशीच होती. समर्थांच्या पूर्वीच्या बावीस पिढ्यांनी कृष्णाजीपंतांनी सुरू केलेली सूर्योपासना अव्याहत चालू

ठेवली होती. पिढीतील प्रत्येकाने आपल्या पित्याकडून उपासनेचा, परंपरांचा वारसा मनापासून घेतला होता. निवृत्तीनाथांनी जसा भक्तीचा मार्ग दाखविला आणि ज्ञानदेव जसे म्हणतात, '' भक्तीचे अगदी इवलेसे रोप लावले आणि त्याचा केवढा मोठा वेल झाला आणि अगदी उंचीवर म्हणजे गगनावरी गेला. '' समर्थांच्याही घरात उपासनेचा भक्तीचा वृक्ष ज्या निष्ठेने, श्रध्देने लावला जोपासला, त्याच भावनेने समर्थांनी केवढे रूप त्याला पुढे दिले.

ज्या घराण्यात, कुलात, पिढ्यांपिढ्या सातत्याने परमेश्वराची उपासना असते, त्या कुळाला भगवंताचा आशीर्वाद मिळतो, त्यांचे कृपाछत्र लाभते. अशा प्रकारे समर्थांचे वडिल सूर्याजीपंत यांच्या पदरात किती पुण्याई पडली होती आणि त्याच पुण्याईत भर घालून त्यानी ती समर्थांच्या पदरात टाकली होती. त्याच पुण्याईचा, दैवी कृपेचा उपयोग करून घेऊन समर्थांनी स्वतःच्या उपासनेच्या, बुध्दीमत्तेच्या जोरावर प्रशंसनीय राष्ट्रकार्य केले.

भक्तवत्सल आणि पवित्र विचार असणाऱ्या सूर्याचीपंतांची दानत अगदी चोख होती. अशा सत्शील प्रवृत्तीच्या सूर्याजीपंतांची अर्धांगिनीही अशीच सात्विक, सुशील होती. अर्थातच 'राणूबाई' समर्थांची आई. अगदी सर्वार्थाने एकमेकांना साजेसे सूर्याजीपंत आणि राणूबाई हे दांपत्य होते. राणूबाईंनीही आपल्या पतीच्या धार्मिक आणि तपस्वी वृत्तीची नेहमी कदर केली या संदर्भात श्री. अनंतराव रामदासी यांनी संतचरित्रकार महिपती यांच्या विजयग्रंथातील गृहस्थाश्रमाचे वर्णन दिले आहे. ''गृहस्थाश्रमी असोनी जाण। परमार्थ साधनी त्यांचे मन। वाचेसि नेम केला त्याने। असत्य वचन न बोले।।२०।।''[3] यातून सूर्याजीपंत आणि राणूबाई एकमेकांना अनुरूप असलेले सात्विक, मर्यादशील, भगवन्निष्ठ असे दांपत्य होते हे लक्षात येते. या पतीपत्नींना उशीरा का होईना पण जी अपत्ये झाली ती असामान्यच झाली. राणूबाईंच्या पतीनिष्ठतेचे आणि सूर्याजीपंतांच्या मनाच्या मोठेपणाचे, विचारशील वृत्तीचे दर्शन एका प्रसंगातून घडते. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,''एकदा मकरसंक्रांतीच्या पर्वकाळात राणूबाईंनी गोदास्नान करून, गोदामातेचे पूजन करून प्रार्थना केली की,'' विवाहास पंचवीस वर्षे होऊनही अपत्यप्राप्ती नाही. पुत्र झाला तर त्याचं नाव गंगाधर ठेवीन. ''[४]

ज्या घराण्यात, घरात, कुटुंबात नित्यनियमाने मनःपूर्वक, श्रध्देने सूर्योपासना कली जाते, भगवंताचे अनुष्ठान केली त्या घरावर सूर्यनारायणांनी, भगवंतांनी कृपा न केली तरच नवल.

राणूबाईही सूर्याजीपंताबरोबर पूजाअर्चा, व्रतवैकल्य आदी करायच्या. सूर्याजीपंताची उपासना जरी नि:स्वार्थी असली तरी त्यांच्या मनात कुठे तरी एक उदासीनता असायची. कारण त्यांना ओढ होती ती श्रीरामचंद्रांच्या दर्शनाची आणि कृपाप्रसादाची, त्यासाठी त्यांचे मन कित्येकदा व्याकूळ व्हायचे शिवाय निम्मे आयुष्य जाऊनही आपल्या संसारवेलीवर एखादेही फूल उमलू नये याचे थोडे तरी वाईट वाटत असायचे. सूर्याजीपंतांच्या मनात काही वेगळेच विचार येऊ लागले की एखाद्या निवांत ठिकाणी कायमचे वास्तव्य करून उर्वरीत आयुष्य घालवावे. अर्थातच केलेल्या अनुष्ठानांचे उद्यापन करूनच. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' कोठे तरी क्षेत्रवास करून शेष आयुष्य भगवद्सेवेत निवांतपणे घालवावे आणि त्याकरिता चालू असलेल्या अनुष्ठादिकांचे उद्यापन करून घ्यावे. अशी योजना पत्नीच्या संमतीने सूर्याजीपंतांनी ठरविली. ''[५]

यासाठी सूर्याजीपंतांनी माघ सप्तमी अर्थात रथसप्तमीचा म्हणजेच एक महत्त्वाचा आणि धार्मिक दिवस, निश्चित केला. त्याच माघ सप्तमीला सूर्याजीपंताच्या आयुष्यात एक विलक्षण घटना घडली, ती म्हणजे भगवान सूर्यनारायणांचे त्यांना दर्शन झाले. उद्यापनाच्या शेवटी पूजेत सूर्यनारायण एका तेज:पुंज, अगदी तेजस्वी कांतीच्या वृध्द ब्राम्हणाच्या रूपात प्रगट झाले. सूर्याजीपंतांनी नम्रतेने त्या ब्राम्हणाला वंदन केले. त्याची विचारपूस केली आणि त्या ब्राम्हणाच्या उत्तराने सूर्याजीपंतांना आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्याची जाणीव झाली. त्या ब्राम्हणाचे उत्तर विलक्षण होते. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात म्हणतात,'' सूर्याजी, मी प्रत्यक्ष भगवान सूर्यनारायण आहे. तुझ्या चर्मचक्षूंना माझे उग्ररूप सहन होणार नाही म्हणून मी या सौम्यरूपात तुला दर्शन देत आहे. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला, काय हवं असेल ते माग. ''[६] पण सूर्याजीपंतांनी जी इच्छा व्यक्त केली ती पाहून वाटते की समर्थ सुध्दा असेच नि:स्वार्थी आयुष्य जगले, कोणत्याही भौतिक सुखांच्या मागे न लागता फक्त राष्ट्रकार्याचा वसा घेतला आणि तो पूर्ण केला. तो वारसा त्यांच्या पित्याकडूनच आला. सूर्याजीपंतांनी अशी इच्छा व्यक्त केली की, भगवंतानी त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत उपासना करून घ्यावी आणि निरंतर कृपा ठेवावी. तसेच श्रीरामचंद्रांच्या दर्शनाला आपण किती आसुसलेले आहोत, त्यांचे दर्शन एकदा झाले तर आयुष्याचे सार्थक होईल तेव्हा येत्या रामनवमीपर्यंत श्रीरामदर्शन होईल. असा सूर्याजीपंतांना आशीर्वाद मिळाला.

याचवेळी राणूबाईही तेथेच होत्या. त्यांनी सूर्यनारायणांना नम्रतेने वंदन केल्यावर त्यांनाही सूर्यनारायणांनी वर मागायला सांगितला. स्त्री स्वभावानुसार प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात नैसर्गिक, स्वाभाविक भावना असतात, त्याप्रमाणे राणूबाईंच्या मनात मातृत्त्वाच्या वरदानाचाच विचार चमकला. संततीसाठी त्या खूप आसुसलेल्या होत्याच म्हणून त्यांनी पुत्रसंततीची इच्छा बोलून दाखविली. अर्थातच पुत्रसंतती भगवद्भक्त असणारीच हवी हे मात्र सांगायला विसरल्या नाहीत. आणि राणूबाईंना तो अलौकिक आशीर्वाद मिळाला. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' आमचीही हीच इच्छा आहे. त्याकरिताच आम्ही आलो. मदंशेकडून एक व मारूती अंशे एक असे दोन पुत्र तुम्हास होतील. ''[७] श्रीसूर्यनारायणांच्या प्रत्यक्ष दर्शनाने आणि आशीर्वाद सूर्याजीपंत आणि राणूबाईंना अगदी कृतार्थ वाटले.

ठोसर घराण्यातच सूर्यनारायणांची आणि श्रीरामचंद्रांची उपासना चालत असल्याने रामनवमी खूप मोठ्या उत्साहात थाटामाटात साजरी होत असे. सूर्याजीपंतांकडे हे रामनवमीचे नवरात्र अगदी भक्तीभावाने साजरे व्हायचे. यावेळच्या रामनवमीला मात्र त्यांचा उत्साह अगदी ओसंडून वहात होता. कारण अर्थातच रामनवमीपर्यंत त्यांना श्रीरामचंद्रांचे साक्षात दर्शन घडणार होते. चैत्र शुध्द अष्टमीला रात्री सूर्याजीपंतांचे मेहुणे भानजीबुवा बोदलापूरीकर कीर्तनाला उभे राहिले आणि सूर्याजीपंत अगदी तल्लीन होऊन गेले. मध्यरात्रीच्या समयाला आणि कीर्तन अगदी रंगात आले असताना एक विलक्षण प्रसंग घडला. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,''एक येसकर आला आणि सूर्याजीपंतांना म्हणाला,'' मारूती मंदिराजवळ सरकारी अधिकारी आले आहेत. तुम्हाला वह्या घेऊन बोलावले आहे. ''[८] कीर्तनातील तल्लीनतेमुळे सूर्याजीपंतांना उठून जायचे जीवावर आले होते. परंतु त्यांची कर्तव्यनिष्ठता जागी होती म्हणून त्या कर्तव्यपूर्तीसाठी सूर्याजीपंत येसकरा पाठोपाठ निघाले आणि मारूतीमंदिरापाशी पोहोचले मात्र तिथे कुणीच न दिसल्यामुळे येसकराला त्याबद्दल विचारण्यासाठी सूर्याजीपंत गेले पण येसकर कुठेच दिसलाच नाही. आलोच आहोत तर मारूतीरायाचे दर्शन तरी घ्यावे म्हणून सूर्याजीपंत मंदिरात प्रवेशले आणि नमस्कार करतात तोच संपूर्ण मंदिर एका अद्भूत प्रकाशाने आणि तेजाने भरून गेले. त्या तेजाने सूर्याजीपंत क्षणभर बेसावध झाले, स्तब्ध झाले, पण सावध होताक्षणीच त्यांच्या नजरेला जे दिसले ते पाहून त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. समोर धनुर्धारी, मेघवर्णीय, तेजस्वी कांतीचे श्रीरामचंद्र, लक्ष्मण आणि सीतामाई उभे होते. सूर्याजीपंतांनी मोठ्या

भारावलेल्या अवस्थेत नमस्कार केला आणि तसेच हात जोडून श्रीरामचंद्रांसमोर उभे राहिले. श्री. अनंत रामदासी या संदर्भात लिहितात,'' सूर्यनारायणाचे वरदान खरे झाले ना? प्रभूरामचंद्रांनी विचारले. पुन्हा साष्टांग नमस्कार घालून पंत म्हणाले,'' तेव्हा त्या रूपाने दर्शन दिले, आज या रूपाचे दर्शन झाले. सूर्यवरदानाप्रमाणे दोन पुत्र तुम्हांस होतील. ''[१] सूर्याजीपंतांना सूर्यनारायणाचे वरदान आठवले. मदंशेकडून एक आणि मारूती अंशे कडून एक असे दोन पुत्र आपणास होणार. याचवेळेस सूर्याजीपंतांच्या इच्छेनुसार श्रीरामचंद्रांनी त्यांना मंत्रोपदेशही केला. त्यांच्या मस्तकावर हात ठेवून मोठ्या प्रेमाने अनुग्रह दिला.

यावर सूर्याजीपंत सद्गतीत झाले. त्यांनी श्रीरामचद्रांकडे नियमित दर्शन घडण्याची इच्छा दर्शविली. रामरायांनी पण इच्छापूर्तीसाठी त्यांना रामपंचायतन दिले आणि अमोल वरदान देऊन श्रीरामचंद्र अंतर्धान पावले. समर्थांच्या पित्याचे भाग्य कसे वर्णावे? पुत्रप्राप्तीच्या वरदानाने तर सूर्याजीपंत कृतार्थ झाले. त्यांच्या भगवद्निष्ठेचे फळ त्यांना मिळाले. सूर्याजीपंतांनी नंतर या मूर्तींची प्रतिष्ठापना करून त्यांची नियमितपणे अर्चना सुरू केली. आजही या मूर्ती त्यांच्या जांब येथील श्रीराममंदिरात आहेत.

भगवंताच्या दर्शनाने आणि वरदानाने हे दांपत्य खूप आनंदीत झाले होते. त्यांच्या सुखी संसारात कुठे तरी उदासपणा होता. मग मात्र श्रीरामचंद्रांनी दिलेल्या मूर्तीची राणूबाई मनोभावे पूजा करू लागल्या. अधीर होऊन प्रथम अपत्याचे मुख बघायला, त्याचा स्पर्श अनुभवायला त्या आतुर व्हायला लागल्या. अगदी स्वाभाविक अपेक्षा असणाऱ्या राणूबाई मग खरंच मातृत्वाकडे वाटचाल करायला लागल्या. सूर्याजीपंत आणि राणूबाईंएवढाच आनंद आख्ख्या जांब गावास झाला. गावातील समस्त लोक ठोसर घराण्याच्या या वारसाची वाट बघत होते. कारण जांब ही पवित्र भूमी, ठोसर घराण्यांची सव्वासहाशे वर्षांची श्रीरामोपासना, सचोटीने, प्रामाणिकपणे भूषविलेले सूर्याजीपंतांचे कुलकर्णीपद, यामुळे जांब अधीर झाले होते.

मूळच्याच सुस्वरूप असलेल्या राणूबाई गर्भारपणात तेजस्वी दिसायच्या. आपल्या पोटी अलौकिक संतती जन्म घेणार आहेत या कल्पनेनेच त्या रोमांचित होत. रामरायांच्या सेवेत त्या इतक्या गुंतल्या होत्या की पहिल्या बाळंतपणाला माहेरी, वडिलांकडे आसनगावला जायला अजिबात तयार झाल्या नाहीत. सूर्यनारायणांचा आशीर्वाद असणारे अपत्य इथेच जन्मावे याची

त्यांनी इच्छा प्रकट केली आणि लवकरच राणूबाईंनी आपल्या पहिल्या अपत्यास जन्म दिला. श्री. अनंत रामदासी या संदर्भात लिहितात,'' वरदानाप्रमाणे सूर्याजीपंतांस प्रथम अपत्य लाभ शके १५२७, विश्वावासू संवत्सरी मार्गशीर्ष शु.१३ गुरूवारी झाला. ''[१०] सूर्यादयाच्या वेळेस राणूबाईंचा हा पहिला पुत्र जन्मला. श्रीकृष्णाच्या जन्माने जसे अवघे गोकुळ आनंदले, श्रीरामांच्या जन्माने अवघी अयोध्या आनंदली तसेच सूर्याजीपंत आणि राणूबाईंच्या या पहिल्या अपत्याच्या जन्माने अवघे जांब आनंदले. पूर्वी राणूबाई गोदामातेला अपत्यासाठी नवस बोलल्या होत्या. त्यानुसार या मुलाचे नाव गंगाधर ठेवण्यात आले.

एकनाथ महाराजांचे आणि सूर्याजीपंत – राणूबाई यांचे नाते होते. एकदा सूर्याजीपंत आणि राणूबाई गंगाधरला घेऊन पैठणला गेले आणि त्याला एकनाथ महाराजांच्या पायावर ठेवले श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' हा परमभक्त, थोर श्रीरामोपासक होऊन गंगातीरी जगदोध्दार करील. आमच्या शेषकार्याचा काही भाग हा उचलील. हा श्रेष्ठ आहे. ''[११] त्यांच्याच आशीर्वाद गंगाधरांना 'श्रेष्ठ' म्हणून संबोधले जाऊ लागले. सूर्याजीपंत आणि राणूबाईंचे हे पहिले पुत्ररत्न अतिशय भाग्यवानच होते. जांबवासीयसुध्दा आनंदले होते. सर्वच जणांचा हा लाडका असा मुलगा होता. आपल्या आई–वडिलांप्रमाणेच श्रेष्ठही सुसंस्कृत आणि सदाचारी होते, त्यांनी आपल्या मातापित्यांची कधी आज्ञा मोडली नाही. श्रेष्ठसुध्दा सूर्यनारायण आणि श्रीरामचंद्रांच्या आशीर्वादानेच जन्मले, तेही भगवंतांचाच कृपाप्रसाद होते त्यामुळे अगदी लहानपणापासूनच श्रेष्ठ रामोपासना करीत होते.

सूर्याजीपंत आणि राणूबाईंनी श्रेष्ठांवर खूप चांगले संस्कार केले. योग्यवेळी, योग्यप्रकारे त्यांचे शिक्षण झाले आणि वयाच्या सातव्या वर्षी अंबडकर देशमुखांच्या मुलीशी श्रेष्ठांचा विवाह झाला. श्रेष्ठांना आपल्या वयाच्या दहाव्या वर्षीच आपल्याला गुरू असावा असे प्रकर्षाने वाटू लागले. तेव्हा त्यांनी सूर्याजीपंतांकडे अनुग्रह देण्याची मागणी केली. यावर सूर्याजीपंतांनी श्रेष्ठांना 'गावाबाहेरच्या मारूतीमंदिरात जाऊन मारूतीरायांकडेच अनुग्रह मागावा असे सुचविले.' त्याप्रमाणे श्रेष्ठ मारूतीमंदिरात गेले. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,''श्रेष्ठांनी हनुमान मंदिरात बसून फाल्गुन शुध्द प्रतिपदेपासून श्रीमारूती कवचाचे अखंड पाठ सुरू केले. अकरा दिवस त्यानी निष्ठेने पाठ केले. फाल्गुन शुध्द एकादशीस इ.स. १६१५ साली त्यांना

मारूतीरायाचे दर्शन झाले.''[१२] अनुग्रहाची मागणी केल्यानंतर मारुतीरायांनी श्रीरामचंद्रांचे ध्यान केले आणि श्रीरघुपतींनी श्रेष्ठांवर प्रसन्न होऊन त्रयोदशाक्षरी मंत्राचा उपदेश करून त्यांचे 'रामीरामदास' असे नाव ठेवले आणि उपासनाक्रम चालू ठेवण्याची आज्ञा केली. असे हे मोठे भाग्यवान गंगाधर, श्रेष्ठ आणि श्रीरामांचा 'रामीरामदास.'

श्रेष्ठांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा उत्तम समन्वय साधला होता. दोन्ही कर्तव्यांची जाण ठेवून त्यांनी कधीही घरप्रपंचाकडे दुर्लक्ष केले नाही आणि आपली उपासना चालू ठेवली. समर्थांनी पुढे जे सांगितले, 'आधी प्रपंच नेटका' ते श्रेष्ठांनी आधीच करून दाखविले होते. श्रेष्ठांनी महाराष्ट्रात खूप प्रवास केला आणि आपले शिष्य सुध्दा केले. 'भक्तीरहस्य' आणि 'सुगमोपाय' असे त्यांचे दोन ग्रंथ प्रसिध्द झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या काळात शिव आणि वैष्णव यांच्यात मोठे शत्रुत्व होते त्या काळात 'भक्तीरहस्य' या ग्रंथातून त्यांनी शैववैष्णव समन्वय साधला आहे. सर्व संप्रदायामध्ये समन्वय साधणे ही काय सोपी गोष्ट नव्हती. पण ती श्रेष्ठांनी करून दाखविल्यामुळे लोक त्यांचा खूप आदर करू लागले.

### राणूबाईंचे विलक्षण डोहाळे

सूर्याजीपंत आणि राणूबाई या तपस्वीदांपत्याला प्रत्यक्ष सूर्यनारायण आणि श्रीरामप्रभूंचे वरदान लाभले त्याप्रमाणे पहिला पुत्र मदंशेकडून आणि दुसरा पुत्र मारुती अंशेकडून होणार होता. त्याप्रमाणे मदंशेकडून 'श्रेष्ठ' या पुत्राचा जन्म झाला. यानंतर त्यांच्या पोटी मारुतीराया जे प्रभूरामचंद्रांचे निस्सिम भक्त होते, ते जन्म घेणार होते. खरंच ही गोष्टच किती सुंदर, केवढी आनंददायी होती. मारुतीअंशेकडून झालेला पुत्र कृष्णातीरी राहून जगाचा उद्धार करणार होत आणि मोठा इतिहास घडविणार होता. एक निस्पृह पुरुष राणूबाईंच्या उदरात असताना त्यावेळी राणूबाईंना लागलेले डोहाळे काही सामन्य असतील का? नाहीच! आणि ती स्त्रीसुद्धा म्हणजे राणूबाईही सामान्य होत्या का? एक असामान्य स्त्री एका असामान्य मुलाची माता होणार होती. सूर्योपासना आणि रामोपासना करण्याऱ्या ठोसर घराण्यातील एक आदर्श, चारित्र्यवान आणि तेजस्वी पुरुषाची पत्नी होती ती.

राणूबाईंच्या गर्भकाळात एक विलक्षण प्रसंग घडला. हा प्रसंग अतिशय अर्थपूर्ण होता. त्या घरातून निघून गेल्या आणि गावाबाहेरील एका झाडाखाली बसून म्हणू लागल्या 'मला संसारच

आवडत नाही' आणि त्यांनी रामनामाचा गजर सुरु केला. सर्व जांब गाव तेथे जमले होते. एका पंडिताला त्यांची ही अवस्था दाखवली तर त्याने राणूबाईंच्या अवस्थेला उच्च पारमार्थिक अवस्था म्हणून संबोधले. त्यानंतर त्या संपूर्ण रामायण सांगायला लागल्या. मग मात्र सूर्याजीपंतांची खात्री पटली की काही बाहेरची बाधा नाही, तर प्रत्यक्ष राणूबाईंचा गर्भ अर्थातच मारुतीरायाच हे रामायणाचे कथन करीत आहे. म्हणजेच राणूबाईंच्या अंगात हनुमंत प्रवेशले होते. त्या गर्भायोगे त्या रामस्वरुप झाल्या होत्या. अशा या भाग्यशाली राणूबाईंच्या पोटात परमेश्वराचा अंश वाढत होता.

तुकाराम महाराजांची 'शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी।' ही उक्ती प्रत्येकालाच ठाऊक आहे. सूर्योपासना आणि रामोपासना करणाऱ्या ठोसर कुलातील सूर्याजीपंत आणि राणूबाई यांच्या उदरी अशी तशी संतती जन्म घेईल का? शंकाच नाही. याच्या उलट समर्थांसारखा पुत्र ज्या माता–पित्यांच्या घरात, त्यांच्या पोटी जन्मणार तेच किती कुलीन, भाग्यवंत असणार. श्री. अनंत रामदासी या संदर्भात लिहितात,'' जांबचे ठोसर घराणे सदाचार व श्रीरामोपासना यात सहाशे वर्ष भगवंदिच्छेने जणू काय भिजत होते. तेवढे उपासनाबळ कमी होईल म्हणूनच की काय सूर्याजीपंतांच्या प्रखर सूर्यासाधनेची भर दोन तपेपर्यंत त्यात पडत राहिली आणि नंतर हा श्रीमहारुद्राचा अवतार तेथे प्रकट झाला. ''[१३]

समर्थांसारख्या व्यक्तीमत्त्वाने ज्या काळात जन्म घेतला, तो काळ अगदी नाजूक सामाजिक स्थिती असलला होता. एका ग्रहणदशेतच आपले राज्य होते आणि ग्रहणाने ग्रासलेल्या आपल्या देशाला भगवंतांच्या एखाद्या अवतारकार्याचीच गरज होती.

आतापर्यंत म्हणजे युगेयुगे जेव्हा जेव्हा पृथ्वीवर अराजक निर्माण झाले, तेव्हा तेव्हा परमेश्वराने खलनिर्दालन करायला, मानव धर्माच्या रक्षणाकरिता अवतार घेतले आहेत. रावणाचे निर्दालन करायला श्रीरामचंद्र अवतरले, कंसाचे निर्दालन करण्यासाठी श्रीकृष्णांनी अवतार घेतला. तसेच हिंदूधर्म, ब्राम्हणधर्म, क्षत्रियधर्म, जे अधोगतीला जात होते, त्यांना संजीवनी देण्यासाठी, समाजात जागृती निर्माण करण्यासाठी समर्थ जन्मले.

या जगात सतराव्या शतकातही त्यावेळी समाजाची, देशाची, मुस्लीम राजसत्तांच्या आक्रमणामुळे जी काय दयनीय अवस्था झाली होती ती खरोखरच अतिशय वाईट होती. तिला

झुगारण्याकरिता, तिचा सोक्षमोक्ष लावण्याकरिता, बुडालेला धर्म, राज्य परत आणण्याकरिता भगवंतांनी एक निश्चित योजना आखली ती म्हणजे समर्थ रामदास जे मारूतीरायांचा अंश होते आणि छत्रपती शिवराय जे शिवाचा अंश होते, त्यांना या पृथ्वीतलावर पाठविण्याची, त्यांच्या या अवतार कार्यामुळे जो देश अनेक त्रासांनी, तापांनी त्रासला होता तो त्रासमुक्त होणार होता आणि अगतिक झालेल्या देशाला एक आशेचा किरण मिळणार होता.


अशा कुलाचारी 'ठोसर' घराण्यात समर्थांचा जन्म झाला. सूर्याजीपंतांच्या या घराण्याची आद्य देवता म्हणजे साक्षात भगवान सविता–सूर्यनारायण. अर्थातच सूर्याजीपंतांची उपासनाही श्रीराम जे सूर्योकुलोत्पन्नच होते, त्यांचीच होती. प्रखर देवतेची उपासना चालणाऱ्या या घरात उपासनाही तितकीच प्रखर होती. मग ज्या सूर्यनारायणाच्या तेजावर अवघ्या पृथ्वीचे चराचर सृष्टी चालली आहे, त्या सूर्यनारायणाच्या उपासनेचे फळही तेवढेच प्रखर, तेजस्वी असेच असणार होते. समर्थांचा जन्मही या घराण्याच्या उपास्य देवतेच्या म्हणजे श्रीरामचंद्रांच्याच जन्मतिथीला आणि एवढेच नाही तर त्याच जन्मवेळेला झाला. हा काय विलक्षण योगायोगच.

चैत्र शुध्द नवमी शके १५३० ला दोन प्रहरी म्हणजे ज्यावेळी सूर्याची तेज प्रखरता सर्वात जास्त असते, त्यावेळी म्हणजे दुपारी बारा वाजता हे अलौकिक, प्रखर तेजस्वी व्यक्तीमत्त्व जन्मले. रामनवमीच्या दिवशी जन्म म्हणजे केवढे महान भाग्य. जसा श्रीरामचंद्रांचा अवतार मोठ्या कार्यपूर्तीसाठी झाला होता तसा समर्थांचा अवतारही मोठ्या कार्यपूर्तीसाठीच झाला. दोघांचेही कार्य अप्रतिम. शके १५३० चा चैत्र महिना, त्यात शुध्द नवमी म्हणजे श्रीरामनवमीचा हा दिवस म्हणजे 'सोनियाचा दिन'च होता. या पृथ्वीवर, आपल्या देशात मांगल्य नांदायला आले होते. सूर्योपासक ठोसर घराण्याचा, सूर्याजीपंत आणि राणूबाई यांच्या पोटी कुलदिपक जन्मला. एखाद्या सकस भूमीत उत्तम, शुध्द बीज असे बीज पेरले अणि पर्जन्यही अनुकूलच झाला तर त्या वृक्षाला फळही तसेच सकस, उत्तम येते. अगदी तसेच एका महातपस्वी दांपत्याच्या पोटी उत्तम बीज पेरले गेले आणि नऊ मासांच्या गर्भकाळात उपासना झाली आणि समर्थांच्या रूपाने उत्तम फळ या घराण्याच्या वृक्षाला लागले.

अयोध्येत श्रीरामांची माता कौसल्या यांच्या पोटी जेव्हा श्रीराम जन्मले त्यावेळी जसे पवित्र, मंगल, आनंददायी वातावरण होते, अवघी प्रजा ज्या क्षणाची आतुरतेने वाट पहात होती,

अगदी तसेच वातावरण जांबमध्ये होत. सूर्याजीपंत आणि राणूबाईंच्या पोटी जन्मणाऱ्या दुसऱ्या कुतूहलाची वाट जांबची प्रजा बघत होती. नऊ दिवस रामनवमीचा उत्सव मोठ्या धामधूमीत चालला होता. दुपारी रामनवमीला रामजन्माचे कीर्तन जेव्हा सुरू झाले तेव्हाच राणूबाईंना प्रसूतीवेदना सुरू झाल्या आणि रामजन्माच्या कथेचा शेवट आणि गुलाल उधळण्याचा जो क्षण, तोच क्षण एका भगवद्भक्त महापुरूपाच्या जन्माचा होता. मूळातच रामनवमीचा उत्साह आणि त्यातच समर्थांच्या जन्मामुळे अधिकच भर पडली, सर्वांचा आनंद द्विगुणीत झाला कारण प्रत्यक्ष हनुमंतच भूतलावर अवतरले. भारतभूमीचा उध्दार करायला एक महापुरूष जन्मला. सूर्याजीपंत आणि राणूबाई कृतार्थ झाले. हा दुसरा कुलदीपक म्हणजे सूर्यनारायणांचाच प्रसाद होता. म्हणूनच त्याचे नाव 'नारायण' ठेवले. खरंच! समर्थांच्या जन्माचा हा क्षण कसा वर्णावा? अभ्युदयच क्षण तो. आपल्या कुशीतल्या बाळाला म्हणजेच नारायणाला राणूबाईंनी कुशीत घेतले. सुखाच्या लहरी त्यांच्या अंगावर खेळायला लागल्या. सूर्याजीपंतही आनंदाने हरखून गेले होते, त्यांच्या वदनावर धन्यता होती. सूर्याजीपंतांनीही त्याला छातीशी धरले, एका अलौकिक पुत्राकडे, एका भगवान भक्ताकडे ते कुतुहलाने बघत होते. त्यांचेही वात्सल्य उफाळून येत होते.

एका असामान्य कुलात, 'ठोसर' घराण्यात जन्मलेला हा नारायण भगवान सूर्यनारायण आणि श्रीरामचंद्रांचा कृपाप्रसाद होता. रामनवमीच्या दिवशी, रामजन्माच्याच वेळेस जन्मलेल्या नारायणाची जन्मकुंडली अगदी उत्कृष्ट होती. एका महापुरूषाचीच कुंडली ती, त्याचे अद्विितीय कर्तृत्वच सांगत होती. पूर्वी मूल जन्मल्या जन्मल्याच त्याची जन्म कुंडली बनवण्याची पध्दत असे. त्याप्रमाणे नारायणाचीही कुंडली पंडित श्रीराम जोशी यांनी तयार केली. सूर्याजीपंतांना समजावून सांगताना पंडितांचे नेत्र विस्फारत होते आणि आपल्या पुत्राची भविष्यवाणी ऐकताना सूर्याजीपंतांचे भान हरपत होते, त्यांना सार्थ अभिमान वाटत होता नारायणाचा. या आगळ्या वेगळ्या व्यक्तीमत्वाची ही कुंडली श्री. सुनील चिंचोलकर यांनी 'चिंता करितो विश्वाची' या ग्रंथात ती नमूद केली आहे.




अशी या लहानग्या बाळाची कुंडली असामान्य ग्रहदशेची होती. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' एकूणच ही पत्रिका एका महान संताची, योग्याची, एका संघटकाची, एका महान तपस्व्याची, एका थोर ग्रंथकाराची, राष्ट्रकल्याणाचे ध्येयाने प्रेरित झालेल्या एका थोर योग्याची आहे. ''[१४] अर्थातच पंडितांनी मांडलेली कुंडली, भविष्यवाणी, नारायणाच्या बाबतीत अगदी तंतोतंत खरी झाली. हा नारायण पुढे 'समर्थ रामदास' झाला. समर्थांची बुध्दीमत्ता आणि स्मरणशक्ती खरोखरंच तीव्र होती. त्यांनी मोठा पारमार्थिक अधिकार संपादन केला. प्रचंड लेखन केले. अफाट लोकसंग्रह करून 'स्वरूप' संप्रदायाची निर्मिती केली. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या सानिध्यात राहून कार्य केले, राजकीय क्षेत्रात त्यांना साथ दिली. अशा या समर्थांचे शिष्यत्व महाराजांनी पत्करले आणि समर्थांना गुरूपद प्राप्त झाले. समर्थांनी कठोर साधना केली. तप आचरले. आजन्म ब्रह्मचर्य राखले. समर्थांसारख्या या महान योग्याने, संताने, तपस्व्याने राष्ट्राच्या कल्याणावर, हितावरच आपले लक्ष केंद्रित केले. त्यांच्या पत्रिकेपेक्षा काकणभर जास्तच सरस ठरले समर्थ. त्यांच्या कार्यावरून पुढे सिध्द झालेच की एका अफाट आणि अचाट कार्यासाठीच त्यांचा जन्म झाला.

## समर्थांचे बालपण

आपल्याकडे एक म्हण आहे. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात.' मोठेपणीचे कर्तृत्व लहानपणातच त्याची चुणूक दाखविते. समर्थांच्या बाबतीत खरोखरच ही म्हण तंतोतंत जुळली. त्यांचे असामान्यत्व त्यांच्या लहानपणीच्या अनेक घटनांमध्ये जाणवायचे. जशा श्रीकृष्णांच्या बाललीला सर्वश्रुत आहेत, तशाच समर्थांच्याही बाललीला सर्वांना ठाऊक आहेत. त्यांच्या अनेक गुणांची झलक त्यांच्या बालवयातच पहायला मिळाली होती. गिरीधरस्वामींनी 'समर्थप्रताप' या ग्रंथात कही बाललीला वर्णिल्या आहेत. समर्थांचा आणि गिरीधरस्वामींचा सहवास झाला होता. तेव्हा बऱ्याच आठवणी समर्थांनी त्यांना सांगितल्या असण्याची शक्यता आहे.

लहानपणी समर्थ म्हणजे नारायण हूड, अवखळ, खट्याळ, खोडकर, उनाड, हट्टी असा होता. क्षणार्धात एक करताना दिसत असे तर दुसऱ्या क्षणी नजरेसमोरून गायब होत असे. या खोडकर गुणांबरोबरच नारायण तेवढाच साहसी, धीट, अचाट होता, त्याचबरोबर त्याच्यात धूर्तपणा आणि समयसूचकताही होती. तो एकाजागी काही फार ठरायचा नाही. घटकेत इकडे, घटकेत तिकडे असा सारखा तो फिरत असे. एकतर घरात नारायण फारसा थांबायचा नाही आणि थांबलाच तर काही तरी खोड्या करत असे. आईला म्हणजे राणूबाईंना तो सतत सळो की पळो करून सोडत असे. बाहेर गेला तरी काही तरी उद्योग करीत राही. 'सतत उद्योगशीलता' हा त्याचा गुण त्याच्या मोठेपणीही दिसत राहिला. झाडांवर चढणे, फांद्यावरुन तो इकडून तिकडे जाणे, चिंचा, आवळे, कैऱ्या नेम धरून पाडणे असे त्याचे चाले, गलोल तो छान खेळत असे. गोट्यांचा मात्र नारायणाला अतोनात छंद होता, पुढे मोठेपणीही समर्ध लहानमुलांबरोबर गोट्या खेळत असत. त्यामुळे ते मुलांशी खूप जवळीक साधत असत, त्यायोगे मोठेपणी अशीचे मुले पारखून घेत असत.

नारायणाच्या घराण्यात सूर्योपासना असल्यामुळे त्याचे वडिल सूर्याजीपंत नियमितपणे सूर्यनमस्कार घालीत. म्हणूनच सूर्यनमस्काराचे संस्कार त्याला लहान वयातच मिळाले. नारायण सूर्यनमस्काराबरोबरच इतर खेळ, पोहणे, पळणे, उड्या मारणे यात तरबेज होता. त्यामुळे लहानपणापासून नारायणाची तब्बेत दणकट, कणखर आणि बांधीव होती, याचमुळे पुढील काळात समर्थांनी कृष्णा नदीच्या काठावर, घाटावर लहान आणि तरूण मुलांकडून सूर्यनमस्कार नियमितपणे घालून घेतले, त्यांना व्यायामाची गोडी लावली आणि शारीरीक ताकद आणि क्षमता कशी वाढविली पाहिजे, कशी कायम राखली पाहिजे याची शिकवण दिली. नारायणाला नदीत पोहण्याला प्रचंड आवडत असे, तो पट्टीचा पोहणारा होता. गोदावरीला पूर आला की तो बिनधास्तपणे पाण्यात उड्या टाकत असे. त्याच्या याच पोहोण्याच्या विलक्षण क्षमतेमुळे जेव्हा स्वतःच्या विवाहमंडपातून गुपचूप निघाला आणि थेट गोदावरीच्या पाण्यात उडी टाकली. नाशिकच्या दिशेने पुढे खूप अंतर नारायणाने पोहून काटले आहे. त्याच्या बुध्दीची तल्लखता दिसते कारण तेव्हा त्याला नाशिक नक्की कुठे आहे हेच माहित नव्हते, पण दिशा माहीत होती. श्री. गो.नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' इकडेच मावळतीला, गोदामाता वाहात येते त्या दिशेला आपल्या आराध्य दैवताची, रामरायाची नगरी आहे, नासिक. ''[१५]

मोठेपणीही समर्थांनी नदीच्या भोवऱ्याचे देखील आव्हान स्वीकारत. समर्थ तीर्थाटन करीत असताना एकदा तापी नदी ओलांडायची वेळ आली त्या तापीचे पात्र गोदावरी नदीच्या पात्रापेक्षाही खूप विस्तिर्ण होतेच, शिवाय प्रवाह ही मोठा होता. नावेची खरं तर सोय होती, पण पट्टीचे पोहणारे समर्थ कसे जातील नावेतून? पयस्विनी तापीत उतरण्यातच त्यांना धन्य वाटत होते. श्री.गो.नी.दांडेकर या संदर्भात लिहितात,'' आपण यावें, मी पोहून पात्र पैल करायचे म्हणतो. ''[१६] एका माणसाच्या विनंतीवरूनही तेव्हा नावेतून काही समर्थ गेले नाहीत, पोहतच ते पैलतीरावर गेले. अर्थात त्यावेळेस पोहून जाण्याची किंमत समर्थांना वेगळ्या प्रकारे मोजायला लागली. कारण तेथपासून मोगलाईचा टापू सुरू होत होता. नारायण चालतानाही अगदी झपाझप पावले टाकीत असे. त्याच्या बरोबरीला कोणी टिकत नसे. मोठेपणीही समर्थ तसेच चालायचे. अगदी मोजकेच म्हणजे कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, दिवाकर गोसावी इ.जणच त्यांच्याबरोबरीने चालू शकत. लग्न मंडपातून निघालेल्या नारायणाने जांब पासून नाशिक पंचवटीकडे जात असताना असेच कितीतरी अंतर काटले होते. कधी कधी एखाद्या तांड्याबरोबर पण तो चालत असे. तांड्यातील लोकांनाही तो आपल्याबरोबर चालताना दिसायचा पण दृष्टीआड झालेला त्यांना कळतही नसे, इतका तो सर्वांना लवकर मागे टाकून पुढे जाई.

नारायणाला जसे खेळ मनापासून आवडायचे, शक्तीचे प्रयोग आवडायचे तसंच त्याला निसर्ग पण खूप आवडत असे. निसर्गसौंदर्याची त्याला जाण होती. गावाबाहेर ओसाड ठिकाणी, डोंगरदऱ्यात, जंगलात मनसोक्त फिरताना नारायणाला कधी कशाची भिती वाटत नसे. कृष्णातीरी समर्थांनी कार्याची सुरुवात केली, तरी ते कधी फारसे एके ठिकाणी थांबत नसत. त्यांना कडे–कपाऱ्या, घळी अतिशय प्रिय होत्या. नवीन नवीन घळी शोधण्यात त्यांना फार रस असे. घळींमध्ये चिंतन, मनन, लेखन वगैरे योग्य प्रकारे होते असा त्यांचा विश्वास होता.

'उद्योगशीलता' हा नारायणाचा फार मोठा गुण होता. सतत काही तरी उद्योगात तो व्यग्र असायचा. त्याचा मेंदू अहोरात्र क्रियाशील रहायचा. लहानपणीच्या नारायणाच्या या उद्योगांना जरी खोड्यांचे स्वरूप असले तरी मोठा झाल्यावर याच उद्योगांनी, क्रियाशीलतेने मोठे कार्य घडविले. त्यांचा मेंदू सतत कार्यरत असल्याने त्यांचे काम नियोजनबध्द असायचे, त्यामुळेच प्रत्येक गोष्टीवर सखोल अभ्यास करून त्यांनी आडाखेबंद योजना आखल्या आणि त्या अंमलातही

आणल्या. याच उद्योगशीलतेमुळे समर्थांनी केवढे मोठे समाजप्रबोधन केले, आणि शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात मोलाचा वाटा उचलला. नारायणाच्या डोक्यात नाना तऱ्हेचे प्रश्न डोकवायचे. मुख्यत: निसर्गातील बाबींचे प्रश्नांत तो नेहमी हरवून जात असे. खोड्या करण्यात, खेळण्यात त्याला जेवढा असे रस तेवढाच प्रश्नांची उत्तरे मिळविण्यातही विलक्षण रस असे. उदा. वारा कोठून येतो? जातो कोठे? पावसाला वरून कोण धाडते पृथ्वीवर? छोट्या बी मधून मोठा वृक्ष कसा येतो? ज्या जातीचे बी पेरू त्याच जातीचे झाड कसे येते? नारायणाएवढे प्रश्न एखाद्या शेतकऱ्यालाही कधी पडले नसतील. सूर्याची उगवती दिशा एक, मावळती दुसरी, चंद्र एकदा वाढत वाढत जातो, एकदा कमी कमी होतो या निसर्गातील रोजच घडणाऱ्या घटनांचे त्याला रोज आश्चर्य वाटे. राणूबाईच काय, कोणालाच, याच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता येत नसत.

जशा कृष्णलीला गोड वाटतात, तशाच नारायणाच्या बाललीला गोड तर आहेतच पण त्याच्या प्रत्येक लीलेला एक वेगळा कंगोरा असे. त्या लीला नारायणाच्या पुढील आयुष्याशी जोडलेल्या वाटतात, त्यांच्या कार्याशी निगडीत वाटतात. गिरीधरस्वामींनी समर्थप्रतापात जे सुंदर बालपण दाखविले आहे, ते वाचले की नजरेसमोर तंतोतंत नारायण येतो आणि त्या लीलांचे मोठेपण जाणवते. चंद्राच्या कलेप्रमाणे तर समर्थ दिवसेंदिवस वाढत होतेच. पण चंद्राची उपमा न देता श्रीरामांची योग्य, कारण चंद्र अमावस्येस लुप्त होतो, पण श्रीरामचंद्र नित्यज पूर्ण होते. कटीसूत्र बांधणे, जावळ काढणे, शेंडी ठेवणे, आईच्या समवेत जेवण करणे, या गोष्टी ब्राह्मणधर्माप्रमाणे यथापध्दतीने चालत. ह्याच ब्राह्मणधर्माचे पुढे त्यानी रक्षण केले, टिकवून ठेवला. ब्राह्मणधर्माची जी अधोगती होत चालली होती अर्थातच परकीयांमुळे ती रोखली. नारायणाला अन्नसेवनाऐवजी फळेच जास्त आवडत. चमचमीत, चविष्ट अन्नात ते कधीच गुंतले नाहीत. पुढे भिक्षेत मिळालेले अन्नही समर्थ पाण्यात बुडवित, चवी नष्ट करीत आणि मगच सेवन करीत. सर्वच मातांप्रमाणे राणूबाई पण हौसेने नारायणाच्या अंगावर सोन्याची बाळलेणी घालीत. मात्र अलंकारांमध्ये, उंची वस्त्रांमध्ये समर्थांना नंतरही कधी रस वाटला नाही. छत्रपती शिवरायांनी त्यांना स्वत: वस्त्रालंकार, धनसंपत्ती देऊनसुध्दा त्यांनी स्वीकार केला नाही. स्वत:च्या सुखापेक्षा त्यांना समाजहितात जास्त रस होता. सदोदीत नारायणाची दृष्टी अंतर्मुख असायची. अतिशय चंचळ आणि चळवळ्या स्वभावाचा नारायण भगवंताच्या विषयात मात्र स्थिर होत असे. समर्थांची दृष्टी समाजकार्याला वाहून घेतल्यावरसुध्दा अंतर्मुखच असायची. उद्योगशीलतेमुळे उगाचच वेळ

दवडणे त्यांच्या रक्तातच नव्हते. नारायण आपल्या वडिलांशी आणि मोठा भाऊ श्रेष्ठ यांच्याशी नेहमी मर्यादशील वागे. रामनामस्मरण नेहमी करी. त्याचे गुण हनुमंतासारखेच होते. समर्थ पुढेही नेहमी असेच मर्यादशील वागत. पण कधी कधी ते जशास तसे, धटास धट असे वागले तरी ते परिस्थितीनुसार वागले आहेत. नारायण लहान असताना एक सामुद्रिक म्हणजे हस्तरेषा पाहून भविष्य सांगणारा जांब गावात आला. त्याने नारायणाचा हात पाहिला आणि चक्क आनंदाने नाचू लागला. सामुद्रिकाने सांगितले की नारायण मोठेपणी वैरागी होईल आणि खूप मौलिक सामाजिक कार्य करणार आहे. या जगताच्या उध्दारासाठी, विश्वाच्या त्रिविध ताप क्षमविण्यासाठीच त्याचा जन्म आहे. असे सांगितल्यावर त्या ब्राह्मणाला प्रत्यक्ष श्रीरामांचा प्रसाद मिळाला, तो खूप हर्षभरित झाला. कारण नारायणाने म्हणजे प्रत्यक्ष समर्थांनी स्वतःची कंठमाळ सामुद्रिकाला प्रेमाने घातली. पण हे भविष्याचे गुपित राखायला सांगितले, या सामुद्रिकानेही ही गोष्ट कोणास सांगितली नाही.

समर्थांचा प्रत्येक गुण, प्रत्येक घटना हेच सांगते की समर्थ विश्वाच्या उध्दारासाठीच जन्मले. त्यांची प्रत्येक लीला म्हणजे त्यांच्या भविष्याच्या कार्याची झलकच होती. या तर नारायणाच्या सहज केलेल्या लीला होत्या. पण त्याने अनेक चमत्कार केले आहेत, त्यावरुन लक्षात येते की समर्थांची किती योग्यता होती, महानता होती, अधिकार होता.

एकदा नारायण इतक्या खोड्या काढत होता की राणूबाई फारच चिडल्या. हातात चिपाड घेउन त्याला धाक दखवायला गेल्या तर रडून तोंडाचा आ पसरला, आणि त्याच्या मुखात राणूबाईंना अवघ्या देवतांचे दर्शन झाले. राणूबाईंमधील आईच्या मनाला एकदा वाटले की नारायण फारच इकडे तिकडे, रानावनात भटकल्याने रोडावला आहे. म्हणून त्यांनी नरस्या देवाला नवस केला तर नरसोबाने राणूबाईंना स्वप्नात येऊन सांगितले की, ''तुझा मुलगा म्हणजे साक्षात मारुतीरायच आहे.'' म्हणजे चिंता करायचे काय कारण होते? ज्या मारुतीरायांचे चिंतन केल्यावर भूतेखेते घाबरुन पळून जातात, त्या मारुतीरायाचा हा अवतार, मग त्याला काय भूतबाधा होणार?

जांब मधील सूर्याजीपंतांच्या श्रीराममंदिरातील रामनवमीचा उत्सव म्हणजे सर्वात मोठा उत्सव असे. अगदी मंगलमय वातावरणात ठोसर कुटुंबीय त्यांच्या घराण्याला साजेल असाच

मोठ्या धामधुमीत तो साजरा करीत. एका वर्षी रामनवमीच्या वेळी दुष्काळी स्थिती होती, धान्याची कमतरता वाटत होती. त्यामुळे सूर्याजीपंत काळजीत होते, तर नारायणच वडिलांना धीर देतो आणि समजूत घालतो की रामराया आहे, तो काही कमी पडू देणार नाही, उत्सव नीट पार पडेल. सूर्याजापंतानी नारायणाला दहा–अकरा पायली गहू काढायला बळदात उतरविले. नारायण बळदातून घमेली भरुन गहू काढून घ्यायला लागला. कितीही गहू त्याने काढले तरी त्यातील गहू काही संपेनात. अशा रीतीने समर्थांचा हात धान्याला लागला आणि एवढ्या दुष्काळात भरपूर धान्य मिळून उत्सवाला पुरेल एवढे धान्य मिळाले. तर दुसऱ्या प्रसंगात अर्ध्या जेवणावळी संपल्या आणि तूपच संपले. सूर्याजीपंत बैचेन झाले. जेव्हा नारायण तूपाच्या घागरीपाशी गेला आणि तूपाची घागर पूर्ण भरलेली. इथेही समर्थांची नजर पडली आणि घागरभर तूप मिळाले. ज्या घराने येवढ्या निष्ठेने रामोपासना केली आणि समर्थांसारख्या महापुरुषाचा जन्म ज्या घरात झाला तिथे रामरायाची कृपा झाल्याशिवाय राहील का? त्या घरात कशाची कमतरता राहील काय? असा हा उत्सव चिंतेच्या वातावरणात पण चांगला पार पडला. समर्थांची चिंता नुसत्या घरापुरती मर्यादीत नव्हती, तर समाजाची चिंता जास्त होती. त्या दिवशीचा उत्सव हा त्यांच्या घरातील नव्हता तर अवघ्या जांबवासीयांचा होता.

नारायण कितीही हूड, खोडकर असला तरी त्याला कर्तव्याची जाणीव होती. एकदा काही अधिकारी कमानिमित्त सूर्याजीपंतांच्या घरी आले. त्यांना बसायला खाली सतरंजी घातली होती. तर तो अधिकारी सूर्याजीपंताना म्हणाला 'आपण ग्रामाधिपती, गावचे कुलकर्णी, पण बसायला उंच अशी बैठक नाही, आश्चर्य आहे' या वेळेस नारायण तिथेच होता. त्याने त्यांचे ' अष्टजुपती' म्हणजे त्याचे खास आठ मित्र होते, त्याना बोलावले आणि सर्व जणांनी रानातून लाकडे गोळा करुन आणली, बांधकामाचे इतर साहित्य आणले आणि मोठ्या कल्पकतेने एका रात्रीत सुंदर बैठक तयार केली. दुसऱ्या दिवशी अधिकारी परत आले आणि त्यांनी ही बैठक पाहिली आणि आश्चर्याने तोंडात बोटे घातली.

समर्थांच्या कपाळावर उजव्या बाजूस एक टेंगूळ होते. तेच आवाळू म्हणून प्रसिद्ध होते. त्या टेंगूळाची कथा मजेशीर आहे. श्री अनंत रामदासी या संदर्भात लिहितात,'' नारायण चल खाली ये लवकर, आई बोलावते आहे. तुला पाह्यला आले ''[१७] नारायणाचे वय लग्नाचे झाले

होते. पूर्वी १०व्या–११व्या वर्षीच विवाह होत. त्यामुळे त्याला सगळेजण चिडवाचिडवी करत होते, त्यावरुन नारायण इतका रागावला की डोहाच्या काठावरील उंच झाडावर जाऊन बसला. गावचे उपाध्ये, सर्व मुले त्याला खाली यायचा आग्रह करीत होती. शेवटी नारायणाने झाडावरुन डोहात उडी टाकली. बराच वेळ तो वर येईना मात्र श्रेष्ठांनी बोलावल्यावर नारायण पाण्याच्या बाहेर आला. त्यावेळी कपाळाला खडक लागून जे टेंगूळ आले ते कायमचे राहिले.

या प्रसंगातून एक गोष्ट लक्षात येते की समर्थांना लहानपणापासूनच जाणीव होती की, आपल्याला विवाह – संसार काही करावयाचा नाही, आपण वैरागीच होणार आहे, आपले कार्यक्षेत्रच वेगळे असणार आहे. त्यामुळे चिडवाचिडवीत सुद्धा नारयणाला लग्नाचा विषय निघालेला आवडत नसे. वधूपिते घरी येत तेव्हा नारायण त्यांना परस्पर बाहेर जाऊन सांगत असे की त्याला गृहस्थाश्रम करायचा नाही. काही वेगळ्या कर्यासाठी श्रीरामांनी मला आज्ञा केली आहे. त्यामुळे मी विवाह करणार नाही. चार कांता म्हणजे चारी मुक्ती, तेव्हापासून समर्थांची दृष्टी तशीच होती.

समर्थांच्या तीव्र आणि तल्लख बुध्दीमत्तेमुळेच त्यांनी एवढ्या मोठ्या राष्ट्रकार्याचा पसारा सांभाळला. सर्व चांगले गुण त्यांच्या अंगी होते. शिक्षणाच्या बाबतीत पण त्यांचा हात कुणी धरणारा नव्हता. नारायणाच्या अचाट बुध्दीमत्तेला तेवढ्याच अचाट स्मरणशक्तीची जोड होती. त्यामुळे नारायण अगदी एकपाठी होता. एकदा एक अभ्यास केला की तो त्याच्या कायमचा लक्षात राही. त्यामुळे रोज उठून शाळेत जायचे आणि तेच तेच शिकत रहायचे हे त्याच्या बालमनालाही कधी पटले नाही अन् राणूबाईंना वाटे नारायणाने रोज इतर मुलांबरोबर शाळेत जावे आणि अभ्यास करावा. श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' धूळपाटीवर आपण अवघी अक्षरे दोन दिवसातच उरकली, वारंवार पुस्ती कशास गिरवायची, ते आनल्या ध्यानात येईना. ''[१८] नारायणाचे रूद्र, रूपावली, समासचक्र अशी अनेक पाठांतरे सांगितल्या सांगितल्या कंठगत झाली होती. असा हा मूळचाच अफाट बुध्दी असलेला नारायण कशाला शाळेत जाऊन घोकंपट्टी करेल आणि पाटीवर तेच तेच धडे गिरवेल? त्यामुळे समर्थांचे शिक्षण फारच लवकर झाले.

असे अनेक प्रसंग आहेत की जे समर्थांच्या कर्तृत्त्वाची, अवतार कार्याची जणूकाही त्यांच्या बालपणातच ग्वाही देत होते. त्यांच्या असामान्य कर्तृत्त्वाची ती नांदीच होती. हा नारायण शात म्हणून कमी पडत नव्हता. त्याची कुशाग्र बुध्दीमत्ता, शक्ती, युक्ती, कामाचा झपाटा यातून खरोखरच हनुमंताचा अवतार होता याची मनोमन साक्ष पटते.

समर्थांच्या जीवनातील एक खूप महत्त्वाची, त्यांच्या जीवनाला अर्थ देणारी एक गोष्ट म्हणजे त्यांना प्रत्यक्ष हनुमंताने आणि प्रभुरामचंद्रांनी दर्शन देऊन अनुग्रह दिला होता. ठोसर घराण्यात सूर्याजीपंतांच्या पिढीत, सूर्याजीपंत आणि त्यांची दोन्ही सुपुत्र म्हणजे गंगाधर उर्फ श्रेष्ठ आणि नारायण उर्फ समर्थ यांना प्रत्यक्ष रामरायांनी मंत्रोपदेश केला होता.

नारायणाला लहानपणीच अनुग्रहाची ओढ लागली होती. तो श्रेष्ठांमागे नेहमी अनुग्रह घेण्यासाठी लकडा लावत असे पण श्रेष्ठ नेहमीच '' तू लहान आहेस, पुढे बघू '' असे सांगून नारायणाची बोळवण करीत. अगदी वारंवार हे घडत होते. मग एक दिवस नारायण श्रेष्ठांवर रुसून मारूतीच्या देवळात जाऊन बसला आणि अनुग्रहाच्या ओढीने सतत तीन दिवस, तीन रात्री त्याने ध्यानावस्थेत काढले. तेव्हा शेवटी मारूतीरायांनी नारायणाला दर्शन दिले आणि त्याच्या चिंतेचे कारण आणि काय इच्छा आहे हे विचारले. एवढ्या लहान वयातल्या मुलाला प्रत्यक्ष देवाने विचारले, तुला काय हवे तर काय मागू काय नको अशी अवस्था त्या मुलाची होईल. पण नारायण कोणी सामान्य मुलगा थोडीच होता? अत्यंत नम्रपणे त्याने आपली प्रामाणिक इच्छा मारूतीरायांना सांगितली. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' आम्हास अनुग्रहाची इच्छा आहे, दुसरे काही एक मागणे नाही. ''[१९] नारायणाने असे मारूतीरायाला कथन केल्यावर अजून एक सुंदर योग म्हणजे अगदी दुग्धशर्करा योगच आला. मारूतीरायांनी या लहानग्या नारायणासाठी प्रभूरामचंद्रांना प्रकट होण्यास विनविले आणि श्रीरामराया प्रगट झाले. श्री. अनंतराव रामदासी या संदर्भात लिहितात,'' श्री रघुपतींनी दर्शन देऊन, मस्तकी वरदहस्त ठेवून आज्ञा करिते जाले की, ' तुम्हास मारूतीचे अंशे करून निर्माण केले आहे, तरी कलिप्रथम चरणात म्लेंछमय पृथ्वी जाली, धर्म बुडाला, वेदमर्यादा राहिली नाही, .... यास्तव तुम्ही कृष्णातीरास जाऊन जगदोध्दार करावा आणि .... सिसोदे यांच्या कुळी शिवनामे करून राजा उत्पन्न होणार आहे त्यास सहाय्य होऊन अनुग्रह देऊन धर्मस्थापना करावी. ''[२०]

हा आशीर्वाद आणि आज्ञा बघता जाणीव होते ती समर्थांचा हा केवढा मोठा अधिकार आहे. प्रत्यक्ष रामरायांनी एवढ्या स्वतः लहान वयातील नारायणाला आशीर्वाद आणि आज्ञा एकाचवेळी करावी, ती सुध्दा जगाच्या उद्धाराची. तेव्हा जी काही सामाजिक परिस्थिती होती, त्याची जाणीव करून दिली त्याबरोबरच समर्थांच्या पुढील कार्याची दिशा स्वत: रामरायांनी समर्थांना सांगितली आणि त्यावेळेस छत्रपती शिवयायांचा जन्म, एक जाणता राजा होणार हे सुध्दा आधीच सांगितले. मुळात वैराग्याकडे कल असलेला, तल्लख बुध्दीमत्तेचा, अतिशय समजूतदार, उत्तम प्रकृतीचा नायायण तेव्हा अवघा १०–११ वर्षाचा होता. यातूनच समर्थांच्या योग्यतेची जाणीव होते जेव्हा प्रत्यक्ष श्रीरामचंद्र एखाद्या मुलावर एका मोठ्या सामाजिक, राजकिय आणि पारमार्थिक जबाबदारी देतात. समर्थांची ही थोरवी, हे कर्तृत्व आणि पुढचे कार्य पाहून आपण आश्चर्यचकित होतो. श्रीविष्णूंचा अवतार असलेले श्रीरामचंद्र आणि हनुमंताचा अवतार असलेले समर्थ एकरूपच होते. म्हणजेच धर्मस्थापनेचे, देशाच्या–समाजाच्या उध्दाराचे कार्य स्वत: श्रीविष्णूंनी म्हणजे अवघ्या पृथ्वीच्या पालनकर्त्याने समर्थांवर सोपवले अर्थातच समर्थांनीही ही आज्ञा शिरसावंद्य मानून ती कामगिरी बजावली यात तीळमात्र शंका नाही.

समर्थांनी म्हणजे नारायणाने केलेला खोडकरपणा, खट्याळपणा पाहिला तर समर्थांच्या भारदस्त व्यक्तीमत्वाकडे बघून ते खरं वाटत नाही. पण प्रत्येक प्रसंगामध्ये आपण बघतो की समर्थांचा स्वभाव, गुणवैशिष्ट्यांची झलक, चुणूक त्यात दिसते. या खोडकर नारायणाच्या आयुष्याला लहानपणीच म्हणजे अवघ्या १०व्या –११व्या वर्षी एक कलाटणी मिळाली, त्याच्या जीवनाची दिशाच बदलायला लागली. त्याच्या 'चिंता करितो विश्वाची' या वाक्यावरूनच कळते की, नारायण जसा हूड होता तेवढाच उत्तम समज असलेला होता.

श्रीरामचंद्रांचा अनुग्रह मिळाल्यावर नारायण तसा गप्प गप्पच असायचा. जवळ जवळ वर्षभर तो मौनव्रतातच होता जणू पण खोडकरपणा मात्र तसाच होता. कारण तो त्यांच्या स्वभावातच होता. तसं सूर्याजीपंतांचे निधन नारायण लहान असतानाच झाले. श्रेष्ठ मुळातच लहानपणापासूनच शांत स्वभावाचे होते. त्यामुळे त्यांचा  आईला कधी त्रास होत नसे. पण नारायण दुप्पट त्रास द्यायचा. राणूबाई खरंच त्याच्या उनाडपणाला कंटाळल्या होत्या, काही केलं तरी तो त्यांना जुमानायचाच नाही. एकदा राणूबाई नारायणाला खूप रागावल्या. सारखा बाहेर

भटकत राहतो, उनाडक्या करतो, घरात त्याचा पाय ठरत नाही, मोठ्या भावाला मदत करत नाही, जराही कुटुबांची चिंता नाही अशा शब्दांनी त्यांची कानउघडणी केली. आणि याचा मात्र नारायणावर चांगलाच परिणाम झाला. आईचे हे बोल मात्र त्याच्या मनास फारच लागले. म्हणून नारायण एकांतात जाऊन बसला. पद्मासन स्थितीत बसून एवढासा नारायण तपःक्लांत मुद्रेने ध्यानस्थ झाला होता. खूप वेळ तो सापडताच नव्हता. मग मात्र राणूबाई चिंतित मनाने नारायणाला सर्वदूर शोधत राहिल्या. शेवटी अडगळीच्या खोलीत नारायण सापडला. नारायण तर सापडला पण नारायणाचे ध्यान म्हणजे रुप पाहून राणूबाईंना फारच विस्मय वाटला. हा एक द्वाड, खोडकर मुलगा एवढ्या एकांतात शांत कसा काय बसला आहे, असा विचार त्यांच्या मनात आला. ' एकांतात बसून काय करतो आहेस? ' असं राणूबाईंनी विचारल्यावर नारायणाने अतिशय गंभीरपणे उत्तर दिले,'' आई चिंता करितो विश्वाची. ''

राणूबाईंना त्यावेळी त्याचा गभितार्थ कळला नाही. त्यांचे आईचे मन म्हणाले,'' मी याला कुटुंबाची चिंता करत नाही म्हणून म्हणाले तर हा विश्वाचीच चिंता करायला लागला. '' नारायणाच्या जीवनाला इथून एक वेगळे वळण मिळाले. त्या ध्यानस्थ स्थितीत त्यांनी विचार केला असेल '' आपल्याला अवघ्या विश्वाची चिंता करायची आहे, लोकांचे हित बघायचे आहे, श्रीरामांच्या आज्ञेप्रमाणे महत्त्वाचे मोठे कार्य सिध्दिस न्यायचे आहे. '' श्री. शंकर अभ्यंकर या संदर्भात लिहितात,'' निशीदिनी जनचिंता लागलीसे उदारां' या व्यापक भूमिकेवर नारायण अंशावतारी सामर्थ्याने आरूढ झाला होता. ''[२१]

पूर्वी मुलामुलींचे विवाह बालवयातच होत असत. श्रेष्ठांचाही विवाह त्यांच्या वयाच्या अवघ्या ७/८व्या वर्षीच झाला. अंबडकर देशमुखांसारख्या घराण्यातील पार्वती ही मुलगी सांगून आली आणि सूर्याजीपंत असतानाच हा विवाह संपन्न झाला. राणूबाई एका मुलाच्या विवाहाच्या कर्तव्यातून बाहेर पडल्या. आता त्यांना ध्यास लागला होता नारायणाच्या विवाहाचा. खरं तर श्रेष्ठांना कल्पना होती की आपला धाकटा भाऊ म्हणजे नारायण हा काही संसार करणार नाही. त्याचा जन्मच गृहस्थाश्रम करण्यासाठी अथवा गावचे कुलकर्णीपण करण्यासाठी नव्हे तर या देशाचे कुलकर्णीपण करण्यासाठी आहे. खरंतर श्रेष्ठांनी राणूबाईंना बऱ्याच वेळा अप्रत्यक्षपणे सांगितले होते की याच्या लग्नाचा विचार करू नये, हा लग्नबंधनात अडकणार नाही. राणूबाईंना

पण जाणीव व्हायची की हा मुलगा वेगळ्या वृत्तीचा आहे, अवतारी आहे. पण यांच्यातील मातृत्त्व सारखे जागे होई आणि परत नारायणाच्या लग्नाचे विचार त्यांच्या मनात डोकवायला लागत.

'पण चिंता करितो विश्वाची' असे नारायणाच्या तोंडून ऐकल्यावर राणूबाई जरा हादरल्याच. त्यांच्यातील आई विचार करायला लागली. या मुलाचे हे असं काय चाललय? हा विश्वाची चिंता करतो आहे, मला तर याचीच चिंता वाटत आहे, कसे होणार याचे? मग त्यांनी ठरविले यावर एकमेव उपाय म्हणजे याचे लग्नच उरकून टाकू, म्हणजेच हा स्थिरावेल. पण जेव्हा जेव्हा त्या लग्नाचा विषय काढत तेव्हा तेव्हा नारायण चिडचिड करतो हे त्यांना माहीत होते. त्यामुळे आता लाडीगोडीने त्याच्या कलाने घेतले तर आपले इप्सित नक्की साध्य होईल असा त्यांना विश्वास वाटला. त्या लाडाने नारायणास नारोबा म्हणत. त्याच लाडाने त्या नारायणाला लग्नाबद्दल विचारतात, श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' तिने मजला गळ घातली, की बोहेल्यावरी उभा ठाकेस्तोवर ना म्हणू नकोस. ''[२२] समर्थांनी आईला असा शब्द दिला की तीही होकाराने आनंदीत होईल आणि माझे इप्सित साध्य करता येईल. यावर नारायणाने आईला 'होय आई' असे उत्तर दिले. आणि तो खेळायला बाहेर पडला देखील. नारायण अगदी निश्चिंत झाला होता कारण मोठ्या चातुर्याने त्याने आईचे शब्द पकडले होते. म्हणजेच फक्त अंतरपाट धरेपर्यंत लग्नाला नकार द्यायचा नाही, खरं तर लग्न हे अक्षता पडून पुढच्या विधींमध्ये पूर्ण होते त्यामुळे राणूबाईंचा हा नारोबा आपल्या पुढच्या वाटचालीचा विचार करायला मोकळा झाला. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' इंद्रपदाऐवजी निद्रापद मागितले हे त्या भोळ्या मातेच्या ध्यानी त्यावेळी आले नाही. ''[२३] मग मोठ्या हौसेने राणूबाईंनी नारायणासाठी वधूसंशोधन सुरू केले. त्यांनी आपल्या भावाची म्हणजे भानजीबुवा बोदलापूरीकर यांची मुलगी पसंत केली आणि मुहूर्तदेखील ठरवला. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' लग्नाचा मुहूर्त होता फाल्गुन वद्य अष्टमी आणि वेळ होती रात्रीचे ७ वाजून ४० मिनिटे. ''[२४] राणूबाईंच्या घरात धामधूम सूरू झाली आणि लग्नाचे वऱ्हाड आसनगावाहून जांबेला पोहोचले. सगळीकडे समारंभाची लगबग सुरू होती. नारायणाने सीमंतपूजन, रूखवत, हळदीसाठी वगैरे अजिबात नकार दिला नाही. सर्व विधी यथापध्दतीने चालू होते. नारायण कशालाही आढेवेढे न घेता सांगतील ते विधी करत होता कारण आईला आपलं काय इप्सित आहे हे कळू न देता, ते साध्य होईपर्यंत तिला आनंदीत ठेवायचे होते. कारण पुढे जाऊन काहीतरी वेगळेच, असामान्य कृती

करणार आहोत या शंकेला जरासुध्दा वाव ठेवायचा नव्हता, अगदी आईच्या शपथेत सुध्दा अडकायचे नव्हते. या प्रसंगातून समर्थ कितीही हजरजबाबी होते आणि किती पूर्णपणे भानावर असायचे हे समजते. नारायणाने लग्नाला होकार देताना आपण कुठे अडकणार नाही, शिवाय शपथही मोडणार नाही याची पुरेपुर काळजी घेतली होती.

प्रत्यक्ष लग्नसमारंभ सुरू झाला. लग्नाच्या मुहूर्ताची वेळ गोरज म्हणजे संध्याकाळची होती. नारायण बोहोल्यावर चढला, अंतरपाट धरला गेला, वधू पलिकडे उभी राहिली आणि भटजी मंगलाष्टके म्हणू लागले. नारायणाच्या कानावर मंगलाष्टकातील 'सावधान, शुभमंगल सावधान' हे शब्द पडले आणि मेहुण्याला विचारले,'' शुभमंगल सावधान म्हणजे काय? '' तर नारायणाचा मेव्हणा म्हणतो,'' आता सव्वा मणाची बेडी पायात पडणार तुझ्या, सावध व्हायला सांगत आहेत. '' श्री. अनंतराव रामदासी या संदर्भात लिहितात,'' नारायणाने मनात म्हणाले,'मी तर पहिल्यापासून सावधच आहे आणि आता मातुश्रींच्या शपथेतून मोकळा झालो. ''[२५] सावध असलेल्या नारायणाने केवळ मेव्हण्याला बेसावध करण्यासाठी प्रश्न विचारला होता की 'शुभमंगल सावधान' म्हणजे काय?

एका क्षणात नारायणाचा सारासार विचार झाला, क्षणात त्याचा निर्णय झाला जो होणारच होता, की लग्न करायचे नाहीच आपल्याला, आपण आता मुक्त आहोत, आपण पूर्णपणे भानावर असून सावध आहोत. आपल्याला भविष्यात जे कार्य करायचे आहे, त्याची पहिली पायरी चढायची वेळ आली आहे ती म्हणजे वरमाला पडण्याअगोदर बोहोल्यावरून उतरून, लग्नमंडपातून 'सावध' पलायन करून आपण निवडलेल्या मार्गाने निघायचे आहे. कोणत्याही मोहपाशात, कोणत्याही नात्यात न गुंतता. क्षणार्धात नारायण सटकलाही. कुणाच्याही न नजरेला पडता. एवढा लहान नारायण एका मोठ्या, उत्तुंग कार्यासाठी, जगाचा उध्दार करायला सिध्द होत होता, समर्थ होत होता. हा चमत्कार होता का? श्री. शंकर अभ्यंकर या संदर्भात लिहितात,'' वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षी आई, वडिलभाऊ, वहिनी यांचा त्याग करून, ममतेचे अवघे पाश बाजूला सारून आत्मोध्दारासाठी नारायणाने क्षेत्रस्थानाचा रस्ता धरला ही गोष्टच मुळी चमत्कारहून मोठी वाटते. ''[२६]

नारायण तर त्याच्या वाटेवर निघाला. पण इकडे लग्नमंडपात किती हाःहाकार झाला. गोंधळ उडाला. एवढीशी नवरी मुलगी, तिला तर कळलेही नसेल नक्की काय होतय. श्रेष्ठांना कल्पना होतीच असे काही होणार म्हणून तरी त्यांना दु:ख झालेच, पण ते काही बोलले नाहीत. त्यांच्या डोळ्यात अश्रू आले पण त्यांना काय वाटले यावरून त्यांची मानसिकता किती उच्च दर्जाची होती हेही समजते. गिरीधरस्वामी या संदर्भात लिहितात,'' जेष्ठ वैराग्यभाग्य वाटा अनुजे घेतला। कनिष्ठ प्रपंच अग्रजा निघाला। म्हणोनी श्रेष्ठी शोक मांडिला। स्वामी कनिष्ठ तुमचा प्रपंच नोहे।। ''[२७]

श्रेष्ठांना वाटले, प्रापंचिक जीवन हे कनिष्ठ आणि वैराग्य जीवन हे जेष्ठ. कनिष्ठ पुत्राला म्हणजे नारायणाला वैराग्याचा वाटा मिळाला आणि प्रापंचिक जीवनाचा वाटा जेष्ठ पुत्राला म्हणजे स्वत:ला मिळाला पण श्रेष्ठांनी भविष्यात प्रपंच आणि परमार्थाचा योग्य समन्वय गाठला. आईची सेवा केली, पतीची कर्तव्ये पार पाडली, पत्नीस सुखात ठेवले, मुलांवर उत्तम संस्कार केले आणि याच बरोबर भगवंताच्या आराधनेत कुठेही कसूर केली नाही. नारायण कुठेही असला तरी तो सुखात असू दे, अशी प्रार्थना ते नेहमी रामरायांकडे करीत. एक दिवस तो नक्की परत येईल आणि आपली भेट होईल याचीही खात्री त्यांना वाटत असे.

राणूबाईंची अवस्था तर फारच वाईट झाली होती. त्या खूप आक्रोश करू लागल्या, त्यांच्या डोळ्यात सतत अश्रू येत होते. श्रेष्ठ त्यांना खूप समजावयाचा प्रयत्न करत होते. नारायणाला झालेले श्रीरामांचे दर्शन, वरदान, नारायणाच्या असामान्य लीला सांगत होते पण आईवर त्यांच्या बोलण्याचा काही परिणाम होत नव्हता. मात्र त्या माऊलीच्या डोळ्यांवर मात्र नंतर कायमचा परिणाम झाला. कारण एका आईला आपला मुलगा निघून गेला तेही लहानवयात याचे दु:ख मोठे होते. आपण कल्पनाही करू शकत नाही की त्या नारायणाच्या विरहाने किती व्याकूळ झाल्या असतील.

या प्रकारानंतर म्हणजे नारायणाच्या अचानक लग्नमंडपातून निघून जाण्याच्या कृतीने श्रेष्ठांवर फार मोठी जबाबदारी आली ती म्हणजे नारायणाची नियोजित वधू, तिचे काय करायचे? तिचा आणि भानजीगोसावींचा यात काय दोष? आपल्या भावामुळे तिचे आयुष्य उध्वस्त होऊ नये ही प्रामाणिक इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. या वधूचे कुणाशी तरी आजच्या मुहूर्तावर

लग्न लावून देण्याचे त्यांनी योजले. श्रेष्ठांनी अंबडकर देशमुख यांच्या बिजवर मुलाला लग्नासाठी शब्द टाकला आणि भानजी गोसावींसारख्या एका श्रेष्ठ कीर्तनकारांशी नातेसंबंध जोडले जातील या विचाराने आनंदाने भानजी गोसावींनी होकार दिला. अवघ्या काही वेळातच त्याच मंडपात नारायणाच्या नियोजित वधूचे लग्न झाले. श्रेष्ठांनी ही जबाबदारी खूप सहज पण विचार–पूर्वक पेलली आणि जांबमधील ठोसरांच्या घरातील लग्नमंडपातील वातावरण नियंत्रणात आणले.

नारायणाने 'सावध पलायन' केल्यानंतर नातेवाईकांनी, ग्रामस्थांनी नारायणाचा शोध घ्यायचा खूप प्रयत्न केला, पण तो थोडीच सापडणार होता? बोहोल्यावरुन उडी मारून नारायण राणूबाईंचा नारोबा वाऱ्याच्या वेगाने जाऊन थेट गोदामाईच्या कुशीत शिरला होता. विवाहमंडपातून 'सावध पलायन' करून ज्या क्षणी गोदावरी नदीच्या पात्रात उडी घेतली त्या क्षणापासून नारायणाच्या आयुष्याची नवीन प्रकारे जडण घडण सुरू झाली. जिला अनुभवांची, प्रत्यक्ष पाहिलेल्या–घडलेल्या घटनांची जोड होती. डॉ. शं. दा. पेंडसे या संदर्भात लिहितात,'' विवाहाविषयी औत्सुक्य व कुतूहल वाटण्याच्या वयात समर्थांनी केलेला निश्चय त्यांचे जन्मजात वैराग्य आणि असामान्यत्व दर्शवितो. ''[२८]

आता हा नारायण साधा नारोबा राहिला नव्हता. तर समर्थ व्हायला लागला होता. या नारायणाकडून वयाच्या बाराव्या वर्षापासून एक तप तपश्चर्या घडणार होती. त्यानंतरचे एक तप तो तीर्थाटन करणार होता. त्या काळात त्याची परिपक्वता दिवसेंदिवस वाढणार होती कारण त्याच्या संपूर्ण आयुष्याची जडणघडण नव्याने सुरू होण्याचा तो काळ होता.

नारायणाने गोदामाईच्या कुशीत उडी घेतली आणि गोदामाई धन्य झाली, समर्थांच्या स्पर्शाने. नारायण हळदीच्या अंगानेच पाण्यात शिरला होता. त्याने प्रथम हळद पाण्याने धुवून काढली, कारण ही खूण अंगावर ठेवायची नव्हतीच. नारायणाने झेप घेतली पंचवटीच्या दिशेने. त्याला नाशिक ठाऊक नव्हते, पण दिशा ठाऊक होती. गोदावरीचा उगम नाशिकला, त्र्यंबकेश्वरी झाला आहे. म्हणजेच प्रवाहाच्या विरूध्द दिशेने तिच्या उगमाकडे जायचे त्यामुळे कोणाला वाट विचारायचा प्रश्नच नव्हता. गोदामाईला दृष्टीआड होऊ द्यायचे नाही एवढे नारायणाला पक्के कळत होते. आता त्याला ओढ होती पंचवटीच्या रामरायाची. या मूर्तीच्या दर्शनाच्या ओढीने नारायणाने गोदेच्या पात्रात उडी टाकली होती आणि मागचे मागे ठेवून तो पुढे निघाला, मोठ्या धैर्याने,

आत्मविश्वासाने आपल्या कार्यसिध्दीकरता. नारायणा तोपर्यंत जांब गावाच्या बाहेर फारसा म्हणजे पैठण, आसनगाव सोडून कुठे गेला नव्हता. एकटा–दुकटा तो प्रथमच बाहेर पडला तेही स्वतःच्या विवाहमंडपातून, विवाह न करताच, फक्त रामरायासाठी आणि त्यानी सोपविलेले कार्य पार पाडण्याकरता. विश्वाची चिंता करत विश्वाच्या उध्दारासाठी त्याने पहिली पायरी चढली होती. किती नवल आहे, एक केवळ ११–१२ वर्षाचा पोर जगाची चिंता करायला निघतो.

ज्या क्षणी नारायणाने गोदामाईत उडी टाकली होती. त्या क्षणापासून त्याच्या आयुष्यात बदल होणार होते, कलाटणी मिळणार होती. नारायणाने जाबं सोडले तो दिवस होता, फाल्गुन वद्य अष्टमी. जांब सोडल्यापासून पंचवटीत पोहोचेपर्यंत अकरा दिवसांच्या कालावधीत त्याने एकेक विलक्षण घटना पाहिल्या, अनुभव घेतले पण मूळचा निर्भयकणा, सावधपणा, आकलनशक्ती यामुळे नारायण त्या अनुभवांना गाठीशी बांधत पुढे जाऊ शकला होता. अंधार पडत असतानाच त्याने गोदावरीत उडी टाकली होती आणि जेवढे अंतर कापता येईल तेवढे अंतर त्याने पोहून पार केले. खूप पुढे गेल्यावर तो काठावर आला आणि समोरच स्मशानात त्याने एक प्रेत जळताना पाहिले. गिरीधरस्वामी या संदर्भात लिहितात,'' समर्थ लागले गोदावरीच्या दक्षिण तीरी। माहावैराग्य प्रताप तीव्रतर अंतरी। केवळ स्मशानवासी सर्वेश्वर अवतारी। गोदातीरीं प्रेत येक जळता देखिले।।स.प्र.२–५०।। ''[२९] समर्थांनीही पुढे म्हणले आहे, वैराग्यात प्रखरता हवी असेल तर नेहमीच मरणाचे स्मरण असावे. मरणाचे स्मरण असलेली इतर कोणत्याही विषयासक्त गोष्टींमध्ये जीव न अडकता वैराग्य कायम राहण्यास मदत होते. पण नारायण मूळातच वैरागी होता. वैराग्य घेऊन, सर्व गोष्टी मागे ठेवून निघाला आणि दुसऱ्याच दिवशी त्याला प्रेत जळताना दिसले मग अजून काय वैराग्य अंगी बाणवायचे होते?

नारायण पुन्हा झपाझप पायी चालू लागला. खरंतर दुसऱ्या दिवशीपर्यंत त्याच्या पोटात काही गेले नव्हते, भूक मी म्हणत होती तरीही त्याकडे लक्ष न देता होणाऱ्या पाठलागापासून दूर जायचे होते. अन् अशातच एक भयंकर दृश्य त्याच्या नजरेस पडले. सकाळी हिंगणगावाला नदीच्या पाणवठ्यावर नारायण उभा होता. गोदावरी पलिकडील पाणवठ्यावर फांस देऊन टांगलेले चार मुडदे होते. पोरसवदाच असलेला नारायण दचकलाच. कालच घर सोडलेला मुलगा काय काय दृष्य बघत होता. हे दृष्य त्याच्या अगदी काळजालाच भिडले. पाणवठ्यावर एकीकडे

चौकशी केली तर त्याला कळले की हे जुलमी कृत्य तेथील आमीनाचे आहे. शिवाय अगदी थोडी फार जरी चूक झाली तरी अशी शिक्षा मिळते हेही कळले. देशात काय भयानक घटना घडत आहेत याची एक झलक लगेचच नारायणाला पहायला मिळाली, त्यांना परिस्थितीचा अंदाज यायला काही त्याला फार वेळ लागला नाही. आपल्या लोकांना कशा वेदनांना सामोरे जायला लागते आहे हे जाणल्यावर नारायणाला वेदना झाल्या. त्याला हा मोठा धक्काच होता, तरी त्यातून स्वतःला सावरून पुढचा मार्ग चालू लागला.

रस्त्यात मात्र नारायण जिथे जिथे थांबत असे, तिथे त्याची विचारपूस होई. कधी त्याला कुत्सित टोमणे ऐकायला मिळत, तर तो कोण, कुठला, कसा एकटाच फिरतो आहे अशा चौकशांना सामोरे जायला लागत असे. अर्थात कुणीतरी आस्थेने पण चौकशी करीत असे, काही खायला अथवा दूध प्यायलाही देत असे. एकदा त्याला रात्री झोपडीत आसरा पण मिळाला होता, नाहीतर तो एखाद्या देवळात, पारावर कुठेही रात्र काढीत असे. तरीही नारायणाला स्वतःचे नाव, गाव, हेतू वगैरे कुणालाच कळू द्यायचे नव्हते, त्यामुळे तो सर्वांशी अंतर राखूनच वागत असे. एकदा एका रात्री नारायणाने एका बैराग्याच्या कुटीत वास्तव्य केले, तो बैरागीही रामभक्त असल्याने नारायणाचे आणि त्याचे सूर जुळले. नारायण वयाने खूपच लहान असल्याने बैराग्याला त्याच्याबद्दल आत्मीयता वाटली मग नारायणानेही त्याला आपली हकीगत सांगितली बैराग्याला मात्र जाणीव झाली की नारायणाचा पल्ला फार मोठा आहे. या पोरवयातच त्याला त्रास होऊ नये म्हणून बैराग्याने नारायणाला रामनामांकित पिवळे वस्त्र आणि मोठ्या मण्यांची माळ दिली. बैराग्याने त्याला आशीर्वाद दिला. श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात म्हणतात,'' अब हर कोई जान जायेगा, कि तुम गुसाई बैरागी हो। जाओ प्यारे प्रभूके पास पहूँचो। वे अशरणशरण है। ''[३०]

या आशीर्वादाने नारायण आनंदी झाला, मन मोकळे झाल्याने त्याला खूप बरे वाटले. नारायणाच्या लक्षात आले की रामाची सेवा करणारे भक्त आहेत. चांगुलपणा दाखविणारी पण माणसे आहेत पुढे या वस्त्रामुळे आणि माळेमुळे मात्र नारायणाला पुढे फारच फायदा झाला. प्रवासात भेटणाऱ्या लोकांच्या कुत्सित नजरा बंद झाल्या. मग कुणी त्याला महाराज म्हणत, भविष्य विचारीत, आपल मन मोकळं करीत. अशा रीतीने पंचवटीला पोहोचण्यापूर्वीच पहिल्याच प्रवासात नारायण लोकप्रवाहात मिसळायला लागला.

नारायणाला खूप मोठे अंतर काटावयाचे होते, जांब ते नाशिक केवढा मोठा पल्ला होता. त्यातून फाल्गुन महिना, कडक उन्हातान्हाचे दिवस, पायी पोहचायचे म्हणजे एवढ्या लहान मुलासाठी काही थोडी सोपी गोष्ट नव्हती, नारायणाला किती शारीरिक कष्ट पडले असतील. दिवसा चाल चाल चालायचे आणि रात्री जागा मिळेल तिथे पाठ टेकायची. कोणत्याही ओसाड गावी रात्रीचे भय असायचेच. कुत्री भुंकत, घुबडंही आवाज करीत. पण मुळचा सावध, निर्भय असणारा नारायण या प्रवासात अजूनच निर्भय होत चालला होता. अर्थात रामस्मरणाने त्याला खूप आधार वाटायचा.

या प्रवासात नारायणाला अनेक प्रकारचे लोक भेटत. त्यांना कुणाला घरच्यांनी टाकलेलं असे, कुणी रोगाने पिडीत असे, कुणी अन्नालाही महाग झाले असत, मरण यातना देणारे वृध्दत्वही त्याने पाहिले, कुणी अन्यायाने पण त्रस्त असे. त्यांचे दुःख, हताशपणा, नारायणाने जवळून पाहिला. अर्थात त्यांची सहनशीलता बघून कधी कधी त्याला संताप पण येत असे. स्वत: नारायणालाही कधी कधी खायला मिळत नसे, तो उपाशीपोटी तसाच प्रवास करायचा. पण एकेक दृष्य, प्रसंग पाहून मात्र त्याचे विचार, विचारक्षमता प्रगल्भ व्हायला लागली होती. अर्थात प्रत्येक गावाचे, लोकांचे अवलोकन करायला मात्र विसरत नव्हता.

असेच परिश्रम घेत नारायण पंचवटीला रामरायाला भेटायला चालला होता. जसाजसा नाशिकच्या जवळ नारायण जात होता, तसतसे त्याचे बालमन मध्येच जागृत होत असे. त्याला वाटत असे की, आपण खूप लहाणपणी घर सोडलं अजून काहीच सुख, आनंद घेतला नाही, जीवनाचा अर्थ आपल्याला नीट समजला आहे की नाही वगैरे वगैरे. पण क्षणार्धात त्याचे मन नियंत्रित होई आणि म्हणत असे, आपण स्वत: हा निर्णय घेतला आहे. सर्व मोहमाया तोडून आलो आहोत एका ध्येयाने आणि फक्त रामरायाच्या आज्ञेचे पालन करायचे, आता कर्ता आणि करविता रामरायाच.

नारायण टाकळी जवळ जसा पोहोचला तसे त्याला कळले की आपण नाशिक पंचवटीच्या खूप जवळ पोहोचलो आहोत आणि त्याच्या चालण्याचा वेग अजून वाढला. टाकळी पण मागे टाकून तो नाशिकला गोदातटी पोहोचला. फाल्गुनात निघालेला नारायण चैत्रात पंचवटीला पोहोचला. रामनवमी जवळ आल्याने पंचवटी यात्रेकरुंच्या गर्दीने फुलली होती. जसा

नारायण राममंदिरासमोर उभा राहिला तसा आता लवकरच प्रभूरामचंद्रांना क्षेमालिंगन देणार या कल्पनेने तो इतका आनंदीत झाला की, एवढ्या गर्दीतून तो सरसर पुढे जाऊन, सगळ्या गर्दीला मागे टाकून गाभाऱ्यासमोर उभा ठाकला पण ज्या आराध्याची आस धरुन तो आला होता, ते आराध्य प्रभूरामचंद्र नारायणासमोर उभे होते. वस्त्रालंकार, पुष्पमाला ल्यालेले त्याचे आराध्य दैवत दिसल्यावर तो हरखून गेला, त्या दिव्य दर्शनाने त्याचे मन भारावले. त्याची नजर रामरायांवर स्थिर झाली.

सहस्त्र भानूप्रमाणे श्रीरामांची कांती उजळत होती आणि तसेच तेजस्वी रुप असलेली जानकी त्यांच्या डाव्या बाजूला उभी होती. प्रिय बंधू लक्ष्मण उजव्या हाताला आणि लाडका हनुमंत समोर उभा होता. असे हे गाभाऱ्यातील रुप पाहून नारायणाच्या अंगावर रोमांच उभे राहिले, त्याच्या अंगी सात्त्विक अष्टभाव निर्माण झाले. आपल्या नेत्रात मूर्तींचे रुप साठवून घेण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू आले, ज्याच्यासाठी घरदार सोडून आलो, तो रामराया अखेर भेटला याचे समाधान त्याच्या मनात दाटून आले होते, नारायणाचे सर्वांग पुलकीत झाले होते. नारायण धन्य झाला. त्याने श्रीरामांची खूप स्तुती केली आणि त्यांचे चरण धरले. गिरिधरस्वामींनी 'समर्थप्रताप' या ग्रंथात नारायणाने घेतलेल्या दर्शनाचे छान वर्णन केले आहे. '' समर्थे मिठी घातली श्रीचरणकमली। येक मुहूर्त मानसपूजा संपूर्ण केली। उठोनि सप्रेमे डोळा जव देखिली। तव ब्रम्हगोळी परिपूर्ण श्रीराम पूजिला।। ''[३१]

खर तर श्रीरामचंद्रही नारायणाचीच वाट बघत होते. वैराग्य प्राप्त केलेला नारायण भेटावा म्हणून तेसुद्धा आसुसलेले होते. नारायणाने श्रीरामांचे चरण धरल्यावर श्रीरामही अगतिक होतात. श्री गिरिधरस्वामी या संदर्भात म्हणतात,'' आता धर्मस्थापना करावी तुम्ही। सेवासेव्यक भावे ऐक्य तुम्ही आम्ही। सकळ साधूसंत संकल्प कर्मभूमी। सिद्धिस नेईन निधरि।। मज वैकुंठीहून जाले येणे। तुमच्या अनुग्रहाकारणे। सेव्यसेव्यकभावे हे बोलणे। येऱ्ही आत्माराम मी पूर्ण।। ''[३२] श्रीराम आणि नारायणामधील हा संवाद फारच गोड आहे. श्रीरामचंद्र म्हणतात,'तुम्ही आणि मी एकच आहोत. आता तुम्हाला धर्मस्थापना करावयाची आहे. आपले सेव्यसेवक भावाचे नाते आहे. तुम्हाला अनुग्रह देण्यासाठी मी वैकुंठातून आलो होतो. धर्मस्थापनेच्या कार्यात हा हनुमान तुम्हाला सहाय्य करील.'

रामराय नारायणाशी बोलताना त्याला अहो जाहो म्हणतात म्हणजे रामरायांनी तेव्हाच नारायणाला किती मोठा अधिकार दिला होता हे जाणवते. श्रीरामांनी स्वत: त्याला धर्मसंस्थापनेसारखी महान जबाबदारी त्याला दिली. अशा रीतीने श्रीरामांची आज्ञा आणि आशीर्वाद नारायणाला मिळून पुढची दिशा, पुढचा मार्ग समजला, तेही रामनवमीच्या दिवशी. नारायणाने जेव्हा घर सोडले तेव्हा त्याच्यात वैराग्य होतेच. आपले ध्येय काय आहे हे माहित होते आणि जांब ते पंचवटी या प्रवासात जे काय प्रसंग पाहिले होते, अनुभव घेतले होते, समाज परिस्थिती डोळ्याने पाहिली होती, त्यामुळे त्याचे सामर्थ्य अजून वाढणार होते. श्री. शंकर अभ्यंकर या संदर्भात लिहितात, ''या धर्मसंस्थापनेसाठी स्वतःच्या अंगी अलौकिक सामर्थ्य यावे म्हणून एकतप आपले शरीर सामर्थ्यासाठी, शुचितेसाठी, ज्ञानासाठी नारायण धारेवर धरणार होता. ''[३३]

एकूणच समर्थांचे घराणे, जन्म आणि बालपण यांचा परिचय करून घेतल्यानंतर असे लक्षात येते की, समर्थ हे सामान्य पुरूष नव्हते तर; ते एक महापुरूष, तपस्वी, संघटक आणि अलौकिक सामर्थ्य लाभलेले योगी होते.

**समर्थांचे पुरःश्चरण**

समर्थांना आपल्या आराध्य दैवताची, श्रीरामांची उपासना करायची होती, तप आचरायचे होते. धर्मसंस्थापनेच्या कार्यासाठी उपासना, तप, साधना याची चांगली बैठक असणे महत्त्वाचे होते. ही त्यांच्या मार्गावरची पुढची पायरी होती. अर्थात ही साधना एकांती राहूनच व्यवस्थित पार पडणार होती. त्यामुळे उपासनेला योग्य अशा जागेचा शोध घ्यायला सुरूवात केली. पंचवटीत त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की, नाशिकचा हा भाग फार वर्दळीचा आहे. आपला हेतू इथे सफल होण्यास अडथळे येतील. पण टाकळीत आल्यावर त्यांच्या लक्षात आले की हा भाग नाशिकपासून थोडाच दूर आहे. इथेच निवांतपणा मिळेल. पुरःश्चरणासाठी ही योग्य जागा असून इथे नंदिनी उर्फ नासुर्डी आणि गोदावरी या नद्यांचा संगम आहे. समर्थांना ही जागा विलक्षण आवडली. कारण निसर्गसौंदर्याची आवड आणि जाणीव त्यांना होती. तसेच नद्यांच्या संगमावर केलेली उपासना पुरःश्चरण जास्त फलद्रुप असते. शिवाय तेथून रोज पंचवटीला जायचे म्हटले तरी सहज शक्य होणार होते. समर्थांना ठाऊक होते की, नाशिक हे प्रसिध्द तीर्थक्षेत्र असल्याने

इथे विद्वानपंडितांची कमतरता नसेल. ग्रंथ अध्ययन, कीर्तन, प्रवचन, कथा यांचे पण श्रवण करता येईल. तपश्चर्येबरोबरच श्रवण, पठण, मनन यांचाही योग येणार होता.

आपल्या कार्यपूर्तीसाठी जी तयारी स्वतःची असायला लागते, जी सिध्दता असायला हवी त्यासाठी साधना करायला समर्थ सिध्द झाले. सुंदर निसर्गाचे सानिध्य, गोदावरी, नंदिनीच्या संगमावर एकांत असलेल्य स्थळी म्हणजे टाकळीला समर्थांच्या पुरःश्चरण या जीवनातील मोठ्या टप्प्याचा आरंभ झाला.

समर्थांनी बारा वर्षात त्रयोदशाक्षरी मंत्र म्हणजे 'श्रीराम जय राम जय जय राम' आणि गायत्रीमंत्राचे पुरःश्चरण केले. समर्थांना कुणी गुरू नव्हता, प्रत्यक्ष प्रभूरामचंद्रांचाच त्यांना अनुग्रह झाला होता. तेव्हा गायत्रीमंत्र म्हणजे सूर्योपासनेचा मंत्र आणि सूर्यवंशी प्रभूरामचंद्रांच्या उपासनेचा मंत्र म्हणचे रामोपासनेचा मंत्र अशी उपासना समर्थांनी केली कारण ठोसर घराण्याची तीच परंपरा होती.

खरं तर ही उपासना खूप खडतर, श्रमाची आणि सातत्य आवश्यक असणारी होती. ही उपासना सुरू करण्याच्या वेळी समर्थ अवघे बारा वर्षाचे होते आणि ही साधना एक नाही दोन नाही तब्बल बारा वर्षे करायची होती. पण वैराग्य आणि निष्ठा त्यांच्या रक्तातच होती. समर्थांची मानसिक तयारीही जबरदस्तच म्हणायला लागेल कारण एक एवढा खोडकर, उनाड पोरगा एवढी खडतर तपश्चर्या करणार होता, अचंबित करणारीच गोष्ट आहे ही. समर्थांची काय मानसिक स्थिती असेल त्यावेळी? त्यांना आपल्या आईला, आपण अचानक निघून जाण्यामुळे किती यातना झाल्या असतील? आपले पोटचे पोर एवढेसे आहे, ते कुठे असेल, काय खात असेल, परत कधी येईल अशा काळजीने तिच्या जीवाची घालमेल होत असेल आणि आपली सारखी आठवण काढत बसली असेल, अशी एक प्रकारची खंतही समर्थांना लागली असेल, गावातील लोक, नातेवाईक काय म्हणत असतील असे विचारांचे वादळ समर्थांच्या मनात उठले असेल. शिवाय श्रेष्ठांशी आपल्या लाडक्या भावाची ताटातूट झालेली त्यांना दुःख देत असेल. अशा वेळी समर्थांनी मन कसं सावरलं असेल? कारण एवढ्या लहान वयातील मुलं खरं तर आई–वडिलांच्या छत्राखाली सुरक्षित असतात. मग समर्थ कसा हा एकटेपणा काढणार होते? समर्थांची

निश्चयी वृत्ती भक्कम होती. त्यामुळे कणखरपणाने ते या वादळातून सहज बाहेर पडले असतील असे वाटते.

तपश्चर्येच्या बारा वर्षातील समर्थांची दिनचर्या अगदी वाखाणण्यासारखी होती. इतक्या लहानपणापासून केलेली ही साधना अगदी कौतुकास्पदच होती. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' अवघे तेरा वर्षाचे वय आणि जवळ जिव्हाळ्याचे मार्गदर्शक असे कोणी वडिलधारे नाही; असे असताही या बालब्रह्मचाऱ्याचा दिनक्रम असा रेखीव होता की मोठमोठ्या तपस्व्यांनीही अनुकरण करावे. ''[३४] भल्या पहाटे ब्रह्ममुहूर्तावर म्हणजे सूर्योदयापूर्वीही दोन–तीन तास आधी समर्थ उठत. शौच मुखमार्जनादि उरकून नियमितपणे सूर्यनमस्कारचा व्यायाम करत. नंतर नदीवर जाऊन स्नानसंध्या करून कंबरेइतक्या पाण्यात उभे राहून गायत्रीमंत्राचा नित्यनियमित जप करीत. मग सूर्य डोक्यावर येईपर्यंत त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करीत. इतकी वर्षे नियमाने, एकही दिवस न चुकता पाण्यात उभे राहून जप करणे सोपे नव्हते. शरीराचा जेवढा भाग पाण्यात असे तो पांढरट दिसे, शिवाय मासे पण चावत. तरी समर्थांनी साधनेत यत्किंचित व्यत्यय आणला नाही. मध्यान्हीला पुन्हा स्नानसंध्या करून ते गावात रोज माधुकरी मागायला जायचे. माधुकरी मागून आणल्यावर समर्थ तिचे तीन भाग करीत. एक भाग गाईस, दुसरा नदीत माशांना आणि तिसरा भाग स्वतः सेवन करीत. तेही कसे? तर झोळी पाण्यात बुचकळत कारण कोणत्याही चवीची जिभेला सवय होऊ नये म्हणून. हे असे आचरण समर्थांनी पूर्ण बारा वर्षे, उन–थंडी–पाऊस सर्व सहन करीत आचरले, त्यांचे वैराग्य तसे होते.

दुपारचे भोजन आणि थोडी वामकुक्षी झाल्यावर समर्थ नाशिकला जात. नाशिकमध्ये अनेक मंदिरातून कथा, पुराण, प्रवचन, कीर्तने चालत. अनेक ग्रंथांच पठण, श्रवण तिथे होत असे. समर्थांना तपश्चर्येबरोबरच अनेक उत्तमोत्तम ग्रंथांच अध्ययन करायचे होते. तिथे अनेक शास्त्रीबुवा, आचार्य, कीर्तनकार, प्रवचनकार यांच्याशी समर्थांची ओळख व्हायला लागली. श्रवणाला बसल्यावर जवळ ग्रंथ नसूनसुध्दा सांगितलेले निरूपण समर्थांच्या लक्षात रहायचे. त्यानंतर मंदिरातच थांबून समर्थ शास्त्रीबुवांशी चर्चा करायचे. शंकाचे निरसन करून घ्यायचे. शास्त्रीबुवांनाही समर्थांच्या कुशाग्र बुद्धीची, स्मरणशक्तीची चुणूक दिसायची, त्यामुळे तेही मोठ्या आनंदाने, कौतुकाने समर्थांशी चर्चा करायचे. पुढे पुढे तर समर्थांना तेथील ग्रंथभांडारातील अनेक

ग्रंथांचे वाचन करण्यासाठी ग्रंथ मिळायला लागले. समर्थ टाकळीस हे ग्रंथ नेऊन त्याचा अभ्यास करीत. वेद, वेदांत, उपनिषदे, भागवत, भगवद्गीता अशा असंख्य ग्रंथांचा समर्थांनी अभ्यास केला. ग्रंथावलोकनाबरोबरच समर्थांनी ग्रंथलेखन सुध्दा केले. त्यांनी संपूर्ण वाल्मिकी रामायण स्वहस्ते लिहिले. श्री. सुनील चिंचोलकर या बाबतीत लिहितात,'' वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी लिहून काढलेली वाल्मिकी रामायणाची मूळ प्रत उपलब्ध आहे. ''[३५] याचबरोबर टाकळीतील लोकांनाही ते रामायणातील कथा सांगत. अशा रीतीने समर्थांच्या लोकसंग्रहाची सुरूवात येथेच झाली.

पुरःश्चरण, ग्रंथअध्ययन याबरोबरच समर्थांची मूळची अभ्यासू वृत्ती अजून वाढत चालली होती. कीर्तने, प्रवचने याबरोबरच तिथे चालणारे उत्सव, आजूबाजूची परिस्थिती, घटना अशा गोष्टीही ते निरखत. त्यांनी निरीक्षणशक्ती विलक्षण होती. शिवाय तेथील लोक रीती–रिवाज, परंपरा, लोकांचे व्यवसाय, रानावनात मिळणाऱ्या औषधी वनस्पती आणि मुख्य म्हणजे लोकांच्या प्रवृत्तीचाही समर्थांनी अभ्यास केला. म्हणजेच तपश्चर्येत न गुंतता सामाजिक परिस्थितीचा अभ्यास समर्थांनी तेव्हाच सुरू केला होता.

असे हे बारा वर्षे चाललेले पुरःश्चरण, साधना पार पाडताना काही कमी विघ्ने येत नव्हती. या काळात त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. प्रथम प्रथम आजूबाजूचे लोक समर्थांची कुचेष्टा करीत, नाव ठेवीत, उलटसुलट चर्चा करीत, याला कुणी वडिलधारी नाही म्हणून असा वागतोय, घरात रहायला नको म्हणून असलं काही करतोय, कामधंदा नको म्हणून असला छंद याला लागलाय, संसारासाठी धडपडायला नको म्हणून इथे आला, भलत्या वयात याला देवपिसे कोठून लागले असे काहीबाही लोक बोलत. एवढचं नाही तर गावगुंडही त्यांना उपद्रव करीत. तरीही त्यांची तपश्चर्या अभंग रहायची. नंतर त्यांच्या या तपश्चर्येने, साधनेने, दिनक्रमाने, अभ्यासू वृत्तीने लोकांचे वागणे हळूहळू बदलायला लागले. त्यांच्या या साधनेचे, पावित्र्याचे तेजही त्यांच्या मुखावर दिसायला लागले होते त्यामुळे ही स्वैरचर्चा मागे पडू लागली.

टाकळीमध्ये पुरःश्चरणाच्या बारा बर्षाच्या काळात समर्थांना अनेक चांगले वाईट अनुभव आले, अनेक घटना घडल्या. तीन घटनांची मात्र समर्थांच्या जीवनात मोठी दखल घेतली गेली. एका प्रसंगाने त्यानी समाजाची तत्कालीन अगतिक परिस्थिती पाहिली. दुसऱ्या प्रसंगाने

समर्थांकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलला. त्यांच्या तपाचे सामर्थ्य लोकांना दिसले. तिसरा प्रसंग सामाजिक, धर्मसंस्थापनेच्या कार्याच्या दिशेशी निगडित होता.

पहिल्या प्रसंगा संदर्भात श्री. शंकर अभ्यंकर लिहितात,''पहिल्या अस्सल ऐतिहासिक घटनेत सत्वहीन आणि कळाहीन समाजाचे स्वच्छ प्रतिबिंब उठले आहे.''[३६] छत्रपती शिवरायांचे वडिल शहाजीराजे भोसले यांचे चुलतभाऊ खेळोजीराजे भोसले यांची पत्नी, नाशिकमध्ये संगमावर स्नान करण्यास आली असताना औरगंजेबाचा एक सरदार महाबतखान याने सर्वांच्या देखत त्या सुंदर अशा स्त्रीला उचलून नेले आणि तिथे असलेल्या एकाही व्यक्तीने त्यास प्रतिकार केला नाही. समर्थांनी ही हकिकत ऐकल्यावर त्यांना समाजाची चीड पण आली आणि कीव पण. सीतेच्या अपहरणाचीच ही आवृत्ती. समर्थांना सहन झाली नाही. त्यांना वाटले परस्त्रीची लालसा असणारा प्रत्येक जण रावणच आहे आणि त्या रावणाला शासन झालेच पाहिजे. याच विचारांनी त्यांच्या मेंदूत थैमान घातले. मग त्यांच्या लक्षात आले की, या पराक्रमशून्य समाजाला जागृत करायचे असेल, बधीरतेतून गदागदा हलवायचे असेल तर तुळजाभवानी, प्रभुरामचंद्र, वीरहनुमान अशा पराक्रमी दैवतांचे आदर्श समोर ठेवले पाहिजेत.

दुसऱ्या घटनेनी टाकळीतील लोकांना समर्थांचे तपसामर्थ्य कळून त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन अमूलाग्र बदलला आणि समर्थांची प्रतिमा उंचावली. टाकळीच्या जवळच दशकपंचक या खेड्यात एका गिरीधर कुलकर्णी नावाच्या तरूणाचा आजारपणात मृत्यू झाला. तेथे स्मशानभूमी नसल्याने टाकळीच्या संगमावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी त्याला नेत होते. त्याची तरूण पत्नी अन्नपूर्णा ही सती जाण्यास सिध्द झाली होती. त्यावेळी समर्थ ध्यानमग्न होते. अन्नपूर्णेने त्यांना नमस्कार केला. समर्थ ध्यानात मग्न होते शिवाय ते नेहमी अधोमुख असायचे त्यामुळे त्यांनी नकळतच अन्नपूर्णेला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!' असा आशीर्वाद दिला. हे शब्द ऐकताच अन्नपूर्णा चमकली. तिने समर्थांना विचारले,' हा आशिर्वाद पुढील जन्मासाठी आहे का?' असे विचारताच समर्थांनी डोळे उघडून पाहिले आणि हा कोणता प्रसंग चालू आहे याची त्यांना जाणीव झाली. श्री. शंकर अभ्यकंर या संदर्भात लिहितात,'' आपल्या मुखातून प्रत्यक्ष प्रभूरामचंद्रच बोलले याची समर्थांना खात्री होती. त्यामुळे गिरीधर कुलकर्णी यांच्या शवावर गोदावरीचे पवित्र पाणी प्रभूरामचंद्रांना आळवून त्यांनी शिंपडले आणि मृत्यू पावलेला गिरीधर

कुलकर्णी जिवंत झाला. ''[३७] उठून बसला. त्याने आणि अन्नपूर्णेने त्यांच्या पायावर स्वतःला झोकून दिल. त्यांना मूलबाळ नसल्याने आणि महाराजांच्या आशीर्वादाने आपल्याला पुत्र होतील याची खात्री झाल्याने त्यांनी समर्थांना शब्द दिला की त्यांचा पहिला पुत्र समर्थांना देतील, आणि खरंच पहिला पुत्र समर्थांचरणी अर्पण केला, तोच म्हणजे भविष्यकाळातील उध्दव गोसावी.

तिसरी घटना ही महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिकच होती. ती म्हणजे समर्थ आणि शहाजीराजे भोसले यांची पहिली भेट. समर्थ टाकळीच्या वास्तव्यास असताना जुन्नर, संगमनेर, नाशिक, त्र्यंबकेश्वर हा प्रांत शहाजीराजांच्या अखत्यारीत होता. समर्थांची तपश्चर्या, तडफदारपणा, धडाडी अशी सर्व किर्ती शहाजीराजांच्या कानावर होतीच. शहाजीराजे जरी निजामशाहीत सरदारकी करत असले तरी हिंदवी स्वराज्याची स्थापना हे त्यांचेही स्वप्न होते. पण तसा अनुकूल काळ नसल्याने ते स्वप्न पूर्ण होऊ शकत नव्हते. शिवाजीराजांच्या जन्मानंतर त्यांची ही स्वराज्यस्थापनेची इच्छा बळावली आणि त्यांनी ठरविले आपला पुत्र शिवाजी याला मात्र गुलामगिरीत न अडकविता त्याच्या समोरची परिस्थिती स्वराज्यस्थापनेस अनुकूल बनवायची. अशावेळी समर्थ म्हणजे शहाजीराजांना आशेचा किरण ठरत होते. नंतर शहाजीराजांनी या कार्याच्या मदतीसाठी समर्थांकडे शब्द टाकायचा ठरविला आणि टाकळीत समर्थांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करायचे ठरविले. त्याप्रमाणे समर्थ आणि शहाजीराजांची टाकळीत भेट झाली. ही भेट आणि भेटीतील चर्चा अगदी गुप्त राखण्यात आली होती. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' समर्थ रामदास आणि शहाजी महाराज या दोघांच्या मनात तत्कालीन देश स्थितीचे जे वादळ होते ते लक्षात घेता, त्या दोघांमध्ये काय चर्चा झाली असेल याचा आपण अंदाज घेऊ शकतो. या भेटीनंतर काही महिन्यातच आपले पुरःश्चरण संपवून समर्थ भारत भ्रमणाला निघाले आणि भारत भ्रमण संपल्यावर ते नेमके शिवाजी महाराजांच्या जहागिरीत येऊन स्थिरावले. ''[३८] जेव्हा समर्थांची शहाजीराजेंशी भेट झाली तेव्हा नाशिक आणि बाजूचा परगणा शहाजीराजांकडे होता. समर्थ जेव्हा भारत भ्रमण करून परत येईपर्यंत शिवाजीराजांनी हिंदवी स्वराज्याच्या कार्याला आरंभ केला होता. सातारा–चाफळ भागात समर्थ स्थिरावून कार्यला सुरूवात केली, म्हणजे शिव समर्थ या शक्तीने एकत्र येऊन केलेली स्वराज्यस्थापनेची नांदीच म्हणावी लागेल. याचा अर्थ शहाजीराजे आणि समर्थांच्या नियोजनाची आखणी त्यांच्या टाकळी

भेटीत झाली आणि समर्थांना तर प्रत्यक्ष प्रभूरामचंद्रांची आज्ञाच होती की कृष्णातीरी राहून कार्य करावे.

हे तिन्ही प्रसंग समर्थांच्या जीवनातील खूप मोठे ऐतिहासिक आणि महत्त्वाचे प्रसंग आहेत.

जसजसे पुरःश्चरण पूर्ण होऊ लागले, अनुष्ठान पुरे होत आले तसतसा समर्थांचा लौकिक वाढायला लागला आणि समर्थांचा लोकसंग्रह वाढून सगळ्यांची गर्दी त्यांच्याजवळ होऊ लागली. सर्व लोकांना समर्थांचे सानिध्यात राहायला हवेहवेसे वाटू लागले. समर्थ त्यांच्याशी प्रेमाने तर वागतच पण त्यांच्याकडून आजूबाजूच्या वार्ता पण विचारून घेत असत. म्हणजेच समर्थ लोकसंग्रहातून आजूबाजूची सामाजिक परिस्थिती पण व्यवस्थितपणे जाणून घेत.

समर्थांचे पुरःश्चरण संपत आले होते. एक नाही दोन नाही पुरी बारा वर्षे एक पोरसवदा वयाचा नारायण स्वतःचे घरदार सोडून येतो काय, एका ध्येयाने प्रेरित होऊन तपश्चर्या करतो काय आणि ऐन तारूण्यात ही तपश्चर्या, अनुष्ठान पुरे करून समर्थ रामदास होतो. खरोखरीच आश्चर्यजनक आणि अभिमानास्पद! ज्या वयात आईवडिलांच्या छत्राखाली, त्यांच्या मायेच्या उबेत रहायचे, त्या वयात समर्थांनी ते छत्र सोडले आणि रामरायांची आज्ञा घेऊन त्यांनी दाखविलेल्या वाटेवर चालायला निघाले होते. तेही काही सहज सोपे आयुष्य जगण्यासाठी नव्हे तर खडतर तपश्चर्या, परिश्रम करण्यासाठी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राष्ट्रोध्दार, हिंदूधर्माचे रक्षण आणि स्वराज्य स्थापनेला सहाय्य करण्यासाठी. कारण एक जाणता राजा निर्माण होणार होता आणि हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेची स्वप्न पूर्ण करणार होता. या सगळ्या कार्याला पुरे पडण्यासाठी बळ हवे होते आणि ती बळकटी मिळाली या तपश्चर्येने. श्री. गो. नी. दांडेकर या बाबतीत लिहितात,'' वैशाख शुध्द प्रतिपदा. त्या दिवशी संकल्प उच्चारून स्वामींनी पुरःश्चरण संपविले. सायंकाली रामरायासमोर उभे राहिले हात जोडून मनोमनी बोलले–प्रभू येक संकल्प आपल्या प्रसादे पूर्ण झाला. या बारा वर्षांत येकही दिवस पुरःश्चरण खण्डले नाही. जपामध्ये अंतराय निर्माण झाला नाही. ही संकल्पित जपसंख्या आपण पूर्ण केलीत. शरीर निरामय ठेवलेत. आता दुसरा संकल्प आपणांस ठावा आहे. त्यासाठी सद्बुध्दी द्या, बळ द्या, अनामय द्या. आपल्या कृपेचा वरदहस्त सदैव मज दीनाचे माथ्यावर असू द्या. ''[३९] समर्थ्यांच्या साधनेचा एक

टप्पा, संकल्प खंड न पडता पूर्ण झाला. समर्थांच्या जीवनाचे जे ध्येय होते, जे कार्य होते, त्याची दुसरी पायरी होती साधनेची. त्यापुढची तिसरी पायरी म्हणजे देशातील सामाजिक स्थितीचे अवलोकन करायला तीर्थाटन करणे, अवघे भारतभ्रमण करायचे होते. त्यांना सामाजिक परिस्थिती अभ्यासायची होती. कृष्णातीरी राहून कार्य संपादन करण्याच्या तयारीसाठी सज्ञ झाले.

**समर्थांचे तीर्थाटन**

समर्थांच्या आयुष्यात बारा वर्षांच्या काळाला खूप महत्व होते. बारा वर्षांचे असामान्य बालपण, बारा वर्षांची खडतर तपश्चर्या आणि बारा वर्षे तीर्थाटन. संपूर्ण भारतभ्रमणाला एवढा वेळ लागणारच होता कारण आतासारखी वाहतूकीची साधने थोडीच होती त्या काळात. देशस्थितीचे अवलोकन, समाज परिस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी निघाले होते. टाकळीच्या तपश्चर्येच्या बारा वर्षाच्या काळात समर्थांना अनेक ठिकाणची अनेक दुःखं असलेली लोक भेटत, त्यामुळे त्यांची दुःखी, उध्वस्त झालेली मनं समर्थांनी जाणली होती. ते जे काय सासत होते तेही जाणले होते. पण आता हे सर्व त्यांना प्रत्यक्ष देशभ्रमण करून निरखायचे होते. अर्थात या बरोबरच सर्व तीर्थक्षेत्रातील देव देवतांचे दर्शन त्यांना घ्यायचे होते. समर्थांना समाजातील लोकांच्या परिस्थितीबरोबरच, त्यांचे आचार–विचार, तेथील रीतीरिवाज अगदी बोलणे–चालणे–वागणे हे बघण्यात, अभ्यासण्यात रस होता. त्यांना निसर्गसौंदर्य म्हणजे पर्वत, नद्या, अरण्ये तेथील हवामान, उन्हाळे, पावसाळे, हिवाळे वगैरे अशी भौगोलिक परिस्थितीत पण रस होता. तसेच धार्मिक स्थितीची जी अवस्था झाली होती ती बघणे, अभ्यासणेही गरजेचे होते.

समाजाच्या अधोगतीची कारणे त्यांना शोधून काढायची होती. परकीय आक्रमण, मुस्लीमांची राजवट, समाज कसा तटस्थ झाला? का तटस्थ राहिला? त्यांचा स्वाभिमान कुठे गेला? समाज असा सैरावैरा का पळतो आहे? कुणाला घाबरून कुठे जात आहे? अशा असंख्य प्रश्नांचे वादळ समर्थांच्या मनात उठले होते आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधायला समर्थ देशभर भ्रमंती करणार होते. हे सर्व प्रश्न मनात घेऊन ते निघाले. पंचवटी सोडल्यावर लगेच सप्तश्रृंगीच्या दर्शनाला ते प्रथम निघाले तर सप्तश्रृगींच्या पर्वताच्या पायथ्याशीच समर्थांनी अत्यंत विदारक दृष्य बघितले आणि त्यांच्या काळजाचे पाणी पाणी झाले. त्यांच्या मनात विचार आला अजून पुढे

काय बघायचे आहे, अनुभवायचे आहे. पर्वताच्या पायथ्याची सर्व गावे उध्वस्त झाली होती. काय पाहिले तिथे समर्थांनी? तर शेते कापलेली, झाडेझुडपे ओरबाडलेली, घोडे–हत्ती–उंट मरून पडलेले, माणसांची प्रेते, त्यांच्या कवट्या त्यावर ताव मारणारी कोल्ही, कुत्री गावातील घरे उध्वस्त झालेली. सर्व सामान इकडे तिकडे विखुरलेले आणि उरलेले लोक गाव सोडून गेलेत. समर्थांना ध्यानी यायला वेळ लागला नाही की या खूणा जुलमाच्या आहेत. ती वावटळ ह्या आपल्या खूणा मागे ठेवून या प्रदेशावरून वाहून गेली आहे. हे काय कमी तर प्रत्यक्ष सप्तश्रृंगी पण उदास दिसली, खिन्न दिसली. सर्व आयुधे हातात धरलेली असूरसंहारिणीसुध्दा या असूरांच्या कृत्यांना बघून अवाक् झालेली दिसत होती. हे सगळे बघून समर्थ सुन्न होऊन गेले. त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. तरीही मनावर दगड ठेवून समर्थ पुढे निघाले.

समर्थ मालेगावापर्यंत पोहोचले, गिरणा नदी जशी त्यांनी ओलांडली तसा त्यांना फरक जाणवू लागला. भाषा बदललेली. पण परिस्थिती ती तशीच. आमिनाचे, अंमलदाराचे वर्चस्व सोसून अवघी प्रजा आमिनाच्या धाकाखाली रहात होती आणि जोडीला दुष्काळही त्यात भर घालत होता. हे अंमलदार कुणालाही अगदी क्षुल्लक कारणावरून पकडून नेत आणि शिक्षा देत. त्यांची गुरे–ढोरे पळवत असत, समर्थांना आश्चर्य याचे वाटले की लोक हे सर्व जुलूम सहन करीत आहेत? आमिनाचे अत्याचार सोसत आहेत? तेही तोंडातून एक चकार शब्द न काढता. फिर्याद कुणाकडे करायची हाही प्रश्न होता त्यांच्यापुढे. लोक भिऊन जीव मुठीत धरून दिवस ढकलत होते, गावच सोडत होते. अशा रीतीने समर्थ एकेक प्रदेश निरखित, रामरायाला प्रार्थना करीत पुढे पुढे चालले होते. पुढे अंमळगावी समर्थ पोहोचले. त्यांना पयस्विनी सूर्यकन्या तापी नदीचे विशाल पात्र डोळ्यासमोर दिसले आणि त्यांना गोदामाईची आठवण झाली. कारण गोदामाईचे आणि त्यांचे फार जवळचे नाते होते.

समर्थांना तापी ओलांडून पलिकडे जायचे होते. पण नावेने न जाता समर्थ पोहून पैलतीरी गेल्याने काय भयानक अनुभव आला होता समर्थांना. नाव सोडून पोहून का आला म्हणून तिथला अंमलदार नाझिरसाहेब याने त्यांने पकडून चौकीवर नेले. नावेतून आलेल्या स्त्रिया–पुरूषांची झडती त्याच्या प्याद्यांनी घेतली, अगदी स्त्रियांची चाचपणी केली. हे सर्व बघून समर्थांच्या लक्षात आले मोंगलाईची ही झलक आहे. त्यांच्या या निर्लज्जपणाचा समर्थांनी निषेध केला. नाझिरने

समर्थांना जवळ बोलावले पण समर्थ काय सामान्य होते? ताठ मानेने त्यांनी त्यांच्या नजरेला नजर दिली श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' त्यांच्या दृष्टीक्षेपांत पराकाष्ठेचें अभय होतं. वज्रनिश्चय होता. निर्धार होता. कल्पातीही न वाकणारा, न मोडणारा, काही थोडा क्रोधही होता. कांही ललकारणें होतें. एरवी शांत असलेली दृष्टी आतां जणूं प्रतिकारासाठी सिध्द झाली होतीं. ''[४०] दृष्कृत्य करणाऱ्या नाझिरला मात्र समर्थांशी बोलायला उसने आवसान आणायला लागले. त्याने समर्थांना एका जागेवर उभे रहाण्याची शिक्षा दिली. पण समर्थांचे कमावलेले व्यायामाचे शरीर, निर्धारी आणि निर्भयी मन आणि या सत्तेलाच नेस्तनाबूत करून स्वराज्याचे स्वप्न पाहणारे समर्थ यांच्यापुढे नाझिरलाही नमायला लागले. या प्रसंगाने तेथील जनसमुदाय भलताच भारावला होता. तेव्हा समर्थांनी त्यांना  आधार दिला. त्यांना अन्यायाविरूध्द झुंझायला सांगितले.

एकेक अनुभव घेत, संकटातून मार्ग काढत, लोकांना मानसिकता बदलण्याचा सल्ला देत देत समर्थ पुढची वाटचाल करायला लागले. तेव्हापासून समर्थांसारखा उपदेशक लाभावा म्हणून लोक त्यांच्यामागे धावायला लागले. खांडवा, होशंगाबाद,नर्मदा, रेवती, क्षेत्रावती नद्या ओलांडून समर्थ विंध्य ओलांडायला लागले. अतिशय अवघड, आडवाटेवर दरोडेखोरांच्या टोळींनी समर्थ आणि बरोबरच्या यात्रेकरूंना आडवून लुटायच्या प्रयत्नात होते, पण समर्थ त्यांनाही न घाबरता त्यांना चांगले वागण्याचा उपदेश देऊन निघाले. केय नदीपलीकडे पन्न्यात सौदागर आणि लमाणांना मुस्लिम हल्लेखोरांनी कसे लुटले, रक्तपात केला याचा थरकाप उडविणारा अनुभव घेताना समर्थ पुन्हा कळवळले. त्यांना प्रश्न पडला की धावेकरी झुंजले का नाहीत? एकत्र येऊन ताठ का नाही उभे राहिले? खरं त्याचीच कमतरता होती. एकजूट होऊनसुध्दा लढायला कोणी तयार नव्हते. समर्थ बघतच राहिले हे दृष्य आणि विचार करत राहिले.

समर्थ वाराणसीच्या वाटेवर होते. यवनांची शिरजोरी, स्वाभिमान हरवलेला समाज, अधर्म, विच्छिन्न झालेली देवालये अशी परिस्थिती बघत बघत ते वाराणसीत पोहोचले. गंगानदीचे पात्र आणि पावित्र्य हे त्यांना भुरळ पाडत होते. काशिविश्वेश्वराचे भव्य मंदिर, इतर मंदिरांची उंच शिखरे, ध्वज, वाराणसीचा भरगच्च बाजार यात्रेकरूंची गर्दी असे देखणे चित्र समर्थांच्या नजरेसमोर होते. पण यावर परकीयांची यवनांची छाया आहे असे लक्षात आल्यावर पुन्हा त्यांने मन विषिण्ण

व्हायला लागले. काशी तीर्थक्षेत्री बरेच दिवस समर्थ राहिले. काशीस गंगातीरावर जो हनुमान घाट आहे, पण नुसतेच नाव धारण केलेल्या घाटावर समर्थांनी हनुमंताची स्थापना केली. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' त्या प्रतिष्ठापनेस्तव व इतर कार्यास्तव त्यांना काशीस सुमारे सहा महिने रहावे लागले. ''[४१] प्रयागला जाऊन समर्थांनी श्राध्दकार्य केले. गंगा, जमुना आणि सरस्वती या पवित्र नद्यांवर स्नान करून पुढे ते गया येथे गेले. त्यांची त्रिस्थळी यात्रा इथे पूर्ण झाली होती. नंतर त्यांना वेध लागले होते, शरयू तीरावरील अयोध्येत त्यांच्या लाडक्या, आराध्य श्रीरामचंद्र यांच्या भूमीत पाऊल ठेवून, त्यांच्या चरणी मस्तक ठेवून, डोळे भरून पहायचे. समर्थ अयोध्येच्या रामरायाच्या भक्तित मनसोक्त पोहले, पण समर्थांचे समाधान होईना, त्यांना सतत तो कोदंडधारी राम नजरेमसोर दिसे आणि याचे चरण कसे सोडून जायचे असे त्यांना वाटत राहिले. त्यांचे पाऊल काही निघेना, माहेरवाशिणीचे जसे माहेराहून निघताना जशी मनस्थिती होते अगदी तशीच मनस्थिती समर्थांची झाली. पण जवळ जवळ दहा–अकरा महिन्यांचा कालावधी होऊन गेला होता. त्यांना आपला तीर्थाटनाचा हेतूही सतत आठवण करून देत होता निघण्याची. शेवटी समर्थांचे मन स्थिरावले आणि समस्त बहुजनांच्या सुखासाठी हे रामरायाच्या चरणी रहाण्याचे सुख सोडले पाहिजे या विचाराने पुढील टप्पा गाठण्यासाठी समर्थ निघाले. गोकुळ, मथुरा, वृदांवन पाहिले. श्रीकृष्णाच्या बाळलीला जिथे घडल्या, शत्रूसंहार जिथे झाला त्या पावन भूमीत जाऊन कृष्ण दर्शन घेऊन समर्थ उत्तराखंडाकडे झेपावले.

हरिद्वार, ह्षीकेश, बद्रीकेदार इथे जाऊन समर्थ हिमालयावर पोहोचले, जाताना हिमवर्षाव झाला. समर्थांनी तो झेललाच पण निसर्गाचे अभूतपूर्व सौंदर्य निरखले. हिमालयाकडे मान उंचावून बघत होते. पर्जन्यराजा इथे कसा बरसतो. हिमाकणांचा पाऊस पाहून समर्थ मुग्धही झाले. मूळातच निसर्गाची ओढ आणि अभ्यास असल्याने त्यांना परमेश्वरची लीला बघायला मिळाली. हिमालय म्हणजे बर्फाच्या आगारात अनेक डोंगरकडे, दऱ्या, पाण्याचे प्रवाह ओलांडणे, वाऱ्याचे घोंगाट हे सर्व काही फार सहज सोपे नव्हते. हिमशिखरावरच्या श्वेत मारूतीसमोर पोहोचले. केवळ एक लंगोटी अंगावर, समर्थ कसे टिकले असतील त्यांनाच माहित. श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' पण मनातला निर्धार पक्का. बर्फाचे कडे अन् हिमनद्या ओलांडून शेवटी रामदास शिखरावर पोंचलाच! तो कुडकुडत मारूतीसमोर उभा राहिला. मारूतीरायाने आपला लहानगा भक्त पाहिला, अन् उठून त्याला पोटाशी धरलं, मग म्हटल, धन्य रे गड्या; धन्य तुझे

साहस! पण आजपासून अंगावर भगवं वस्त्र पांघरीत जा! ''[४२] प्रत्यक्ष मारूतीरायाला समर्थांचे कोण कौतुक वाटले असेल. स्वतः मारूतीरायांनी त्यांच्यावर भगवं वस्त्र पांघरलं, धन्य ते समर्थ. समर्थांनी मारूतीरायाला सहज विचारलं, 'माझा आश्रम संन्यासी का ब्रह्मचारी?' जसा मी तसा तू रामाचा दास, आजपासून तू रामदास नाव धारण कर.

हिमालयात एक विलक्षण प्रसंग घडला. हिमालयाचे भव्यदिव्य रूप पाहून समर्थ हिमालयाकडे पहात राहिले. या संदर्भात गिरीधर स्वामी समर्थ प्रतापात म्हणतात,'' म्हणोनी हिमालय कुंडी समर्थ बुडी देती। रघुनाथजी समर्थांसी वरिच्या वरि धरिती।। समर्थ समर्थांसी गाळीप्रदाने समर्पिती। काय प्रयोजन देहाचे।। ''[४३] समर्थांच्या मनात आले प्रपंचमाया मिथ्या आहे. वैराग्य मात्र शाश्वत आहे मग या देहाचा उपयोग काय, म्हणून समर्थांनी स्वतःला हिमकुंडात झोकून दिले. पण श्रीरामचंद्रांनी त्यांना अलगद झेलले. प्रभूश्रीरामचंद्रांनी समर्थांना समजावले. कारण समर्थांचा जन्म अशा समर्पणासाठी झाला नव्हता, त्यांच्यावर जगाच्या उध्दाराची, धर्म संस्थापनाची जबाबदारी स्वतः रामरायांनी दिली होती. दोन तपे रामरायांनी सांभाळले होते. रक्षण केले होते. असे समजल्यावर समर्थ क्षणार्धात सावध झाले.

जयपूर, अजमेर, चितोड, अबू, द्वारका, शंखतीर्थ, सोरटी सोमनाथ करून समर्थ जगन्नथपूरीला पोहोचले. समर्थांचा समर्थपणा लोकांना दिसू लागला होता. त्यामुळे त्यांच्याबरोबर लोक सतत राहाण्याचा प्रयत्न करीत. कारण समर्थ प्रगल्भ झाले होते. त्यांच्या कीर्तीचा सुगंध दरवळू लागला होता. समर्थ त्यांच्याशी गुजगोष्टी करत, त्यांना आधार देत, त्यांची शल्य दूर करीतच शिवाय त्यांचे हित कशात आहे, याचे मार्गदर्शन करीत की हिंमतीने संकटांशी सामना करायचा, रामाचे स्मरण करायचे. अशा रितीने भेटतील त्या लोकांचे निरीक्षण करीत, त्यांचे मन जाणून, त्यांना धीर देत देत समर्थ अख्खा देश पालथा घालण्याचे काम करीत होते. प्रत्येक प्रदेशातील खाद्यसंस्कृती, राहणी, तेथील पर्वतराजी, रानेवने हे सर्व निरखायलाही विसरत नसत. आसाम जगन्नाथपुरी करून पूर्ण तटातटाने समर्थ रामेश्वरला पोहोचले. रामेश्वराचे दर्शन घेऊन सेतूच्या ठिकाणी मारूतीरायांचे दर्शन घेतले, तिथे त्यांच्यात संभाषणही झाले. समर्थ पंचवटीत असताना एका पुराणात लंकेतील अशोकवाटिकेतील पुष्पे तांबडी का पांढरी असा वाद समर्थ

आणि मारूतीरायांमध्ये झाला होता. तेव्हा आपण लंकेत जाऊन येऊ असे मारूतीला म्हणताच समर्थांनी मारूतीरायांची आज्ञा प्रमाण मानून दोघेही अंतरीक्षमार्गे जाऊन परत सेतूबंधात आले.

कृष्णा ओलांडून कावेरी नदीच्या प्रदेशात समर्थ आले. मोठमोठी मंदिरे, कोट, सभामंडप, स्तंभ, गोपुरे, गावातील वाडे बघून समर्थांना आवडलेच, पण प्रश्न पण पडले. या सर्वांचे रचनाकार कोण? बेलूर, हळेबीड, मदुरा मीनाक्षी येथील कोरीव काम समर्थांनी पाहिले. शिवाय तेथे एक मात्र होते, वातावरण भितीचे नव्हते. हिंदू–मुस्लिम एकत्र राहात होते.

मध्यप्रदेशातून समर्थ विजयनगरला गेल्यावर तुंगभद्रा नदी आणि तिच्या तीरावर वसलेलल्या विजयनगरची भव्यता समर्थांना भावली. कर्नाटक, बंगळूरला शहाजीराजे भोसले रहात आहेत याची खबर होती. त्यामुळे शहाजीराजांना भेटण्यासाठी बंगळूरला समर्थ थांबले. पुन्हा एकदा समर्थांची आणि शहाजीराजांची भेट झाली. ही पण भेट खूप अर्थपूर्ण होती. शहाजीराजांनी जेव्हा समर्थांना विचारले कोठून आलात? तेव्हा समर्थांनी सर्व प्रवासाचा वृत्तांत शहाजीराजांना दिला. उत्तरेतील बेबंदशाही, अनेक ठिकाणची दुष्काळी स्थिती, धाडी, ओस पडलेली गावेच्या गावे, सैनिकांचे क्रौर्य, शिक्षा, अशी भयानक परिस्थिती तर स्त्रियांची विटंबना, त्यांच्या आर्त किंकाळ्या वगैरे सर्व काही बोलले. शहाजीराजे मग समर्थांशी मुद्याचे बोलले. जिजाबाई आणि शिवबा महाराष्ट्रातील जहागिरीवर रहात असून. शिवबा खूप चतुर, शहाणा, सावध आहे. दोघांनाही वाटते नवीन काही करावे. पुणे प्रांतात जहागिरी असून तेथील लोक श्रध्दाळू असून त्यांच्या मनात अन्यायाची चीड आहे, आपल्या देशावर त्यांचे खूप प्रेम आहे. शहाजीराजांच्या या वाक्यांवरून जाणवते की ही सर्व पूर्वतयारी आहे, शिवाजी राजांच्या स्वराज्यस्थापनेची. श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' इंधन तेथे उपलब्ध आहे स्वामी. पेटविणारे धाडले आहे! केवळ आपला आशिर्वाद. त्याची बहुत गरज आहे. ''[४४] शहाजीराजांनी समर्थांना पुढच्या कार्याची जाणीव दिली. खरं तर शहाजीराजांनी समर्थांवर खूप मोठी जबाबदारी टाकली होती. ज्या छत्रपतींनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले त्या छत्रपतींना मार्गदर्शन करण्याचे अतिशय महत्वाचे कार्य समर्थांनी केले म्हणूनच टाकळी आणि बंगळूर येथे झालेल्या समर्थ आणि शहाजीराजांच्या भेटीला अनन्य साधारण महत्व आहे. कारण तीच

स्वराज्यस्थापनेची नांदी होती. यातून समर्थ आणि शहाजीराजांच्यामध्ये एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला,

तीर्थाटनात देशस्थिती न्याहाळताना ही भेट खूप महत्त्वाची होती. दक्षिण भारतातील इतर क्षेत्रे म्हणजे ऋष्यमूक–पंपासरोवर–शबरी–जटायू–अगस्त्याश्रम व अशी श्रीरामचंद्रांशी निगडीत असलेली स्थाने समर्थांनी पाहिली. शिवकांची, विष्णूकांची, पक्षीतीर्थ, श्रीशैल्य, गोकर्ण महाबळेश्वर यांचे दर्शन घेऊन समर्थ चिपळूणला परशुरामक्षेत्री गेले. समर्थांचे गोत्र जमदग्नीच होते. त्यामुळे समर्थांनी परशुरामांशीही हितगुज केले. चिपळूणहून समर्थ महाबळेश्वरला आले. कृष्णा, कोयना, वेण्णा, गायत्री–सावित्री या पंचनद्यांचा उगम पाहिला. ज्या कृष्णातीरी आपल्याला जायचे आहे तिचा उगम बघताना समर्थांचा धन्य वाटले. तसेच पुढे त्यांच्या कार्याचा आरंभ याच परिसरात झाला, त्यामुळे तेव्हाच महाबळेश्वर आणि आजूबाजूच्या ठिकाणांची पहाणी सुध्दा समर्थांनी केली. नंतर भीमाशंकर, शिखर शिंगणापूर, पंढरपूर त्र्यंबकेश्वर करून समर्थ पंचवटीस परत आले. संपूर्ण बारा वर्षे लागली त्यांना सर्व देश हिंडून यायला. सर्वसाधारणपणे सामान्य माणसे पुण्यप्राप्ती आणि प्रेक्षणीय स्थळे बघण्याकरता जातात. पण समर्थ असामान्य होते. तीर्थक्षेत्रांचे दर्शन याहीपेक्षा मुख्य हेतू होता, देशातील सामाजिक, राजकिय, धार्मिक परिस्थितीचे अवलोकन करायचे. अर्थातच पंचवटीत परत येईपर्यंत त्यांच्या अनेक योजना मनात पक्क्या झाल्या होत्या. पंचवटीला प्रभुरामचंद्रांना साष्टांग प्राणिपात घालून प्रार्थना केली आणि शब्द दिला 'तुमच्या आज्ञेप्रमाणे कृष्णातीरी जाईन.'

बारा वर्षापूर्वी टाकळीतून निघताना उध्दव खूप लहान होता. त्याच्या समाधानासाठी टाकळीत त्यांला मारूतीराया स्थापून दिलाच होता. आता उध्दव मोठा झाला होता. समर्थांची आज्ञा ऐकून तिथेच मारूतीरायाची सेवा करत समर्थांची वाट बघत होता. समर्थ परत आल्यानंतर त्याला केवढा मोठा आनंद झाला. समर्थांनी नंतर गंगाप्रदक्षिणा करून जांबला आईला भेटायला जाणार होते. तेव्हा त्यांनी उध्दवाला सांगितले पुढील कार्याकरिता कृष्णातीरी आपल्याला जायचे आहे. त्र्यंबकेश्वरापासून समर्थांनी गंगा प्रदक्षिणेला सुरूवात केली.

समर्थ पैठणला आले. तिथे रोज समर्थ कीर्तन करीत. समर्थांच्या पायात पादुका, गळ्यात मेखला, डोक्यावर जटाभार टोप, काखेत कुबडी, अंगावर हुर्मुजी वस्त्र नि पाठीशी गलोल असे

गावात फिरत असताना समर्थ तिथल्या मुलांमध्ये पण मिसळत असत. पण ही मुले एकदा समर्थांची टर उडवून म्हणाली,' तुमच्या गलोलीचा नेम अचूक लागतो ना? मग आकाशात उडत्या घारीला तुमची गलोल टिपेल का? ' आणि समर्थांनी अचूकपणे एका खड्यातच घारीला टिपले, ती घार खाली कोसळल्यावर मुले घाबरली. समर्थांचा वेध आणि हातातील गलोल पाहून समर्थांकडे ब्रह्मवृंदाने तिरस्कारीत नजरेने पाहिले आणि कुत्सितपणे म्हणाले,' एका जीवास तुम्ही मारले तर शास्त्रानुसार प्रायश्चित्त घ्या. ' समर्थांनी सक्षौर प्रायश्चित्त घेतले आणि ब्राह्मणांना म्हणाले,' जर माझी शुध्दी झाली तर आता घारही जिवंत व्हायला हवी. अशा रीतीने समर्थांना युक्तीवाद सुरू केला आणि मृत घारीला जिवंत केले. समर्थांचा हा अधिकार पाहून सर्वजण थक्क झाले आणि समर्थांची क्षमायाचना करू लागले.

यानंतर समर्थांच्या कीर्तनाला लोकांनी अलोट गर्दी जमू लागली. कीर्तनाला जांबहून पण अनेक जण येत होते. एका ब्राह्मणाला मात्र समर्थांकडे पाहून सारखे वाटत होते की हा आपला सूर्याजीपंत ठोसरांचा मुलगा नारायण असावा. कीर्तनानंतर त्याने समर्थांकडे तशी विचारणा केल्यावर समर्थांनी होकार दिला. त्यावर ब्राह्मणाने समर्थांच्या घरची वार्ता सांगितली. तुम्ही गेल्यानंतर शोकाने तुमच्या आईची रडून रडून दृष्टी केली आणि बंधू श्रेष्ठ तुमच्याच आठवणीत दंग असतात. तसं तर समर्थ जांबला आईला, श्रेष्ठांना भेटायला जाणारच होते. मात्र ही वार्ता ऐकल्यावर समर्थांच्या मनात भावनांचा कल्लोळ उडाला आणि त्यांची पाऊले आपल्या गावाकडे पडू लागली. जरी अवघ्या विश्वाची चिंता समर्थांना असली तरी, त्याच ध्यासाने त्यांनी घर साडले तरी आईची माया थोडीच ते विसरले असतील?

समर्थांनी गावात प्रवेश केल्यावर प्रथम हनुमंताच्या दर्शनाला गेले. त्या हनुमंताला पाहिल्यावर समर्थांचे अंतःकरण पुलकित झाले आणि तेथून थेट ते आपल्या ठोसर वाड्यात आले. अंगणात उभे राहून 'ॐ भवती भिक्षां देही' म्हणून भिक्षेचा श्लोक म्हणल्यावर त्यांची वहिनी, श्रेष्ठांची पत्नी भिक्षा वाढण्याला पुढ्यात आली, तर समर्थांनी छान उत्तर दिले. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' एवढीशी भिक्षा घेऊन जायला हा काही परका गोसावी नाही. हा घरातलाच गोसावी आहे. ''[४५] समर्थांच्या पार्वती वहिनींनी जेव्हा राणूबाईंना आत जाऊन सांगितले तेव्हा राणूबाई चमकल्या. शेवटी समर्थांचीच आई ती, तिने ओळखले हा

घरचा गोसावी म्हणजे नारायणच असणार. 'नारायण का?' असे आईचे शब्द ऐकले आणि समर्थांचा ऊर भरून आला. समर्थ जरी भावनेच्या आहारी जाणारे नसले तरी काही पाषाणहृदयी नक्कीच नव्हते. अतिशय भारलेल्या अंतःकरणाने समर्थ आईला म्हणाले,' हो, मी नारायण' राणूबाई आनंदाने तरी पण धडधडत्या हृदयाने सामोऱ्या आल्या आणि समर्थांनी आईचे पाय धरले आणि आईच्या कुशीत शिरले. त्यांना लहान नारायण आठवत होता. इतक्या वर्षांनी परत आलेल्या नारायणाला राणूबाईंनी प्रेमाने, स्पर्शाने, चाचपडले. त्यांच्या लक्षात आले आता हा नारायणाचे शरीर बांधीव, भरीव, बलदंड आहे. प्रचंड बाहू आणि लांब दाढी आहे. चोवीस वर्षांनी आईला भेटलेला मुलगा आणि दररोज आपल्या मुलाची नारायणाची वाट बघणारी आई, यांची ही भेट मोठी अपूर्वच होती. 'श्रीराम जयराम जय जय राम' ह्या मंत्राचा वैखरीने जप करू लागले केवळ समर्थांच्या हाताच्या स्पर्शाने राणूबाईंना आपल्या डोळ्यांनी पुन्हा एकदा न्याहाळले. तेवढ्यात श्रेष्ठही देवघरातून बाहेर आले. समर्थांनी श्रेष्ठांच्या चरणी मस्तक ठेवले. एकमेकांनी जवळ घेतले आणि दोघांच्या नयनातून प्रेमाश्रू आले. काय भेट होती ती, अगदी भरतभेटच. जांबमधील या वास्तव्यानंतर समर्थ थेट आपल्या पुढील सामाजिक कार्यासाठी ध्येयपूर्तीसाठी कृष्णातीरावर आले आणि तेथून त्यांनी आयुष्याचे चौथे तप चालू केले. पुढची तब्बल तीन तपे त्यांनी समाजासाठी, स्वराज्यनिर्मितीला सहाय्य करण्यासाठी वेचली.

### ४.१.१ समर्थांचे सामाजिक कार्य

श्रीरामरायांच्या आशीर्वादाने आणि आज्ञेने समर्थांच्या, सामाजिक, जीवनाची आणि कार्याची सुरूवात झाली. तीर्थाटन काळात समर्थांनी संपूर्ण देशाची परिस्थिती न्याहाळ्ली होती, अभ्यास केला होता. याचबरोबर पुढच्या कार्याचे नियोजनसुध्दा करत होते. धर्मसंस्थापना आणि स्वराज्य स्थापना ही दोन ध्येये त्यांना गाठायची होती. स्वराज्याला एक जाणता राजा देण्यासाठी प्रयत्न करायचे होते.

तीर्थाटन करून जांब गावी जाऊन आपल्या आईला, जेष्ठ बंधू 'श्रेष्ठ' यांना भेटून समर्थ कृष्णातीरी स्थिरावले. महाबळेश्वर, वाई, कऱ्हाड, कोल्हापूर अशा सर्व प्रांतात जाऊन त्यांनी कीर्तने प्रवचने केली, मारूती मंदिरे स्थापन केली. लोकांना बलोपासनेचे महत्त्व पटवून दिले, याचबरोबर हे सर्व कार्य एकट्याचे नसल्यामुळे समर्थांनी 'समर्थ' किंवा 'रामदासी' संप्रदायाचे

लौकीकदृष्ट्या प्रवर्तन केले. मात्र ते संप्रदायाला 'स्वरूप' संप्रदाय असेच संबोधत. या संप्रदायाच्या कार्याला बळकटी येण्यासाठी शिष्यांची गरज होती. अर्थातच समर्थांचे शिष्य हे काही साधारण व्यक्तीमत्त्वाचे नव्हते. समर्थ त्यांना हेरून ठेवत, पारखून ठेवत आणि मग आपल्या संप्रदायाच समाविष्ट करून त्यांना योग्य रीतीने पैलू पाडून, तावूनसुलाखून घेऊन कार्यासाठी तयार करीत. ह्या कृष्णातीरीच्या परिसरात समर्थांनी अनेक उत्तम शिष्य मिळविले. उदा. कल्याणस्वामी, वेण्णास्वामी, दिवाकर गोसावी, आक्कास्वामी, अनंतभट, गिरी गोसावी वगैरे.

एकाच वेळी पाच पातशाह्या आपला फास महाराष्ट्राभोवती आवळत होते यामुळे सर्वदूर अंदाधुंदी माजली होती. जाळपोळ, कत्तली, लूट, स्त्रियांची विटंबना, अतिशय क्रूरता यामुळे सर्व जनता पिळवटली जात होती. स्वतः श्वासावरही कुणाचे नियंत्रण नव्हते. अशा या दुःखाने, गांजलेल्या जनतेला ह्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचे काम करायचे होते. यासाठी समर्थांनी तीन महत्त्वाच्या गोष्टी सामाजिक पातळीवर केल्या त्याम्हणजे पराक्रमी देवतांचा आदर्श समाजासमोर ठेवणे, अन्यायाला तोंड देण्यासाठी मनगटात बळ पाहिजे शरीर बलवान हवे यासाठी लोकांना बलोपासनेचे महत्त्व पटवून देणे आणि समाजप्रबोधन करून लोकांना स्वराज्याभिमुख बनविणे, कारण स्वराज्यनिर्मिती आणि धर्मसंस्थापना हे त्यांचे स्वप्न होते.

श्रीरामचंद्र, हनुमंत, तुळजाभवानी अशा पराक्रमी देवतांचे आदर्श समाजासमोर ठेवले. कथा–कीर्तन–प्रवचनातून त्यांची चरित्रे लोकांना ऐकविली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. लोकांना व्यायामाचे महत्त्व सांगून त्यांच्याकडून सूर्यनमस्कारासारखे व्यायाम करवून घेतले. अनेक गोष्टींची शिकवण देऊन, लोकांचे बौद्धीक सामर्थ्य वाढविले त्यामुळे त्यांना अन्यायाविरूध्द बंड पुकारायची इच्छा होईल, स्वतःचे स्वतंत्र राज्य होऊन आपण सुखाने नांदू अशी मनोवृत्ती तयार केली. ह्या सर्व कार्यासाठी समर्थांनी अनेक मठ स्थापन केले. पूर्णपणे तयार झालेल्या शिष्यांना त्या त्या मठांचे मठाधिपती बनवून सर्व कार्य पार पाडायला सांगितले. या मठांद्वारे समर्थांच्या महंतांनी मोठ्या जबाबदारीने, अव्हान पेलून यशस्वीपणे सामाजिक कार्य केले. समर्थ आणि शिवरायांच्या भेटीनंतर ह्या सर्व कार्याला बळकटी आली. शिवरायांच्या पाठीशी सावलीप्रमाणे उभे राहून, त्यांना अनेक गोष्टीत योग्य सल्ले दिले. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात समर्थांनी शिवरायांना केलेले सहाय्य अनन्य साधारण आहे.

समर्थांनी संपूर्ण आयुष्य समाजाच्या सुखासाठीच वेचले. केवळ धर्मसंस्थापना, स्वराज्यनिर्मिती आणि जाणता राजा ह्यावरच त्यांचे लक्ष केंद्रित होते.

### ४.१.२ समर्थांचे महानिर्वाण

इ.स. १६८०मधे शिवरायांच्या निर्याणानंतर मात्र समर्थ अस्वस्थ झाले, त्यांना एकाकी वाटू लागले, त्या दोघांचा जन्म एकाच कार्यासाठी होता. अवघ्या पन्नासाव्या वर्षी आपल्या लाडक्या शिवरायाचे, एका कर्तव्यदक्ष, सर्वगुणसंपन्न राजाचे निर्याण होणे हे समर्थांच्या सहनशीलतेपलिकडचे होते त्यामुळे आता आपल्याही आयुष्यात काही 'राम' नाही असे त्यांना वाटणे सहाजिक होते. शिवराय, लाडक्या कन्येसारख्या असलेल्या वेणास्वामी जगातून गेल्यावर समर्थ बराच वेळ एकांतात घालवत असत. आपलेही कार्य आता संपत आले आहे, रामरायाच्या भेटीला जायची वेळ आली आहे, अशी जाणीव त्यांना व्हायला लागली होती.

आपल्या पश्चात सज्जनगडावर लोकांसाठी श्रीराममंदिर उभारण्यासाठी तंजावरहून एका अंध कारागिराकडून राम, लक्ष्मण, सीता आणि हनुमंताच्या पंचधातूच्या मूर्ती बनवून घेतल्या. समर्थांच्या निर्याणापूर्वी केवळ पाच दिवस ह्या मूर्ती सज्जनगडावर पोहोचल्या, त्यांची स्थापनाही झाली. समर्थांना आपला अंतकाळ जवळ आला आहे हे माहित होते तसेच देह त्यागाचा दिवसही त्यांना ठाऊक होता आणि तो होता माघ वद्य नवमी. त्याआधी समर्थ चाफळला म्हणजेच त्यांच्या कर्मभूतीत आले. रामरायाला प्रार्थना केली आणि सज्जनगडावर परतले.

सज्जनगडावर मठात आपल्या काही शिष्यांबरोबर बसले होते. आपला अंतसमय जवळ आला आहे हे कोणाच्या लक्षात येते का पाहण्यासाठी समर्थांनी 'रघुटिळकाचा वेध सन्निध आला। तदुपरी भजनाने पाहिजे चांग केलं। असे दोनच चरण म्हटले. त्यावेळेस उद्धवस्वामीही समर्थांच्या जवळच होते, त्यांनी ताबडतोब पुढचे दोन चरण म्हणून श्लोक पूर्ण केला. श्री. सुधीर शिरवाडकर या संदर्भात लिहितात,'' श्रीसमर्थांचा हा अपूर्ण श्लोक पूर्ण करीत उद्धवस्वामी उत्तरले, अनुदिनी नवमी हे मानसी आठवावी। बहुत लगबगीने कार्य सिध्दी करावी।। ''[४६] सर्व शिष्यांमध्ये केवळ उद्धवस्वामींनी श्लोक पूर्ण केला, याचे समर्थांना कौतुक वाटले, मात्र उद्धवस्वामींनी जाणले की समर्थांचे अवतारकार्य संपणार त्यामुळे उद्धवस्वामी समर्थांचा आता कायमचा विरह होणार हे समजून अत्यंत दुःखी झाले.

श्रीरामचंद्राच्या प्रतिष्ठापनेनंतर समर्थांनी अन्न–पाणीच वर्ज्य केले पूर्णपणे मौन धरले. अर्थात शेवटचे काही दिवस त्यांची तब्बेतही बरीच नव्हती. उद्धवस्वामी समर्थांच्या जवळच बसून होते. अखेर नवमीचा दिवस उजाडला. दुपारी बाराचे सुमारास प्रत्यक्ष प्रभू श्रीरामचंद्र आलेले दिसले. समर्थांनी मोठ्यांदा तीनवेळा श्रीरामांचे नाव घेतले. यासंदर्भात शुभांगी भडभडे लिहितात,'' प्रभू श्रीरामांनी त्यांचा हात धरला आणि वायुमंडळातून अधांतरी ते निराकारच्या विराटमार्गाकडे निघाले. ''[४७] वयाच्या ७२व्या वर्षी इ.स.१६८२ च्या माघ वद्य नवमीला समर्थांनी देह ठेवला. चैत्र शुध्द नवमीला दुपारी बारा–साडेबाराला जन्म आणि माघ वद्य नवमीला दुपारीच त्यांचे निर्याण असा योगायोग होता. समर्थांच्या वियोगाने अवघा महाराष्ट्र शोकमग्न झाला होता.

## ४.२ समर्थांचे वाङ्मय

समर्थांचे वाङ्मय समर्थ आणि परिपूर्ण आहे. अगदी परिपूर्ण आहे. सर्व जगताचे ज्ञान समर्थ वाङ्मयात सामावले आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांच्या प्रत्येक ग्रंथाला हिरे, मोती, माणिक अशा रत्नांच्या उपमा द्याव्यात एवढे समर्थांचे वाङ्मय मौलिक आहे. समाजाचा उत्कर्ष व्हावा, समाज सजग असावा अशी सामाजिक दृष्टी समर्थांच्या ग्रंथात दिसते. अर्थातच काळाच्या गरजेप्रमाणेच समर्थांना समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर सामाजिक जाणीवेचा ठसा उमटविण्याची जरूरी भासली. रामायण, महाभारत, भगवद्गीता यासांरख्या महान ग्रंथातून त्यातील महान व्यक्तीमत्वांकडून समर्थांना प्रेरणा मिळालीच. परंतु समर्थांच्या वाङमयावर देशातील त्यावेळच्या भयानक परिस्थितीचा पडसाद नक्कीच उमटला. समर्थांची ग्रंथसंपदा अपार आहे. अनमोल आहे. आणि ग्रंथराज 'दासबोध' हा अपूर्व आहे. समर्थांचे वाङमय खालीलप्रमाणे आहे.

१)ग्रंथराज दासबोध २)आत्माराम ३)मनाचे श्लोक अथवा शते ४)राम ५)आनंदभुवनी ६)अनेक स्फुट काव्ये ७)ओव्या ओव्या शतके ८)भूपाळ्या, आरत्या, देवी, हनुमानाची स्तोत्रे ९)लोक साहित्य अस्मानसुलतानी, परचक्र निरूपण, फूट समास, स्फुट पंचके, अभंग.

## ग्रंथराज दासबोध

श्री समर्थांचा 'श्री ग्रंथराज दासबोध' दासबोध म्हणजे वाङ्मयातील हिरा आहे. मुकुटमणी आहे. समर्थांच्या संपूर्ण वाङ्मयात 'दासबोध ग्रंथ' हा मुख्य ग्रंथ आहेच पण इतर संत वाङ्मयात 'दासबोध' ग्रंथाला खूप महत्त्व आहे. जगाला सर्व ज्ञान देणारा एक समर्थ ग्रंथ आहे. दासबोध म्हणजे अगदी समर्थांचे हृदयच आहे. समर्थांना मुळातच सामाजिक भान होते. व्यवहार ज्ञानावर त्यांचा विश्वास होता. शिवाय त्या काळाची गरजच अशी होती की समाजाला जागरूक करायचे होते. समाजाला व्यवहार ज्ञान शिकविण्यासाठी तत्त्वज्ञान समजावून सांगण्यासाठी, अर्थातच त्यांच्या प्रपंचाची घडी न विस्कटू देता परमार्थाबरोबर त्यांची सांगड घालून देण्यासाठी त्यांना ग्रंथवाचन, अध्ययन करायला सांगणे अतिशय गरजेचे होते. या विचाराने समर्थांनी या महान ग्रंथ लेखनास सुरवात केली. दासबोधाचे वैशिष्ट्य म्हणजे अतिशय सोपी, सोयीस्कर, दैनंदिन जीवनातील दाखले देणारा, वाचताना उकल होणारा, गोड वाटणारा असा हा ग्रंथ आहे. संपूर्ण जगाचे व्यवहार ज्ञान यात आहे असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. या ग्रंथाचे मनापासून वाचन करून, समजावून घेऊन त्यातील शिकवण जर आचरणात आणली तर माणसाचे जीवन नक्की सुखी होईल. समर्थांनी हा ग्रंथ सुंदरमठात म्हणजेच महाड जवळील शिवथर घळ येथे लिहिला. त्यांनी सांगितला आणि कल्याणस्वामींनी आपल्या सुवाच्य अक्षरात, अतिशय सात्त्विक वृत्तीने लिहिला. समर्थांना डोंगरदऱ्या, नद्यांचे संगम स्थान, डोंगरघळी अतिशय आवडत. त्यांचे मन तिथे नेहमी रमत असे. मग जेव्हा या घळींना त्यांनी भेट दिली तेव्हा ते या घळींच्या, तेथील निसर्गसौंदर्याच्या प्रेमात पडले. त्याचवेळी त्यांच्या मनात खूप ज्ञान साठले होते. विचार रूजले होते. ते सर्व वाङ्मयाच्या रूपात एकदा लिहीले पाहिजे अशी इच्छा, जाणीव प्रकर्षाने निर्माण झाली. तेव्हा त्यांनी तसा निर्णय घेऊन कल्याणस्वामींना सांगितले आणि सुंदरमठात श्रीग्रंथराज दासबोध लिखाणाला सुरवात झाली.

कोणत्याही ग्रंथात सर्वप्रथम देवतांचे स्मरण करून ग्रंथाचा प्रारंभ होतो. पण समर्थांनी केवळ 'श्रीराम'! या शब्दाने ग्रंथास थेट सुरवात केली. श्री ग्रंथराज दासबोधाच्या यासंदर्भात पत्रद्वारा अध्यापनात म्हटले आहे,'' जुन्या शास्त्रीय प्रथेप्रमाणे प्रारंभी नमनासाठी एकही ओवी लिहिलेली नाही. एकदमच ग्रंथाला प्रारंभ झाला आहे ही विशेषताच आहे. ''[४८] हा ग्रथ म्हणजे

गुरू–शिष्याचा संवाद आहे. संपूर्ण भक्तीज्ञान, व्यवहार ज्ञान वगैरे ज्ञानांचे भांडार आहे हा ग्रंथ. अनेक विषयांची, विचारांची व्याप्ती घेऊन ईश्वरभक्तीचे मार्ग, ब्रह्मज्ञान, वैराग्याची लक्षणे सांगताना समर्थांनी, उत्तम पुरूषांची लक्षणे सांगतांना, मूर्खाची लक्षणे सांगितली आहेत. अगदी लेखन प्रक्रियेपासून राजकारणापर्यंतचे विषय त्यांनी हाताळले आहेत. दासबोध एकूण वीस दशकांचा आहे. समर्थ म्हणतात,' प्रत्येकाने अध्यात्मिक प्रगती केलीच पाहीजे. ' त्यासाठी नैतिक आणि धार्मिकदृष्ट्या संपन्न असायला हवे. मग त्यासाठी ते उत्तम पुरूषाची लक्षणे सांगतात. अर्थातच मूर्खांची पण लक्षणे सांगितली आहेत. दासबोधाच्या पहिल्या दशकात याचबरोबर रजोगुण, तमोगुण, कोणते आणि सत्वगुण कसा असतो हे सांगितले आहे.

जन्म–मरण, दुःख, अध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशा त्रिविध तापांबद्दल सांगतांना समर्थांनी मृत्यू व वैराग्य यांच्या बद्दलही विश्लेषण केले आहे. जन्मदुःखा बद्दल समर्थांनी एक सत्यच सांगितले आहे ते म्हणजे मुळात जन्मामुळेच सुखदुःख भोगावी लागतात याची सुरवातच मातेच्या गर्भातूनच होते. मग बालपणात बोलता येत नाही तर तारूण्यात काही कमी दुःखे नाहीत. वार्धक्यात आधार असला तर ठीकच नाही तर अवघडच. समर्थांनी नवविधा भक्ती म्हणजे भक्तीचे नऊ प्रकार सांगितले आहेत. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चना, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन या द्वारे भक्ती कशी करावी हे सांगितले आहे.(नवविधा भक्ती)

गुरू आणि शिष्य दोघेही महत्त्वाचे. समर्थ म्हणतात नुसता गुरू नको तर तो सद्‌गुरू असावा, तर शिष्यही तेवढाच अधिकारी असावा. साधना करताना प्रत्येक जण एक तर अनेक दोष असलेला, दोष कळून त्यातून सुधारण्याचा प्रयत्न करणारा, तर तिसरी पायरी म्हणजे अवगुणांचा त्याग करून संतांना सद्‌गुरूला शरण जातो तो अर्थातच बध्द, मुमुक्षु आणि साधक. माया आणि ब्रह्म सर्वत्र आहे. समजायला अतिशय कठीण असलेल्या दोन्ही गोष्टी समर्थांनी फारच सोप्या करून सांगितल्या आहेत. 'ब्रह्म आहे निर्मळ आणि निश्चळ तर माया चंचल आणि चपळ. समर्थ सांगतात, संसार हे स्वप्नच जणू त्याच्यात लोभ असतो. त्यामळे ज्ञान काम करीनासे होते. प्रपंच्यामुळे बुध्दी निष्क्रिय होते, मलिन होते. त्याला निरूपण कळत नाही. सद्‌गुरूकृपेने बुध्दीला चालना मिळते. तर सत्संगाने परमार्थ करता येतो. त्यांच्या संगतीत ज्ञान

प्राप्त होते. म्हणून गुरूभजन, निरूपण आणि क्रिया शुध्द निर्मळ असेल तर मनुष्याला पूर्ण समाधान मिळते.

ब्रह्माचे दर्शन घडायला हवे तर माणूस प्रयत्नशील आणि एकाग्रचित्त असावा मग एक एकाग्रचित्त नाही व्यग्रचित्त म्हणजेच दुश्चित्तपणा समर्थ म्हणतात हाच दुश्चित्तपणा कधीच आपली ध्येयपूर्ती होऊ देत नाही म्हणून परमार्थ करायचा असेल तर एकाग्रचित्त अत्यंत आवश्यक आहे. असे समर्थ म्हणतात. समर्थांच्या दृष्टीने ज्ञानाचे सामर्थ्य मोठे आहे. प्रापंचिक आणि पारमार्थिक दोघेही कर्मच करतात पण समजून उमजून करणारा खरा. म्हणजेच प्रत्येक कर्म हे जाणतेपणानीच करायला हवे. अंगात जाणतेपणा येतो कधी तर आपण ज्ञानप्राप्ती करून घेतली की. जो सुविद्या प्राप्त करून घेतो तो नक्कीच भाग्यवान ठरतो. अंतःकरण एक जाणीव आणि जाणीव म्हणजेच अंतःकरण आणि नेणीव म्हणजे तमोगुण जाणीवेचे काम सुख देणे तर नेणीवेचे दुःख देणे. समर्थांनी दासबोधात या दहाव्या दशकात 'प्रचिती' यावर पण प्रकाश टाकला आहे, ते लिहितात,'' प्रचितीविण ज्ञान। तेथे नाही समाधान। करून बहुतांचा अनुमान। अनहित जाले।।''[४९] आपले आयुष्य सुंदर घडविण्यासाठी, प्रपंच आणि परमार्थ यांचा समतोल हवा. यासाठी जीवनाला सुंदर वळण देण्याकरीता समर्थांनी शिकवण निरूपण सांगितले आहे. ते म्हणतात, सर्वप्रथम आळस झटकून द्यायला हवा आणि आत्मचिंतन, पाठांतर, ग्रंथमनन, गोड वाणी, खबरदारी, अडलेल्याला मदत केली पाहिजे. आळसामुळे प्रयत्नात अपयश येते. समर्थ लिहितात,'' म्हणोन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा । अरत्री परत्री जीवा। समाधान।।''[५०] याच समासात समर्थ राजकारण समजावून सांगतात. समर्थांची राजकारणाची व्याख्या खूप वेगळी पण अर्थपूर्ण आहे. श्रीग्रंथराज दासबोध अध्यायन पत्रद्वारामध्ये, '' समाजातील भिन्न प्रवृत्तीची, भिन्न पातळीवरची आणि भिन्न आवाक्याची माणस एकत्र गोळा करून प्रत्येकाकडून काही तरी कार्य करून घेण्याच्या कलेला श्रीसमर्थ 'राजकारण' हे नाव देतात. ''[५१] त्यामुळे महंतांना तयार करताना हा गुण समर्थांनी त्यांच्यावर बिंबवला आहे. असा महंत मग अलंकार, उत्तम वस्त्रे यांचा त्याग करून तो चिंतनावर भर देतो.

दासबोधात समर्थांनी अजून एका गोष्टीवर भर दिला आहे. तो म्हणजे विवेक वैराग्य. प्रत्येक कृतीला विवेकाची जोड असायलाच हवी, समर्थ लिहितात,'' ना प्रपंच ना परमार्थ। अवघें जिणेची झाले व्यर्थ। अविवेकें अनर्थ। ऐसा केला।। ''[५२]

अजून एका महत्त्वाच्या गोष्टीवर समर्थ भर देतात ती म्हणजे प्रयत्नवाद. योग्य दिशेने प्रयत्नपूर्वक पावले टाकली तर दैव अनुकूल रहातेच यावर समर्थांची नितांत श्रध्दा आहे. समर्थांचा उत्तम पुरूष निरूपणाचा समास नितांत सुंदर आहे. समर्थांचा उत्तम पुरूष हा आत्मज्ञानी आहे. त्यांच्या मते हा उत्तम पुरूष शांत, क्षमाशील, मृदू व मधूर वाणीचा, नम्र आणि मुख्य म्हणजे 'बोले तैसा चाले' या आचरणाचा असतो. समर्थांनी महंताला पूर्ण तयार होण्यासाठी अगदी साचेबद्धता असायला हवी हेही सांगितले आहे. समर्थ दासबोधात आत्म्याबद्दलही सांगतात. ते म्हणतात, आत्माच शरीर चालवतो. देह अनित्य आहे तर आत्मा नित्य आहे आणि नित्यानित्य तो विवेक, मग या विवेकानेच सारासार ओळखता येते. या तेराव्या दशकात समर्थांनी सांगितले आहे की सृष्टी अथवा भूगोलाचे मूळ ब्रह्म असून आणि आत्मारामच सृष्टी निर्मिती करतो. चौदाव्या दशकात समर्थांनी निस्पृहाची लक्षणे सांगितली आहेत. निस्पृहाने आचारभ्रष्ट न होता, स्वच्छंद आचरण करू नये. भोगलोलुप न व्हावे, भिक्षा मागूनच अन्नसेवन करावे तसेच अंगी कवित्व, कीर्तनकला असावी. हरिकथा सांगावी. चातुर्य संपादन करावे. यात समर्थ पुढे सांगतात मायेचा त्याग करून सत्य ब्रह्म ओळखावे. 'आत्मदशक नाम' या पंधराव्या दशकात समर्थ बाह्य राहणी आणि अंतःकरणात कशी युक्ती असावी हे सांगतात. दिसायला कसाही असला तरी तो लोकांमध्ये मिसळून रहातो. त्यांना भजनमार्ग दाखवतो. वाल्मिकी ऋषींचा महिमा, सूर्य, पृथ्वी, आप यांचे स्तवन तर नाना उपासना आणि गुणभूत यांचे निरूपण, अग्नी, वायू आणि आत्माराम यांबद्दल समर्थांनी खूप सुंदररित्या समजावून सांगितले आहे. दासबोधाचा सोळावा दशक यावर आधारित आहे. सतराव्या दशकात देवाचे महात्म्य सांगताना समर्थ म्हणतात, आदिशक्ती आणि शिवशक्ती एकच. तिच्यातूनच अनेक आकार झाले. समर्थ म्हणतात, अध्यात्माबद्दल वक्तव्य करताना श्रोत्यांनी कितीही प्रश्न विचारले तरी त्याचे उत्तर व्यवस्थित देता यायला हवे. कारण समर्थ म्हणतात, पोहणाराच गचक्या खाऊ लागला तो बुडणाऱ्या लोकांना वाचवू शकेल का?

अठराव्या दशकात समर्थ म्हणतात, माणूस फार लोभी असतो. सतत काही ना काही तरी अभिलाषा पूर्ण होण्यासाठी त्याला देव हवा असतो. पण तसे न करता अंतर्मुख होऊन खऱ्या देवाचा शोध घ्यावा. समर्थांनी याच दशकात उत्तम पुरुषाची लक्षणे फारच छान सांगितली आहेत. धर्मस्थापना, लोकरक्षणाकडे लक्ष द्यावे. कायम सावध रहावे. विवेक विचार आणि राजकारण याने अंतरंग शृंगारले पाहिजे. अंगी नम्रता, बोलण्यात मृदुता असावी.

दासबोधात समर्थांनी अगदी लिहावे कसे? अक्षर कसे असावे? हे सुद्धा वर्णन केले आहे. काळी शाई, वाटोळे, सरळ मोकळे अक्षर काढावे असे ते सांगतात. १९ व्या दशकात समर्थांनी करंटेपणाची लक्षणे, समर्थ माणसाची लक्षणे म्हणजेच करंटा प्रचंड आळशी तर समर्थ कामसू असतो. करंट्याच्या अंगी अवगुण जास्त असतात तर समर्थ माणूस नम्र, अंगी अनेक चांगल्या विद्या, कला असलेला असतो.

दासबोधाचा विसावा व शेवटचा दशक किंवा शिवशक्ती, निरुपण, देहक्षेत्र, सूक्ष्म आणि विमल ब्रम्हनिरुपणाबद्दल सांगतात सर्वात महत्त्वाचे म्हणजे शरीरासारखे यंत्र दुसरे यंत्र कोणतेही नाही. समर्थ लिहितात,'' अस्थिमांसांचे शरीर। त्यामध्ये गुणप्रकार। शरीरासारखे यंत्र। आणिक नाही।। ''[५३] विसाव्या शतकात संपूर्ण सारच आले आहे. दासबोध प्रवेश पत्रद्वारामध्ये लिहिले आहे,'' दासबोध म्हणजे प्रत्यक्ष भगवंतांचीच वचने आहेत. आत्माराम ग्रंथाचा कर्ता आहे. जे मनापासून अभ्यास करील, त्यास दासबोध ब्रह्मज्ञानी बनवून टाकील. ''[५४]

असा दासबोध हा ग्रंथ अद्वितीय ज्ञान देणारा आहे. अगदी बालवयापासून वृद्धांपर्यंत, स्त्री, आणि पुरुष दोघांसाठी त्याने दैनंदिन जीवनातील आचारांचे, तर संपूर्ण जीवन कसे सार्थकी करावे या विषयी सांगितले आहे.

**आत्माराम**

समर्थांचा आत्माराम हा ग्रंथ म्हणजे त्यांचा आत्मा आहे. श्री शंकर अभ्यंकर या संदर्भात म्हणतात,''दासबोध म्हणजे समर्थ बोध असेल तर आत्माराम म्हणजे पूर्णबोध आहे.''[५५] 'आत्माराम म्हणजे स्फुट असून दासबोधाप्रमाणेच 'आत्माराम' पण गुरुशिष्यांचा संवाद आहे. एकूण पाच समास आणि १८३ ओव्यांचा हा ग्रंथ आहे. त्यागनिरूपण, मायानिरुपण, ब्रह्मनिरुपण,

साधन निरुपण आणि स्वानुभव निरुपण हे आत्म्याच्या उद्धारासाठी आहेत असं सांगून समर्थांनी ज्ञानाचे एक भांडार खुले केले आहे.

पहिल्याच समासातील पहिल्या ओवी गणेशाला वंदन कसे केले आहे? तर त्याच्या निर्गुण रुपाचेच. ब्रह्म निर्विकार, निर्गुण, निराकार असते असे सांगून समर्थ म्हणतात की लौकिकाचा त्याग करा. माझ्या शब्दांवर विश्वास ठेवून श्रवण, मनन, चिंतन करा. माया ही वेड लावणारी असते. म्हणून सावध करण्यासाठी समर्थ सांगतात, मायेमुळे परमार्थाची जाणीव होते. लोखंड अग्नीजवळ आले की शुद्ध होते, तर परिसाजवळ आले की सुवर्ण होते. मायानिरुपणात नि:संग म्हणजे अशाश्वत असे समर्थांचे सांगणे आहे. समर्थांनी 'आत्माराम'मध्ये लिहिलेल्या,'' संग तितुका नाशिवंत । सोडून रहावे निवांत। एकपणाचा अंत झालिय समाधान ।। '' या ओवीसंदर्भात प्रा. के. वि. बेलसरे लिहितात,'' सर्व प्रकारची आसक्ती नाशिवंत आहे, तिचा त्याग करावा आणि शांत रहावे. पुढे एकटेपणाचाही शेवट झाला म्हणजे समाधान लाभते ''[५६] तर समर्थांनी दोन महत्त्वाचे उपदेश केलेले आहेत. नुसते शब्दांनी बोलणे हे काही खरे नाही, त्यात तथ्य नाही पण अनुभवाची जोड असेल तर ते खरे महत्त्वाचे. अनुभव म्हणजे खरं रुप आहे.

साधनानिरुपणात समर्थांनी मोक्षप्राप्तीचे साधन कोणते तर सर्व साधनांचे सार म्हणजे श्रवण, मनन आहे असे सांगितले आहे. त्यासारखे दुसरे साधन नाही म्हणूनच अध्यात्म निरुपणाचे श्रवण करावे.

गुरु म्हणजे परिस आणि शिष्य म्हणजे लोखंड. अनुभवांनी शिष्य गुरुच्या पूर्णपणे सानिध्यात येतो आणि गुरुशी पूर्णपणे समरस होतो. मग अशाने शिष्यसुद्धा परिस होतो. असा हा दोघांचा आत्मानुभव असतो. जेव्हा शिष्य गुरुशी संपूर्णपणे एकरुप होतो तेव्हा त्याच्यात ही गुरुत्व प्रकट होते. असे गुरू-शिष्याचे महत्त्व याठिकाणी समर्थ सांगतात.

**मनोबोध**

'मनोबोध' 'मनाची शते' अर्थातच 'मनाचे श्लोक' समर्थांचे वाङ्मय म्हणजे बालपणीच आपल्याला शिकवले जातात. या श्लोकांना एक प्रकारचा गोडवा आहे. शिवाय अत्यंत सोप्या, रसाळ शब्दात समर्थांनी केलेला मानवी मनाला मोठा बोध आहे. भुजंगप्रयातवृत्त येथे समर्थांनी

वापरले असून ह्या श्लोकांची भाषा अत्यंत तेजस्वी आहे. या संदर्भात श्री. शंकर अभ्यंकर लिहितात,'' मनाचे श्लोक म्हणजे महाराष्ट्र सारस्वताचा श्रेष्ठ अलंकार आहे. जणू कौस्तुभमणीच! मराठी भाषेतील उपनिषद म्हणून या समर्थ रचनेचा गौरव केला जातो. ''[५७]

मनाच्या श्लोकाची रचना एका प्रसंगामुळे झाली. चाफळला समर्थांनी श्रीरामनवमी उत्सव चालू केला. काही वर्षांनी खूपच लोक यायला लागले. छत्रपती शिवराय उत्सवासाठी धान्य पाठविणार होते. परंतु काही कारणास्तव ते लवकर पोहोचले नाही. तेव्हा हा अन्नधान्य पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी समर्थांनी एका रात्रीत कल्याणस्वामींकरवी २०५ श्लोक लिहिले आणि सर्व समर्थ शिष्यांनी हे श्लोक पाठ केले आणि दुसऱ्या दिवशीपासून पंचक्रोशीत प्रत्येक घरापुढे भिक्षा मागताना एकेक श्लोक म्हणला. काही काळातच धान्याची कोठारे भरली आणि सर्वांच्या भोजनाची चिंता दूर झाली. पण या अचानक रचलेल्या श्लोकांनी संपूर्ण जीवनाला वैचारीक आधार दिला. मनाला खूप अशा सूचना दिल्या की त्या पाळल्यातर अवघे जीवन उजळून निघेल. वारकरी जसे नित्यनेमाने हरिपाठ म्हणतात, तसेच समर्थ भक्त मनाचे श्लोक म्हणतात. समर्थ म्हणतात पूर्ण जगात सर्वात चंचल काय तर आपले मन. सर्वात जास्त वेग कोणाचा? तर मनाचा. त्यामुळे या चंचल, अस्थिर मनाला काबूत ठेवणे सर्वात अवघड आहे. मनाचे श्लोक केवळ मनालाच उद्देशून लिहिले आहेत. शिवाय हे लेखन अगदी शास्त्रशुद्ध आहे.

समर्थांच्या सुरूवातीचे श्लोकच या वाङ्मयाचे महत्त्व सहजपणे सांगून जातात. मना सज्जना भक्तीपंथेची जावे। या ओळीत समर्थ आधीच आपल्या मनाला 'सज्जना' म्हणूनच संबोधतात. जर आपण आपल्या मनाला सुरुवातीपासून 'सज्जना' म्हणून म्हणले तर तिथपासून आपण मनाला जिंकायला सुरुवात करु शकतो. समर्थ मनाला म्हणतात की तू भक्तीमार्गाचा अवलंब केल्याने, प्रत्यक्ष भगवंत नक्कीच प्रसन्न होतात, म्हणून या जगात जे जे काही वाईट आहे, ते सर्व सोडून द्यावे. तर 'प्रभाते मनी राम चिंतित जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा'।

आपल्या दिवसाची सुरुवात ज्या मंगलमय प्रभातने होते, त्यावेळीच श्रीरामांचे चिंतन करुन त्यांचे नाव घेतले तर त्याचा दिवस सुंदर जाऊन तो धन्य होतो. म्हणून समर्थ म्हणतात,' प्रभाते मनी राम चिंतित जावा' माणसाचा देह नाशवंत असला तरी आत्मा सत्य आहे आणि तो परमात्म्याशी एकरुप होतो. जोपर्यंत माणूस आपल्या देहालाच महत्व देतो आणि 'मी म्हणजे

कोण?' तर माझे हे शरीर. त्याचेच चोचले तो पुरवत बसला तर परमार्थ कधी करणार? इतरांचे कल्याण तरी कधी बघणार? मग ते सर्व मनाचे श्लोक समजून सांगतात. समर्थांनी २०५ श्लोकांची १)मंगलाचरण २) विवेक वैराग्याचे उद्बोधन ३)राघवाचा पंथ सगुणभक्ती ४) राघवाचा पंथ – निर्गुणभक्ती ५) सगुणनिर्गुणातील शुद्धस्वरुप. अशा पाच भागात मांडणी केली आहे.

यात समर्थ सदाचार करावा असे निक्षून सांगतात. आणि वाईट वासना, पाप यांपासून लांब राहून धर्म, नीती सोडून नको आणि कायम सारासार विचाराने प्रत्येक कृती कर. किती यातायात करून जो देह सांभाळला. त्याचे सर्व लाड पुरवले परंतु शेवटी काळाने तो नष्ट होतोच. मग आता पुढची चिंता सर्व श्रीराघवांवर सोड, त्यांना भक्तीभावाने जिंक असे सांगतात.

श्रीराम स्वतः सामर्थ्यवान आहेत. आपल्या भक्ताची ते कधीच उपेक्षा करीत नाहीत. त्यांचे ते कैवारी तर आहेतच. शिवाय ते पराक्रमी, कोदंडधारी आहे. यमसुध्दा त्यांच्या पुढे लटपटतो. श्रीरामांना आपल्या दासाबद्दल, भक्ताबद्दल खूप अभिमान आहे. रावणाने बंदिवान केलेल्या सर्व देवांना श्रीरामचंद्रांनी साडविले. शिळा होऊन पडलेल्या अहल्येचा केवळ श्रीरामचंद्रांमुळे उद्धार झाला. ते आपल्यावर निस्सिम भक्ती करणाऱ्याला कधी डावलणार नाहीत. या राघवांचा जो सदाचारी, मनोगावे भक्ती करणारा जो दास आहे तो त्याच्या भक्तीने धन्य होते. त्याचे संपूर्ण जीवन सार्थकी लागते. केवळ मनापासून श्रीरामांचे चिंतन, नामस्मरण केले तर त्याचे सर्व दोष जातात. त्याला गती मिळते कारण त्यामुळे त्याने खूप पुण्यप्राप्ती केलेली असते. नामस्मरणाचा महिमा खूप मोठा आहे. श्रीरामाचा ध्यास धरा त्याचे नाव घ्या. स्वतः चंद्रमौळी भगवान शंकरांना सुध्दा रामनामाने तारले आहे. मनोबोध मध्ये सत्संग रामभक्ती यात समर्थांनी सांगितले आहे की सज्ञनांचीच फक्त संगत धरली तर दुर्जनाची सुध्दा वृत्ती पालटते आणि बुध्दी सन्मार्गावर चालू लागते. सत्संगामुळे देहबुध्दी सोडता येते आणि आत्मबुध्दी मिळविता येते. मनानेच धरलेला इंद्रिय विषय सोडुन निर्गुण देव ओळखशवा. मनानेच केलेल्या कल्पना मनानेच नाहीशा कराव्यात. यासाठीच सज्ञनांची संगती हवी. मी म्हणजे देह आहे असे आपण कधी म्हणतो? तर अज्ञानामुळे आपण तसे म्हणतो. पण सज्ञनांच्या संगतीत आल्यावर मात्र मी देह आहे असे न म्हणता आपण मी आत्मा आहे असे म्हणतो. शाश्वत असलेल्या आत्म्याबद्दल

मानची भावना निःसंशय असावी, त्याबाबत बिलकुल संदेह बाळगू नये प्रत्येक क्षण सार्थकी लावण्यासाठी नेहमी सज्जनांचीच संगत धरावी, असे समर्थ सांगतात

श्रीरामांचे सगुण–निर्गुण स्वरूप समर्थ खूप परिणामकारकपणे सांगतात. व्यवहारिक दृष्ट्या विचार केला तर श्रीरामांचे रूप सगुण आहे पण पारमार्थिकदृष्ट्या विचार केला तर ते निर्गुण अर्थातच परब्रह्म आहे.

श्रीरामांचे शुध्द स्वरूप कसे आहे? श्री. शंकर अभ्यंकर या बाबतीत म्हणतात,'' परमात्म्याचे हे स्वरूप अत्यंत गुढ आणि स्थिर आहे. त्याच्या ठिकाणी दुजेपण (म्हणजे द्वैत) नाही. ही खूण सद्गुरू कृपेने कळली की ते सुलभ होते. (अर्थात प्रत्ययाला येते) ''[५८] अशा रितीने समर्थांनी सद्गुरूंची थोरवी सांगितली आहे. समर्थांनी सर्वात शेवटच्या श्लोकात मनोबोधाचे सारच दिले आहे. '' मनाची शतें ऐकता दोष जाती। मतीमंद ते साधना योग्य होती। चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी। म्हणे दास विश्वासता मुक्ती भोगी।। ''[५९]

मनोबोधातील हा शेवटचा श्लोक म्हणजे फलश्रृती अर्थात गोमटे फळ. हे श्लोक वाचल्यास पाप बुध्दी जाते तर बुध्दीने मंद असणारेही साधना करण्यास योग्य होतात. ज्ञान आणि वैराग्य अंगी बाणता येते. या सर्वांवर विश्वास ठेवला, मनाला पटले की मुक्तीचे सुख मिळते.

**करूणाष्टके**

समर्थांच्या वाङ्मय संपदेमध्ये जसे दासबोध, आत्माराम, मनोबोध वगैरे महत्त्वाचे आहेत. तेवढीच महत्त्वाची त्यांची करूणाष्टके आहेत. समर्थांच्या वाङ्मयसागरातील हा करूणाष्टक म्हणजे पहिला मोती की ज्यांची रचना त्यांच्या लहान वयात असताना झाली. अर्थातच टाकळी येथील त्यांच्या पुरःश्चरणाच्या काळात. करूणाष्टकाचा शब्दशः अर्थ म्हणजे देवाची भाकलेली करूणा, त्याला अंतःकरणातून, मनापासून घातलेली साद. व्याकुळतेने जेव्हा मन व्यापलेले असते, त्या व्याकुळतेने केलेली प्रार्थना. समर्थांनी वयाच्या बाराव्या वर्षी एक ध्येय ठेवूनच घर सोडले, पण एवढ्या लांब आल्यावर त्यांना जो त्रास झाला. तो सोसताना त्यांच्या मागे कुणी खंबीरपणे उभे राहिले नव्हते, त्यामुळे त्या कोवळ्या वयात एकट्याला त्रास सहन करायला लागला. पुरःश्चरण,

उपासना, अनुष्ठाने अतिशय खडतरपणे चालू होती. ती काही सहज होणारी नव्हती. त्यावेळेस समाजातील लोकांना त्याच्या तपश्चर्येचे महत्त्व माहित नसल्याने ते त्यांची चेष्टा करत, त्रास देत, एवढेच नव्हे तर हा कुणी वेडा घरदार सोडून, पळून आलेला आहे. उदा. समर्थांना भिक्षेत अनेक प्रकारचे चांगले पदार्थ मिळत. पण असे अन्न खाण्याची सवय लागली तर ती आपल्या तपश्चर्येत अडथळा आणणारी ठरेल याची त्यांना जाणीव झाली. म्हणून मिळालेली सर्व भिक्षा एकत्र करून एका फडक्यात बांधून पाण्यात बुडवत. त्यामुळे त्या पदार्थातील सर्व प्रकारचे म्हणजे, गोड तिखट, आंबट वगैरे रस पाण्यात निघून जात आणि मग तो चव नसलेला 'अरूची आहार' त्यांनी सेवन करायला सुरुवात केली. पण लोकांच्या दृष्टीने हा विचित्र प्रकार होता, त्यामुळे त्यांना वेडे समजून लोक चांगली भिक्षा, कपडे वगैरे देईनासे झाले. हे सर्व त्या लहान नारायणास कसे सहन होत होते? पण मग अशा वेळी त्यांना स्वाभाविकपणे घरची आठवण यायला लागली. बंधू श्रेष्ठ, आई, आपलं घर, सर्व गाव हे सर्व सोडून आल्याचा पश्चाताप व्हायला लागला आणि मन अजूनच व्याकूळ झाले. पण त्यांची रामरायावर प्रचंड निष्ठा होती. त्यामुळे ही निंदा, टिंगल ज्यामुळे जी त्यांच्या मनाची घालमेल होत होती, जो कोंडमारा होत होता, तो सांगण्यात त्यांना फक्त रामरायाच जवळचा होता. मग आपल्या भावना त्यांनी प्रभूरामरायाजवळ बोलायला सुरूवात केली. मन मोकळे करायला ते नाशिकच्या राममंदिरात जात. आपल्या आराध्यदेवताने सद्गुरूंनी (कारण प्रभूरामचंद्रच त्यांचे गुरू) आपल्याकडे लक्ष द्यावे, कृपा करावी याची जी 'भाकलेली करूणा' जी त्यांनी काव्य रूपात मांडली, रचली तीच ही 'करूणाष्टके' याद्वारे समर्थांनी श्रीरामांशी संवाद साधला. करूणाष्टके प्रासादिक आहेत. त्यांच्या अनुभवातून आणि अगदी अंतःकरणापासून झालेली रचना आहे. जो यातील सर्वात महत्त्वाचा श्लोक आहे त्या श्लोकात समर्थांच्या जीवाची घालमेल दिसते आणि करूणाष्टकांच्या निर्मितीचे कारण समजते.

'' अनुदिनी अनुतापे तापलो रामराया। परमदिनदयाळा निरसी मोहमाया। अचपळ मन माझे नावरे आवरीतां। तुज विण शिण होतो धाव रे धाव आता।। ''[६०]

यातून समर्थांच्या मनाची तगमग, पश्चाताप, दुःख अतिशय तीव्रतेने दिसते. समर्थ म्हणतात दिवस अन् दिवस मी पश्चातापाच्या आगीत होरपळतोय. रामराया तू खूप कृपाळू दयाळू आहेस. माझ्यावर दया कर. माझे मोह माया माझ्याजवळ येऊन देऊ नकोस. माझे मन इतके

चपळपणे सैरावैरा धावत आहे की त्याला आवरता येत नाही. तुझ्याशिवाय माझा जीव शिणला आहे. आता तु धावत ये. केवळ या एका ओवीत, समर्थांची करूणा देवाला यावी, एवढी त्या करूणेत आर्तता आहे. समर्थांना रामरायाचे सानिध्य हवे होते. त्यांची मनापासून सेवा करायची होती.समर्थांना रामरायाचा सहवास घडण्याची इच्छा होती. सेवा करता करताच मरण यावेसे वाटत होते. ते म्हणतात,'' हे सर्व गुणसंपन्न असलेल्या अनंता माझी उपेक्षा नको, दुर्लक्ष नको.''[६१]

अशा रितीने समर्थांनी श्रीरामचंद्रांच्या त्यांच्या ८२ करूणाष्टकात गणेशाचे वर्णन केले आहे. रामाची स्तुती केली आहे. त्याचे रूप वर्णिले आहे, श्रीकृष्णाचे ध्यान वर्णिले आहे, रामायणातील प्रसंग सांगितले आहेत, तुळजाभवानीची स्तोत्रे आहेत. भक्ती, ज्ञान, विवेक, वैराग्याची मागणी केली आहे. असे अनेक विषय यात समर्थांनी हाताळले आहेत. समर्थांना परिस्थितीचे, आपल्या इप्सिताचे भान असायचे. काही वेळाकरीता समर्थ दुःखाने, पश्चातापाने जरी अगतिक झाले होते, तरीही ते लगेच भानावर आले. त्यांच्या ध्येयाची त्यांना त्याक्षणी जाणीव होऊन ते रामरायापुढे नम्र झाले आणि आपले समर्पण कशासाठी आहे याचे त्यांना भान आले. म्हणजेच दुःखावर फुंकर न घालता ते परिस्थितीला सामोरे जात असत.

एकंदरीत सांप्रदायिक उपासना जिथे नियमित चालते, तिथे करुणाष्टके पण नियमित म्हणण्याची पद्धत आहे. अशा या गोड, लयबध्द करूणाष्टकांना समर्थ वाङ्मयात स्वतंत्र स्थान आहे.

## आनंदवनभुवनी

समर्थांच्या वाङ्मय संपदेतील अवघे ५९ ओव्यांचे हे काव्य अगदी भव्यदिव्य आहे. कारण या काव्यात त्यांचा ध्यास दिसतो, त्यांची स्वप्नपूर्ती झालेली कळते. समर्थांनी आपल्या आयुष्याचे ध्येय काय आहे हे केव्हाच समजून घेतले आहे. स्वराज्य निर्मिती तेही शिवरायांसारख्या कर्तृत्ववान पुरूषाकडून व्हायला हवी होती आणि ते त्यांना पाहायला आणि प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले. समर्थ स्वतःच्या ध्येयापासून एक दिवस सुध्दा बाजूला झाले नाहीत. त्यांनी एक क्षणसुध्दा कधी वाया घालवला नसेल. एवढ्या बालवयात घरादाराचा त्याग करून आपल्या लक्ष्याकडे झेप घेतली, काही आशा–आकांक्षा ठेवूनच. बारा वर्षांच्या खडतर

तपश्चर्येनंतर ते तीर्थाटनाला निघाले ते केवळ सामाजिक परिस्थितीचे आकलन करण्यासाठी. राष्ट्राचे हित साधण्यासाठी. एवढ्या तरुण वयात केलेला संकल्प त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची ओळख करुन देतो. त्यामुळे 'आनंदवनभुवनी'त समाजाच्या विदारक परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते आणि नंतर त्यांच्या स्वराज्य सुराज्याची स्वप्नपूर्तता दिसते. अर्थातच छत्रपती शिवरायांसारखा राजा मिळाल्याचा परम आनंद आणि पृथ्वीवर परत रामराज्य आल्याचे समाधान अशा अनेक पूर्तता केवळ या ५९ ओव्यात दिसतात.

समर्थांनी देशात चाललेला अनाचार, अत्याचार स्वत:च्या डोळ्यांनी बघितला होता. समर्थांची निरिक्षणशक्ती तीक्ष्ण होती. देशास्थितीचे अवलोकन करताना त्यांच्या नजरेतून काही सुटले नाही. ही विदारक स्थिती पाहून त्यांचे जागृत असलेले सामाजिक भान अजूनच जागृत होऊन त्यातच त्यांच्या भावी सामाजिक कार्याची, भूमिकेची दिशा ठरत गेली आणि त्याची बीजेही रोवली गेली. जर का यवनी शक्तीचा जुलुम झिडकारायाचा असेल, तर आपल्या समाजाचे पाय प्रथम भक्कम रोवले गेले पाहिजेत. समाजातील लोकांचे मन आणि तन दोन्हीत स्फूर्ती जागली पाहिजे. त्यात बळकटी आली पाहिजे. 'आनंदवनभुवनी' च्या पहिल्या ओवीतच समर्थ जनतेच्या, अवघ्या, महाराष्ट्राच्या दु:ख–दैन्याबद्दल सांगतात.

यात समर्थ म्हणतात जन्म, जरा दु:खे आहेत. पण संसार त्यागणे म्हणजे कुठे तीर्थक्षेत्री जाऊन बसणे अगर देहाचाच त्याग करणे नसून स्वराज्यनिर्मिती कार्यात उतरण्यासाठी आहे. कारण रामराज्यात व्यक्तीगत दु:ख न मानता स्वराज्याच्या कामात झोकून द्यायचे आहे. समर्थांनी 'आनंदवनभुवन' रामराज्य आणण्याचा संकल्प सोडला होता. तसाच प्रयत्न त्यांचा आणि शिवरायांचा होता. शिवरायांना हिंदवी स्वराज्य निर्माण करायचे होते. तशीच त्यांची घोडदौड या निर्मितीकडे चालू होती. या घडामोडी, महाराष्ट्रात सुखशांती नांदायला येता होती आणि हे सर्व समर्थ आपल्या नजरेने बघत होते. म्हणून ते ७ व्या ओवीत म्हणतात,'' स्वप्न जे देखिले रात्री। तेंतें तैसेचि होतसे। हिंडता फिरता गेलो। आनंदवनभुवनी।। ''[६२]

समर्थांचे प्रबोधन, मार्गदर्शन आणि शिवरायांचा पराक्रम याने स्वराज्याची शक्ती एकत्र येत होती. माणसे ध्येयाने पेटत होती. आपला धर्म जागला पाहिजे या भावनेने ती पण पराक्रम गाजवत होती, आणि 'आनंदवनभुवन' निर्माण व्हायला लागले होते. जसजशा लढाया जिंकल्या

जात होत्या, तसतसा सगळ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना डोळ्यासमोर फक्त 'आनंदवनभुवन' दिसत होते. म्हणजे म्लेंछ दैत्य अर्थात या यवनी सत्तेचा, यांचा संहार झाला आणि हिंदुस्थान सुखी झाले. अभक्तांचा नाश झाला म्हणजे वाईट गोष्टींचा अर्थात जी यवनी सत्ता आपल्या डोक्यावर बसून थयथय नाचत होती, त्यांचा नायनाट झाला. यानंतर स्वराज्यात धन–संपत्ती पण नांदायला लागली. स्वराज्यनिर्मितीसाठी आणि टिकविण्यासाठी धन लागते. आर्थिक बाजू पण बळकट व्हायला लागते. यामुळे सगळीकडे अवघा संतोष पसरला.

३३ व्या ओवीत समर्थांनी मोठा आनंद व्यक्त केला आहे. हर्षभरित मनाने ते म्हणतात, पापी औरंगजेब बुडाला, म्लेंछ संहार झाला. आनंद केवढा मोठा आहे. मोडली मांडली क्षेत्रे. यातील शब्दांनी समर्थ केवढा आशय व्यक्त करतात. मोडलेल्या क्षेत्रांना त्यांचे स्वरूप मिळण्यासाठी भक्तांच्या अंतःकरणात स्थित व्हावे लागते.

आपला धर्म वृध्दींगत होण्यासाठी जप,तप अनुष्ठाने, स्नानसंध्या घडायला लागते. पण ते सुध्दा कुणाला करता येत नव्हते. समर्थ खूप सुंदररीत्या सांगतात. हे सर्व करण्यासाठी, पाणी उदंड होतेच म्हणजे उपलब्धता. परकीय सत्तेच्या जुलमांमुळे, त्यांच्या अधर्मामुळे या सर्वांचे आचरण अतिशय भयभीत अवस्थेत पार पडत होते. जर यवनी कुठे दिसत नसतील तरच सूर्याला अर्ध्य दिले जायचे. पण आता आनंदवनभुवनात तसे राहिले नाही. जप–तप, अनुष्ठाने, पुरःश्चरणी परत निर्भयतेने व्हायला लागली. समर्थांचा 'रामदायिनी' वर पूर्ण विश्वास होता. ते म्हणतात, रामदायिनीचा आशीर्वादाने खलनिर्दालन झाले. तिने आपल्या भक्तांना कसे तारले, आताही ती पुढती त्यांचे रक्षणच करणार आहे. येणाऱ्या रामराज्यात समर्थांना पहायचे होते की, सरस्वतीने इथे सुखा–समाधाने नांदावे, धर्माचे आचरण, पुराणेकीर्तने, कथा घडाव्यात तसेच सोळा विद्या, चौसष्ट कलांना आपल्याकडे स्थान असावे आणि खरोखरीच समर्थ त्याची अनुभूती घेत होते. आरोग्यसंपदा चांगली व्हायला लागली, वैभव नांदायला लागले. हे वैभव कधी खरे म्हणायचे तर जेव्हा वैराग्याच्या अधिष्ठानावर आधारलेले साकारलेले असेल. मग आता तर रामराज्य सुरू झाले आहे. समर्थांनी रामराज्याची अजून एक सुंदर व्याख्या केली आहे. ती म्हणजे, श्री. शंकर अभ्यंकर या संदर्भात म्हणतात,'' इथे विक्रम–वैभव–वैराग्य हातात हात

घालून चालतात. ''[६३] म्हणजेच शिवरायांचा पराक्रम. त्यामुळे आलेले वैभव आणि त्यावर टिकणार आहे ते वैराग्य.

आनंदवनभुवन म्हणजे समर्थांची भक्ती आणि शिवरायांची शक्ती जिथे एकत्र आली, नांदली. ही दोन्ही महान व्यक्तीमत्त्वे या हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी तर जन्माला आली. समर्थांना कळले होते की या स्वराज्य निर्मितीच्या कार्यासी अंगी सर्व उत्तमपुरूषाची लक्षणे असलेले, खंबीर नेतृत्व हवे आणि ती लक्षणे या शिवरायांमध्ये पूर्णपणे सामावली आहेत. त्यामुळे समर्थांनी शिवरायांना आपले कार्य समर्पण केले तर शिवरायांसुध्दा समाजाप्रती जपणारे कर्तव्य, इच्छाशक्ती, युक्ती समर्थांमध्ये आहे, हे जाणवते. आणि मग या दोन व्यक्तीमत्त्वांनी एकत्र येऊन जो काही इतिहास घडवला तो भव्य–दिव्य आहे, प्रेरणादायी आहे. केवळ समाजहितासाठी झगडणारे समर्थ आणि एक जाणता राजा यांच्यामुळे हिंदुस्थानला नव संजीवनी मिळाली हे खरे! समर्थांनी भविष्यात असे होण्याची नुसती स्वप्न नाही पाहिली तर स्वतःचे आयुष्य सामाजिक कार्यासाठी समर्पित केले व शिवरायांनी सुध्दा नुसती स्वराज्य निर्मितीची शपथ घेतली नाहीतर स्वराज्य निर्मिती करून दाखविली.

## इतर वाङ्मय

समर्थांनी जे वाङ्मय निर्मिले, त्यात मुख्य रचना म्हणजे ग्रंथराज दासबोध, आत्माराम, मनोबोध इत्यादी आहेत. या नुसत्याच मुख्य नाहीत तर वाङ्मयातील एकेक अलंकारच आहेत. या रचनांशिवाय समर्थांनी जे साहित्य लिहिले ते सुध्दा महत्त्वाचे आहे. सर्व संतसाहित्यात समर्थांची वाङ्मयनिर्मिती ही अनेक विषय हाताळलेली आहे. म्हणजेच समर्थांनी फक्त गंभीर तत्वज्ञानाचेच विषय हाताळले नसून देवीची आणि हनुमानाची स्तोत्रे, रामायणातील सुंदरकांड, युध्दकांड अनेक स्फुट, ओव्या, भूपाळ्या, पदे, अभंग, लोकसाहित्य यांचीही विपुल रचना केली आहे. अर्थातच प्रत्येक रचनेला स्वतःचे स्वतंत्र सौंदर्य आहे.

आत्माराम स्वामींच्या एक्केहळी मठात समर्थांच्या खालील साहित्याची नोंद आहे. पूर्वारंभ, आत्माराम, पंचसमासी, अंतर्भाव, पंचकर्ण, निर्गुणध्यान, सगुणध्यान, मानसपूजा, जुनाटपुरूष, सप्तसमासी, बहुधा गोसावी, रामायण सुंदरकांड, युध्दकांड, ओव्या, दासबोध, रामी रामदासाकृत

कृतनिर्वाह, सुगमोपाय, २१ समासी, अष्टाक्षरी ग्रंथ, पंचमान, पंचीकर्ण, मानपंचक, चातुर्थमान, पदे, अभंग, भूपाळी, समर्थकृत वीरभाट.

'सगुणध्यान' आणि 'निर्गुणध्यान' हे दोन्ही भिन्न भक्तीचे विषय असून त्यांचा विशेष म्हणजे प्रभूरामचंद्रांची सगुण आणि निर्गुण दोन्ही स्वरूपांची साधना करणारी भक्तांची भक्ती. 'पंचसमासी' हे सुध्दा गुरूशिष्यांचा संवाद असून सद्‌गुरू, श्रीरामांचा महिमा गायला आहे आणि मग स्वतः श्रीरामराया प्रगट झाले. बहुधा गोसावी अथवा जनस्वभाव गोसावी हे स्फुट समास असून समग्र समर्थ साहित्यात ज्योर्तिभास्कर जयंत साळगांवकर नमूद करतात,'' परमार्थ क्षेत्रात काही धूर्त किंवा अज्ञानी स्वतःला मोठे समजून ज्या तऱ्हेवाईक पध्दतीने वागतात त्याचे भेदकवर्णन समर्थांनी केले आहे. ''[६४] अंतर्भाव या रचनेचा सुध्दा समर्थ संप्रदायात मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता. पंचप्राण आणि वायूदेवता यांचे विवेचन केले आहे. समग्र समर्थ साहित्यात ज्योर्तिभास्कर जयंत साळगांवकर नमूद करतात मानपंचकात समर्थ म्हणतात,''रामकथा व रामराज्य जेथे जेथे असते तेथे तेथे गायन, संकीर्तन, भजनात तल्लीन होऊन नाचणारे भगवद् भक्त नामघोष तऱ्हेतऱ्हेचे देवांचे उत्सव सतत चालू असतात.''[६५] 'पंचमान' या रचनेत समर्थांनी श्रीरामचंद्रांच्या कृपेमुळे आपली रचना पूर्णत्वास गेली असे सांगितले. म्हणजेच समर्थ म्हणतात,'सर्व रामोपासना रामरायांच्या कृपेमुळेच घडली. 'चौदा शत ओव्यां' मध्ये १४१७ ओव्या असून जन्म, संसार, भक्ती, वैराग्य, ज्ञान, उपासना असे विषय तर श्रीराम–कृष्ण यांचे चरित्रही पहायला मिळते. 'स्तोत्ररचना' हाही एक वाङ्मयाचा छोटासा पण सुंदर प्रकार आहे. समर्थांनी त्यांची आवडती दैवते श्रीरामवरदायिनी, तुळजाभवानी तसेच हनुमंताची अनेक स्तोत्रे लिहिली आहेत. त्यातील 'भीमरूपी महारूद्रा' हे स्तोत्र अजूनही नित्य पठण करणारे लोक आहेत. अतिशय लयबध्द असलेले हे स्तोत्र तेवढेच हनुमंताचे रुप आणि पराक्रम गाणारे आहे.

'रामायणात सुंदर कांड' हे हनुमंतांच्या प्रतापावर आहे. श्रीरामांच्या चरित्रात जसे त्यांच्या पराक्रमाची गाथा समर्थांना महत्त्वची वाटत होती तशीच हनुमंताचे प्रतापी, वीर रूप समर्थांना महत्त्वाचे होते. हनुमंताची प्रतापगाथा लिहावी हे त्यांचे उद्दिष्ट्य होते. सुंदरकांडात त्यांनी मारूतीची ख्याती केली तर तेवढ्याच महत्त्वाच्या युध्दकाडांत युध्दाचे, शौर्याचे प्रसंग समर्थांनी

फार अप्रतिमरित्या वर्णिले आहेत. शत्रूसंहाराचे वर्णन वाचताना श्रीरामांचा, हनुमंताचा पराक्रम आणि प्रत्यक्ष युध्दभूमी नजरेसमोर अवतरते.

ग्रंथरचने प्रमाणेच समर्थांनी लोकपरंपरासुध्दा वर्णन केल्या, त्या रचना तर तालबध्द, सोप्या आहेतच. शिवाय अर्थपूर्णही आहेत. त्यांची डफगाणी काही वेगळ्याच सौंदर्याची आहेत. समग्र समर्थ साहित्यात ज्योर्तिभास्कर जयंत साळगांवकर नमूद करतात,'' आजपर्यंत समर्थांनी जेवढी डफगाणी रचली तेवढी दुसऱ्या कोणीही रचनाकाराने रचलेली नाहीत. ''[६६] डफगाणी गेय असून एका तंतूवाद्यावर म्हणजे 'दंडी'वर गातात. त्यामुळे डफगाण्यांना 'दंडीगाणे' पण म्हणतात. अर्थातच त्यात शाहीरी कला आहे. दासबोधातच समर्थांनी त्याचे वर्णन केले आहे. दंडिगाण्याबरोबरच लोकगीतातील 'पहाटगाणी' सुध्दा लिहिली आहेत. पहाटेच्या वेळी लोकगीताची ही 'पिंगळा गाण्यांची' रचना सुध्दा समर्थांनी केली आहे. दासबोधातही समर्थ पिंगळ्यांचा उल्लेख करतात. अर्थातच हा पिंगळा भविष्यवाणी करतो. समर्थंनी काही 'लावणीवजा' रचना पण केल्या आहेत. तर समर्थांच्या 'गोंधळ', 'भारूडे', भुत्या, जोहार, स्वानसंवाद, बुच्ची कथा, वीरा, चौपदी, टिपरी वगैरे प्रकारच्या रचना खूप सुंदर आहेत. समर्थांनी अनेक अभंग रचले तर आजही सर्वामुखी असणारी गजाननाची 'सुखकर्ता दुःखहर्ता', 'लवथवती विक्राळा' ही आणि 'सत्राणे उड्डाणे' ही हनुमंतांची आरती ऐकायला मिळते. समर्थांचे 'दासगीता' हे संस्कृत मधील काव्य आहे. आणि त्यांच्या हिंदी वाङ्मयीन रचनाही खूप लयबध्द आणि गोड आहेत. दासबोध, आत्माराम, मनोबोध, आनंदभुवनी, एकवीस समासी अशा मुख्य वाङ्मयाबरोबरच देवीची, हनुमंताची स्तोत्रे, रामायण, स्फुट ओव्या व शतके, भूपाळ्या, आरत्या, अष्टाक्षरी श्लोक, पदे, स्फुट प्रकरणे, लोकसाहित्य, स्फूट समास, स्फुट पंचके हेही वाङ्मय उत्कृष्ट आहे.

हे सर्व तर वाङ्मय आहेच. पण समर्थांनी अनेकांना लिहिलेली पत्रे म्हणजेच 'समर्थांची पत्ररचना' आहे. ही पत्रे सुध्दा समर्थांच्या वाङ्मय कलेची एक उत्तम रचनाच आहे. समर्थांनी आपली आई, बंधू श्रेष्ठ यांना लिहिलेली पत्र खूप अर्थपूर्ण, भावपूर्ण आहेत. तसेच शिष्य उध्दवस्वामी, भीमस्वामी, रंगनाथस्वामी, केशवस्वामी यांना लिहिलेली पत्रे उपदेशपर आहेत. तर शिवाजीमहाराजांना लिहिलेली पत्रे एक उत्तम सामाजिक भूमिका बजावतानाची आहेत, म्हणजेच समर्थांनी पत्रामधून उपदेश केले आहेत.

असे हे समर्थांचे वाङ्मय अतिशय संपन्न, अर्थपूर्ण उत्तम उपदेश करणारे आणि त्यात सामाजिक भान ठेवणारे आहे.

## ४.३ मराठीतील प्रमुख संप्रदाय आणि त्यांचे कार्य

आपल्या महाराष्ट्रातील काही प्रमुख संप्रदाय म्हणजे नाथ संप्रदाय, महानुभव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय आणि रामदासी संप्रदाय. समर्थ रामदास संप्रदायाचा अभ्यास करताना इतर चारही संप्रदायाचा परामर्श घ्यावा लागेल, कारण महाराष्ट्राच्या संस्कृतीची जडणघडण याच पाच संप्रदायावर आधारलेली आहे.

### ४.३.१ नाथ संप्रदाय

नाथ संप्रदाय म्हटले की प्रथम संत ज्ञानेश्वर नजरेसमोर येतात. कारण ज्ञानेश्वर हे प्रत्यक्ष गहिनीनाथांचा प्रसाद म्हणूनच विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई या कुलकर्णी दांपत्याच्या पोटी जन्मले. ज्ञानेश्वरांनी त्यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथातच १८ व्या अध्यायात स्वत:ची गुरुपरंपरा सांगितली आहे. त्यांना कसा उपदेश मिळाला. ते सांगतात. '' क्षीरसिंधू परिसरी। शक्तीच्या कर्णकुहरी। तेणे कै श्री त्रिपुरारी। सांघितले जे। तें क्षीरकलागेळाअंतु। मकरोदरी गुपितु। होता तयाचा हातु। पैठे जाले। तो मछप्रसवसृंगी। भग्नावयव चौरंगी। भेटला तो चौरंगी। भेटला तो सर्वांगी। संपूर्ण जाला। मग समाधी अव्यया इया। भोगाची वासना इया। ते मुद्रा श्रीगोरखराया। दिधली मीनी। तेणे योगाजिनीसरोवरु। विषयविध्वंसेकवीरु। तिचें पदी का सर्वेश्वरु। अभिषेकिला। मग तेहि हि ते शांभव। अद्वयानंदवैभव। संपदिले सप्रभाव। श्रीगयणीनाथी।। तेणे कलिकलितभूतां। आला देखौनि निरुता। आज्ञा निवृत्तिनाथा। दिधली ऐसी। तो हा घेऊनि आघवा। कळी गिळि यतया जीवा। सर्व प्रकारी धावा। करि पां वेगे। आधीच तंव कृपाळु। वरी गुरु आज्ञेचा बोलु । जाल जैसा वरिपाकाळु। खवळणे मेघा।। मग आवर्न अतिचेनि वोरसे। गीतार्थ ग्रंथ नभिषे। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथू ।। तेथ पुढोमी बापिया। मांडला आर्ती आपुलीया । कीं या साठी येवढिया। आणि लो यशा।।अनादि गुरु शंकरा। पासौनि शिष्य परंपरा। बोधाचा हा संवसारा। आला आमने।। ''[६५](ज्ञानेश्वरी १८ १७५२ ते १७५८)

या ओव्यांतून पूर्ण बोध होतो की प्रत्यक्ष आदिनाथ शंकर हे प्रथम, त्यांनी आदिशक्ती म्हणजेच पार्वतीला उपदेश केला. मत्सेंद्रनाथांनी गोरक्षनाथांना, गोरक्षनाथांनी गहिनीनाथांना उपदेश केला. तोच बोथ गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना आणि निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांना दिला. या संदर्भात सुहास आगरकर लिहितात,'' शिवशक्ती अर्थात शक्तीसह शिव हे पंथांचे आराध्य दैवत''[६६] संपूर्ण देशात ह्या संप्रदायाचा प्रसार झाला होता. परंतु उत्तर भारतात याचा प्रभाव जास्त होता.

सुहास आगरकर या संदर्भात लिहितात,'' मत्स्येंद्रनाथ भ्रमण करीत असताना सिंहल देशात गेले. तेथील राणीचा पती तिची कामवासना पूर्ण करण्यास असमर्थ होता. तिने मत्सेंद्रनाथांकडून आपली कामवासना पूर्ण करून घेतली. मत्सेंद्रनाथ भोगविलासात गुरफटले. आपल्या गुरूचा शोध घेत गोरक्षनाथ तेथे आले. गुप्तरूपाने नाच–गाण्याच्या प्रसंगी मृदंगावर 'चलो मछिंदर गोरख आया' असे बोल वाजवून गुरूला सावध केले. ''[६७] मत्स्येंद्रनाथ यांना शिवशक्तीकडून उपदेश मिळाला असला तरी ते पुढे वामचारी साधनेत अडकल्याने गोरक्षनाथांनी त्यांना बाहेर काढले. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' दहाव्या शतकापर्यंत विकृतावस्थेत गेलेल्या तांत्रिक वामाचारी उपासनेला पायबंद घातला आणि शुध्द योग मार्गाच्या पायावर एका नवीन परंपरेची प्रस्थापना केली. ''[६८] शुद्ध योगमार्गाच्या आचरणाला महत्व प्राप्त करून एक प्रकारे नवीन वळण दिले, म्हणूनच गोरक्षनाथांना नाथ संप्रदायाचे प्रवर्तक म्हणतात.

## नाथसंप्रदायाचा उदय

इ.स ९व्या व १०व्या शतकात हा पंथ उदयास आला. गोरक्षनाथांच्या जन्माची कथा अशी आहे की, गोदावरी नदीच्या काठी चंद्रगिरी येथे सुराज नावाच्या एका ब्राम्हणाची सरस्वती नावाची स्त्री होती. ती पुत्रलाभासाठी खूप आसुसलेली होती. तिची इच्छा पाहून मत्स्येंद्रनाथांनी तिला विभूती देऊन प्राशन करायला सांगितले पण त्याबद्दल विश्वास न वाटून तिने ती विभूती उकिरड्यावर फेकून दिली. बारा बर्षानंतर मत्स्येंद्रनाथ पुन्हा तिथे आल्यावर त्यांनी विचारणा केली. त्या स्त्रीने त्यांची क्षमा मागितली आणि खरी हकिकत सांगितली. त्याच उकिरड्यावर येऊन मत्स्येंद्रनाथांनी 'अल्लख' म्हणून हाक मारताच एक बालमूर्ती प्रकट झाली. तेच गोरक्षनाथ. बारा वर्षे राखेच्या ढिगाऱ्यात वाढल्याने त्यांनी त्या बालकाचे नाव गोरक्ष ठेवले. म्हणजेच गोरक्षनाथ.

गोरक्षनाथ हे तेजस्वी होते. त्यांची वाणीही अलौकिक होती. त्यामुळे त्यांच्या या प्रभावशाली व्यक्तीमत्त्वामुळे अनेक साधक या संप्रदायात समाविष्ट व्हायला लागले आणि या संप्रदायाचा विस्तार व्हायला लागून महत्त्व प्राप्त झाले. त्यांच्या थोड्याच आधीच्या काळात परमार्थाच्या नावाखाली खूप दूराचार, वाममार्ग, तंत्रसाधना बोकाळले होते. परंतु गोरक्षनाथांनी परमार्थसाधना चांगल्या उत्कृष्ट मार्गावर आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' जनसाधारणविषयीच्या आत्यंतिक तळमळीतून त्यानी तत्त्वनिरूपणासाठी लोकभाषांचा स्वीकार करून पुढीलांसाठी तोही एक आदर्श निर्माण केला. ''[६९] गोरक्षनाथांच्या या कार्यामुळे भक्तीसाधनेला एक नवीन वळण लागले, एक नवी दिशा मिळाली.

## नाथसंप्रदायाचे कार्य व तत्त्वज्ञान

नाथसंप्रदायाच्या उदयाचा आणि प्रसारच्या काळातही मुस्लीम सत्तांचे आक्रमण होतच होते. राजकीय, सामाजिक स्थिती जशी बिघडत चालली होती तसेच सांस्कृतिक जीवनही डळमळीत झाले होते. वर्णभेद, रुढी, परंपरा, कर्मठपणा, याला नाथसंप्रदायाने विरोध करून गुरूकृपेच्या बैठकीवर परमतत्व अनुभूती याची निर्मिती केली. गोरक्षनाथांची वाणी, भाषा अमृततुल्य व परिणामकारक होती, त्यामुळे लोकांच्या आचारातही सुधारणा होत होती. तसेच वर्णभेद तोडल्याने हिंदू-मुस्लिम असा भेद न होता सर्व लोक या संप्रदायात समाविष्ट होऊ लागले. समकालीन आणि उत्तरकालीन असणाऱ्या अनेक प्रकारच्या संप्रदायांवर नाथसंप्रदायाचा प्रभाव पडू लागला, गोरक्षनाथांनी इतर संप्रदायातील अनेक चांगल्या तत्वांना आपल्या संप्रदायात सामावून घेतले, अनेक विकृतींना त्यानी समूळ नष्ट केले आणि वामाचारी तांत्रिकांना नष्ट करून चित्तशुध्दी साधनेला महत्त्व दिले. त्यात लोकोध्दाराची तळमळ होती. यामुळे अनेक संतमहात्म्यांना यातून दिशा मिळाली आणि पुढील काळात ज्ञानेश्वरांमुळे नाथसंप्रदाय सर्वदूर पोहोचला.

संपूर्ण भारतात या संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अनेक प्रांतांच्या भाषांमधून वाङ्मय निर्मिती केली गेली. हिंदी, बंगाली, मराठी, संस्कृत अशा भाषांमधून ग्रंथाचे लेखन केले असल्याने संप्रदायाचा प्रसार सर्वदूर झाला. नाथ संप्रदायातील उच्च विचारांमुळे वर्णभेद नष्ट व्हायला सहाय्य झाले तसेच नैतिकताही वाढीस लागली. मुख्य म्हणजे स्त्रीशूद्रादी

भेदभाव दूर झाल्यामुळे स्त्रिया आणि शूद्र लोक सुद्धा संप्रदायात समाविष्ट होऊन परमार्थ मार्गाकडे आकर्षित झाले. द्वैत आणि अद्वैत यावरुन अनेक संप्रदायात किंवा भक्ती मार्गात संभ्रम निर्माण व्हायचे. शिवाय अनेक मते निर्माण होऊन त्यात तट पडत. मात्र नाथ संप्रदायाने ईश्वराद्वैती तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. यामुळे परमार्थ करण्यासाठी जो समाज संभ्रमित होता तो यातुन बाहेर पडला.

## नाथसंप्रदायाचे वाङ्मय

नाथसंप्रदायिकांचे वाङ्मय बहुतांशी तत्त्वज्ञान, योगमार्ग आणि आचार यांच्यावर आधारलेले आहे. अर्थातच गोरक्षनाथांकडून त्यांना प्रेरणा मिळाली. गोरक्षनाथांनी अमनस्क, अमरौघशासनम, अवधूत गीता, गोरक्षकौमुदी, गोरक्षगीता, गोरक्षशतक, गोरक्षपद्धती, महार्थमंजरी, सिद्धसिद्धांत पद्धती हे ग्रंथ लिहिले आहेत. तसेच 'सब्दी' आणि 'पद' हे त्यांचे काव्यग्रंथ आहेत. हिंदीतही अजयपाल, धूंधलामल, घोडाचूली, पृथ्वीनाथ, चर्पटनाथ, भृतहरी हे हिदी ग्रंथ आहेत. मत्सेंद्रनाथांचे कौलज्ञाननिर्णय अतुलवीरतंत्र, कुलानंद आणि ज्ञानकारिका हे चार संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

## नाथसंप्रदायाची अवनती

नाथसंप्रदायाचे कार्य थोर असले तरी आणि तत्त्वज्ञानही चांगले असूनसुध्दा संप्रदायाला काही मर्यादा पडल्या. त्यामागची कारणे म्हणजे सांप्रदायिकांना अतिशय कडक वैराग्य, नैष्ठिक धर्मचर्य व योगसाधना यांचे कठोर पालन करायला लागत असे. सर्वसामान्य माणसे काही या पालनाला सामोरी जाऊ शकत नव्हती तर संसारापासून दूर राहणारे किंवा ज्यांना सामाजिक बंधने झुगारायची होती ते शुद्ध आचरण टिकवू शकत नव्हती. तेव्हा हा अनुनायांचा वर्ग तांत्रिक साधना, शक्तीपूजा अशा गोष्टींकडे वळू लागला. त्यामुळे अनाचार माजला आणि एकूण संप्रदायच विकृतीकडे झुकू लागला. तसेच पुढे पुढे या संप्रदायाचा स्वतंत्रपणा कमी होऊन तो महाराष्ट्रातील इतर संप्रदायात म्हणजेच महानुभव, वारकरी, वीरशैव यांमधे विलिन होऊ लागला. र .रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' नाथसंप्रदायाचा प्रभाव कमी होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्याने योगमार्गावर दिलेला अवास्तव भर. ''[७०]

## ४.३.२ महानुभाव संप्रदाय

महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक 'चक्रधरस्वामी' होत. ह्या संप्रदायाची सुरुवात म्हणजे तेराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि त्यांचा काळ म्हणजे देवगिरीच्या यादवांच्या कारकीर्दीचा काळ. यादव राजांना वैदिक संस्कृती भावत होती. यादवराजांच्या या काळात अनेक विद्वान ज्योतिषी, महापंडित होऊन गेले. यांचे राजदरबारात वर्चस्व असले, त्यांना राजाश्रय असला तरी त्या सांस्कृतिक घडामोडी सर्वसाधारण लोकांच्या जीवनात काही परिणाम घडवू शकत नव्हत्या. त्यामुळे अनेक मतप्रवाह आपल्या मतांचा पुरस्कार करत होते. एकाच वेळी दोन भिन्न समाजात भिन्न प्रवृती होत्या. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' उच्च वर्गात देवाप्रीत्यर्थ केलेली हजारो व्रते, उपवास, तीर्थयात्रा या कर्मकांडातच गुरफटून जाण्याची प्रवृत्ती वाढत होती; तर सर्व सामान्य अज्ञ समाज हीन कोटीतील निरनिराळ्या देवतांच्या तामसी उपासनेतच परमार्थ मानीत होता. ''[७१] सर्वसाधारणपणे अनेक मतप्रवाह समाजात रुढ होऊ बघत असतात, अशक्य गोष्टींना शक्य करता येते असा समज समाजात बिंबविण्याचा प्रयत्न करत असतात. बरेच वेळा सर्वसामान्य जनतेचे यात नुकसानही होत असते. याच काळात मुस्लीम धर्म सुद्धा प्रभावी होऊ पहात होता. त्यामुळे अशा परिस्थितीचे अवलोकन चक्रधरस्वामींनी केले आणि महानुभाव संप्रदायाची स्थापना केली.

परमेश्वराचे पाच अवतार महानुभाव संप्रदाय मानतो. ते म्हणजे श्रीकृष्ण चक्रवर्ती, श्री दतात्रेयप्रभू, श्री चांगदेव राऊळ, श्री गुंडम राऊळ म्हणजेच गोविंदप्रभू व श्री चक्रधर आणि हे पाच म्हणजे 'पंचकृष्ण'. श्रीकृष्ण हे संप्रदायाचे आदिदैवत आहे. हा संप्रदाय जसा कृष्ण संप्रदायी आहे तसाच दत्तसंप्रदायी सुद्धा आहे. कारण चांगदेव राऊळ आणि गोविंदप्रभू हे दत्त परंपरेतील आहेत आणि गोविंदप्रभू हे चक्रधरांचे गुरु, त्यामुळे तेही दत्तपरंपरेतच येतात. हा संप्रदाय द्वैती आहे. जीव आणि ईश्वर हे वेगवेगळेच राहतात, एक बनू शकत नाही हे या संप्रदायाचे ठाम मत आहे.

### महानुभाव संप्रदायाचा उदय

श्रीचक्रधरांचे मूळ नाव हरपाळदेव. गुजरातमधील भडोच राज्याचा राजा मल्लदेव याचा प्रधान विशाळदेव आणि त्याचाच हा मुलगा हरपाळदेव. हरपाळदेवने वयाच्या बाविसाव्या वर्षी

युद्धात मोठा पराक्रम केला. वयाच्या अवघ्या सव्विसाव्या वर्षीच अल्पशा आजारात तो मरण पावला. तेव्हा फलटणच्या श्रीचांगदेव राऊळ यांनी त्याच्या देहात प्रवेश केला आणि हरपाळदेव पुन्हा जिवंत झाला. परंतु याला द्यूत खेळायचे व्यसन होते. एकदा द्यूतात सर्व धन गमावल्यावर आपली पत्नी कमळाइसा हिच्याकडे हरपाळदेवने दागिने मागितले. त्यावर कमळाइसाने असे काही उत्तर दिले की त्याला उपरती झाली आणि संसाराविषयी विरक्ती निर्माण होऊन हरपाळदेवने घरसंसाराचा त्याग करून पुढे ऋद्धीपूरचे गोविंदप्रभू यांचे शिष्यत्व पत्करले आणि बारा वर्षे तपश्चर्या केली. अशीच श्रीचक्रधरांच्या वैवाहिक आणि विरक्तीचे जीवन यात सारखी वेगवेगळी वळणे येत गेली. एका पत्नीचा त्याग केल्यावर त्यांनी घोड्यांच्या व्यापाऱ्याची कन्या हंसावा हिच्याशी विवाह केला. तिच्याशी संसार करताना एका अवधूताच्या दर्शनाने पुन्हा त्यांची विरक्ती जागृत झाली. परत संसारत्याग आणि पुन्हा एकदा एका संस्थानिकाच्या गौरी नावाच्या मुलीशी त्यांनी विवाह केला. एकदा चंद्रभागेत स्नान करीत असताना ते बुडाल्याची वार्ता कळताच त्या धक्क्याने 'गौरी' मरण पावली. पुन्हा ते दु:खी कष्टी होऊन विरक्त झाले. पुढच्या परिभ्रमणकाळात मात्र त्यांचे आयुष्य बदलले. सुहास आगरकर या संदर्भात म्हणतात, '' कोल्हापूरजवळ भोगवतीच्या तीरावर श्री दत्तात्रयांचे दर्शन झाले. तद्नंतर संन्यासदीक्षा धारण करुन धर्मप्रचारार्थ उर्वरित आयुष्य वेचले. पैठण हे कार्यक्षेत्राचे केन्द्र बनवले. ''[७२]

श्रीचक्रधरांचे रुप अलौकिक होते. अनेक स्त्रिया त्यांच्या रुपावर, व्यक्तिमत्त्वावर भाळत. इतर दैवतांची उपासना करणाऱ्या लोकांची कधी श्रीचक्रधरांनी हेटाळणी केली नाही किंवा आपले गुरुत्व शिष्यांवर लादले नाही तर समाजाचे दु:ख जाणून घेतले. त्यांच्या स्वभावातही मनमोकळेपणा होता. त्यामुळे श्रीचक्रधर हे उच्च चरित्राचे आणि कडकडित वैराग्य बाणलेले होते. त्यांच्या पांडित्याने आणि भाषाप्रभुत्वाने समाज आकृष्ट होत असे. मात्र श्रीचक्रधरांचा शेवट अतिशय वाईट झाला. त्यांच्या लोकप्रियतेमुळे त्यांच्या विरोधकांनी खूप कारवाया केल्या. हेमाडपंताच्या सांगण्यावरुन त्यांच्या सैनिकांनी त्यांना पकडले आणि स्त्रियांना नादी लावतो असा आरोप ठेवत एकेक अवयव विच्छेदनाची शिक्षा देत शेवटी शिरच्छेद केला.

श्रीचक्रधरस्वामींनी चांगल्या उद्देशाने या संप्रदायाची स्थापना करून त्याचा शेवट मात्र असा झाला.

## महानुभाव संप्रदायाचे कार्य आणि तत्त्वज्ञान

प्रत्येक संप्रदायाचे मुलभूत तत्त्व म्हणजे जीव आणि शिव. म्हणजेच एक तर द्वैत मानणारे अथवा अद्वैत. त्या त्या संप्रदायाचा वेगवेगळा दृष्टीकोन असतो. महानुभाव संप्रदाय हा द्वैती आहे. जीव आणि शिव हे वेगवेगळे आहेत, त्यांचे अस्तित्व स्वतंत्र आहे असे मानतो. जीव शिव याशिवाय प्रपंच आणि परमेश्वर या कल्पनांना सुद्धा संप्रदायाने महत्त्व दिले आहे. या चारही गोष्टी म्हणजे पूर्णपणे स्वतंत्र तत्त्वे आहेत. ही चारही तत्वे एकमेकांच्या सान्निध्यात येत नाहीत, एकत्र होत नाहीत.

श्री. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' सर्वसामान्य जनतेच्या विकासाचा मार्ग मोकळा करुन देणे, हे या संप्रदायाचे प्रमुख उद्दिष्ट होते. ''[७३] कोणत्याही संप्रदायाचे कार्य हे सर्व स्तरांवर हवे, म्हणजे सर्वसाधारण समाजसुद्धा यात समाविष्ट व्हायला हवा, संप्रदायाचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचायला हवे. त्यामुळे महानुभाव संप्रदायांनी सर्वसाधारण समाजसुद्धा विकसित व्हावा याकडे लक्ष दिले. त्या काळात पुन्हा कर्मकांड वाढायला लागले होते, बहुजन समाज तर परमार्थाकडे जाऊच शकत नव्हता तर तो हीन तामसी देवतांच्या उपासनेला बळी पडत होता. जेव्हा फक्त उच्चवर्णीय लोकांची मिरासदारी होती तेव्हा श्रीचक्रधरांनी ज्ञान आणि भक्ती या तत्त्वांना महत्त्व देऊन महानुभाव संप्रदायाची उभारणी केली. अशा रीतीने फक्त साधन मार्ग स्विकारलेले आणि कर्मठ कर्मकांडांना कंटाळलेले लोक म्हणजे अगदी उच्च विद्वान सुद्धा या संप्रदायाच्या तत्वांना अनुसरु लागले. अशा काळात प्रत्येकाचाच आत्मविकास कसा होईल याकडे संप्रदायाने लक्ष पुरविले, दिशाहीन समाजापुढे भक्तीभावना व परमेश्वर अवताराची कल्पना स्पष्ट केली. महानुभाव सांप्रदायिकांनी अनेक लोकभाषांचा वापर संप्रदायाच्या प्रचारासाठी आणि प्रसार करण्यासाठी केला.

## महानुभाव संप्रदायाचे वाङ्मय

महानुभाव संप्रदायाने मराठीतील पहिले गद्य चरित्र म्हणून 'लीळाचरित्र' ने मान मिळविला आहे. चक्रधरांनी शिष्यांना सांगितलेल्या जीवनातील आठवणी शिष्यांनी म्हाइंभटाला सांगितल्या आणि म्हाइंभटानी 'लीळाचरित्र' मधून ग्रंथित केल्या. म्हाइंभटाने कुशलतेने या ग्रंथाची मांडणी अतिशय प्रभावी, नीटनेटकी केली आहेच शिवाय ती प्रवाही असून श्रीचक्रधरांचे सर्वांगीण दर्शन

त्यांच्या एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध या तीनही भागातून बघायला मिळते. महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म सांगणारा हा ग्रंथ अनन्यसाधारण आहे.

याचप्रमाणे म्हाइंभट याने श्रीचक्रधर यांचे गुरु गोविंदप्रभू यांच्या लीळा वर्णन करणारा चरित्रग्रंथ लिहिला तो म्हणजे 'ऋद्धीपूरलीळा'. साती ग्रंथ श्रीकृष्णचरित्र, दत्तात्रेयप्रभू चरित्र, पूजाअवसर, मूर्तिप्रकाश, स्मृतीस्थळ. ऋद्धीपूर वर्णन असे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. रुक्मिणी स्वयंवरावर एकूण आठ काव्ये रचली गेली आहेत. तसेच नागदेवाचार्यांचा शिष्य केशीराजबास याने श्रीचक्रधरांनी स्वतः सांगितलेल्या सूत्रांवर आधारित 'सूत्रपाठ' ग्रंथ निर्मिला. याव्यतिरिक्त 'सातीग्रंथ' ही महत्वपूर्ण आहे. साती ग्रंथ म्हणजे रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वछाहरण, सह्याद्री वर्णन, ज्ञानप्रबोध आणि ऋद्धीपूरवर्णन हे होत. हे ग्रंथ महानुभाव संप्रदायात अतिशय पवित्र मानले गेले आहेत.

## संप्रदायाची अवनती

कर्मकाडांतून समाजाला मुक्त करावे आणि सर्व सामान्य जनतेचा विकासमार्ग खुला व्हावा यासाठी सज्ज झालेला महानुभाव संप्रदाय पुढे पुढे मात्र आचारधर्माच्या कर्मकांडात ओढला गेला. ह्याच सामान्य जनतेला खाणे–पिणे, भिक्षा मागणे, फिरणे, वेश, आचार या गोष्टींचे नियम पेलवेनासे झाले. एवढे कडक नियमन आणि आचरण त्या समाजाच्या चाकोरीबद्ध जीवनाला मानवले नाही. मग पुढे त्यात एक प्रकारचा निराशभाव निर्माण झाला. सर्वसाधारणपणे प्रत्येक मनुष्य मूर्तीपूजा मानतो. मूर्ती ही एक त्याचे श्रद्धास्थान असते. पण महानुभाव संप्रदाय मूर्तीपूजा मानत नव्हता. पण इतर वस्तूंची पूजा करणे ही एक प्रकारची विसंगतीच होती. याशिवाय महानुभाव संप्रदायानी स्त्रियांनाही संन्यास घेण्याची मुभा दिल्याने समाजात फारच नाराजी होती. परंपरेविरुद्ध जाऊन जातिव्यवस्था धुडकावून लावण्याची प्रवृत्ती, विटाळशी, शुचित्व–अशुचित्व याबद्दल त्यांच्या परस्परांविरुद्ध कल्पना इ. गोष्टी समाजास खटकत राहिल्या. अशा अनेक कारणामुळे समाज महानुभव संप्रदायाच्या तत्त्वांपासून दूर व्हायला लागला.

ज्या समाजासाठी या संप्रदायाची कार्याला सुरूवात केली, तोच समाज या संप्रदायात टिकू शकला नाही.

### ४.३.३ वारकरी संप्रदाय

संत बहेणाबाईंनी अवघ्या वारकरी संप्रदायाचे कार्य, अर्थ, आशय केवळ या ओळींमध्ये स्पष्ट केला आहे. '' संतकृपा झाली। इमारत फळा आली। ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।। नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार।। जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।। तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।। ''

संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी ह्या संप्रदायाला, धर्माला, आध्यात्माला केवढे मोठे स्थान प्राप्त करुन दिले. या महाराष्ट्रातील संतांचा जो भागवत धर्म आहे तोच वारकरी संप्रदाय. विष्णू भगवान यांच्या प्रेरणेतून हा वैष्णव धर्म निर्माण झाला. भगवान विष्णूंनीच श्रीकृष्णांच्या रुपाने अवतार घेतला. श्रीकृष्णांनी पुढे सांगितलेली गीता ही अजरामर झाली आणि भागवत धर्माचा आधार झाली. अशा या संतानी अवघ्या महाराष्ट्रात भागवत धर्माचे देवालय उभे केले. संत ज्ञानेश्वरांनी भागवतातील भक्तीचा मार्ग समाजाला निर्माण करुन आध्यात्माची वाट दाखवली म्हणजेच भागवत धर्माच्या देवालयाचा पाया रचला आणि संत नामदेव, एकनाथ यांनी त्याचा विस्तार केला, त्यांच्या कार्यात भर घातली आणि संत तुकाराम म्हणजे या देवालयाचा कळस.

वारकरी संप्रदायातील लोकांचे पंढरपूर म्हणजे परमस्थान. महाराष्ट्रातील सर्वात मोठा म्हणजे संख्येने, अगदी तळागाळातील समाजात रुजलेला सर्व जाती–जमातींना सामावून घेणारा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय. वारकरी म्हणजे पंढरीची वारी करणारा. हा अद्वैती संप्रदाय आहे. हा संप्रदाय भागवत धर्माचेच रुप असल्याने त्याला 'भागवत संप्रदाय' पण म्हणतात.

#### वारकरी संप्रदायाचा उदय

वारकरी संप्रदायाचा काळ ज्ञानदेवांच्या पूर्व काळाच्याही आधीचा आहे. भक्त पुंडलिकापासून या संप्रदायाच्या इतिहासाला सुरुवात होते, असे मानले जाते. श्री. र. रा. गोसावी बाबतीत लिहितात,'' ज्ञानपूर्व (भक्त पुंडलिकाचा ) काळ, ज्ञानदेव नामदेव काळ, भानुदास आणि एकनाथांचा काळ, तुकोबा आणि निळोबा यांचा काळ आणि तुकारामोत्तर तीनशे वर्षांचा काळ, असे या संप्रदायाचे पाच कालखंड स्थूलमानाने पडतात. ''[७४] या कालखंडातील संताच्या

कार्यानुसार वारकरी संप्रदायाचा उदय आणि विस्तार यांचा थोडक्यात परिचय करून घेता येईल.

पुंडलिक हा पंढरपूरचा रहिवासी. आपल्या मातापित्यांवर खूप प्रेम असूनही पत्नीच्या नादाने तो प्रत्यक्ष माता–पित्याचा अनादर करु लागतो. पुढे काही घडामोडींमुळे त्याची वृत्ती बदलते आणि आपल्या माता–पित्यांना परमेश्वर मानून त्यांची सेवा करु लागतो. एकदा प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण आणि रुक्मिणी विठ्ठल रखुमाईच्या रुपात पुंडलिकासमोर उभे ठाकतात. तरी माता–पित्यांच्या सेवेत असलेला पुंडलिक त्यांच्यासमोर वीट फेकून त्यांना थांबायला सांगतो. त्याची सेवा पूर्ण होईपर्यंत विठ्ठल–रखुमाई विटेवर उभे राहतात आणि त्याची माता–पित्यावरची भक्ती पाहून भगवान प्रसन्न होतात. जेव्हा ते वर मागायला सांगतात तेव्हा पुंडलिक भगवानांना सांगतो, '' तुम्ही येथेच असे राहावे आणि लोकांचा उद्धार करावा. '' अशा रीतीने पांडुरंगांनी कायमचे वीटेवर उभे राहून पंढरपूरात वास्तव्य केले. केवढा मोठा अधिकार या पुंडलिकाचा. वारकरी संप्रदायात प्रथम जयजयकार हा या भक्त पुंडलिकाचाच होतो '' पुंडलिक वरदा हरि विठ्ठल '' आणि मग '' श्री ज्ञानदेव तुकाराम '' म्हणजे पुंडलिक हे आद्य प्रवर्तक. पुढे ज्ञानदेवांच्या कर्तृत्वाने हा संप्रदाय महाराष्ट्रात पूर्णपणे रुजला. श्री. र. रा. गोसावी या बाबतीत म्हणतात,'' पुंडलिक आणि पांडुरंग यांचा अतूट संबंध निर्माण झाला. ''[७५]

भक्त पुंडलिकानंतर खऱ्या अर्थाने वारकरी संप्रदायाचा विस्तार करण्याचे श्रेय श्री ज्ञानेश्वरांना जाते. आपेगावच्या विठ्ठलपंत कुलकर्णी आणि रुक्मिणीबाईंच्या पोटी निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या अलौकिक कर्तृत्वाच्या मुलांनी जन्म घेतला. पुढे आळंदीस हे कुटुंब स्थायिक झाले. परंतु विठ्ठलपंतांनी एकदा संन्यास घेऊन परत गृहस्थाश्रम स्वीकारला आणि त्यानंतर त्यांना ही मुले झाल्याने समाजाने एका संन्यासाची मुले म्हणून या सर्वांना वाळीत टाकले त्यामुळे अतिशय खडतर आयुष्य या सर्व कुटुंबाच्या पदरी पडले. तेथील ब्रह्मवृदांच्या निर्णयानुसार विठ्ठलपंत आणि रूक्मिणीबाईंनी देहान्तप्रायश्चित्त घेतले आणि ही भावंडे खरोखरीच उघड्यावर पडली. केवळ संन्याशाची मुले म्हणून त्यांच्यावर उपनयन संस्कार होत नव्हते व त्यासाठी शुद्धीपत्र हवे म्हणून ही मुले पैठण येथील पंडितांकडे गेली. ज्ञानदेवांकडून त्यांच्या योगसामर्थ्याचा आविष्कार तेथील लोकांना बघायला मिळाला आणि मग समाजाने या भावंडांना

मानायला सुरूवात केली. नेवासे येथे मुक्कामी असताना निवृत्तींनी ज्ञानदेवांना त्यांना काय कार्य करायचे आहे याची जाणीव करून दिली आणि संस्कृतमधील गीता मराठीत ज्ञानेश्वरीच्या रूपाने अवतरली. मोठे बंधू निवृत्तीनाथ हेच ज्ञानदेवांचे गुरू होते. ज्ञानदेवांनी त्यांच्या वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी समाधी घेतली. निवृत्तीनाथांना आणि स्वतः ज्ञानदेवांना आपल्या जिवित कार्याची पूर्ण कल्पना होती. त्यामुळे ज्ञानेश्वरीसारखी अभिजात कलाकृतीची निर्मिती करून अवघ्या महाराष्ट्राला भक्तीमार्ग दाखवून, भागवतधर्माच्या मंदिराचा पाया रचून आळंदी येथे ते समाधीस्थ झाले. ही ज्ञानेश्वरी अजूनही आपले महत्त्व या वारकरी संप्रदायात ठेवून आहे. या ज्ञानेश्वरीच्या ज्ञानाने फक्त कर्मकाडांत बुडलेला, व्रत–वैकल्यात अडकलेला समाज त्यातून बाहेर पडू लागला आणि भक्तीमार्ग, अध्यात्ममार्गाच्या वाटेवर आला.

'संत नामदेव' हे शिंपी कुळात जन्मले. हे ज्ञानदेवांचे समकालीन संत. नामदेवांना खूप लहानपणापासूनच विठ्ठल भक्तीची खूप ओढ होती, संसारातही ते कधी रमले नाहीत. अगदी नामदेवांनाही अन्नान्न दशेतून जावे लागले. त्यांना पूर्णपणे विरक्ती आली. मात्र आपल्या भक्तीचा त्यांना फार गर्व झाला आणि तो अभिमान–अहंकार, ज्ञानदेवांची बहिण मुक्ताबाई, गोरोबाकाका यांनी संपुष्टात आणला. त्यानंतर नामदेव अहंकारातून बाहेर पडले आणि गुरूच्या शोधात निघाले. विसोबा खेचर यांची भेट झाल्यावर नामदेवांना परमात्म्याचे स्वरूप कळले आणि त्यांनी विसोबा खेचर यांना गुरूस्थान दिले. येथून तेव्हा नामदेवांचे आयुष्य अमूलाग्र बदलले. पुढे नामदेवांनी ज्ञानदेवांबरोबर तीर्थयात्रा केल्या. नामदेवांनी भागवत धर्माच्या मंदिराचा किंकर होऊन संप्रदायाच्या विस्तारात महत्वपूर्ण कार्य केले. पंढरपूरच्या मंदिराची पहिली पायरी ही 'नामदेव पायरी' म्हणून ओळखली जाते, यावरून नामदेवांचा अधिकार समजतो. नामदेवांनी स्वतः माउली ज्ञानदेवांचा समाधी सोहळा आळंदीत पाहिला होता. माऊलींच्या समाधी नंतर नामदेवांनी उत्तरेत फिरून भागवत धर्माचा प्रचार केला, पंजाबमध्ये अगदी वार्धक्यापर्यंत ते घुमान या गावी राहिले. आपला शेवट मात्र पंढरपुरी पांडुरंगाच्या पायाशीच झाला पाहिजे या जाणिवेने ते परत पंढरपुरात आले आणि मंदिराच्या शेवटच्या पायरीवर त्यांनी मस्तक ठेवले आणि ते कायमचे लीन झाले.

गोदावरी तीरी पैठण या गावात एका ब्राह्मण कुळात भानुदास महाराजांचा पणतू म्हणजे 'संत एकनाथ' जन्माला आले. त्यांचे नातू सूर्यनारायण यांच्या पोटी एकनाथांच्या जन्मानंतर

लगेच त्यांच्या माता–पित्यांना देवाज्ञा झाली आणि आजोबा चक्रपाणी यांनी त्यांना वाढविले. भानुदास म्हणजे, ज्यांनी विजयनगरच्या तत्कालीन राजाने पंढरपुरच्या विठ्ठलाची मूर्ती आपल्या राज्यात नेली आणि ती भानुदासांनी पंढरपुरात परत आणली. त्यावेळी नामसंकीर्तनाच्या जोरावर त्यांनी राजाला जिंकले होते. एकनाथांवर एक नाही तर दोन दोन संप्रदायाचा प्रभाव होता. कारण नाथांचे गुरू जनार्दनस्वामी हे दत्तसांप्रदायिक होते. नाथांच्या वेळचा काळ हा मुसलमानांच्या धार्मिक, सांस्कृतिक आक्रमणांचा होता, हिंदूंच्या धर्मभावनेला पुन्हा जागृती देण्याची गरज होती. जनार्दनस्वामींना जाणीव झाली की पुन्हा एकदा भक्तीमार्गच समाजाला बदलू शकेल आणि वारकरी संप्रदाय समाजाच्या सर्व स्तरांमध्ये रूजू शकतो म्हणून त्यांना नाथांना भागवतधर्माच्या कार्याची प्रेरणा दिली. नाथांचे केवळ त्या काळचे कार्य, कर्तृत्व खूपच सुंदर होते, त्यामुळे महाराष्ट्रात भागवतधर्माला ते पुनर्जीवन देऊ शकले. म्हणूनच बहिणाबाई म्हणतात, '' जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत. '' एकनाथांनी प्रपंचाकडे कधी पाठ न फिरवता प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड त्यांनी उत्तमरीतीने घातली. सुहास आगरकर या संदर्भात लिहितात, '' नाथांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे आक्रमणात तोवर विस्मृतीत गेलेली ज्ञानेश्वरांची समाधी शोधून काढली. तसेच ज्ञानेश्वरीची शुध्द प्रत तयार केली. म्हणून भागवत धर्माच्या मंदिराला खांब दिला असे म्हणले जाते. ''[७६] श्रीकृष्णाचा पराक्रम समाजाला सांगण्यासाठी नाथांनी रुक्मीणी स्वयंवर रचले, तर त्यांना रामायण लिहायची ओढ लागल्यामुळे त्यांनी 'भावार्थ रामायण' ही ग्रंथरचना केली आणि एकदा तीच कथा गाताना एकाक्षणी जाणीव झाली, आपले जिवित कार्य संपले, आता जायची वेळ आली आहे. आपल्या जाण्याचा दिवस माहित असल्यामुळे त्याच दिवशी ते गोदावरी नदीच्या काठी गेले, वाळवंटात त्यांनी शेवटचे निरूपण सांगितले आणि गोदावरीच्या पाण्याशी एकरूप झाले.

देहू येथे मोरे कुळात तुकोबांचा जन्म झाला. तुकोबा अत्यंत उत्तम सांपत्तीक स्थिती असलेल्या घरात जन्मले. घरी सावकारी व महाजनी असल्यामुळे आर्थिक सुबत्ता होती. पण या स्थितीस दुष्काळामुळे ग्रहण लागले, त्या दुर्दैवी तडाख्यात त्यांची पत्नी, पुत्र मृत्यू पावले. त्यामुळे तुकोबा इतके दुःखी कष्टी झाले की त्याची परिणती विरक्तीत झाली. नंतरची दुसरी पत्नी खूपच कजाग असल्याने प्रपंचाबद्दलची जी काही आसक्ती राहिली होती तीच पूर्णपणे नष्ट झाली. मग ते परमेश्वराच्या भक्तीकडे इतके ओढले गेले की ते संसाराकडे पाठ फिरवून अखंड नामस्मरण करू

लागले, एकांतवासात राहायला लागले, मग त्यांनी भागवत ग्रंथाचा अभ्यास केला. पुढचे आयुष्य त्यांनी केवळ परमार्थ साधनेत व्यतीत केले आणि आपल्या अभंगवाणीने, काव्याने महान तत्त्वज्ञान समाजापुढे मांडले. अर्थातच ज्ञानदेवांसारखीच तुकोबांच्या नशिबीही खडतर आयुष्य होते. समाजाकडून त्यांना खूप अवहेलना सहन करायला लागली. पण हे सर्व कष्टप्रद, अपमानास्पद जीवन जगून तुकोबा भागवतधर्माच्या मंदिराचे कळस झाले. यावरूनच त्यांची पारमार्थिक उंची कळते. तुकोबांना फार कमी आयुष्य लाभले. त्यांना वैकुंठाची आस लागली होती. आपल्या जाण्याचा दिवसही त्यांना माहित होता. त्या दिवशी त्यांनी सर्वांना भजनाला बोलावले, सर्वजण हरिरंगात अगदी रंगून गेले आणि अचानक त्यांनी सांगितले की माहेरी निघालो आहे. माझे आई–बाप स्वतः मला न्यायला येणार आहेत. त्यांना खरंच भगवंत दिसायला लागले. तुकोबा लोकांना सांगू लागले,'' मला उशीर होतोय, माझा भगवंत माझी वाट बघतोय. '' आणि बोलता बोलता ते दिसेनासे झाले. भगवंताबरोबर ते वैकुंठाला गेले सदेह.

### वारकरी संप्रदायाचे कार्य व तत्त्वज्ञान

वारकरी संप्रदाय, वारकरी संत तेव्हा सर्व समाजाशी एकरुप झाले होते. अद्वैत तंत्रज्ञानाला या संप्रदायानी अधिष्ठान दिले. याचबरोबर वारकरी संप्रदायाने सांगितलेला भक्तीमार्ग अतिशय सोपा, सहज सर्वसमान्यांना पचणारा, गोडी वाटणारा असाच होता. प्रापंचिक संकटाशी सामना करण्यासाठी अगदी गरिबीतसुद्धा या उपासना मार्गाने सुखसमाधान मिळेल अशी स्थिती असायची. वारकरी संप्रदायाच्या भक्तीने समाजाची मने सबल झाली, आत्मिक विकास कसा प्राप्त करुन घ्यायचा याचे आकलन झाले. लोकांच्या मनात एक प्रकारची आध्यात्मिक बैठक निर्माण झाल्यामुळे कर्म करताना भक्ती कशी सहजपणे करता येते याचे अनुभव यायला लागले. या संदर्भात श्री. र. रा. गोसावी लिहितात,'' विचलीत होणाऱ्या मानवी मनाला परिस्थितीनिरपेक्ष अशा पारलौकिक सुखाकडे नेऊन चित्तशांती प्राप्त करुन देणे, संसारात अडकून राहणाऱ्या दुबळ्या मनाला 'उन्मन' करणे हे वारकरी संतांचे प्रमुख कार्य होते आणि ते त्यांनी यशस्वी रीतीने केले. ''[७७] माणसाचे मन अनेक छोट्या–मोठ्या संकटांनी घेरले जाते, त्यात ते इतके अडकते की त्यातून बाहेर पडणे मुश्किल होऊन जाते, मग परमेश्वराची उपासना यातून मार्ग दाखवते. अशा या दु:खी कष्टी लोकांच्या मनावर हळुवार फुंकर घातली ती वारकरी संप्रदायाने.

तेही नामस्मरण, कीर्तन, भजन, वारी अशा अनेक रुपांनी. ज्ञानदेवाना, तुकोबांना एवढे यातनामय, दु:खी, कष्टी जीवन वाटेस आले तरी पण आध्यात्मिक मार्गावरील वाटचालीमुळे त्यांचे एका वेगळ्याच समाधानाने त्यांचे जीवन युक्त होते. त्यामुळे त्यांनी जे कार्य केले ते अशा लोकांना खूप उपयुक्त ठरले.

देवगिरीचे यादवराज्य संपुष्टात आल्यावर महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाला ग्रहणच लागले. पण अशा परिस्थितीत वारकरी संप्रदाय विलक्षण प्रभावी ठरला. सुहास आगरकर या बाबतीत लिहितात,'' मुसलमानी आक्रमणामुळे फारसीचे मराठीवर आक्रमण झाले. अशावेळी मराठी भाषा शुद्ध ठेवण्याचे व मराठीत काव्यरचना करुन मराठी भाषा समृद्ध ठेवण्याचे काम संप्रदायाने केले. ''[७८]

दया, क्षमा, शांती, समता, अहिंसा ही तत्त्वे मोठी आहेत. अशी तत्त्वे वारकरी संप्रदायाने समाजात रुजवली. याचबरोबर व्यसनमुक्त समाज करण्याचेही मोठे कार्य वारकरी संप्रदायाने केले आहे.

## वारकरी संपद्रायाचे वाङ्मय

वारकरी संप्रदायाचा परमकोटीचा ग्रंथ म्हणजे ज्ञानदेवांची 'ज्ञानेश्वरी'. संस्कृत मधील गीतेचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी मराठीत आणलेली गीता म्हणजेच 'ज्ञानेश्वरी'. 'ज्ञानेश्वरी' म्हणजे अथांग सागर आहे, तर मराठी वाङ्मयाचे कैलास लेणे आहे. ज्ञानेश्वरी निर्मितीचा हेतू ज्ञानदेव तेराव्या अध्यायात स्पष्ट करतात.

''जैसा वागविलास विस्तारूं। गीतार्थेसी विश्व भरूं। आनंदाचा आवरूं। मांडू जगा।। फिटो विवेकाची वाणी। ही कानामना जिणी। देखो आवडे ती खाणी। ब्रह्म विद्येची।। दिसो परतत्त्व डोळा। पाहो सुखाचा सोहळा। रिघो महाबोध सुकाळा। माजि विश्व।। (ज्ञा.१३वा अध्याये १९६१ ते १९६३) ही अभिजात कलाकृती आपला अनमोल वारसा आहे.

ज्ञानदेवांचे गुरू म्हणजे त्यांचे बंधू म्हणजे निवृत्तीनाथ त्यांच्या आदेशावरुन संस्कृतातील गीता मराठीत आणली. तसेच मुकुंदराजांप्रमाणे स्वतंत्र ग्रंथरचना करावी या आज्ञेला मान देण्यासाठी 'अमृतानुभव' ग्रंथ लिहिला. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' शिवशक्तीचे

ऐक्य, अज्ञानाचा आणि शेवटी ज्ञानाचाही निरास 'स्फुर्तीवाद' तथा 'चिद्विलासवाद' आणि 'ज्ञानाज्ञानातीतता' हा स्वानुभव, हे विषय यात प्रामुख्याने आले आहेत. ''[७९]

'चांगदेवपासष्टी' केवळ ६५ ओव्यांच्या ग्रंथात म्हणजे ज्ञानदेवांनी चांगदेवांनी पाठविलेल्या कोऱ्या पत्रास दिलेले उत्तर यात 'अमृतानुभव' या ग्रंथाचे सार आहे.

ज्ञानदेवांची अभंगवाणी तर अतिशय उच्च दर्जाची, मोहक शब्दाची आणि अत्यंत अर्थपूर्ण आहे. त्यांच्या प्रत्येक अभंगात शेवटी 'बापरखूमादेवीवरू विठ्ठल' ही ओळ आहे आणि त्यांच्या प्रत्येक अभंगात उत्कट भाव आहेत. ज्ञानदेवांच्या कृष्णभक्तीच्या विरहिण्या आणि गौळणी अप्रतिम आहेत. ज्ञानदेवांचा हरिपाठ म्हणजे वारकऱ्यांची दैनंदिन उपासना. नामसंकीर्तनाच्या साधनेचे महत्व म्हणजे २७ ओव्या त्याची फलश्रुती म्हणजे शेवटच्या २ ओव्या. अत्यंत सोप्या, रसाळ भाषेतील हरिपाठ सर्वांनाच भावतो.

संत नामदेवांच्या अभंग रचनाच त्यांच्या वाङ्मयात मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांच्या या अभंगगाथा खूप प्रसिध्द आहेत. त्यांच्या अभंगरचनेत शेवटच्या पदात 'नामा म्हणे' असा उल्लेख आहे. 'नामस्मरण' या भक्तीमार्गावर त्यांची नितांत श्रध्दा होती. वारकरी संप्रदायाचा नाममहिमा आपल्या अभंगातून उत्तरभारतापर्यंत पोहोचवला. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' कारूण्य, वात्सल्य, औदासीन्य, विरोध, माधुर्य इत्यादी भाव व्यक्त करणारे त्यांचे अभंग आत्मनिष्ठ भावकाव्याचे उत्तम उदाहरण ठरतील. ''[८०]

एकनाथांनी विपुल प्रमाणावर ग्रंथरचना केली आहे. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीला ३०० वर्षे उलटून गेल्यावर नाथांनी ज्ञानेश्वरीची शुध्द प्रत तयार केली. हे त्यांचे कार्य अनमोल आहे. भागवत पुराणाच्या एकादशस्कंधावर आधारीत टीका ही 'नाथभागवत' किंवा 'एकनाथी भागवत' म्हणून प्रसिध्द आहे. त्यातील संवादांवर जे भाष्य नाथांनी केले आहे त्यात त्यांनी भागवतधर्म आणि भक्तीमार्गाचे गमक मांडले आहे. भागवतधर्माचा अर्थ, परंपरा, ध्येय असा अनेक गोष्टींवर आपले विचार प्रकट केले आहेत. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' भावार्थ रामायण' ही खूप सुंदर रचना आहे. भावार्थ रामायण या नाथांच्या परिपक्व अशा अवस्थेत निर्माण झालेला ग्रंथ असून सप्तकांडात्मक रामायणाची पहिली पाच कांडे आणि सहाव्याचे ४४ अध्याय रचून नाथांनी आपली जीवनयात्रा संपविली. ''[८१] त्याचवेळी त्यांना आपला शेवट जवळ आल्याची जाणीव

झाली म्हणून उर्वरीत ग्रंथ नाथांचा शिष्य 'गावबा' याने पूर्ण केला. नाथांची अभंगवाणीही उदंड प्रमाणात आहे. त्यांच्याही अभंगात शेवटच्या चरणात 'जनार्दनी' हा उल्लेख केला आहे. त्यांच्या अभंगात गुरूभक्ती, पारमार्थिक सुखाचा अनुभव दिसतो.

याचबरोबर नाथांनी समाजाभिमुख करणाऱ्या अगदी बहुजनसमाजात जागृती होईल अशा रचना भारूड, गवळण अशा रूपाने केल्या आहेत. हे त्यांचे लोकसाहित्याची रचना खूप अर्थपूर्ण आणि मोठ्या प्रमाणावर आहे.

तुकोबांची अभंगरचना अगदी प्रचंड आहे. त्यांचे अभंग 'तुकारामाची गाथा' म्हणूनच प्रसिध्द आहेत. त्यांच्या विरोधकांनी गाथा इंद्रायणी नदीत बुडवुन टाकल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष भगवंतांनी प्रकट होऊन त्या गाथा नदीतून बाहेर काढल्या. तुकारामांचे अभंग अगदी सोपे असले तरी त्यातील तत्त्वज्ञान खूप मोठे आहे, त्यांच्या अभंगातून त्यांची अंतर्मुख करणारी वृत्ती दिसते.

वारकरी संप्रदायाच्या वाङ्मयीन कार्यात संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या संतांबरोबर इतरही संतांची वाङ्मयनिर्मिती भरपूर आहे. त्यात ज्ञानदेवांची भावंडे म्हणजे निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताबाई यांच्या सुंदर रचना आहेत. या वाङ्मयनिर्मितीत संत गोरा कुंभार, चोखामेळा, सावता माळी, तसेच नामदेवांच्या घरची दासी जनाबाई, वेश्याकुळात जन्मलेली कान्होपात्रा, बहिणाबाई, नरहरी सोनार, सेना नाव्ही अशा अनेक संतांनी मोलाची भर घातली आहे.

## वारकरी संप्रदायची आजची स्थिती

इतर संप्रदायांपेक्षाही वारकरी संप्रदायाचा एक विलक्षण पगडा अजूनही महाराष्ट्रातील लोकांवर आहे आणि आजचा तरूणवर्ग सुध्दा या संप्रदायात सामील होत आहे. फक्त त्या काळात आणि या काळात निश्चितच फरक पडला आहे. ज्ञानदेवांपासून निळोबांपर्यंतची वाङ्मय निर्मिती फार मोठी आहे. मात्र त्यांच्या नंतर यात काही विशेष भर पडलीच नाही. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' स्वाभाविकपणे आत्मचिंतनांचा, आंतरजीवनाच्या समृध्दीचा मार्ग मागे पडून भौतिक जीवनविकासाच्या वाटा मळल्या जाऊ लागल्या. ''[८२] तरीसुध्दा नंतरच्या काळात

सोनोपंत दांडेकर आणि धुंडामहाराज देगलूरकर अशा व्यक्तींनी सुशिक्षीत समाजालासुध्दा वारकरी संप्रदायाकडे प्रेरीत केले.

### ४.३.४ दत्त संप्रदाय

दत्तस्वरुप हे ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवतांचा समन्वय रूप आहे. अर्थात या सृष्टीची निर्मिती, स्थिती किंवा पालन आणि लय यासाठी असणारे अनुक्रमे ब्रह्मा, विष्णू आणि महेश ही देवते होत. या तिघांचे जे एकरूप ते दत्तात्रय म्हणजे दत्तप्रभू. दत्तसंप्रदायाच्या प्रवर्तनाचा काळ म्हणजे यवनी आक्रमणाचा होता. हिंदू–मुस्लिम धर्मात जे वैर होते ते या संप्रदायामुळे कमी होण्यास मदत मिळाली. निराकार, निर्गुण असे रूप दत्तात्रयांचे आहे.

### दत्तसंप्रदायाचा उदय

अतिप्राचीन काळापासूनच दत्तोपासना भारतातील अनेक प्रातांमध्ये होतीच. पण त्यावेळी दत्तोपासनेला सांप्रदायिक स्वरूप नव्हते. नृसिंहसरस्वतींचा अवतार म्हणजे प्रत्यक्ष दत्तात्रेयांचाच अवतार होता. नृसिंहसरस्वतींनी या दत्तोपासनेला सांप्रदायिक स्वरूप प्राप्त करून दिले. तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात आवेगाने वाहू लागलेल्या भक्तीसरितेला येऊन मिळालेला दत्तसंप्रदाय हा चौदाव्या शतकातला एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांत दत्तसंप्रदायाचा प्रसार सर्वात जास्त आहे. कारण दत्तांत्रयांचे मुख्य तीन अवतार श्रीपादवल्लभ, नृसिंहसरस्वती आणि स्वामी समर्थ यांची जन्मभूमी, कर्मभूमी आणि अवतार समाधी या तीन राज्यांतील आहे. या अवतारांमुळे त्यांनी जेथे जेथे वास्तव्य केले त्या त्या स्थळांना तीर्थक्षेत्राचे महत्व प्राप्त झाले आहे. असा हा दत्तसंप्रदाय दत्तात्रयाची उपासनेला महत्व देत चौदाव्या शतकात उदयास आला.

अत्री ऋषी आणि त्यांची पत्नी अनसूया. अनसूया पतिपरायण होती. ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे त्रिदेव अनसूयेचे सत्व पहायला अतिथीच्या रूपात तिच्या घरी गेले, तेव्हा अत्री ऋषी स्नानसंध्येसाठी बाहेर गेले होते. त्रिदेवांनी अनसूयेकडे इच्छाभोजन मागितले शिवाय नग्न होऊन वाढायची अट पण घातली. परंतु अनसूयेचे सामर्थ्यही इतके मोठे होते की तिने अतिथींवर तीर्थ

शिंपडले आणि त्यांची तीन बालके झाली. लगेच ब्रह्मा, विष्णू आणि महेश आपल्या मूळ रूपात प्रगट झाले हेच त्रिमूर्ती दत्त.

दत्तसंप्रदायकांनी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या एकत्रित रूपात म्हणजेच त्रिगुणात्मक त्रैमूर्ती (आपल्याकडे प्रचलित असलेल्या दत्ताच्या आरतीची सुरवातच 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा' अशीच आहे.) ची उपासनेची परंपरा रूढ केली. तरीही काही संप्रदायिक एक मुखी दत्त जो विष्णूचा अंश आहे त्यालाही मानतात.

दत्तसांप्रदायिंकांना दत्तात्रयांची त्रिमुखी, सहा हात असलेली मूर्ती अभिप्रेत आहे. दत्तात्रेयांचे प्रथम अवतार श्रीपादवल्लभ यांची जन्मभूमी आंध्रप्रदेश मधील 'पीठापूर.' पिता अपळराज आणि माता सुमती यांच्या पोटी त्यांनी जन्म घेतला. साधारणपणे त्यांचा इ.स.१३२० ते १३५० हा काळ मानला जातो. श्रीपाद जन्मापासूनच गुणसंपन्न आणि ज्ञानी होते. लहानपणापासूनच श्रीपादांनी आपल्या बुध्दीमत्तेची चुणूक दाखविली होती. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांच्या माता-पित्याने सूनमुख पाहण्याची इच्छा प्रकट केली. परंतु श्रीपादांना प्रपंच न करता ज्ञानानंदाची प्राप्ती करून घ्यायची होती. आपल्या अपंग भावंडांना कृपादृष्टीने रूप संपन्न करून, विद्वान करून आणि आपल्या मात्यापित्यांची समजूत घालून पीठापूर सोडले. काशीक्षेत्र बद्रिकेदार, जगन्नाथपुरी अशा तीर्थयात्रा करून गोकर्ण महाबळेश्वरला ते तीन वर्षे राहिले आणि मग श्रीशैल्य पर्वतावर गेले. नंतर कुरवपूर येथेच श्रीपादांनी कायमचे वास्तव्य केले. अशा रितीने कुरवपूरला तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले, ते अजूनही आहे. तिथे त्यांनी अनेक चमत्कार दाखविले आहेत आणि लोकांचे दैन्य दूर केले आहे. अंबिका नावाची स्त्री आपल्या गलीतगात्र मुलाला घेऊन नदीवर जीव द्यायला गेली असता श्रीपादांनी तिला बोधामृत पाजले. अंबिकेने पुढील जन्मात 'तुमच्या सारखा पुत्र व्हावा' अशी इच्छा प्रकट केली असता त्यांनी तिला तसा आशिर्वाद दिला. तिच्या गलितगात्र पुत्राला त्यांचे कृपेने चर्तुदश विद्या प्राप्त झाल्या. श्रीपादांचा गुरूमहिमा पुढे दिवसेंदिवस जसा वाढत गेला तसे त्यांनी आता प्रकट रहाणे योग्य नाही असे ठरवून गंगेत प्रवेश केला.

कुरवपुरला असताना श्रीपादवल्लभांनी ज्या अंबिकेला आशीर्वाद दिला होता ती अंबाभवानी म्हणून वाजपेयी शाखेत विप्र कुलात जन्मली. करंजनगरीतील माधव नावाच्या ब्राह्मणाशी तिचा

विवाह झाला. इ.स.१३७८ मध्ये नृसिंहसरस्वतींनी नरहरी नावाने माधव आणि अंबाभवानीच्या पोटी जन्म घेतला. नरहरीने जन्मल्याबरोबरच ओंकार शब्दाचा उच्चार केला. अत्यंत गुटगुटीत, तेजस्वी असे ते बालक होते. ज्योतिषींनी तेव्हाच 'हा कारणिक पुरूष होईल महान' असे वक्तव्य केले. मुंजीपर्यंत हा पुत्र मुका होता, तरी मौजीबंधनाच्या दिवशी त्याने चारही वेदांचे उच्चारण केले आणि सर्वांना चकित केले. तसेच श्रीपादवल्लभांसारखेच आपण ब्रह्मचारी असून वेदाभ्यास करायला निघण्याची इच्छा सांगितली. मात्र या धक्क्याने अंबाभवानी मूर्छित होऊन पडली. तिच्या मस्तकावर कृपाहस्त ठेवताच तिला गतजन्माची आठवण झाली, त्यानंतर नरहरी एक संवत्सर घरी राहिला आणि दोन बंधूंचा जन्म झाल्यावर मातेला तीस वर्षांनी पुन्हा भेटेन असे वचन दिले आणि काशीला आला. नरहरीने आपल्या बुध्दीच्या आणि ज्ञानाच्या जोरावर अनेकांना मार्गदर्शन केले. तर श्रृंगेरीच्या बुध्दीवंतांनी त्याला संन्यासाश्रम स्वीकारावा अशी विनंती करून नृसिंहसरस्वती नाव ठेवले. पुढे अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी देत ते ज्ञानदान करीत राहिले. अनेक चमत्कार दाखवत 'नृसिंहवाडी' येथे त्यांनी एक तप वास्तव्य केले आणि पुढे पूर्ण दोन तप ते कर्नाटकातील 'गाणगापूर' येथे राहिले. त्याकाळात यवनांची क्रूर राजवट होती. एका यवनी राजाला त्यांची कृपा लाभली होती, पुढे असेच होत राहील म्हणून गाणगापूर येथे निर्गुण पादुका ठेवून आपले अवतार कार्य संपविले आणि कर्दळीवनात गुप्त झाले. नृसिंहसरस्वतींचे दत्तसंप्रदायप्रती कार्य खूप महान आहे.

ज्या कर्दळीवनात नृसिंहसरस्वती गुप्त झाले तेथेच 'स्वामी समर्थ' प्रकट झाले. स्वामी समर्थ हे जन्मशून्य असून अत्यंत तेजस्वी, दैदिप्यमान, अजानुबाहू होते. स्वामींच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव खूप होता. वाईट कृत्य करणाऱ्या लोकांना त्यांनी योग्य शासन केले त्यामुळे त्यांच्याकडे पहाताक्षणीच कुमार्गी लोक गलितगात्र होत असत. त्यांचा अवधूतस्वरूप व्यक्तीत्वाचा प्रभाव चांगलाच होता. स्वामी समर्थांनी भारतभर भ्रमण करून आपल्या अगाध लीला दाखविल्या आणि महाराष्ट्रातील अक्कलकोट येथे इ.स. १८५८ पासून कायमचे वास्तव्य केले. अशा रीतीने लोकांना सन्मार्गी लावण्याचे, आध्यात्ममार्ग दाखविण्याचे मोठे कार्य स्वामी समर्थांनी केले आहे. अनेक शिष्यांना त्यांनी अनेक ठिकाणी वास्तव्यास पाठवून दत्तसंप्रदायाचा प्रसार केला. महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी स्वामी समर्थांचे मठ आहेत.

## दत्तसंप्रदायाचे कार्य आणि तत्त्वज्ञान

मुसलमानी सत्तेनी फक्त क्रौर्यच दाखविले. अगदी सर्वसामान्य जनता सुध्दा त्याची बळी पडत होती, जबरदस्तीने हिंदूना मुस्लीम धर्म स्विकारायला भाग पाडत होती. यामुळे ब्राह्मणवर्गाची स्थिती फारच गंभीर, बिकट होती, धर्मपरंपरा अगदी लयास चालल्या होत्या. अशा काळात दत्तसंप्रदायाचे प्रवर्तन नृसिंहसरस्वतींनी केले. दत्तात्रयाचे अवतार श्रीपाद वल्लभ, नृसिंहसरस्वती आणि अक्कलकोटचे स्वामी समर्थ या तिघांनीही यवनी आक्रमण आणि जुलमांना आळा घालायचे आटोकाट प्रयत्न केले आहेत. हिंदू–मुस्लिमांचे ऐक्य घडवून आणण्याचाही प्रयत्न केला आहे. एका धोब्याची श्रीपाद वल्लभांवर नितांत श्रध्दा होती. एका यवन राजाचे ऐश्वर्य पाहून तो धोबी खूप स्तंभित झाला आणि असेच ऐश्वर्य आपणास पण भोगायला मिळावे अशी इच्छा त्यांच्या मनात अभिलाषा निर्माण झाली हे पाहून श्रीपादांनी त्याला पुढच्या जन्मी राज्यपद मिळेल आणि ऐश्वर्यसंपदा उपभोगता येईल असा आशीर्वाद दिला, तसेच ह्या जन्मात नृसिंहसरस्वती या संन्याशीवेशात भेटेन असे वचनही दिले. त्याप्रमाणे तो धोबी पुढील जन्मी यवनी धर्मात, बेदरचा बादशहा म्हणून ऐश्वर्यसंपन्न होऊन राज्यपद भोगत होता. हा यवनी बादशहांमध्ये माणुसकीला धरून वागणारा एकमेव राजा होता. त्याच्यात सहिष्णूता आणि उदारता होती. असा हा बेदरचा बादशहा दत्तोपासक होता. दत्तोपासक जर्नादनस्वामी आणि माणिकप्रभू यांनीही हिंदू–मुस्लिमांचा समन्वय साधण्यासाठी कार्य केले आहे. जर्नादनस्वामी तर दत्तोपासक यवनांच्या नोकरीत होते.

दत्तसंप्रदंयाचे तत्वज्ञान अद्वैती अधिष्ठानालाच मानणारे आहे. जीव, जगत, परमेश्वर, परब्रह्म, ब्रह्मांड या विषयी दत्तसंप्रदयाने तत्त्वज्ञान सांगितले आहे. योगसाधनेसाठी दत्तसंप्रदायात महत्त्व दिले गेले आहे. सुहास आगरकर या संदर्भात लिहितात,'' दत्तसंप्रदायाची तत्वज्ञानाची बैठक विशाल, व्यापक व सर्वस्पर्शी आहे. ''[८३] ब्रह्मा, विष्णू, महेश हे एकच रूप आहे.

## दत्तसंप्रदायाचे वाङ्मय

'श्रीगुरूचरित्र' हा ग्रंथ दत्तोपासक सरस्वती गंगाधर यांनी लिहिला. दत्तसंप्रदायात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या या ग्रंथाची पारायणे महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश येथील उपासक नियमितपणे करतात. श्रीपाद वल्लभ आणि नृसिंहसरस्वती यांच्या चरित्राचा या ग्रंथात समावेश आहे. अनेक देवतांच्या कथा, अनेक स्तोत्रांचे महात्म्य, अनुष्ठाने, तपश्चर्या, उपासना,

आचार, अनेक चमत्कार, भक्तांचे शंकानिरसन, भक्तांची संकटातून मुक्तता, ज्ञानामृत देण्याच्या अनेक कथा गुरूचरित्रात समाविष्ट आहेत. अतिशय पराकोटीचे तत्त्वज्ञान या ग्रंथात ओतप्रोत भरले आहे.

अक्कलकोटच्या स्वामी समर्थांवर श्री गुरूलीलामृत हे दोन ग्रंथ, एक आनंदभारतींचा निवेदन असलेला आणि श्री. वामन वैद्य यांनी लिहिलेल्या असे आहेत. तसेच श्री. मधुकर देशपांडे यांचाही 'श्री स्वामी समर्थ भक्तीविजय' हा ग्रंथ प्रसिध्द आहे. यात प्रथम अवतार श्रीपादवल्लभ, द्वितीय अवतार नृसिंहसरस्वती यांचा संक्षिप्त चरित्रासह स्वामी समर्थांचे पूर्ण चरित्र लेखन झाले आहे.

दत्तसांप्रदायिक दासोपंत यांच्या दत्तभक्तीने प्रेरीत झालेल्या अनेक काव्यरचना आहेत. अत्री, अनसूया आणि नारद यांच्या कथांसह असलेला 'दत्तमहात्म्य' आणि 'दत्तपुराण' असलेला दत्तात्रेय महात्म्य हे मोठे ग्रंथ प्रसिध्द आहेत. श्री. वि. गो. नातू यांचा 'श्रीदत्तचरित्रसार' हा दत्तावतार आणि दत्तभक्तांच्या अनेक कथा समाविष्ट असलेला ग्रंथ आहे. कावडीबाबांचा 'श्रीदत्तप्रबोध' हा एक ६१ अध्यायांचा मोठा ग्रंथ आहे आणि ते दत्ताला आणि विठ्ठलाला एकच म्हणतात.

वासुदेवानंद सरस्वती म्हणजेच टेंबे महाराज यांनी 'श्री दत्तमहात्म्य' हा विस्तृत असा ग्रंथ लिहिला असून दत्तभक्तांची चरित्रे, नवविधाभक्ती, उपासना, योभमार्ग याबद्दल सांगितले आहे. तसेच 'गुरूसंहिता', 'शिक्षात्रय', 'सदाशक्ती गुरूचरित्र' हेही त्यांचे ग्रंथ संप्रदायाच्या परंपरा अनुसरणारे आहेत. तसेच पंत महाराज बाळेकुंद्री यांनी दत्तमक्ती सांगणाऱ्या अनेक काव्यरचना केल्या आहेत.

### दत्तसंप्रदायाची अवनती

हिंदू-मुसलमानांचे ऐक्य साधण्यासाठी दत्तसंप्रदायाने केलेले कार्य निश्चितच अनमोल आहे. त्या काळातील या संप्रदायाचे प्रवर्तन खूप महत्वाचे ठरले. समन्वय साधण्याचे कार्य करीत असताना सुध्दा त्यात एकीकडे कर्मठपणा खूप होता. सर्वसाधारण लोकांना हे कडक आचार-धर्माला पेलता आले नाही, त्यांना सोवळे-ओवळे पाळणे फारच कठीण जात असे. डॉ. पुरूषोत्तम

गणेश सहस्त्रबुध्दे या संदर्भात लिहितात,'' दत्तपंथ कडक आचारधर्म, कर्मकांड, अतिरेकी सोवळे–ओवळे यांवर भर देतो आणि ब्राह्मणवर्गाची उन्नती एवढेच त्याचे ध्येय आहे असे दिसते त्यामुळे त्याचाही बहुजनात प्रसार झाला नाही. ''[८४]

### ४.३.५ रामदासी संप्रदाय

संत बहेणाबाई म्हणतात,'भागवत धर्माच्या मंदिराचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचला, नामदेव त्या मंदिराचे किंकर झाले, एकनाथांनी या मंदिराला खांब दिले आणि तुकाराम त्या मंदिराचा कळस झाले. हे अगदी सत्य आहे. या चारही महान संतांचे कार्य महान होते. त्यानंतर महाराष्ट्रातील पाचवे संत, संत समर्थ रामदास यांनी त्यावर, कळसावर भगवा फडकवला. हेही सत्यच आहे. त्यांनी भागवत धर्माचे मंदिर ध्वजाच्या रूपाने पूर्ण केलेच, शिवाय त्याला महाराष्ट्र धर्माचीही जोड दिली आणि छत्रपती शिवरायांच्या ज्या स्वराज्याचा भगवा दिमाखाने फडकला त्या स्वराज्यनिर्मितीत समर्थांनी अनमोल योगदान दिले आहे.

समर्थांनी जो संप्रदाय निर्माण केला तो रामदासी संप्रदाय म्हणून सर्व जण संबोधत असले तरी समर्थ म्हणतात,' हा स्वरूप संप्रदाय आहे. या संप्रदायाचे अधिष्ठित स्थान अयोध्येचा मठ म्हणजे प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांचे स्थान, श्रीरामचंद्र आणि सीतामाई हेच त्यांचे दैवत आहे. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,

'' हनुमंत आमुची कुळवल्ली। राम मंडपा वेली गेली।

श्रीरामभक्तीने फळली। रामदास बोले या नावें।।१।। ''[८५]

समर्थ श्रीरामचंद्र आणि हनुमंताला संप्रदायाची प्रमुख उपास्य दैवते मानतात.

### रामदासी संप्रदाय उभारणीची गरज

समर्थांनी परमार्थ केला तरी त्याला प्रत्यक्ष प्रत्येक परिस्थितीच्या जाणीवेची जोड होती. मुख्यत्वेकरून त्यांना सामाजिक स्थितीचे भान कायमच असायचे. अतिशय डोळसपणे परिस्थितीचे आकलन करण्याचा त्यांचा गुण फार मोठा होता, बारकाईने सर्व गोष्टींचे, सर्व बाजूंचा विचार करणे यात त्यांचा हातखंडा होता. रामरायांनी समर्थांना कल्पना दिली होतीच की, 'तुमचे जीवन हे सर्वसाधारण नाही, खूप मोठे सामाजिक कार्य करायचे आहे.' याचे भान समर्थ कायम

ठेवून असायचे. ते लक्ष्य ठेवूनच त्यांनी स्वतःच्या लग्नाच्या बोहल्यावरून 'सावध पलायन' केले. अगदी लग्नमंडपापासून ते पंचवटी नाशिकच्या काळा राम मंदिरापर्यंतचा प्रवास त्यांनी पोहत आणि पायी केला, गोदावरी–नंदिनीच्या संगमस्थानी टाकळी येथे पुरःश्चरण केले संपूर्ण भारतभ्रमण केले. तेही सर्व अतिशय जागरूक राहून, परिस्थितीचे आकलन करीतच, अगदी डोळसपणे. जेव्हा पुरःश्चरण समयी टाकळी येथे जेव्हा शहाजीराजांची भेट झाली, तेव्हाच त्यांच्यात जी मसलत झाली त्यावरूनच त्यांनी आपल्या सामाजिक कार्याचा पाया रचायला सुरुवात केली आणि शहाजीराजांच्या दुसऱ्या भेटीत म्हणजे बंगलोर येथे त्या कार्याच्या स्वरुपावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले.

समर्थांनी अतिशय विचारपूर्वक ठरविले होते की, या समाजकार्यात संपूर्ण देशाची परिस्थिती समजावून घ्यावी लागेल, ठोस पावले उचलण्यासाठी परिस्थितीचा अभ्यास करायला लागेल. कारण फक्त माहिती असलेल्या परिस्थितीवर तसाच विश्वास ठेवून कार्य करायचे त्यांच्या तत्त्वात बसणारे नव्हते, त्यासाठी त्यांनी पुरःश्चरण संपल्यावर तीर्थाटनातच संपूर्ण भारत अभ्यासता येईल या दृष्टीकोनातूनच बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. एक नाही, दोन नाही तर तब्बल बारा वर्षात त्यांनी संपूर्ण देश पालथा घातला. डोळे आणि कान उघडे ठेवून त्या काळात किती गोष्टी निरखल्या हे त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यावरच समजेल. सौ. कुमुदिनी देशपांडे या संदर्भात लिहितात,'' समर्थांच्या कणखर पण संवेदनशील मनाने तीर्थाटनात काय काय टिपले हे पाहिल्याशिवाय त्यांच्या महान कार्याची कल्पना येणार नाही. ''[८६]

काळाची पार्श्वभूमी हीच समर्थांच्या संप्रदायाच्या उभारणीची गरज ठरली. तीर्थाटनाच्या काळात देशाचे जे विदारक चित्र त्यांनी अनुभवले तेव्हाच पुन्हा एकदा रामराज्य निर्माण व्हावे या ओढीने आणि हेतूने त्यानां संप्रदाय निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. त्यावेळची दयनीय अशी धार्मिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहूनच संप्रदायाकरवी ही परिस्थिती पालटविण्याचा आणि समाजाला त्या विळख्यातून सोडविण्यासाठी त्यांनी या संप्रदायाची स्थापना केली.

संप्रदायाच्या निर्मितीसाठी, गरजेसाठी, उभी ठाकलेली काळाची पार्श्वभूमी ही राजकीय, सामाजिक, धार्मिक, क्षत्रियवर्गाची स्थिती, ब्राह्मणवर्गाची स्थिती, सूफींचा आक्रमक पवित्रा यांवर आधारित होती.

## तत्कालीन राजकीय परिस्थिती

समर्थकाळाच्या अनेक शतकांपूर्वीच भारतावर परकीयांनी आक्रमण करायला सुरुवात केली होती. ह्या परकियांचे म्हणजे मुस्लिमांचे राज्य सुखावह नव्हतेच पण सर्वसाधारणही नव्हते. या परकियांच्या राज्यव्यवस्थेने सर्व देश ढवळून टाकला होता. सौ. कुमुदिनी देशपांडे म्हणतात,'' त्यामुळे शासनाचे दुष्परिणाम इतके दूरगामी होते की देशाची संस्कृतीच नष्ट होते की काय अशी परिस्थिती होती, ''[८७]

एकाच वेळी देशावर अनेक सत्ता आपले वर्चस्व स्थापन करू पहात होत्या, जास्तीत जास्त हिंदूना आपल्या धर्मात धर्मांतर करण्याचे, दहशतीने, सक्तीने, जुलूम जबरदस्तीने प्रयत्न करत होत्या. महाराष्ट्र तर पाच–पाच शाह्यांना सहन करत होता. त्यांच्या धर्माचा प्रसार म्हणजे केवळ शस्त्राच्या जोरावर होता. या सर्व शाह्यांसाठी आपापसात लढाया व्हायच्या आणि त्याचे दुष्परिणाम आपला देश भोगायचा. समर्थांचे अस्मानी–सुलतानी प्रकरण स्त्रियांची शोचनीय परिस्थितीचे वर्णन करते. ''किती गुजरणी ब्राह्मणी भ्रष्टविल्या । किती सुंदरा हाल करून मेल्या । किती शांमुखी जहाजी फाळविल्या। कितीएक देशांतरी त्या विकिल्या । किती सुंदरा हाल होऊनी मेल्या । लोक नीलंड नीलंड काढून नेती पोरी । '' स्त्रियांना भ्रष्ट करणे, त्यांना दुसऱ्या देशात विकणे, त्यांच्या देहाची दारूण विटंबना करणे याला तर काहीच सीमा नव्हती. म्हणजेच स्त्रियांची विटंबना हे त्यांचे प्रमुख कामच असायचे इतके पापी होते हे म्लेंछ. हे सर्व स्त्रियांवरचे अन्याय, जुलूम लोक उघड्या डोळ्यांनी बघत होते, पण सत्तेला विरोध करण्याचे धाडस एकातही नसायचे कारण त्यांच्यावरही जुलूम होतच होते. सतत लढाया, लूट, कत्तली, जाळपोळ ही तर दैनंदिनीच असल्यासारखे होते. क्रौर्य म्हणजे काय हे या यवनी सत्तांच्या जुलमातून कळते. अंतःकरण पिळवटून टाकणाऱ्या या घटना सर्रासच घडत होत्या, परकियांच्या जुलमातून अगदी अबालवृध्दही सुटले नाहीत. असे महाराष्ट्रातील आस्मानी सुलतानी संकट पाहून समर्थांचे मन पोळत होते.

## तत्कालीन सामाजिक स्थिती

या अशा राजकीय स्थितीमुळे सामाजिक व्यवस्था पुरती कोलमडून पडली होती आणि भयानक सामाजिक चित्र उभे राहिले होते. ह्या परचक्रामुळे आपला समाज इतका अगतिक,

हतबल झाला होता की आत्महत्या करणे सुध्दा अगदी सामान्य गोष्ट झाली होती. ह्या परचक्रातून सुटण्याचा हा एकमेव मार्ग असल्याचेच समाजाला वाटत होते. मनाला सहन होणार नाही असे हे विदारक चित्र समर्थांनी त्यांच्या 'परचक्रनिरूपणात' लिहिले आहे. ज्योर्तिभास्कर साळगांवकर या संदर्भात लिहितात,'' पदार्थमात्र तितुका गेला। नुस्ता देशचि उरला। येणेकरिता बहुताला। संकट झाले।।२८।। माणसा खावया अन्न नाही। अंथरूण पांघरूण ते ही नाही। घर करया सामग्री नाही। काय करिती।।३१।। ''[८८]

सर्व संपन्नता गेली, आणि देशच उरला. माणसांना खायला अन्न नाही, वस्त्र, अंथरूण–पांघरूण नाही अशी अवस्था झाली. एवढेच कमी काय होते तर अतिपर्जन्याने पीके वाहून जायची, नाही तर दुष्काळानेही अन्नान्न दशा व्हायची आणि शेवटी उपासमारीने मरायची वेळ यायची. यात मुलाबाळांचेही बळी पडत होते. कुणाचेच काही सुरळीत चालले नव्हते. सततच्या अशा चिंतांनी कुणाला काही सुचत नव्हते. काही मार्गच सापडत नव्हता. कुठे जावे, काय करावे, काही मार्ग नव्हता, भिक्षा सुध्दा मिळत नव्हती प्रत्येक जण भिकारी होत होता. सर्वच दुःखी, कोणीच सुखी नाही असे चित्र होते सगळीकडे. आपला देश कशातून जात होता, त्याची भयानकता यातून दिसते.

यवनांनी पापांची तर परिसीमा गाठली होती. धर्माची घडी पुरती विस्कटली होती. देव–देवालयांचा तर काही आदरच ठेवला नव्हता. मंदिरे पाडून मूर्तींची विटंबना अशा प्रकारे केली की आपण विचार केला तर किती यातना होतात. मंदिरांचा पूर्ण विध्वंस करायचा आणि मूर्ती फोडून मशिदींच्या पायऱ्यांखाली घालायच्या जेणे करुन त्या हिंदू देवतांच्या मूर्ती सारख्या पायांखाली तुडविल्या जातील. त्यात काशी–विश्वेश्वर, मथुरा अशी देवस्थानेही नष्ट करायला त्यांचे मन धजावले. केवढा घोर अपमान आपल्या देवतांचा होत होता.

जसे यवनी अनाचारी होते, धिंगाणा घालत होते तसेच पोर्तुगीजसुध्दा जुलूम करण्यात मागे नव्हते. त्यांनीही लूटालूट, जाळपोळ, मंदिरांचा विध्वंस, लोकांवर अत्याचार, स्त्रियांची विटंबना यात कुठे कमतरता ठेवली नव्हती. यात सगळ्या सत्तांना आपले वर्चस्व, आपला धर्म प्रस्थापित करायचा होता तो हिंदू धर्म कायमचा नष्ट करुनच.

त्यामुळे देवदेवता, धार्मिक परिस्थितीत निर्माण झालेले अराजक मनाला घरे पाडत होते. धार्मिक स्थितीला सांभाळण्यासाठी कोणीच पुढाकार घेत नव्हते. याचा परिणाम काय होत होता? तर लोक अंधश्रध्देला बळी पडत होते. पण समाजात या अघोरी विद्यांनाही याबरोबरच उधाण आले. या सगळ्या परिस्थितीत लोक आपल्या देवतांच्या पूजाअर्चेला, भक्ती, अध्यात्माला बाजूला सारू लागले मग परमार्थ तर दूरच राहिला. अशा रितीने यवनांच्या आक्रमणामुळे, धर्मांध सत्तेमुळे, पूर्ण देश ढवळून निघाला. सर्व बाजूंच्या शाही सत्तांमुळे महाराष्ट्र होरपळून निघत होता.

जसे परकीय सत्ता आपल्यावर वर्चस्व करू पहात होत्या. तसेच आपल्याच राज्यातील क्षत्रिय एकमेकांशी वैर करून लढाया करत होते. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात, '' आपापसांतील भांडणे हा क्षत्रिय वर्गाला मिळालेला नियतीचा शापच होता. ''[८९]

परकीय सत्ता जशा जुलमी, अत्याचारी होत्या तशाच राजकारणी, धोरणी विचार करण्यातही त्या तरबेज होत्या. महाराष्ट्रात अनेकांना ते जहागिरी देऊ करत, सरदार सेनापतींसारखे हुद्दे देत, त्यामुळे आपले लोक जहागिरी सांभाळण्यात आणि ती वाढविण्यात दंग असत. खरे तर आपले सरदार खूप पराक्रमी, शूर होते जर त्यांनी ठरविले असते तर अन्यायाविरूध्द बंड पुकारले असते. एक राजपूत अस्सल क्षत्रिय, वीरसिंग, त्याने पण एकदा सत्तेच्या हव्यासापाई थेट शहाजहानची मदत घेतली आणि लढाई जिंकल्यावर त्या मोंगलांनी फारच लाजीरवाणे कृत्य केले. परस्त्री आणि तिची विटंबना हे समीकरण झाले होते. वीरसिंगची पत्नी तर मृत्यू पावली, पण ज्या स्त्रिया जिवंत राहिल्या, त्यांचे हाल काय वर्णावे, त्या राजाच्या माता, मुली यांच्यावर नराधमांनी अत्याचार केले आणि त्यांना जनानखान्यात डांबले. स्त्री दाक्षिण्य हा शब्दच मुसलमानांच्या शब्दकोशात नव्हता.

त्यावेळी जो ब्राह्मणवर्ग होता, त्यांच्याकडून समाजाच्या काय अपेक्षा होत्या? ब्राह्मणवर्गाचे काय काम होते? काय जबाबदाऱ्या होत्या? तर ज्ञान मिळविणे आणि दुसऱ्याला ज्ञान देणे, सर्व वेदांचा-पुराणांचा अभ्यास आणि त्याचे सुध्दा दुसऱ्यांना ज्ञान देणे, उपासना, धार्मिक कर्मे, तसेच सत्वगुणांची लोकांना ओळख करून देणे, भक्तीचा मार्ग उपलब्ध करून देणे, विवेक आणि वैराग्य यांना अंगी बाणणे, म्हणजेच आपल्या धर्माचे रक्षण करण्याची जास्तीत जास्त जबाबदारी ब्राह्मणांचीच होती. पण हाच ब्राह्मणवर्ग स्वतःचे ब्राह्मण्य, सत्व हरवत चालला होता. स्वतःच्या

चारित्र्याकडे पूर्ण दुर्लक्ष करू लागला. समाजाचे, आपल्या धर्मासाठी नेतृत्व घेणारा ब्राह्मण पण लोभी होऊ लागला. ते एवढे निर्लज्ज झाले की पीराचे दर्शन घ्यायला दर्ग्यात जाण्याचीही त्यांनी शरम बाळगली नाही. मग हे ब्राह्मण काय धर्मरक्षण करणार?

सूफीसंप्रदायाचे लोक फार पूर्वीपासूनच आपल्याकडे येत होते. '' राजकीय दृष्ट्या आक्रमक विजेत्यांच्या, आधी आलेल्या सुसंघटित सूफी साधूंच्या धर्म प्रसाराच्या कार्याची मुळे दक्षिण भारतात रूजली होती. '' धर्म प्रसाराच्या कार्यात हे सुफी साधू आग्रेसर असत. पण सुफींचे हे कार्य मात्र जबरदस्तीचे आणि आक्रमक स्थिती निर्माण करू लागले. हे सूफी साधू सरदारांना मुसलमान धर्मात घेण्यासाठी खूप प्रयत्न करत. ह्या सूफी साधूंच्या मृत्यूनंतरही त्या साधूंचे महत्त्व कमी होत नसे. त्यांचे दरगे अक्षरशः आपली हिंदूची मंदिरे पाडून तेथेच बांधले जायचे आणि अशा सुफींना गुरू करण्यात आपला समाज स्वतःच्या धर्माचा अभिमान सोडून देऊन धजावू लागला.

**रामदासी संप्रदायाचे वेगळेपण**

समर्थ रामदास पाच प्रमुख संतांमधील पाचवे संत, अर्थात काळाप्रमाणे संत ज्ञानदेव तेराव्या शतकातले, संत नामदेव त्यांना समकालीन, संत एकनाथ पंधराव्या शतकातले, तर संत तुकाराम, आणि समर्थ रामदास १७ व्या शतकातले. अर्थात प्रत्येक संताचे कार्य हे त्या त्या काळाला अनुसरून होते. संत ज्ञानदेवांच्या काळात समाजाला भक्तीमार्गाची ओळख करून दिली, भागवत धर्माचा प्रसार करण्यासाठी समाजाला भक्ती-अध्यात्माच्या मार्गावरून परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी शिकवण दिली. संत नामदेवांनीही भक्तीमार्गाला अनुसरले आणि पंजाबपर्यंत भागवतधर्माचा प्रसार करायला गेले. एकनाथांनीही भक्तीमार्ग अवलंबिला होताच, त्यांचे सामाजिक भानही वेगळे होते. लोक साहित्यातून त्यांनी लोकांना चांगली शिकवण दिली. सांसारिक, पारमार्थिक, भौतिक अशी अनेक अंगे असलेले साहित्य त्यांनी रचले तेही सर्वसामान्य लोकांना समजेल भावेल अशा भाषेत. अशा रीतीने त्यांनी समाजप्रबोधन केले. तसेच ते उत्तम पंडित होते, राजकारण जाणून होते. एकदा ते युध्दालाही सामोरे गेले आहेत. त्यांचे महत्वपूर्ण कार्य म्हणजे महाराष्ट्रातील आक्रमणांमुळे ज्ञानेश्वरांची समाधी विस्मृतीत गेली होती. ती त्यांनी शोधून काढली आणि ज्ञानेश्वरीची शुध्द प्रत तयार केली.

संत तुकारामांची पारमार्थिक उंची सर्वात उच्च होती. त्यामुळे भागवत धर्माच्या मंदिराच्या कळसाची त्यांना उपमा दिली आहे. तुकारामांच्या अभंगगाथेनेही परमोच्च बिंदू गाठला होता. त्यांच्या अभंगातून गीता आणि भागवतातील ज्ञान अगदी खालच्या स्तराच्या समाजापर्यंत पोहोचायला मोठे सहाय्य झाले आहे. म्हणजेच भागवतधर्म दृढ करायला तुकारामांचे योगदान सर्वात मोठे आहे.

प्रत्येक संप्रदायाची वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत, त्यांचे तत्वज्ञान, कार्यही वेगवेगळे आहे. त्यांच्या अवनितीची कारणे पण पाहिली. मात्र वारकरी संप्रदायाच्या प्रभाव आणि प्रसारात काही अमूलाग्र फरक पडत गेला नाही. समर्थांवरही भागवत धर्माचा प्रभाव होता. त्यांना त्याचे तत्त्वज्ञानही भावत होते, त्यांच्या तत्वांशी मिळते जुळतेही होतेच.

९व्या, १०व्या शतकापूर्वी योगाला, योगमार्गाला फारच महत्व प्राप्त झाले होते. तरीपण त्याला विकृतरूप प्राप्त झाले होते. आणि अशा काळातच गोरक्षनाथांनी नाथसंप्रदायांचे प्रवर्तन केले. सर्व जातीजमातीच्या, वर्णाच्या, उच्च–शूद्र, स्त्री–पुरूष अशा सर्वांना आपल्या संप्रदायात सामावून घेतले आणि धार्मिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला. परंतु योगमार्गावर दिलेला अवास्तव भर आणि कडक नियमांचे पालन यामुळे या संप्रदायाचा प्रभाव कमी झाला आणि नाथ संप्रदाय इतर संप्रदायांमध्ये विलिन होऊ लागला.

१३ व्या शतकातील चक्रधरस्वामींचा महानुभव संप्रदायाने सोप्या, सुटसुटीत भाषेतील तत्वज्ञान सर्व प्रकारच्या लोकांपर्यंत पोहोचविले. त्यांनी स्पृश्य–अस्पृश्य, स्त्री–पुरूष हा भेदभाव मानला नाही. सर्वसामान्य जनतेचा विकास व्हावा हे प्रमुख उद्दिष्ट महानुभावांचे होते. कर्मकांड वाढून, परमार्थाची कास कमी होऊन समाज हीन देवतांची उपासना करायला लागला होता. अशावेळी श्रीचक्रधरांनी ज्ञान आणि भक्तीची तत्त्वे समाजासमोर मांडली. परंतु परंपरेविरूध्द जाऊन जातीव्यवस्था धुडकवण्याची प्रवृत्ती, विटाळ, शुचित्व, अशुचित यांच्याबद्दलची विचारधारणा या गोष्टी समाजास मानवल्या नाहीत. त्यामुळे या पंथाचे महत्व कमी होऊ लागले.

दत्तोपासना ही अतिप्राचीन काळापासून चालत होती. परंतु चौदाव्या शतकात नृसिंह–सरस्वतींनी अवतार घेतला आणि त्याच्या कार्यातून दत्त संप्रदायाचे प्रवर्तन झाले. म्लेच्छांच्या आक्रमणाने आपली धार्मिक संस्कृती, ब्राह्मण संस्कृती यावर फारच विपरीत परिणाम झाले होते.

अशा कठीण परिस्थितीत, यवनांच्या क्रूरपणाच्या काळात दत्तात्रयांचे प्रथम अवतार श्रीपाद वल्लभ आणि नृसिंह–सरस्वतींनी ब्राह्मणवर्गाची, हिंदू धर्माची चाललेली अवनती रोखण्याचे चांगले प्रयत्न केले, वैदिक परंपरेचे पण पुनरूज्जीवन केले आणि मुख्य म्हणजे हिंदू–मुसलमानांचे ऐक्य सुध्दा साधण्याचा प्रयत्न केला. या संप्रदायाचा आचारधर्म फारच कडक होता, त्यात कर्मठपणा खूप असल्याने, अतिरेकी सोवळे–ओवळे यांमुळे बहुजनात फारसा प्रसार झाला नाहीच शिवाय ब्राम्हणवर्गालाही आचारधर्म पेलवता न आल्यामुळे संप्रदायाच्या प्रसाराला आणि प्रभावाला सीमा पडत गेल्या.

वारकरी संप्रदाय सर्व समाजाशी म्हणजे सर्व जाती–जमातीच्या समाजाशी एकरूप झाला होता. अगदी तळागळातही रूजलेला होता, अद्वैत तत्त्वज्ञान असलेला ह्या संप्रदायचा भक्तीमार्ग सोपा, सुलभ आणि सर्वसामान्य लोकांना सहज पेलणारा होता. सहजरित्या त्या परंपरांची लोकांना गोडी वाटत होती, त्यामुळे लोकांची भक्ती–उपासना या संप्रदायाने वाढीस लागली. कथा–कीर्तन–प्रवचन यातून पौराणिक कथांचा आधार घेतला जात होता. त्यामुळे संगीत, लयबध्दता यांच्या जोडीने समाज प्रबोधनाचा मार्ग फारच सहज होता.

संत निळोबांपर्यंत हा संप्रदाय खूप वाङ्मय–निर्मिती करत होता. परंतु त्यांच्यानंतर त्यात फार भर पडली नाही. भौतिक सुखासाठी जीवनाची दिनचर्या बदलत चालली आणि संप्रदायातील आत्मचिंतन, समृध्दी थोडी कमी होत चालली.

समर्थ रामदास हे पाच प्रमुख संतांपैकी एक. इतर संप्रदाय जाणून घेतले तर रामदासी संप्रदायाच्या कार्याचा वेगळेपणा जाणवतो. स्वतः समर्थ भागवतधर्माच्या खूप जवळ होते. संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांचा भक्तीमार्ग, अध्यात्ममार्ग, प्रपंच, वैराग्य हा तर समर्थांनी चोखाळलाच; पण त्याच्या पुढे जाऊन त्यांनी स्वतःला सामाजिक कार्यात निष्ठेने, तळमळीने, विशिष्ट स्वप्न ठेवून झोकून दिले. ब्राह्मणधर्म, हिंदू धर्माचे रक्षण करणे हा तर हेतू होताच, शिवाय महाराष्ट्रातला त्यावेळचा समाज जो अधांतरी जीवन जगत होता, मुसलमानांच्या, अत्याचारांनी त्रस्त होता. त्यांना सोडविण्यासाठी केवळ स्वराज्य–निर्मिती आणि त्या स्वराज्याला एक जाणता राजा हवा या स्वप्नांनी ते कार्याला प्रवृत्त होत होते. तेही ' आधी केले मग सांगितले

आणि प्रपंचाकडे पाठ न फिरवता परमार्थ साधणे या गोष्टीची शिकवण समाजाला देऊन. ' समर्थांचे हे कार्य खरंच खूपच प्रशंसनीय होते.

समर्थांनी अवघ्या भारतभर तीर्थयात्रा केल्या. त्या तीर्थयात्रेचा भारतभ्रमणाचा हेतू इतरांहून खूपच वेगळा होता. भारतातील तीर्थस्थानांचे देव–देवतांचे दर्शन घेणे आणि त्याबरोबर पुण्य पण जोडणे हा हेतू कमीच होता. समर्थांचा खरा हेतू होता, भारताची झालेली दयनीय–शोचनीय अवस्था बघणे, सामाजिक भावना ठेवून त्या परिस्थितीचे आकलन करणे हे ठरवूनच त्यांनी तब्बल बारा बर्षे पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आणि उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत संपूर्ण भारत देश पालथा घातला. प्रयत्नांवर पूर्ण भर देणारे आणि राजकारण साधणारे समर्थ हे वेगळे होते. परकीय सत्तांना सहन करत असलेला देश त्यांना पाहवत नव्हता. धार्मिक अवनतीबरोबरच त्यांना आपली राजकीय अवनती जास्त भेडसावत होती. प्रजेला साधे दोन सुखाचे घास तरी मिळावेत, त्यांचे दैनंदिन जीवन साधेसरळ तरी जगता यावे असे समर्थांना तळमळीने वाटत होते. श्री. शंकर अभ्यंकर या संदर्भात म्हणतात,'' परकीय आक्रमणामुळे सोळाव्या शतकात झालेला धार्मिक व राजकीय गुंता सोडविण्याचा प्रचंड उद्योग समर्थ रामदासांनी केला. ''[१०] परकीय आक्रमणाने जसा आपल्या धार्मिकतेचा नाश करायला सुरवात केली तशीच देशाची राजकीय स्थितीसुध्दा पोखरून काढायला सुरूवात केली.

परकीय सत्तेची, त्यांच्या राजकारणाची पाळेमुळे जी खोलवर रूजत चालली होती, जखडली होती ती दूर करणे काही सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठी नितांत प्रयत्न करायला हवे होते. भयभीत झालेल्या लोकांना धीर देणारा, मार्ग दाखविणारा कुणीच नव्हता. सर्व समाजच भरकटलेला होता, अशावेळी समर्थ मोठ्या धैर्याने सामोरे जायला उभे राहिले ते या देशाला, समाजाला त्या रसातळातून सुखरूपपणे बाहेर काढायला. नुसत्याच पारमार्थिक सामर्थ्यापेक्षा मनगटातही जोर निर्माण करणारा, मोठ्या धैर्याने परकियांना तोंड देण्यासाठी एक खंबीर नेतृत्त्व हवे हे समर्थांनी ओळखले. त्या परकियांना जशास तसे वागवणारा, ठोशास ठोसा देणारा समाजच तयार करायला हवा असे समर्थांचे प्रयोजन होते. या संदर्भात श्री. शंकर अभ्यंकर म्हणतात,'' वारकरी संप्रदाय पारमार्थिक दृष्ट्या सशक्त नव्हता असे नाही. परंतु तो कालखंडच इतका भयावह होता की 'धटास धट' आणल्या शिवाय गत्यंतर नव्हते. ''[११] तो काळच एका धार्मिक,

राजकीय खंबीर नेतृत्त्वाची गरज निर्माण करणारा होता. पारमार्थिक आणि आध्यात्मिक घडी अगोदरच भागवत धर्माने चांगली बसवली होती. तिलाच पुढे अनुसरून समर्थांना जायचे होते ते त्यात बुध्दी, शक्ती आणि युक्तीला, जोडीला घेऊनच. ते कार्य समर्थांनी इतके प्रयत्नपूर्वक नेटाने, बुध्दी चातुर्याने पार पाडले की त्यांच्या प्रतिमेने एक वेगळीच उंची गाठली. भागवत संप्रदायाची जोपासना करत करत एका नवीन संप्रदायाची स्थापना करून अजून चांगल्या कार्याची जोड देणारा हा संत वेगळाच म्हणायला लागेल. समर्थांचे सर्वात मोठे स्वप्न स्वधर्म स्थापनेचेच होते. त्यांना धर्मकारण करायचे होते. पण पारतंत्र्याचा अंमल इतका होता की, माणसाचे स्वतःच्या श्वासावर सुद्धा नियंत्रण नव्हते. त्यांच्याच आश्रयाखाली राहयला लागला होता. असा हा देश पाहून त्यांचा जीव तळमळत होता. समर्थ मात्र एकमेव संत असे होते की, धर्मकारण आणि राजकारण यासाठी ते या लढ्यासाठी प्रत्यक्ष पुढे होऊन सज्ज झाले. त्यांना अन्याय सहन केलेला अजिबात आवडत नसे. अन्यायाच्या विरुद्ध उभे ठाकलेच पाहिजे या विचाराचे समर्थ होते. त्यामुळेच आपले आराध्य दैवतही तसेच पराक्रमी, सशस्त्र, प्रतिकाराची, लढ्याची विलक्षण ताकद असलेले असले पाहिजे असा विश्वास असल्याने त्यांनी श्रीरामचंद्र, हनुमान, तुळजाभवानी यांना स्वतःसमोर तर आदर्श म्हणून ठेवलेच, परंतु समाजासमोरही याच देवतांना समर्थांनी आदर्श म्हणून उपासनेसाठी समोर ठेवले. त्या काळात स्वधर्मस्थापनेसाठी लढणे, झुंजणे, युद्ध करणे केवळ एकच उपाय होता. मग त्यासाठी अंगात धाडसीपणा येण्यासाठी, अन्यायाविरुद्ध मन पेटून उठण्यासाठी आणि मनगटात बळ येण्यासाठी त्यांनी हनुमंताची बलोपासना करण्यासाठी त्याचा आदर्श समाजासमोर ठेवला.

पंढरपूरचा विठोबा समर्थांना आदर्श ठेवण्यासाठी म्हणून भावत नव्हता. कारण तो कटेवर हात ठेवून युगे-युगे उभा आहे. समर्थांनी पंढरपूरला गेल्यावर विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. सुहास आगरकर या संदर्भात म्हणतात, ''येथे उभा का श्रीरामा। मनमोहना मेघश्यामा। चापबाण काय केले। कर कटेवरी आले। काय केले वानरदळ। येथे जमविले गोपाळ। दिसे हनुमंत येकला। हा का सैन्यातून फुटला। ''[९२] त्या विठोबाला श्रीरामांच्या रुपात बघायला जातात आणि विचारतात सीतामाई कुठे, अयोध्यापुरीचे काय झाले, शरयू गंगा कुठे, तुझ्या हातात तुझी आयुधे नाहीत, धनुष्यबाण नाही तर ते हात कटेवर ठेवून उभा आहेस. गोपाळांचा मेळावा जमवलास, पण वानर सैन्य कुठे आहे?

समर्थांना हातात शस्त्रे घेतलेली, पराक्रमी, आवेशाने युक्त असणारी, शक्तीचा वापर करणारी देवता मनाला भावत होती. त्यामुळे हातात चाप–बाण घेतलेला श्रीराम, हातात गदा घेऊन आवेशात लढणारा हनुमान आणि हातात त्रिशूळ घेऊन राक्षस संहार करणारी तुळजाभवानी, अशा देवता मनावर ठसल्या होत्या आणि त्यांनाही वाटायचे की ही दैवते नजरेसमोर असली तर नक्कीच आवेश वाढेल. यामळे मनगट बळकट असावीत हा विचार लोकांच्या मनात यायला लागेल.

समर्थांच्या संप्रदायाला स्वतःची अशी दोन प्रमुख तत्त्वे आहेत आणि समर्थांनी या तत्वांना प्रमुख स्थान दिले होते. किंबहुना हा संप्रदाय, ही संघटना उभी करण्यामागे या दोन्हींना त्यांनी गरजेचेच मानले आहे. त्याशिवाय शिकवणूक आणि कार्य सार्थ होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते.

ही दोन्ही तत्त्वे समर्थांनी दासबोधात स्पष्ट केली आहेत. एक म्हणजे प्रबोधन शक्ती. समर्थांना संप्रदायाचे कार्य करायला ज्या शिष्यांना तयार करायचे होते त्यांच्यात तर ही प्रबोधन शक्ती असलीच पाहिजे. जे समाजकार्य करायला समर्थ प्रवृत्त झाले होते, त्यातले पहिले पाऊल हेच होते की, समाज ज्ञानी झाला पाहिजे, शिक्षित, सुसंस्कृत, विवेकी व्हायला हवा. मग त्यांनी तशी शिकवणूक द्यायला पाहिजे, प्रबुद्ध करायला हवे. श्री प्रभाकर पुजारी या बाबतीत म्हणतात,''समाजकार्याच्या यशस्वितेसाठी संघटकाची प्रबुद्धता आणि कार्यप्रेरकता कशी आवश्यक असते ते रामदासांनी स्पष्ट केले आहे''[९३] हा तर संप्रदायाच्या कार्याचा पाया आहे. आधी केले, मग सांगितले हे जसे त्यांचे तत्त्व होते त्याप्रमाणे दुसऱ्यांना शिकविण्याआधी, ज्ञान देण्यापूर्वी, स्वतः पूर्णपणे प्रबुद्ध पाहिजे, तो स्वतः ज्ञानी आणि जाणता पाहिजे. मगच तो दुसऱ्यांना अडचणीतून, गुंत्यातून मार्ग काढून देईल. तसेच सांप्रदायिकांनी, संघटनांनी सर्वगुणसंपन्न होणेही अतिशय आवश्यक आहे. कारण त्यामुळे संघटनेचे कायमस्वरुपी अस्तित्व राखणे महत्वाचे आहे असे समर्थांचे मत होते. समर्थांचे संप्रदायाचे दुसरे तत्व, प्रमुख तत्त्व म्हणजे 'जसा विचार तसे आचरण' आपण बोलतो ती कृती आधी स्वतः करुन दाखवावी, तो उपदेश

स्वतः आचरणात आणावा आणि मग ती दुसऱ्यांना सांगावी. म्हणजे तो उपदेश करण्याला तो अधिकार राहतो. त्याचा दुसऱ्यावर लवकर आणि चांगला प्रभाव पडू शकतो.

## रामदासी संप्रदायाची प्रमुख वैशिष्ट्ये

समर्थांनी आपल्या संप्रदायाची काही प्रमुख वैशिष्ट्ये ठरवली होती. त्याच वैशिष्ठ्यांपासून सांप्रदायकाची जडणघडण सुरु होते, त्यांच्या कार्याचा पाया त्यामुळे पक्का होतो. त्यासाठी समर्थांनी शुद्ध उपासना, विमलज्ञान, वैराग्य, ब्राह्मण्य आणि गुरु परंपरा ही संप्रदायाची पाच वैशिष्ट्ये अथवा अंगे स्पष्ट केली आहेत, की ज्यावर हा संप्रदाय उभा राहणार होता.

सर्वात पहिली पायरी शुद्ध उपासनेची. शुद्ध निर्मळ अंतःकरणाने केलेली उपासना ती शुद्ध उपासना. समर्थ म्हणतात उपासना करण्यापूर्वी आपली वाचा–तन–मन तर शुद्ध पाहिजे, विवेकानेच करायला पाहिजे. अलौकिक कार्य करण्याचे सामर्थ्य अंगी हवे असेल तर त्याच उच्च प्रतीची उपासना अंगी बाणवणे महत्त्वाचे होते. विवेकानेच उपासना करण्याचा नियम समर्थांनी शिष्यांना घालून दिला होता. संप्रदायच शुद्ध हवा यावर समर्थांचा पूर्ण भर होता. या संदर्भात श्री शंकर अभ्यंकर म्हणतात,''धाटी, मुद्रा, भाषा, वाचा, अर्थ, अन्वय, चित्त, भावार्थ, भक्ती, विश्वास, ज्ञान, वैराग्य हे सर्व शुद्धच पाहिजे याविषयी समर्थांनी फार आग्रहाने सांगितले आहे.''[९४] संप्रदायात सगुण उपासनेलाच महत्व होते. समर्थ सगुण उपासनेला स्वतःच मानत, यामुळे प्रत्येक मठात दैनंदिन उपासनेला पण महत्व दिले गेले पाहिजे, ती उपासना झालीच पाहिजे याकडे समर्थांचा कटाक्ष असे. श्रीरामचंद्र, मारुती अशा मूर्ती नजरेसमोर असल्या आणि शुद्ध मनाने, हेतूने उपासना केली की मग आपोआपच ती उपासना भावते.

विमल ज्ञान म्हणजे अतिशय शुद्ध, निर्मळ, नितळ अशा स्वरुपाचे ज्ञान. समर्थांनी दासबोधात 'शुद्धज्ञानाची' व्याख्याच सांगितली आहे. समर्थ म्हणतात,''ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. 'मी कोण' हे ओळखणे म्हणजे ज्ञान (आत्म) म्हणजे आपणास आपण पहावे.'' मुख्य देवाला ओळखावे, जाणावे. त्याचे सत्य स्वरूप काय आहे समजावून घ्यावे.

समर्थ म्हणतात शुद्ध विमल ज्ञानाची प्राप्ती अतिशय आवश्यक आहे. त्याच्या प्राप्तीसाठी अंगी 'वैराग्य' बाणलेले हवे. देहाची आसक्ती जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत कुणी वैराग्यापर्यंत पोहोचू शकत नाही. ही देहासक्ती एकदा सुटली की, परमेश्वर ओळखता येतो, परमेश्वराचे रुप बघून त्याची आवड निर्माण होते. एकदा परमेश्वर आवडू लागला की मग अंगी वैराग्य बाणायला विलंब होत नाही. वैराग्य हे विवेकयुक्त हवे, शुद्ध हवे. जो विवेकयुक्त वैरागी आहे तो महायोगीच

नाही तर ईश्वरस्वरुप आहे. वैराग्यावाचून काही परमेश्वर भेटत नाही. त्यामुळे परमार्थाला वैराग्याची नितांत आवश्यकता आहे. समर्थ म्हणतात मरणाचे ध्यान सतत असावे. आपल्याला एक दिवस मरण येणार आहे याची आठवण नेहमी ठेवली तर आपोआप वैराग्याकडे माणूस वळायला लागतो. एकदा का वैराग्य अंगी बाणले की टिकवतापण आले पाहिजे. मग ते टिकून राहण्याकरता निस्पृहता लागते.

यापुढे 'ब्राह्मण्य रक्षावे आदरे' असे समर्थ सांगतात. रामदासी संप्रदाय हा ब्राह्मणांचा संप्रदाय आहे असेही म्हणणारे होते. परंतु त्या काळची परिस्थितीच तशी होती, धर्माची अवनती चालू होती. श्री. सुहास आगरकर या बाबतीत म्हणतात,'' त्याकाळी ब्राह्मण हा पुढारलेला वर्ण असल्याने त्याला समर्थांनी हाताशी धरले होते. ''[९५] अर्थात समर्थांचे शिष्य काही फक्त ब्राह्मणच नव्हते तर इतरही जमातीतील लोक होते. सहिष्णु धर्म जपण्याकरिता समर्थांनी मठनिर्मिती, महंत यावर लक्ष केंद्रित केले. श्री. शंकर अभ्यंकर यासंदर्भात लिहितात,'' महंताचा आचार, मठाची शिस्त, सात्विक व्यवहार यासाठी समर्थांचा आग्रह 'ब्राह्मण्यावर' होता. ते योग्यच होते. ''[९६] तसेच समाजाचे सत्व राखायचे असेल तर ब्राह्मण्याला महत्त्व दिले गेले पाहिजे, ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्यात असे समर्थ म्हणत. समर्थ स्वत: ब्राम्हण होते. या ब्राम्हणाने जेव्हा महाराष्ट्र परकीय–यवनी अंमलाखाली होता, तेव्हा धर्मकारण, राजकारण आणि समाजकारण करून केवढा मोठा इतिहास घडविला. छत्रपतींच्या स्वराज्यनिर्मितीच्या, स्वधर्मसंस्थापनेच्या कार्यात समर्थांचा केवढा मोठा वाटा होता. हे जे अनमोल कार्य त्यांनी केले तो एक ब्राह्मणच होता हे विसरुन चालणार नाही. असा हा साक्षेपी महात्माच म्हणावे लागेल.

भारतीय संस्कृतीत गुरुमहात्म्य खूप मोठे आणि महत्त्वाचे मानले आहे. गुरुस्थान हे मोठे श्रद्धेचे स्थान आहे. समर्थ म्हणतात, परमार्थ करण्यासाठी गुरुची नितांत आवश्यकता आहे, गुरुला शरण जायलाच हवे. श्री. शंकर अभ्यंकर या संदर्भात म्हणतात,'' गुरुचरणावर शरण गेल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही. भवसिंधु पार करता येतो तो केवळ सद्गुरुंमुळेच. जन्ममृत्युचा फेरा चुकतो तो ही सद्गुरुंमुळेच! ''[९७] यावरुन सद्गुरुंची थोरवी कशी आहे ते समजते. गुरु असेल तर सर्वच प्रकारची कृपा तो आपल्यावर करतो. श्रीराम, श्रीकृष्ण हे भगवंताचे अवतारही गुरुसेवा करण्यासाठी तत्पर होते. सिद्ध, साधू, संत या सर्वांनी गुरुसेवा

केली. अवतारी पुरुष, संत गुरुला शरण गेले, मग सामान्य माणसांची काय अवस्था असेल. त्यामुळे समर्थांनी सद्गुरुकृपेवर भर दिला.

समर्थांनी कधीच फक्त परमार्थाचा परमार्थ करा असा उपदेश केला नाही. प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साध्य करावे ही त्यांची शिकवण होती. प्रपंचाकडे पाठ फिरवून परमार्थाच्या मागे धावणे त्यांच्या तत्वात बसत नव्हते. परमार्थासाठी प्रपंचच करु नये किंवा त्याचा विचारही करु नये असे समर्थ कधीच म्हणाले नाहीत, त्यासाठी संन्यास घ्यायला हवा असेसुद्धा नाही. प्रपंचाकडे लक्ष नाही दिले तर खायला अन्न कसे मिळेल? घरच्या लोकांची जबाबदारी ज्याच्यावर आहे त्याने असे करुन कसे चालेल? मग तो करंटाच म्हणावा लागेल आणि त्या परमार्थाला काहीही अर्थ नाही असे समर्थ म्हणतात. प्रपंच सुखासुखी करून, घरातील लोकांना आनंदी-समाधानी ठेवून एकीकडे परमार्थ केला. तर तो खरा परमार्थी. समर्थांनी स्वत: वैयक्तिक प्रपंच केला नाही हे खरे पण त्यांनी अवघ्या महाराष्ट्र देशाचा प्रपंच केला. आपले कार्य क्षेत्रच वेगळे आहे याची जाणीव त्यांना पहिल्यापासूनच झाली होती. त्यांचे किती शिष्य, मठाधिपती प्रापंचिक असूनही त्यांनी परमार्थ केला.

समर्थांच्या काळातही स्त्री पुरुष समानता होती असे नाही. कर्मठ कर्मकांडाचा तो काळ होता. इस्लामी राजवटीत तर स्त्रियांची काय स्थिती होती ह्याची कल्पना करवत नाही. तरी सुद्धा पुरुषांच्या परमार्थाच्या मक्तेदारीकडे लक्ष न देता स्त्रियांनाही तो अधिकार असावा असे समर्थांचे मत होते आणि त्याप्रमाणे त्यांनी ते करुनही दाखविले. स्त्रियांना त्यांनी परमार्थाचा मार्ग मोकळा करुन तर दिलाच शिवाय आपल्या संप्रदायात त्यांना समाविष्टही करुन घेतले. त्यावेळी बालविधवांचे जिणं तर फारच भयानक होते परंतु त्यांना सुद्धा आपल्या संप्रदायात स्थान दिले. स्त्रियांना मठाधिपतींचा सुद्धा अधिकार आणि स्थान दिले. वेण्णास्वामी या मूर्तिमंत उदाहरण आहेत.

## संप्रदायाची वीस लक्षणे

समर्थांनी स्वत:च संप्रदायाची लक्षणे सांगितली आहेत. ती लक्षणे अशी आखली आहेत की त्यावरुनच संप्रदायात प्रवेश करणे आणि त्यात टिकणे केवढे अवघड होते याची कल्पना येते. त्यामुळे कुणी ऐरा-गैरा या संप्रदायात प्रवेश करणारच नाही याची दक्षता आधीच घेतली जायची.

श्री. श. श्री. पुराणिक या संदर्भात म्हणतात,'' रामदासांचा संप्रदाय म्हणजे शिवकालातील दुर्गम अशा दुर्गासाखा होता. ''[९८] म्हणजे किल्ल्यात प्रवेश करणे किल्ल्यासारखेच दुर्गम. शिवाजी महाराजांच्या किल्ल्यातील प्रवेशद्वारावरचा पहारा पार करुन आत प्रवेश जरी झाला तरी आत पण अनेक चौक्या असत. त्यातून सुटले तर ठीक, नाहीतर कठीणच. अगदी तसेच या संप्रदायाचे, प्रवेश झाला तरी अनेक नियम, शिस्त, त्यात कुठेही तडजोड नसे. विशिष्ट नियमावलीतूनच कार्य करायला लागायचे. समर्थांनी सर्व बाजूंचा विचार करुन, सर्व आवश्यकता पडताळूनच ही लक्षणे ठरविली होती. समर्थांना काय नुसता संप्रदाय चालवायचा नव्हता तर त्या संप्रदायाचे कार्य त्यांनी विचारपूर्वक ठरवले होते. स्वधर्मसंस्थापनेचे एक व्रत घेतले होते आणि त्या व्रताची सांगता स्वधर्म आणि स्वराज्यनिर्मितीपाशीच होणार होती. मग एवढे महान कार्य करण्यासाठी संप्रदाय असा–तसाच असून थोडीच चालणार होता? समर्थ स्वत:च शिस्तीचे भोक्ते असल्या करणाने त्यांच्या संप्रदायात कडवी शिस्त असणे अगदी निर्विवाद होते.

संप्रदायाची ही लक्षणे अर्थातच सांप्रदायिकांना लावलेल्या कसोट्याच होत्या. त्या प्रत्येक कसोटीतून त्यांना उत्तीर्ण होऊनच संप्रदायात प्रवेश मिळत असे. अशा या कसोट्यांचा अभ्यास केला तर नक्कीच समर्थांची विचारसरणी, त्यांचे नियोजन, आडाखे, कृतीशीलता कशी परिपूर्ण होती याची जाणीव होते. ही समर्थांच्या संप्रदायाची वीस लक्षणे अशी होती. प्रा. श. श्री. पुराणिक या बाबत लिहितात,'' प्रथम लिहिणे। दुसरे वाचणे। तिसरे सांगणे। अर्थांतर।।१।। आशंका निवृत्ती। ऐसी चौथी स्थिती। पाचवी प्रचिती। अनुभवे।।२।। सहावे ते गाणे। सातवे नाचणे। टाळी वाजविणे। आठवे ते।।३।। नववा अर्थभेद। दहावा प्रबंध। अकरावा प्रबोध। प्रचितीसी।।४।। बारावे वैराग्य। तेरावा विवेक। चौदावा तो लोक। राजी राखे।।५।। पंधरावे लक्षण। ते राजकारण। सोळावे ते जाण। अव्यग्रता।।६।। प्रसंग जाणावा। हा गुण सतरावा। काळ समजावा। सर्वां ठायी।।७।। आठरावे लक्षण। कृती उदासीन। लोलंगता जाण। तेथे नाही।।८।। एकोणिसावे चिन्ह। सर्वांसी समान। राखे समाधान। ज्याचे त्याचे।।९।। विसावे लक्षण। राम उपासना। वेध लावी जन। भक्तीरंगे।।१०।। ''[९९]

नुसतेच लिहिता–वाचता येणे समर्थांना अभिप्रेत नव्हते तर त्याच्यात समज–उमज असणे आवश्यक होते. समर्थ म्हणतात, संपूर्ण दिवसात काहीतरी लिहावे आणि नित्यनियमित वाचत

जावे. अर्थातच त्या लेखन–वाचन क्रियेतून ज्ञानप्राप्ती होणे जरुरीचे आहे. लेखन आणि वाचन क्रियेला समर्थांनी खूप महत्व दिले आहे. लोकांना ग्रंथ समजावून सांगता आला पाहिजे तोही पूर्ण अर्थासहित, उदाहरणांच्या दाखल्यासह. लोकांनी कोणत्याही शंका विचारल्या तर त्यांचे निरसन उत्तमरित्या करता आले पाहिजे. नुसते वाचन समर्थांना अभिप्रेत नव्हते तर त्याचे आकलन होणे अभिप्रेत होते. समर्थ म्हणतात, आपण जे काही बोलतो ते कशाच्या तरी आधारावर हवे, त्याची प्रचिती, अनुभव प्रथम आपणास असावा. तरच दुसऱ्याला सांगण्यात अर्थ आहे. स्वतःला आलेली अनुभूती फार महत्त्वाची आहे.

समर्थांच्या शिष्याला समाज प्रबोधन करायचे होते. लोकांच्या सान्निध्यात राहून त्यांच्याशी जवळीक साधता आली पाहिजे, त्यांची मते ओळखता आली पाहिजेत, लोकसंग्रह हा सतत वाढविता आला यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे संप्रदायाचा होऊन समाजप्रबोधन होणार होते. समाजप्रबोधनाचे एक महत्वाचे साधन म्हणजे कीर्तन. समर्थांनी या साधनाला खूप महत्व दिले आहे. अर्थात समर्थांच्या विचाराप्रमाणे समाजप्रबोधनाच्या पटांगणात उतरणे म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती. जो दुसऱ्याला ज्ञान देणार तो स्वतः पूर्ण ज्ञानी हवा. लोकात राहून लोकांची मनं जिंकायची म्हणजे अंगी कला हवीच. कीर्तन हे साधन असे आहे की कीर्तनकाराला चांगले बोलता आले पाहिजे. तेही जे सांगायचे ते अर्थपूर्ण, त्यातून दुसऱ्याला ज्ञानप्राप्ती होईल अशा दृष्टीने. कीर्तन हे संगीताच्या संगतीतच होते. समर्थांच्या कीर्तनकाराला गाणे, नाचणे आणि टाळी वाजविणे ह्या कला अवगत असायलाच हव्या होत्या. संगीताद्वारे कीर्तन केले की ते अत्यंत प्रभावी होते. लोकांची मनं एकदा कीर्तनकाराकडे आकृष्ट झाली की कीर्तनकार जे सांगेल ते तेवढेच परिणामकारक ठरते. त्याचे बोलणे, सांगणे लोकांच्या मनावर लगेच ठसते आणि समर्थांना हेच तर करायचे होते.

असे हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे आणि या कला असलेला कीर्तनकार नक्कीच तेवढा प्रभावी ठरतो. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' त्यांचा हनुमंत जसा बुद्धीमंत, बलवंत आहे तसा तो 'संगीतज्ञानी महंत' ही आहे. संगीताचे महात्म्य ओळखूनच त्यांनी आपल्या महंतांना संगीताचे ज्ञान प्राप्त करुन घ्यावयास सांगितले. ''[१००]

अर्थभेद हे लक्षण ग्रंथवाचनाच्या संदर्भातीलच आहे. जेव्हा ग्रंथवाचन करायचे असेल तेव्हा त्या ग्रंथाचा पूर्ण अर्थ स्वत:स समजणे आवश्यक आहे. कारण शब्दांचे अर्थ वेगवेगळे असतात. समर्थांनी अर्थाचे चार प्रकार सांगितले आहेत, ते म्हणजे शब्दार्थ, वाच्यार्थ, लक्षार्थ व गूढार्थ. ग्रंथकाराने जे सांगायचे त्या अनुषंगाने अर्थाचा प्रकार वापरायला हवा. जर का अर्थभेदाचे ज्ञान असेल तर कीर्तनकारही त्याद्वारे लोकांचे मनोरंजन करु शकतो.

प्रबंध लिहिण्यासाठी नक्कीच तेवढी बौद्धिक क्षमता अंगी असावी लागते. समर्थ जसे ग्रंथकार होते तसेच उत्तम ग्रंथाचे संग्राहक देखील होते. आध्यात्म या विषयावरील सर्व ग्रंथ आपल्या संग्रही असावेत असे त्यांना वाटत असे. त्यामुळे आपल्या सांप्रदायिकांना तसा ते उपदेश करीत. शिष्यांनीही स्वत:च्या ग्रंथरचना कराव्यात असं समर्थांना नेहमीच वाटे. त्याकाळी छपाईची साधने उपलब्ध नसल्याने ग्रंथाची एकेक नक्कल तयार करावी लागत असे. समर्थांनी नियमच घालून दिला होता की ग्रंथाची प्रत सुंदर हस्ताक्षरात करुन उत्तम तऱ्हेने बांधावी. समर्थांच्या मठाचे सर्वात मोठे कार्य म्हणजे प्रबोधन. मग त्यासाठी हे ग्रंथ व्यवस्थित प्रकारे संग्रही ठेवणे आवश्यक होते. समर्थांच्या सांप्रदायिकांनी विपुल प्रमाणात ग्रंथनिर्मिती केल्या आहेत. हीच ग्रंथनिर्मिती हे 'प्रबंध' हे लक्षण सांगते.

सांप्रदायिक जेव्हा विषय समजावून सांगते तेव्हा त्यात त्याची हातोटी दिसली पाहिजे. मुख्य म्हणजे त्याच्या आत्मप्रचितीस जे आले आहे ते त्याच्या प्रबोधनातून लोकांच्या प्रचितीस आणता आले पाहिजे आणि यात तो निष्णातच हवा. प्रपंच, परमार्थ, समाजकारण, राजकारण, नीतीशास्त्र, व्यवहार, प्रयत्नवाद अशा अनेक गोष्टींचे निरुपण आहे ते म्हणजेच प्रबोध लक्षण. कारण समर्थांनी प्रबोधनाचा वसा कधीच सोडला नाही.

विवेक–वैराग्य किंवा वैराग्य–विवेक. या संदर्भात श्री. सुहास आगरकर म्हणतात,'' या जोडगोळीवर समर्थांचा विलक्षण भर आहे. ''[१०१] समर्थांना वैराग्य हे नुसते अभिप्रेत नाही तर ते विवेकयुक्तच हवे. नुसते वैराग्य हे अर्थहीन आहे. वैराग्याला विवेकाचे अधिष्ठान हवे. समर्थांच्या मते प्रपंच, परमार्थ या दोन्हीत विवेकाला मोठे स्थान आहे. दासबोधातील एकोणीसाव्या दशकात 'विवेकलक्षण–निरुपण' समर्थांनी अतिशय समर्पकरित्या सांगितले आहे. लोकशिक्षणाचा जो प्रभावी मार्ग आहे तो विवेकयुक्तच आहे. आपणास जे कळते, तितके हळूहळू दुसऱ्यांनर शिकवून

तो शहाणे करतो. समर्थांनी आपल्या सांप्रदायिकांना ही विवेक लक्षणे सांगितली ती शिकवण बहुमोल आहे आणि हीच लक्षणे त्यांनी समाजापर्यंत प्रबोधनाद्वारे पोहोचवावीत असे समर्थ म्हणत. विवेकाचा सर्वात जास्त प्रसार करणारे समर्थ हे एकमेव संत होते.

संप्रदायाचे लोकराजी राखण्याचे लक्षण संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. कारण समर्थांच्या संप्रदाय निर्मितीचा उद्देशच लोकसमुदाय प्रबोधन, सामजकारण हा होता. त्यामुळे सर्वप्रमथम लोकसंग्रह करणे हा प्रथम आणि त्या लोकांना प्रबोधन करणे हा दुसरा उद्देश होता. अर्थात लोकांचा समुदाय मिळवला की मुख्य कार्य म्हणजे त्यांचे मन राखणे. एकदा का लोकांना जवळ केली की झाले असे नाही. लोकांचे समाधान थोडक्यात बोलून करावे. अगदी राग जरी आला तरी आपले मन आवरावे पण त्यांचे मन राखलेच पाहिजे. कोणत्याही माणसाला आपला वेध लागेल असेच बोलावे.

आपल्या वागण्या–बोलण्याने कोण आनंदी झाले, कोण दुःखी झाले याचे परिक्षण क्षणोक्षणी करायला हवे. लोकसमुदाय मिळविला आणि त्यांच्या अंतःकरणावर पकड नाही मिळवली तर उपयोग काय?' शेती केली आणि मशागत केली नाही तर काय उपयोग? जवाहिऱ्याचा व्यापार केला आणि नुसतेच घरात बसून राहिले तर काय उपयोग? अगदी तसेच लोकसमुदाय मिळविला पण त्यांचे अंतःकरणच जिंकता नाही आले, राखता नाही आले तर काय उपयोग? अर्थात प्रत्येक माणसाची मानसिक स्थिती, बौध्दिक क्षमता, आकलन शक्ती वेगवेगळी असते. मग अशा वेळी सांप्रदायिकाने प्रत्येकाच्या कलाकलाने, त्यांचे मन राखतच त्याच्या ग्रहण–शक्तीनुसारच त्याचे प्रबोधन केले पाहिजे. म्हणजेच आपला संप्रदाय वाढविण्यासाठी लोकसंग्रह करता करता त्यातून समाजाला ज्ञानी करणे हा मोठा उद्देश समर्थांचा होता.

राजकारण म्हणजे राष्ट्रकारण असे समर्थ म्हणतात. राजकारण हा शब्द समर्थांनी वेगवेगळ्या अर्थाने वेगवेगळ्या ठिकाणी घेतला आहे. या संदर्भात सौ. कुमुदिनी देशपांडे म्हणतात,''एक आदर्श समाजरचना करून ती राबविण्यासाठी, तिच्याशी संबंधित प्रत्येक घटकाने आपली कर्तव्ये कशी पार पाडावी हे 'दुसरे ते राजकारण' मध्ये श्रीसमर्थ सांगतात. ''[१०२] समर्थांचे राजकारण त्या काळच्या गरजेनुसार आहे. परकीय सत्ता आपल्यावर राज्य करत होत्या. आपली सामाजिक, राजकीय स्थिती अत्यंत विदारक होती. त्यामुळे सुखी समाजासाठी स्वतंत्र

राज्य हवे आणि तशी आदर्श समाजरचना करून ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक गोष्टींची पूर्तता करायला लागणार होती. मग अनेक घटकांची अनेक कर्तव्य कशी पार पाडायची हे समर्थांनी 'राजकारण' समजावले. म्हणजेच एकदा का समाजसंघटन झाले की हे दुसऱ्या पायरीला राजकारण होते. म्हणून समर्थ राजकारणाचे सूत्र असे सांगतात की, हे संघटन आणण्यासाठी राज्यनिर्मितीसाठी कार्य केले पाहिजे, तसेच प्रयत्न केले पाहिजेत. शिवरायांच्या काळात त्यानी थेट राजकारण न करता त्यांच्या राजकीय नीतीला नक्कीच उपदेश करून एक अधिष्ठान प्राप्त करून दिले. श्री. सुहास आगरकर या बाबतीत म्हणतात,'' ऐसा पाहिजे की राजा कैपक्षी परमार्थी यासाठी समर्थांनी स्वराज्यप्राप्तीसाठी लोकांची मनोभावना तयार केली. ''[१०३]

अव्येग्रता म्हणजे सावधपणा. आपल्यात सावधपणा कधी असतो? तर आपले मन म्हणजे चित्त आणि बुध्दी एकाग्र करूनच काम करणे. चतुःसूत्रीतील समर्थांच्या दृष्टीने 'सावधपण' हे खूप महत्त्वाचे आहे. कामातील व्यग्रता अशी पण नसावी की ज्याने आजूबाजूला काय चालले आहे याची खबरही नसावी, ज्याने बेसावधपणा येतो. म्हणून समर्थांनी हरिकथा, राजकारण, सामजकारण करताना सगळ्या ठिकाणी सावधपणा म्हणजे अव्येग्रता असावी असा उपदेश केला आहे. दरवेळेस परिस्थिती समजून घ्यायला हवी.

विचार करण्याचाही आळस केला तर कदाचित असे संकट अचानक येऊ उभे ठाकते की त्यातून आवराआवर करायला अवधीच मिळणार नाही. नंतर पश्चाताप करून काय उपयोग? अकस्मात घाला पडला तर पळापळच होणार.

समर्थांनी सावधानतेच्या बाबतीत शिवरायांना आणि संभाजीराजांना सल्ला दिला होता. शिवरायांना त्यांनी सांगितले की,'' तुमच्यावर तुळजाभवानीची कृपादृष्टी आहेच, तरी पण अखंड सावध राहूनच कार्य करावे. '' आणि संभाजीराजांना ते सांगतात की,''अखंड सावध रहा, काळप्रसंग ओळखून निर्णय घ्यावा. '' अखंड सावधानतेमुळेच शिवराय आग्र्याहून सुखरूपपणे सुटले.

प्रसंग जाणावा, प्रसंग जाणूनच संकटातून पण मार्ग काढता येतो. समर्थ म्हणतात,'सावधानता असेल तर माणसाला आपोआप प्रसंगाची जाण येत. काळवेळ–प्रसंग न पाहताच विचार केला, निर्णय घेतला तर कार्य फसू शकते. समर्थ खूप दूरदर्शी, चाणाक्ष होते.

त्यामुळे हे साममजकार्याचे व्रत जे घेतले आहे, संप्रदायाचा प्रसार करायचा तर प्रत्येक परिस्थिती सर्व बाजूंनी जाणून घेतली पाहिजे, तिच्यावर विचार केला पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीत काम न करता, अनुकूल वेळ आली की काम करावे. अफझलखानाचा वध हे अत्यंत समर्पक उदाहरण आहे. शिवरायांनी घेतलेले निर्णय काळप्रसंग, अनुकुल वेळ आणि पूर्ण सावध राहून घेतले होते. त्यामुळे त्यांची सफलता ही विलक्षण प्रशंसनीय ठरली. समर्थांनी येथे उदासिनतेचा अर्थ म्हणजे,'अलिप्तता' सांगितला आहे. लालगंता नको म्हणजे आसक्ती नको. सांप्रदादिक जेव्हा लोकसमुदाय करतो आहे, एक समाजकार्य म्हणून आणि तो त्या समुदायातच सतत मिसळून राहिला तर तो त्यांच्यापैकीच एक होऊन जाईल. संप्रदायाच्या या कार्यात तर अशा मिसळण्याला थाराच नाही कारण लोकराजी राखता राखता तो आपला हेतूच विसरेल. म्हणून समर्थ म्हणतात, लोकसंग्रह करा, त्यांना शिकवण द्या पण अलिप्त राहून. जसे कमळाचे पान पाण्यातच असते पण ते थोडेही पाण्याने ओले होत नाही. अगदी तशीच अलिप्तता सांप्रदायिकाच्या अंगी असावी. तरच त्याच्या हातून लोकोध्दाराचे कार्य होईल. आसक्ती मुळे तो परमेश्वराच्या जवळच जाऊ शकणार नाही, त्याच्या कार्यात तन्मयताच येणार नाही, पूर्णपणे कार्यात झोकून पण देऊ शकणार नाही. मग तो काय समाजप्रबोधन करणार?

सर्वांसी समान रहाणे म्हणजे सर्वांशीच समान व्यवहार, वागणूक ठेवावी. त्यात कमी जास्त करू नये. समबुद्धी ठेवून सर्वांचे समाधान करावे. कुठेही भेदभाव न ठेवता वर्तणूक केली तर लोकांच्याही मनात आपल्याबद्दल आदर निर्माण होतो. समर्थांनी स्वतः पण सांप्रदायिकांमध्ये असा भेदभाव केला नाही. सर्वांशी समानतेनेच वागले. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात, '' नभामाजी तारांगणे, तैसे लोक मानावेत, जगनायक हा जगदांतरी असतो हे जाणून किंवा 'नारायण असे विश्वी' हे ओळखून परहितासाठी, परोपकारासाठी तत्पर असले पाहिजे यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. ''[१०४]

रामाची उपासना, समर्थांचे आराध्य दैवत की चे पराक्रमी, सर्वगुणसंपन्न होते, त्याची उपासना समर्थ म्हणतात,'आपल्या काही स्वार्थासाठी, सुखप्राप्तीसाठी रामाची उपासना करू नका, कारण स्वार्थासाठी केलेली प्रार्थना रामापर्यंत पोहोचणार नाही, निःस्वार्थीपणाने रामाच्या चरणी लीन व्हा, काहीच न मागताही तुमची निस्पृहता, श्रध्दा बघूनच तुमच्यावर कृपा करील.

त्यामुळे कोणत्याही मागणीसाठी केलेली उपासना समर्थांना अभिप्रेत नाही तर त्यांना अशी उपासना अभिप्रेत आहे की, त्या उपासनेद्वारे रामाचे आदर्श गुण आपल्यामध्ये येतील. या अशा उपासनेचा वेध घ्यायला हवा. अशा रीतीने भक्ती करावी. हे संप्रदायाचे प्रथम लक्षण आहे. कारण या उपासनेमुळेच रामरायाच्या जवळ जाता येते.

अशी ही संप्रदायाची वीस लक्षणे समर्थांनी ठरविली. ही वीस लक्षणे बघता त्यांची महानता दिसून येते. समाजाचे नेतृत्व करणे म्हणजे काही येऱ्या गबाळ्याचे काम नव्हते. तर या वीस कसोट्यांमधून पार होतानाच त्यांचा शिष्य तावून–सुलाखून निघत असे आणि मगच समर्थांच्या पसंतीस उतरत असे. कारण समर्थांना राष्ट्रकारण करायचे होते, एका उदात्त हेतूने संप्रदायाची स्थापना त्यांनी केली होती ती काही क्षणिकही नव्हती की कोणता मोठेपणा मिळविण्यासाठी केली नव्हती. अशा वीस परीक्षा पार करून आलेल्या सांप्रदायिकांनी अतिशय चांगल्या पध्दतीने संप्रदायाचे कार्य केले, संप्रदाय वाढविला आणि समर्थांच्या देशव्यापी चळवळीला हातभार लावला.

## संप्रदायाची दैवते

श्रीरामचंद्र म्हणजे समर्थांचे आराध्य दैवत. समर्थांच्या घराण्यातच सूर्यापासना आणि रामोपासना पूर्वीपासूनच चालत आली होती. समर्थांचे वडील सूर्याजीपंत आणि आई राणूबाई यांना अनेक वर्षे अपत्यप्राप्ती नव्हती. अनुष्ठादिकांचे उद्यापनादिवशी सूर्याजीपंतांना भगवान सूर्यनारायणांनी दर्शन दिले आणि दोन पुत्र होतील असा आशिर्वाद दिला की मोठा पुत्र मदंशेकडून आणि धाकटा पुत्र मारूतीअंशेकडून असेल. धाकटा पुत्र नारायण म्हणजेच समर्थ प्रत्यक्ष रामरायाचा आशिर्वाद आणि हनुमंतांचा अवतार होते. एका रामनवमीला सूर्याजीपंतांना स्वतः रामरायांनी दर्शन दिले आणि एका रामनवमीला रामजन्माच्या वेळेस समर्थांचा जन्म झाला होता. त्यामुळे रामोपासना त्यांच्याकडे रक्तातूनच आली होती.

श्रीराम अत्यंत पराक्रमी, एक आदर्श पुत्र, आदर्श पति होते. एकवचनी, एकपत्नीव्रत घेतलेले होते. सर्वगुणसंपन्न, चारित्रसंपन्न असलेले श्रीराम एक मर्यादाशील पुरूषोत्तम होते. अनेक संकटांना, अडचणींशी सामना देऊन त्यांनी रावणाचा वध केला आणि सीतामाईंना सोडवून आणले. असे अतुलनीय शूर, पराक्रमी श्रीरामचंद्र समर्थांना भावले कारण त्यावेळी जी धार्मिक,

राजकीय, सामाजिक परिस्थिती निर्माण झाली होती ती समर्थांना बदलायची होती. स्वधर्म आणि स्वराज्यस्थापना करून एक जाणताराजा निर्माण करायचा होता. समाजाची मानसिकता बदलण्यासाठी प्रबोधन करायचे होते, समाजाला निर्भय बनविण्यासाठी, अंगी शूरपणा बाणण्यासाठी तसेच परमेश्वराची उपासना करायला प्रवृत्त करण्यासाठी म्हणजेच आध्यात्म–भक्तीचा प्रसार करण्यासाठी समर्थांना समाजासमोर एक आदर्श दैवत ठेवायचे होते. त्यासाठी श्रीरामचंद्रांचा त्यांनी आदर्श ठेवून पुढचे कार्य केले. समर्थांना शस्त्रसज्ज दैवत समाजासमोर ठेवायचे होते. सर्व देवतांमध्ये रामकथाच समर्थांना प्रिय का होती? तर सर्व देवादिकांना ज्या श्रीरामांनी बंदिवासातून सोडविले, ज्या प्रयत्नांनी प्रारब्ध बदलता येते हे दाखविणारे दैवत समर्थांना प्रिय होते. समाजजागृतीसाठी श्रीरामांनी उपासना करायला सांगितली. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात म्हणतात,'' अशा परममंगला आणि करूणासागर रामचंद्राची कथा इह आणि पर या दोन्ही जीवननिष्ठांचा समन्वय करणारी आहे. म्हणूनच रामकथा त्यांना 'ब्रह्मांडाला भेदून पैलाड' न्यावयाची होती. ''[१०५] धर्म, न्याय, नीती, आणि उपासना पुन्हा एकदा नव्याने स्थापित व्हाव्या म्हणून श्रीरामांसारख्या धर्मसंस्थापक, कर्तव्यदक्ष राजा, देवदेवतांचा रक्षिता असलेल्या देवतेचीच समर्थांनी निवड केली. जेणेकरून लोक कर्तव्य बजावतील, स्वधर्मासाठी लढतील, त्याचप्रमाणे आत्मस्वरूपाचे ज्ञान ते मिळवतील आणि पराक्रम, पुरूषार्थ, परमार्थ आणि प्रयत्न यांसारखे गुण त्यांच्यात निर्माण होतील असा समर्थांचा हेतू होता. अशा रीतीने प्रभूरामचंद्रांचे दैवत निर्गुण आणि निराकार रामतत्व या उपासनेच्या स्वरूपाद्वारे समाजासमोर ठेवले.

जसे श्रीरामचंद्र शस्त्रसज्ज, पराक्रमी होते. तसाच हनुमंतही तेवढाच पराक्रमी, शक्तीशाली, युक्तीशाली होता. मारूतीस्तोत्रांत समर्थांनी त्याला महाबळी, प्राणदाता, सौख्यकारी, दुःखहर्ता, दीनानाथ, लोकनाथ, पुण्यवंत, चपळांगाचा म्हणले आहे आणि खरंच तो तसाच आहे. हनुमंत बलदंड, शक्तीशाली सर्वगुणसंपन्न म्हणून समर्थांनी श्रीरामांएवढीच त्याची उपासना केली. हनुमंत जसा शक्तीशाली होता तेवढाच तो बुध्दीमान होता. त्यामुळे समर्थांनी हनुमंतही आदर्श दैवत म्हणून समाजासमोर ठेवला. तरूणांना आदर्श म्हणून ही निवड अगदी योग्यच होती. मारूती म्हणजे कोण? तर श्री. सुहास आगरकर या संदर्भात म्हणतात, '' शक्ती, युक्ती, भक्ती, नीती, गती, साहस, धैर्य, उपासना, नम्रता, निष्ठा यांचा आदर्श! ''[१०६] हनुमंतांची श्रीरामांप्रती असलेली भक्ती केवळ अनन्य साधारण आहे. तो कायम श्रीरामांसमोर हात जोडून उभा असतो.

अशा या हनुमंताचा आदर्श ठेवून समर्थांना स्वराज्यस्थापनेच्या कार्यासाठी तरूणपिढी सशक्त, बलवंत बनवायची होती. त्याचा आदर्श ठेवून तरुणांकडून व्यायाम, बलोपासना करुन घ्यायची होती. तन–मन दोन्ही मारुतीरायांसारखे तयार करायचे होते, त्यांचे थंडावलेले रक्त सळसळायला हवे होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यासारखे साहसी आणि निर्भय होणे नितांत गरजेचे होते. त्यांच्यात आक्रमकता, आवेश, प्रतिकार करणाऱ्या रुपाची मूर्ती म्हणजे 'वीर' स्थितितील मूर्तीच त्यांना भावत असल्यामुळे त्यांनी जेवढी मारुतीमंदिरे स्थापन केली ती बहुतेक सर्व वीरमारुतीच्या प्रतिमेचीच आहेत. देशस्थिती समजावून घेत घेतच समर्थ तीर्थाटन करत होते. त्यांना बहुतेक करुन दुबळी, भ्यायलेली, धैर्य गमावून बसलेलीच प्रजा पहायला मिळाली, म्हणूनच त्यांनी ठिकठिकाणी हनुमंताच्या मंदिराची स्थापना केली. श्रीरामचंद्रांनी हनुमंताला चिरंजीवपदाचा वर दिला आहे आणि भक्तांची काळजी वाहयची अशी आज्ञा केली आहे आणि म्हणूनच समर्थांना हनुमंत भावला आणि त्यांनी लोकांसमोर हनुमंताचा आदर्श ठेवला.

आदिशक्ती तुळजाभवानी ही समर्थांची म्हणजे ठोसर घराण्याची कुलस्वामिनी, त्यामुळे तिची भक्ती त्यांच्या घराण्यातच होती. शिवाय छत्रपती शिवरायांची, भोसले घराण्याची पण कुलस्वामिनी तुळजाभवानीच. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' तुळजावरापेनि गुणे। रामे रावण मारीला। ऐसी ही तुळजाभवानी प्रसिध्द रामवरदायिनी।। ''[१०७] तिच्याकृपेने रामाने रावणाचा वध केला म्हणून तिला श्रीरामवरदायिनी म्हणतात. तीर्थाटनाच्या काळात भयंकर देशस्थिती बघताना समर्थांनी तुळजाभवानीला विनविले, काही रोकडे मूळ सामर्थ्य दाखव. छत्रपतींचीही तीच कुलस्वामीनी वरदायिनी जिने त्यांना भवानी तलवार दिली होती, ती धर्मसंस्थापनेसाठी, एका स्वतंत्र राज्याच्या निर्मितीसाठी. तुळजाभवानी सुद्धा अन्यायाविरुद्ध लढणारी, राक्षसांचा संहार करणारी अशीच होती. म्हणूनच हातात आयुधे घेतलेली तुळजाभवानी पण समर्थांनी आदर्श देवता म्हणून समाजासमोर ठेवली.

अशी समर्थांनी समाजासमोर आदर्श म्हणून ठेवलेली तीन साहसी, पराक्रमी आणि शस्त्रसज्ञ दैवते, अर्थातच समर्थांनी लोकांकडून करुन घेतलेली या तीनही दैवतांची उपासना फळाला आली. स्वधर्माची संस्थापना झाली, स्वराज्याची निर्मिती होऊन राज्याला एक जाणता राजा मिळाला.

## संप्रदायाचे तत्त्वज्ञान

संप्रदायाचे जे प्रमाण ग्रंथ असतात त्यातूनच संपूर्ण संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगितलले असते. समर्थांचा 'दासबोध' हा ग्रंथ म्हणजे संप्रदायाचा प्रमाण ग्रंथ आहे की ज्यात समर्थांनी अतिशय सुंदर प्रकारचे तत्त्वज्ञान अगदी समर्पकपणे सांगितले आहे. आध्यात्मच त्यांनी नाविन्यपूर्ण आणि अधिक सखोल केले आहे. दासबोध या ग्रंथाचे लेखन गुरू–शिष्य संवादातून केले आहे. अद्वैत, तत्वज्ञान असूनही आत्मप्रचिती, अनुभव याला त्यांनी खूप महत्व दिले आहे. दासबोधात त्यांनी मंगलस्तवन, मूर्खलक्षण, सगुणपरीक्षा, नवविधाभक्ती, मंत्र, देवशोधन, चतुर्दशब्रह्म, ज्ञान, गुणरूप, जगज्योती, भीमदशक, विवेक, वैराग्य, नामरूप, अखंड ज्ञान, आत्मदशक, सप्तनिन्वय, प्रकृतीपुरूषांचा, बहुजिनसी, शिकवण आणि पूर्ण दशक या वीस दशकातून संपूर्ण तत्त्वज्ञान सांगितले आहे.

## संप्रदायाची तीर्थक्षेत्रे

समर्थांचे आराध्य दैवत प्रभूरामचंद्रांची जी स्थाने आहेत ती सांप्रदायिकांसाठीसुध्दा तीर्थक्षेत्रेच आहेत. शिवाय जांब, चाफळ, सज्जनगड, शिवथरघळ आणि अकरा मारूती ही संप्रदायातील महत्त्वाची तीर्थक्षेत्रे आहेत.

## ४.४ समर्थ रामदासांचे सामाजिक कार्य

समर्थांनी केलेले समाजकारण, राजकारण काही  असेतसे नव्हते तर ते काही सूत्रांवर ते आधारलेले होते, त्यासाठी समर्थांनी हरिकथा निरूपण, राजकारण, सावधानता आणि साक्षेप यांच्या या साधनांची निवड केली, त्यामुळे समर्थांच्या सामाजिक कार्यात या चतुःसूत्रीला मोठे महत्त्व प्राप्त झाले.

### ४.४.१ समर्थांचे बालपण, पुरःश्चरण आणि तीर्थाटन काळातील सामाजिक जाणीव

समर्थ म्हणजे श्रीरामचंद्रांचा आशीर्वाद आणि मारुतीरायांचा अंश होते. म्हणजे त्यांचा पृथ्वीतलावरचा जन्म ही परमेश्वरी योजना असावी. त्यामुळे समर्थांसारख्या असाधारण व्यक्तीचे बालपणही असाधारणच होते, अतिशय हूड, खोडकर, खट्याळ, उपद्व्यापी वृतीचा असूनही हा नारायण फारच चौकस बुद्धीचा होता. अशा या एकपाठी तल्लख बुद्धीच्या नारायणाची चुणुक

लहानपणीच दिसायची. एका प्रसंगामधून त्याच्या म्हणजे समर्थांच्या अलौकिक अशा सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ तेव्हा रोवली गेली असे म्हणायला हरकत नाही.

नारायणाच्या आईला राणूबाईंना नेहमी वाटत असे त्याने घरात लक्ष द्यावे, मोठ्या भावाला मदत करावी म्हणून त्या एकदा नारायणाला खूप रागावून, तू काहीच काम करत नाही अशा बोलल्या. तेव्हा त्याने निमूटपणे ऐकून घेतले आणि तो बेपत्ताच झाला. कुठेही सापडेना अखेर अडगळीच्या खोलीत ध्यानस्थ मुद्रेने बसलेला नायायण आईला म्हणाला,'' आई, चिंता करितो विश्वाची. '' श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात ,''मी याला कुटुंबाची चिंता कर म्हटलं तर हा बसून विश्वाची चिंता करतो आहे?.' नारायण म्हणाला,' आई, वसुधा हे सुध्दा कुटुंब नव्हे काय? ''[१०८] एवढ्या लहान वयात समर्थांना कुटुंबापेक्षा जगाचे कुटुंबही महत्त्वाचे वाटले. त्याने पुढे घेतलेल्या समाजकार्याच्या व्रताची बोलण्यातून केलेली मुहूर्तमेढच.

स्वतःच्या लग्नात ऐनवेळेला केलेले पलायन हे सावध पलायन होते तेही पुढील कार्य करण्यासाठी, वसुधेची चिंता सोडवायलाच. याच निर्णयात नारायणाच्या पुढील उत्तुंग समाजकार्याची बीजे पेरली होती. सावध पलायनानंतर समर्थ गोदावरी नदीच्या उगमाच्या दिशेने वाटचाल करून नाशिक पंचवटी येथे काळ्याराम मंदिरात श्रीरामरायाला बघायला, भेटायला आले. जांब ते पंचवटी ही झेप थेट मारूतीरायासारखी होती. डोळेभरून रामरायाला पाहिले आणि रामरायांची स्तुती केली. श्रीरामचंद्राचा प्रत्यक्ष आशीर्वाद समर्थांना मिळाला. समर्थप्रतापात गिरीधर यासंदर्भात लिहितात,

'' आता धर्म स्थापना करावी तुम्ही। सेव्य सेवक भावे ऐक्य तुम्हीआम्ही।

सकळ साधु संत सकल्प कर्मभूमी। सिध्दिस नेईन निर्धारे।।९२।। ''[१०९]

प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांनी समर्थांना उपदेश केला, तुमचा अवतारच धर्माच्या रक्षणासाठी, साधुसंतांच्या उध्दारासाठी झाला आहे. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात म्हणतात,'' या प्रकरे सद्‌गुरू श्रीरामाचा कृपा प्रसाद संपादन करून समर्थ पुरःश्चरणाच्या योजनेस लागले. घरून निघताना प्रखर वैराग्य, निर्मल भाव, ध्येय निष्ठा आणि खडतर प्रसंगातही टिकेल असे शरीरिक सामर्थ्य एवढी शिदोरी समर्थांनी या प्रवासात बरोबर घेतली होती. ''[११०] वयाच्या अवघ्या

बाराव्या वर्षी श्रीरामरायांची आज्ञा आणि ती पूर्ण करण्याचा संकल्प समर्थांनी सोडला. त्यांच्या तीक्ष्ण बुध्दीने जाणले आपल्याला काय करायचे आहे. समर्थ शेवटपर्यंत वैराग्य, निर्मलभाव, ध्येयनिष्ठेपासून यत्किंचितही ढळले नाहीत. मानसिक आणि शारिरीक सामर्थ्य यांच्या जोडीने समर्थांनी श्रीरामरायांनी सोपवलेले कार्य अतिशय चोखपणे पार पाडले यात तिळमात्र शंका नाही.

कडकडीत वैराग्य अंगी बाणवून समर्थांनी बारा वर्षे टाकळीला गोदावरी नदीच्याकाठी पुरःश्चरण केले, जपजाप्य केले, अनेक ग्रथांचे पुराणांचे श्रवण, मनन, चिंतन केले, तपश्चर्या केली. या बारा वर्षात त्यांना खूप कष्ट झेलायला लागले. लोकांच्या निरर्थक चर्चेला तोंड द्यायला लागले. त्यातून घरच्या आठवणीने कित्येकदा मन व्याकूळ व्हायचे. पण तसूभर ध्येयापासून ते मागे सरकले नाहीत. एवढ्या लहान वयात खडतर तपश्चर्या करणे काही सोपे काम नव्हते. त्याचवेळी त्यांनी समाजालाही जाणण्याची सुरुवात केली. लोकांच्या अंतरंगाचा ठाव घ्यायला लागले. त्यांची निरीक्षण शक्ती कमालीची होती. त्यामुळे त्यांनी जनजीवन जवळून पाहिले. दशक–पंचक गावातील मृत झालेले गिरीधरपंत समर्थांच्या आशीर्वादामुळे वाचले. सती जाणाऱ्या अन्नपूर्णाबाईंना दिलेल्या केवळ 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' आशीर्वादाने गिरीधरपंत वाचले. हाच श्रीरामरायांचा आशीर्वाद होता. त्याप्रसंगापासून समर्थांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. उलटसुलट चर्चा करणारे लोक जे समर्थांच्या विरोधात होते तेच त्यांच्या भक्तीला लागले. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर म्हणतात,'' साधन काळातील श्रवण भक्तीने आणि तपाने समर्थांच्या जाणिवेला एक प्रकारची प्रगल्भता आली होती. ''[१११]

अशा पुरःश्चरणाच्या काळात एक विलक्षण योग आला. तो म्हणजे शहाजीराजे आणि समर्थांची भेट. त्यावेळेस त्या प्रातांची सुभेदारी शहाजीराजांकडे होती. त्या भेटीत अर्थातच तत्कालीन देशस्थिती बद्दल चर्चा झाली आणि बाल शिवाजीची स्वतंत्रपणे जडणघडण होऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना हे स्वप्न चर्चिले. त्याच अनुषंगाने समर्थांनी पुढील कार्याचा निश्चित आराखडा तयार केला. त्यात देशस्थितीचे अवलोकन, महाराष्ट्रात कृष्णा नदीच्या तीरावर येऊन समाजकार्याची सुरूवात, नंतर शिवरायांना स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मदत आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहाणे, वेळोवेळी त्यांच्याशी सल्लामसलत असे कार्य घडत गेले.

## तीर्थाटन काळातील सामाजिक जाणीव

पुरःश्चरणानंतर तेजस्वी असा हा नारायण २४ वर्षाचा झाला आणि देशातील सामाजिक परिस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पहाण्यासाठी, अवलोकन करण्यासाठी तीर्थाटनाला बाहेर पडला आणि समर्थ रामदास झाला. नुसतेच देशस्थितीचे निरीक्षण करणे समर्थांना नको होते तर त्यात पुढील कार्याची योजना करायची होती. एक विराट पुरूष महाराष्ट्रासह संपूर्ण भारत देश पालथा घालायला निघाला. हा विराट पुरूष अतिशय विरक्त होता. संसारपाशात समर्थ कधीच अडकले नाहीत की त्याचा विचारही त्यांनी कधी केला नव्हता. अगदी कोणत्याही बंधनात अडकले नाहीत. पण लोकांच्या  दुःखाने दुःखी झाले होते, मनात करूणा दाटली होती, दीनवाणा समाज पाहून कळवळले होते. तीर्थक्षेत्री जाऊन देवदर्शन तर घ्यायचेच होते, उत्तराखंडातील अयोध्येच्या रामरायाला पहायचे तर होतेच पण खरी गरज होती देशातील लोकांचे जीवन बघण्याची.

समर्थांनी टाकळी सोडले आणि प्रथम गेले वणीला. सप्तशृंग गडावर असलेल्या सप्तशृंगीला. पण प्रवासाच्या सुरवातीलाच एक विदारक दृश्य त्यांनी पाहिले. पर्वताच्या पायथ्याशी असलेली गावे उध्वस्त झाली होती. शेते कापून नेलेली, घोड्यांचे सांगाडे, मृत माणसांची प्रेते विखुरलेली, कवट्या उघड्यावर पसरलेल्या, शरीराचे अवयव इकडेतिकडे पसरलेले. पंचवटी सोडल्या सोडल्या लगेच हा प्रसंग पाहून त्यांचे काळीज पिळवटले, मन खिन्न झाले. घरे उघडी, मोकळी झाली होती. गावात एक माणूस नजरेस दिसत नव्हता. या संदर्भात श्री. गो. नी. दांडेकर लिहितात,'' समर्थांच्या ध्यानी यायला वेळ लागला नाही, की ह्या खुणा युध्दाच्या आहेत. ती वावटळ ह्या आपल्या खुणा मागे ठेवून या प्रदेशावरून वाहून गेली आहे. ''[११२] या पातशह्यांच्या जुलुमांची तर ती एक झलक  होती. अजून पुढे काय काय चालले असेल या देशात असे समर्थांना वाटले असेल.

अशा प्रकारे समाज हे सगळं सहन करीत होता. अतिशय भयानक, ह्रदयद्रावक स्थिती सगळीकडे होती. यवनी राजवटीने अंदाधुंदी माजवली होती. देशाचे चित्र फारच भयंकर होते. या संदर्भात सौ. कुमुदिनी देशपांडे लिहितात,'' देशात उत्तरेकडे मुसलमान राज्यकर्त्यांनी घातलेला धिंगाणा, दक्षिणेकडे पार्तुगीज शासनाचा येनकेन प्रकारेण होणाऱ्या त्यांच्या धर्माचा प्रसार व मध्यभागी म्हणजे प्रत्यक्ष महाराष्ट्रात पाच शाह्यांचा जुलुम असे देशाचे चित्र होते. ''[११३]

दक्षिणेकडे फिरंगी बलंदेज, इंग्रज आणि अरब हे बलदंड खानाशी धुमाकूळ घालत होते. या सर्वांचे शासनाची कारस्थाने इतकी वाईट होती की देशाचीच संस्कृती लयाला जाण्याच्या मार्गावर होती. या राजकीय, संघर्षात सर्वसामान्य समाज लाचार होत होता, होरपळत होता. ह्या सत्ता कशा धिंगाणा घालत होत्या? तर सतत सर्वदूर जाळपोळ, प्रत्येक बाबतीत मनमानी, लूटालूट, कत्तली करीत होत्या. स्त्रियांची तर परिस्थिती केवळ दयनीय होती. हे मुस्लिम, स्त्रियांची विटंबना करीत, त्यांना पळवून नेत, त्यांना भ्रष्ट करीत. अस्मानी सुलतानी मध्ये समर्थ म्हणतात,'' किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टविल्या। किती गुजरीणी ब्राह्मणी भ्रष्टविल्या। किती शांमुखी जाहाजी फाकविल्या। किती येक देशांतरी त्या विकल्या। किती सुंदरा हाल होऊनी मेल्या। लोक नीलंड नीलंड काढून नेती पोरी। ''[११४] सर्वांचा अनन्वित छळ, रोजच्या धाडी, देवालयाचा विध्वंस असे सर्व जणू महान धर्मकृत्य आहे असे समजून हे सर्व करीत होती. यात सक्तीने हिंदूना धर्मांतरीत केले जात होते. या सर्वांचा परिणाम म्हणजे पराकोटीचे दारिद्रय जनतेच्या वाटेला होते. सामान्य माणसाची दारुण विटंबना होत होती. समाजाचे जिवीत, वित्त आणि शील उघड्यावर पडले होते. धर्मांध मोगल हिंदू धर्म नष्ट करुन मुसलमान धर्म स्थापन करणे म्हणजे मोठे कार्य आहे असेच समजत. धार्मिक जुलूम इतके पराकोटीला पोहोचले होते की देवालये नष्ट होत होती. आपल्या हिंदू देवतांच्या मूर्ती मशिदींच्या पायऱ्यांखाली घातल्या जात होत्या. हेच काय कमी म्हणून निसर्ग पण कोपत होता. जणू कल्पांतच ओढवला होता. दुष्काळही त्यात भर घालत होता.

अशा रीतीने समाज अगतिक झाला होता. लोकांना खायला अन्न नव्हते. प्यायला पाणी नाही, तर साधे अंथरूण, पांघरूणही नव्हते, डोक्यावर आसऱ्याला छप्पर नव्हते. जवळ काहीही वस्तु शिल्लक नाही अशी दयनीय परिस्थिती निर्माण झाली होती. अशा भयंकर परीस्थितीत लोक जगत होते.

हे महागाई, दुष्काळ, दैन्याचे चित्र पाहून समर्थांच्या जीवाची घालमेल झाली. पर्जन्याच्या अभावामुळे दुष्काळ तर पडलाच, माणसांची उपासमार व्हायला लागली, याला एक महत्वाचे कारण म्हणजे प्रजेला दास्यात ठेवण्यासाठी मुस्लीम बादशहांना जे अवाढव्य लष्कर पोसावे लागे, म्हणून जो खर्च करावा लागे तो प्रजेला पिळूनच भागवावा लागे. शिवाय हलाखीच्या

परिस्थितीमुळे दरोडेखोर, लुटारु यांचेही राज्य सुरु झाले. कुणीही उठाव, चार–दहा दांडगट माणसं गोळा करावीत, कोणत्याही गावात घुसावं आणि लूटावं अशी पण परिस्थिती निर्माण झाली. कोण कुणाला रोखत नव्हतं, कुणी कुणाला आधार देत नव्हतं, अश्रू पुसायला कोणी नव्हतं.

यातून समर्थांना काय जाणीव झाली? तर अशा या अत्यंत गंभीर परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज व्हायची वेळ आली होती, सगळी अंदाधुंदी संपवायला हवी होती, अन्यायाविरुद्ध बंड पुकारायची गरज होती आणि परकीय सत्तेला हाकलून लावायला हवे होते, यासाठी समाज जागृत करण्याची गरज होती, माणसामाणसांची मने जुळवायची होती, समाज संघटित करायला हवा होता, समाजाला मूल्यशिक्षण देण्याची जरुरी भासत होती. अशा या गांजलेल्या, अगतिक समाजाला कुणीतरी योग्य दिशा दाखविणारा हवा होता जो या परिस्थितीतून त्यांना सहीसलामत सोडवील. या परिस्थितीत समर्थांचे मन खूप दु:खी झाले, कळवळले. त्यांना समाजाचे दु:ख पाहवेना, राज्यावरचे अरिष्ट सहन होईना. म्हणून या समाजामागे त्यांनी हिमतीने उभे रहायचे ठरविले. तीर्थाटनाच्याच काळात ते एक एक योजना मनाशी योजत होते. याच काळात पुन्हा एकदा समर्थांची आणि शहाजीराजांची भेट झाली. अनेक वर्षांनी भेट झाल्यामुळे दोघेही गहिवरले होते. पण दोघांनीही भावनेच्या आहारी न जाता पुढील योजनांवर सल्लामसलत केली. शहाजीराजांनी त्यांच्या देशभ्रमणाबद्धल माहिती विचारली. शहाजीराजांना देशातील परिस्थितीची कल्पना होती तरी समर्थांनी केलेले विदारक स्थितीचे वर्णन ऐकून शहाजीराजांच्या काळजाला घरं पडत होती. या संदर्भात श्री. गो. नी. दांडेकर लिहितात,'' उत्तरेतले बेबंद, दुष्काळ, कल्पांत, धाडी, जनांचा देशत्याग, वोस पडलेली ग्रामे, पिकांचे नष्ट होणे, सैनिकांचे क्रौर्य, त्यांनी केलेले संहार, खायला न मिळणे, झाडास टांगलेले फास, नानाविध शिक्षा, खोडे, पायबेड्या, गळ्यात अडकलेले नांगर. ''[११५] अशा हृदये चिरत जाणाऱ्या आकांताचे वर्णन ऐकून शहाजीराजे दु:खी झाले.

समर्थांचे वैराग्य, शरीरयष्टी, निष्ठा, देशाचा केलेला अभ्यास, जबरदस्त आत्मविश्वास, त्यांच्या नजरेतील चमक बघून शहाजीराजे अजूनच समर्थांच्या व्यक्तीमत्त्वाने भारावले आणि त्यांना जाणवले की पुढच्या योजनेसाठी हे त्यांचे स्वामी म्हणजे समर्थ यांना आपल्या

स्वप्नपूर्तीसाठी ईश्वराने पाठविले आहे. शहाजीराजांनी लगेच त्यांच्या मनातील विचार समर्थांच्या समोर प्रकट केले. शहाजीराजांनी समर्थांना माहिती दिली की जिजाऊसाहेब आणि शिवबा हे महाराष्ट्रातील शहाजीराजांच्या जहागिरीत राहतात. त्या स्वतः विचारवंत असून त्याच स्वतंत्र राज्याचे स्वप्न बघत आहेत. त्यांना आपली चाकरी मान्य नाही. आपल्या मुलाला म्हणजे शिवाजीला हाताशी धरुन हे स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करावे हा त्यांचा मनसुबा आहे. शहाजीराजे शिवरायांचे पण वर्णन करतात की हा मुलगा चतुर आहे, विचारी आहे, मुळातच उष्ण रक्त त्यांच्या अंगात सळसळतय आणि मुख्य म्हणजे तो पण जनतेच्या सुखासाठी आसुसलेला आहे. त्याला या शाह्यांच्या तावडीतून रयतेला सोडवायचे आहे. काही नवीन करावे, जहागिरीत सुधारणा कराव्यात, यासाठी अर्थातच स्वतंत्र राज्याची कल्पना त्यांच्या मनात घोळत आहे. शहाजीराजांनी समर्थांना विनविले की त्यांनी या कार्यास आशीर्वाद द्यावेत. आणि त्या जहागिरीत जाऊन शिवराजांना सहाय्य होईल असे कार्य करावे.

त्याचवेळेस इकडे शिवरायांनी लहानपणापासून पातशाह्यांचे अन्याय–अत्त्याचार पाहिले होते. या भरतभूमीवर इतक्या परकीय राजवटी न नांदता स्वतःच एक राज्य असावं असं त्यांना वाटत होत. आईची योग्य शिकवण आणि दादोजी कोंडदेवांचे बाणेदार शिक्षण यात हा सिंहाचा छावा चांगलाच तयार व्हायला लागला होता आणि हळूहळू स्वराज्य स्थापनेची बीजे रुजायला लागली होती. मग समर्थांच्याही कार्याला सुरुवात होणार होती ती याच विचाराने की समाजाला आधार हवा, वाली हवा, नेता हवा, स्वराज्य स्थापन व्हावे आणि एका समर्थ राजाने सिंहासनावर आरुढ होऊन राज्याची धुरा सांभाळावी आणि अवघ्या महाराष्ट्राचा स्वतंत्र संसार सुरू व्हावा.

त्यानंतर समर्थांच्या कार्याचे ठोकताळे बांधून झाले, आराखडे तयार करुन झाले. स्वधर्म–स्वराज्यस्थापनेसाठी प्रथम पाऊल उचलायचे होते ते समाजपरिवर्तनाचे. कारण राजकीय, धार्मिक आणि सामाजिक परिस्थिती बदलायची म्हणजे समाजाची मानसिकताच पहिले बदलणे जरुरीचे होते. अर्थात हे परिवर्तन काही सोपे नव्हते. तत्कालीक विचारसरणी लोकांना जखडून बसली होती आणि ती प्रथम बाजूला सारली की दुसऱ्या नवीन विचारसरणीचे महत्त्व पटवून द्यायला सोपे जाणार होते. त्यासाठी संप्रदायाचे प्रवर्तन, मठनिर्मिती आणि

महंताकडून कार्यपूर्ती अशी योजना त्यांनी अंमलात आणली. समाज कसा बदलायचा अशी साशंकता निर्माण होईपर्यंत त्यांनी आत्मविश्वासच निर्माण केला. समर्थांच्या बुद्धीमत्ता, दूरदृष्टी, सद्‌विवेक, तडफदारपणा, कणखरपणा, अचूक निर्णय क्षमता अशा अनेक उत्तम गुणांनी सामाजिक परिस्थितीचे जे स्थित्यंतर झाले ते केवळ अद्वितीय आहे.

जेव्हा समर्थांनी आपले कार्य सुरु करण्या आधी परिस्थितीचे जे अवलोकन केले त्यातून असा विचार त्यांच्या मनात आला की, पातशाह्यांची राजवट जरी ठाण मांडून बसली असली तरी ती आता स्थिरावली आहे. त्यामुळे त्यांच्या कारकीर्दीत ढिलेपणा आला आहे. त्यांचे राज्य म्हणजे पोकळ वासाच आहे. आता घाव घातला तर तो बरोबर बसेल. आता दैव त्यांना साथ देत आहे. म्हणजे कायमच हे दैव त्यांच्या पाठीशी राहणार नाही कारण केवळ ते पापकृत्यच करीत आहेत. म्हणून समर्थांच्या मनाने निर्णय घेतला की, त्यांच्या विरुद्ध आवाज उठवायचा, त्यांना उखडून काढायचा योग्य काळ आला आहे. फक्त आता लोकशिक्षक होऊन कार्याचा श्रीगणेशा करु, आपोआपच आपली चेतना, उत्साह, कामाचे महत्त्व बघून मग संपूर्ण जनतेची साथ आपल्याला मिळेल. कारण समर्थांनी एक खूप चांगली गोष्ट सांगितली ती म्हणजे,'वन्ही तो चेतवावा रे। चेतवितांच चेततो। केल्याने होत आहे रे। आधि केलेचि पाहिजे।।'

या तत्त्वावर फक्त कुणीतरी अग्नी प्रज्वलन करणे गरजेचे आहे. मग तो अग्नी आपले खरं पेटण्याचे रुप घेईलच. अशा रीतीने या तत्वावर समर्थांनी लोकशिक्षकाची भूमिका स्वीकारली. समर्थांचे हे कार्य अवाढव्य होते, त्याचा विस्तार, पसारा खूप मोठा होता. अर्थातच नियोजनबद्ध कामाची सुरुवात पण अशी तशी करुन चालत नाही. तिला पूर्वतयारी आवश्यक असते. या संदर्भात सौ. कुमुदिनी देशपांडे लिहितात,'' कोणत्याही कार्याला विचार, बुद्धी, चिंतन ह्या शिवाय हात लावण्याचा त्यांचा पिंडच नव्हता. ''[११६] खरच समर्थांच्या अंगी विवेक, विचार, नियोजन, दूरदृष्टी अगदी ओतप्रोत भरल्या होत्या. तो प्रत्येक कृती करण्याआधी त्यामगची पार्श्वभूमी, त्याचा परिणाम वगैरे सर्व गोष्टींचा खोलवर विचार करीत. मग ही जी महत्त्वाची भूमिका बजावायची होती तिचा तर त्यांनी केवढा अभ्यास केला असेल? परिस्थिती, नियोजन, परिणाम अशा अनेक गोष्टींचा त्यांनी पूर्णपणे अभ्यास केला. केवळ बाराव्या वर्षापासून ते समाजात वावरत होते. समाजाची सुखदुःखे जवळून बघत होते. समाजातील प्रत्येक माणसाचे

मन निरखित होते. त्यामुळे समाजाचे परिवर्तन ही सर्वात पहिली पायरी त्यांच्या कार्याची होती. मूळात अन्यायाला प्रतिकार करायचा असेल तर त्यासाठी मन कणखर हवे, परिस्थितीशी सामना करण्याची मानसिकता हवी. म्हणजे ती मानसिकता समाजात तयार झाली की मग आपोआपच झगडण्याचे बळ त्यांच्या मनगटात येईल.

समर्थांचे कार्य सोपे नव्हते. कारण राजकीय, धार्मिक आणि सामाजिक या तिन्ही आघाड्यांवर त्यांना एकाच वेळी लक्ष केंद्रित करायला लागणार होते. जेव्हा शहाजीराजांनी बंगळूर येथे समर्थांची पुन्हा भेट झाली ती अनेक वर्षांनी. जेव्हा टाकळी  येथे भेट झाली तेव्हा समर्थांचे पुरःश्चरण चालू होते आणि बंगळूर ये्थे भेट झाली तेव्हा समर्थ  सर्वार्थांनी प्रगल्भ झाले होते, तोपर्यंत त्यांचा जवळजवळ सगळा देश पालथा घालून झाला होता आणि देशस्थितीचा अभ्यास झाला होता. त्यामुळे टाकळीच्या भेटीत त्यांच्यात फक्त कार्याबद्दल बोलणे झाले. कार्याचे नियोजन झाले होते. अर्थातच तेव्हा शिवराय वयाने खूपच लहान होते.

### ४.४.२ कृष्णातीरी कार्याची मुहूर्तमेढ

तीर्थाटनाच्या निमित्ताने भारतभ्रमण हा समर्थांच्या सामाजिक कार्याचा पायाच होता. देवदर्शन आणि पुण्यप्राप्तीसाठी लोक तीर्थयात्रा करतात, पण समर्थ लोकोध्दारासाठी निघाले होते, त्या उध्दार, प्रबोधन कार्याच्या योजना आखण्यासाठी, परिस्थितीचा अभ्यास करून त्याचे मार्ग त्यांना शोधायचे होते. त्याकाळात ते मंदिरे–मठ स्थापत होतेच आणि शिष्यगण गोळा करत होते. पण त्यांची कर्मभूमी महाराष्ट्रच होती. कारण महाराष्ट्रात स्वराज्य स्थापना करायची होती, भावी स्वराज्याचा भावी राजा महाराष्ट्रात सह्याद्रच्या कुशीत वाढत होता, तारूण्यात पदार्पण करून स्वतःच्या हिकमतीवर, बळाच्या जोरावर धर्मसंस्थापनाच्या कार्याची मुहूर्तमेढ करत होता, सह्यगिरीच्या राज्यात पाय रोवत होता. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्रातच जास्तीत जास्त मठ निर्माण  केले.

तीर्थाटन करून समर्थ महाराष्ट्रात पुन्हा आले तेव्हा मसूर आणि आजूबाजूचा परगणा शहाजीराजांकडे होता. शिवराय आणि शिवरायांची कर्मभूमी ही आसपासची होती. हा परगणा शहाजीराजांच्याकडे असून कारभार शिवरायच करत होते. त्यामुळे समर्थांच्या कार्याची सुरुवात मध्य ठिकाणी म्हणजे कृष्णीतीरी झाली. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' इ.

स.१६४५ ते १६४९ ही चार वर्षे समर्थ महाबळेश्वर, कराड, मसूर, चाफळ, कोल्हापूर या परिसरात मुक्त संचार करून जागोजागी हनुमंताची देवालये उभी करत आहेत आणि याच काळात शिवाजी महाराज एक एक गड सर करत आहेत. ''[११७]

समर्थ सर्वात प्रथम महाबळेश्वरला आले. सह्याद्रीचे रूप पाहून ते मोहितच झाले. तीर्थाटनाच्या काळात समर्थांनी हिमालय, सातपुडा, अरवली असे अनेक पर्वत पाहिले होते. सह्याद्रीचे रूप रौद्र असले तरी सह्याद्री त्यांच्या मनास भावला. कारण भावी राजाच्या कारकीर्दीला हाच सह्यपर्वत कारणीभूत राहणार आहे याची खात्री समर्थांना होती. सह्याद्रीच्या उंच कड्यावर अवघा परिसर त्यांनी न्याहाळला आणि मनोमन निर्णय केला की आता हाच सह्याद्री माझी कर्मभूमी. समर्थांनी जुन्या महाबळेश्वरच्या प्रशस्त मंदिरात 'महाबळेश्वर' चे म्हणजे महादेवाचे दर्शन घेतले, आणि आनंदून कृष्णा–कोयना–वेण्णा–गायत्री–सावित्री या पाच नद्यांच्या संगमस्थानी पोहोचले. नद्यांचा उगम, तिथले कृष्णेचे मंदिर, आजूबाजूची घनदाट वृक्षवल्ली बघून त्यांचे मन खूप प्रसन्न झाले. सर्व दिशेला पर्वत दऱ्या–खोऱ्या पाहूनच त्यांना डोळ्यासमोर ते शिवराय, शिवरायांचे सैन्य अणि त्यांचे स्वतंत्र राज्य दिसले आणि आता त्याच स्वराज्यनिर्मितीच्या कार्याला हातभार लायवचा होता. भावी राजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहायचे होते.

महाबळेश्वरच्या डोंगर, दऱ्या–खोऱ्या, गाव, वस्त्या समर्थ पालथे घालत असतानाही ते अभ्यासूवृत्तीनेच माणसांशी सख्य करत, चौकशी करत. कृष्णेच्या मंदिर परिसरतच समर्थांची दिवाकरभट आणि अनंतभट यांच्याशी भेट झाली. त्या दोघांना पारखल्यावर अर्थातच समर्थांनी पुढील कार्याच्या दृष्टीने जवळ केले. समर्थांनी स्वतः पाथरवटाकडून मारूती बनविला आणि त्याची स्थापना केली. दिवाकरभट दिवाकर गोसावी झाले. समर्थांनी त्या मंदिराचा कारभार आणि कार्य त्यांच्यावर सोपवले. ह्याच दिवाकर गोसावींनी पुढे राजकारणात खूप मदत केली. म्हणजे समर्थांनी या परिसरातूनच शिष्यशाखा वाढवायला सुरूवात केली.

संपूर्ण महाबळेश्वर परिसराचा अभ्यास करून समर्थ वाईला आले. वाईत समर्थांच्या कार्याला चांगलाच जोर मिळाला. कृष्णातीरीच समर्थांनी मारूती स्थापला. तो 'रोकडोबा' या नावाने. यासंदर्भात श्री. अनंत रामदासी लिहितात,'' तेथील थिटे, पिटके, चित्राव या

घराण्यातील लोक समर्थांचे शिष्य झाले.'' कृष्णेच्या दक्षिणतीरी श्री सिध्देश्वराच्या स्वयंभू स्थानालगत मारूतीरायाची स्थापना करून तेथील पूजा पिटके यांच्याकडे दिली ''[११८] वाईत समर्थांनी सर्व मुलांना, तरूणांना एकत्र केले होते. त्यांच्याकडून कृष्णेच्या काठावर सूर्यनमस्कार घालून घेतले, त्यांना व्यायामाची गोडी लावली, भिक्षेचे महत्व समजावले. वाईतील कार्य म्हणजे समर्थांनच्या कार्याचा पहिला टप्पा. समर्थांनी वाईतील गावां–गावांतील वाद, वैर मिटविले होते. समर्थांनी या लोकांना खूप छान समजाविले. समर्थ त्यांना समजावत की त्यांच्या अंगातील रग, मस्ती एकमेकांच्या वैरासाठी खर्ची घालण्यापेक्षा हेच बळ स्वराज्य–निर्मितीचा जो उठाव होत आहे, तिकडे वापरावे. समर्थांच्या व्यक्तीमत्त्वामुळे वाईतील लोक खूपच प्रभावित झाले आणि समर्थांना तरूणांना स्वराज्य निर्मितीच्या कार्याकडे वळवायचे होते. तेथेही त्यांना सफलता मिळत होती. एवढेच काय तर वाई परिसर ताब्यात असलेल्या अमिनाला त्याच्याच सरकारवाड्यात जाऊन अशी समज दिली की, समर्थांचा त्यांच्यावर चांगलाच वचक बसला. वाईत कृष्णातीरावर समर्थांनी कीर्तने केली. आपल्या तेजस्वितेने तेथील समाजाला खेचून घेतले आणि कीर्तनांमधून समर्थांनी समाजप्रबोधन केले. श्रीरामचंद्र, हनुमंताची भक्ती करायला सांगून, त्यांच्या पराक्रमाच्या कथा ऐकून वाईतील लोकांची मानसिकता बदलायला सुरूवात झाली.

वाईतील लोकांचे प्रबोधन करून समर्थ माहुली–जरंडेश्वराच्या परिसरात आले. कृष्णा–वेण्णा संगमी काही दिवस राहिले. जरंडेश्वरला जे अनादीसिध्द मारूतीचे स्थान आहे तिथे ते राहिले. जरंड्यावरच त्यांची कराडच्या रूद्राजी देशपांडे आणि त्यांची कन्या अक्का यांची भेट झाली. अक्का म्हणजे अक्का स्वामी, ज्या पुढे समर्थांच्या शिष्या झाल्या. रूद्राजीपंतांनी समर्थांना कराडमध्ये यायची गळ घातली आणि वाईच्याच कार्याची पुनरावृत्ती कऱ्हाडमध्ये झाली. कऱ्हाडच्या कृष्णेच्या घाटावरही तरूण जमले. सूर्यनमस्कार, दंड–बैठका, घालू लागले, कुस्ती, पट्टे, तलवारी शिकू लागले. मुलांना पाठशाळेत यायची गोडी लागली, एवढेच नाही तर प्रौढ माणसेही रात्री देवळात जावून रामायण–महाभारतासारखी पुराणे वाचू लागली. येथील तरणीताठी मुले समर्थांच्या शिकवणूकीने भारावून गेली. कऱ्हाडमध्येही समर्थांची कीर्तने झाली. त्यांची तेजस्वी वाणी सर्वांवर छाप पाडत होती. समर्थांनी कीर्तनातून खूप उपदेश केले. देवांसमोर पशुहत्या करण्यापेक्षा, नातलगांचे गळे कापण्यासाठी तलवारीचा उपयोग करण्यापेक्षा

याच तलवारीचा उपयोग गनिमांना कापण्यासाठी करा. हकीम तुमच्यावर एवढा अन्याय करतात, जेव्हा तुमच्यासमोर पीके कापून नेतात, मुलीबाळींवर अत्याचार करतात तेव्हा तुमच्या मनगटातील जोर कुठे जातो. 'तुम्ही देवास विसरलात. आता अन्यायाला वाचा फोडा. या संदर्भात श्री. गो. नी. दांडेकर लिहितात,'' तेव्हां उठा! आपापली शस्त्रे पाजळा! मेलात, तुम्हांसाठी स्वर्गद्वारे मोकळी आहेत. जिंकलात, तुमच्यासाठी पृथ्वीचे राज्य आहे.''[११९] तरुणांच्या मनामध्ये समर्थांनी अशा रीतीने एक प्रकारची ठिणगीच टाकली.

कोयना कऱ्हाड करून समर्थ शहापूरला आले. शहापूरपासून अगदी जवळच समर्थ एका टेकडीवर राहिले. अर्थात भिक्षा मागायला शहापूर गावात येत. या गावात गावकीची कामं बघणारे बाजीपंत कुलकर्णी आणि त्यांच्या पत्नी यांना समर्थांच्या सामर्थ्याचा अनुभव आला, आणि समर्थांनी त्यांना  अनुग्रह दिला. शहापूरला त्यांच्याच वाड्यात समर्थांनी मारूतीची स्थापना केली. शिवाय समर्थांना गुरुदक्षिणेत सतीबाईंनी आपला मुलगा भीम जो समर्थांना खूप आवडत होता तो दिला. हा भीम म्हणजेच भीमस्वामी, तंजावरच्या मठाचा मठपती. अशा रीतीने शहापूरमध्येही समर्थांनी अजून लोकसंग्रह वाढविला.

मिरजेत असताना समर्थांची कीर्तने चालू होती. कोल्हापूरच्या गोपजी देशपांडेची मुलगी वेणा ही सासरी मिरजेला होती. लहानपणापासूनच ती विधवेचे जीवन जगत होती. एकदा समर्थ भिक्षेसाठी घरी आले असताना ती भागवत ग्रथांचे वाचन करत होती. तेव्हा तिची अध्यात्मीक वृत्ती समर्थांना आवडली. वेणाबाईंनी जिज्ञासूवृत्तीने काव्यातून समर्थांना पंचवीस प्रश्न विचारले आणि समर्थांनीही त्वरीत उत्तरे दिली तीही काव्यातूनच. पुढे कोल्हापूरला माहेरी असताना त्या समर्थपरिवारात सामावल्या.

मिरजेत कीर्तनातून उपदेश देतदेत समर्थ कोल्हापूरला आले. वेणा तेव्हा माहेरी  आली होती. ती रोज कीर्तनाला जायची आणि समर्थांशी पारमार्थिक चर्चा पण करायची. मात्र जननिंदेला तिला तोंड द्यावे लागले. पण समर्थांनी कोल्हापूरातील या जननिंदेला सडेतोड उत्तर दिले आणि वेणाला समर्थांनी अनुग्रह दिला. ही वेणा म्हणजेच वेणास्वामी, या मिरजमठाच्या मठाधिपती झाल्या. या प्रसंगातून समर्थांनी समजाला मोठी समज दिली. स्त्रियांनाही वेद, पुराणे

वाचण्याचा अधिकार आहे. कीर्तन–प्रवचन ऐकण्याचा अधिकार आहे. स्त्रिया पारमार्थिक विषयावर चर्चा करू शकतात.

अशा रीतीने समर्थ प्रत्येक गाव जोडीत, लोकसंग्रह वाढवित होते. शिष्यांच्या रूपात ह्न्यिामाणकांना मिळवत होते. उत्तमउत्तम तरूण मुले निवडत. त्यांना रामभक्तीचा महिमा पटवून देत. त्यांना बलसंपदेचे महत्व समजावून शिवरायांकडे कशी आकर्षित होऊन स्वराज्य–निर्मितीत सहाय्य करतील यावर समर्थांचे लक्ष केंद्रित होते. कोल्हापूर नीट न्याहाळल्यावर त्यांना वाटले हा प्रदेश श्रीराम आणि हनुमंतांच्या स्थापनेस योग्य वाटेना, कोल्हापूर सुरक्षित वाटत नव्हते. परंतु कीर्तने करीत असताना समर्थांना दोन दहा बारा वर्षाची मुले म्हणजेच कल्याणस्वामी आणि दत्तात्रय गोसावी ही दोन रत्ने मिळाली. या दोघांचेही भविष्यातील कार्य थोर आहे. शिवाय त्यांच्या आईला लक्ष्मीबाईंना अनुग्रह देऊन शिरगाव येथे मठ स्थापून दिला.

महाबळेश्वरपासून–कोल्हापूरपर्यंत समर्थांनी खूप संचार करून, मंदिरे–मठ स्थापन केले. लोकांना परमार्थिक जीवनाची गोडी लावली. समाजकारण केले, मनगटात बळ निर्माण करून दिले, आणि देशसेवचे महत्व पटवून दिले.

**मसूर परगण्यात कार्यारंभ**

समर्थांनी पहिला रामनवमी उत्सव मसूर येथे केला. समर्थ एक गोष्ट जाणून होते की उत्सव साजरा करायला मनुष्यबळ हवे. तसे त्यांना महाबळेश्वर–कोल्हापूरच्या पट्ट्यामधून मिळालेच होते. तो त्यांचा शिष्यसमुदाय आणि लोकसंग्रह वाढवितच होते. शिवाय मसूर म्हणजे शहाजीराजांच्या जहागिरीचे ठिकाण, त्यामुळे मसूरला ऐतिहासिक दृष्ट्याही महत्व होते. अनेक ठिकाणी मठ–मंदिरांच्या स्थापनेमुळे लोक भक्तीभार्गाकडे वळत होते. अर्थातच समाजाची विचारसरणी बदलत चालली होती. मसूरला रामनवमी उत्सव म्हणजे समर्थांचे राजकारणातील एक पाऊलच होते. मसूर मध्ये मारूती स्थापन करून रामनवमी उत्सव सुरू करणे यात शहाजीराजांची इच्छा असू शकते. कारण मसूर परगणा त्यांच्या अखत्यारित होता आणि मुसलमान लोकसंख्या होतीच त्यामुळे हिंदू–मुसलमान यांचे खटके उडायचे. पण समर्थांनीही विचारपूर्वक मसूरचे मठपती एक पहिलवानच नेमला होता. तो सदा हातात मुसळच घेऊन फिरत असे. त्याचे नावच ‘मुसळराम’ होते. अनेक राजदरबारातील मंडळी पण समर्थांच्या

परिवारात येत होती. मग ही वजनदार मंडळी आणि आपला समुदाय जर रामनवमी उत्सवानिमित्त एकत्र आला तर खूप चांगला राजकीय परिणाम साधला जाईल याचा समर्थांनी अतिशय दूरदृष्टीनेच विचार केला. समर्थांचा हा रामनवमीचा उत्सव यशस्वी झाला. समर्थांनी जगन्नाथपुरीला रथयात्रा पाहिलीच होती, तशीच रामाच्या मूर्तीची रथयात्रा काढली. सर्वात महत्वाचे म्हणजे या उत्सवात, मिरवणूकीत सर्वात जास्त तरूणच सामील झाले होते.

समर्थांनी कऱ्हाडजवळील शमनापीर डोंगरावर मुसलमांच्या ऊरूसात शाहिरी काव्य करून त्यांना जिंकले. शिरगावचे मारूतीमंदिर म्हणजे शमनापीर उरूसाला दिलेला शहच होता. त्यामुळे अर्थातच मुसलमानांवर समर्थ धाक बसवित होते. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' ज्या काळात मंदिरे पाडली जात होती त्या काळात समर्थ मंदिरे उभी करत होते. ज्या काळात देवांचे नैवेद्य बंद पाडले जात होते त्या काळात समर्थ मोठ्या प्रमाणात रामनवमी उत्सव साजरा करत होते. ''[१२०]

### ४.४.३ चाफळला श्रीराममंदिराची स्थापना

मसूरच्या आजूबाजूच्या प्रातांत मारूतीची मंदिरे स्थापन केली. समर्थांच्या कार्याला आता चांगला आकार प्राप्त झाला होता. समर्थांनी जे जे योजिले होते, त्यातील एकेक टप्पा ते पार करीत चालले होते. महाबळेश्वरपासून कोल्हापूर, इकडे मिरजपासून मसूरपर्यंत लोकसंग्रह, शिष्यसमुदाय गोळा केला. पण त्यांना वाटायला लागले की या कार्याचे एक केंद्र असावे जेणे करून कार्याचे व्यवस्थापन करता येइल. त्यासाठी एक भव्य वास्तू उभारावी अर्थातच मोठे मंदिर आणि तेही आता श्रीरामचंद्रांचे, कारण श्रीराम त्यांचे आराध्य दैवत. एकदा का येथे केंद्र स्थापन झाले की आपली संघटना मजबूत तर होईलच शिवाय कार्यकर्त्यांशी, मठाधिपतींशी सतत संपर्क राहील म्हणजे एकप्रकाराने ठाणेच. अर्थातच या भव्यदिव्य मंदिराची स्थापना म्हणजे ते कामच मोठे भव्य आव्हानात्मक होते. पण समाजसेवेचे व्रत घेतलेले समर्थ थोडेच कमी होते? त्यांनी समर्थपणे हे आव्हान पेलले, तेही केवळ स्वतःच्या आणि संप्रदायातील लोकांच्या श्रमावर आणि हिकमतीवर.

संप्रदायाचे केन्द्र सुरक्षित ठिकाणीच असायला हवे होते. कारण एक तर समर्थांना राजकारणही करायचे होते आणि त्या बाबतीत गुप्तता पाळणेही खूप महत्वाचे होते. चाफळ हे

शिवरायांच्या कर्मभूमीसाठी मध्यवर्ती होतेच आणि आजूबाजूला डोंगर, मांडनदी, घळींसारखी स्थळे, तसेच तारळ, परळ, जावळी वगैरे खोरीच्या परिसरात चाफळ होते. शिवाय चाफळ भागातील सर्वात उंच डोंगरकड्यांवरून सर्व दिशांचा दूरवरचा प्रदेश नजरेत येत होता. शत्रूंच्या आक्रमणांवर चाफळ खोऱ्यामुळे आपोआपच नियंत्रण होणार होते. म्हणजे समर्थांच्या कार्यक्षेत्राची चाफळ ही राजधानीच होती.

समर्थ चाफळला आल्यानंतर प्रश्न उभा राहिला मोठ्या जागेचा कारण संप्रदायाच्या या केन्द्रासाठी जागाही खूप मोठी लागणार होती. चाफळ सुभ्याचे अधिकारी नरसो मल्लनाथ यांनी एक टेकाडावरची सर्व जागा देऊ केली. पण तिथे पूर्वी स्मशान होते. त्यामुळे काही जणांचा या जागेसाठी नकार होता. प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांचे मंदिर उभारायचे म्हणल्यावर भय कसले, म्हणून समर्थांनी मात्र त्या जागेसाठी त्वरीत होकार दिला. समर्थांनी ते टेकाड सर्वदूर फिरून निरखले आणि श्रीरामचंद्रांना आमंत्रण दिले. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,''राघोबा उदारा ये तुझ्या मंदिरा। जानकीच्या वरा देवराया।। चित्त निरंतर जडले तुझे पाई। धावोनीया येई रामराया।। प्रेमे स्फुंदताहे उभारूनी बाहे। वाट तुझी पाहे रामदास।। ''[१२१]

अशा रीतीने समर्थांनी त्यांच्या रामरायाला प्रेमाने आमंत्रण दिले आणि त्याच आवेशाने समर्थ म्हणाले,'' श्री रघुपती येणार आहे. या स्थानाची अवकळा हरपणार आहे. येथे देवाचे देवालय उभे राहाणार आहे. मंगळ उच्छाव होणार आहे. जनांचा सत्कर्माविषयींचा प्रेम वाढणार आहे. दुष्ट दुराचाऱ्याचा नाश होणार आहे. अभक्तांचा क्षय होणार आहे. हे स्थळ महाराष्ट्राचे तीर्थ होणार आहे. येविषयी शंका करण्याचे यत्किचिंतही कारण नाही. ''

समर्थांचे हे शब्द किती आत्मविश्वासाचे होते. सर्व महाराष्ट्रासमोरच समर्थांनी चाफळ मंदिराविषयीच्या भावना व्यक्त केल्या. ही जरी स्मशानभूमी असली तरी रघुपतींच्या आगमनाने ती पवित्र होईल. आता इथे मांग्यल्य नांदून सर्व चांगलेच होणार, दुष्टांचा संहार, अभक्तांचा नाश होणार, चाफळ रामभूमी हे एक तीर्थक्षेत्र होईल, या विचाराने समर्थ आनंदले.

ही स्मशानभूमीच असल्याने सुरूवातीचे कामही मोठे होते. कळकांची बेटे होती, झाडे होती, अनेक शेंदऱ्या देवांना ठिकठिकाणी बसविले होते. समर्थांनी जेव्हा ही सर्व कळकांची बेटे झाडेझुडपे तोडून द्यावी असा प्रस्ताव गावांतल्या लोकांकडे मांडला तेव्हा कोणीच भितीमुळे पुढे

येईना. भूताखेताची, पिशाच्च्याची बाधा होते या समजूतीने कोणीच पुढे येईना, मग समर्थांनीच या कामात पुढाकार घेतला आणि या सर्व शेंदऱ्या दगडांना मांड नदीच्या कुंभार डोहात बुडवून टाकले. पण एक म्हसोबा (दगडाचा देव) काही निघत नव्हता तर समर्थांनी त्याला समजावले. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,''तुम्ही व तुमचा समुदाय उत्तम जन नव्हेत लोकांस उपद्रव करणार. या स्थानी आता श्रीराम मंदिर होणार, श्रींची स्थापना झाल्यानंतर सहस्त्रावधी भक्त मंडळी येथे येतील, त्यांना तुमचे राहाणे येथे कसे परवडेल?''[१२२] यावर म्हसोबाने पण समर्थांना समजावले त्याची इथून जायची इच्छा नाही आणि त्याला वंचित करू नये. मग समर्थ तयार झाले आणि त्याची स्थापना नव्याने एका कोपऱ्यात जांभळाच्या झाडाखाली केली. शिवाय त्याला कबूल केले की रामनवमीच्या रथोत्सवात मान दिला जाईल, एक मापटेभर तांदूळ, एक नारळ आणि नंतर दहिभात दिला जाईल. आजही तो म्हसोबा तेथे आहे आणि आजही त्याचा मान त्याला दिला जातो.

त्यानंतर स्वतः समर्थच कुऱ्हाड घेऊन झाडे–झुडपे तोडायला निघाले. मग एकेकाची भिती नष्ट होऊ लागली. सर्व शिष्य मंडळी नरसो मल्लनाथ वगैरेंसह मुहूर्त करून बांधकामास सुरूवात झाली. शेकडो माणसे बायांसह काम करत होती. भिक्षेच्या रूपात धान्य, पैसा गोळा करण्यात आला. अनेक महिने मंदिराचे बांधकाम व्हायला लागणार असल्याकारणाने समर्थांनी सर्व मजूरांच्या नाष्टा–जेवणाची सोय केलीच शिवाय गरीबांना वस्त्रेही पुरविली. औषधोपचाराची सोय केली. म्हणजेच समर्थांनी या गोरगरीबांची सेवा, त्यांचे श्रम फुकट घेतले नाहीत. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' देवस्थानातून लोकांचे संसारही उभे राहिले पाहिजेत ही दूरदृष्टी समर्थांकडे होती. जनतेचा पैसा जनतेला वाटून समर्थ सुध्दा आपली निःसृहता दाखवत होते. ''[१२३] त्याचवेळेस समर्थांनी अनेक शिष्यांना मसूर, शहापूर, उंब्रज, कऱ्हाड अशा सर्व प्रांतामध्ये असलेल्या इतर शिष्यांना निरोप देऊन बोलावून घेतले. गिरीगोसावी जे समर्थांच्या कार्यात राजकारण करण्यात खूप उपयुक्त झाले त्यांना कीर्तनसेवा करून द्रव्य मिळाले. याच काळात गिरीगोसावींनी शिवरायांकडे गडावर कीर्तन केले आणि सत्कारप्रीत्यर्थ जे तीनशे होन देणार होते ते त्यांनी चाफळ राममंदिर उभारणीसाठी द्यावे अशी विनंती केली.

चाफळच्या श्रीरामांच्या मूर्तीच्या बाबत एक विलक्षण घटना घडली. अंगापूरच्या कृष्णेच्या तीरावर स्नानसंध्या करीत असताना कृष्णेच्या डोहातून श्रीरामांनी समर्थांना आदेश दिला की या कृष्णेच्या डोहात त्यांच्या मूर्ती असून त्याचीच प्रतिष्ठापना चाफळच्या मंदिरात करावी. त्याप्रमाणे समर्थांनी पाण्यात उडी टाकली तर त्यांना खरोखरच राम, लक्ष्मण, सीतेची आणि महिषासुर्मदिनीची मूर्ती मिळाली. परंतु त्या चाफळला न्यायला लागल्यावर तेथील गावकऱ्यांनी समर्थांना खूप प्रतिकार केला आणि या आमच्या मूर्ती असून तुम्ही घेऊन जायच्या नाहीत असे बजावले म्हणून समर्थांनी या मूर्ती तिथेच ठेवल्या आणि चाफळला आले. समर्थ गेल्यानंतर त्या मूर्ती उचलायचा अंगापूरकरांनी आतोनात प्रयत्न केले तर त्या तसूभरही जागेवरून हलल्या नाहीत. शेवटी गावकऱ्यांना कळून चुकले की त्या मूर्तीची प्रतिष्ठापना चाफळलाच होणार हा ईश्वरी संकेत आहे. त्याप्रमाणे त्यांनी त्या सर्व मूर्ती समर्थांना सुपूर्द केल्या आणि मोठ्या समारंभपूर्वक, वाजतगाजत या श्रीराम, लक्ष्मण, जानकीचे आगमन चाफळला झाले. प्रसन्न, मंगलमय मुहूर्तावर त्यांची प्रतिष्ठापना झाली. देवीच्या मूर्तीची मात्र प्रतिष्ठापना तेथे न करता पुढे सज्जनगडावर केली तीच अंगलाई देवी.

असे हे चाफळचे श्रीराम मंदिर म्हणजे समर्थांच्या कार्याचे मुख्य केन्द्र. समर्थांचे खूप मोठे समाजकार्य चाफळ येथून घडले. त्यानंतर समर्थ जरी सतत चाफळला नसले तरी नरसो मल्लनाथ, प्राणजी देशमुख, नागोजीपंत कुलकर्णी, नागोजी भावे व नाणेघोलकर यांच्याकडे सर्व व्यवस्था सोपविली होती. समर्थांचे उत्कृष्ठ नियोजन, दूरदृष्टी, आचार संहिता आणि नियमावली यामुळे चाफळ केन्द्र एक यशस्वी केन्द्र झाले. समर्थांच्या आज्ञेप्रमाणे दरवर्षी सर्व मठाधिपती आपल्या मठाचा, कार्याचा वृत्तांत निवेदन करण्यास चाफळला येत.

समर्थांनी चाफळचे श्रीराम मंदिर उभे करे पर्यंत तेथून ते करवीर स्थानापर्यंत स्थापन केलेले मठ, त्यांचे मठाधिपती, बाकीचा सर्व शिष्य संप्रदाय अतिशय योग्य रीतीने आपले कार्य चोख करत होते आणि आपली भूमिका पार पाडत होते. आता समर्थांना प्रत्यक्ष शिवरायांकडे वळून काही वेगळी कर्तव्ये पार पाडायची होती.

### ४.४.४ समर्थांचे स्वप्न शिवराज्याभिषेक

समर्थांना आस लागली होती शिवरायांना भेटण्याची कारण त्यांच्या जीवनाचे सार्थक स्वधर्म, संस्थापना, स्वराज्य आणि स्वराज्याचे खंबीर नेतृत्व करणारा एक उत्तम पुरूष, एक जाणता राजा असावा हेच होते. समर्थ आणि शहाजीराजांच्या भेटीतच ठरलेले होते की हिंदवी स्वराज्याची स्थापना होईल आणि त्या सिंहासनावर त्यांचा पुत्र मोठ्या कर्तबगारीने बसेल, ते सिंहासन स्वकर्तृत्वावर सांभाळेल.

चाफळचे मंदिर स्थापन झाले तेव्हा समर्थांनी कृष्णातीरावर येऊन बराच कालावधी झाला होता आणि त्यांच्या कार्याची मुळे चांगली पक्की होत चालली होती. तसेच शिवराय पण एकीकडे स्वराज्याची बीजे रोवत होते आणि त्याची पाळेमुळे आता घट्ट रूजायला हवी होती, त्याच्या कष्टांचे फळ मिळण्याची वेळ जवळ येत होती. परंतु समर्थ योग्य वेळेची वाट बघत होते. स्वतःच्या कार्याची घडी जोपर्यंत पक्की बसत नाही तोपर्यंत शिवरायांना न भेटणे कदाचित त्यांना उचित वाटले असेल. समर्थांचे राजकारणातील धुरंधर शिष्य गिरी गोसावी राजगडावर जाऊन थडकले आणि ओघवत्या मधुर वाणीने समर्थांच्या आराध्य दैवत श्रीरामांच्या रामायणातील वालीवधाची कथा कीर्तनात सांगितली, यावेळी समोर होते स्वतः शिवराय आणि जिजाऊसाहेब. कीर्तनानंतर स्वतःचे गुरू समर्थ यांची संपूर्ण कहाणी अगदी सुरवातीपासून त्या क्षणापर्यंत सांगितली. जिजाऊसाहेबांच्या लक्षात आले शहाजीराजे ज्या स्वामींबद्दल बोलले आणि शिवरायांच्या ऐकण्यात आलेले हे स्वामी म्हणजेच 'समर्थ,' दोघेही खूप आनंदले. शिवरायांच्या मनात एक विचार त्वरीत घोंगावला. श्री. गो. नी. दांडेकर यासंदर्भात लिहितात,'' पहा ना! हां, आतां आमच्या ध्यानी आले की तिकडून आम्हांस कुमक कां येते आहे! ''[१२४] शिवरायांना खूप आनंद झाला, सत्कार प्रित्यर्थ त्यांनी जी बक्षिसी देऊ केली, ती दिवाकर गोसावींनी नम्रतेने चाफळ मंदिरासाठी द्यावी अशी विनंती केली.

दिवाकर गोसाव्यांनी राजगडापर्यंत मजल मारली याचा समर्थांना केवढा अभिमान वाटला. मोठ्या तन्मयतेने समर्थांनी गिरी गोसावींच्या तोंडून सर्व वृत्तांत ऐकला आणि कल्याण स्वामींकडून त्वरीत एक पत्र शिवरायांसाठी लिहून घेतले आणि ते पत्र घेऊन दिवाकर गोसावींना शिवरायांकडे धाडले. हे पत्र इतके सुंदर होते, अर्थपूर्ण होते आणि या पत्रामुळे समर्थ आणि

शिवरायातील अंतर दूर सरून त्यांची अपूर्व भेट होणार होती. स्वराज्य स्थापनेसाठी जन्मणारी दोन उत्तुंग, अद्वितीय व्यक्तीमत्वे एकत्र येऊन एक इतिहास घडवू पहात होती. कारण या संदर्भात श्री. शंकर अभ्यंकर लिहितात,'' शिवाजी महाराजांच्या या लोकोत्तर कामगिरीची दखल केवळ समर्थांनीच घेतली हे ही लक्षात घेण्यासारखे आहे. परमार्थांच्या वाटचालीसाठी स्वराज्य सत्ता प्रबळ असावी लागते. हे ईश्वरी कार्य शिवाजी महाराजांनी केले. ''[१२५] हे पत्र मिळताक्षणीच शिवराय समर्थांच्या भेटीला निघतात. त्या पत्राचा मजकूरही तेवढाच उंची गाठणारा होता यात शंकाच नाही.

शिवरायांनी प्रथम या पत्रावर पहिले डोकं टेकवून नमस्कार केला आणि मग वाचले. एवढा अर्थ भरलेला आशय वाचून शिवराय अत्यंत गहिवरले. स्वतःचे गुणगान ऐकूनसुध्दा यत्किंचितही कोणता गर्व वाटत नसलेल्या शिवरायांनी समर्थांचे मन त्वरित जाणले, त्यांच्या अपेक्षा समजून घेतल्या आणि आपल्याला त्वरीत समर्थांना भेटायची इच्छा दिवाकर गोसावींना बोलून दाखविली. हे पत्र म्हणजे शिवरायांचे सर्वात सुंदर वर्णन करणारे एकमेव असेल यात शंका नाही.

शिवराय समर्थांच्या भेटीला चाफळला त्वरित निघाले. एकीकडे शिवराय समर्थांच्या दर्शनाला अत्यंत आसुसले होते आणि दुसरीकडे समर्थ तर त्यांच्या लाडक्या शिवबाला कधी एकदा हृदयी कवटाळता येईल या क्षणाची वाट बघत होते. शिंगणवाडीच्या बागेत शिवराय अक्षरशः अनवाणी पायाने समर्थांसमोर ताटकळत उभे होते. समर्थ कल्याणांना काही सांगण्यामध्ये व्यग्र असल्याने त्यांचे शिवरायांकडे लक्ष जायला किंचित विलंब झाला. पण जेव्हा समर्थ उठले तेव्हा शिवरायांनी साष्टांग दंडवत घातला आणि समर्थांनी शिवरायांना आलिंगन दिले. केवळ अपूर्व भेट होती ती. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' शिवसमर्थ भेट म्हणजे आकाश आणि समुद्र यांची भेट, शिवसमर्थ भेट म्हणजे प्रचंड अग्नी आणि प्रचंड वादळ यांची भेट'' आध्यात्मीक प्रकाशाचा शीतल चंद्रमा समर्थ रामदास आणि क्षात्रतेजाचा प्रखर भास्कर छत्रपती शिवाजी. हे दोघे एकमेकांना भेटले ''[१२६] खरोखरीच या चंद्रमाने आणि भास्कराने अद्वितीय इतिहास घडविला होता.

शिवराय समर्थांच्या सहवासात काही काळ राहिले. त्या काळात शिवरायांचे आचरण अगदी इतर शिष्यांप्रमाणेच होते. समर्थांना याचा किती अभिमान वाटला असेल की एक भावी राजा आपल्याकडे आल्यावर किती नम्रपणे वागतोय, राहतोय. समर्थ आणि शिवरायांनी अनेक विषयांवर व्यापक चर्चा केली. धर्म, कर्तव्य, देशातील राजकीय–धार्मिक–सामाजिक स्थिती, अस्मानी–सुलतानी संकट, इथून पुढचे कार्य–नियोजन असे सर्व विषय दोघांनीही चर्चिले. याच वेळी शिवरायांनी समर्थांकडून अनुग्रह घेतला. जरी त्यांच्यात बऱ्याच विषयांवर सल्ल–मसलत झाली असली तरी शिवरायांनी नम्रपणे समर्थांकडे उपदेश मागितला. समर्थांनीही शिवरायांना राजधर्म, क्षात्रधर्म, सेवकधर्म, अध्यात्मसार, म्हैसमंगळू राजा, खबर्दार राजा, आणि राजकारणाची द्वारे याबद्दल अत्यंत महत्वाचा उपदेश केला. त्यातील 'राजधर्म' खूप महत्वाचा होता कारण तो एका भावी राजासाठी होता. एका स्वराज्य संस्थापकाला उद्देशून होता. तो राजधर्म असा आहे. श्री. अनंददास रामदासी यांनी 'श्रीदासायन' मध्ये नमूद केले आहे.
'' रायांनी करावे राजधर्म। क्षत्री करावे क्षात्रधर्म। ब्राह्मणी करावे स्वधर्म। नाना प्रकारे ।।१८।।
तुरंग शस्त्र आणि स्वार। पहिलाची पहावा विचार। निवडूनी जाता थोर थोर। शत्रू पळती।।१९।।
ऐसा प्रपंचाचा विवेक। स्वल्प बोललो काही येक। येका मनोगते स्वामी विवेक। असता बरे।।२०।।''[१२७]

शिवराय समर्थांना भेटल्यावर अगदी भारावून गेले होत. समर्थांची योग्यता त्यांनी जाणली. शिवराय समर्थांचा आशीर्वाद घेऊन निघाले, महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी, स्वधर्म–स्वराज्य संस्थापनेसाठी. पुढील सर्व कार्यात शिवरायांनी समर्थांशी सल्ला–मसलत तर केलीच शिवाय समर्थांनी हिरीरिने नियोजनपूर्वक शिवरायांच्या राजकारणात अप्रत्यक्ष जे कार्य केले ते अनमोल आहे याची सतत जाणीव ठेवली अशा या दोन्ही पुरूषांचे जन्म परमेश्वर नियोजित होते तेहि धर्मस्थापनेसाठी, दुर्जनांचा संहार करण्यासाठी.

समर्थांना लोकांसमोर आदर्श घालून देण्यासाठी दासबोध लेखन करायचे होते. त्यासाठी त्यांनी शिवथर घळ ही जागा नियोजित केली कारण लेखनासाठी हवा असलेली योग्य होती, शिवाय समर्थांना निसर्गसौंदर्याची अतोनात आवड असल्याने तेथिल डोंगर–धबधबा, त्यांना

भावला. शिवाय एकांत, योग्य हवा आणि भिक्षेसाठी थोडीफार जवळ असलेली काही उंबरठ्यांची घरे.

शिवथर घळीत समर्थ दासबोध लिहित असताना शिवरायांचे सेवक बाळाजी आवजी, निलोजी मुजूमदार हे समर्थांना शोधत तेथे आले अर्थातच वरती चंद्रराव मोरेंच्या वाड्यातही त्यांना राजकारण करण्यासाठी जायचे होते. त्यांची चर्चा काही अपयशी ठरल्याने समर्थ स्वतः जातीनिशी शिवराय आणि मोरेंचे वैर मिटविण्यासाठी वाड्यावर गेले आणि चंद्रराव एकत नाही म्हटल्यावर खडे बोल त्याला ऐकवले होते. त्याचवेळेस समर्थांनी बाळाजी आवजी आणि निळोजींना सेवाकाचा धर्म सांगितला.

समर्थांचे शिष्यही अगदी सावधपणे वावरायचे. समर्थांचे सर्व मठ उत्तमरीतीने कार्यरत रहायचे. राज्यातील बितंबातमी त्यांच्याकडे असायची कमालीची गुप्तता बाळगून संदेशवहनाचे काम खरंच कौतुकास्पद असायचे. अशीच एक कामगिरी अफझलखान विजापूहून निघाला असून वाईत जो ठाण मांडायला येणार आहे ही बातमी वाईजवळ असणाऱ्या कण्हेरी येथिल मठाधिपती वासुदेव गोसाव्यांना समजली. त्वरित त्यांनी समर्थांना एक सांकेतिक पत्र पाठवले. त्याचा मजकूर, श्री. अनंत रामदासी यांनी 'श्रीदासायन' मध्ये नमूद केला आहे.

'' **वि**वेके करावे कार्यसाधन। **जा**णार नरतनु हे जाणोन। **पु**ढील भविष्यार्थी मन। **र**होष्टोचि नये।।१।। **चा**लो नये असन्मार्गी। **स**त्यता बाणल्या अंगी। **र**घुवीर कृपा ते प्रसंगी। **दा**समहात्म्य वाढवी।।२।। **र**जनीनाथ आणि दिनकर। **नि**त्यनेमे करिती संचार। **घा**लिताती येरझार। **ला**विले भ्रमण जगदीशे।।३।। **आ**दिमाया मूळभवानी। **हे**चि जगाची स्वामिनी। **येकांती विवेक धरूनी इष्ट योजना करावी**।।४।। ''[१२८]

हे पत्र समर्थांनी ताबडतोब शिवरायांकडे पोहोचविले. खरं तर या काही ओळींवरून प्रथमतः हा आशय शिवरायांच्या लक्षात येत नव्हता. पण ही सांकेतिक भाषा आहे हे जाणले आणि त्याच्या अभ्यासू वृत्तीने अर्थ जाणला की 'विजापूरचा सरदार निघाला आहे.' या बाबतची अफझल भेटीबद्दल त्यांच्यात सल्लामसलत झाली होती. परंतु शिवरायांनी भावनेच्या भरात गाफील राहू नये म्हणून समर्थ त्यांना काळजी घेण्यासाठी काम फत्ते करण्यासाठी शिवरायांना उपदेश करतात.

समथाचे कौतुक कितीही करावे तेवढे थोडेच आहे. एका राक्षसाच्या भेटीस जाताना अखंड सावध राहून, प्रसंग पाहूनच धारिष्ट करावे, जरी तुळजाभवानीचा आशिर्वाद असला तरी हे काम विचार करूनच करावे. असा मोलाचा सल्ला समर्थांनी शिवरायांना दिला. याशिवाय शिवरायांचे आत्मबळ वाढावे म्हणून सुध्दा समर्थांनी त्यांना सूचना दिल्या, उदा. अगदी पाणी सुध्दा कोणते प्यावे. अर्थात काळजीपोटी कारण अफझलखान म्हणजे केवळ यमदूत आणि त्याला भेटायला चालले होते शिवराय स्वराज्याचा भावी राजा आणि त्यांचा लाडका शिवबा. त्यादिवशी प्रतापगडावर भेटीच्या दिवशी समर्थ इकडे कोकणकड्यावर उभे होते. तेही अगदी निश्चलपणे. त्यावेळी समर्थ छातीशी हात बांधून कामगिरी फत्ते झाल्यावर तोफांचा आवाज येईपर्यंत उभे होते. समर्थांना त्यांच्याच श्लोक आठवला,''समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।'

पुढील काळात शाहिस्तेखानवरील हल्ल्याची खबर समर्थांना वेळीच पोहोचली नाही तर समर्थ दिवाकर गोसावी आणि उध्दवस्वामींना रागावले होते. कारण तेव्हा समर्थ शिवथरघळ येथे दासबोध लिहित होते आणि बाकी इकडील जबाबदारी दिवाकर गोसावी, उद्धवस्वामी वगैरे मंडळींवर सोपविलाी होती. येथे पण शिवराय मृत्यूच्या दाढेतच गेले होते. समर्थांचे कर्तव्य यात दिसून येते की केवळ हरिकथानिरूपणात न अडकता बाहेर, राज्यात काय चालले आहे याची खबर घेतली पाहिजे.

मोंगलांशी म्हणजे औरंगजेबाशी तह करण्यास शिवराय आग्र्याला जाताना समर्थांचा आशीर्वाद घेऊन गेले. त्यावेळेसही समर्थांनी त्यांना सूचना दिल्या. शिवाराय अग्र्याहून सुटल्यावर जवळ जवळ तीन – सव्वातीन महिन्यांनी राजगडावर पोहोचले. या संपूर्ण प्रवासात शिवराय समर्थांच्या मठाच्या आणि शिष्यांच्या आधारानेच सुखरूपपणे पोहोचले. हा एवढा काळ किती कमालीची गुप्तता राखली गेली याचे कौतुक आहे. कोणत्याही मठातून, शिष्याकडून ही बातमी फुटली नाही. शिवरायला अग्र्यात जायला निघून येईपर्यंतचा काळ जवळजवळ नऊ महिन्यांचा होता. परंतु महाराष्ट्रातील कारभार व्यवस्थितपणे चालला होता. त्याकाळातील समर्थांची सामाजिक भूमिका लक्षणीय होती.

त्यावेळी समर्थ शिवथरघळीतून चाफळला आले आणि सर्व शिष्यांना त्यांनी बोलावून घेतले. समर्थ म्हणतात शिवराय तिकडे आग्र्यास कैदेत आहेत. इकडे राज्याची धुरा सांभाळायला आपण तत्पर पाहिजे, काळ आला आहे, त्यास तोंड देऊन परतवून लावण्यासाठी आपले मठ सोडा, बाहेर पडा, लोकांना आधार द्या. या संदर्भात श्री. गो. नी. दांडेकर लिहितात,'' आरतीच्या क्षणी वाजवायचे शंख आणि घंटा खुंट्यांवर टांगून ठेवा आणि बाहेर पडा! तुम्हां सर्वांस काळाचे आवताण आलेले आहे. त्याची हांक आहे. तीस प्रतिसाद देईल तो खरा. उगामुगा ती नाइकेल तो खोटा. तेव्हा जनांस अभय देत हिंडा. अवघा देश यवनाक्रांत झाला आहे. सर्वत्र संचार होऊ द्या.'' म्हणा,धीर्धरा धीर्धरा तकवा। हडबडूं गडबडू नका। ''[१२९]

समर्थांनी काय नुसतां आपल्या शिष्यांना सल्ला दिला नाही तर स्वतः ते वणवण हिंडले. स्वतःच्या तब्बेतीची तमा न बाळगता, तेही स्वराज्यासाठी. एक दक्ष प्रजापतीच्या प्रजेच्या रक्षणासाठी धीर देण्यासाठी. कारण तहामुळे स्वराज्यात जेमतेम काहीच किल्ले राहिले होते आणि रयतेला पुन्हा एकदा मोंगलाईला तोंड द्यावे लागले होते. समर्थांनी कीर्तन–प्रवचनातून समजाला दिलासा द्यायला सुरूवात केली. समर्थ सांगत होते, खचू नका, धीर सोडू नका, श्रीरामावर भरवसा ठेवा, तो परीक्षा पहात आहे, त्याच्या कसोटीस उतरा अशा रीतीने समर्थांनी लोकांना निर्भय बनण्यासाठी अव्हान केले. राजगडावर समर्थ जिजाऊसाहेबांनाही भेटून आले, गडाची व्यवस्था पाहिली त्यांनाही धीर दिला. शिवराय उत्तरेतून राजगडावर पोहोचले सर्वत्र आनंदी आनंद झाला. जनतेच्या जीवात जीव आला.

**शिवराज्याभिषेक**

आग्र्याहून परतल्यावर शिवरायांनी पुन्हा एकदा गेलेले वैभव परत आणले. समर्थांची आता इच्छा होती की स्वराज्याच्या सिंहासनावर शिवरायांनी आरूढ व्हावे. या स्वराज्याला सिंहासनाधिष्ठित राजा हवा तेव्हा शिवरायांनी स्वतःला राज्याभिषेक करून घ्यावा. तो सोहळा होण्याची अगतिकता शिवरायांपेक्षा समर्थांना जास्त होती. त्याप्रमाणे शिवराय छत्रपती झाले. सिंहासनावर आरूढ झाले. राज्याभिषेकाच्या सोहळ्याने डोळ्याचे पारणे फिटत होते. परंतु समर्थ या सोहळ्याला उपस्थित राहिले नाहीत याचे कारण समर्थांचे मन किती विचारी होते याची कल्पना येते. शिवरायांना आपल्यासमोर, म्हणजे गुरूंसमोर राजचिन्हे धारण करायला

संकोच होईल. समर्थांनी दिवाकर गोसावींना राज्याभिषेकाच्या समारंभाला पाठवले होते, दिवाकर गोसावींनी परत आल्यावर जो वृत्तांत समर्थांना दिला, त्याने समर्थांचे मन खूप आनंदले, तृप्त झाले, अनेक वर्षे उराशी बाळगलेले स्वप्न पुरे झाले होते. शहाजीराजांना दिलेल्या शब्दाची पूर्तता झाली होती. समर्थांचा लाडका शिवबा आता राजा झाला, छत्रपती झाला. समाधानाने, हर्षाने समर्थांचा ऊर भरून आला. समर्थांचे आनंदवनभुवनाचे स्वप्न सत्यात उतरले. समर्थांच्या मुखातून शब्द बाहेर पडले,! स्वप्नी जे देखिले। ते ते तैसेचि होतसे। ......... आनंदवनभुवनी

'आनंदवनभुवन' समर्थांच्या मनात होते, श्वासात होते. ते स्वराज्य, ती स्वधर्म संस्थापना, तो जाणता राजा ही ज्याने उत्तम पुरूषाची व्याख्या सार्थ करून दाखविली ते सगळे समर्थांच्या नजरेसमोर सतत येत राहिले आणि समर्थांच्या कार्याला यशाची झालर लागली.

### ४.४.५ समर्थांच्या कार्याची चतुःसूत्री

समर्थांनी समाजकारण, राजकारण याचा व्याप करण्यासाठी स्वराज्य – एक जाणता राजा यासाठी चार महत्त्वाची साधने अथवा मार्ग काढले. समर्थांच्या सामाजिक कार्यात, भूमिकेत या चार प्रकारच्या कार्याचे स्थान खूप मोठे आणि तेवढेच महत्वाचे आहे. कारण या चार साधनांनीच समर्थ समाजाच्या तळाशी तर गेलेच शिवाय सर्व समाजाला, गढूळ झालेल्या सामाजिक स्थितीला अगदी ढवळून टाकले. प्रत्येक माणसाच्या अंतरंगापर्यंत पोहोचून अपेक्षित बदल घडवून आणले. हा कार्यक्रम कसा होता? दासबोध ग्रंथात राजकारण निरूपण या समासात समर्थांनी तो सांगितला आहे. या समासात.

'' मुख्य कथा निरूपण। दुसरे ते राजकारण। तिसरे ते सावधपण। सर्वविषई।।४।। चौथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आक्षेप। अन्याय थोर अथवा अल्प। क्षमाकरीत जावे।।५।। ''[१३०]

लोकहितासाठी पहिली मुख्य गोष्ट हरिकथा निरूपण करणे, दुसरी राजकारण करणे (समाजाचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी) समाजधुरीणांनी व राजकीय पुरूषांनी करण्याच्या सर्व गोष्टी, तिसरी सर्व गोष्टींविषयी सावधपणा ठेवणे. चौथा उपाय (साक्षेप) अतिशय उद्योगी असणे, नाना प्रकारच्या शंका दूर कराव्या, अन्याय लहान असो वा मोठा असो, क्षमा करीत जावी. समर्थ म्हणतात या चार गुणांशिवाय लोककल्याण साधले जात नाही. ज्याला हे उद्योग

(कार्य) करायचे आहेत. त्याच्याजवळ हे चारही गुण अत्यंत आवश्यक आहेत. तत्कालीन काळात समर्थांनी या चार सूत्रांवरच कार्य केले आहे.

त्या काळात लोकांचे अंतःकरण बदलण्याचे महत्वाचे काम पहिले करायचे होते. आत्मज्ञान प्राप्त करण्याची गरज पहिली होती. आणि ती भक्तीमार्गाने साध्य करायची होती. मुळातच दासबोध ग्रंथाचा आशयच हा आहे की भक्तीच्या योगाने मनुष्यांना देवाची प्राप्ती निश्चितपणे होते. आपल्या संप्रदायाची, कार्याची चतुःसूत्रीमध्ये हरिकथा निरूपणाला समर्थांनी मुख्य स्थान दिले आहे.

### मुख्य हरिकथा निरूपण

समर्थांना लोकांच्या उपासनेची पद्धत बदलायची होती. कारण त्यावेळी अनेक पंथ, उपासना, उपास्यदैवते प्रचलित होती. परंतु ती अंधश्रध्देला महत्व देणार होती. म्हणून समर्थांनी श्रीरामचंद्रासारखे सर्वगुणसंपन्न, सगुणसाकार असे आराध्य दैवत समाजासमोर ठेवले. त्याचीच स्तुती करणे आणि अद्वैतावर चर्चा करणे म्हणजेच हरिकथा निरूपण. श्रीरामचंद्र म्हणजे अर्थातच श्रीरामपंचायतन, श्रीराम, सीतामाई, लक्ष्मण, हनुमंत. श्रीरामचंद्र मर्यादापुरुषोत्तम होते, एकबाणी, एकवचनी, सज्जन साधूसंतांचे रक्षण करण्यासाठी नेहमीच तत्पर होते, ज्यांनी प्रजेचे हित सर्वोच्च स्थानी मांडले असे आदर्श राजे होते. म्हणून समर्थांनी मूर्तीपूजेला आपल्या कार्यात महत्त्वाचे स्थान दिले. समर्थ म्हणतात ही सगुण साकाराची उपासना करताना पूर्णपणे तल्लीन व्हायला हवे कारण अंतःकरणापासून केलेली पूजा शुध्द वागणूकीने केली तर ती परमेश्वरापर्यंत पोहोचते. एकदा का शुध्द अंतःकरणाने पूजेने उपासना केली की आपोआपच त्या व्यक्तीचे चारित्र्याचे शुध्द होते. समर्थांनी भक्तीचे एकूण नऊ प्रकार सांगितले. हे प्रकार आध्यात्मिकता समोर ठेवून सांगितले तरीही त्याला एक सामाजिक व्यापकता दिली.

### नवविधा भक्ती

समर्थ म्हणतात,'सर्व काही ऐकावे, परंतु त्यातले सार शोधून असार असेल ते टाकून देता आले पाहिजे असे श्रवण करून त्यातले सार जाणणे हीच श्रवणभक्ती. सर्व प्रकारच्या विद्या, शास्त्रे, विविध कलांचे सुध्दा श्रवण करा असे समर्थांनी सांगितले. या संदर्भात डॉ. शं. दा.

पेंडसे लिहितात,'' त्यांचे मठ म्हणजे विद्यापीठे व्हावी, नाना तऱ्हेच्या हस्तलिखित ग्रंथांचा सग्रह तेथे असावा, बुद्धिमान विद्यार्थ्यांनी त्यांचा अभ्यास करावा व मिळवलेल्या ज्ञानाचा सर्वत्र प्रसार करून 'शहाणे करून सोडावे। सकल जन। अशी त्यांची इच्छा होती. विविध शास्त्रांचे अध्यपन म्हणजे भक्तीचाच एक प्रकार असे त्यांचे मत होते. ''[१३१] समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन म्हणजे कीर्तन. अजूनही सध्याच्या काळात कीर्तनाला महत्त्व आहे. अनेक सामाजिक विषय कीर्तनातून स्पर्शिले जातात. कीर्तनातून भक्ती, ज्ञान, वैराग्य यांची लक्षणे सांगावीत. नीतीन्याय आणि स्वधर्माचे रक्षण कसे करावे हे सांगून साधनमार्ग आणि अध्यात्मनिरूपण स्पष्ट करावे. कीर्तनाने माणसातील दोष जातात. भगवंताची प्राप्ती होते, वाणी शुध्द होते, तर प्राणिमात्र सुशील होतो.

रामनाम, हरीनामाला म्हणजेच नामस्मरणाचे भक्तीमार्गात अन्यन्यसाधारण महत्व आहे. समर्थ म्हणतात, नामस्मरण करण्यात काही असे काळाचे सकाळ, दुपार, रात्र बंधन नाही, अखंड नामस्मरण घेता येते. सुखात, दुःखात नामस्मरणाचा विसर पडू नये. नामस्मरणाने मनाला मिळणारी शांती सर्वात मोठी असते. या संदर्भात सौ. कुमुदिनी देशपांडे म्हणतात,'' त्यांच्या काळात सर्वार्थांने दुबळा झालेल्या माणसाला काहीतरी अश्वासक आश्रयाची फार गरज होती. ''[१३२] केवळ परमेश्वराच्या नामाने सर्व संकटे, विघ्ने नाहीशी होतात आणि उत्तम पदे प्राप्त होतात.

सद्‌गुरूचरणांची सेवा म्हणजेच पादसेवन भक्ती. ती सुध्दा काया–वाचा–मनाने मोक्षप्राप्ती साठी सद्‌गुरूची चरणसेवा करणे. गुरू म्हणजे कसाही कोणताही गुरू चालत नाही असे समर्थ सांगतात. ज्या गुरूमुळे समाज सन्मार्गाला न जाता वाममार्गाला जातो असा गुरू नसावा.

अर्चन म्हणजे पूजा, आपल्या उपास्यदेवतेची पूजा करणे, आपणास प्रिय असेल ते भगवंताला मनोभावे अर्पण करणे, सर्वसाधारणपणे नैवेद्य, फळे, विविध अलंकार देवाला अर्पण केले जातात. परंतु मंदिरे बांधणे, मंदिराभोवती बागा, मठ, मंडप, धर्मशाळा, वापी, कुप, राजांगणे, वृदांवने निर्माण करून ती देवाला अर्पण करावीत. समर्थांनी या अशा प्रकारच्या अर्चनभक्तीला महत्व दिले कारण तत्कालीन परिस्थितीत यवन हिंदूच्या मंदिराचा नाश करत होते. म्हणून विविध मंदिरे बांधून हिंदूची अस्मिता जागृत होईल असा समर्थांचा विश्वास होता.

समर्थ म्हणतात, देव साधू, संत, सज्ञन यांना नमस्कार करणे ही वंदनभक्ती. नमस्कारामुळे अंगी लीनता येते, विकल्प माडतो. सज्ञन, साधू संतांशी जवळीक साधता येऊन दोष जातात, अन्यायांची क्षमा होते, गुरू साधकावर प्रसन्न होतो. दास्यभक्ती ही अर्चनाभक्ती सारखीच आहे. देवाचे दास्य करण्याकरिता, देवद्वारी सदा सन्निध असावे, पडेल ते कार्य करावे देवाचे ऐश्वर्य सांभाळावे. जयंत्या, पर्व, महोत्सव साजरे करावे. समर्थ म्हणतात, अतिथिंचे यथोचित आतिथ्य ही सुध्दा भक्तीच आहे. समर्थ म्हणतात, देवाशी इतके सख्य करावे की त्याला प्रेमाने, प्रीतीने बांधून टाकावे. त्याच्याशी एवढी जवळीक साधावी की त्यालाच आपली चिंता लागली पाहिजे. तो कृपेचा सागर आहे, त्यामुळे अनन्यभक्ती करणाऱ्या भक्ताला तो कधी विसरत नाही.

भक्ताने देवात पूर्णपणे विलिन होणे गरजेचे आहे, समर्थ म्हणतात, आदिअंती (सर्वत्र) एक आत्माच आनंदरूप आहे आणि 'अहं आत्मा' मी तो आत्मा असे श्रुतिवाक्य आहे. मग त्या ठिकाणी वेगळा 'मी' कोठे राहिला? जीव व शिव ह्यांची आणि आधि काढून टाकली तर जीव कोठचा व शिव कोठचा बुध्दी स्वरूपामध्ये स्थिर झाल्यावर 'आपण' कोठचा? हीच 'आत्मनिवेदन भक्ती.'

भक्तीमार्गात समर्थांनी रामोपासना तर सांगितलीच शिवाय मारूतीची आणि शक्तीची उपासनाही महत्त्वाची सांगितली आहे. समर्थांना जसे श्रीरामचंद्राचे आदर्श गुण समाजापुढे ठेवायचे होते तसेच हनुमंताचे गुणही ठेवायचे होते कारण हनुमंत हा शूर, धाडसी, पराक्रमी होता. त्याला कसले भयच नव्हते, त्याचे बळ विराट होते, अगदी बाळपणीच तो सूर्याला गिळायला गेला तर मोठेपणी त्याने किती पराक्रम गाजविला असेल. दुष्टांचा संहार केला. राम–रावण युध्दात हनुमंतांची भूमिका, कार्य, शौर्य अनन्यसाधारण होते. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत समर्थांना अशा हनुमंताचे गुण समाजात असणे, लोकांमध्ये येणे अपेक्षित होते. अशा या भीमरूपी महारूद्र हनुमंताला त्याच्याच सारखे बळ समाजहितासाठी मागतात. त्याच्यासारखी सुदृढ, बलवान शरीरसंपत्ती ते मागतात.

समर्थांना काय वाटत असे? सौ. कुमुदिनी देशपांडे या संदर्भात लिहितात,'' त्यांना मनोमनी वाटे की मारूती जसा अन्यायाविरूध्द व दुष्ट प्रवृत्ती विरूध्द खवळून उठला तसेच तत्कालिन जुलमी राजवटीविरूध्द लोकांनी खवळून उठावे. ''[१३३]

शक्ती उपासनेत श्रीराम आणि हनुमंताच्या शक्तीलाच मानतात. युक्तीला शक्तीची जोड हवीच. समर्थांनी तुळजाभवानी स्तोत्राची रचना तेवढ्यासाठीच केली आहे. समर्थांनी शक्ती उपासना म्हणजे प्रत्यक्ष आदिशक्तीची उपासना सांगितली आहे. समर्थांनी शक्ती उपासनेची देवता ही तुळजाभवानी होती, त्यांची ती कुलस्वामीनी होती तरी शक्तीची देवता होती. तिने अनेक राक्षसांचा संहार केला होता. छत्रपती शिवरायांची कुलस्वामीनी पण तुळजाभवानीच होती. समर्थांनी म्हणूनच विश्वासाने तुळजाभवानीला प्रार्थना केली की,' समाजाचे दुःख, दारिद्य, पीडा हरण कर. '

## दुसरे ते राजकारण

समर्थांना अभिप्रेत असलेले राजकारण हे अप्रत्यक्ष राजकारण आहे. राजा जो राजकारण करतो त्याला अप्रत्यक्षपणे किंवा त्याचे राजकारण सुरळीत होण्यासाठी किंवा तशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी सहाय्य करणे. समर्थ, समर्थांचे महंत, शिष्य हे ही राजकारणच करतात पण अप्रत्यक्षपणे. या संदर्भात सौ. कुमुदिनी देशपांडे लिहितात,'' प्रत्यक्ष स्वराज्य संस्थेच्या कार्यात गुंतलेल्या लोकांचे हात बळकट करणे, लोकांना त्या कार्यास अनुकूल करणे, प्रापंचिकांना ही देशातील उलाढालींचे ज्ञान देणे, हे ह्या लोकसंग्रही कार्यकर्ताचे राजकारण''[१३४] समर्थ म्हणतात स्वराज्याच्या कारभारात अनेक प्रकारचे कार्य पार पाडले जाते. कधी ते अवघड असते, अर्थात त्यांना प्रत्यक्ष राजकारण करायचे असून समाजाशी निगडीत असते. जर समजानेही व्यवस्थित सहकार्य केले तर राज्यकारभाराचे कार्यही सुरळीत चालते म्हणूनच समाजाला तसे प्रवृत्त करण्याचे काम महंत करतात आणि तेही 'आधि केले मग सांगितले' या तत्वाला अनुसरूनच. धर्मरक्षणाचे कार्य करणाऱ्या राजाला अप्रत्यक्ष राजकारणाची मदत जरी संप्रदाय करीत असला तरी मुख्य आत्मोध्दार साधणे या क्रियेला मात्र सोडायचे नव्हते. धर्मरक्षण हे खूप महत्त्वाचे असल्याने धर्माला डावलणारा अधर्माला खतपाणी घालेल असा सांप्रदायिक समर्थांना अभिप्रेत नव्हता, स्वधर्म पाळला जाण्यासाठी तत्पर असलेलाच सांप्रदायिक

समर्थांना अभिप्रेत आहे. समर्थ आपल्या शिष्यांना कार्य करायला सांगत. ते त्याच्या गुणांनुसारच. उदा. दिवाकर गोसावी हे अत्यंत बुध्दीवंत होते आणि प्रत्यक्ष राजकारणाशी  निगडीत असलेले कार्य बुध्दी चातुर्याने पार पाडायचे. समर्थांनी छत्रपतींकडे पाठविलेला पहिला शिष्य–महंत म्हणजे दिवाकर गोसावी.

समर्थ दासबोधात त्यांच्या महंताना राजकारण हे अचूक करायला सांगतात, चोख वागायला सांगतात. म्हणजेच परमार्थ विवरण, सावधपणाचे राजकारण आणि चोख वर्तन हे आवश्यक गुण आहेत. राजकारण कितीही केले तरी त्यात गुप्तता बाळगावी कोणाला कळू देऊ नये. एकतर महाराष्ट्र एवढासा राहिलेला आणि त्यात बरेचसे लोक राजकारणात एवढे गुंतले आहेत की त्यांना जेवायला–खायला वेळ मिळेनासा होतो. इतकी कामे त्यांना असतात. समर्थांचा महंत लोकांमध्ये एकोपा ठेवतो, ऐक्य राखतो आणि लोकांना राजकारणी लावतो. हरिकथांचे निरूपण करणाऱ्यांनी राजकारणाची माहिती लोकांना करून द्यायला हवी. तेव्हा राज्यात बंड माजले होते, ते मोडून काढण्याकरीता राजकारण आवश्यक होते.

राजधर्म सांगताना समर्थांचा राजा हा जाणता असला पाहिजे. तो सामर्थ्यवान असायला हवा. त्याच्याकडे शक्ती–युक्ती दोन्हीही ताकदीच्या हव्या. प्रसंगाप्रमाणे त्याचे निर्णय हवेत, कधी आक्रमकता गरजेची असते तर कधी माघार. पण कोणत्या परिस्थितीत कोणता निर्णय घ्यावा हे ओळखण्याचे चातुर्य त्याच्यात हवे. समाजाच्या प्रगतीवर त्याचे लक्ष केन्द्रित हवे. सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन या तत्वाला तो धरूनच असणारा हवा. त्याला युध्दाचा निर्णय घेता यायला हवा. राजाने राज्य आपले नाही, जनतेचे आहे, त्याचा सांभाळ मात्र आपणाला करायचा आहे हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे. राजाचा सेवकवर्गसुध्दा कर्तृत्ववानच हवा. कारण त्यांच्या संघटित शक्तीमुळे राज्यकारभार व्यवस्थित चालतो. तरीसुध्दा त्यांच्यावर कारभार सोपवून राजाने अगदी निश्चिंत राहू नये, त्यांच्यावर लक्ष ठेवावे, तसेच सेवकांनीही आपला सेवकधर्म नीट पार पाडावा. समर्थांना राजा म्हणजे छत्रपतींसारखा आणि सेवक म्हणजे छत्रपतींच्या सेवकांसारखे अभिप्रेत होते.

समर्थांच्या महंतांचे अप्रत्यक्ष राजकारण हे वाखाणण्यासारखे होते. शिवरायांच्या स्वराज्यनिर्मितीचा प्रयत्न यशस्वी करायचा असेल तर तत्कालीन परिस्थितीत समाजात सर्वदूर

त्याला अनुकूल असे वातावरण तयार करायला महंतांकडून तसेच कार्य पार पाडण्याची आवश्यकता होती. कारण तत्कालिन समाजाची मनःस्थिती फारच नाजूक होती, लोकांचा आत्मविश्वास हरवला होता, भविष्यात त्यांना अंधार दिसत होता. अशा वेळी समर्थांच्या महंताला लोकांमधे आत्मविश्वास परत आणायचा होता. या पारतंत्र्यामुळेच आपलेच सर्वस्व हरवला आहे, भविष्यात अंधार दिसतो आहे याची जाणीव करून द्यायची होती, त्यामुळे समाजाला जागे करायचे होते. परकीयांना आापल्या राज्यातून घालविण्यासाठी तयार व्हा, सज्ञ रहा, आक्रमक व्हा, असा संदेश द्यायचा होता. अर्थात हे कार्य गुप्ततेने करावयाचे होते म्हणून महंत समाजात हरिकथा सांगून गुप्तपणे समाजप्रबोधन करीत. समर्थ म्हणतात, महंताने नुसते वर्तमानात राहून नाही चालणार. पुढे घडणाऱ्या गोष्टी आधी कळायला हव्या. त्यावर सावधतेने तर्क बांधता आले पाहिजेत. त्या पुन्हा पुन्हा नीट जाणून घेता आल्या पाहिजेत. म्हणजेच समर्थांच्या महंताला हरिकथा निरूपण एवढेच राजकारणही करायचे आहे. ही कसरत असल्याने त्याकडे ते गुण हवेत.

अशा रीतीने समर्थांनी धर्मकारण करताना त्याला राजकारणाचीही जोड अत्यंत विचाराने आणि चातुर्याने दिली.

## तिसरे ते सावधपण

समर्थांनी जे 'सावधपण' सांगितले आहे ते सर्व बाबतीत आणि सर्वांसाठीच सांगितले आहे. आपल्या दैनंदिन जीवनात सुध्दा सावधानतेने वावरले पाहिजे नाही तर एखादे शेंबडे पोरही आपल्याला फसवू शकते. समर्थ सांगतात, उदरनिर्वाहासाठी जो आपण उद्योगधंदा करतो तोही दक्षतेने केला पाहिजे.

प्रपंच करणाऱ्या माणसाने प्रपंच आधी नीट केला पाहिजे, म्हणजे प्रपंचातील जबाबदाऱ्या नीट पार पाडल्या पाहिजेत. प्रपंच सावधपणे करावा तोही अनासक्त राहून. म्हणजे हीच सावधानता परमार्थ करताना पण उपयोगी पडेल. परिस्थिती समजून, भविष्याचा अंदाज घेऊन वागावे. जर सावधपणा असेल तर कोणतेही संकट अचानक पुढे येऊन उभे ठाकले तरी त्याचा सामना करणे सोपे जाते. यासाठी समर्थ श्रीरामांना विनवतात,' सावधपण मज दे रे राम!' प्रापंचिकांने प्रपंच परमार्थ समन्वय अतिशय हुषारीने आणि सावधपणे साधला पाहिजे.

समर्थांनी सामाजिक जीवनातसुध्दा सावधानतेचे महत्व सांगितले आहे. वैयक्तिक जीवनात सावध रहाणाऱ्या माणसाला सामाजिक जीवनात सुध्दा सावधानता बाळगता आली पाहिजे. तत्कालीन काळात सामाजिक जीवन विस्कळीत झाले होते. त्यामुळे सावधपणाची गरज जास्त होती. समर्थांचे सामाजिक कार्य महत्त्वाचे तसेच नीट साधण्याचेच होते. त्यामुळे जरासाही हलगर्जीपणा, बेसावधपणा चालणार नव्हता. समर्थांच्या महंतांना–शिष्यांना सावधानता अपरिहार्य होती.

सर्वसाधारण माणसाप्रमाणेच राजासुध्दा चोवीस तास दक्ष, सावधच असायला हवा. कारण त्याला शत्रूपासून नेहमीच धोका असतो. त्याच्या चुकीची शिक्षा सर्व जनतेला भोगायला लागते. समर्थ म्हणतात, दूरदर्शीपणा असावा, अखंडपणे विचार करत रहावा आणि पुढे म्हणजे भविष्यात काय काय होणार आहे याचे अनुमान करून ठेवावे. जर अंगात सावधपणा असेल तर आपला–परका चटकन ओळखता येतो, आपले हित–अहित कशात आहे हे चांगले समजते. छत्रपती शिवरायांचा सावधपणा विलक्षण होता. त्याच्या अखंड सावधानतेमुळेच ते आग्र्याहून सुखरूप परत आले, अफझलखानासारख्या दुष्टाचा युक्तीने संहार केला. या शिवाय अनेक संकटातून छत्रपती सहीसलामत बाहेर पडले आहेत. त्यांच्या दक्षतेमुळे प्रजाही निर्भयपणे राहात होती.

समर्थ आपल्या महंताना सांगतात की हरिकथा निरूपण करताना राजकारण करता आले पाहिजे आणि ते राजकारण साधताना अतिशय जागरूक आणि सावध राहिले पाहिजे. आपल्या ईप्सिताकडे जाताना, एखादे साध्य साधताना सर्वत्र चौफेर नजर ठेवून सावध राहूनच मार्ग चालावा. अनेक संकटे, अडथळे येतील असे धरून चालले तर आपोआपच अंगात दक्षता येते. छत्रपती सुध्दा संभाव्य अडचणी, संकटे आधीच विचारात घ्यायचे, आणि तसाच निर्णय घेत जायचे त्यामुळे सावधपणानेच ते नेहमी आपले साध्य गाठायचे. म्हणून समर्थ म्हणतात, व्यक्तीगत जीवन असो वा सामाजिक क्षेत्र असो, अखंड सावधानता बाळगणे अतिशय गरजेचे आहे.

समर्थांना जे राजकारण करायचे होते ते अप्रत्यक्षच करायचे होते. त्यामुळे अप्रत्यक्ष राजकारण करतानाही सावधानता बाळगणे हे ही खूप आवश्यकच होते.

**चौथा अत्यंत साक्षेप**

समर्थांनी 'साक्षेप' या शब्दाचे अत्यंत व्यापक रूप स्पष्ट केले आहे. साक्षेप म्हणजे प्रयत्न. प्रयत्नशीलता पण समर्थ म्हणतात अर्थातच हा प्रयत्न म्हणजे ज्या कामासाठी हा प्रयत्न करत आहे ते अत्यंत लक्षपूर्वक, मनापासून अर्थात कळकळीने, न कंटाळता करणे. कोणतेही काम असो, कोणत्याही क्षेत्रातील म्हणजेच सामाजिक, राजकीय, पारमार्थिक, प्रापंचिक यात यशस्वी व्हायचे असेल तर साक्षेप हवा. त्यात, आळशीपणा नसावा, समर्थांना आळसाचा अतिशय तिटकारा होता. समर्थ स्वतःच सतत उद्योगशीलतेचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. पुरःश्चरणाच्या काळात त्यांचे वय असे किती होते? पण त्या बारा बर्षात ब्राह्ममुहूर्तावर उठून तपश्चर्येला सुरूवात करायचे. त्यात कधी खंड पडला नाही. त्यांनी आळसाला स्वतःच्या जवळही कधी फिरकू दिले नाही.

आळसामुळे फजिती होऊ शकते. आळस आपल्या प्रयत्नशीलतेलाच बुडवतो. आळसामुळे निरूत्साह येतो आणि करंटपणाची चिन्हे, खुणा दिसायला लागतात. समर्थांच्या महंताच्या कार्यात कुठे आळसाला जागाच नव्हती. तत्कलीन परिस्थितीत समर्थांना जी संघटित शक्ती निर्माण करायची होती, त्याला शर्थीचे प्रयत्न आवश्यक होते, जिद्द हवी होती, मनोबल हवे होते. अर्थातच त्याला कळवळीची, नीट लक्ष घालण्याची जरुरी होती. कोणत्याही कार्यपूर्ततेसाठी समर्थांना परमेश्वराला साक़डे घालणे कधीच पटले नाही. त्यांचा प्रयत्नवादावर ठाम विशवास होता. जर का योग्य रीतीने प्रयत्न केले तर यश हे हमखास मिळतेच यावर त्यांचा विश्वास होता. त्यावेळी समाजात आळशी, कोणतीही कृतीशिलता नसलेली लोक खूप होते. त्यामुळे समर्थ शिष्यांनी प्रयत्नपूर्वक त्यांच्यात कार्यशीलता आणली होती. शिवाय त्या काळात लोक प्रारब्धावर अनेक गोष्टी सोडून द्यायचे. समर्थांना ते बिलकूल मान्य नव्हते. नशीबात असेल तर होईल या वाक्याची त्यांना प्रचंड चीड होती. समाजस्थिती बदलण्याची तेव्हा जी गरज होती त्यासाठी प्रयत्नवादच महत्त्वाचा ठरणार होता. तिथे प्रारब्धाला महत्त्व देणे समर्थांना मान्यच नव्हते. समर्थ म्हणतात, केवळ प्रयत्नांनी हवी ती गोष्ट मिळवता येते आणि नको ती गोष्ट दूर सारता येते. समर्थांच्या साक्षेपाला विवेक, सावधानता, वैराग्यवृत्ती आणि आशावाद यांचीही जोड होती.

अशी ही समर्थांची सामाजिक भूमिका कौतुस्कापद होतीच आणि त्यांनी केलेले समाजकार्य केवळ अद्वितीय होते, उत्तुंग होते. स्वधर्म–संस्थापनेची जबाबदारी त्यांनी चोख पार पाडली. स्वराज्य निर्मितीच्या कार्याला तर त्यांनी अप्रत्यक्षपणे वाहूनच घेतले होते. छत्रपतींच्या पाठी समर्थ सावलीप्रमाणे उभे राहिले आहेत. त्यामुळेच त्यांचे हे सामाजिककार्य उल्लेखनीयच होते.

## ४.५ समर्थ रामदासांचे महंत आणि मठनिर्मिती

समर्थांना सामाजिक परिस्थितीत मोठा बदल घडवून आणायचा होता. स्वधर्म संस्थापना आणि स्वराज्यनिर्मित हे त्यांचे स्वप्न होते, किंबहुना त्यांच्या जीवनाचा उद्देशच तो होता. अर्थात हा समजात करावयाचा बदल हे एक आवाहानात्मक कार्य होते, त्यामुळे समर्थांचे सर्व आडाखे, नियोजन हे सर्व सामाजिक पातळीवरच ठरत होते. ही सामाजिक चळवळ उभी करण्याकरीता समर्थांनी महंत आणि मठनिर्मिती करावयाची ठरविली. मठातून होणाऱ्या प्रबोधनामुळे लोकांमध्ये धर्माभिमान निर्माण होईल याची समर्थांना खात्री होती. यासाठी प्रत्येक मठाला अध्यात्मिक आणि सामाजिक बैठक असणे, हा त्यामागचा समर्थांचा विचार होता. समाजकार्याची धुरा सांभाळण्यासाठी अध्यात्म आणि समाजप्रबोधनाचे केंद्र म्हणून हे मठ निर्मिती करून समाजात मोठा बदल घडवून आणण्याचा समर्थांचा हेतू होता.

### ४.५.१ समर्थ रामदासांचे महंत

समर्थांनी ज्या समाजकार्याचे व्रत घेतले होते. त्यातील महत्वाची एक पायरी म्हणजे मठ निर्मिती. समर्थांचे हे मठ मोठी चळवळ करणार होते. या मठांकरवी जे समाजप्रबोधन करायचे होते ते प्रबोधन मुख्यत्वेकरून त्या मठांच्या अधिपतीकडे म्हणजे मठाधिपतीकडे सोपवायचे होते. अशा महत्त्वाच्या कार्यासाठी जो लोकसमुदाय करून त्यांच्यात राहून, प्रबोधन करणार तोच किती ज्ञानी आणि सर्वगुणसंपन्न असायचा म्हणजे अत्यावश्यकच होते.

समर्थांचे शिष्य आणि महंत यातील फरक प्रथम पाहवा लागेल. समर्थांचे सर्व महंत त्यांचे शिष्य होते. परंतु सर्व शिष्य काही महंत नव्हते. महंत म्हणजे मठाचा अधिपती 'मठाधिपती.' महंताला मठ स्थापना करता येत असे आणि त्यांना शिष्य करण्याचाही अधिकार असे. समर्थांनी

महंतांना उपदेशच केला होता की त्यांनी शिष्यही करावे आणि महंतही करावे. त्यामुळे या रामदासी संप्रदायातील महंताना एक स्वतंत्र स्थान होते, स्वतंत्र अस्तित्व होते.

समर्थांनी एखाद्याला शिष्य बनविले तर त्याला पुढे महंत व्हायची संधी मिळत असे अर्थातच त्यासाठी असणाऱ्या सर्व कसोट्या त्याला पार करायला लागत. समर्थांना संप्रदायातील सांप्रदायिकांच्या, संख्येवर भर द्यायचा नव्हता. मोजके पण अतिशय गुणवंत शिष्य असायला प्राधान्य असे. त्याचे गुण त्यांच्या लेखी महत्त्वाचे असत त्यामुळे त्याची गुणवत्ता सर्वतोपरी वाढविण्याकडे त्यांचा कल होता. म्हणून त्यांचे शिष्य बनण्यालायक वय म्हणजे १०–१२ वर्षे किंवा तरूण असायचा. अगदी विशी–पंचविशी ओलांडलेला शिष्यही त्यांना योग्य वाटत नसे. कारण समर्थ म्हणत व्यक्तीमत्व घडवायला एक विशिष्ट वय असते, लहान व तरतरीत मुलांना चांगल्या प्रकारे आणि लवकर घडविता येते. त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांच्यात लवकर रूजतात, शिवाय संस्कार अंगी बाणायला सोपे जाते. त्यातून मुले मुळातच बुध्दीमान असतील तर त्यांना समर्थ अगदी हिऱ्यासारखे पैलू पाडत. हुषार मुलांनाच ते पहिले जवळ करत आणि भोळसट मुलांना मात्र ते दूरच ठेवत. समर्थ म्हणत जिथे अंगी भोळसटपणा असतो तिथे ज्ञानाचा अभावच असतो.

### ४.५.२ समर्थांचे महंताबद्दलचे आडाखे आणि त्यांचे आवश्यक गुण

श्री र. रा. गोसावी 'श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय' या ग्रंथात लिहितात, ''महंती सुखाची नाहीं। तेथे दुःखे उदंडली। उदंड दुःख लोकांचे। ऐकता ऊर फाटतो।।१।। लोक हे नाना विकारी। फार अन्याय वर्तला। पहावे ते किती डोळा। ऐकावे श्रवणी किती।।२।। वळिता दुःख मानिता। अन्याय घात नेणती। सांगता हित वाटेना। ऐकता त्रास मानिनी।।३।। झंजणिती चंचणिती। फणफणीती हटे हटें। हटे ते उध्दहें होती। आपशुध्दी असेचिना।।४।। उध्देहें वर्तती क्रिया। उध्दटें शब्द बोलिती। उध्दटे नास्ति मर्यादा। उध्दटे प्रीति नासती।।५।। अखंड सर्व सोसावे। भलेपणा चिकारणे। परंतु सुख तो नाही। कांही कांही क्वचितही।।६।। सीण उदंडे होताहे। नेणत्या संगती गुणे। जाणता संग भेटेना। दुष्काळ पडिला गमे।।७।। सज्ञने काय करावें। लोक मोठा अनावरु। कीत्यास काय सांगावे। मनातूनी कळेचिना।।८।। सज्ञनी फारसी निष्ठा। देव त्यांसीच वळतो। अन्याय वर्ततो तो तो। भ्रष्ट होतो अनावरू।।९।। ''[१३५]

महंती काय सुखासुखी मिळत नाही, तर महंती म्हणजे सुळावरच्या पोळीसारखी असते. जेव्हा एखादा शिष्य महंत होतो, मठाधिपती होतो. जेव्हा त्याला वाटते की आता माझा लोकांकडून मान–सन्मान होईल, माझे पद केवढे मोठे आहे, तर समर्थांनी ह्या वरील ओव्यांतून त्या शिष्याच्या मनात असे विचारही येऊ नयेत म्हणून ही एक शास्त्रशुध्द संहिता, नियमावलीच घालून दिली होती.

समर्थांनी दिलेली महंती काही फार सुखावह नव्हती. समाजात अनेक प्रकारची दुःखे आहेत. लोकांचे दुःख बघता बघता उरही फाटतो. त्यावर फुंकर घालता आली पाहिजे. नाना विकार असलेले लोक असतात, अन्याय असतो, डोळ्यांनी काय पहावे लागते, काय काय ऐकावे लागते, कितीही पोटतिडकीने सांगितले तरी ऐकत नाहीत. अतिशय उध्दटपणे बोलतात, वागतात तरी पण त्यावर महंताने संयमाने, शांतपणे सोसून मार्ग काढावा.

‘श्रीग्रंथराज दासबोध’ यात समर्थांनी, महंत कसा असावा त्याचे आचार–विचार कसे असावे, त्याच्यात कोणते गुण असावे हे अतिशय योग्य रीतीने सांगितले आहे. कोणत्या गुणांनी तो परिपूर्ण होईल हे खालील प्रमाणे स्पष्ट केले आहे. त्या सर्व गुणांशिवाय तो महंत पदाला पोहचूच शकत नाही.

समर्थांना नुसताच बुध्दीमान महंत नको होता. तर त्याचे ज्ञान सखोल असावे. त्याला प्रत्येक गोष्टीचा सखोल विचार करता आला पाहिजे आणि सर्व बाजूंनी विचार करता आला पाहिजे. चांगले वाईट कळायला तीक्ष्ण आणि चाणाक्ष बुध्दी त्याच्याकडे असणे गरजेचे होते.

महंताला चांगला लोकसंग्रह करता यायला हवा. वेगवेगळ्या प्रकारच्या विचारांच्या लोकांमध्ये मिळून–मिसळून वागण्याची, राहण्याची त्याच्याकडे कला असावी. नव्याने माणसे जोडता आली पाहिजेत, तसेच माणसांना चांगल्या प्रकारे सांभाळता पण आले पाहिजे. कितीतरी लोक उध्दट पणे वागतात, बोलतात पण त्यांना चांगल्या प्रकारे हाताळता येण्याची कला अवगत असावी. प्रत्येक प्रकारच्या, विकारच्या माणसाला, त्यांच्या विकारांसुध्दा सहन करण्याची एक विशिष्ठ सहनशीलता असावी. किती तरी लोक डोळ्यावर पट्टी बांधल्यासारखेच वागत असतात, त्यांच्या बुध्दीपटलावर जमलेली अज्ञानाची, अविचाराची धूळ बसलेली असते ती इतकी चिकटून

बसलेली असते की त्याला स्वतःचे हित, अहितही समजत नाही. मग महंताला अतिशय शांत राहून, मनावर संयम ठेवून माणसाला हित–अहित कशात आहे हे समजावून देता आले पाहिजे.

समर्थांनी वाणीचे, बोलण्याचे महत्त्व सांगितले आहे. ज्या बोलण्याने समोरचा दुःखी होतो ती वाणीच अपवित्र असते. आणि जसे पेरतो तसेच उगवते या नियमाप्रमाणे आपली जशी वाणी तशी समोरच्या माणसाची प्रतिक्रिया असते म्हणून सर्व लोकांशी गोड वाणीत, गोड शब्दाने बोलून त्यांच्या अंतरमनात शिरावे. महंताला दुसऱ्याचे दुःख जाणता आले पाहिजे. त्याच्या अंतःकरणातील तगमग ओळखता आली पाहिजे. त्याचे दुःख निवारण करण्याचा प्रयत्न तर केला पाहिजे. त्याचे दुःख जरी जाणून घेतले तरी त्याचे मन हलके होऊ शकते. म्हणजेच समुदायाचे बरे वाईट सर्व सहन करायला हवे. समुदाय विस्कटू देऊ नये.

महंतांने स्वतः शांती राखावी, जो अशांत आहे त्यालाही शांती राखण्यास सांगावे. स्वतःही तऱ्हेवाईकपणे, विचित्रपणे न वागता समोरच्यालाही तऱ्हेवाईक आचारापासून परावृत्त करावे. राजकारण करण्यासाठीच्या नियमांबद्दल समर्थ दासबोधात म्हणतात,'' राजकारण। बहुत करावें। परंतु कळोंच नेदावें। परपीडेवरी नसावें। अंतःकरण ।।१९।। लोक पारखून सांडावे। राजकारणें अभिमान झाडावे। पुन्हां मेळवून घ्यावे। दुरील्या दोरे।।२०।। हिखटासी दुरी धरावी। कचरटासी न बोलावें। संबंध पडतां सोडून आवेंजावें। येकीकडे।।२१।। ''[१३६]

राजकारण तर महंताने केलेच पाहिजे, पण ते कोणाला कळू देऊ नये, त्याचा गाजावाजा करणे टाळावे, अर्थातच त्याने राजकारण करताना दुसऱ्याला पीडा देण्याचा हेतू यत्किंचितही मनात ठेवता कामा नये म्हणजेच पराला दु:ख देण्याची बुद्धी धरु नये. लोकांची पारख करुन ठेवावी, राजकारण करुन त्यांच्यातील अहंकार काढून टाकावा, त्याला पुन्हा धाग्याने जोडून घ्यावे, जवळ करावे. अर्थातच माणसाला तोडू नये. हिरवट म्हणजे तामसी, रागीट. त्याला लांबच ठेवावे आणि कचरट म्हणजे कामचुकार त्याच्याशी न बोलता त्यालाही सोडून द्यावे.

तसेच महंताने दुटप्पी वर्तन करु नये, पक्षपातीपणा करु नये. एकाला पाठीशी घालायचे, त्यासाठी दुसऱ्याशी वैर करायचे, हे काही चातुर्याचे लक्षण नाही किंवा राजकारण नाही. सर्व जनांचा आधार व्हायचे असेल तर त्याची बुद्धी व्यापक असावी तरच तो आधार होऊ शकतो. अशा धारणाशील पुरुषाचा अर्थातच श्रीरामांचा गुण घ्यावा. समर्थ दासबोध ग्रंथात म्हणतात,

'' जंवरी चंदन झिजेना। तंवरी सुगंध कळेना। चंदन आणि वृक्ष नाना। सगट होती ।।१७।। जंव उत्तम गुण न कळे। तो या जनास न कळे। उत्तम गुण देखतां निवळे। जगदांतर।।१८।। ''[१३७]

समोर चंदनाचे खोड पडले तरी त्याचे महत्व समजत नाही. ते झिजले तरच त्याचा सुगंध दरवळतो आणि त्याला महत्त्व प्राप्त होते. मग इतर वृक्षात आणि चंदनात काय फरक? अगदी तसेच महंताने परोपकारासाठी झिजले पाहिजे, तरच त्यांचे गुण सर्वांपर्यंत पोहोचतील. नाही तर सामान्यांत आणि महंतात काय फरक? त्याचे गुण इतरांना कळले की ते आपोआपच महंताला अनुकूल होत जातील.

राजकारणाच्या बाबतीत समर्थ दासबोधात लिहितात,'' हरिकथा निरुपण। बरेपणे राजकारण। प्रसंग पाहिल्याविण। सकळ खोटे।।२९।। विद्या उदंड सिकला। प्रसंगमान चुकतचि गेला। तरी मग तये विद्येला। कोण पुसे।।३०।। ''[१३८]

हरिकथा निरुपण असो की राजकारण असो, प्रसंग जाणण्याची हुशारी महंताकडे असावी, नाही तर सर्व निष्फळ आहे. इथे समर्थांनी प्रसंग म्हणजे देश, काल आणि स्थिती सांगितली आहे. पुष्कळ विद्या शिकली आणि वेळेला कर्तव्यच चुकत गेला, तर त्या विद्येचा काही उपयोग आहे का? कोण विचारतो त्या विद्येला?

महंताने स्वत: जास्तीत जास्त ज्ञान मिळवून समाधानी व्हावे आणि तेच ज्ञान लोकांना द्यावे, आपल्या ज्ञानाचा दुसऱ्यास उपयोग होईल असेच वागावे. उदा. एखादा पोहता न येणारा पाण्यात बुडत असेल तर पोहणाऱ्याने त्याला वाचवावे. त्याला तसेच बुडताना बघू नये.

दुसऱ्यात जे जे चांगले गुण दिसतील ते ते वेचून घ्यावेत आणि ते लोकांना पण वेचायला द्यावेत  त्या गुणांनी युक्त असे महंताने स्वत:चे आचरण ठेवले पाहिजे, नाहीतर आचरणाशिवाय दुसऱ्याला बोललेले शब्द मिथ्या आहेत.

समुदाय आणि लोकसंग्रहाविषयी समर्थ दासबोध ग्रंथात लिहितात,'' आता समुदायाकारणे। पाहिजेत दोनी लक्षणे। श्रोती येथे सावधपणें। मन घालावे।।३६।।  जेणे बहुतांस घडे भक्ती। ते हे रोकडी प्रबोधनशक्ती।बहुतांचे मनोगत हाती। घेतले पाहिजे।।३७।। ''[१३९]

महंताला जे समुदाय, लोकसंग्रह करायचे, जे कार्य करायचे आहे त्यासाठी अगदी दोन मुख्य लक्षणे अशी कि, रोकडी प्रबोधशक्ती आणि बोलल्याप्रमाणे क्रिया. क्रियेविण केलेले तत्त्वज्ञान निरर्थक आहे. महंत जर प्रबोधन करणार आहे, जो उपदेश करणार आहे, ते लोकांना विश्वसनीय कधी वाटतील? तर तो जेव्हा बोलल्याप्रमाणे चालेल, वर्तन करील, तेव्हाच.

भक्तीमार्गाबद्दल समर्थ महंतांना सांगतात,'' महंताने भक्तीमार्गाची उभारणी करताना जो परमार्थ करायचा आहे, परोपकार करायचे आहेत ते अशा पद्धतीने करावेत की त्याने स्वत: त्यात अडकून राहू नये, त्यातच सापडू नये. आपली स्वतंत्रता मोडू नये. परस्पर भक्तीमार्ग उभारावा. तो जर तिथेच अडकून राहिला तर त्याचे पुढचे सर्व कार्य ख़ुंटेल.महंताकडे धूर्तपणा आणि चातुर्य येण्यासाठी समर्थ दासबोधात म्हणतात,'' उदंड बाजारी मिळाले। परी ते धूर्तेची आळिले। धूर्तापासी काहीं न चाले। बाजाऱ्यांचे।।२५।। या कारणे मुख्य मुख्य। तयांसी करावे सख्य। येणे करिना असंख्य। बाजारी मिष्ठति।।२६।। ''[१४०]

समर्थ म्हणतात बाजारबुणगे म्हणजे सामान्य चिक्कार मिळतात. पण जो धूर्त असतो, तो त्यांना आपल्या नियंत्रणातच ठेवतो. त्या सामान्यांचे या धूर्तापुढे काही एक चालत नाही. येथे धूर्त म्हणजे दूरदर्शी, चतुर पुरुष. त्यासाठी मुख्याशी म्हणजे पुढाऱ्यांशी सख्य करावे म्हणजे मग सामान्य लोक आपोआप महंताकडे वळतात, त्याला अनुकूल होतात.

लोकांमध्ये मिसळल्यावर कसे वागावे याबाबत समर्थ दासबोधात लिहितात,'' मिळोन जाऊन मेळवावे। पडी घेऊन उलथावे। काहीच कळो नदावे। विवेकबळे।।१६।। दुसऱ्याचे चालणी चालावे। दुसऱ्याचे बोलणी बोलावे। दुसयाचे मनोगते जावे। मिळोनिया।।१७।। ''[१४१]

महंताने लोकात तर मिसळावे, अगदी प्रतिपक्षात पण जाण्याची कला अवगत पाहिजे. वेळप्रसंगी आपण कमीपणा घेऊन, योग्य वेळेस त्याला उलथून टाकावे. पण आपण विवेकबळाने त्याला त्याचा थांगपण लागू देऊ नये. असा रीतीने महंताला लोकांमध्ये राहून त्यांच्यापासून वेगळे राहण्याची गुरुकिल्ली सापडली पाहिजे. लोक नाना प्रकारचे असतात. त्यांच्या चालीने चालावे म्हणजे त्यांच्याशी त्या त्या वेळी त्या त्या प्रकारे वागावे आणि त्यांचे मन जिंकावे. श्री. अनंत रामदासी यांनी महंताची व्याख्या अगदी सुरेख सांगितली आहे. श्री. अनंत रामदासी या संदर्भात लिहितात,'' समर्थांचे महंत म्हणजे सांप्रतच्या भाषेत राष्ट्रकार्याचे

स्वत:स वाहून घेतलेले पण भगवन्निष्ठ प्रचारक होत. यांना वेतन आणि वृद्धवेतन देण्यासाठी समर्थांना फंड जमविण्याची आटापीट करावी लागली नाही. भिक्षेची 'अमरवल्ली' कामधेनू त्यांनी प्रत्येक महंतास दिली. भगवत्कृपेचा साक्षात्कार ही त्यास बक्षिसी ठेवली होती. ती ज्याने त्याने स्वत:च्या परिश्रमाने आपापल्या पातत्रेप्रमाणे मिळवावी. ''[१४२]

'दासबोध' ग्रंथात समर्थांनी महंत कसा असावा, त्याचे आचरण, बोलणे–चालणे कसे असावे हे सांगितले कारण समर्थांना जे लोककार्य करायचे होते, जे प्रबोधन करायचे होते, त्यात महंत हा खूप मोलाचा कार्यकर्ता होता. म्हणून समर्थांनी त्याला एवढी नियमावली घालून दिली. याचबरोबर महंताने जे सामाजिक उपक्रम असतात त्यात सुद्धा सहभागी व्हायला हवे. धर्मशाळा, मंदिरांचा जिर्णोद्धार, नवीन उभारणी यात लक्ष घालावे. पाण्याच्या सोईसाठी तळी, विहिरी बांधाव्या. बागा, वने यांची देखभाल करावी. अशाश्वत गोष्टींमध्ये, मायेमध्ये न अडकता परब्रह्माची प्राप्ती करुन देण्यासाठी जनसामांन्यांना सहाय्य करावे.

त्याचप्रमाणे लिहिणे, वाचणे, अर्थांतर, शंकानिरसन, प्रचिती, गाणे, नाचणे, टाळी वाजवणे, अर्थभेद, प्रबंध, प्रबोध–प्रचिती, वैराग्य, विवेक, लोकराजी, राजकारण, अवेग्रता, प्रसंगजाणणे, उदासीनता, सर्वांशी समान वागणूक, रामोपासना ही लक्षणे तर महंतात पूरेपूरपणे उतरली पाहिजेत, कारण समर्थ महंताला एकेच ठिकाणी न ठेवता दूरवरच्या प्रदेशांमध्येही समाजप्रबोधनाच्या कार्यासाठी बाहेर पाठवत आणि जाताना त्यांच्याकडे 'दासबोध' देत ज्याच्यात संपूर्ण जीवनासाठी सांगितलेली शिकवण आहे. आणि एक झोळी म्हणजे ज्याच्यात गरजेपुरत्या वस्तु ठेवण्यासाठी आणि भिक्षेसाठी तसेच एक दंड म्हणजे काठी अर्थातच स्वरक्षणासाठी देत. महंत ज्ञानी असला तरी त्याला त्याचा अहंकार नसला पाहिजे. अखंड एकांतात रहायला पाहिजे, लोकांचे मन राखूनच व्यवहार केला पाहिजे. जर कुणाशी पटत नसेल तर आपल्यात दोष आहे, लोकांत नाही हे समजायला पाहिजे.

समर्थांची महंताना सूचना असायच्या की त्यांनी स्वतःला सिध्द करावे आणि मगच समाजात उतरावे. पर्वत, दऱ्या, घळी या ठिकाणी वास्तव्य करून रहावे. मठ स्थापना करून मारूतीरायाची प्रतिष्ठापना करावी. शिस्तीत जीवन जगावे, तप ध्यान नियमित करावे आणि शेवटपर्यंत भिक्षा मागून त्यावरच आपला उदर निर्वाह करावा.

याशिवाय जाताना काही उपदेशपर निरोप असायचा. प्रा. श. श्री. पुराणिक या संदर्भात लिहितात,'' पुत्राप्रमाणे मानलेल्या शिष्याला गुरूने निरोप देताना केलेला हा उपदेश लक्षणक्षय आहे. कारण ते महंत शिक्षेचे सार सर्वस्व त्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे समर्पक आणि सूत्रबध्द शब्दांत त्यांनी व्यक्त केले आहे. ''[१४३] हे नमूद करणे अगदी आवश्यक आहे. याने महंताबद्दलचे समर्थांचे आडाखे केले होते याची पूर्ण कल्पना येते. प्रा. श. श्री. पुराणिक या संदर्भात लिहितात,'' स्वदेश राहिला मागे। विदेश लागला पुढे। आचारराखणे आधी। स्नानसंध्या पवित्रता।।१।। अचूक शुध्द ल्याहावे। वाचावे नीटनेटके। साकल्य अर्थ सांगांवा यथातथा प्रचीतीने।।२।। प्रत्यही मागणे भिक्षा। मिळाली न मिळे तरी। नित्य नूतन हिंडावे। धुंडावे भक्त प्रेमळ।।५।। भक्तीज्ञान असो द्यावे। शुध्द वैराग्य नेटके। धरावी कीर्तीची द्वारे। तरावी भाविके बहू।।१३।। तगावे बहुता ठायी। उपाधी नस्ता बरे। सद्‌गुण सार द्यावे ते। नेघावे अवगुण ते।।१४।। अत्यंत साक्षेपी व्हावे। न व्हावे आळसी कदा। घ्यावा या देहाचा लाहो। जायाचे हे म्हणोनिया।।१७।। मरोनि कीर्ती उरवावी। नुरवावी अपकीर्ती ते। धन्य धन्य म्हणे लोक। सक्रिय करिता बरी।।१८।। दास्य ते करावे ऐंसे। यामध्ये घडेल तसे। देव सांग करी सर्वे। भावार्थ पाहिजे बरा।।२२।। ''[१४४]

समर्थांनी महंताला महंतपण कधी सहज दिले नाही. त्याला अगदी तावून–सुलाखून घेत असत. तो शिष्य स्थितीत असताना त्याला समर्थ पैलू पाडून घेत असत. अनेक प्रसंगांमधून त्यांना शिष्याची परीक्षा घेत घेत, वेळ पडली तर शिक्षा देत देत समर्थ त्याला तरबेज करायचे. समर्थांकडे कुणीही आला, शिष्य झाला, महंत झाला असे कधी झालेच नाही.

महंत जेव्हा दूर ठिकाणी कार्यसिध्दीसाठी निघाल्यावर त्याने मठात राहून आचारसंहितेत अडकून न राहता अजून पुढे उद्योग करावा म्हणजेच त्याचे जे शिष्य होतील त्यांनाही पैलू पाडून स्वतःसारखे महंत तयार करावेत आणि त्यांनाही परप्रांतात पाठवावे. याचाच अर्थ देशभर, राज्यभर मठ स्थापना करून महंतांची साखळी आणि मठांचे जाळे पसरवावे आणि देशकार्य करण्यासाठी सर्वदूर असलेल्या महंतांनी सिध्द व्हावे. समर्थाचे असे अनेक शिष्य होते की त्यांना समर्थांनी महंत करून मठ स्थापून दिले. त्यानंतर या महंतांनी

अनेक महंत तयार केले. मठ केले. हे मठ म्हणजेच समर्थांचा संसार होता असे म्हणणे योग्यच ठरेल.

### ४.५.३ समर्थांची मठनिर्मिती आणि मठांचे कार्य

समर्थांनी मठस्थापनेचे कार्य खरं तर त्यांच्या तीर्थाटनाच्या काळातच सुरू केले. समर्थांचे तीर्थाटन ही काही नुसती 'तीर्थ यात्रा' नव्हती. देशस्थितीचे अवलोकन हाही त्यामागचा हेतू होता. पुरःश्चरणाच्या काळातच समर्थ त्यांच्या तपश्चर्येबरोबरच तेथील स्थानिक, सामाजिक, आर्थिक जीवन ते अवलोकत होते. त्या नेमक्या काळात समर्थांची शहाजीराजांची भेट झाली आणि त्यांच्या चर्चेतून, मसलतीतून त्यांच्या कार्याची दिशा ठरत गेली. समर्थ तीर्थाटनाला निघाले तेच मुळी मनात एक निश्चय करून की जर समाजकार्य करायचे असेल तर फार काळ न घालवता, संपूर्ण देश पालथा घातला पाहिजे आणि देशस्थिती स्वतःच्या नजरेतून बघीतली तरच ध्येयपूर्ती करणे शक्य होईल.

समर्थ संप्रदाय मठाबरोबरच घडत गेला, विस्तारत गेला. समाजस्थितीचे अवलोकन करीत असतनाच कार्याचा आराखडा त्यांच्या मनात तयार होत होता. त्यामुळे त्यांनी अनेक प्रांतात काही काळ वास्तव्य करून शिष्य गोळा करत आणि तेथे मारुतीची प्रतिष्ठापना करीत.

तीर्थाटनाच्या काळात समर्थांनी संपूर्ण देशाच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय स्थितीचा पूर्ण अभ्यास केला होता आणि तिन्हींची जी स्थिती होती ती अतिशय विदारक, भयानक होती. परकीय अंमलाखाली असलेल्या समाजाला पारतंत्र्याच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर धार्मिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती पूर्णपणे बदलली गेली तरच ही परकीय सत्ता झुगारता येईल याची त्यांना पूर्ण कल्पना होती. तसा समर्थांच्या मनात ठाम विश्वास निर्माण झाला होता. त्यासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाला वैचारिक आणि मानसिक आधार देण्याची गरच होती. समाज खूप भीषण जीवन जगत होता. भेदरलेल्या लाचार झालेल्या लोकांना पातशाह्यांच्या धाकातच श्वास घ्यावा लागत होता. समाज इतका पिळवटला जात होता की उद्याचे मरण आजच आले तर बरं होईल अशा मनस्थितीत होता. दारिद्र्याने पीडलेल्या, भूकेने तडफडणाऱ्या समाजाला काही दिलासाच मिळत नव्हता, कोणताच आशेचा किरण दिसत नव्हता, म्हणून हे सर्व चित्र बदलण्यासाठी समर्थांनी समर्थ संप्रदाय स्थापन

केला. या संप्रदायाला बैठक हवी, संप्रदायाच्या कार्यात नियमितपणा राखता यावा यासाठी समर्थांनी मठस्थापना केली.

देशावर परकियांनी घालाच घातला होता. समोर अंधःकारच पसरलेला होता. परिस्थितीने समाज तर अगदी भेकड झाला होता. देश, धर्म, संस्कृतीचा ऱ्हास होत आहे हे चित्र समर्थांनी डोळ्याने बघितले होते, यातून बाहेर पडायचे असेल, परकियांना झुगारायचे असेल तर समाजाला एकत्र आणून सर्व प्रथम प्रतिकार करायला शिकवणे गरजेचे होत हे समर्थांना प्रकर्षाने जाणवत होते, जर का यात अमूलाग्र क्रांती घडवायची असेल तर काही ठोस पावले उचलणे  आवश्यक होते. सौ. कुमुदिनी देशपांडे या संदर्भात लिहितात,'' सामान्य माणसाचे ऐहिक सुधारण्यासाठी व समाजजीवनाचा सर्व स्तरच उंचावण्यासाठी त्यांनी लोकशिक्षकाची भूमिका स्विकारली व जन्मभर ते कार्य त्यांनी एक व्रत म्हणून पार पाडले. ''[१४५]

सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि संस्कृतिक परिस्थिती बदलण्यासाठी हिंदवी स्वराज्य हवेच हा विचार समर्थांच्या मनात रूजला. संप्रदाय आणि मठस्थापना करून कठांद्वारे ही परिस्थिती बदलेल, स्वधर्म, स्वराज्य स्थापले जाईल. स्वराज्याला एक जाणता राजा मिळेल या विश्वासाने समर्थांनी मठाद्वारे हे कार्य सिध्दिस नेण्याचा संकल्प सोडला.

## ४.५.४ मठस्थापनेचे प्रमुख हेतू

समर्थांना प्रामुख्याने समाजसंघटनावर लक्ष केंद्रित करायचे होते. त्यावेळी समाजाची परिस्थिती अतिशय विदारक होती. सर्वच समाज विस्कळीत झाला होता, समाजातील लोकांमध्ये वैचारिक स्थिरता नव्हती. दारिद्र्याला कंटाळलेले, परकीय जुलूम सहन करीत असलेले लोक हे ह्यातून बाहेर पडायला हवे होते. लोकांची मने इतकी होरपळली होती की केवळ अगतिकताच शिल्लक राहिली होती. प्रत्येक जण आपापलाच विचार करत असल्यामुळे सामाजिक विचाराला स्थानच नव्हते. अशा दुभंगलेल्या मनांना एकत्र आणायचे होते. प्रथम सर्व लोकांना एकत्र करायचे, संघटीत करायचे कामच प्रथम करण्याची गरज होती. हे कार्य मठांद्वारे सुरू करण्याचे समर्थांनी योजिले. श्री. सुहास आगरकर या संदर्भात लिहितात,'' संप्रदाय निर्माण करताना सर्व समाजघटकांना एका सूत्रात बांधण्यासाठी मठांची व मठपतींची योजना केली. ''[१४६]

समर्थांचा एक मुख्य कार्यभाग कशात होता? तर लोकांना स्वराज्याभिमुख बनविणे. देशावर, महाराष्ट्रात, सर्व समाजावर यवनी सत्तेचा अंमल होता. अंमल म्हणजे काय तर फक्त जुलूमच होता. यवनांना जे हवे होते ते समाजाकडून कोणत्याही तऱ्हेने मिळवितच होते. जुलूम–जबरदस्तीने, समाजाला ओरबाडून आपले सुख–सोईंकडे बघण्यात त्यांना एक अघोरी आनंद मिळ्त असे. समाजाचा आक्रोश ऐकण्यात त्यांना मजा येत होती आणि हे सर्व करण्यात यवनांना धन्यता वाटत होती. समर्थांना अशा या गर्तेत अडकलेल्या समाजाला स्वतःच्या अस्तित्त्वाची जाणीव करून द्यायची होती, त्यांचा स्वाभिमान परत आणायचा होता. आपणावर दुसरेच कुणीतरी अधिकार गाजवत आहेत, राज्य करीत आहेत म्हणून आपण संतुष्ट नाही याची जाणीव लोकांना करून द्यायची होती. समर्थांना अशी परिस्थिती निर्माण करायची होती की समाज खाडकन डोळे उघडून जागा व्हावा. लोकांना समजावे की आपणावर एकावेळी किती शाह्या राज्य करत आहेत, हा देश, हे राज्य आपले आहे. आपल्यावर परकीय सत्ता राज्य करीत आहेत. आपले स्वतःचे, आपल्या कुटुंबाचे जीवन धोक्यात, सतत दडपणाखाली जगत आहे, हे सगळे कुठे तरी थांबायला हवे. परकीय सत्तेला झुगारून द्यावे आणि त्यासाठी आपण आता सज्ज व्हायला पाहिजे. आपले स्वतंत्र राज्य, स्वराज्य निर्माण व्हायला हवे. आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला चार घास सुखाने खाता यावेत, स्वाभिमानाचे जिणे पुन्हा एकदा चालू होऊ दे. हा स्वाभिमान फक्त स्वराज्यातच मिळू शकतो याची खात्री पटवून देणे. ही अशी जाणीव एकदा समाजात निर्माण झाली की समाज पेटून उठेल, अन्यायाविरूध्द युध्द पुकारेल. अशा तऱ्हेने समाज स्वराज्याभिमुख होऊन एक राजकीय, सामाजिक क्रांती घडवून आणेल मठांद्वारे प्रबोधन होऊन ही क्रांती घडायला मदत होईल. अशा हेतून समर्थांनी मठ स्थापन केले. ज्या उद्देशांनी हे मठ स्थापन झाले त्याही पेक्षा अनेक पटींनी उत्कृष्ठ कार्य या मठांमुळे पार पडले.

### ४.५.५ मठांचे कार्य

परमार्थाच्या क्षेत्रात समाजात प्रगती झाली. लोक भक्ती–अध्यात्मापासून दूर होत होते, त्यांना पुन्हा भक्तीमार्गाकडे या मठांनी वळविले. परमार्थाचे महत्व समाजावून सांगितले. पुन्हा एकदा परमेश्वरावर श्रध्दा निर्माण करायला मदत झाली. यामुळे लोकांची मने भरकटत चालली

होती ती स्थिर व्हायला या मठातील उपासनेमुळे, भक्तीच्या मार्गाने सहाय्य झाले. लोकांमध्ये वैचारीक, मानसिक स्थैर्य आल्यामुळे त्यांची सकारात्मक विचारसरणी तयार झाली. इतर हलक्या, अघोरी श्क्तीदेवतांच्या कचाट्यातून अंधश्रद्धेच्या प्रभावातून समाज हळुहळू बाहेर पडला. या मठांद्वारे समाजाला परमार्थक्षेत्राकडे आकर्षित करुन तो उपासनेकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघायला लागला. आपोआपच लोकांना भक्तीची, उपासनेची गोडी लागली आणि परमेश्वरावर विश्वास निर्भाण झाला. मठातील दैनंदिन उपासनेमुळे, कार्यक्रमांमुळे लोकांमध्ये एक प्रकारची  शिस्त निर्माण झाली.

तसेच मठांमधे अनेक उत्सव सुरु झाले. मुख्यत्वे म्हणजे रामनवमी. रामनवमीचे नवरात्रच असल्यामुळे आधीचा काही काळ उत्सवाची तयारी करण्यात जायचा. रामनवमी उत्सवात कथा–कीर्तन, प्रवचन, नामस्मरण अशा अनेक कार्यक्रमांची योजना असायची. अर्थातच, श्रीरामचंद्रांच्या, हनुमंतांच्या कथांचा त्यात भर असे. त्यामुळे त्या देवतांचा आदर्श, पराक्रम, सद्‌गुण अशा अनेक गुंणांनी लोक अर्थातच भारावून जायचे. एकत्रित भोजन म्हणगेज भंडारा या संकल्पनेमुळे लोक एकमेकांशी मिळून मिसळून रहायला लागले. अर्थातच याची परिणीती परमार्थ क्षेत्रात संघटित शक्ती निर्माण झाली. मठातील शिस्तपालनामुळे, उपासनेमुळे लोकांची मने निर्मळ होऊन त्यांच्यात्यांच्यातील हेवेदावे कमी होण्यास खूप मदत झाली.

मठांच्या माध्यमातून बलोपासनेला चालना मिळाली. या मठांमध्ये नियमित व्यायाम, मुख्य म्हणजे सूर्यनमस्कारावर भर असायचा. समर्थांचा ताकदीवर, बळावर खूप विश्वास होता. बलवान शरीरसंपदेवर त्यांचा फार भर होता. हनुमंतासारख्या बलदंड देहाचा आदर्श लोकांसमोर उभा राहिल्याने आपसुकच त्यांनाही बलसंपदेचे महत्व पटायला लागले. मनगटात बळ असेल, अंगात जोर असेल तर सहजपणे युद्ध करण्याची शारीरीक–मानसिक तयारी होते. या विश्वासाने समाजाची मानसिक स्थिती बदलायला सुरुवात झाली, आणि त्यांच्या मनगटात बळकटी यायला लागली.

समाजातील अंतर्गत कलह कमी होण्यास मठांचे खूप सहाय्य झाले. खरं तर समाजात अंतर्गत कलह, वैरभावना, एकमेकांशी हेवेदावे, अशी परिस्थिती फार मोठ्या प्रमाणावर झाली होती. समाज संघटित करण्यासाठी या गोष्टी खूप जाचक ठरत होत्या. लोकांमधे एकजूट

नव्हती. अनेक रीती–रिवाज, पंथ, उपासना यामुळे श्रेष्ठ–कनिष्ठ या भावना रुजल्या होत्या. मठांच्या कार्यामुळे परमार्थक्षेत्रात संघटित शक्ती निर्माण झाल्यामुळे या सूडाच्या, वैराच्या भावना कमी झाल्या. लोक मनानी एकमेकांच्या जवळ आल्याने एकमेकांशी भांडण्या–लढण्यापेक्षा, परकियांच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवा अशी मानसिक धारणा तयार व्हायला नक्कीच मदत झाली.

मठातील प्रबोधनाद्वारे, परमार्थ शिकविल्यामुळे, उपासनांमुळे भितीग्रस्त समाजाला आधार मिळाला. एकमेकांशी वैरभावनेने वागणारा, अन्याय करणारा एक समाज सोडला तर एक समाज अगदी दीनवाणा होता. त्यांचे दैनंदिन जीवनसुध्दा निरर्थक होते, त्या जगण्यात काही त्यांना आत्मीयताच वाटत नव्हती. त्यांचा आत्मविश्वास पूर्णपणे ढळला होता. पण असा समाज हळूहळू तरतरीत झाला, त्यांची भिती नाहीशी व्हायला लागली होती. अर्थातच यवनांच्या जुलुमात हा समाज  होरपळून निघाल्याने त्यांची ही परिस्थिती झाली होती. मठातील शिक्षणामुळे त्यांचीही मानसिकता बदलायला लागली. आपल्याला आता एक भक्कम आधार मिळत आह, याची खात्री वाटून समाजाने पुन्हा उभारी धरली.

प्रपंच–परमार्थांचा समन्वय कसा गाठायचा याची शिकवण मठांनी दिली. त्याकाळी एकतर संन्यास, वैराग्य किंवा परमेश्वर–भक्ती म्हणजेच परमार्थ तरी किंवा प्रपंच एके प्रपंच तरी अशी मानसिकता लोकांत होती, पण मुळात समर्थांची विचारसरणी वेगळी होती. प्रंपचाकडे पाठ फिरवून केलेला परमार्थ खरा नाही आणि फक्त प्रपंचातच रमून परमेश्वराची आठवण नाही, या दोन्ही गोष्टी समर्थांच्या तत्वातच बसत नव्हत्या. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय असणे ही समर्थांची मोठी शिकवण होती. एक उच्च विचारसरणी होती. दैनंदिन जीवनातसुध्दा दोन्ही गोष्टींचा समन्वय हवाच याची जाणीव समाजाला झाली.

दुःखितांची दुःख निवविणे यात मठांची भूमिका मोठी होती. त्याकाळी सगळीकडे दुःखच जास्त होते. परकियांनी तर समाजाला दुःखाच्या खाईत लोटले होतेच, उपर त्यांच्या भावनिक जखमांवर मीठ चोळण्याचे कामसुध्दा करत होते. अशा भरडलेल्या, दुःखी मनांवर फुंकर घालायलाच कुणी नव्हते. मठ स्थापना झाल्यापासून महंतांनी हे एक महत्वाचे कार्यच हाती घेतले. समाजातील लोकांची दुःख, मनं जाणून घेतली, त्यावर हळूवारपणे फुंकर घातली.

यामुळे लोकांना दुःखातून बाहेर पडायला मिळाले. मग परकियांमुळे एवढे दुःखी जीवन वाटेला येते तर त्यांनांच का नाही हाकलवायचे आणि आपण आपले स्वतःचे राज्य का नाही निर्माण करायचे, हा विचार लोकांच्या मनात बिंबवायला सुरवात झाली.

मठांमुळे लोक सन्मार्गी लागले. समाजात जरी दारिद्र्य होते तरी एका बाजूला धनिक वर्ग होताच. त्यामुळे चोऱ्या–माऱ्या, लुटालुट अशा गोष्टींना वाव मिळायला लागला होता. परंतु हा सन्मार्ग नाही, वाममार्ग आहे, त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मठांमुळे समाजाला दिसला. कष्ट करून होईल तसा उदर–निर्वाह करा पण कुमार्गावरून चालू नका याची शिकवण मठांमुळे मिळाली.

त्याकाळी अडाणी जनता मोठ्या प्रमाणावर होती. साक्षरतेचे महत्व त्यांच्यापर्यंत पोहोचतच नव्हते. त्याचे फायदे लोकांना कळत नव्हते. अशा वेळी मठांनी साक्षरतेचा प्रसार केला. जास्तीत जास्त लोकांना साक्षर बनविण्याच्या कामात मठांचा मोठा वाटा आहे. त्याकाळी मुद्रणकलाच अस्तित्वात नव्हती त्यामुळे पोथ्या–पुराणे, ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथांची पुनःनिर्मिती केवळ हस्तलेखनातून चाले. त्यामुळे प्रत्येक मठात लेखन क्रियाही अखंडच चालायची. त्यामुळे साक्षरतेचा प्रसार ही गरजच होती.

सौ. कुमुदिनी देशपांडे या संदर्भात लिहितात,'' समर्थांचे मठ मूलतः अध्यात्मप्रसारासाठीच स्थापन झाले होते. पण हे कार्य करतानासुध्दा सामाजिक दृष्टीकोन त्यांनी ठेवला. ''[१४७] तत्कालीन परिस्थितीत अध्यात्माचे महत्व कमी व्हायला लागले होते. समर्थांना जे कार्य करायचे होते, जे समाजबदल घडवायचे होते त्याची बैठक त्यांना प्रथमता अध्यात्मिकच हवी होती. परमेश्वर प्राप्तीचे महत्व जाणून होते. जुलमी पातशहांना धुडकावून लावण्याकरिता, समाजातील अंदाधुंदी नष्ट करण्याकरिता प्रथम परमेश्वराचे अधिष्ठान हवे. त्यानेच समाजाचे, लोकांचे आचरण बदलेल, धर्माबद्दल अभिमान जागृत होईल, आत्मविश्वास वाढेल याबद्दल समर्थांना मोठा विश्वास होता. त्यामुळे मठांनी आध्यात्मप्रसाराचे कार्याची सुरवात प्रथम केली. अर्थात मठांनी फक्त अध्यात्म प्रसार न करता त्यामागे सामाजिक परिवर्तन अत्यंत गरजेचे आहे, या दृष्टीने इतर सर्व कार्य केले. त्यामुळे सर्व मठ प्रथम आध्यात्मिक

विद्येचे केंद्र होती. परमेश्वराची उपासना आणि परमेश्वराची प्राप्ती याकडे मठांनी लोकांची मने वळविली, त्यांना अध्यात्मिक बैठक दिली.

मठांमुळे लहान मुलांवर उत्कृष्ट संस्कार व्हायला लागले. लोक परपीडेला गांजले होते, त्यामुळे संसारातील त्यांचे लक्ष उडायला लागले होते. अशावेळी मुलांकडे कसे लक्ष देणार आणि त्यांच्यांवर काय संस्कार होणार. अर्थातच याचा परिणाम चांगला होतच नव्हता, कारण लहान मुले म्हणजे उद्याची पिढी. ती वाया जाऊन चालणार नव्हते. मग मठांनी लहानमुलांवरती संस्कार करण्यावर सुध्दा लक्ष केंद्रित केले. मठात दैनंदिन उपासना चाले, कथा–पुराणातील गोष्टी सांगितल्या जायच्या, खेळ, व्यायाम, सूर्यनमस्कार अनेक स्तोत्रांचे पाठांतर अशा उपक्रमांनी लहान मुले सुसंस्कृत व्हायला मदत झाली. अशा रीतीने लहान मुलांवर उत्तम संस्कार करणे या प्रेरणेतून मठांनी ती पिढी सुसंस्कारित बनविली.

आपल्या धर्माचा अभिमान, मठांमुळे लोकांमध्ये जागृत झाला. आपल्या हिंदू धर्माचे महत्व त्यांना समजायला लागले. मुस्लिमांनी स्वतःच्या धर्माचा प्रसार चालवला होता. जबरदस्तीने हिंदूंना धर्मांतर करण्यास भाग पाडत होते. धार्मिक असहिष्णूता सगळीकडे पसरली होती. अशा परिस्थितीत मठांमुळे लोकांच्या वैचारिक, मानसिक स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे आपोआपच त्यांच्यात आपल्या हिंदू धर्माच्या स्वाभिमानाची जागृती झाली. धर्माचे श्रेष्ठत्व समजायला लागले. अर्थातच स्वराज्य स्थापनेच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते. अशा रीतीने मठांनी आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान, धर्माच्या परंपरा याचे महत्त्व पटवून दिले.

समर्थांच्या मठांना जशी अध्यात्माची बैठक होती तेवढीच सामाजिकतेची होतीच, त्यामुळे एकाच ठिकाणी मठ आणि महंताची नेमणूक सोयीस्कर नव्हती. तर ठिकठिकाणी मठ स्थापना होत होती. महंतांची नेमणूक होत होती. समर्थांना समाजप्रबोधनासाठी ठिकठिकाणी प्रचारक पाठवायचे होते. पण संप्रदायाचे प्रचारक सुध्दा पूर्णपणे प्रशिक्षितच असे. एवढ्या महान कार्यासाठी संप्रदायाचे मठ स्थापन झाले होते. मग प्रचारकांचे हे कार्य तेवढेच महत्वाचे होते. त्यामुळे यथातथा ज्ञानाचा प्रचारक संभाव्यच नव्हते. हे प्रचारक पूर्णपणे प्रशिक्षित करण्याचे काम मठांमध्येच होई. समाजप्रबोधनासाठी बाहेर पडणारा प्रचारक हा एक प्रशिक्षित खंदा सामाजिक कार्यकर्ताच होता.

समर्थांच्या कार्यात खऱ्या अर्थाने मठ हे महत्त्वाचे होते. कानाकोपऱ्यात समर्थांनी जे मठांचे जाळे पसरविले याचा समर्थांच्या राजकारणात आणि छत्रपतींच्या राजकारणात त्यांचा मोठा उपयोग होत होता आणि अनेक अत्यंत महत्त्वाचे राजकीय संदेश तेव्हा मठांकरवी पोहोचले गेले, जायचे तेही कमालीची गुप्तता बाळगून. अशा या मठांद्वारे झालेल्या संदेशवहनाचा स्वराज्य–निर्मितीत मोठा वाटा आहे.

छत्रपती शिवराय दिल्लीला आग्र्यात औरंगजेबाच्या कैदेत होते. एवढ्या मोठ्या पहाऱ्यातून निसटणे जेवढे महत्वाचे होते तेवढेच आग्र्यातून निसटल्यावर स्वराज्यात परतणे तेवढेच मुश्किल, जिकीरीचे आणि धोक्याचे होते. आग्रा ते महाराष्ट्र त्यावेळचा काही सोपा प्रवास नव्हता. अशा वेळी समर्थांच्या ठिकठिकाणी असलेल्या मठांचा खूप उपयोग झाला होता. समर्थांनी तीर्थाटनाच्या काळात जागोजागी मठ स्थापन केले, त्यांची कार्ये नेमून दिली होती. प्रत्येक मठात अनेक शिष्य असायचे. आग्र्याहून निसटून छत्रपती पहिल्या मठात गेले आणि शिष्यांबरोबर त्यांची पुढची योजना ठरली. मठातून दहा शिष्य आणि अकरावे छत्रपती असे संन्यासी वेषात निघाले. संन्याशच्या वेषात एकतर कुणी ओळखण्याची शक्यता नव्हती आणि अडवण्याचीही नाही. एका मठातून हे अकरा जण पुढच्या मठात पोहोचायचे. त्या मठातील पुढचे दहा शिष्य निघायचे आणि पहिले दहा शिष्य आपल्या मठात परतायचे. अशा या मठांच्या आश्रयाने स्वराज्याचा पोशिंदा जाणता राजा आपल्या स्वराज्यात सहीसलामत पोहोचला. या शिष्यांनी केवढी मोलाची साथ दिली होती. याशिवाय त्यांनी जी गुप्तता बाळगली त्याला तर तोडच नाही. औरंगजेब सारख्या पाताळयंत्री बादशहाला धूळ चारण्यात या मठांनी केवढी मोठी साथ छत्रपतींना दिली होती. या मठांनी भितिग्रस्त समाजाला आधार दिला. भरकटलेल्या समाजाला योग्य दिशा दाखवली आणि भक्तीचा आणि अध्यात्माचा प्रसार केला.

अशा रीतीने समर्थांचे मठ अध्यात्माचे, समाजप्रबोधनाचे महत्वाचे केंद्र बनून मठांनी मोठ्या समाजकार्याची धुरा सांभाळली, समाजात आमूलाग्र बदल घडवून महाराष्ट्राला स्वराज्याचे सुख देण्यात मोठी भूमिका बजावली. अर्थातच महाराष्ट्रात आनंदभुवन निर्मिले, एक उत्तमपुरुष असलेला, जाणता राजा असलेल्या स्वराज्याच्या कारकीर्दीत समर्थांचे मठ अनन्यसाधारण महत्वाचे ठरले.

### ४.६ समर्थ रामदासांचे प्रमुख मठ आणि मठाधिपती

समर्थांचे प्रमुख मठ आणि मठाधिपती हे बहुतेक सर्व महाराष्ट्रातीलच आहेत कारण समर्थांच्या सामाजिक कार्याची बैठक ही महाराष्ट्रातूनच तयार होत होती. ज्या स्वराज्यस्थापनेचे स्वप्न पूर्ण करायचे होते, त्या स्वराज्याची सीमा, शिवरायांचे प्रयत्न हे या मुलुखातच सुरू होत होते. त्यांच्या कार्याची मुख्य केन्द्रे होती चाफळ, सज्जनगड आणि शिवथरघळ. या तीन केन्द्रांच्या जोडीने जी बाकी ठिकाणी केन्द्रे म्हणजेच मठ तयार होत होते, ज्यायोगे समर्थांच्या संप्रदायाचा आणि कार्याचा विस्तार होत होता, ते मठ हे प्रमुख मठ म्हणून संबोधता येतात. हे मठ सामाजिक चळवळीच्या, स्वराज्यस्थापनेच्या उद्दिष्टातून महत्त्वाची ठरणार होती. या प्रकरणात उल्लेख केलेले मठ आणि मठाधिपती अथवा महंत हे प्रमुख आहेत शिवाय या सर्व मठांची स्थापना समर्थांनी स्वतः करून समर्थांनी या महंतांना, उत्तम शिष्यांना मठाधिपतीपद दिले.

### ४.६.१ वेणास्वामी – मिरज मठ

समर्थांच्या महंत आणि शिष्यांमध्ये वेणास्वामींचे स्थान अतिशय उंचावर आहे. स्त्री–पुरूष भेदभाव समर्थांनी कधी केला नाही. त्याकाळी समर्थांनी एका स्त्रीला अनुग्रह दिला आणि ज्या विश्वासाने काही योजना मनात धरून वेणाबाईंना समर्थांनी घडविले, पैलू पाडले, तो विश्वास वेणाबाईंनी खरा करून दाखविला. समर्थांच्या या संप्रदायातील पहिली स्त्री मठाधिपती म्हणून वेणाबाईंना मान मिळाला आणि सभेत उभे राहून कीर्तन करणाऱ्या वेणाबाई या पहिल्या कीर्तनकार होत. वेणास्वामींचा समर्थांच्या जीवनातील प्रवास म्हणजे लहान वेणा, संप्रदायात प्रवेश झालेल्या वेणाबाई आणि मिरज मठाच्या पहिल्या मठाधिपती वेणास्वामी. वेणा ते वेणास्वामी हा प्रवास काही सुकर नव्हताच पण वेणास्वामींनी आपल्या कर्तृत्त्वाने कार्यसंपादनाने तो मान मिळविला होता. समर्थप्रतापकार गिरीधरस्वामी या संदर्भात लिहितात,'' वेणाबाई मुख्य भक्ती संस्थान।सदा सर्वदा समर्थध्यान।। बाहोक्षेत्रीं समर्थांसी जालें हनुमंतदर्शन। श्रीरामलिंगी देवाल्यीं ते वेळीं।। ''[१४८]

वेणास्वामी या खरंचच आपल्या आयुष्यात सदा समर्थध्यानीच होत्या. त्यांनाही हनुमंतांचे दर्शन झाले होते आणि त्या समर्थां एवढ्याच रामभक्त होत्या.

समर्थ रामदासांच्या संप्रदायात ज्या स्त्रिया मठाधिपती होत्या, त्यात वेणास्वामी ह्या उच्चस्थानावरील स्त्री मठाधिपती मानल्या जातात, कारण त्यांचे कर्तृत्व, कार्य आणि वाङ्मय अतिशय उच्च दर्जाचे आहे.

**चरित्र**

कोल्हापूर मधील एक मान्यवर दांपत्य गोपजीपंत देशपांडे आणि राधिकाबाई. उत्तम आर्थिक स्थिती असणाऱ्या गोपजीपंतांना गावात मान होता. त्यांनी अनेक लोक जोडलेले होते ते त्यांच्या सुस्वभावावर. त्यांचा लोकसंग्रह खूप मोठा होता. शेतीचा व्यवसाय करतानाच पंचांग–ज्योतिष सांगणे, पत्रव्यवहाराला मदत करणे, अडचणीत असलेल्यांच्या पाठीशी उभे रहाणे, त्यांना मदत करणे हा सुध्दा त्यांच्या आयुष्याचाच भाग होता. या दांपत्याचा स्वभाव अतिशय मनमिळावू असल्याने या देशपांडेचा वाडा म्हणजे लोकांचा आधार होता. त्याचप्रमाणे हे कुटुंब आध्यात्मिक होते. त्यांचेकडे नित्योपासना, देवधर्म चालायचा. अनेक ग्रंथांचे वाचन, निरूपण गोपजीपंत करायचे गोपजीपंतांच्या घराण्यात रामोपासना ही परंपरेनेच होती. गोपजीपंत आणि राधिकाबाई यांची पहिली दोन–तीन अपत्ये अल्पायुषी ठरल्याने दोघांच्या संसारात दुःखाची झालर लागली होती. पण रामोपासना चालणाऱ्या घरात अवकृपेला काही स्थान मिळाले नाही आणि एका गोऱ्यापान, तरतरीत आणि बुध्दीमान अशा कन्येचा जन्म त्यांच्या पोटी झाला. ही कन्या म्हणजेच वेणा, वेणाबाई अर्थातच वेणास्वामी. आपल्या आईवडिलांप्रमाणेच मनमिळावू, सुस्वभावी असलेली वेणा अर्थातच सर्वांची खूप लाडकी होती. गोपजीपंत आणि राधिकाबाईंचे अवघे जीवन या वेणा भोवती फिरायचे.

वेणा अगदी लहान वयातच आध्यात्मिक कल असलेली होती. रामोपासनेला घरात महत्वाचे स्थान असल्यामुळे वेणाच्या मनात लहानपणापासूनच रामभक्ती रुजली होती. गोपजीपंतांबरोबरच वेणाही पूजाअर्चा, कथा–पुराणात तल्लीन व्हायची. अगदी लहान वयापासूनच तिची श्रवण शक्ती अगदी तीक्ष्ण होती. रामरक्षा, विष्णूसहस्त्रनाम, शिवमहिम्न अशी अनेक स्तोत्रे तिने मुखोद्‌गत केली होती. केवळ पाठांतर न करता मोठ्या जिज्ञासू वृत्तीने ती वडिलांना सर्वांचा अर्थ समजावून द्यायला सांगत असे आणि अनेक शंकाही विचारत असे. यावरून वेणास्वामींच्या बुध्दीमत्तेची चुणूक लहानपणापासून दिसायची. मराठी ‘संत कवियत्री’ यात प्राचार्य मा. के. यादव

लिहितात,'' तिच्या प्रश्नात नुसती बुध्दीमत्तेची धार वा जिज्ञासा नव्हती तर सत्यान्वेषाची तळमळ होती. ''[१४९] गोपजीपंत वेणाच्या अध्ययनाच्या बाबतीत दक्ष होते. आपली मुलगी साक्षर असायला हवी या हेतूने पत्की नामक गुरूजींना त्यांनी वेणाला शिकवायला नेमले होते. मूळचा गोड लाघवी स्वभाव आणि कमालीची जिज्ञासू वृत्ती यामुळे पत्की गुरूजींना वेणाला शिकवायला खूप आवडत असे. नुसतेच साक्षरतेला महत्व न देता त्यांनी वेणाला ग्रंथाचे वाचन करायलाही शिकविले. अशा रितीने घरातच मिळणाऱ्या संस्काराच्या बाळकडूमुळे योग्य अध्ययनामुळे वेणा सुसंस्कृत आणि बुध्दीमान होत होती.

त्यावेळच्या रितीरिवाजाप्रमाणेच वेणाचाही विवाह वयाच्या अवघ्या ९व्या–१०व्या वर्षीच मिरजेच्या दत्तात्रय देशपांडे यांच्याशी झाला. कोल्हापूरला त्यांच्या वाड्यात साधेपणानेच पार पडला कारण तेव्हा त्या प्रांतात मुघल सत्तेचा अंमल होता. अतिशय श्रीमंत, तालेवार घरात सुसंस्कृत अशाच दत्तात्रेय या मुलाची पत्नी बनून वेणाने प्रवेश केला. तिला सासू–सासरेही अतिशय प्रेमळ मिळाले. विवाहानंतर वेणा प्रथम माहेरपणाला आली असतानाच तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी वाईट घटना घडली. ज्यामुळे एवढ्या लहान वयातच तिच्या जीवनाला कलाटणी मिळाली. त्यामुळे कदाचित 'वेणास्वामी' हे बिरूद तिला लागून खूप मोठे महत्वाचे कार्य पार पाडले. समर्थ संप्रदायात 'वेणास्वामी' हे स्वतंत्र स्थान निर्माण झाले.

वेणाचे पती दत्तात्रय देशपांडे यांचे अचानक निधन झाले. संसाराच्या, वैवाहिक जीवनाशी काही ओळख झाली नसली तरी आपण 'विधवा' झालो, एवढेच तिला समजत होते. एवढ्या लहान वयात आणि अजाणत्या वयात वैधव्य आल्याने वेणा कमालीची उदास बनली. परंतु तिचे सासू सासरे अतिशय चांगले असल्याने तिचे दैनंदिन जीवन तरी सुकर होते. अर्थातच त्या काळाप्रमाणे समाजाची करडी नजर तर वेणाला सोसायलाच लागली. मूळचीच हुषार असलेली वेणा घरकामात लक्ष द्यायला लागली. हे सर्व असूनसुध्दा नंतर तिचा कल अध्यात्माकडे झुकू लागला. अध्यात्माशी जवळीक असलेली वेणा पूर्णपणे अध्यात्मात तल्लीन व्हायला लागली. वेणाने तारूण्यात प्रवेश केला. बुध्दीवान असलेली वेणा मात्र खूप प्रगल्भ झाली. भागवत आणि भावार्थ रामायण यांसारख्या ग्रंथवाचनामुळे वेणा खूप बदलली. आता वेणाची वेणाबाई झाली. खरं तर ती लहान असतानाच चिंतनामुळे जीवनाकडे बघण्याचा वेणाबाईंचा दृष्टीकोन फारच वेगळा होता.

वैराग्याकडे त्यांची ओढ असल्याने सांसारिक जीवनात पडूच नये असे वेणाबाईंना वाटायचे पण रितीरिवाजांचा पगडा गोपजीपंत आणि राधिकाबाईंवर असल्याने त्यांना वेणाबाईंच्या विचारातील गांभीर्य न बघता त्यांचा विवाह करून दिला.

एक दिवस अचानक वेणाबाईंचा 'वेणास्वामी' होण्याऱ्या प्रवासाची सुरवात झाली. ती म्हणजे अर्थातच समर्थांची आणि वेणाबाईंची भेट. तीसुध्दा अशी की एकीकडे भागवत ग्रंथाचे वाचन, मनातून कळत नकळत येणारे सद्गुरूप्राप्तीचे विचार आणि समर्थांचे त्यांच्या वाड्यात अचानक येणे केवळ या तीन गोष्टींमुळे समर्थ संप्रदायाला वेणाबाईंच्या रूपाने हिरा सापडला.

समर्थ मिरजेत असताना एकदा भिक्षा मागायला वेणाबाईंच्या वाड्यात आले. वेणाबाई अंगणातच होत्या. तेव्हा गाईचा गोठा पाहून समर्थांनी तांब्याभर दुधाची भिक्षा मागितली. परंतु तिच्या सासूबाईंनी आतूनच उत्तर दिले की,' मारुतीच्या नेवैद्यासाठी दूध ठेवले आहे. पुढच्या घरी विचारा.' त्याचवेळेस वेणाबाईंनी समर्थांकडे बघितले. श्री 'दासायन' मध्ये श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' तिने सहज वर पाहिले तो तिला समर्थांऐवजी मारूतीरायाचे रूप दिसले. ''[१५०] वेणाबाई लगोलग आत गेल्या आणि सासूबाईंकडून दूध मिळविले. अंगणात परत येऊन बघतात तर भिक्षा मागणारा गोसावी म्हणजेच समर्थ तोपर्यंत निघून गेलेले. त्यामुळे वेणाबाईंच्या मनाला चुटपुट लागून राहिली कारण त्यांनी तेजस्वी पुरूष आयुष्यात प्रथमच पाहिला होता. हे कुणीतरी साक्षात्कारी गोसावी आहेत याची त्यांना जाणीव झाली. त्याक्षणापासूनच हा गोसावी पुन्हा भेटावा याची तळमळ वेणाबाईंच्या मनात सुरू झाली. किती दिवस झाले तरी समर्थांचे ध्यान नजरेसमोरून जात नव्हते. गुरूशिष्यांचे नातेच असे असते की त्या दोघांनाही एकमेकांची ओढ लागते.

समर्थ गावोगाव, दारोदारी भिक्षेच्या निमित्ताने जात होते पण हिंडताना त्यांचे सामाजिक भान सदैव जागरूक असे कारण त्यांना संप्रदायाची बैठक घट्ट बसवायची होती. संप्रदायाचा प्रसार करायचा होता. त्यांची नजर सतत शिष्य बनविण्यासाठी बुध्दीमान लहान किंवा अगदी विशीच्या आसपास असलेल्यांना शोधत असे कारण त्यावयातच तसे संस्कार शिष्यांवर होतात. संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात असणाऱ्या मुशीतून पूर्णपणे हवी तशी जडण-घडण होते. यावर त्यांचा विश्वास होता. अगदी तसेच वेणाबाईंच्या बाबतीतही झाले असणार. या संदर्भात प्राचार्य मा. के.

यादव लिहितात,'' वेणाबाईंना एकदा ओझरते दर्शन देऊन समर्थ निघून गेले होते. तरी ही विधवा तरूणी त्यांनी संप्रदायासाठी ओझरती पाहून निश्चित केली असणार. ''[१५१]

एकदा अचानक समर्थ पुन्हा वेणाबाईंच्या वाड्यात भिक्षेसाठी आले तेव्हा वेणाबाई अंगणातील तुळशीवृंदावनाजवळ बसून भागवत ग्रंथाचे वाचन करीत होत्या. तेव्हा समर्थांनी वेणाबाईंना विचारले,' बाळ तू काय करत आहेस? ' त्यावर वेणाबाई उत्तरल्या श्रीमद्‌भागवत वाचत आहे. समर्थ त्यावर विचारतात,'त्यातील भागवत धर्म समजला का तुला?' त्यावर वेणाबाई म्हणतात,'अगदी थोडे समजते पण काही शंका आहेत.' असे सांगून वेणाबाईंनी समर्थांना पंचवीस प्रश्न विचारले. यातून वेणाबाईंची बुध्दीमत्ता, परमार्थामधील चिंतन बघून थक्क व्हायला होते. इतक्या लहानपणी आलेल्या वैधव्याला सामोरे जाताना एकीकडे वेणाबाईंनी आपल्या अध्यात्मिक वृत्तीला जोपासले होते. त्यातील ओवीरूप प्रश्न पाहू या. त्यावरून त्यांच्या पारमार्थिक उंचीची जाणीव होते. 'श्रीदासायन' मध्ये श्री. अनंतदास रामदासी यांनी हे नमूद केले आहेत,''नमूं वागीश्वरी शारदा सुंदरी। श्रोता प्रश्न करी वक्तयासी।।१।। वक्तयासी पुसे जीव हा कवण। शिवाचे लक्षण सांगा स्वामी।।२।। सांगा स्वामी आत्मा कैसा तो परमात्मा। बोलिजे अनात्मा तो कवण।।३।। ''[१५२]

वेणाबाईंनी या वेळेपर्यंत असे किती विश्व बघितले असेल! बाहेरच्या जगात किती वावरल्या असतील? पण वेणाबाई प्रत्यक्ष समर्थांना जीव, शिव, आत्मा, अविद्या, विद्या, आद्य, माया, मूळमाया, जन्म-मृत्यु, मोक्ष वगैरे गहन, समजायला कठीण अशा विषयातील शंका विचारतात याचे आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही, तर समर्थ सुध्दा हे प्रश्न ऐकून थक्क झाले. अर्थातच समर्थांनीही तेवढ्याच अधिकाराने समर्पक उत्तरे देऊन वेणाबाईंचे शंका निरसन करून वेणाबाईंनाही आश्चर्य चकित केले. कदाचित या प्रसंगातूनच समर्थ आणि वेणाबाई, एका गुरू आणि शिष्य नात्याची वीण गुंफायला सुरूवात झाली. अशा रीतीने वेणाबाई समर्थांच्या लक्षात चांगल्याच राहिल्या, त्यांचे असामान्यत्व लक्षात आले. वेणाबाईंनाही आपले सद्‌गुरू हेच होऊ शकतात याची खूणगाठ मनाशी बांधली. पुन्हा आपल्या दैनंदिनीत आणि चिंतनात मग्न झाल्या.

या प्रश्नोत्तरानंतर वेणाबाईंच्या सासूबाईंनी समर्थांना भिक्षा घातली आणि वेणासाठी आशीर्वाद मागितला, तेव्हा समर्थांनी त्यांना रामनामाचे नामस्मरण करण्याचा आदेश दिला. आणि

सर्वांचा भविष्यात उद्धार होईल असा आशीर्वाद दिला. त्यानंतर समर्थांनीही मिरज सोडले आणि वेणाबाई पुन्हा आपल्या दैनंदिन व्यवहारात आणि आध्यात्म–चिंतनात मग्न झाल्या. पण या सद्गुरूरायांची परत भेट होणार ही आशा मनी धरूनच वेणाबाईंची पुन्हा दैनंदिनी सुरू झाली.

पुढे एकदा त्या माहेरी कोल्हापूरला गेल्या. त्याचवेळेस समर्थ उद्धवस्वामी, कल्याणस्वामी, दिवाकरस्वामी आणि इतर शिष्यांसह कोल्हापूरला आले. अंबाबाईच्या मंदिरात त्यांची किर्तने चालू झाली. वेणाबाईंचे वडील गोपजीपंत कीर्तनाला दररोज जात. वेणाबाईपण वडिलांसमवेत एक दिवस गेली. कीर्तनकारांना बघताच वेणाबाई चकित झाल्या. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही, कारण समोर प्रत्यक्ष समर्थ कीर्तन करीत होते, मग वेणाबाईसुध्दा नित्यनियमाने कीर्तनाला जायला लागल्या. वेणाबाईंचा पारमार्थिक अधिकार येथपासून उठून दिसतो. त्या वेद, माया, ब्रह्म, यावर अनेक शंका कीर्तनानंतर समर्थांना विचारू लागल्या आणि समर्थही त्यांचे शंका–निरसन करीत. परंतु कोल्हापूरातील इतर लोक नुसते कीर्तन श्रवण करीत. ते कधी कोणते प्रश्न समर्थांना विचारत नसत. त्यामुळे त्यांना वेणाबाई, एक स्त्री वेदांवर प्रश्न विचारते हे काय त्यांना रूचले नाही, ते विरोध करायला लागले, शिवाय गोपजीपंतांनाही बोलू लागले तरीपण वेणाबाई कीर्तनाला जायच्याच. अजून खूप विरोध, निंदा त्यांच्या पदरात पडणार होती. समर्थांनी आपल्या संप्रदायातला हा हिरा हेरून ठेवला होता. जशी हिऱ्याची परीक्षा करायला लागते, कस बघायला लागतो. तशीच साधकाला पण परमार्थाची परीक्षा द्यावी लागते. वेणाबाईंच्या आईवडिलांना तिच्या चारित्र्याबद्दल, शुध्दतेबद्दल यत्किंचितही संदेह नव्हता. पण गावातील लोक मात्र तिला खूप बोल लावू लागले आणि गोपजीपंतांना मुलीला विष देऊन मारायला सांगितले. गोपजीपंत जननिंदेला कंटाळून, घाबरून वेणाबाईंना म्हणाले,' तू आता घरातच बसून परमार्थ करायचा का विष प्यायचे याचा विचार कर.' पण वेणाबाई आपल्या मतावर ठाम होत्या. स्वतःवर आणि त्याहीपेक्षा जास्त समर्थांवर त्यांचा विश्वास होता. शेवटी विष प्यायला सिध्द झाली.

कोजागिरी पौर्णिमेची ती रात्र होती. गोपजीपंतांनी वेणाबाईंना दूधातून विष घालून प्यायला दिले. विषाचा असर व्हायला लागला आणि वेणाबाई निपचित पडल्या. आणि त्यांची अखेर झाली. गोपजीपंत पुढच्या तयारीला जातात आणि खोलीचा दरवाजा लावून घेतात. त्यावेळी

अंबाबाईच्या मंदिरात समर्थ कीर्तन करीत असतात पण त्यादिवशी त्यांना आंबाबाईची मूर्ती प्रसन्न वाटेना. तिचे मुखकमलावर चैतन्य दिसेना म्हणून ते काही क्षण ध्यान लावतात तर त्यांना वेणाबाईंचा विषप्रयोगाचा प्रसंग डोळ्यासमोर येतो. उध्दवस्वामींना बरोबर घेऊन ते वेणाबाईंच्या घरी आले. समर्थांनी दरवाज्याच्या फटीतून सूक्ष्म रूपाने खोलीत प्रवेश केला आणि बाहेर उद्धवस्वामींना बसायला सांगितले. समर्थांनी त्रयोदशाक्षरी मंत्र म्हणून वेणाबाईंच्या अंगावर शिंपडले. समर्थांची कृपा झाल्या झाल्या वेणाबाई पूर्ववत झाल्या. आणि समोर बघतात तर प्रत्यक्ष समर्थ, त्यांनी समर्थांच्या पावलांवर आपले मस्तक ठेवले. त्याक्षणी वेणाबाईंची देहबुध्दी नष्ट होऊन त्या आत्मबुध्दीकडे वळल्या. गोपजीपंत परत येतात तर समर्थांचा शिष्य वेणाबाईंच्या खोलीबाहेर आणि आतून बोलण्याचा आवाज. आत जाऊन बघतात तर वेणाबाई जिवंत, अगदी व्यवस्थित होत्या. त्यांची मुलगी जिवंत राहिली. त्यांना आनंद होतो. इकडे बाहेर सर्व निंदक वेणाबाईंच्या मरणाची वाट पहात असतात. पण वेणाबाईंना जिवंत पाहून त्यांचे चेहरे पडतात. त्यांना कुठे कल्पना होती की समर्थांचा काय अधिकार आहे. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' पण ज्या रामनामाने वेणाचे जीवन धन्य झाले होते ते रामनाम सर्व मांत्रिकांचे मांत्रिकाप्रमाणे प्रभावी होते.''[१५३]

गोपजीपंतांच्या अश्रूंचा बांध फुटला आणि ते समर्थांना शरण गेले. त्यावर समर्थांचे बोल म्हणजे वेणाबाईंच्या आयुष्यातील मोठे स्थित्यंतरच होते. समर्थ म्हणाले,'ज्या क्षणी तुम्ही मुलीला विष दिले त्याक्षणी ती तुम्हाला मेली. आता ती आमची कन्या झाली आहे. आता भविष्यात ती रामाच्या सेवेतच रूजू होईल.' अशा रीतीने वेणाबाईंवर सद्गुरूकृपा झाली. समर्थांनी गोपजीपंत आणि राधिकाबाईंना सांगितले,' तुमच्या वेणाला आता आम्ही आमच्या बरोबर चाफळला नेणार.' तेव्हा वेणाबाईंना ते अगदी स्वप्नवतच वाटत होते कारण त्यांना सद्गुरूकृपेची छाया कायमचीच हवी होती. त्याप्रमाणे सर्वांचीच चाफळला निघण्याची तयारी सुरू झाली. गोपजीपंत आणि राधिकाबाई समाधानाने आपल्या लेकीची सद्गुरूगृही पाठवणी करणार होते. समर्थांवर त्यांची अपार श्रध्दा होती आणि विश्वास होता. निघताना राधिकाबाईंनी 'वेणा' म्हणून हंबरडा फोडला. पण वेणाबाईंनी क्षणभरच मागे वळून पाहिले आणि लगोलग पुढची वाट चालू लागल्या. आता समर्थच त्यांचे मातापिता होते, तेव्हा हा क्षण त्यांच्या माहेरी, कोल्हापूरला शेवटचाच होता.

मिरज ते चाफळ असा सर्वांचा पायी प्रवास सुरू झाला. एवढ्या मोठ्या पायी प्रवासाचा वेणाबाईंचा पहिलाच प्रसंग होता. तिच्या दृष्टीने तो निकराचा होता तरी ती खूप उल्हसित होती. पूर्ण प्रवासभर समर्थ तिच्या स्वभावाचे निरीक्षण करत होते, पण त्याचवेळेस वेणाबाईसुध्दा समर्थांच्या स्वभावाचे निरीक्षण करीत होत्या. समर्थांचे निसर्गप्रेम, निरीक्षण शक्ती, वनस्पतीशास्त्र, आरोग्यशास्त्र याचे अफाट ज्ञान निरखित निरखितच पुढे जात होत्या. पुढे चाफळला पोहोचेपर्यंत समर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू ओळखले होते आणि समर्थांसारखा गुरू आपल्याला लाभला म्हणून त्यांना सार्थ अभिमान वाटायला लागला. कासेगांव, कऱ्हाड, उंब्रज असा प्रवास करीत सर्व जण चाफळच्या मठात आले. तिथे समर्थांनी आपल्या कन्येस, शिष्या आक्कास्वामींच्या स्वाधीन केले. समर्थांच्या इतर शिष्या कृष्णाबाई, अंबिकाबाई, सतीबाई, आपाबाई तेव्हा तिथेच रहात. त्यांच्यात वेणाबाई पूर्णपणे मिसळून गेल्या. वेणाबाईंना वाटले आता चाफळला समर्थांच्या सहवासात आपल्याला रहायला मिळेल. पण समर्थ थोडीच एका ठिकाणी वास्तव्य करायचे? ते तर सिंघणवाडी किंवा रामघळीत जायचे. मग वेणाबाई नामस्मरणात, ध्यानात रमायला लागल्या आणि रामरायाकडे पहाण्याची एक नवी दृष्टी त्यांना मिळाली.

रामरायाची सेवा करीत समर्थांच्या शिस्तीत वेणाबाई चांगल्याच तयार होऊ लागल्या. त्यांची दिनचर्या अगदी आखीवरेखीव होती. त्या पहाटे लवकर उठून मांड नदीत स्नान करायच्या. काकड आरतीला मंदिरात वेळेला हजर रहायच्या. मंदिराची झाडलोट, शेणाचे सारवण, सर्व साफसफाई नित्यनियमाने करीत. रामनामस्मरणात तल्लीन होत. समर्थांनी स्वयंपाकघर सांभाळण्याची जबाबदारी आक्कास्वामी आणि वेणाबाईंवर सोपविली होती. अत्यंत कुशलतेने त्या पाकसिध्दीची कामगिरी पार पाडत. दुपारी त्या रोज नियमितपणे अनेक ग्रंथांचे अध्यापन करीत. त्याच्यातून टिपणे काढायची पण त्यांना सवय होती. मठातील संध्याकाळची नित्योपासना करीत.

चाफळचा मठ म्हणजे मोठे अध्ययन केंद्रच होते. समर्थ जेव्हा जेव्हा चाफळला वास्तव्य करायचे तेव्हा रामरायांसमोर अनेक पदे म्हणत. वेणाबाई ती पदे उतरवून घ्यायच्या, पाठांतर करायच्या. त्यांचे आयुष्य समर्थ आणि रामराया यांच्या भोवतीच फिरत होते. समर्थांविषयीच्या आठवणी वेणाबाई लिहून ठेवीत आणि त्याचे कधी गद्यात तर कधी पद्यात रूपांतर करीत.

वेणाबाईंच्या आयुष्यात घडलेले काही प्रसंग लक्षणीय होते. दासबोध ग्रंथ लेखनाच्या कार्यासाठी समर्थ शिवथरघळला वास्तव्याला होते. त्यामुळे त्या वर्षीच्या रामनवमी उत्सवाला ते उपस्थित राहू शकणार नव्हते. तेव्हा त्यांनी वेणाबाईंना दिवाकर गोसावींबरोबर एक पत्र पाठविले आणि वेणाबाई व आक्कास्वामींना उत्सवाची जबाबदारी पार पाडावी असे लिहिले होते. इतर शिष्यांकडे कोणती कामगिरी सोपवायची हेही सांगितले.

त्याप्रमाणे आक्कास्वामी कऱ्हाड प्रांतात भिक्षेस जातात. इतरही शिष्य भिक्षेस जातात. मुख्य म्हणजे कल्याणस्वामी, उध्दवस्वामी, दिवाकर गोसावी सर्वच समर्थांसमवेत असतात. एवढ्या मोठ्या उत्सवाची तयारी वेणाबाई करू लागतात. परंतु एक–दीड महिन्यांनी वेणाबाई खूप आजारी पडल्या. तरीसुध्दा त्यांच्या दिनचर्येत फरक न पडता त्या उत्सवाची तयारी करीत होत्या. उत्सव पंधरा दिवसांवर येऊन ठेपला आणि त्या तापाने इतक्या फणफणल्या की, शारीरीक कष्टाने त्यांना यातना होऊ लागल्या, अखेरीस त्या रामरायाला शरण गेल्या आणि त्यांनी प्रार्थना केली की,' आता रामराया तुम्हीच माझी व्यथा समजून घ्या. तुम्ही मला सहाय्य करा. 'वेणास्वामींनी रामरायाची अशी करूणा भाकली की रामरायाच्या नयनात अश्रू आले. या संदर्भात प्रा. मा. के. यादव लिहितात,'' भगवंतासाठी रडणारे भक्त महाराष्ट्राच्या आध्यात्मीक इतिहासाने अनेक पाहिले पण भक्तासाठी रडणारा भगवंत चाफळच्या मंदिरात वेणाबाईंनी पाहिला.''[१५४] वेणाबाईंना भगवंतांनी आक्कास्वामींनी पाठविले असे सांगून भगवंत स्वतः रामाबाईच्या रूपाने मठात राहिले. वेणास्वामींनी पूर्णपणे विश्रांती घेतली आणि रामरायाने म्हणजे रामाबाईने उत्सवाची संपूर्ण जबाबदारी पार पाडली. श्रीरामांनी सर्व वेणाबाईंसाठी केले अगदी त्यांच्या पथ्यपाण्यासह. काय अधिकार व योग्यता ही वेणाबाईंची! समर्थ उत्सवाला येऊ शकले नाहीत. आक्कास्वामींनी सर्व वृत्तांत ऐकला आणि म्हणाल्या,' सर्व तर रामरायाची लीला, मी तर कुणालाच मदतीला पाठविले नाही. स्वतः रामरायाने उत्सवाची कामे केली आणि तुझी देखभाल केली, वेणा तू धन्य आहेस. प्रत्यक्ष रामरायांना जिंकलेस. अर्थात नंतर समर्थांना हे समजलेच त्यांनी वेणाबाईंना बजावले की परत रामरायाला वेठीस धरायचे नाही.

प्रत्यक्ष रामरायाने एक वृत्तांत वेणास्वामींना सांगितला. एकदा समर्थ ब्रह्मारण्यात संचार करत असताना भिक्षेच्या वेळेस एका झोपडीत एक ब्राह्मण दांपत्याने अर्थातच जानकी–राम त्यांना

भोजनासाठी बोलावले. ब्राह्मणाने स्वतः ताट मांडले, पत्नीने वाढले, पाणी दिले. नंतर तांबूल दिला. समर्थप्रतापकार गिरीधर म्हणतात,'' एवं जानकीकांते भक्ती वेणीसी सांगितले।। वेणाबाईहिं बाइया संस्थानीं निरोपिले। बाइया स्वामीहिं सेवकासी कथिले। सेवकें लिहिलें यथार्थ ही।। ''[१५५] वेणाबाईंवर स्वतः रामरायाचे केवढे प्रेम होते की त्यांच्यांशी ते संवाद साधतात आणि समर्थ सुध्दा तोच प्रसंग सांगतात.

एखादी वावगी गोष्ट कुणी न करण्यासाठी वेणास्वामींचा धाक असे. वेळ पडली तर त्या परखडपणे बोलत. एकदा एक शिष्य पलंगावर बसून दासबोध ग्रंथाचे वाचन करीत होते. वेणास्वामी तिथून जात असताना त्यांना हे दृश्य दिसले. वेणाबाईंना खूप संताप आला. परंतु त्यांनी त्या शिष्याला सरळ जाब न विचारता त्याच्या समोर येऊन त्याला नमस्कार केला. तो म्हणतो,'हे काय करता आहात?' तर वेणाबाईं उत्तरल्या,' नमस्कार तुम्हाला नाही 'श्रीग्रंथराज दासबोधांचा' हा सन्मान होता.' वेणास्वामींचे इतरत्र चांगले लक्ष असे. समर्थांनी तर त्या शिष्याचा चांगलाच समाचार घेतला. परंतु त्या आधीच वेणास्वामींनी ही गोष्ट दुर्लक्षित न करता त्या शिष्याला 'दासबोध ग्रंथ म्हणजे प्रत्यक्ष समर्थ' अशी जाणीव करून दिली.

वेणास्वामींना शिवरायांबद्दल खूप प्रेम आणि अभिमान होता, राज्याभिषेकानंतर शिवराय एकदा चाफळला आले, तेव्हा चाफळ मठात त्यांचे मोठे स्वागत झाले. सनई–चौघडे, गुलाबाच्या फुलांची उधळण, अत्तराचे सडे याबरोबरच वेणाबाईंनी त्यांना कुंकुमतिलक लावून अगदी बहिणीसारखे निरांजनाने ओवाळले. याने शिवराय फारच गहिवरले. सर्वांचे प्रेम पाहून भारावले. ते वेणाबाईंना म्हणाले,'तुम्हा सर्वांचा अधिकार फारच मोठा आहे. आम्ही संसारात आणि राजकारणात गुंतून राहिलेली माणसं' वेणाबाईंची योग्यत प्रत्यक्ष शिवरायांनी, एका छत्रपतींनी मान्य केली होती. हा संवाद एवढ्यावरच नाही थांबला. वेणास्वामींची सामाजिक स्थितीची एक विलक्षण जाणीव आपल्याला जाणवते. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,''वेणास्वामी लडिवाळपणे म्हणाल्या,' राजे आपण आहात म्हणून आम्ही स्त्रिया, पतिव्रता म्हणून, साध्वी म्हणून स्वाभिमानाने जगू शकतो. तुमचे राज्य म्हणजे जणू रामरायांचे राज्य. ''[१५६] छत्रपतींना योग्य मान द्यायला त्या विसरल्या नाहीत. राज्यातील घडामोडींवर त्यांचे लक्ष असे.

एकदा शिवथरघळला धबधब्याखाली वेणाबाईंनी सकाळी सूर्योदयसमयी स्नान केले आणि आपले लुगडे खडकावर वाळत टाकून घळीमध्ये अनुष्ठान करीत बसल्या. तीनचार तासाने त्या बाहेर आल्या तर त्यांचे लुगडे तिथे दिसले नाही. तेवढ्यात समर्थ आणि कल्याणस्वामी समोरून येताना त्यांना दिसले. वेणाबाईंचे लुगडे समर्थांच्या गळ्यात रामदासी वस्त्राप्रमाणे बांधले होते. त्या क्षणभर लाजल्या. समर्थांशी कसे बोलावे हे त्यांना कळेना. पण त्यांचे भाव समर्थांच्या लक्षात आले तेव्हा समर्थ वेणाबाईंना म्हणतात,' आमच्या सहवासात राहून तुझी देहबुध्दी कशी गेली नाही? ' स्त्री–पुरूष भेद नष्टच झाला नाही तर आत्मसाक्षात्कार कधीच होणार नाही. समर्थांनी यावेळी वेणाबाईंना खूप उपदेश केला. या उपदेशाने वेणाबाईं मात्र समाधान पावल्या कारण त्याक्षणीच त्यांच्यात जी काही थोडी देहबुध्दी होती ती समूळ नष्ट झाली. आपले वस्त्र समर्थांनी निर्मळ मनाने गळ्यात बांधले त्याचा मोठा अभिमान वाटला. हेच वस्त्र त्यांनी निर्याणसमयी मुद्दामहून परिधान केले होते. यावरून त्यांचे समर्थांवरील प्रेम, निष्ठा दिसून येते.

समर्थांबरोबर कल्याणस्वामी बहुतेक वेळेस असत. त्यामुळे किती वेळा शंका निरसन करायचे काम किंवा एखाद्याची मिजास उतरवायचे काम समर्थ कल्याणस्वामींना सांगत, एवढी योग्यता त्यांची होती. तसेच अनेक वेळा समर्थांनी वेणास्वामींना देखील उत्तरे द्यायला लावली आणि त्याही योग्य प्रकारे शंका निरसन करीत. वेळप्रसंगी गर्वपरिहार करीत. एकदा एकजण समर्थांकडे आला. तो अतिशय चिकित्सक होता. अनेक प्रश्न विचारण्याचे ठरवूनच तो आला होता. त्याने समर्थांना विचारले,'आमच्यापाशी भरपूर संपत्ती, संतती आहे त्यामुळे आम्ही सुखी–समाधानी आहोत. परंतु तुम्ही तर निस्पृह महंत, संपत्ती–संतती तुमच्याकडे नाही, मग तुम्हाला कसले सुख आणि समाधान?' यावेळेस वेणास्वामी ही तिथे उपस्थित होत्या. समर्थांनी त्याच्यांकडे पाहून किंचित स्मित केले. त्यावरून या तरूणाच्या प्रश्नाला उत्तर द्यायचे त्यांनी ओळखले. त्या तरूणाला त्यांनी अतिशय समाधानकारक ज्ञानदेवांसारखे दाखले देऊन गप्प केले. त्यांनी ज्ञान, वैराग्य, शिष्य परिवार यांबद्दल बोलून त्याचे समाधान केले. अत्यंत प्रेमाने, सालसतेने वेणास्वामी तरूणाशी बोलत होत्या. त्यांचे ज्ञान, त्यांची वाणी, प्रखरता तेवढीच सालसता पाहून त्याने वेणास्वामींना आदरपूर्वक नमस्कार केला. त्यांच्या चोख उत्तराने तो तरूण लज्जीत झाला. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर म्हणतात,'' बाळ ज्ञान आणि वैराग्य ही समर्थांचे जवळची कधीही न संपणारी संपत्ती आहे. आपल्या सर्व शिष्यांनी त्यांनी ही संपत्ती मुक्त

हस्ताने वाटली, परंतु ही संपत्ती वाटल्यानंतर कमी होण्याऐवजी वाढलीच. समर्थांचे ज्ञान आणि वैराग्य वाढलेच. संततीचे म्हणाल तर आम्ही सारी शिष्यमंडळी म्हणजे त्यांची संततीच होय.''[१५७] या उत्तरावरून वेणास्वामींचा आत्मविश्वास, ज्ञानाची खोली कळ्ते.

प्रत्यक्ष हनुमंताचे सगुण दर्शन वेणाबाईंना झाले होते. समर्थांना नेहमी जेवणाचे ताटात सर्व जिन्नस पुरेसे होतील एवढे ताट एकाच वेळी भरून द्यायला लागत असे. शिवाय समर्थांची आज्ञाच होती की जेवत असताना एकदाच काय ते सर्व जिन्नस वाढावेत परत आत येऊ नये. एकदा वेणाबाई समर्थांचे ताट वाढून नेतात आणि जाताना खोलीचा दरवाजासुध्दा लावून जातात. एकदा एक पदार्थ वाढायचा विसरला म्हणून त्या दार उघडून खोलीत जातात तर त्यांना एकदम अलौकिक दृष्टांत झाला. स्वतः मारूतीराया खोलीत भोजन करत होते. या संदर्भात प्रा. मा. के यादव लिहितात,'' साक्षात वज्रदेही मारूतीरायाच भोजनास बसले होते. आश्चर्यचकित झालेल्या वेणास्वामी मारूतीरायाला वंदन करीत असतानाच मूर्च्छित होऊन पडल्या. ''[१५८] पण पडताना त्यांचे हात तोपर्यंत मारूतीरायांच्या चरणांना भिडले होते. त्या दर्शनाने वेणास्वामी कृतकृत्य झाल्या. खरेतर मारूतीरायाने दर्शन देण्याएवढा अधिकार, योग्यता वेणास्वामींनी मिळवली होती. साक्षात मारूतीरायांचे सगुण दर्शन होणे वेणास्वामींच्या नशिबातील एक उत्तम योग होता. या सर्व प्रसंगावरून लक्षात येते की वेणास्वामींचे ज्ञान, भक्ती, निष्ठा, अध्ययन, प्रसंगाची जाण, प्रत्येक कार्यातील तत्परता, विचारीपणा हे सर्वच अलौकिक होते.

समर्थांना एक नैसर्गिक नियमाची जाणीव नेहमीच असायची ती म्हणजे एका मोठ्या वृक्षाखाली दुसरा मोठा वृक्ष वाढू शकत नाही. अगदी त्याचप्रमाणे त्यांना आपल्या संप्रदायात पण हाच नियम असावा अशी इच्छा असायची. तसेच अगदी वेणाबाईंच्या बाबतीत त्यांनी विचार केला होता. एक कर्तबगार, शिष्या,रामराया आणि मारूतीरायांवर भक्ती, निष्ठा असणाऱ्या वेणाबाई जर इथेच चाफळ मठात राहिल्या तर शेवटी त्या आपल्याच अधिपत्याखाली राहतील, त्यांचे असामान्य व्यक्तिमत्त्वव, कर्तृत्व याला वाव मिळणार नाही शिवाय समर्थांनी तिला आपली कन्या मानल्याकारणाने आणि वेणाबाईंनीही समर्थांनाच आपले पालक मानल्याकारणाने दोघांना ऐकमेकांची खूप सवय झाली होती. पण संप्रदायाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर समर्थांना वाटले की आपण वेणाबाईंवर अन्याय करतो आहोत. त्यांच्या असामान्य कर्तृत्वाला एक प्रकारे कुंपण

घातले आहे. ते फुलले पाहिजे म्हणून समर्थांनी वेणाबाईंना एक मठ स्थापन करून देऊन त्याचे आधिपत्य करण्याचे ठरविले. तसेच शिष्य संप्रदाय वाढावा, समाजप्रबोधन व्हावे या हेतून समर्थ यावर विचार करू लागले आणि तसा योग जुळून येण्यासाठी एक विलक्षण घटना घडली.

वडगावच्या जयरामस्वामींची मिरजेत किर्तने चालू होती. मिरज किल्ला आणि तो सर्व परगणा हा सरदार दिलिलखानच्या ताबेदारीत होता. हा दिलिलखान हिंदू धर्माचा कट्टर विरोधी असल्याने तो हिंदूचा अन्वनित छळ करीत असे आणि मुस्लिमधर्म स्वीकारायला सक्ती करत असे. एकदा जयराम स्वामींचे कीर्तन चालू असताना दिलिलखान तेथून चालला होता. त्यांच्या किर्तनाचा विषय होता संत ज्या मार्गाने जातात त्या मार्गाने आपण गेलो तर आपल्याला रामरायाचे दर्शन नक्की होते. दिलिलखान ते ऐकून तिथे थांबला. त्याने या विषयाचा, या बोलण्याचा शब्दशः अर्थ घेतला आणि कीर्तन थांबवून जयरामस्वामींना तो म्हणाला,‘तुम्ही पावलं चाला मीही त्याच मार्गाने चालतो, मला राम भेटवा’ यावर जयरामस्वामी म्हणतात,‘मी पारमार्थिक अर्थ सांगितला तो काही शब्दशः घ्यायचा नाही.’ परंतु दिलिलखान हट्टालाच पेटला त्याने जयरामस्वामींना धमकावले आता राम दाखवा नाहीतर धर्म सोडा. त्यावर जयरामस्वामी म्हणतात,‘ मी नाही पण आमचे समर्थ तुम्हाला राम भेटवतील.’ म्हणून जयरामस्वामींनी आपल्या गोपाळ नावाच्या शिष्याला समर्थांना बोलावण्यासाठी पाठविले. त्यावेळी समर्थ मिरजेतच होते आणि कृष्णा नदीत स्नान करीत होते. त्यानंतर समर्थ तिथे जातात आणि समर्थ दिलिलखानला म्हणतात,‘माझ्या मार्गाने चाल मागोमाग मी तुला राम भेटवतो.’ असे म्हणून समर्थांनी सूक्ष्मरूप धारण केले आणि टेहळणी छिद्रातून पलिकडे गेले आणि दिलिलखानाला म्हणाले,‘ ये माझ्या मागोमाग तर दिलिलखान मुख्य दरवाजातून यायला लागला. मी जसा आलो, तसाच ये समर्थ म्हणाले आणि मगाशी कसा शब्दशः अर्थ घेतलास मग आता ये.’ दिलिलखानाला स्वतःची चूक समजली. समर्थांच्या बोलण्यातील अर्थ त्याला उमगला, अगदी मनापासून दिलिलखान एक मुस्लिम सरदार असून सुध्दा, हिंदू धर्माची ध्वजा ज्यांना फडकवत ठेवायची होती, अशा समर्थांना शरण गेला. समर्थांकडे त्याने अनुग्रह मागितला, समर्थांनीही मोठ्या मनाने त्याला अनुग्रह दिला. त्याने समर्थांना विनंती केली की त्यांना मिरजेत मठ स्थापून देतो, आता तिथेच वास्तव्य करावे. परंतु समर्थ एके ठिकाणी जास्त काळ राहत नाहीत म्हणून त्यांनी सांगितले

की,'येथे किल्ल्यात एक मारूती स्थापन करून देतो आणि इथे एक मठ स्थापना होऊन त्याचे अधिपत्य वेणाबाईंकडे असेल. त्या या मठात संप्रदायाचे कार्य करतील.'

श्री. सुनील चिचोलकर या संदर्भात लिहितात,'' ब्राह्मणपुरीत हिचे सासू–सासरे असतात. देशपांडे त्यांचे नाव. तो परिसर देशपांडे यानांच द्या. ही पोर तेथे मठी स्थापून वास्तव्य करेल.''[१५९] अशा प्रकारे समर्थांनी मिरजेला मठ स्थापना करून वेणाबाईंची नेमणूक करायचा निर्णय घेतला. अशा रीतीने समर्थांनी शके मिरज येथील देशपांडे वाड्यात वरदहस्त मारूतीची स्थापना करून त्यांची सूत्रे वेणाबाईंच्या हातात दिली आणि वेणाबाई पहिल्या स्त्री मठाधिपती झाल्या. वेणाबाईंच्या 'वेणास्वामी' झाल्या. दिलिलखानाने समर्थांची आज्ञा पाळली. ब्राह्मणपुरीचा परिसर त्यांनी समर्थांना अर्पण केला. आणि हेच स्थळ, मठ समर्थ संप्रदायाचे महाराष्ट्रातील एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक केंद्र झाले.

वेणास्वामींच्या सासू–सासऱ्यांना हा मोठा आनंदाचा धक्काच होता. रामरायाची, मारूतीरायाची ज्या वाड्यात उपासना होत होती, त्याच वाड्यात समर्थांच्या हस्ते वरदहस्त मारूतीची स्थापना होऊन एक मठ स्थापन झाला. ते धन्य झाले. सूनेची ताटातूट होऊन अनेक वर्षे लोटली होती आणि सूनेचा सहवास आता कायमचा लाभणार, अजून उत्साहात येथे रामराया आणि मारूतीरायांची उपासना होणार या विचाराने वेणास्वामींचे सासू–सासरे हर्षभरित झाले. शिवाय ज्या वाड्यात लहान वेणाने पती निधनाची दुखःद घटना पचवली त्याच वाड्यात सद्‌गुरू समर्थांच्या कृपेने तिचे अध्यात्मिक जीवन सुरू होऊन तेथील मठाधिपती वेणास्वामी म्हणून नावारूपाला आली.

समर्थानी स्थापन केलेला हा मारूती आगळावेगळा आहे. वरदहस्त रूपातील हा मारूती गोमय आणि सप्तकडधान्ये वापरून तयार केला आहे. मुख्य म्हणजे त्याच्या डोळ्यात नीलमणी बसविला आहे. रामेश्वरला जाताना बेळगावमध्ये एक रत्नपारखी भेटला होता. त्याला त्वचारोग झाला होता. आणि समर्थांनी त्याला परत येईपर्यंत महिपाळगडच्या गुहेत रामनाम स्मरण करायला सांगितले. त्याने समर्थांची आज्ञा पाळली, समर्थ परत येईपर्यंत तो पूर्ण बरा झाला होता म्हणून त्याने समर्थांना गुरूदक्षिणा म्हणून हा नीलमणी दिला होता. सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या या

मारूतीचे दर्शन घेतल्याने स्त्रियांना शनीचे दर्शन घेतल्याचे पुण्य मिळते कारण स्त्रियांना शनीदर्शन घेता येत नाही.

याचबरोबर समर्थांनी स्वतः आपल्या आयुष्यातील ३६वर्षे पूजा केलेले रामपंचायतन वेणास्वामींना प्रसाद म्हणून दिले. हे श्रीराम मात्र ध्यानस्थ रूपातील आहेत. सात–आठ दिवस समर्थ आणि त्यांचे शिष्य काही दिवस तेथे राहिले. वेणास्वामींवर मठपतीचे विधिवत संस्कार केले आणि इतिहास घडविण्याऱ्या पहिल्या स्त्री मठाधिपती वेणास्वामींचा एक सांप्रदायिक कार्यकर्ती म्हणून कार्याचा श्रीगणेश झाला, तेही तत्कालीन सामाजिक स्थितीत. समर्थांनी वेणास्वामींच्या हातात झोळी दिली आणि वेणाबाई, समर्थ, इतर शिष्य मिरज गावात भिक्षा मागायला बाहेर पडले. एक नवे चैतन्यच मिरजेत पसरले.

मठात मारूती, रामपंचायतन आणि समर्थ पादुकांचे अधिष्ठान आहे. या समर्थांच्या पादुका म्हणजे समर्थांनी स्वतः वापरत असलेल्या खडावा होत्या. केवळ मठात अधिष्ठान हवे म्हणून आणि सद्‌गुरू आता सोडून जाणार, तर त्यांच्या चरण पादुका हव्या म्हणून वेणास्वामींनी त्यांचा हट्ट धरला होता. याच पादुका आजही सज्जनगडाच्या भिक्षा दौऱ्यात असतात. शिवाय समर्थांच्या अजून एक पादुका तिथे आहेत. त्याम्हणजे समर्थांनी दिलिलखानला दिलेल्या. दिलिलखानाने स्वतःच्या शेवटच्या काळात आणून दिल्या कारण त्याची व्यवस्था नंतर नीट पार पडावी म्हणून. दिलिलखानची समाधी मठा समोर जिथे मारूती स्थापन केला, तिथे आहे. कारण तिथेच त्याचे दहन व्हावे अशी इच्छा होती.

समर्थांनी वेणास्वामींवर विधिवत मठाधिपतीचे संस्कार केले आणि सात–आठ दिवसांनी समर्थ परत चाफळला गेले. त्याक्षणापासून वेणास्वामींना पूर्ण जाणीव होती ती आपल्या कर्तव्यपूर्तीची. समर्थांनी आपल्याला संप्रदायाच्या कार्य विस्तारासाठीच मिरजेत मठ स्थापून दिला हा हेतू त्या जाणून होत्या, लगेच त्यांनी आपल्या कार्याला प्रारंभ केला.

## कार्य

वेणास्वामींनी मिरजेत मोठी आध्यात्मिक चळवळ केली. त्यांचा मठ या आध्यात्मिक चळवळीचे स्फूर्तीस्थानच होते. लोकांना आध्यात्माची गोडी लागावी, सामाजिक बदलासाठी

आध्यात्मापासून सुरवात झाली तर त्याची पकड चांगली धरली असते यावर वेणास्वामींचा विश्वास होता. वेणास्वामी उत्तम कीर्तनकार होत्या. जगातील पहिल्या स्त्री कीर्तनकार म्हणून त्यांचा मान होता. शिवाय समर्थांनी त्यांना उभे राहून कीर्तन करण्याची परवानगी दिली होती. श्रीरामचंद्र, हनुमंत यांच्या कथा, यांच्या वरील अभंग त्या कीर्तनात निरूपणासाठी घेत. अस्खलित मराठी, वाक्योच्चार, लयबध्दता, विषयाची निवड, विषय बोलताना त्यावरील पकड, पुराणातील उदाहरणे, ओघवती वाणी अशा अनेक वैशिष्ट्यांनी वेणास्वामी श्रोत्यांवर विलक्षण छाप पाडत. अर्थातच त्यांच्या कीर्तनाच्या विषयात सामाजिक ऐक्याची जाणीव लोकांना करून देणे यावर भर असे. तत्कालिन राजकीय स्थितीत सामाजिक ऐक्याची किती गरज आहे हे त्या कीर्तनातून सफाईदारपणे पटवून देत. श्रीरामांचे चरित्र त्या वारंवार कीर्तनातून मांडत त्यामुळे लोकांची, मुख्यत्वे करून तरूण आणि लहान मुले यांच्या पुढे श्रीरामांचा आदर्श निर्माण होऊ लागला. शिवाय कीर्तनात स्वतःचे अभंग म्हणून त्या स्वतः चाल लावून म्हणायच्या, श्रोते अगदी मंत्रमुग्ध होऊन जात. कारण त्यांचे अभंग आणि चाली प्रासादिक होत्या. आपल्या कीर्तनातून त्यांनी अवघे रामचरित्र गाऊन रामकथेचा प्रचार केला. लोकांमध्ये रामभक्ती निर्माण केली. गागाभट्टांसारख्या विद्वान पंडितांनी वेणास्वामींची कीर्तने समोर बसून ऐकली आहेत आणि त्यांची प्रशंसा केली आहे.

वेणास्वामींनी मठात किशोरवयीन मुलांसाठी संस्कार केंद्र चालू केले. रोज संध्याकाळी जवळजवळ १००–१२५ मुले उपासनेसाठी येत. त्या मुलांकडून अनेक अभंग, स्तोत्रे, पदे पाठ करून घेत असत. त्यात सर्व संतांचे अभंग समाविष्ट करीत त्यामुळे सर्व संतांची त्यांना ओळख होऊ लागली, त्यांचे चरित्रही वेणास्वामी मुलांना समजावून सांगत. त्यांच्या गोड आवाजामुळे अनेक कथा ऐकायला मिळतात म्हणून मुले न चुकता नित्योपासना करीत. याचबरोबर वेणास्वामी त्यांच्यावर इतरही संस्कार करीत. उठणे, बसणे, वागणे, बोलणे, आचार–विचार कसे चांगले असावेत हे शिकवण्यावरही त्यांचा कटाक्ष असे शिवाय त्याही शिस्तिच्या भोक्त्या असल्याने मुलांना शिस्त लावण्याकडे त्यांचे लक्ष असे, त्यामुळे मुलेही चांगलीच तयार व्हायला लागली. समर्थांप्रमाणेच वेणास्वामीही मुलांना बलोपासनेचे महत्व समजावून सांगत, त्यासाठी मुलांना हनुमंताच्या शौर्याच्या, पराक्रमाच्या कथा सांगत, त्याचबरोबर हनुमंताची निष्ठा, रामभक्ती मुलांना ऐकवत. यामुळे मुलांनाही व्यायामाची गोडी लागली. शारिरीक तंदुरूस्तीकडे मुले लक्ष देऊ

लागली. मानसिक सुदृढता मुलांमध्ये लहानपणापासून विकसित कशी होईल याकडे वेणास्वामी जाणीवपूर्वक लक्ष देत. मन चांगले असावे, मनात नेहमी शुध्द विचार यावेत, मनोबल कसे वाढेल यासाठी त्या अनेक आदर्श व्यक्तींचे आदर्श त्यांच्या समोर मांडत, शुध्द चारित्राचे महत्त्व पटवून देत. शक्ती बरोबरच युक्ती पण श्रेष्ठ असते हे समजून सांगत.

## वेणास्वामींची वाङ्मय निर्मिती

वेणास्वामींनी सात प्रकारची रामायणे लिहली. तसेच स्फुट रचना, पदे, अभंग, आरत्या यांची रचना केली. 'सीतास्वयंवर' हा त्यांचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा ग्रंथ. त्यांचे प्रत्येक वाङ्मय प्रासादिक आहे. त्यातून त्यांची रामभक्ती, सद्‌गुरूंबद्दलची निष्ठा, स्नेह दिसतो. त्यांची साध्या, सोप्या, तितक्याच रसाळ भाषेतील शब्द रचना अतिशय मोहवून टाकणारी, हृदयाला भिडणारी आहे. समर्थांनी त्यांना आशीर्वादच दिला होता की त्यांची प्रज्ञा शक्ती त्यांच्याकडून काव्यलेखन, ग्रंथलेखन करवून घेईल. समर्थांचा आशीर्वाद वेणास्वामींनी सार्थ करून दाखविला. वेणास्वामींच्या रामकथा लोक गोडीने वाचू लागले, त्यांचे भक्त वेणास्वामींची कवने पाठ करीत, पूजा अर्चा करताना त्याचे पठण करीत. त्यांचे अभंग तल्लीन होऊन गाऊ लागले. अशा प्रकारे वेणास्वामींनी रामकथेचा, रामचरित्राचा प्रसार केला आणि रामायणातील विचार लोकांच्या मनापर्यंत पोहोचवले.

समर्थांनी वेणास्वामींना संप्रदाय विस्तारासाठी मठ स्थापून दिला. त्यानंतर वेणास्वामी तेवढ्यावरच थांबल्या नाहीत. संप्रदायाच्या विस्ताराचे मोठे आणि महत्वाचे कार्य त्यांनी पार पाडले. श्रीसमर्थप्रतापकार गिरीधरस्वामी म्हणतात,'' वेणाबाईपासूनि कितेक महंत जाले। उत्तरभूमीसी बहुधा गेले। त्रिवेणी अंतर्वेदी राहिले। अयोध्या समीप करूनियां।। ''[१६०] वाङ्मयनिर्मिती, कीतर्नकार्य, संस्कार–बलोपासना केंद्र याबरोबर सर्वात मोठे कार्य म्हणजे शिष्य संप्रदाय वाढविणे. मठांचे जाळे पसरविणे हे होते. वेणास्वामींनी इतर कार्याबरोबरच शिष्यसंप्रदाय वाढविण्याकडे जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित केले. गिरीधरस्वामी म्हणतातच,'नुसत्या महाराष्ट्रातच नाही तर उत्तर भारतात पण इतरत्र मठ स्थापन होऊ लागले. शिष्य पसरू लागले. त्यांच्या स्त्री–शिष्याही होत्या. बाईयाबाई, आक्काबाई, बाकुबाई, मुथाबाई, भीमाबाई या त्यांच्या स्त्री– शिष्या होत्या. त्यांना वेणास्वामींनी अनुग्रह दिला होता. तसेच उत्तर भारतातील प्रयाग येथील वेणीमाधव

हा त्यांचा महत्त्वाचा अधिकारी शिष्य होता. या सर्व कार्यातून वेणास्वामींचा अधिकार, त्यांची योग्यता, नीती याचा प्रत्यय येतो.

स्वतः समर्थांनी वेणास्वामींचे कार्य प्रत्यक्ष पाहिले होते आणि अत्यंत समाधानी होते. ते एका प्रसंगावरून कळते. समर्थांनी एकदा अचानक मिरज मठाला भेट दिली. समर्थ सायंकाळी पोहोचले होते. मठाजवळ आल्यानंतर त्यांना मठातून काही किशोरवयीन मुलांच्या एकत्रित पठणाचा आवाज कानी पडू लागला. अगदी मठापाशी आल्यानंतर अत्यंत नाजूक स्वरातील पसायदान ऐकू येत होते, त्यावर पाठोपाठ ही मुले अगदी एका स्वरात म्हणत होती. समर्थांच्या ताबडतोब लक्षात आले की वेणास्वामी हे पठण मुलांकडून घेत होत्या. मुलांच्या पठणात एक सुसूत्रता समर्थांना जाणवत होती आणि त्यावरून मठात दैनंदिन उपासना होते. म्हणजे मठाचे कार्य व्यवस्थित चालू आहे याची खात्री त्यांना त्याचवेळेस पटली. त्यांचे पठण पूर्ण झाल्यावरच समर्थांनी मठात प्रवेश केला. ती सर्व मुले समर्थांना पाहून आनंदीत झाली. तर वेणास्वामी इतक्या बावरून गेल्या की समर्थांचे स्वागत कसे करावे हे काही सुचेना. भानावर आल्यावर वेणास्वामींनी काशिराज नावाच्या मुलाला समर्थांचे पाय धुण्यास पाणी आणायला सांगितले. त्याने रामरायांच्या मूर्ती पुढे ठेवलेला पूजेचा पाण्याचा तांब्याच दिला. त्यावर समर्थ म्हणाले,'देवपूजेचे पाणी पाय धुवायला देणार? देव मोठा की गुरू मोठा?' यावर वेणास्वामींनी असे समर्पक उत्तर आपल्या सद्‌गुरूंना दिले की ते निरूत्तर झालेच शिवाय वेणास्वामी योग्य प्रकारे कार्य करीत आहेत याचाही प्रत्यय आला. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' सद्‌गुरूहून देव मोठा। जयास वाटेल तो करंटा। या दासबोधातील वचनाचे संस्करण या मुलांचे अंतःकरणावर खूप खोलवर बिंबवले गेले आहे. खुद्द रामरायास्वरूप दारी आले असता पाणी रामरायाचेसाठी दडवून ठेवण्यात काय हाशील? ''[१६१] आपल्या प्रिय शिष्येकडून हे स्पष्टीकरण ऐकल्यावर समर्थांना खूप समाधान वाटले.

समर्थ शिष्या वेणास्वामी अतिशय बुध्दीवान, निष्ठावान तर होत्याच, पण त्या तेवढ्याच प्रतिभावानही होत्या. त्यांची प्रतिभा विलक्षण, असाधारण होती. वेणास्वामींच्या हस्ते लिखित झालेले वाङ्मय खूप सुंदर आहे. त्यांच्या वाङ्मयाचे विषय चांगले आहेत. त्यांच्या वाङ्मयातील भाषा अगदी प्रासादिक होती. त्यांची भाषाशैली स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची होती. वेणास्वामी त्यांच्या

आयुष्यातील प्रसंगांमुळे तावून सुलाखून निघाल्या होत्या. समर्थांच्या सहवासात असताना त्यांच्या एकंदरीत जीवनावरच म्हणजे त्यांच्या देहबोलीवर, वाणीवर, प्रतिभेवर समर्थांचा ठसा होता. त्यांची निष्ठा आणि बुध्दीमत्ता पाहूनच समर्थांनी त्यांना त्यांच्या स्वतंत्र वाङ्मय-निर्मितीचे स्वातंत्र्य दिले. पण वेणास्वामींनीही तेवढ्याच विश्वासाने, प्रतिभेने वाङ्मयलेखन केले. त्यांचे प्रत्येक ग्रंथ, श्लोक, स्फुटप्रकरणे, पदे, स्तवन, अभंग, आरत्या वगैरे वाङ्मयात त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व जाणवल्याशिवाय रहात नाही यासंदर्भात प्राचार्य मा. के. यादव लिहितात,'' संयमित जीवन, कोमल अंतःकरण, प्रखर प्रज्ञा आणि असाधारण प्रतिमा लाभलेल्या वेणाबाई साक्षात्कारी संत, थोर विदुषी व प्रासादिक ग्रंथकार होत्या. ''[१६२]

वेणास्वामींचा 'सीतास्वयंवर' हा ग्रंथ 'रामगुह संवाद उर्फ नावेचे श्लोक', 'कोल रघुनाथाचा' ही स्फुट प्रकरणे प्रसिध्द आहेतच शिवाय 'श्रीकृष्णस्तुती', पदे, पंचीकरण कवने, स्तवने, आरत्या, अभंग वगैरे अनेक असून फार प्रभावी ठरतात.

वेणास्वामींच्या वाङ्मयातील 'सीतास्वयंवर' हा ग्रंथ सर्वोत्कृष्ठ किंवा मुकुटमणीच म्हणले तर वावगे ठरणार नाही. त्यांची योग्यताच तेवढी होती. हा ग्रंथ वाचल्यावर त्यातील शब्द, शब्दालंकार, मांडणी, भावपूर्ण अर्थ, त्यामागचे विचार या सर्वांतील भव्यता जाणवते. एका स्त्रीसुलभ मनाने एका स्त्रीसुलभ मनातील भावनांचे वर्णन अतिशय सहजतेने केलेले परंतु अतिशय भावपूर्ण आपल्या मनाचे पकड घेणारे असेच आहे. असा हा अत्यंत प्रासादिक ग्रंथ आहे. 'सीतास्वयंवर' प्रभू रामचंद्रांच्या प्रिय सीतेच्या, श्रीरामचंद्र-जानकीच्या विवाह सोहळ्याचे वर्णन आहे. आधी पण सीतेच्या स्वयंवराचे वर्णन अनेक ग्रंथांनी केले आहे तेही सुंदरच आहे. मात्र वेणास्वामींचे 'सीतास्वयंवर' खूप आगळेवेगळे वाटते. त्यातील वर्णने अगदी खरे चित्र डोळ्यासमोर तंतोतंत आणतात. कारण 'स्त्री'चे मन एका 'स्त्री'ने उत्तम रीतीने जाणलेले, तिच्या भावना जगलेल्या आहेत. हे या ग्रंथातून समजते. पहिल्या समासाची गणेश वंदनेने सुरवात करून वेणास्वामींनी दशरथ राजाच्या दरबाराचे वर्णन केले आणि विश्वामित्र ऋषींनी दुष्ट राक्षस-राक्षसी यांचा संहार करण्यासाठी, ऋषीमुनींच्या याग-यज्ञांच्या रक्षणासाठी, श्रीरामांना घेऊन जाण्याची आज्ञा मागितली. वेणास्वामी 'सीतास्वयंवर'मध्ये म्हणतात,'' विश्वामित्राचे उत्तरी। रायासी भेदिले जिव्हारी। जैसे वज्राचिया धारी। ह्दय विदारे।। ''[१६३] या मागणीने दशरथ राजांना वज्राघात

झाल्यासारखे वाटले कारण लाडक्या रामाला दूर पाठवायचे हा विचारच दशरथराजांना सहन होईना तर कौसल्याराणींच्या काळजाचा तुकडा असल्याने, हे समजल्यावर त्या सुध्दा व्यथित झाल्या. परंतु विश्वामित्र ऋषींनी या राक्षससंहाराच्या कार्याबरोबरच श्रीरामांच्या विवाहाचा योग आहे हे समजल्यावर सुनमुख पाहण्याची अधिरता कौसल्याराणींच्या मनात रूजते आणि त्यांचा होकार मिळतो. फार सुंदर रीतीने ही कल्पना वेणास्वामी मांडतात. त्राटिक, मरिच, सुबाहु आदी राक्षस संहारानंतर विश्वामित्र ऋषी श्रीराम–लक्ष्मणांना मिथिला नगरीकडे नेतात. वेणास्वामींनी मिथिला नगरीचे इतके सुंदर वर्णन केले आहे की आपले मन प्रसन्न होऊन जाते. जेव्हा जनकराजाने श्रीरामांना पाहिले तेव्हा त्यांच्या मनात येणारा विचार फारच गोड वाटतो.

खरंतर जनकराजाने आपली गुणवान, रूपवान लाडकी कन्या सीतेसाठी उत्तम वर मिळावा यासाठी स्वयंवराचा घाट घातला होता आणि शिवधनुष्याला प्रत्यंचा लावण्याचा पण सर्वांसमोर ठेवला असतो. पण श्रीरामांच्या प्रथम दर्शनी जनकराजांचे मन म्हणते,' अरे हा राजकुमारच माझ्या प्रिय कन्येसाठी योग्य असून तोच स्वतः समोर आला आहे आणि मी उगाचच धनुष्याचा पण ठेवला. ' परंतु ही प्रतिज्ञाच असल्यामुळे स्वयंवराचे कार्य तर चालू ठेवायला लागलेच. तसेच वेणास्वामींनी या समासात अतिशय सुंदर वर्णन केले आहे ते स्वयंवरासाठी सज्ज झालेल्या दरबाराचे आणि किती देशांचे राजांनी उपस्थिती लावली याचे. श्रीरामचंद्रांच्या आगमनाची वार्ता सीतेला समजल्यावर ती आपल्या सखीला विचारते ते शब्द नितांत सुंदर आहेत. वेणास्वामी लिहितात,'' कोण तो गे आत्माराम। कोण तो गे सुखधाम।विश्रांतीचा हि विश्राम। मदनमूर्ती दाखवी।। ''[१६४] सीतेच्या या शब्दात तिची अधीरता, आश्चर्य आणि तेवढेच माधुर्य प्रकर्षाने जाणवते. तिच्या सखीने तिला लांबूनच श्रीरामांकडे अंगूली निर्देश केल्यावर सीतेला त्या श्रीरामांच्या रुपाकडे बघून स्तंभित व्हायला होते. श्रीरामांचे वर्णन वेणास्वामींनी सुरेख केले आहे.

पाचव्या समासात श्रीरामांची धनुष्य पेलण्याची तयारी प्रत्यक्षात श्रीरामांनी धनुष्य पेलले याचे वर्णन वेणास्वामी करतात. दरबारात नव्हे तर त्याचा आनंद स्वर्गातील देवादिकांनाही झाला. वेणास्वामी म्हणतात,' जनक राजाचे मनोरथ पूर्ण होऊन आनंदभरीत झाला.' 'राम आत्मा त्रैलोक्याचा' या तीनच शब्दात श्रीरामांचे सामर्थ्य दर्शवतात. मिथिलानगरीचे श्रेष्ठ प्रधान अयोध्येस

येऊन दशरथ राजापुढे वार्तालाप करतात आणि आपल्या लाडक्या रामाचा पराक्रमाचे वर्णन ऐकून आणि सीतेला पणाने जिंकल्याचे ऐकून सर्वजण हर्षभरीत झाले. दहाव्या समासातील वऱ्हाडाचे वर्णन वेणास्वामींनी रसाळ पध्दतीने केले आहे. वेणास्वामींनी ध्वज, पताका, तोरणे, मंगलतुरे, दीपमाला, गजघंटांचे घणघणाट, रथांचे धडधडाट, कर्णे, तुताऱ्यांचे, वाद्यांचे आवाज वगैरे वर्णन इतक्या तालबध्द शब्दात केले आहे की नजरेसमोर तो नजारा उभा राहतो.

राम–जानकीचा विवाह म्हणजे केवढा अद्‌भूत योग. जनकराजाने वऱ्हाडाचे केलेले स्वागत, आदरातिथ्य, वेगवेगळ्या सुंदर आभूषणे–वस्त्रे परिधान केलेल्या रामचंद्रांचे वर्णन वेणास्वामींनी फारच छान केले आहे. तर वधू–वर पक्षांची वाद्ये कशी वाजत होती, सगळीकडे आनंद कसा ओसंडून चालला होता, तसेच जनक राजा, त्याच्या राण्या, त्याचे पुत्र यांचे हे वऱ्हाड किती सुंदर भासत होते याचे वर्णन आपल्या मनाला खूप आनंद देऊन जाते. अशा रीतीने वऱ्हाडाचे वर्णन करून वेणास्वामी पुढल्या समासात त्यावेळच्या चालीरीती म्हणजे सीमांतपूजन, हळद, तेलवण, कुंकुमटिळक, देवदेवक प्रतिष्ठा, पत्रिकापूजन, रूखवताची पंगत याचे वर्णन खरंच राजेशाही विवाहाला शोभेल असेच केले आहे. त्यातून वेणास्वामींना स्वतःलाच विवाहातील चालीरीतींचे पूर्ण ज्ञान होते याचा प्रत्यय येतो. लग्नकार्याची लगबगीचे, तयारीचे वर्णन त्या करतातच परंतु रूखवातील लाडूंचे प्रकारही त्या सांगतात.

प्रत्यक्ष विवाहप्रसंगी वधू–वर, अर्थातच अयोध्येचा लाडका सुपुत्र आणि मिथिलेची लाडकी सुपुत्री कसे दिसत होते. त्यांचे वस्त्रालंकार कोणते होते हे ऐकून आपल्यालाही वेणास्वामींच्या शब्दभांडाराचे कौतुक वाटते. या दोघांचे केलेले वर्णन अप्रतिम आहे. श्रीरामांची नील तनू, त्यावरचे पितांबर, उपरणे, रत्नमुकुट, रत्नकुंडल, मेखला, पदकांचे हार, वैजयंतीचा हार, भाळावर रेखाटलेला केशरटिळा आदी राजानेच ल्यावे अशा वस्त्रालंकारांचे वर्णन फारच सुंदर आहे तर सीतेसारखी लावण्यवती काय ल्यायली होती हे तर वेणास्वामी खूपच सुंदररीत्याच वर्णन करतात. सीतेने मुक्तमंडित पीतांबर, मुक्तकंचुकी, कानात झुमके, पुतळ्यांची–बारीक कळ्यांची माळ, बांगड्या, पोंची, तर वस्त्रांमध्ये चिरड्या, म्हणजेच एक नेसण्याचे वस्त्र आणि पांघरण्याची वैरण अर्थात शेल्यासारखी, त्यांचे रंग डाळींबी व जास्वंदी असे आकर्षक असे वस्त्रालंकार त्यामुळे सीता इतकी रूपवान दिसत होती की तिचे सौंदर्य मुग्ध करून टाकत होते.

येथे वेणास्वामींच्या कल्पनाशक्तीची प्रशंसा करावीशी वाटते. वेणास्वामी लिहितात,'' सातखणी पांचखणी। मुक्ते झुमके रत्न चुणी। पंखे झमकती तेजखाणी। ससिफुल झमकते।। ''[१६५] या ओवीतील शब्दांचे सौंदर्य खरोखरच मुग्ध करते.

दहाव्या समासात वेणास्वामी सखींच्या मेळ्यात गौरीहार पूजा करायला बसलेल्या सीतेचे वर्णन करतात की सीता अगदी लाजेने चूर झाली आहे. वेणास्वामींनी यात रचलेली मंगलाष्टके खूप सुंदर आहेत. प्रत्येक कडव्याच्या शेवटी त्यांनी 'सीतावरं मंगलं' निर्मिले आहेत. प्रसन्न मंगलमय वातावरणात अशी मंगलाष्टके म्हणल्यावर मुहूर्ताची घटिका भरते आणि श्रीराम–जानकी एकमेकांना हार घालतात. वधूवरांचे औक्षण लाजाहोम, अग्नीपूजा वगैरे विधी वेणास्वामींनी खूप सुंदर वर्णिले आहेत. वेणास्वामी हळदीउटण्याच्या कार्यक्रमाचे सविस्तर वर्णन अकराव्या समासात करतात तर भोजन समारंभ, अगदी श्रीरामांच्या पंगतीला कोणकोण होते, भोजनात जिन्नस काय होते  याचेही वर्णन आहे.

तेरावा समास कन्यादानाचे वर्णन करतो. इतका वेळ समारंभाचा आनंद भोगल्यावर कन्यादान करताना म्हणजेच सीतेला रामाच्या स्वाधीन करताना जनक राजाची मनःस्थिती कशी होते, याचे वर्णन वेणास्वामींनी अगदी वत्सलरसपूर्ण केले आहे. एका प्रेमळ पित्याच्या मनाची घालमेल त्यांनी दाखविली आहे. सीतेच्यामातेच्याही मनस्थितीचे वर्णन वेणास्वामी यात करतात. शेवटच्या चौदाव्या समासात सीतास्वयंवराची कथा पूर्ण होते. ग्रंथाबद्दल सांगताना वेणास्वामी म्हणतात,'' हे सीतेचे सैवर। वाल्मीक बोलिला विस्तार। रम्य रसाळ सुंदर। नाना विळासे करूनी।। ''[१६६] प्रभूरामचंद्रांच्या भक्तीचा महिमा येथे वेणास्वामींनी गायला आहे. अशा रीतीने वेणास्वामीचा हा 'सीतास्वयंवर' ग्रंथ वाचल्यावर मन प्रसन्न होते. वाचताना या ग्रंथातील भाषालंकार, नाद माधुर्य, तंतोतंत वर्णन, शब्द माधुर्य त्याचबरोबर मुख्यत्वेकरून श्रीरामांबद्दल भक्ती, विश्वास वगैरे गोष्टी आपल्या मनाला आनंद आणि समाधान देतात.

४४ श्लोकांचा राम आणि गुहक यांचा संवाद म्हणजेच नावेचे श्लोक स्फुटप्रकरण म्हणून वेणास्वामींनी लिहिला. एरवी रामायणात रामाचे बालपण, सीतास्वयंवर, वनवास रावणाचा संहार वगैरे गोष्टींना महत्व दिले जातेच. परंतु एक वेगळा असा प्रसंग तेवढाच महत्वाचा मन हेलावून टाकणारा वेणास्वामींनी यात वर्णिला आहे आणि रामायणात रामाच्या जीवनात या गुहकाला,

म्हणजेच अयोध्येतून गंगेच्या पैलतीरी सोडणाऱ्या नावाड्याला महत्व दिले आहे. यात रामचंद्र, जानकी आणि लक्ष्मण वनवासाला जायला निघण्यासाठी भागीरथीच्या तीरावर येतात आणि गुहकाला नावेने पैलतीरी सोडण्याची विनंती करतात. वेणाबाई लिहितात,'' श्रीरामचंद्र म्हणतात, असो तापसी तीर्थवासी वनासी। तपा जातसो अरी गूणरासी। तूझी तोयतारी त्वरे आणि तीरी। परदेसिया पाववी पैलतीरी।। ''[१६७] परंतु श्रीरामचंद्र, जानकी आणि लक्ष्मण जरी तापस वेषात असले तरी त्यांच्या चेहऱ्यावरील, कांतीवरील तेज काही लपत नाही. त्यामुळे गुहक त्यावर विश्वास ठेवत नाही.

नावाड्याचा चाणाक्षपणा, तसेच त्याची भक्ती पाहून श्रीराम त्याला खरी ओळख आणि सर्व स्थिती सांगतात. तेव्हा गुहक प्रेमभराने त्यांची पाद्यपूजा करतो. फुलांचा नैवेद्य अर्पण करतो. आणि या तिघांनाही नावेने पैलतीरावर सोडून येतो. श्रीराम मनापासून गुहकावर प्रसन्न होतात. आणि वर मागायला सांगतात. खरं तर नावाडी गरीब होता. धनसंपत्ती पण तो मागू शकला असता परंतु अतिशय नम्रतेने गुहक श्रीरामांना काय मागणे मागतो? तर वेणाबाई लिहितात,'' म्हणे त्रासलो देहबुध्दीसमंधे। तुसी बोलिलो बोल ते ते अबध्दे। पदपंक्ती ठाव दीनासी द्यावा। सखा आपुला मित्र ऐसा म्हणावा।। ''[१६८] यावर श्रीराम तथास्तु म्हणतात आणि पुढचा मार्ग त्यास विचारून जायला निघतात. हा प्रसंग खूप लहानसा असला तरी वेणास्वामींनी रामायणात त्याला केवढे महत्त्व दिले आहे. त्यांच्या 'सीतास्वयंवर' ग्रंथापेक्षा हे स्फुट प्रकरण नक्कीच वेगळे आहे. त्या नावाड्याचे श्रीरामप्रभूंच्या जीवनातील स्थान आणि नावाड्याच्या जीवनातील श्रीरामचंद्राचे स्थान खूप महत्वाचे होते. ते या स्फुट प्रकरणात खूप सुंदररित्या वेणास्वामींनी दाखविले आहे. अत्यंत सोपी भाषा असून त्यांनी वेगवेगळ्या छटा दाखविल्या आहेत.

वेणास्वामींचे 'कौल' अथवा 'कौल रघुनाथाचा' हे स्फुट प्रकरण फार वेगळ्या प्रसंगावरचे आहे. बारकाईने पाहिल्यास 'सीतास्वयंवर' फक्त स्वयंवरावर, 'श्रीरामगुहसंवाद' म्हणजे फक्त श्रीरामचंद्र आणि एका नावाड्याचा तर 'कौल' हा विषय म्हणजे राजाकडून प्रजेस मिळणारे अभयपत्र म्हणजेच रामायणातील 'कौल' चा विषय पण खूप वेगळाच आहे. एकूण २६ श्लोकांचे हे प्रकरण आहे.

रावणासारख्या महाराक्षसाचा संहार करून विजयश्री प्राप्त करून श्रीरामप्रभू त्यांचीच प्रिय पत्नी जानकी आणि सावलीसारखा पाठी उभा राहणारा लक्ष्मण या भावासह अयोध्येत परत आल्यावर श्रीरामचंद्र सिंहासनाधिष्ठित होतात. एका कर्तव्यदक्ष राजाने अयोध्या राज्याची सूत्रे हाती घेतल्यावर अयोध्येची प्रजा खूप आनंदी झाली, राज्यात पुन्हा एकदा प्रसन्नता आली तेव्हा प्रजेने श्रीरामांपाशी कौल मागितला तेव्हा श्रीरामचंद्र मोठ्या कर्तव्यभावाने आणि आनंदाने प्रजेला सांगताात की,'मागा काय तुम्हाला पाहिजे ते, हा राजा तुमची गाऱ्हाणी ऐकून ती दूर करण्यासाठी, तुमच्या सुखी जीवनात सुख नांदण्यासाठी अगदी तत्पर आहे' असे वचन देतात.

या ओवीत वेणास्वामींनी अगदी योग्य, श्रीरामचंद्रासारख्या एखाद्या उत्तमपुरूषाला शोभतील असेच शब्द, तत्परता, वचन, अश्वासन आणि दिलास देणाऱ्या भावना फारच सुरेख दाखविल्या आहेत. तसेच प्रजेने एकेक गोष्टी मागितल्या आणि श्रीरामांनी त्या लक्ष्मणास लिहून ठेवायला सांगितल्या. त्यामुळे वेणास्वामींनी ओवीच्या शेवटी 'वदे राम लक्ष्मणा हे लिहिरे'. असे शब्द योजिले आहेत त्यामुळे या ओव्या वाचताना लयबध्दता जाणवते आणि त्याहीपेक्षा श्रीरामचंद्रांचे आश्वासन मनाला भावते. या प्रकरणाच्या सुरवातीच्या ध्रुपदातच प्रजेची मानसिकता आणि दशरथराजासारखेच दक्ष असलेले त्यांचे पुत्र श्रीरामचंद्र आता गादीवर आले आहेत म्हणून त्यांच्या मनात संवादासाठी आलेला मोकळेपणा खूप छान शब्दात वेणास्वामीं लिहितात,'' बहु कष्टलों पातलों जी स्वदेशा। प्रजा बोलती कौल दे राघवेशा।।ध्रु।। ''[१६९] श्रीरामचंद्राच्या आश्वासनावर प्रजेने जे काही मागितले ते तर कौतुक करण्यासारखेच होते, कारण कोणतीही विलासी, ऐहिक अशी सुखे न मागता केवळ समृध्द जीवनासाठी लागणारी सुखंच प्रजेने मागितली. अर्थात वेणास्वामींनी उत्तमरीतीने शब्द वापरून ही रचना केली. प्रजेने श्रीरामांकडे धन–धान्य, पशुधन, उत्तम संतती, समृध्दी, सौख्य, निर्विघ्नता, धर्मपरायणता, पुण्यवासना, पवित्रपणा, निष्कपटपणा अशाच गोष्टी मागितल्या.

हे प्रकरण वाचले की लक्षात येते की वेणास्वामींसुध्दा समर्थांसारख्याच फक्त आध्यात्मविषयात रमत नाहीत तर आजूबाजूची म्हणजेच तत्कालीन परिस्थितीचेही भान ठेवतात. ज्या विचाराने समर्थांनी प्रजेसमोर श्रीरामचंद्रांसारख्या राजाचे आदर्श ठेवले आणि तुमचा भावी राजा म्हणजेच 'शिवाजी' तुमच्या इच्छा आकांशा पूर्ण करील, असे ठामपणे सांगितले अगदी

त्याच विचाराने वेणास्वामींनी हे प्रकरण रचले. प्राचार्य मा. के. यादव या संदर्भात लिहितात, '' येथे 'कौल रघुनाथाचा' या कवितेत त्या अयोध्येत रामराजा झाला असता लोकांनी काय मागण्या केल्या त्या सांगतात. पण त्या वाचून वाचकांना डोळ्यापुढे चित्र येते ते शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे व या राज्यस्थापनेमुळे प्रजेत निर्माण झालेल्या आकांक्षाचे. ''[१७०] कारण त्यावेळी महाराष्ट्र गरीबीने, दारिद्र्याने गांजला होता. अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजा मिळाल्या तरी संतुष्ट होण्यासारखा होता. त्यामुळे वेणास्वामींच्या काव्यात प्रासादिकतेबरोबरच समयसूचकता व सामाजिक परिस्थितीचे भान जाणवते.

पाच कांडांचे वेणास्वामींचे रामायण अतिशय रसाळ आहे. युध्दकांड व उत्तरकांड हे त्यांनी न लिहिता सुंदर कांडांनंतर एक श्लोक एका कांडाला देऊन आठ श्लोक लिहिले आहेत. वेणाबाईंनी आदिकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड आणि सुंदरकांड लिहिले आहे. रामायणात भक्त, वात्सल्य, नातेसंबंध, एकमेकांवरील प्रेम, निष्ठा यावर वेणास्वामींनी खूप भर दिला आहे. श्रीरामांचे मातृ-पितृ प्रेम, बंधू प्रेम, पत्नी प्रेम तसेच त्यांचा प्रिय सेवक हनुमान यावरील प्रेम, असे नात्यांचे आणि जाणीवांचे पैलू वेणास्वामींनी उलगडून दाखविले आहेत. त्याचबरोबर या सर्वांचे स्वभाव विशेषही त्यांनी आवर्जून दाखविले आहेत. मुळात रामचरित्रातील अनेक प्रसंग खूप गोड आहेत. त्यामुळे मृदू-मुलामय, प्रेमळ अशा वेणाबाई ते प्रसंग सांगतात ते अजूनच गोडव्याने आणि भक्तिवात्सल्याने भरलेले जाणवतात. रामायणाच्या सुरूवातीचा काळ म्हणजेच दशरथ राजा आणि त्याच्या राण्यांना संतती नव्हती. त्यामुळे बाकी सर्व सुख-समाधान त्यांच्यापुढे हात जोडून उभी असूही हा सल त्यांच्या आयुष्यात भरून राहिला होता. म्हणूनच इतक्या वर्षांनी पुत्रप्राप्ती झाल्याने त्यांचा आनंद वेणाबाईंनी तेवढ्याच आनंदाने रामायण या ग्रंथाच्या सुरूवातीच्या ओवीत वर्णिला आहे. खूप वेगळे शब्द त्यांनी या रचनेसाठी वापरले आहेत. त्या लिहितात,'' आनंदअंदी शुभचैत्रमासी। श्रीराम हा जन्म अजन्मासी। माध्यान्ही हा शुध्द सुभानू आला। श्री मंदिरी सादृश्य देव आला।। ''[१७१]

माध्यान्ही हा शब्द सर्वसाधारण पणे वापरला गेला तरी 'सुभानू' हा शब्द किती वेगळा आणि तेवढाच गोड वाटतो. त्यानंतर श्रीरामांच्या बाललीला, त्यांचे विद्यार्जन हा काळ जसा महत्त्वाचा होता तसेच पुढे त्राटिका, मरिच, सुबाहु आदि राक्षसांचा संहार यानंतर

मिथिलानगरीतील शिवधनुष्याला प्रत्यंचा लावून सीतेला जिंकून त्यांचा आणि सीतेचा स्वयंवर–विवाह सोहळा हा प्रसंग खूपच आनंददायी होता. त्यातच ज्या बंधूंवर श्रीरामांचे नितांत प्रेम होते त्या बंधूंचा विवाह सीतेच्या भगिनींशी झाला. अशा रीतीने रामसीता हे लक्ष्मण–उर्मिला, भरत–मांडवी, श्रत्रुघ्न आणि श्रृतर्किती परत आले. विश्वामित्र ऋषींबरोबर अरण्यात पाठविण्याची मानसिक तयारी नसलेली कौसल्याराणी मग मात्र सुनमुख पाहण्यासाठी अधीर होते आणि खूप आनंदी होते.

अयोध्याकाडांत एका प्रसंगाने श्रीरामांच्या आयुष्याला कलाटणी मिळते ती म्हणजे कैकयीने मंथरेच्या शिकवण्यावरून दशरथराजाकडे मागितलेला वर या कांडात वेणास्वामींनी हा प्रसंग दशरथ राजाच्या केविलवाणी स्थितीचे वर्णन ऐकून मन हेलावले जाईल अशा शब्दरचनेत वर्णिला आहे. त्या लिहितात,'' महाश्रीमता मंदिरी हीणवाणा। दिसे राव लोळे भूमी दैन्यवाणा। उभी कैकई कर्कशा गर्वरासी। सुमंत्रा म्हणे राम अणि त्वरेसी।। ''[१७२] शेवटी दशरथराजाला कैकयीला वर देऊन कोदंडपाणी रामाला, एक राजकन्या असलेल्या सीतेला अयोध्येपासून दूर वनवासाला पाठवायलाच लागते. वेणास्वामींनी यात भरत आजोळहून अयोध्येस परत आल्यावर किती दुःखी होतो आणि आपल्या लाडक्या भावावर जो सदैव प्रेमळपणे, न्यायीभावानेच वागतो त्याच्यावर वनवासाचा प्रसंग आला हे बघून त्याच्या नयनातून आलेले अश्रूही थांबत नव्हते आणि तो श्रीरामांची भेट घेतो. हा प्रसंग वेणास्वामींनी खूप छान वर्णिला आहे. अरण्य कांडात श्रीराम–सीता–लक्ष्मणांचा वनवास वर्णिला असून रावणाने सीतेचे अपहरण केल, रावण अतिथिच्या वेषात येऊन भिक्षा मागतो आणि कपटाने सीतेला पळवून आकाशमार्गाने लंकेला जातो. जसे सीता पत्नीनिष्ठेमुळे रामाबरोबर वनवास स्वीकारते, तशीच वालीच्या पत्नीची पतिनिष्ठा वेणाबाई सांगतात. वालीच्या निधनानंतर त्याची पत्नी तारा आपला शोक श्रीरामांपुढे व्यक्त करते. पती नसेल तर हे ब्रम्हांडही ओस वाटते आणि मग आता जगून तरी काय उपयोग? अशा शोकाचे वर्णन वेणास्वामींनी उत्तम केले आहे. सुंदर कांडात सीतेचा शोध लागतो. मारूतीरायाने लंकेत जाऊन सीतेचा शोध लावला. राम–सीतेचा विरह देखील वेणास्वामींनी खूप भावनाशील मनाने वर्णिला आहे. सर्वात शेवटी त्या म्हणतात, आदराने सर्व भक्त ही रामकथा गातात, त्याच्यात त्यांना आनंद मिळतो, समाधान मिळते. रामायण सांगायचा हाच तर हेतू होता. तो सफल झाला. श्रीरामांचे चरित्र सर्वांना कळावे. या विश्वात ते गाजावे अशी समर्थांची इच्छा होती. तसेच

वेणास्वामींनी सुध्दा केले. 'सीता–स्वयंवर', रामायण यातून अनेक नात्यांचे महत्व, निष्ठा–सेवा अशा अनेक गोष्टी पून्हा एकदा लोकांसमोर आणल्या. समर्थांना जसे सामाजिक भान होते तसेच वेणाबाईंनाही होते. त्याही श्रीरामनाम चिंतन, मनन यात पूर्णपणे तल्लीन असत.

वेणास्वामींनी श्रीरामांवर कथन केले. त्या रामचरिताने खूप प्रेरीत झाल्या होत्या. श्रीरामांवर त्यांची नितांत श्रध्दा असल्यामुळे श्रीरामांवर काव्य रचना करणे अगदी स्वाभाविक होते. पण वेणास्वामींचा व्यासंग मोठा होता. लहानपणापासून त्यांनी अनेक ग्रंथांचे वाचन, मनन केले होतेच. त्यामुळे त्यांनी रामयणा व्यतिरिक्तही अनेक काव्यरचना केल्या.

असाच एक अत्यंत निराळा विषय वेणास्वामींनी आपल्या 'पंचीकरण' या स्फुटकाव्यात घेतला आहे. पंचमहाभूते ही समजायला कठीण आहेत. पंचमहाभूतांचा विचार वेगळ्या तऱ्हेने करून 'पंचीकरण' यात मांडला आहे.

या विश्वाची उत्त्पती कशी झाली? मानव जन्माचे कार्य काय? अशा अनेक प्रश्नांची उकल 'पंचीकरण' मधे मिळते. प्राचार्य मा. के. यादव या संदर्भात लिहितात,'' अन्वय – व्यतिरेक, आकाशी तीन रूपे, चत्वार देह, पंचीकरण, उभारणी–संहारणी इत्यादी विषयांचे गद्यात विवेचन असून शेवटी एक पद आहे. ''[१७३] पंचीकरणाचे जे शेवटचे पद आहे ते अतिशय मधूर आहे, लयबध्द आहे. वेणास्वामी रचतात,'' पाहता पाहता द्वैत सरले वो वो।। सेखी पाहणें मात्र चि उरले वो वो।। उरलें नुरलें वृती स्फुरणांचे वोझे।। हे ही माये आता हरलें वो वो।।१।। रामदास्यत्वे रामचि जालें वो वो।। जैसे सागरी लवण मिळालें वो वो।। ऐकूनिया मग वेणी ह्मणें तुज।। विमळ पुण्य फळा आलें वो वो।।३।। ''[१७४] या विश्वाचा खूप मोठा गहन विषय वेणास्वामींनी मांडला यावरूनच त्यांची मेधाशक्ती, विद्वत्ता सामर्थ्य याची कल्पना येते. श्रीरामांची आरती आणि शेजारती वेणास्वामींनी इतक्या वेगळ्या शब्दात आणि लयबध्दतेत रचल्या आहेत. श्रीरामांची आरती,'' शरयूतीर वासी जिवनें जिवमात्रा। जनमन मोहन रूपडे नलिनीदलनेत्रा। उपमा विलसे निरसे चकीत गुणगात्रा। हर नर सुर सेविती निजहित निजपात्रा।।११।। जयदेव जयदेव जय कार्मुकपाणी। आरते आरत उजळूं वरदवर वाणी।।धृ।। ''[१७५] वेणास्वामींनी शरयूतीरवासी या शब्दांनी केलेली सुरूवातच त्यांचा वेगळेपणा दाखविते. तर 'आरते आरत' हे शब्द त्यात कमालिचा गोडवा आणतात. वेणास्वामींनी अनेक स्फुट पद रचना केल्या आहेत.

त्याच्यात अध्यात्मिक विषयांचेपण वर्गीकरण करून तशा रचना केल्या आहेत. ते वर्गीकरण त्यांनी परमार्थ श्रीराम राम–नाम–भजन–महिमा आणि इतर अशा प्रकारे केले आहे. परमार्थावर गुरूनी शब्दांची बीजे, आम्ही स्वामींचे अंकित, मनाची करणी, राघवाचे रूप अशा रचना केल्या आहेत. तर श्रीरामांवर शबरी को भाग, मृत वानरांना जीवनदान, विभिखनसू पटदिनो, गोब्राह्मण प्रतिपाळ, रामाजवळ मागणे, सगुणरूपे मज भेटाया आणि शेवटी मनाची प्रार्थना ही रचना केली आहे. राम–नाम–भजन महिमा यावर 'नामतुझे' असे शब्द योजून नामाचे महत्व सांगितले आहे. वेणास्वामींची किरकोळ पदे सुध्दा वेगवेगळे आशय हाताळतात. समर्थ स्थापित अकरा मारूती यावर पण वेणास्वामींनी एक छान रचना केली आहे. योग्य प्रकारे सर्व स्थाने त्यांनी पाच ओव्यात गुंफली. समर्थांनी स्थापन केलेल्या मारूतीबद्दलही वेणास्वामींना फार प्रेम होते. येथे त्यांना समर्थांचा फार अभिमान ही वाटतो. म्हणूनच त्या म्हणतात,' रामदास माझा समर्थ. ' येथे समर्थांना त्यांनी माझा समर्थ असे संबोधले आहे. तर त्यांच्या कीर्तीचेही गुणगान केले आहे.

वेणास्वामींवर जेव्हा कोल्हापूरला विषप्रयोग झाला होता, त्याचा थोडाफार परिणाम त्यांच्या शरीरावर झाल्याने त्यांची प्रकृती तशी नाजूकच झाली होती. शिवाय सद्गुरूकृपेने, समर्थांच्या मायेने, त्यांनी दिलेल्या जबाबदारीची पूर्ती झाल्याने त्या तृप्त झाल्या होत्या. त्यामुळे त्यांना आता निवृत्तीची ओढ लागली होती. त्यामुळे त्या सारख्या समर्थांना विचार,'मी माहेरी कधी जाऊ?' पण दर वेळेस समर्थ म्हणत,'उद्या बघू.' पण मनातून समर्थांना 'उद्या कधी उगवू नये असे वाटत होते. सर्वांना वाटत होते त्या कोल्हापूरला जायची परवानगी मागत आहेत. शके १६००, चैत्र वद्य अमावस्येला (इ.स.१६७८) समर्थांनी वेणास्वामींना माहेरी जाण्याची परवानगी दिली आणि वेणास्वामींना म्हणाले,'तुझ्या हातचे भोजन आता कधी मिळणार? तेव्हा रामरायांना नेवैद्य कर. तुझे कीर्तन कधी ऐकायला मिळणार? तेव्हा आज तू कीर्तन कर.' म्हणून वेणास्वामींनी स्वतः पुरणावरणाचा स्वयंपाक केला. रामरायाला नेवैद्य दाखविला. समर्थांना स्वतः जेवायला वाढले. समर्थांच्या आज्ञेप्रमाणे वेणास्वामी रामरायासमोर मठाच्या अंगणात कीर्तन करायला उभ्या राहिल्या. समर्थांनी आधीच उद्धवस्वामींकडून सर्वांना कीर्तन झाल्यावर वेणा माहेरी जाणार आहे तर सर्वांनी कीर्तनाला यावे. असा निरोप दिला होता. त्यामुळे गडावर सर्वजण कीर्तनाला जमले होते. वेणास्वामी कीर्तनाला उभ्या राहिल्या. शिवथरघळला समर्थांनी त्यांचे जे लुगडे गळ्यात रामदासी वस्त्र म्हणून बांधले होते, तेच लुगडे वेणास्वामींनी यावेळी परिधान केले

होते. त्यांनी कीर्तन सुरू केले. उत्तररंगात त्या म्हणत होत्या,' बंदविमोचन राम। माझा बंदविमोचन राम।। सूर्यास्ताच्या वेळीस वेणास्वामींचे मन उन्मत झाले. त्यांचा देहभाव पूर्णपणे अस्ताला गेला. इकडे सूर्याचा अस्त होत असतानाच त्या उन्मत अवस्थेत समर्थांकडे धावत आल्या आणि आपले मस्तक त्यांच्या चरणावर ठेवले. सूर्याचा आणि वेणास्वामींचा एकाच वेळी अस्त झाला. शके १६०० चैत्र वद्य अमावस्येला वेणास्वामींनी आपला देह श्रीरामाच्या आणि समर्थांच्या चरणी ठेवला. समर्थांनी स्वतः वेणास्वामींना अग्नी दिला कारण त्यांची ती वेणा होती मानसकन्या होती. सज्जनगडावर त्यांची समाधी वृदांवनापाशी म्हणजे तुळशी वृंदावनापाशी ंनंतर एक चाफ्याचे झाड आले त्यानंतर समर्थांच्या समाधीजवळ आरती सुरू झाली की त्या चाफ्याची फुले समाधीवर पडत असत. धन्य ती वेणास्वामींची भक्ती, निष्ठा.

### मठाची सद्यस्थिती

श्री. कौस्तुभबुवा रामदासी हे या मिरज मठाचे आताचे अधिपती आहेत. अभिमानाची गोष्ट म्हणजे कौस्तुभबुवा या मठाचे कार्य, व्यवस्था उत्तमपणे पार पाडत आहेत. आजही श्रीरामपंचायतन, समर्थांच्या पादुका, वरदहस्त मारूती यांचे दर्शन होते. तसेच वेणास्वामी स्वतः कीर्तनात जी झांज वाजवायच्या ती झांज, समर्थांची कुबडी अजूनही येथे पाहयला मिळते. या मठात दररोज सायंकाळी नित्योपासना चालू असते आबालवृध्द येथे रोज येतात. श्रीरामनवमी उत्सव, हनुमानजयंती, दासनवमी असे अनेक उत्सव मोठ्या सोहळ्याने संपन्न होतात. कीर्तनसेवेला चालना मिळविण्यासाठी नियमितपणे कीर्तन शिबिरे घेऊन कीर्तनकार घडवायचे काम चालू आहे. तसेच नियमित प्रवचने होतात, दासबोध ग्रंथाचे पारायण, भागवत सप्ताह येथे पार पडतो. स्वतः कौस्तुभ बुवांचे प्रवचन–कीर्तन येथे नियमितपणे सादर होते. कौस्तुभबुवांनी आपले आयुष्य मठकार्यालाच अर्पण केले आहे. त्यांनी स्वकर्तृत्वावर मठाचे कार्य अव्याहतपणे चालू ठेवले आहे.

### ४.६.२ दिनकर स्वामी – तिसगांव मठ

दिनकरस्वामी हे समर्थसंप्रदायातील एक सिध्द सत्पुरूष असून ज्यांना समर्थांचा अनुग्रह मिळाला. एक प्रापंचिक असूनसुध्दा प्रापंचिक सुखे न भोगता, प्रापंचिक प्रलोभलांना बळी न पडता, समर्थांवरील आणि संप्रदायावरील निष्ठा अखंडपणे जपणारे हे समर्थांचे महंत तिसगांव

मठाचे मठाधिपती. अनुग्रह मिळण्यापूर्वीच, प्रभूश्रीरामचंद्रांचे दर्शन समर्थरूपांत त्यांना झाले. इतके भाग्यशाली महंत होण्याचा योग दिनकरस्वामींना आला. त्यांचा 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ म्हणजे समर्थशिष्यांच्या वाङ्मयातील एक हिरा आहे. त्याची योग्यताच एवढी आहे की त्यांना 'स्वानुभवदिनकर' कर्ते तिसगांव मठाधिपति म्हणून संबोधतात. एवढा त्यांचा पारमार्थिक अधिकार होता. समर्थ प्रतापकार गिरिधरस्वामी म्हणतात,'' दिनकर नामा स्वधर्ममार्गे। महावित्पन्न शास्त्रमार्गे। तीक्ष्ण बुध्दि देखूनि स्वामीमार्गे। दिनकर नाम ठेविले।।स.प्र.१०-३६।। ''[१७६.] स्वानुभव दिनकरग्रंथात मठपरंपरा अशी आहे.

**मठाची परंपरा** -'' समर्थ → दिनकरस्वामी → रामचंद्र → बाबाजीबुवा → नारायणबुवा → राजारामबुवा → रघुनाथबुवा → रामकृष्णबुवा → सीतारामबुवा → भास्करबुवा → प्रकाशबुवा ''[१७७]

दिनकरस्वामींचा जन्म भिंगार या गावी शके १५५० म्हणजेच इ.स.१९२८ मध्ये झाला. दिनकरस्वामी खरोखरीच तीक्ष्ण बुध्दीचे होते. त्याचप्रमाणे समर्थांनी स्वतः त्यांचे नावं 'बहिणाजी' बदलून 'दिनकर' असे ठेवले. एवढे थोर भाग्याचे हे दिनकरस्वामी होत. दिनकरस्वामींचे मूळ नावं बहिणाजी मुळे. अहमदनगरजवळील भिंगार या ठिकाणचे ते रहिवासी आणि त्याच गावाचे जोशीपण, आणि ज्योतिषीपण, या घराण्याकडे असल्याने त्यांना सगळे पाठक म्हणत. माध्यांदिन शाखेचे वत्सगोत्री असणारे हे घराणे अध्यात्मिक भक्तवत्सल, सद्वर्तनी आणि चारित्र्यवान होते. समर्थांप्रमाणेच या घराण्यात निःस्सीम सूर्यापासना पिढ्यान्पिढ्या केली जात होती. दिनकरस्वामींचे वडिल 'नरहर' आणि आई 'द्वारका' यांचा असामान्य बुध्दीचा असा हा मुलगा 'बहिणाजी' अर्थातच 'दिनकर' जेजूरीच्या खंडेराय आणि माता पूर्वासिनी ही कुलदैवते असलेले हे घराणे मनापासून जोशीपण आणि ज्योतिषीपण करत होते. घरातच धर्मशास्त्र, ज्योतिषी आणि वैद्यकिय शिक्षणाचा वारसा दिनकरस्वामींना मिळाला. कोणत्याही गरजूस, याचकास विन्मुख पाठवायचे नाही असा त्यांचा स्वभावच होता. दानधर्म सढळ हाताने ते सततच करीत त्यामुळे त्यांचे आई, वडिल, भाऊ, बहिण, पत्नी सर्वच जण बहिणाजींवर नाराज असत. बहिणाजींच्या या दानधर्माच्या कृतीमुळे त्यांच्या घरात असमाधान जास्त वाढायला लागले. बाकी सर्व सद्गुणांबरोबर दानधर्माचा गुण चांगलाच असला तरी बहिणाजी त्यावर काही नियंत्रणच ठेवत नसत. मग घरातील या वातावरणामुळे बहिणाजी काही वेगळाच विचार करू लागले. त्यांनी या

प्रपंचापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' दिनकरांनी विचार केला की प्रपंचात राहून आपले व इतरांचे असमाधान वाढवित बसण्यापेक्षा स्वतःचे शाश्वत समाधानाचा मार्ग आपण धरावा हे चांगले. ''[१७८] असा विचार करून बहिणाजींनी घरच सोडले. अर्थातच त्यांचे हे निघून जाणे हे 'पळून जाणे' नव्हते. काही तरी चांगले, उंची गाठणारे ध्येय गाठणे हीच त्यामागे भावना होती हे निश्चित. एखाद्या शांत, निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या ठिकाणी जायचे त्यांनी ठरविले. म्हणून भिंगारहून निघाले ते जवळच असलेल्या वृध्देश्वरच्या पुरातन स्थळी. त्या स्थानाची पावित्र्य, शांतता त्यांच्या मनाला भावली आणि त्यांनी तेच ठिकाण निश्चित केले. पुरःश्चरणाचा संकल्प त्यांनी सोडला. आणि नववर्षाच्या म्हणजेच चैत्र शुध्द प्रतिपदेस त्यांनी यथाविधी पुरःश्चरणाला सुरूवात केली. समर्थ आणि दिनकरस्वामी यांच्यात हे साम्य आहे. अतिशय तन्मयतेने, काटेकोरपणे करत असलेल्या पुरःश्चरणाला एक वर्ष झाले आणि बहिणाजींच्या आयुष्याला अशी कलाटणी मिळाली की तिथून पुढे त्यांच्या कार्याला योग्य दिशा मिळाली आणि नंतर त्यांनी मोलाचे कार्य केले. अखंड तपोसाधना नामस्मरण करीत असताना एकदा ते निद्रास्थितीत असताााना त्यांना एक मूर्ती दिसली. त्यांनी हात नम्रपणे जोडले तर त्या मूर्तीने त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. जागृत झाल्यावर पाहतात तो ती मूर्ती नाहीशी झालेली. भानावर आल्यावर बहिणाजींना जाणवले की हे स्वप्न जरी असले तरी ही घटना काही सर्वसाधारण नाही. ती मूर्ती त्यांच्या नजरेसमोरून जाईना. पण यामुळे त्यांचे मन कावरेबावरे झाले, थोडे अशांत झाले आणि त्यांना त्या मूर्तीचा इतका ध्यास लागला की त्यांनी मनात निश्चय केला की आता पुन्हा ते दर्शन झाल्याशिवाय अन्नपाणी घ्यायचे नाही. अंतर्मन म्हणत होते हाच तुझा सद्गुरू. आता तुझ्या कुळाचा उद्धार होणार आहे आणि तुझे जीवन आता अमूलाग्र बदलून एका नवीन सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे. ज्याला सद्गुरू म्हणून प्रत्यक्ष समर्थ लाभले त्या सर्वांचाच उध्दार झाला होता. या संदर्भात श्री. शंकर श्रीकृष्ण देव लिहितात,'' बाह्योपधींचे त्यांचे भान हरपले. जणू काय त्यांची काही वस्तू हरवली आहे, अशा रीतीने ते त्या डोंगरात ते ती वस्तू शोधू लागले. बाहेरून पाहणाऱ्याला ते दुःश्चित दिसत परंतु सद्गुरूचे पायी सर्वस्वी चित्त जडल्यामुळे ते अंतरी शुचित होते. ''[१७९]

खूप शोध घेऊनही त्यांना सद्गुरूचे दर्शन होईना. त्यांच्या जीवाची प्रचंड घालमेल होत होती. मनापासून केलेले पुरःश्चरण, तप, ध्यास अशा गोष्टी पाहून सद्गुरूची कृपा होते याची

त्यांना खात्री होती. मग तब्बल एक वर्षाच्या ध्यासानंतर विलक्षण योग आला तो म्हणजे स्वतः समर्थांचे वृध्देश्वराकडे येणे. समर्थ आपल्या शिष्य परिवारासह या ज्ञानोबामाऊलींच्या पुण्यभूमीत वृध्देश्वराच्या दर्शनार्थ आले आणि बहिणाजी व समर्थांची समोरासमोर भेट झाली. केवळ एका क्षणात बहिणाजींनी समर्थांना ओळखले. एक वर्ष ज्या मूर्तीसाठी जीवाची तळमळ होत होती, ती मूर्ती प्रत्यक्ष समोर अवतरली. मग मात्र बहिणाजींनी समर्थांच्या पायावर थेट आपले मस्तक ठेवले आणि त्यांचे पाय घट्ट धरले. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहात होते. त्याबरोबर समर्थही आपल्या या नवीन शिष्याकडे तेवढ्याच आनंदाने बघत होत कारण समर्थ आपल्या कार्यासाठी एकेक रत्न शोधतच रहायचे, येथे प्रत्यक्ष श्रीरामचंद्रानीच समर्थांच्या रूपात बहिणाजींना दर्शन दिले होते. त्यामुळे हे गुरूशिष्य दोघेही धन्य झाले. कारण समर्थांनाही आगोदर श्रीरामचंद्राचे दर्शन होऊन मग अनुग्रह मिळाला होता आणि दिनकरस्वामींनाही प्रथम श्रीरामचंद्राचे दर्शन आणि नंतर अनुग्रहाची प्राप्ती झाली. अशा रीतीने दोन निस्पृह एकत्र आले.

समर्थांना एवढा सत्शिष्य भेटल्यावर त्याला त्या प्रांतात सामाजिक कार्यासाठी मठ स्थापना करून त्याचा कार्यभाग सोपवणार हे निश्चित होतेच. त्यामुळे बहिणाजींची निष्ठा पाहून समर्थ त्यांना घेऊन मठासाठी योग्य त्या स्थळाचा शोध घेण्यासाठी निघाले. बरेच दिवस बहिणाजी आणि समर्थ एकमेकांच्या सानिध्यात होते. वृध्देश्वरापासून जवळच असलेले तिसगांव हे स्थान समर्थांच्या मनास आले, आणि येथे मठ स्थापना करण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळेस मढी येथे जाऊन दोघांनीही कानिफनाथांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि जवळच टाकळी येथे समर्थांनी स्वतः हनुमंतांची गोमयाची मूर्ती बनविली आणि तिथे प्रतापमारूतीची स्थापना केली हीच ती हनुमान टाकळी.

यानंतर 'तिसगांव' मठ स्थापनेचा मुहूर्त साधला गेला तो पुढच्या चैत्र शुध्द प्रतिपदेला. अनुग्रहाच्या वेळी आपल्याला नित्यपूजेसाठी एक श्रीरामांची मूर्ती हवी अशी इच्छा बहिणाजींना झाली तेव्हा समर्थांनी एक अतिशय सुंदर, सुबक अशी श्रीरामांची मूर्ती त्यांच्या सुपूर्द केली. मूर्तीची तिसगावच्या मठात प्रतिष्ठापना झाली. त्याचबरोबर बहिणाजींचे नामांतरही समर्थांनी केले. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' बहिणाजींना अनुग्रह दिल्यानंतर 'दिनकर' हे नामनिधान त्यांना प्राप्त झाले. समर्थांनी दिनकरांना प्रसाद म्हणून दिलेली श्रीरामांची मूर्ती तिसगाव

येथे स्थापन केली. ''[१८०] अशा रीतीने समर्थांनी नगर हा प्रांत संप्रदायाच्या कार्यासाठी दिनकर स्वामींवर सोपविला. त्या चैत्र शुध्द प्रतिपदेपासून तिसगाव मठात नियमितपणे श्रीरामोपासना सुरू झाली. सुरूवातीपासून शेवटपर्यंत दिनकरस्वामींनी मोठ्या निष्ठेने कार्य संपादन केले आणि श्रीरामचंद्र, मारूतीराया आणि समर्थांना कधीही अंतर दिले नाही. दिनकरस्वामी एका सोरट रचनेत म्हणतात,'' काया वाचा मनेसी भाषदान। दासमारूती स्वामी रघुनंदन। विनटलें मी न सोडी चरण। दिनकर रामदासी शरण।। ''[१८१] दिनकरस्वामींची वृत्ती अगदी वाखाणण्यासारखी होती. ते मूळातच निस्पृह असल्याने त्यांनी प्रपंचातील प्रलोभनांना थाराच दिला नाही. पत्नी, पुत्र, भगिनी, माता-पिता, या सर्वांपासून ते दूर आले होते. ते आध्यात्मात इतके रममाण होत असत की त्यांना कुटुंबातील सदस्य, धन, ऐहिक सुखाची आठवणच झाली नाही.

## दिनकरस्वामींचे कार्य

मठ स्थापना झाल्यापासून मठाच्या कार्याची जबाबदारी दिनकरस्वामींनी पूर्णपणे पेलली. नित्य-नियमित रामोपासना, रामनवमी, हनुमान जयंती असे उत्सव मठात संपन्न व्हायला लागले. तसेच समर्थांनी आपल्या महंताना लोकसंग्रह वाढविण्याविषयी शिकवण, सूचना दिलीच होती. त्याप्रमाणे दिनकरस्वामी आध्यात्मात जरी मग्न होते तरी शिष्य परिवार तयार करण्यासाठी ते तत्पर असत. मुख्य म्हणजे त्यांच्या शिष्यांमधे कोणतेही सांसारिक व्याप नसणारे आणि प्रापंचिक असे दोन्ही प्रकारचे शिष्य होते. सर्वांना त्यांनी ज्ञानाधिष्ठीत केले, संप्रदायाची शिकवण दिली, संप्रदायाचे कार्य करण्यासाठी सतत प्रेरणा दिली. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने, कार्याने अनेक जण प्रभावित होऊन त्यांच्या कडून अनुग्रह घ्यायचे. अगदी मोहिते, निंबाळकर, घाटगे या घराण्यातील मराठे जहागिरदारांनी सुध्दा त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. अर्थातच त्यांचा योग्य उपयोग स्वराज्याच्या कार्यात निश्चितच झाला असणार. आपली बहिण, कन्या यांनासुध्दा दिनकरस्वामींनी अनुग्रह दिला होता. जसे समर्थ वेचून, निवडून लोकांना शिष्य बनवित तसेच दिनकरस्वामीही करीत आणि योग्य ज्ञानप्राप्ती करून देत आणि शिकवणही देत. अशा निस्पृह शिष्यांपैकी गणेश, जर्नादन, शिवराम, श्रीधर, व्यंकटेश, हरी, रघुवीर, त्र्यंबक, विठ्ठल, श्याम व दामोदर हे प्रमुख होत. भक्ति, ज्ञान, वैराग्य अशा प्रपंची शिष्यांत दिनकरांचे उभय बंधू शामराज व त्र्यंबक हे अग्रगणी होते.

यावरून दिनकरस्वामींचा शिष्यपरिवार वाढविण्याकडे कसा कल होता हे दिसते. प्रपंच करणारे, न करणारे, आपल्या कुटुंबातील व्यक्तीसुध्दा त्यांना योग्य वाटत आणि ते त्यांना शिष्यत्व प्रदान करीत. या सर्वांनाच त्यांनी मठाचे आणि संप्रदायाचे कार्य करण्यासाठी प्रोत्साहित केले. दिनकरस्वामींचे अजून एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी मठाचे संपूर्ण कार्य केवळ भिक्षेवर पार पाडले. खर तर दिनकरस्वामींकडून ज्या मराठे जहागिरदारांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते त्यांच्याकडून, सरकारकडून, दिनकर स्वामींना वतने, सनदा मिळत होत्या. पण निस्पृहपणे त्यांनी भिक्षेद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नावरच मठाच कार्यभार कसा चालेल यावर शेवटपर्यंत कटाक्ष ठेवला. अजूनही या मठाला कायमस्वरूपी असे उत्पन्न नसल्याने भिक्षेद्वारे किंवा मठाधिपतींच्या स्वतःच्या उत्पन्नातूनच मठाची व्यवस्था सांभाळली जाते. ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा।। ही समर्थांची उक्ती नेहमीच प्रत्यक्षात आणली.

दहाव्या शतकात निर्माण झालेला नाथसंप्रदाय हा कशासाठी होता? तर त्या काळात वामाचार बोकाळला होता, समाजात विकृत धर्माचरण चालू होते, धार्मिक जीवनाला तर तिलांजलीच मिळत होती, त्याचे शुध्दीकरण निर्माण करण्यासाठी झाला होता. अशी विकृत कर्मकांडे आणि वर्णभेदांमुळे समाज अजून विकृतीत अडकत चालला होता. नाथसंप्रदायानंतर त्या काळात पण या विकृतीचे निर्मूलन पूर्णपणे होऊ शकत नव्हते त्यामुळे तेच कार्य संत ज्ञानेश्वरांनी पुन्हा चालू केले. त्यांच्या नंतर पुन्हा एकदा यात खंड पडत चालला होता.

पुढे समर्थांनी यावर लक्ष केंद्रित केले आणि त्यांचा हाच वारसा दिनकरस्वामींनी चालविला. समर्थ स्वतः आपल्या कोणत्याच ग्रंथात हठयोग शिकवत नसत. मात्र दिनकरस्वामींची तशी इच्छा होती. त्याहीपेक्षा त्यांचा अधिकारच मोठा होता. त्यामुळे समर्थांनी त्यांना मात्र अष्टांग योग शिकविला. समर्थांसारख्या गुरुच्या कृपेमुळे दिनकरस्वामींना सोहेसिध्दीची प्राप्ती झाली. दिनकरस्वामींना समाजातील किळसवाणे स्वरूप, ही विकृती, वामाचार हे सलत होते. त्यामुळे यावर त्यांनी त्यांच्या प्रसिध्द अशा 'स्वानुभव दिनकर' मध्ये भाष्य केले आहे. ते म्हणतात,'' आणि मंत्र तंत्र कीळनोत्कीळने। आगमतंत्रोक्त नाना साधने। शाक्त कवळिक चवळिक संपादणे। भ्रष्टाचारी कृत्ये।। स्वा.दि.कलाप ५ कीरणप्रकाश ३।। ''[१८२] काही ओव्यांमध्ये त्यांनी अघोरमंत्र, प्रेतसाधन, कुंभपूजा, कामाक्षविधी, अभक्षभक्षण, मद्यपान

असे अनेक अघोरी किळसवाणे आचार कसे होते ते सांगितले आहे. त्यामुळे ग्रंथातून तसेच प्रत्यक्षातही अशा वाईट आचार–विचारातून मुक्त करण्याचा प्रयत्न दिनकरस्वामींनी केला. गोरक्षनाथांनी जसे या तंत्रसाधनांविरूध्द जे आंदोलन केले ते समर्थांनीही पुढे चालविले आणि समर्थ शिष्यांपैकी कल्याणस्वामी, दिनकरस्वामी, मेरूस्वामी, गिरीधरस्वामी अशा काहींनी आपल्या वाङ्मयातून याचा विरोध दर्शविला. सर्वात जास्त दिनकरस्वामींनी या प्रकारांबद्दल अनेक विचार मांडले. अशा रीतीने त्यांनी धार्मिक जीवन, जे या विकृत विधींनी लडबडले होते ते कसे शुध्द करता येईल यावर लक्ष केंद्रित केले. या सर्वांवर प्रकाश टाकताना त्यांनी मठातील पूजापाठ, संप्रदायाचे सर्व उत्सव, साधना, आचारधर्म, स्वतः तंतोतंत पाळले, जोपासले अर्थात आपल्या इतर संप्रदायिकांकडून, शिष्यांकडूनही ते करून घेतले.

दिनकरस्वामींनी संप्रदायाचे संवर्धन मोठ्या प्रमाणात केले. संप्रदायाचा विस्तार होण्यासाठी, शिष्य परिवार वाढविण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. संप्रदायाची शिस्त त्यांनी स्वतः जशी पाळली तशीच इतर शिष्यांनाही शिस्त लावली. आपल्या संप्रदायाचे कार्य शिकवण याची सर्व शिष्यांना सतत जाणीव करून देत. समर्थांनी घालून दिलेली घडी त्यांनी कधीच विस्कटून दिली नाही. नगर प्रांतात शाही सत्तेचे वर्चस्व असूनसुध्दा त्याही स्थितीत संप्रदायाचे कार्य चालू ठेवले, पुढे नेले. संप्रदायाचा भगवा सतत फडकवत ठेवला, समर्थांचा विश्वास यथार्थ ठरविला.

## दिनकरस्वामींची वाङ्मयनिर्मिती

समर्थ संप्रदायाच्या वाङ्मयातील 'स्वानुभव दिनकर' हा दिनकरस्वामींचा ग्रंथ मेरूमणी तर आहेच. त्याची योग्यता दासबोधा एवढीच आहे. तरीसुध्दा दिनकरस्वामींची इतर काव्ये, वाङ्मय निर्मिती पण आहे. डॉ. प्रल्हाद नरहर जोशी या संदर्भात म्हणतात,'' विशेष बाब म्हणजे यांनी पंढरपूर आणि पांडूरंग यासंबधित कविता केल्या आहेत. ''[१८३]

दिनकरस्वामींनी अतिशय सोप्या रचना केल्या आहेत. समर्थांप्रमाणेच त्यांनाही निसर्ग, निसर्गसानिध्याची आवड होती. ऐन तारूण्यात दिनकरस्वामी आपला प्रपंच सोडून निघाले होते. वृध्देश्वराच्या मंदिरात ते आले तेव्हा जे त्यांचे मन खूप प्रसन्न झाले. चहूकडून डोंगर आणि मध्यभागी शिवालय. अत्यंत सुंदर, प्रसन्न, रमणीय असे ते स्थान होते. ते त्यांच्या मनाला इतके

भावले की त्यांनी तेच स्थळ आपल्या साधनेसाठी निश्चित केले. त्या स्थळाचे वर्णन सांगणारे त्यांचे हे काव्य तेवढेच सुंदर आहे. त्यांनी अभंग, पदे, श्लोकबध्द प्रकरणेही लिहिली आहेत. सवाया लिहिल्या आहेत. श्री. अनंत रामदासी यांनी 'श्री दासायन' मधे ही सवाई दिली आहे. '' गिरी खळी दरकुसा कुह रें शीखरे ही। गडि दरि गूहां गव्हेरं भूयरे ही। जळमळित तडागें साजिरे कूप बावी। सरोवर विहिरे ही रम्य टांकीं असावी।।३।। अमर जळ नुरेनां खंड वोघी पडेना। परम सुरस ऐसे स्थान कोठे दिसेना। खळखळ जळ वाहे दाटले वृक्ष जेथें। जनपद हिन पावे राहवें स्वस्थ त्येथे।।४।। रघुपति मग तेथें आठवे नाठविता। रघुपति मग तेथें धांवतो दूरि जातां। रघुपति मग तेथें सोडितां हि न सोडी। दिनकर वरदे हे लाविली नित्य गोडी।।८।। ''[१८४] या स्थानाचा निसर्ग जेवढा सुंदर होता, तेवढेच सुंदर वर्णन दिनकरस्वामी या काव्यातून करतात, म्हणजेच दिनकरस्वामींना निसर्गाची आवड होती. नंतर दिनकरस्वामींच्या तपश्चर्येला एक वर्ष पूर्ण झाल्यावर जेव्हा श्रीरामचंद्रांनी समर्थरूपात त्यांना स्वप्नात दर्शन दिले, तेव्हा त्या मूर्तीचे पाय धरावे असे मनात येताच ती मूर्ती अदृश्य झाली. पण जागृत झाल्यावर समोर काहीच नव्हते तेव्हा त्यांच्या कावऱ्याबावऱ्या मनाने एक सुंदर रचना केली. श्री. अनंतदास रामदासी यांनी 'श्री दासायन'मधे ती रचना दिली आहे,'' ठेऊनि मस्तक श्रीपदीं भावे। स्वामीनें बाळ सनात करावे। ऐकून हास्य करी प्रभू राजा। दिनकरा शिरी हा कर माझा।।१।। जागृती येऊन जों पुढे पाहे। दीप असे परि मूर्ती न लाहे। विस्मय तो येक राघव जाणे। मूढमती हिण कांही न जाणे।।४।। ''[१८५]

या प्रसंगानंतर दिनकरस्वामी फार भारावले होते, त्यांना सतत डोळ्यासमोर ती मूर्तीच फक्त दिसत होती. त्यांचे भान इतके हरपले होते की हीच मूर्ती पुन्हा नजरेस पडेपर्यंत त्यांनी अन्नपाणी वर्ज्य करायचे ठरविले. त्या मूर्तीत जडलेले त्यांचे चित्त जे म्हणत होते ती रचना अशी आहे. 'श्रीस्वानुभवदिनकर' यात,'' गुरूराज माझ्या सोयरे जीवाचे। देखे न तयांचे पाय केव्हा।।१।।पाय केव्हा दृष्टी पडतील साचे। उतरीन देहाचे निंबलोण।।२।। ''[१८६] या ओळीतून त्यांनी त्यांच्या मनाची अधीरता जी केवळ गुरूराजांचे चरण बघण्यासाठी होती ती फारच भावस्पर्शी असल्याचे जाणवते. जेव्हा ती मूर्ती परत नजरेस पडते म्हणजेच स्वतः समर्थ त्याठिकाणी जातात आणि दिनकरस्वामींच्या नजरेस पडतात तेव्हा दिनकरस्वामी क्षणार्धात हीच ती मूर्ती म्हणून ओळखतात, हेच ते माझे गुरूराज म्हणून त्यांचे पाय घट्ट धरतात, त्यांच्या पायावर मस्तक ठेवतात, त्यावेळची मानसिक स्थिती अत्यंत विलक्षण होती, ते समाधान भरून

पावले होते. त्या भावना त्यांनी काव्यात मांडल्या आहेत. 'श्रीस्वानुभवदिनकर' मधे त्याचे वर्णन असे आहे,'' धन्य जन्माचे सार्थक आजी जालें। येणे संगे देखिली पाऊलें। तुटला भ्रम मन निश्चयासी आलें। निजानंदे हे ब्रह्मांड कोंदले।।१।। जय रामा हरहृदयविश्रामा। अभयंकर। शिरी ठेवीन मेघश्यामा।।धृ।। ''[१८७]

मठाचा कारभार, संप्रदायाचे काम, विस्तार चालू असतानाच त्यांचे वाङ्मय लेखनही चालू होते. संप्रदायाला अनुसरून आणि सर्वांना ते या कवितेतून श्रीरामाला सतत स्मरत रहा असे सूचित करतात. 'श्रीस्वानुभवदिनकर' मध्ये ते लिहितात,'' विचारवंत संत हो। समस्त भाग्यवंत हो। तुम्हांस वीनती त्वरे। स्मरा श्रीराम रे।।१।। तुम्हां समान योग्यता। नसे अशी सभाग्यता। हमणौंनी सांगतों बरें। स्मरा श्रीराम रे।।२।। हिमाग्री धूम्र पान रे। भूगर्भ शून्य वास रे। ह्मणे दिनेश व्यर्थ रे। स्मरा श्रीराम रे।।१०।। ''[१८८]

समर्थांच्या दासबोधा एवढीच 'स्वानुभवदिनकर' या ग्रंथाची श्रेष्ठता आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. समर्थांनी जसे दासबोधात विविध विषय मोठ्या कौशल्याने हाताळले आहेत तसेच दिनकरस्वामींनीही या ग्रंथात विवेक, वैराग्य, आध्यात्मज्ञान,आत्मप्रचिती, गुरूभक्ती हे विषय मांडले आहेत. त्यांचा हा ग्रंथ अत्यंत प्रासादिक आहे. हा अपूर्व ग्रंथ श्रीरामचंद्रांची भक्ती, त्यांची उपासना सांगतो. गुरूभक्ती, संयम, करूणा, भावना, अहंकार, शून्यता अशा अनेक गोष्टी यात प्रकट केल्या आहेत. साधकांसाठी हा ग्रंथ निश्चितच एक मार्गदर्शक ठरणारा आहे. सोळा कलापांचा म्हणजेच समासांचा हा भव्य ग्रंथ कसा आहे हे पाहू. पहिला कलापात दिनकरस्वामींनी ग्रंथपरिभाषा निरूपण म्हणजेच या ग्रंथात काय काय समाविष्ट केले आहे हे सांगून गणेशस्तवन, शारदास्तवन, ओंकारनिरूपण, सद्गुरूनामव्याख्या, कुलदेवतेचे स्तवन करतात.

संसारातही दुःखं आहेतच. दिनकरस्वामी म्हणतात संसार कष्टी होतो. अनेक त्रास सोसावे लागतात. पत्नी चांगली मिळाली तर ठिकच नाही तर तिचे एवढे लाड पुरवून सुखात ठेवून पण ज्या आईवडिलांनी मला कष्टाने वाढविले त्यांचाही ती छळच मांडते. मग सर्व सुखं क्षणभंगूर ठरून प्रपंचाचा वीट येतो. पत्नीने निराशा केल्यावर ज्या पुत्रासाठी नवससायास केले, क्लेश सोसले, ज्याला विद्याभ्यास शिकवून मोठा केला तो शेवटी काय करतो? तर आईबापांना सोडून नविन संसार थाटतो. सासुरवाडीच्या लोकांचे कोडकौतुक करताना इकडे आईवडिल

अन्नाला महाग होतात. मोठा महाल म्हणजे घर बांधलं, कर्ज झालं, ऐषोरामामुळे कर्ज नाही फेडता आलं तर हातात बेड्या मग पत्नी मुलांनीही वाईट ठरविले आणि जीवनच नकोसे झाले. प्रपंचदुःख अशी वर्णन केल्यावर दिनकरस्वामी म्हणतात जन्म,बालपण, तरूणपण, वृध्दत्वपण काही सोपे नाही. आईच्या उदरात यातना, बाहेर येताना याताना, बालपणातील आजारपणं, तारूण्यातील अहंकार आणि मग वृध्दपणी? दिनकरस्वामी पुढे म्हणतात,'' सांगता वृध्दपणाची अवस्था। चित्तकांटाळतसे सर्वथा। संसासदुःख अनिवार त्राहे त्राहे आतां। म्हणे दिनकररामदास।।४९।। ''[१८९] या दुसऱ्या कलापात दिनकरस्वामी सांगतात की संसारसुखाचा करावा, स्त्रीच्या नादाने आईवडिलांना दुखावले तर आपली मुले हेच करणार आणि संसारात पदरी फक्त दुःखच येणार. पुढे दिनकरस्वामी सांगतात आपण केलेल्या पापांची फळं नरकात भोगावी लागतात. सर्वात कठीण यातना म्हणजे यमयातना, त्या भोगायला लागतात. म्हणून तिसऱ्या कलापात दिनकरस्वामी संतसंगाचे वर्णन, निरूपण  करतात. संतांना शरण गेल्यास सुखप्राप्तीची खात्री असते.

सद्गुरू वर्णन करताना दिनकरस्वामी सद्गुरूसाठी एक फार सुंदर, गोड शब्द वापरतात, ते म्हणजे 'सज्जनचकोरसुचंद्र', 'सद्गुरू' या व्याप्तीचा संपूर्ण अर्थ केवळ एका शब्दात मांडला आहे. जसे गुरूचे वर्णन केले आहे. तसेच शिष्य कसा असावा हे ही चौथ्या समासात ते सांगतात.

पाचव्या कलापात गुरूपूजनाच्या पध्दती सांगून दिनकरस्वामी देह स्वभावकर्म, त्रिगुणस्वभावकर्म, खूप उत्कृष्टरित्या समजावून सांगतात. तर पूर्ण वर्णाश्रम स्पष्ट करून सांगतात. दिनकरस्वामींच्या गुरूबद्दलच्या व्याख्या, गुरूची उपासना अगदी व्यापक आहेत. म्हणून ते म्हणतात,'' गुरू दाविती जो जो मार्ग। त्या त्या मार्गे चाले अवघे जग। म्हणौनि गुरूविण उपासनामार्ग। व्यर्थ चि अवघे।। ''[१९०]

सहाव्या कलापात प्रणवाची उपासना, स्वरूप दिनकरस्वामी खूप सोपे करून सांगतात. चतुर्वर्ण, पतिव्रता, स्त्री, विधवा स्त्री, यांचा यातिक्रम पण त्यांनी सांगितला आहे. परमेश्वरावर दिनकरस्वामींची गाढ श्रध्दा आहे त्यामुळे उपासना हे आध्यात्मातील एक महत्वाचे अंग ते मानतात. सूर्य, गणेश, शंकर, ब्रह्म, विष्णू, श्रीरामचंद्र, आदिशक्ती, आदि देवदेवतांमुळे सर्व सृष्टी जिवंत आहे, ही पृथ्वी, चराचर यांना अर्थ आहे. त्यांची मनोभावे उपासना करावी असे ते

सांगतात. 'स्वानुभवदिनकर' मधील सातवा कलाप उपासनेवर प्रकाश टाकतो. ते म्हणतात,'' 'ओंकार' हा सर्व प्रथम आहे. याच ओंकाराच्या रूपाने ब्रह्म–विष्णू–महेश आणि सत्व–रज–तम हे त्रिगुण उत्पन्न झाले आहेत.

आठव्या कलापात भक्तींचे प्रकार दिनकरस्वामी स्पष्ट करतात. सगुणभक्ती, निर्गुणभक्ती, श्रवणकिर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन अशा अनेक भक्तीप्रकारांचा अर्थ, पध्दती दिनकरस्वामींनी खूप व्यवस्थित समजावून सांगितल्या आहेत. विष्णूनामस्मरणाने प्रल्हादाला, रामनामाने वाल्मिकींना तर स्वतः शिवाला सुध्दा रामनामस्मरणाने मुक्त केले आहे. दिनकरस्वामींनी नवव्या व दहाव्या कलापात हठयोगाची लक्षणे सांगितली आहेत. त्यात देहशुध्दी, कुंडलिनि, उर्ध्व भेदन, योगसिध्दी, प्राणायाम, साधन यांचा खुलासा करताना त्यातील योग प्रक्रिया याचा नाथसंप्रदायाशी संबंध जोडला. ते म्हणतात,'' नवही नाथ सोळा सिध्द। तैसेची चोऱ्यासी उपसिध्द। हठयोगबळे जाले प्रसिध्द। महासामर्थ्यवंत।। ''[१९१]

अकराव्या कलापात चतुर्विधज्ञान, स्थूलसूक्ष्मदेह अशाचे निरूपण दिनकरस्वामी करतात, तर बाराव्या कलापामध्ये ब्रह्मांड, विश्वाची व्युत्पत्ती, उत्पत्ती याचे विस्तृतपणे स्पष्टीकरण करतात. परब्रह्म, मूळमाया, पिंड–ब्रह्मांड, अशा या ब्रह्मांडातील गोष्टींचे विवरण, खुलासा दिनकरस्वामींनी तेराव्या कलापात सोप्या करून सांगितल्या आहेत.

चौदाव्या कलापात ज्या पंचमहाभूतांवर ह्या सृष्टीचे विज्ञान आधारलेले आहे ती पंचभूते, विज्ञानस्थिती, पंचभूतांचा परस्परानुक्रम, त्रिगुणाचे स्वरूप दिनकरस्वामी समजावून सांगतात. मनाच्या उन्मनी अवस्थेचे लक्षण, ती स्थिती, तसेच मोक्ष निश्चय, जड्वंचळनिश्चळ आदि गोष्टींचे विवरण दिनकरस्वामी पंधराव्या कलापात स्पष्ट करतात. संप्रदायाची लक्षणेही त्यात सांगतात. यात अखंड स्मरणात ठेवावी अशी शिकवण दिनकरस्वामींनी दिली आहे. दिनकरस्वामी वैराग्यावर भर देताना म्हणतात,'' वैराग्य करावे विवेकयुक्त। प्रतिज्ञा म्हणवावे श्रीरामभक्त। पदार्थमात्री कदापि आसक्त। प्राणांती हि न व्हावे।। तर श्री राम जय जय राम जय जय राम। नित्य स्मरणाचा हा चि। असावा नेम। यावांचूनि सकळ मिथ्याश्रम। वायांविण करू नये।। ''[१९२] दिनकरस्वामीसुध्दा विवेक, वैराग्य, अहर्निश रामभक्ती, हनुमंताचे स्मरण आणि श्रीरामजयरामजयजयराम हे नित्य स्मरण यावर भर देतात. गुरूपरंपरा पूर्णत्व, प्रतिपाद्य हे सांगणारा सोळावा कलाप आहे. त्यात

दिनकरस्वामी रामदासनाम व्याख्या, श्रीगुरूउत्तरपूजा, श्रीगुरूपरंपरा आणि शेवटी गुरूपूर्णत्व सांगतात. दिनकरस्वामींच्या घराण्यात वडिलांकडून मुलाला अनुग्रह मिळाला आहे. त्यांची गुरूपरंपरा ही आदिनारायणापासून ब्रह्मा–वशिष्ठ–श्रीराम–रामदासस्वामी आणि दिनकरस्वामी अशी आहे. त्यानंतर ते म्हणतात,'' मग दिनकरे प्रबोधुनि निजात्मज। रामचंद्रस्वरूपानुभवी सहज। ठेऊनि गुरूपरंपरा वोज। दाविली निजकृपा।। ''[१९३] असा हा 'स्वानुभवदिनकर' ग्रंथ दैनंदिन जीवन आणि अध्यात्म यांचा मेळ घालतो. गुरूकृपा कशी मिळवावी. गुरूकृपेच्या सानिध्यात राहिल्यावर कसे सुख मिळेल, मोक्ष मिळेल हे ही सांगतो. श्रीरामभक्ती, श्रीरामांच्या उपासनेने मिळणारी फलश्रृती अवघे जीवन आनंदी करते, एक विलक्षण अनुभूती देणारा, अज्ञानालाही ज्ञानामृत पाजून ज्ञानी, कृतार्थ करणारा हा ग्रंथ कालातीत आहे.

दिनकरस्वामींना ६९ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यापैकी २७वर्षे त्यांना समर्थांचा सहवास लाभला. दिनकरस्वामींचे निर्याण श्रावण वद्य नवमी शके १६१९ म्हणजेच इ.स.१६९७ मध्ये झाले. त्यांचे समाधीस्थान तिसगांव बाहेरच्या एका शेतात आहे. त्याजागी एक लहान वृदांवन त्याच्या कार्याची, रामोपासनेची, समर्थांवरील अखंड दृढ प्रेमाची साक्ष देते.

### मठाची सद्यस्थिती


सध्याचे मठाधिपती 'श्री. प्रकाशबुवा रामदासी' आहेत. मठात ते रामनवमी, हनुमानजयंती उत्सव साजरे करतात.तसेच दासबोध पारायण, नित्यापासनाही येथे चालते. शहरात आडबाजूला अजूनही तिसगाव मठाचे कार्य व्यवस्थित चालावे यासाठी प्रकाशबुवा रामदासी अत्यंत प्रयत्नशील आहेत.

### ४.६.३ कल्याणस्वामी – डोमगांव आणि परंडा मठ

'श्री समर्थ शिष्य कल्याण' कल्याणस्वामी म्हणजे समर्थांचा अतिशय निकटचा, सर्वात जास्त सहवासात राहिलेला शिष्य. त्यांची यथार्थ ओळख म्हणजे समर्थांचे ग्रंथलेखक आणि दुसरे म्हणजे एकनिष्ठ सेवक. समर्थांचे बहुतांशी ग्रंथलेखनाचे काम कल्याणस्वामींचे आहे आणि समर्थांच्या प्रत्येक परीक्षेत पसंतीला उतरलेला एक गुरूसेवक, ज्याला समर्थांची सर्वात जास्त सेवा करण्याचे भाग्य लाभलेला. एकमेव सेवक. समर्थ प्रतापकार गिरीधर म्हणतात,''

कल्याणनामा ग्रंथ विस्तारी। उत्कट कीर्ती विश्वाभीतरी। देहांत साधने गुरूआज्ञे करी। कल्याण चराचरी पावला राम।।१६।। ''[१९४]

सत्कार्योत्तेजक सभेच्या 'श्रीसांप्रदायिक विविध विषय प्रथम खंड'यात त्यांची मठपरंपरा दिली आहे.




## कल्याणस्वामींचे चरित्र

'कल्याणस्वामी' म्हणजे मूळचा अंबाजी. वयाच्या केवळ १०व्या-१२व्या वर्षी समर्थांबरोबर कोल्हापूरमधून निघाला आणि 'कल्याणस्वामी' होऊन शेवटपर्यंत समर्थ आणि संप्रदायाशी एकनिष्ठ राहिला. त्यांचे पूर्ण नाव अंबाजी कृष्णाजीपंत कुलकर्णी. विरक्त स्वभाव असलेले कृष्णाजीपंत मूळचे बाभूळ गावचे. सराफीचा व्यवसाय असलेले. त्यांची पहिली पत्नी आणि पहिला मुलगा अतिशय अल्पायुषी ठरले. अंबाजीच्या वडिलांचा पहिला संसार अगदीच भातुकलीचा ठरला. आणि कृष्णाजीपंतांना अजूनच विरक्ती येऊन ते तीर्थयात्रेला बाहेर पडले.

देवीवर त्यांची निःस्सीम श्रध्दा होती. त्यावेळी कृष्णाजीपंत अगदीच तरूण म्हणजे केवळ विशीतील होते. नाशिक, त्र्यंबकेश्वर, वणी, सातारा, कऱ्हाड अशा अनेक ठिकाणी देवदर्शन घेऊन ते कोल्हापूरात आले आणि देवीवर निस्सिम श्रध्दा असल्याने महालक्ष्मी मंदिरात सप्तशतीची पारायणे करू लागले.

तेव्हा कोल्हापूरला वैद्यकिय, भिक्षुकी, शेतीवाडी करणारे पाराजीपंत कुलकर्णी एका भल्या मोठ्या वाड्यात रहात होते. पत्नी सत्यभामा, दोन मुली आणि अविवाहित बहिण लक्ष्मी असा त्यांचा संसार होता. एक दिवस अंबाबाईने स्वप्नात येऊन दृष्टांत दिला. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' मंदिराच्या ओवरीत बसून एक तरूण सप्तशतीचे वाचन करतो आहे. त्यास तुझी बहिण लक्ष्मी दे. तिचा संसार तू चालव. ''[१९६] मूळचेच सद्वर्तनी असलेले पाराजीपंत खूप भारावले. दृष्टांताप्रमाणेच त्यांची भेट अंबाबाईच्या मंदिरात कृष्णाजी पंताशी झाली आणि सप्तशतीचे पाठ करण्यासाठी त्यांनी कृष्णाजीपंतांना घरी नेले. काय योगायोग होता पहा. विरक्त होऊन कृष्णाजीपंतानी घर आणि गांवच सोडले आणि पाराजीपंताच्या घरी मुक्कामाला असताना अंबाबाईने त्यांनाही दृष्टांत दिला. समर्थ संप्रदायाच्या आणि समर्थांच्या जीवनात खूप महत्वाचा असणारा असाच हा दृष्टांत होता. संप्रदायाला त्यांच्यामुळे मोठे योगदान मिळाले, दोन भक्त, सेवक समर्थांना लाभले. श्री. सुनील चिंचोलकर याबाबत लिहितात,'' तुझ्या प्रारब्धात संसार अटळ आहे, तेव्हा पाराजीपंतांच्या बहिणीबरोबर लग्न कर. तुज पासून तिजला दोन पुत्र होतील. ते दोघे मोठे देशभक्त आणि देवभक्त निघतील. ''[१९७]

याप्रमाणे कृष्णाजीपंतांचा आणि पाराजीपंतांच्या बहिणीचा विवाह झाला तरी कृष्णाजीपंतांना केव्हाही वाटेल तेव्हा तीर्थयात्रेला जाता येईल आणि त्यांच्या संसाराची काळजी पाराजीपंत घेतील असे ठरले. लक्ष्मीचे नाव कृष्णाजीपंतांनी रखमा ठेवले. काही काळ कृष्णाजीपंत पत्नीसह बाभूळगावला राहिले. परंतु बाळंतपणाच्या निमित्ताने रखुमाबाई माहेरी आल्या आणि कृष्णाजीपंतांनी पुन्हा तीर्थयात्रेला जायचा निर्णय घेतला. त्यामुळे रखुमाबाई, त्यांची दोन मुले, अंबाजी, दत्तात्रय सर्वजणांची जबाबदारी पाराजीपंतांनी घेतली. कृष्णाजीपंत पुन्हा कधी परत आलेच नाहीत. कृष्णाजीपंतांची दोन्ही मुले अतिशय तरतरीत होती. अंबाजी मात्र लेखन, वाचन, पाठांतर, जमाखर्च या सर्वच बाबतीत अतिशय हुषार होता. प्रचंड निर्भय, साहसी होता.

समर्थ कऱ्हाड, मिरज करून कोल्हापूरला आले. काही काळ त्यांचा मुक्काम अंबाबाईच्या मंदिरात होता आणि त्यांची कीर्तने चालू होती. ती कीर्तने ऐकून पाराजीपंतांनी समर्थांचा अनुग्रह घेण्याचे ठरविले आणि समर्थांना घरी येण्याचे निमंत्रण दिले. समर्थ घरी येण्याआधीच अंबाजीचा उत्साह उतू चालला होता, कारण पारमार्थिक असणाऱ्या अंबाजीला त्याचे सद्‌गुरू भेटणार आहेत आणि तो मोठा साधक होऊन महान कार्य करणार आहे असे त्याचे भविष्यच होते. समर्थ वाड्यातील दृश्य पाहून हरखूनच गेले. वाडा पाना–फुलांनी सजवला होता. आल्या आल्या अंबाजीने पाट मांडून त्यावर बसविले, त्यांचे पाय धुतले. सुवासिनींनी सात्विकतेने, श्रध्देने त्यांना ओवाळले. त्याचवेळी समर्थांच्या मनावर ठसले ते अंबाजीचे चुणचुणीत, तरतरीत, नियोजनबध्द कृती असलेले व्यक्तिमत्त्व. तत्क्षणी समर्थांना जाणीव झाली की शिष्याची ही तत्परता, नेटकेपणा, बुद्धीमत्ता, प्रत्येक गोष्टीतील कुशलता जी आपल्या संप्रदायाची गरज आहे ती हा मुलगा पूर्ण करेल. अर्थात तेवढ्या वेळेत त्यांनी अंबाजीची अनेक प्रकारे परीक्षा घेतली आणि अंबाजी दरवेळेस उत्तीर्णच झाला. त्यामुळे समर्थांनी पाराजीपंतांकडे गुरूदक्षिणेत अंबाजीलाच मागितले. अर्थातच पाराजीपंत म्हणाले,' ह्यावर माझी सत्ता नाही. हा निर्णय केवळ माझी बहिणच घेऊ शकते. '

समर्थांवर श्रीरामांची कृपा कशी होती याचा प्रत्यय त्यांना आला. रखूमाबाई म्हणाल्या, 'स्वामी तुम्ही अंबाजीस न्या, शिवाय मी आणि दत्तात्रय यांचाही स्वीकार करा. समर्थांना अंबाजीसारख्या शिष्याबरोबर अजून एक शिष्य आणि शिष्या मिळणार होती. समर्थांचे अंतःकरण भरून आले आणि त्यांनी तिघांनाही घेऊन जायचा निर्णय घेतला. यातून असे दिसते की समर्थांसारखा गुरू लाभणार असेल तर शिष्यही तशीच कामना करतो.

अशा प्रकारे समर्थ या दोन नवीन शिष्यांना त्यांच्या आईसह घेऊन निघाले. मसूरला रामनवमी उत्सव साजरा करायचा म्हणून ते मसूरला निघाले. कऱ्हाडजवळ त्यांनी खंडोबाच्या पालीजवळ असलेल्या शिरगांव या गावी दत्तात्रय आणि रखमाबाईस ठेवले, मठस्थापना करून दिली, तोच दत्तात्रय स्वामींचा शिरगांव मठ. पुढे अंबाजीसह ते मसूरला आले.

समर्थ सर्व शिष्यांसह मसूर या प्रांतात आले ते रामनवमीचा उत्सव साजरा करायला. तेही अगदी भव्य रथयात्रेसह. मसूरची जहागीर शहाजीराजांकडे असली तरी आदिलशाहीचे सावट

होते. ढोल, ताशे, लेझीम, मृदुंग, टाळ, वाजंत्री यांच्या गजरात रथातून रामारायाची मूर्ती येत होती. परंतु वाटेत आंब्याच्या एका मोठ्या झाडामुळे रथाच्या निशाणाच्या काठ्या अडत होत्या. फांदी कापायचा निर्णय घेतल्यावर समर्थ सांगतात बुंध्यापाशी बसून फांदी तोडावी. पण कोणीच पुढे येईना हे काम करायला कारण ती फांदी विहिरीवर असल्याने फांदी तोडणारा विहिरीत पडणार होता. तेव्हा समर्थांचा अंबाजी तुरंत पुढे झाला आणि त्याने फांदी तोडली. अर्थातच तो खोल विहिरीत पडला. कितीवेळ झाला तरी अंबाजीची काहीच चाहूल लागेना. अख्खा गाव विहिरीपाशी जमला, रथयात्रा थांबली, सर्वजण चिंतातूर होते, ते अंबाजीचे बहुतेक बरेवाईट झाले असणार या विचारात, पण आज्ञाधारक असणाऱ्या या समर्थकृपेच्या शिष्याला यमदूत येतील का न्यायला? मग समर्थ विहिरीत डोकावून अंबाजीला हाक मारतात. श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' कल्याण आहे ना रे बापा? ''[१९८] अंबाजी विहिरीतून म्हणतो,' हो तुमच्या कृपेने कल्याणरूप आहे. समर्थ त्याला विहिरीतून बाहेर ये अशी आज्ञा देतात आणि अंबाजीस म्हणतात,'आज पासून तू कल्याण, इथून पुढे तुला सर्व 'कल्याण' म्हणूनच ओळखतील. ' या कल्याणाने खरोखरीच भविष्यात समर्थांनी केलेले नामकरण 'कल्याण' हे अगदी सार्थ केले. 'कल्याणस्वामी' म्हणून त्यांची ख्याती झाली.

समर्थांच्या सानिध्यात येऊनच 'अंबाजीचा कल्याण' झाला आणि समर्थांनीच त्याला घडविले म्हणजे त्याचे सर्व कल्याणच होणार याची पूर्णपणे खात्रीच होती. कल्याणाचे गुण पाहूनच समर्थांनी त्याची एक शिष्य म्हणून निवड केली होती. समर्थ लहान आणि कोवळी तरूण मुले निवडीत, कारण त्यांची जडण-घडण त्यांना हवी तशी करता येत असे. सर्वात लहान वयातील त्यांचे भावी शिष्य म्हणजे उध्दवस्वामी आणि कल्याणस्वामी. कल्याणचे वय ही अगदी दहा बारा वर्षाचेच होते. म्हणजे समर्थांनी आपल्या पठडीत हवे तसे कल्याणच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले ते क्रमाक्रमाने त्याला शिस्तीत घडवित होते. शरीर बुध्दी आणि मन यांची वाढ एकसारखीच व्हावी म्हणजे तिन्हींचा विकास एकसमान विकास झला पाहिजे. याकडे समर्थांचा कला होता. त्याप्रमाणे समर्थ जसजसे पैलू पाडत होते तशीच कल्याणची जडणघडण होत होती. समर्थ त्याच्या बौध्दिक विकासाकडे, शरीर सुदृढ होण्याकडे व्यवस्थित लक्ष देत. कल्याणस्वामींचे पुढील कार्य बघताना लक्षात येते की, कल्याणही तेवढ्याच हुशारीने स्वतःला पैलू पाडून घेत होता. त्याचे सुंदर हस्ताक्षर, ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती सर्वांना थक्क करणारी होती. त्याच्या या

गुणांमुळे तो समर्थांच्या ग्रंथांचा लेखक बनला होता. असा हा ग्रंथ लेखक 'कल्याण' समर्थ जे सांगत ते नुसतेच लिहून घ्यायचे काम करत नसे तर त्याचा अर्थही समजावून घेत असे. त्याच्या या गुणामुळे समर्थाच्या सहवासात त्याची प्रतिभा, काव्यशक्ति जागृत होऊन ती पूर्णपणे विकसित झाली. अशा प्रकारे बोलणे, चालणे, रहाणे, बघणे, हसणे, लेखन, वाचन या सगळ्याच बाबतीत कल्याणाने समर्थांचा आदर्श ठेवला आणि तसेच तरबेज होऊन दाखविले. आणि नंतर 'कल्याणस्वामी' म्हणून महान कार्याची सुरूवात केली.

पुढील काही प्रसंगातून कल्याणस्वामींचे कर्तृत्व, निर्भयता, आज्ञाधारकता, एकनिष्ठता, समर्थांवरील विश्वास, स्वतःचा आत्मविश्वास असे अनेक पैलू दिसतात. त्यावरून समर्थांच्या जीवनातील त्यांचे स्थान, कल्याणस्वामींच्या जीवनातील समर्थांचे स्थान दिसते. शिवाय त्यांच्या या गुणांमुळे त्यांचे संप्रदायातील योगदान, वाङ्मय निर्मितीतील योगदान समजते.

कल्याणस्वामी डोमगावला जाईपर्यंत त्यांचा बहुतेक काळ समर्थांच्या सहवासात गेला. पण त्यांच्या गुरूबंधूना मात्र वाटायचे की शिष्यांच्या बाबतीत डावे-उजवे करून फक्त कल्याणालाच स्वतःजवळ ठेवून घेतात. अशी तक्रार त्यांनी शिवरायांकडे सुध्दा केली. पण समर्थांनी ते जाणले आणि कल्याणस्वामी कसे सगळ्या कसोटीत उतरतात हे एकदा दाखवायचे ठरविले. पुढे एकदा शिवराय आले असताना गप्पागोष्टी करताना समर्थ सर्वांना विचारतात, 'दासबोधाची कोणी किती पारायणे केली?' मग सर्वजण शिवरायांसह सर्वजण उत्तरतात ५०-१०० पारायणे केली. त्यावर समर्थ विचारतात,'तुम्हाला परमार्थ समजला म्हणजे दासबोधाचा अर्थही समजला असेलच. तेव्हा एक ओवी मी विचारतो ती दासबोधाच्या कोणत्या दशकात, समासात कितवी आहे सांगा.' पण कुणालाच उत्तर देता येईना, यावर शिवराय मात्र शांत राहिले पण कल्याणस्वामींनी लगेचच ती ओवी काढून दाखविली. असे हे कल्याणस्वामींचे पाठांतर आणि स्मरणशक्ती होती.

समर्थ एकदा कोंडवा घळीतून चाफळला निघाले होते. वाटेत कोयना नदी दुथडी भरून वाहत होती. कोणी सांगडवाला मिळेना म्हणून त्यांनी कोयनेत उडी घेऊन पोहायला सुरवात केली, अर्धी नदी पार केल्यावर एका भोवऱ्यात ते अडकले आणि दोन दिवस वर आलेच नाहीत. आजूबाजूच्या लोकांनी खूप प्रयत्न करून शेवटी चाफळला निरोप पाठवला. कल्याणस्वामी आणि

उद्धवस्वामी त्वरित पाटणला आले. कल्याणस्वामींनी सद्‌गुरूंचे आणि रघुपतीचे स्मरण करून पुराच्या पाण्यात उडी मारली आणि भोवरा पार करून समर्थांना नदीतून काठावर आणले. जर समर्थच सापडत नाहीत तर ह्या शिष्याचा पुरात काय टिकाव लागेल. या गावकऱ्यांच्या शंकेला कल्याणस्वामींनी तडा दिला आणि आपल्या गुरूसाठी मोठ्या आत्मविश्वासाने कोयना नदीलाच आव्हान दिले. 'समर्थ सेवा मंडळ, सज्ज्नगड', च्या श्रीसमर्थ चरित्रामृतात म्हणले आहे की,'' शिष्य असावा धारिष्ट्याचा। शिष्य असावा दृढ व्रताचा। शिष्य असावा अंतरीचा। परमशुध्द। ''[१९९] असे हे कल्याणस्वामी नुसते पोहण्यातच नाही तर पुराच्या पाण्यातही पट्टीचे पोहणारे होते.

बऱ्याच शिष्यांमध्ये कल्याणस्वामी फक्त गुरूसेवाच करतात, जपजाप्य, भजनपूजन करतच नाहीत तसे ते कल्याणस्वामींना सुध्दा विचारत. पण या निंदासत्राला समर्थांनीच एका युक्तीने धुडकावले. एक दिवस भर सभेत समर्थांनी आव्हान केले की ते स्वतः एका संस्कृत श्लोकाचे दोन चरण सांगतील पुढचे दोन चरण बाकीच्यांनी रचून दाखवावेत, या आव्हानाला उत्तर द्यायला कोणीच तयार होईना. शेवटी समर्थांनी कल्याणस्वामींना सांगितल्यावर एकच काय दोन चरणे समर्थांचे आणि दोन चरण कल्याणस्वामींचे असे बघता बघता शंभर श्लोक रचले गेले. अशा प्रकारे पाच अध्यायांची ही 'दासगीता' तयार झाली. अर्थातच निंदकांची चर्चा थांबली. श्री. अनंत रामदासी म्हणतात या संदर्भात लिहितात,'' गुरूसेवेत अखंड मग्न असणाऱ्या कल्याणांना 'सेवेकरिता झाले ज्ञान' या सद्‌गुरूवचनाचा पूर्ण अनुभव आला असल्यास नवल काय? ''[२००] यावरूनच लक्षात येते की कल्याणस्वामी जसे गुरूसेवेत मग्न असायचे तसेच एकीकडे त्यांचे अखंड चिंतनही चालू असायचे.

समर्थ सज्ज्नगडावर वास्तव्यास असताना त्यांच्या एकदा कफाची व्यथा फारच उचंबळून आली. वैद्यकशास्त्राप्रमाणे साठलेले पाणी न वापरता जिवंत, वाहणाऱ्या पाण्याचा वापर करावा असे लक्षात आले, तर हे पाणी कोण आणणार? समर्थांसाठी एवढे कष्ट कोण घेणार? त्यासाठी तेवढ्याच शारिरिक क्षमतेचा माणूस हवा होता. अर्थातच शेवटी कल्याणस्वामी तयार झाले. १८-१८ किलोचे तांब्याचे हंडे, जे अजूनही सज्ज्नगडावर आहेत ते रोज गडाखाली जाऊन उरमोडी नदीच्या जिवंत झऱ्यातून आणू लागले कुठेही न थांबता खालून थेट एका चालीत गडावर पोहोचत. असे त्यांचे अफाट शारीरिक सामर्थ्य, त्याही पेक्षा जास्त त्यांचे मनोबल आणि

सद्गुरूसेवेची तळमळ होती याचसाठी समर्थ रोज कल्याणस्वामींना दोन शेर डाळ, एक शेर गूळ आणि अर्धा शेर साजूक तूप देत, म्हणजे खाली परळीत डाळीच्या पुरणाचा नाष्टा करून ते निघतील आणि शारिरिक झीज भरून येईल. त्यामुळे पुन्हा इतरांचा मत्सर सुरू झाला आणि ते कल्याणस्वामींना 'डाळगप्पू' म्हणून चिडवू लागले. समर्थांच्या कानावर ही पण गोष्ट आली आणि त्यांनी एक दिवस इतर शिष्यांना दासबोधातील एक ओवी विचारली. पण नुसत्या गप्पाच करणारे शिष्य कोणीच सांगू शकले नाही, शेवटी कल्याणस्वामींनी ओवीचा दशक, समास आणि ओवीचा क्रमांक सांगितला आणि सर्व गप्प झाले. पुढे डाळगप्पूचा विषय झाल्यावर कल्याणस्वामी इतर शिष्यांना चोख आध्यात्मिक उत्तर देत. श्री सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' त्यावर हात जोडून कल्याणस्वामी म्हणाले,' महाराज डाळ द्विदल असते. सुख-दुःख, पाप-पुण्य, मान-अपमान, चांगले-वाईट ही दोन दल' जो गप्प म्हणजे जो या द्वैताच्या पलिकडे जातो तो डाळगप्पू होय. ''[२०१] या उत्तरातून कल्याणस्वामींच्या यथार्थ ज्ञानाची झलक मिळते.

एकदा समर्थ कीर्तनात एक श्लोक म्हणतात,' आम्ही रांधिले ते सर्व सेऊनी। अवशीष्ट देतो मज काढूनी। या कल्याणासाहित्यें कोदंडपाणी। किर्तनी रंग माजविला।। '

याचा शब्दशः अर्थ असा होत होता की, 'आम्ही रांधतो, जे कल्याण खातो आणि आम्हांस ते उच्छिष्ट देतो तेव्हा कीर्तनाला रंग चढतो. मूर्ख लोकांनी निंदा सुरू केली की शिष्याचे उच्छिष्ट आणि किर्तनाला रंग याचा काय संबंध तरी आहे का? पण त्या श्लोकात समर्थांनी कल्याणस्वामींची स्तुती केली होती. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'श्री समर्थशिष्य कल्याण' या ग्रंथात लिहिले आहे,'' आम्ही कविता करतो आणि कल्याण ती पाठ करितो, वेळेवर आम्हांस आठवली नाही म्हणजे कल्याण सुचवितो. आम्हास आनंद होतो आणि कीर्तनात रंग माजतो. ''[२०२] कल्याणस्वामींची स्मरणशक्ती आणि महानता कशी आहे हे कळते. कधी कधी समर्थांनाही ते वेळेवर आठवून ओवी सांगू शकत होते.

अशा प्रकारे अनेक प्रसंग आहेत की ज्यावरून कल्याणस्वामींची आज्ञाधारकता, सद्गुरूंवरील विश्वास, त्यांचे स्वतःचे अफाट शारीरिक सामर्थ्य, प्रचंड मनोबल, कुशाग्रबुद्धी, आत्मविश्वास असे असंख्य गुण लक्षात येतात. त्यांनी एकदा माजलेल्या हत्तीला आपल्या सामर्थ्याने वठणीवर आणले, भर पावसाळ्यात जीवाची पर्वा न करता समर्थांकरिता विड्याची पाने

आणली. एवढे धारिष्ट्य करणाऱ्या शिष्याबद्दल समर्थांना केवढा अभिमान वाटत होता. जेव्हा कल्याणस्वामींना सर्पदंश झाला तेव्हा समथांनी त्यांना आपल्या सामर्थ्याने वाचविले एवढेच नाही तर, अकरा मण साखर वाटीन असा नवस केला. एखाद्या गुरूने शिष्याच्या प्रेमाखातर नवस बोलला यात शिष्य किती महायोग्यतेचा असावा, हे लक्षात येते. दुसरे म्हणजे स्वतः शिवरायांनी एवढी साखर घळीत पाठवली. एका राजाने आपल्या गुरूबंधूला केलेला आदर कल्याणस्वामींची महती सांगतो.

समर्थांचे ग्रंथलेखन कार्य जवळजवळ पूर्ण झाले होते. कारण समर्थांचा कल्याणस्वामींना लहानपणीच संप्रदायात आणण्याचा प्रथम हेतू तोच होता. समर्थांचे एवढे अफाट ग्रंथलेखन पूर्ण होण्यास मोठा काळ लागला कारण त्यांचे फक्त वाङ्मयनिर्मितीचे कार्य नसून इतरही मोठे कार्ये, जबाबदाऱ्या होत्या. हे आपण पाहिलेच. जवळजवळ ४८वर्षे कल्याणस्वामी समर्थांच्या सान्निध्यात होते. समर्थांच्या सर्व कार्यात कल्याणस्वामी त्यांना साथ देत होते. मुख्य म्हणजे कल्याणस्वामींनी ही लेखनाची जबाबदारी चोखपणे पार पाडली होती. पुढे लेखनकार्य संपल्यावर समर्थांनी कल्याणस्वामींना सज्ञनगड सोडून कोठेतरी दूरवर पाठवण्याचा निर्णय घेतला, कारण एक तर समर्थांचा अंतकाळ जवळ आला होता, त्यामुळे कल्याणजवळ असताना आपला अंतकाळ कल्याण सहन करू शकेल का नाही, याबद्दल समर्थांनाच काळजी वाटत होती. समर्थांच्या डोळ्यासमोर सतत कल्याणस्वामींचा जीवनपट येत होता. एवढासा १०–१२वर्षाचा पोर आपले घर, आई–बंधूंना सोडून केवळ सद्‌गुरूंच्या तळमळीने आपल्या बरोबर आला. आपण घडवू तसा तो घडत गेला, आपल्या प्रत्येक कसोटीत तो उतरला, आपल्यासाठी कधी जीवाची तमा बाळगली नाही, इतर शिष्यांकडून होणारा मत्सर, निंदा, चेष्टा सहन करून आपल्या सेवेत याने कधीच खंड पडू दिला नाही. त्याच्या आयुष्यात प्रथम स्थान फक्त आपलेच होते, मग आपल्यानंतर त्याची काय अवस्था होईल ही कल्पना खरंतर समर्थांनांही कष्टी करत होती.

या एवढ्या दीर्घ काळात कल्याणस्वामींचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे विकसित झाले होते. नवीन प्रांती जाऊन मठनिर्मिती, संप्रदायाचे विस्तारकार्य हे तेवढ्याच जबाबदारीने अंगावर घेतील आणि यशस्वीरित्या पार पाडतील याची समर्थांना पूर्ण खात्री होती. मग आपल्या दुःखात बुडून त्यांचे आयुष्य कोमेजून जाईल असे समर्थांना वाटले आणि काही झाले तरी या लाडक्या शिष्याला हे

सहन करायला भाग पाडण्यापेक्षा त्याला जबाबदारीच देऊन दूरवर पाठविले तर संप्रदायाच्या कार्यात आपला वियोग सहन करणे सुलभ होईल या हेतूने समर्थांनी नवीन ठिकाणी, दूरवर म्हणजेच सोलापूरजवळ डोमगावला जाऊन मठस्थापना करून कल्याणस्वामींनी तिथे आपल्या कार्याची मुहूर्तमेढ करावी असा निर्णय घेतला. श्री. सुनिल चिंचोलकर या संदर्भात लिहितात,''पण झाडाखाली झाड वाढत नाही या नियमानुसार जोपर्यंते ते समर्थांपासून दूर जाऊन स्वतंत्र कार्य उभे करीत नाहीत तोवर त्यांच्या गुणांची वाढही होणार नाही व त्याची समाजाला कल्पना येणार नाही.''[२०३] समर्थांची या सर्व हेतूंबरोबरच अशी तीव्र इच्छा होती की कल्याणासारख्या माझ्या शिष्याने देशकार्याचा वसा घ्यावा, समाजप्रबोधन करावे आणि एक महंत म्हणून त्याची ख्याती सर्वदूर पसरावी.

मोगलाई असलेला प्रांत समर्थांनी कल्याणस्वामीसाठी निवडला आणि एक दिवस जड अंतःकरणाने कल्याणस्वामींना आपली भूमिका सांगितली. समर्थांनी कल्याणस्वामींना समजाविले की,' मोगलाई असलेल्या सोलापूरजवळील प्रांतात संप्रदाय विस्ताराची, कार्याची गरज आहे. संप्रदायाची तत्त्वे, स्वरूप, त्याप्रती असणारे रामनाम स्मरण, भक्ती-विरक्ती, निस्पृहता वाढवावी, त्यांचा प्रसार करावा, माणसांना घडवावे, कार्याचा हा वसा स्वतंत्रपणे हाती घ्यावा. ' समर्थांचा वियोग होणार असला तरी नेहमीप्रमाणेच सद्गुरूंच्या आज्ञेचे पालन, ज्या अर्थी त्यांनी निर्णय घेतला आहे म्हणजे तो योग्यच असणार, समर्थांच्या या निर्णयामागे काहीतरी ईश्वरी योजना सुध्दा असणार या विश्वासाने कल्याणस्वामींनी समर्थांचा निरोप घेतला. अशा रितीने सोलापूर प्रांतात कुर्डुवाडी पासून जवळ असलेल्या सीना नदीच्या तीरावर असलेल्या डोमगावला कल्याणस्वामींचा मठ स्थापन झाला. कल्याणस्वामी जड अंतःकरणाने निघाले होते पण सीना नदीच्या काठावर आल्यावर नदी बघताच त्यांना प्रसन्न वाटू लागले आणि त्यांच्या दुखऱ्या मनावर हळूवार फुंकर घातली गेली.

कल्याणस्वामींनी डोमगाव मठ स्थापन करून त्याचा कारभार हाती घेतला. तेथील सर्व कारभार सुरळीत झाल्यावर समर्थांनी कल्याणस्वामींना अजून एका मठाची स्थापना करण्याची आज्ञा दिली. ते म्हणजे 'परंडा', डोमगावजवळच्याच एका गावी आणि तेथेही महंती करावयाची असे सांगितले. कारण त्या प्रांतात शिवरायांच्या काही राजकीय हालचाली सुरू झाल्या होत्या. या

दोन्ही प्रांतात कल्याणस्वामींना पाठविले याचे कारण म्हणजे त्या प्रांतात राजकीय दृष्टीने कार्य करणारा मठ आणि महंत नव्हता आणि या दोन्ही ठिकाणी यासाठी खंदा व्यक्तिमत्वाचा महंत असणे आवश्यक होते त्यामुळेही समर्थांनी हा निर्णय घेतला असेल. यातून कल्याणस्वामी किती विश्वासार्ह होते याची जाणीव होते.

अशा रितीने डोमगाव आणि परंडा या दोन्ही मठांची निर्मिती होऊन कल्याणस्वामींनी त्याची सूत्रे हातात घेतली. या भागात डोंबांची वस्ती होती म्हणूनच तेथेही समाजप्रबोधनाची गरज होती.

समर्थ जेव्हा तीर्थाटन काळात हिमालयात गेले होते तेव्हा त्यांनी आपला देह हिमालय कुंडात झोकून दिला होता. परंतु श्रीरामचंद्रांनी त्यांना झेलले आणि तुमचा जन्म, हा देह या कारणासाठी नाही तर जगाचा उध्दार करण्यासाठी आहे. तसेच अगदी तसेच समर्थांनी कल्याणस्वामींना सांगितले. इतके वर्षांचा समर्थांचा सहवास  आणि आता वियोग होणार हे कल्याणस्वामींचे दुःखच होते. त्यांची स्थिती अचानक आकाश कोसळावे अशी झाली होती. तेव्हा समर्थ त्यांना म्हणतात,‘आम्हांला श्रीरामचंद्रांनी जगोध्दाराचे कार्य करण्याची आज्ञा दिली. आता हेच अवतार कार्य तुम्हाला इथून पुढे करायचे आहे म्हणजे समर्थांना  कल्याणस्वामींबद्दल केवढा विश्वास होता की हा आपला शिष्य संप्रदायाची जबाबदारी यशस्वीपणे घेईल. यातूनच कल्याणस्वामींची थोरवी लक्षात येते. कल्याणस्वामींनी समर्थांच्या आज्ञेने डोमगावला जाऊन स्वतंत्र कार्याची मुहूर्तमेढ केली. त्यापूर्वी अनेकवर्षे त्यांनी समर्थांच्या ग्रंथाचे लेखन केले. एकनिष्ट सेवकाबरोबरच कल्याणस्वामींची ‘समर्थांचे लेखक’ म्हणून ओळख आहे. सुरवातीला आपण पाहिलेच आहे की. श्रीसमर्थप्रतापकार गिरिधर म्हणतात,‘‘ कल्याणनामा ग्रंथ विस्तारी। उत्कट किर्ती विधाभीतरी। ’’ आणि अनंत कवीही म्हणतात,‘‘ स्वामींचा कवितासमुद्र अवघा कल्याण लिहित असे। ’’ कल्याणस्वामीही स्वतःला ‘समर्थांचा लेखक’ म्हणवून घेतच होते. मुख्य म्हणजे समर्थ वाङ्मयातील मुकूटमणी समजला जाणारा ‘श्री ग्रंथराज दासबोधही’ कल्याणस्वामींच्या हस्ते लिहिला गेला. सुंदरमठाच्या म्हणजेच शिवथरघळच्या पवित्र, रमणीय, एकांत स्थानी कल्याणस्वामींनी समर्थ सांगतील तसाच ग्रंथ लिहिला. पुढे त्याच्याही प्रती कल्याणस्वामींनी

लिहून काढल्या आहेत. त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरातील दासबोध ग्रंथ आजही डोमगावच्या मठात आहे.

### कल्याणस्वामींचे कार्य

समर्थांनी संप्रदायची निर्मिती आणि विस्तार केला तोच एका महान हेतूने. त्यामुळे अनेक ठिकाणी मठनिर्मिती झाली आणि त्या मठाचा अधिपती नेमला गेला, तसेच इतर शिष्य मठाचे कार्य करीत, प्रबोधनासाठी इतरत्र संचार करीत. समर्थांनी सर्व शिष्यांना संहिता घालून दिलीच होती. तरीसुध्दा ते त्यांचे कार्य चोख बजावतात की नाही, संप्रदायाचे कार्य सुरळीत चालू आहे की नाही याची पहाणी किंवा निरीक्षण तर करणे आवश्यक होते. देखरेखीचे हे महत्त्वाचे काम कल्याणस्वामींवरच सोपवले जात असे आणि कल्याणस्वामी ती जबाबदारी व्यवस्थितपणे सांभाळून त्या कार्याचा संपूर्ण वृत्तांत समथांना देत असत. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'श्रीसमर्थ शिष्यकल्याण' ग्रंथात म्हणले आहे,'' अशा या समर्थांच्या संघटनेत श्रीसमर्थांच्या खालोखाल कल्याणांचे स्थान आणि अधिकार असे. ''[२०४] समर्थ शिवरायांच्या राजकारणात अप्रत्यक्षरित्या भाग घ्यायचे. अर्थात त्यांच्या कार्याचा तो एक मोठा हेतू होता. जेव्हा शिवरायांकडे त्यांच्या दरबारात कामानिमित्त जायला लागायचे तेव्हा हे काम असे कोणाकडेही सोपवून चालत नसे. समर्थांना या कामासाठी योग्य वाटणारे दोघेच शिष्य होते, ते म्हणजे कल्याणस्वामी आणि दिवाकर गोसावी. काही काळानंतर दिवाकर गोसावींवर राजदरबारी जायचे–यायचे, महत्त्वाची पत्रे देणे–घेणे, संदेशांचे देवाण–घेवाण याची जबाबदारी आली, तत्पूर्वी हे काम कल्याणस्वामीच करीत. ही महत्त्वाची सेवा म्हणजे कल्याणस्वामींचा गौरवच आहे.

कल्याणस्वामींनी खूप मोठा शिष्यसमुदाय जमविला, महंतनिर्मिती केली. कल्याणस्वामी दूरदर्शी होते. शिष्यसमुदायाची सुरूवात कल्याणस्वामींनी सज्जनगडहून डोमगावसाठी प्रस्थान समयीच केली. समर्थांप्रमाणेच कल्याणस्वामीही किशोरवयीन मुलांना निरखत, संप्रदायाच्या कार्यविस्तारासाठी त्यांची योग्यत बघत आणि आपल्या संप्रदायात सामील करून घेत. सज्जनगड ते डोमगाव या प्रवासात त्यांना अठरा मुले त्या योग्यतेची मिळाली आणि त्यांना ते डोमगावला घेऊन आले, मठात ठेवून घेतले, त्यांना योग्य शिकवण दिली. अशा तऱ्हेने डोमगावला आल्या आल्याच त्यांनी शिष्यांना पैलू पाडण्यास सुरूवात केली आणि संप्रदायाचा प्रसार लगेचच सुरू

झाला. या संदर्भात श्री. सुनिल चिंचोलकर लिहितात,'' अनंतगोसावी, अप्पाजीगोसावी, अण्णाजी भालकीकर, अनंत भट, अंताजी निनामकर, अंबाजी माजगावकर, आप्पाजी चितळे, आनु, आक्का, काळूबाई, केशव, कबीर, कृष्णाजी तामसेकर, गोविंद पन्हाळेकर, नरहरी, दिगंबर, जयराम, भिमाजी, बहिरव या सर्व शिष्यांना त्यांनी मठात ठेवून घेतले व संप्रदायास प्रारंभ केला.''[२०५]

डोमगाव आणि परंडा या दोन्ही गावात 'डोंब' लोकांचीच वस्ती सर्वात जास्त होती. या लोकांमध्ये ज्ञानाचा, अध्यात्माचा, व्यवहाराचा प्रचंड अभाव होता. त्यामुळे तेथे वास्तव्य करताना या वस्तीतील लोकांसाठी प्रभावी काम करणे गरजेचे होते. कल्याणस्वामींना प्रकर्षाने जाणीव झाली की एक तर तिथे मोगलांचा अंमल, त्यातून हे लोक 'परमेश्वराची भक्ती या गोष्टीचा विचारही न करण्यातील होते म्हणून संप्रदायाच्या प्रसारासाठी आणि प्रबोधनासाठी ही गोष्ट त्यांना अति आवश्यक वाटली. शिवाय कल्याणस्वामींना तिथेच राहून कार्य करायचे होते. सर्वप्रथम त्यांनी त्या लोकांना प्रेमळपणे जवळ केले कारण, इतर कर्मठ लोकांच्या दृष्टीने हे 'डोंब' जातीचे लोक हीनच होते. त्यासाठी वेळोवेळी या कर्मठ लोकांचा रागही त्यांनी सहन केला. या डोंब लोकांना कल्याणस्वामींनी आपल्या शिष्यांकरवी शिकवण द्यायला सुरूवात केली. त्यांच्यात नामस्मरण, भजनाची आवड निर्माण केली. विविध प्रकारचे वाचन, अर्थांतर, त्यांना सांगण्यावर भर दिला. भक्ती, मनाची प्रकृती, श्रवण–वाणी, याचे महत्त्व पटवून दिले. या लोकांसांठी काम करणे खरंच प्रशंसनीय होते.

कल्याणस्वामींनी मठातील दैनंदिन आचार नित्यनियमाने करण्यावर भर दिला. सर्वप्रथम भिक्षेचे संस्कार त्यांनी शिष्यांवर केले, दैनंदिन भिक्षा, भिक्षेबरोबर श्लोक म्हणण्याच्या पध्दतीकडे त्यांनी लक्ष दिले. लहानमुलांसाठी संस्कार केंद्र चालू केले, त्याच्यात दैनंदिन नित्योपासना, पुराणातील कथा, आचार–विचार, लेखन–वाचन या सारख्या गोष्टींवर भर दिला, तसेच बलसंपन्नशरीराचे महत्त्व लहान आणि तरूण वर्गात पटवून देण्यासाठी सूर्यनमस्कारासारखे व्यायामही त्यांना शिकवून, नित्याने करवून घेत अशाप्रकारे त्यांना स्वराज्याप्रतीच्या कर्तव्याची जाणीव करून दिली, देशभक्तीची, देशसेवेची गोडी त्यांच्यात निर्माण केली. एक प्रकारे मठ म्हणजे संप्रदायाची मोठी पाठशालाच असावी असा त्यांचा मानस होता. अनेक ग्रंथांचे वाचन, निरूपणही

मठात होई. याचबरोबर कल्याणस्वामींनी कीर्तनाचा अभ्यासही शिकवायला सुरवात केली. ते स्वतः उत्तम कीर्तनकार असल्याने कीर्तन सेवेमुळे अनेक कला आत्मसात होतात, वेद–पुराणांची ओळख होते, वाचन–पाठांतर अशा गोष्टी आपोआपच घडतात यावर त्यांचा विश्वास होता.

समर्थांप्रमाणेच कल्याणस्वामी इतरत्र, खेडोपाडी, आजूबाजूच्या सर्व परिसरात संचार करीत. त्यामुळे समाजात परमेश्वराची भक्ती, उपासना केली जावी यासाठी त्यांनी मारूतीमंदिरांची स्थापना केली. अर्थातच त्यांनाही समाजासमोर पराक्रमी, अतुलनीय, आदर्श सेवाव्रत अंगीरलेल्या अशा बलवान देवतेचा आदर्श ठेवायचा होता. तसेच स्वतःच्या तालमीत पूर्ण तयार झालेल्या मठाधिपती म्हणून योग्यता प्राप्त झालेल्या शिष्यांना कल्याणस्वामींनी मठ स्थापून दिला. महंतांची निर्मिती करून त्यांना शिष्यांना अनुग्रह देण्याचे अधिकार दिले. त्यांना संप्रदायाच प्रसार करण्यासाठी दूरवर पाठवून मठांचे जाळे पसरवायला सुरवात केली. त्या मठांच्या निर्मितीचा आणि प्रसाराचा भविष्यात खूप उपयोग झाला आहे. मराठवाडा आणि कर्नाटक या दोन्ही प्रांतात कल्याणस्वामींचे महंत आणि शिष्य मठाचा प्रसार, संप्रदायाचा विस्तार आणि समाजप्रबोधन करू लागले, त्यामुळे हे दोन्ही प्रांत संप्रदायासाठी जोडले गेले. अण्णाजी भालकीकर, केशवस्वामी, जगज्जीवन, रामाजीदादा, शिवराम, स्वामीदास यांना कल्याणस्वामींनी अनुक्रमे निलंगा, उंब्रज, तडवळे, बारामती, तेलंगती येथे पाठवून कार्यभार सोपवला. प्रत्येक मठातून लेखनाचे काम अव्याहत चालू असायचे. समर्थांची आज्ञाच असायची की इतर ग्रंथांच्या नकल करून प्रति वाढवायच्या आणि स्वतःची पण काही वाङ्मय निर्मिती करावी. त्याप्रमाणेच कल्याणस्वामींनी शिष्यांकरवी संत ज्ञानेश्वर, मुक्ताई, चोखामेळा, एकनाथ तर मुकुंदराज, शिवदिन केसरी, मुक्तेश्वर अशा अनेक कवींच्या काव्याची बाडे लिहून घेतली. जेणेकरून अनेक गावात, मठात हे वाङ्मय ठेवता येईल. तसेच कल्याणस्वामींचा कित्ता आणि ही हस्तलिखिते अनेक मठात ठेवली आहेत.

शिवराय आणि समर्थ या दोघांचेही निर्याण केवळ दोन वर्षांच्या अंतराने झाले होते. त्यामुळे पुन्हा एकदा स्वराज्यावर वावटळ आली. औरंगजेब तर स्वतः लाखोंची फौज घेऊन अवघ्या महाराष्ट्रात धुमाकुळ घालू लागला. परत महाराष्ट्राची धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक घडी विस्कटली. कल्याणस्वामींना महाराष्ट्र उध्वस्त होताना पहायला लागला. तरीपण त्यांनी धीर

सोडला नाही. ते स्वतः आणि शिष्यांकरवी आपल्या संप्रदायाचे, मठाचे कार्य अजून जोमाने करायला लागले. समुदायाचे संघटन, एकात्मता, बलसंवर्धन या सर्वांचे महत्व समाजाला पटवून देत होते. सामाजिक आणि राजकीय स्थितीबरोबरच पुन्हा एकदा लोक आध्यात्मापासून दूर जायला लागले होते. त्यावेळी कल्याणस्वामींनी आध्यात्मिक स्थितीला पुन्हा जागृती आणली. समर्थांचे विचार, त्यांची शिकवण समाजासमोर मांडायला सुरवात केली खरं तर नंतरची परिस्थिती तर अजूनच बिकट होत गेली.

शिवराय गेले, काही वर्षातच संभाजीराजे पण गेले, मग राजारामांचे नेतृत्व सुरू झाले. तोपर्यंत संप्रदायाच्या मठांचीपण सुरक्षितता नाहीशी व्हायला लागली, त्यामुळे सगळीकडे प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आणि संप्रदायाच्या कामात अडथळे यायला लागले. या परिस्थितीत कल्याणस्वामी समर्थांशी एकरूप असलेले शिष्य असल्याने समर्थांचे अवतार कार्य त्यांना पुढे न्यायचे होते, अशा अवघड, प्रतिकूल वातावरणात अतिशय सावधगिरीने, गुप्ततेने संप्रदायाचे अस्तित्व ते टिकवत होते आणि त्याचा उपयोग करून घेत होते. या संदर्भात श्री. सुनिल चिंचोलकर लिहितात,'' त्या भयाण अंधारात ते प्रचंड वादळाला न जुमानता हा संप्रदायाचा दिवा घेऊन वणवण हिंडून लोकांना आशेचा किरण दाखवत होते. ''[२०६] यावरून कल्याणस्वामींचे संप्रदायातील स्थान किती उच्च होते याचा प्रत्यय येतो.

समर्थांच्या सहवासात, सानिध्यात जास्त काळ राहिलेल्यांमध्ये कल्याणस्वामींबरोबरच उध्दवस्वामी, दिवाकर गोसावींचाही उल्लेख करावा लागेल. समर्थांच्या पश्चात उध्दवस्वामी आणि दिवाकर गोसावी यांच्यात चाफळ मठाच्या अधिकारावरून काही कलह सुरू झाला होता. अर्थात तसे होणे स्वाभाविक असले तरी अपेक्षित नव्हते, कारण प्रत्येकजण समर्थांच्या शिस्तीत तयार झाला होता. अशा वेळी या वादात कल्याणस्वामींनी वडिलकीच्या नात्याने अधिकाराने भूमिका वठवली. त्या भूमिकेला अनुसरून त्यांनी दिवाकर गोसावींच्या एका पत्राला उत्तर दिले आहे. त्या पत्राचा मजकूर पाहिल्यावर लक्षात येते की डोमगाव, परंडा आणि इतर प्रांतात कार्यरत असताना सुध्दा कल्याणस्वामींचे ध्यान संप्रदायाच्या मुख्य ठाण्यावरही असायचे. समर्थांच्या कार्याची, शिकवणीची, संप्रदायाची धुरा नीट व्यवस्थित आपल्या स्वतःकडून आणि सर्व शिष्य महंतांकडून

सांभाळली कशी जाईल याकडे कल्याणस्वामी कटाक्षाने बघत. समर्थांच्या नावाला, कामाला कुणी बोल लावू नये याची त्यांनी कायमच काळजी घेतली.

हीच गोष्ट ध्यानात ठेवून कल्याणस्वामींनी हे खाली नमूद केलेले पत्र दिवाकर गोसावींना लिहिले. सत्कार्योत्तेजक सभेने, 'श्रीसमर्थ शिष्य कल्याण' या ग्रंथात या पत्राचा समावेश केला आहे. '' श्रीगुरूभक्त पारायेण मोक्ष श्रीया विराजित विराजमान दिवाकर गोसावी यांप्रति कल्याणनाम्ने कृतानेक नमस्कार. विनति उपेरि तुम्ही पत्र पाठवलें ते पावोन लेखनार्थ अवगत जाहलें सर्व प्रकारें विस्तारें ल्याहावें तरि श्रीयाची आज्ञाप्रमाणे वर्तावे हें उचित. ते हि सूज्ञ आसेच वडिलपणाची निती जे परंपरागत उपासना स्छापना जे केलि आहे तें भजन चालावें, तेथे कलहास कारण नाहि. आपण श्रींच्या आज्ञेप्रमाणें देवाचा कार्यभाग चालु देणें. श्री शिवथरते घळीस अस्तां तुम्हांवर संतोष होऊन नळ नाम संवच्छरिं आज्ञा सर्वत्रांस केलि. जे हा महाबळेश्वरकर आहे बुद्धि हि महाबळ आहे. राजद्वारिं कीत्येक प्रसंगीं पाठवावयास योग्य आसे. प्रस्छानपारपत्या योग्य. याच्या हस्तें श्रीचें संस्छान जोपर्यंत तों कार्य कर्तव्य वंशपरंपरेने घ्यावें. ऐसे बोलोन तुह्मास श्रीनि तांबुळ दिधला. ते समयि रो उद्धव गोसावी व विठ्ठल गोसावी व चीमणाबाई व भांजी गोसावी व आह्मी आणिक कित्येक समुदायि होते ने आज्ञा स्मरोन अभिमान अक्रोध होऊन भजनास प्रवर्तल्यानें श्री दया करितिल. तुह्मी धैर्य न टाकणें. यांच्या कलहामुळें श्रीच्या धर्मस्थापनेसि अंतर पडे ऐसें न करणे. त्यांचा संतोषरूप आशिर्वाद आसे. सर्व हि यश देतिल. राजेश्री उद्धव गोसावी ह्यांस हि पत्र लिहिलें आसें त्यावरून विदित होईल. आह्मी हि लवकरिच येतों. बहुत काय लिहिणें. धैर्य श्रीभजनाचें न टाकणें हे विनंति. ''[२०७]

कल्याणस्वामींनी हे पत्र खूपच सुंदररीत्या लिहिलेले आहे. सुरूवातीलाच दिवाकर गोसावींना त्यांत 'कृतानेक नमस्कार' लिहून मोठेपणा देऊन स्वतःचेही स्थान राखले आहे.

कल्याणस्वामींनी अतिशय योग्य, सूचक शब्दात, योग्य रचना करून हे पत्र लिहिले आहे. यावरूनच लक्षात येते की दूर राहून सुध्दा कल्याणस्वामी मठाच्या पारपत्य अधिकारांसारख्या बाबींकडे लक्ष देत होते. कलह, वाद-विवाद यामुळे कार्यावर काही परिणाम होऊ देत नव्हते. शिवाय सारखे समर्थांच्या आज्ञेची, शिकवणीचीही जाणीव करून देत होते. वडिलकीच्या नात्याने

पण कोणावरही अहंपणाने अधिकार न गाजवता कल्याणस्वामी शिष्यांच्या सांप्रदायिक कामात लक्ष घालायचे.

## कल्याणस्वामींची वाङ्मय संपदा

कल्याणस्वामींची वाङ्मय संपदा अतिशय समृद्ध आहे. समर्थांच्या सहवासात राहून त्यांची प्रतिभा आणि काव्यशक्ति खूप बहरली होती. समर्थांच्या वाङ्मयाचे संस्कार कल्याणस्वामींवर झाले होतेच. तरीसुध्दा त्यांची स्वतःची लेखणी समृध्दच होती. कल्याणस्वामींच्या वाङ्मय निर्मितीमध्ये खूप विविधता आहे. अनेक प्रकारचे काव्य लेखन त्यांनी केले आहे. त्यातील भाषा सुबोध, समजायला सोपी आहे, त्यांच्या रचनेला एक प्रकारचा स्वतंत्र साज आहे. कल्याणस्वामींनी अनेक स्फुट प्रकरणे, स्फुट श्लोक, अष्टपदी, चौचरणी, ओव्या, पदे, सवाया, भूपाळ्या, आरत्या वगैरे रचना केल्या आहेत. त्यांच्या रचनांचे सौंदर्य अगदी वेगळे आहे. 'महावाक्य पंचीकरण ग्रंथ' हा अभंगात्मक असा ग्रंथ सात शतकांचा आणि ७७१ ओव्यांचा परमार्थावरील ग्रंथ आहे. या ग्रंथावरून कल्याणस्वामींचा पारमार्थिक अधिकार लक्षात येतो. गुरूच्या शोधाची त्यांची एक ओवी खूप सुंदर आहे. सतकार्योत्तेजक सभेने 'श्रीसमर्थशिष्य कल्याण' या ग्रंथात ती नमूद केली आहे,'' अत्यंत गहन अर्थ येथें आहे। पाहिल्याविण हें काय कळे।।१५।। थोर तो प्रत्ययो सत्य विवेकाचा। गुरूमुखें याचा शोध होय।।१६।। ''[२०८]

कल्याणस्वामी म्हणतात हा विषयच गहन आहे. पण तो समजावून घ्यायचा असेल तर गुरू हवा, अर्थ कळण्यासाठी गुरू करून, त्याच्या करवी आकलन करून घ्यावे, नाही तर समर्थांच्या चरणी प्रार्थना करून त्यांचे 'आत्माराम', 'दासबोध' असे ग्रंथ वाचावेत. रामभक्तीनेही सत्याचे ज्ञान होईल. पन्नास ओव्यांचे 'सोलीव सुख' हे प्रकरण परमार्थाचे महत्त्व सांगते. त्यात संसारात खस्ता खाणाऱ्या जीवांचे वर्णन कल्याणस्वामी करतात आणि त्यांना या त्रासातून मुक्त करण्यासाठी समर्थांना प्रार्थना करतात.

वैराग्य असावे तर शुकासारखे हे सर्वश्रुतच आहे. मग कल्याणस्वामींनी या शुकाची कथा ते १८ ओव्यांमधून 'श्रीशुक आख्यान' यात खूप सुंदररित्या सांगितली आहे. या आख्यान काव्याचे सौंदर्य काही वेगळेच आहे. समर्थांनाही या शुकाची ' शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे ' उपमा दिली आहेच. शुकाने वैराग्ययुक्त तपश्चर्येला सुरवात केल्यानंतर इंद्रदेवाला आपल्या

स्थानाला धोका आहे हे जाणवल्यावर तो रंभेला शुकांच्या तपश्चर्येचा भंग करण्यासाठी पाठवतो. पण शुक हे ओळखतात आणि रंभेचा डाव उधळून टाकतात. हे आख्यान लिहिता लिहिता कल्याणस्वामी एक कलाटणी देतात. समर्थांच्या पश्चात त्यांच्या प्रमुख शिष्यात कलह निर्माण झाला तो त्यांना आठवतो. निरर्थकपणे एकमेकांशी भांडण करतात त्यामुळे कल्याणस्वामी दुःखी होतात. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'श्रीसमर्थशिष्य कल्याण' या ग्रंथात या ओव्या दिल्या आहेत. ''वृथा भांडती निंदिती एकमेकां। भरा दुर्भरा कारणे शिष्यशाखा।।१५।। सहस्त्रांमर्ध्ये वीरळा येक संतू। गीतातत्वता वाक्य बोले संततू।।१६।।असो बोलता बोलता शीण होतो। प्रभूरामचंद्राविणें काळ जातो।।१७।। ''[२०९] या आख्यानातून शेवटी दिलेल्या ओव्यांमधून कल्याणस्वामींची मनःस्थिती कशी झाली ते कळते आणि खरोखरीच शहाणे असलेल्या शिष्यांत सुध्दा असे वाद होतात की, ते सोडवताना कल्याणस्वामींनाही शीण आला होता, ते अंतर्मुख होतात.

'ध्रुवाख्यान' हे कल्याणस्वामींचे आख्यान वेगळ्या विषयावरचे आहे. ध्रुवाच्या कथेने सर्वच जण प्रभावित होतात. त्याने परमेश्वर प्राप्तीसाठी घेतलेले कष्ट सर्वश्रृतच आहेत. ध्रुवाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. त्याच्या दृढनिश्चयाची बऱ्याच वेळा उपमा दिली जाते. येथे कल्याणस्वामींना ध्रुवाइतकेच त्याच्या आईचे काम प्रशंसनीय वाटते, कारण तिने आपल्या मुलाला, ध्रुवाला परमेश्वर प्राप्तीचा मार्ग दाखविला, त्याला मार्गदर्शन केले. कल्याणस्वामी त्याच्या आईला धन्यवाद देतात. या विचारातून कल्याणस्वामींचा वेगळेपणा जाणवतो.

हिंदुस्थानी भाषेत कल्याणस्वामींनी 'रक्मिणीस्वयंवर हिंदुस्तान' हे काव्य लिहिले. हे आख्यान कल्याणस्वामी खूप गोड भाषेत लिहितात. कल्याणस्वामींचेही आदर्श दैवत, भक्तीचे दैवत म्हणजे प्रभूश्रीरामचंद्र. त्यांनी स्वयंवर आख्यान लिहिले पण ते सीतेचे नाही लिहिले तर रूक्मिणीचे लिहिले, तेही हिंदुस्तानी भाषेत. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'श्रीसमर्थशिष्य कल्याण' मध्ये लिहिले आहे,'' कृष्णलीला उत्तर हिंदुस्तानात प्रिय फार. तेव्हा त्या भागातील समर्थ शिष्यांना आणि मठपतींना प्रचार कार्याला उपयोग पडावे म्हणूनच कल्याणांनी रूक्मिणी स्वयंवर वर्णिले आणि तेवढ्याच साठी ते हिंदुस्तानींत वर्णिले. आणि तेवढ्याच साठी ते हिंदुस्तानीत वर्णिले. ''[२१०] कल्याणस्वामींचे हे कार्य खरंच प्रशंसनीय आहे कारण त्यांचे लक्ष नुसतेच महाराष्ट्राात केंद्रित नव्हते तर उत्तर भारतातसुध्दा होते आणि तेथेही कार्याची आवश्यकता होती.

समर्थांनीही तीच दृष्टी ठेवून तिकडे तीर्थाटन केले, मठ–मंदिरे स्थापन केली. त्यामुळे महाराष्ट्राबाहेर मठपतींच्याही सोयी कल्याणस्वामी बघत होत, त्यांना सहाय्य करत होते. ' ओव्या संतमाळा ' म्हणजे कल्याणस्वामींनी केलेले संत स्तवने. दहा ओव्यांमध्ये त्यांनी जवळजवळ २५–२६ संत लोकांची नावे गुंफली आहेत. या काव्याचे सौंदर्य असे की श्रीरामांच्या रूपात या सत्पुरूषांची कल्पना ते करतात. शेवटच्या चरणात ते स्वतःचे आणि आपले बंधू दत्तात्रय यांचेही नाव गुंफतात, यावरून आपले सद्गुरू समर्थ रामदासांची महती त्यातून कशी दाखवतात ते दिसते.

'श्रीकल्याणकृत चौचरणी ओव्या' मध्ये कल्याणस्वामींनी पाच अभंग मिळून ८२ चौचरणी ओव्यांची रचना केली आहे. त्यामध्ये 'रामकथा' यात गोदावरी नदीचे महत्व गायले आहे. 'पांगुळ मी देवा' यात मी पांगळा असून माझ्याकडे तू कृपादृष्टीने पहा अशी रामाला विनंती करतात.

या अभंगामध्ये गोदावरी नदीला महत्त्व दिले आहे, रामरायाला माझा मायबाप असून या पांगळ्यावर कृपादृष्टी ठेव असे विनविले आहे, मी समर्थ चरणांमुळे पावन झालो शिवाय ते आपल्यालाही आश्वासन देतात की सज्ञनांची सेवा हा कल्याणाचा मार्ग आहे हे सांगितले आहे. 'जनीजनार्दन' हे सत्य असून वंद्य–निंद्य, रंक–राव असे अनेक भेद असले तरी 'ब्रह्मी ब्रह्म पूर्ण कल्याण संपूर्ण' असे म्हणून कल्याणस्वामी गुरूकृपेकडे आपले लक्ष वेधतात.

एकूण १९ मथळ्यांचे 'श्रीकल्याणकृत स्फुट श्लोक' हे ७५ श्लोक आहेत. यात कल्याणस्वामींनी अनेक विषय हाताळले असून त्यातील काही विषय मात्र खूप ठळक वाटतात. ते म्हणजे शिष्य वर्णन, श्रीक्षेत्र चाफळ, श्रीपत्रिका, आणि नाममहिमा. 'नव्हे तो चि तो शिष्य मोक्षाधिकारि' यात कल्याणस्वामी प्रथम शिष्यांची कुलक्षणे सांगतात आणि नंतर सत्शिष्याची लक्षणे सांगतात. चाफळ ही अत्यंत पवित्र भूमी. कल्याणस्वामींचेही मन तिथे रमते. पावित्र्याबरोबरच त्या स्थळाची रमणीयता भावते. पुढे ते सांगतात की,'समर्थांच्या वसतीचे स्थान' अशी चाफळची महती आहे. या रमणीयस्थानी तुळशी वृंदावन असून वृंदावनाची अखंड आरती होत असते. हे वर्णन कल्याणस्वामी 'स्थळ थेरमाळे येडे स्वरीचे' यात करतात.

'श्रीपत्रिका' ही संज्ञाच फार छान आणि खूपच वेगळी आहे. 'श्रीपत्रिका' म्हणजे लंकार्णवी देव जालो मराया। म्हणजेच अकरा श्लोकांचे एक पत्र. रावणाने सर्व देवांना बंदी बनून

लंकेत ठेवले होते. त्या बंदीशाळेत असताना ब्रह्मदेवाने श्रीरामांना पत्र लिहिले. त्यांची विटंबना, दैन्यावस्था कशी होत आहे हे सांगितले. श्रीरामराया हा कल्याणस्वामींचा आदर्श आहे. त्यामुळे सर्व देवांची सुटका ज्या श्रीरामरायाने केली, त्या रामरायाची स्तुती सर्वांनी ऐकावी या हेतून हे काव्य लिहिले. 'नाम महिमा'मध्ये कल्याणस्वामी नामस्मरणाचे महत्व समजावून सांगतात. कारण कल्याणस्वामींचाही 'नामस्मरण' या भक्तिप्रकारावर जास्त भर आहे.

'रामा पतीतपावना' या अष्टपदीतील चरणांची रचना कल्याणस्वामींनी वेगळ्या प्रकारे केली असून थोडक्यात रामचरित्र सांगितले आहे. शिवाय यात सुध्दा नामस्मरणाचा आग्रह धरला आहे. 'श्रीकल्याणकृत सवाई' यात कल्याणस्वामी नामस्मरणाचे महत्व सांगतात. कल्याणस्वामींनी श्रीराम, बारा ज्यार्तिलिंगाची आणि मारूतीची भूपाळी रचली आहे. नामस्मरणाचे महत्व तिन्हीत असून त्यात दोन मध्ये समर्थांचा उल्लेख केला आणि मारूतीच्या भूपाळीत त्याच्या पराक्रमाचे, शक्तिचे वर्णन करतात. कल्याणस्वामींच्या आरती रचना ह्या सद्‌गुरू, रामदास, काकडआरती, दासबोध, मारूती, कृष्ण, श्रमहरणी म्हणजे सीना नदी, ब्राह्मण यांच्यावर आहेत. 'श्रीकल्याणकृत पदपदांतरे' यात गणपती, शारदादेवी, श्रीराम म्हणजे त्रिदशवंदविमोचक राम, कृपासागर राम, योगीसज्ञन जीवन राम, पतित पावन राम या श्रीरामांच्या रूपांवर २६ पदे रचली आहेत. तर १० पदे मारूतीरायांच्या रूपावर रचली आहेत. या शिवाय श्रीदत्तमहाराज,शंकर, कृष्ण आणि समर्थांवर कल्याणस्वामींच्या पदरचना लक्षणीय आहेत, केवळ गुरूसेवेवर चार पदे रचून नामाच्या महिमावर ९ पदे कल्याणस्वामींनी रचली आहेत. कल्याणस्वामींच्या 'प्रार्थना' या प्रकारात श्रीरामाची, समर्थांची, श्रोत्यांची, प्रार्थना आर्जवी शब्दात रचल्या आहेत.

असे हे समर्थ शिष्य कल्याणस्वामींचे वाङ्मय स्वतंत्र अस्तित्व दाखविते. स्वतःचे स्वतंत्र असे सौंदर्य प्रत्येक काव्याला आहे. कल्याणस्वामींच्या वाङ्मयात श्रीरामचंद्र आणि समर्थांना सर्वात महत्त्वाचे स्थान असून भक्तीला अनन्य साधारण महत्व दिले आहे. आपल्या वाङ्मय निर्मितीतून अनेक विषय कल्याणस्वामींनी कौशल्याने हाताळले आहेत. त्यांच्या प्रत्येक कार्याचे सौंदर्य तर वेगळे आहेच शिवाय ते काव्य अगदी आश्वासक आहे. श्रीरामाची सेवा करा, नामस्मरण करा, मनोभावे भक्ती कराल तर श्रीरामरायाची कृपादृष्टी अखंड तुमच्यावर राहील असे

ते आपल्याला खात्रीने सांगतात. अशा रितीने त्यांच्या प्रत्येक लेखनात,'रामराया आणि समर्थ आहेत.

समर्थांनी सर्व महंतांना एक दंडक घालून दिला होता. तो म्हणजे वर्षात एकदा सर्व कामाचा वृत्तांत चाफळ मठात येऊन देणे. कल्याणस्वामींचे महंत जरी समर्थांना भेटले तरी त्यांना 'कल्याण' भेटल्याचा आनंद होई. समर्थांच्या निर्याणानंतर कल्याणस्वामी सज्जनगडावर आले तोपर्यंत अग्निसंस्कार पूर्ण झाले होते. समाधीपाशी जाऊन कल्याणस्वामी खूप रडू लागले आणि अंतसमयी बोलावले नाही म्हणून सगुण दर्शन झाल्याशिवाय अन्नपाणी घेणार नाही अशी शपथ घेतात. परंतु कल्याणस्वामींचा आधिकारच एवढा होता की समाधीतून ज्योत प्रकट होऊन तीत प्रत्यक्ष समर्थ प्रकटले आणि कल्याणस्वामींना दर्शन दिले, ते खूप गहिवरले. पूर्ण सज्जनगडच कल्याणस्वामींना समर्थरूपात दिसायला लागला. त्यामुळे त्यांनी पुन्हा सज्जनगडावर पाऊल ठेवायचे नाही असा निर्धार केला. श्री. सुनिल चिंचोलकर या संदर्भात लिहितात की,'' कारण गडावर पाऊल ठेवणे म्हणजे समर्थांच्या देहावर पाऊल ठेवणे असे त्यांना वाटले. ''[२११] या विचारात कल्याणस्वामींच्या ह्रदयातील समर्थांचे स्थान समजते.

समर्थांच्या निर्याणानंतर त्यांच्या अस्थी चाफळच्या तुळशी-वृंदावनात जवळ जवळ ३२ वर्षे होत्या आणि त्या काशीच्या गंगेत विसर्जन करायच्या होत्या. कल्याणस्वामींचे शिष्य केशवस्वामी उंब्रज मठाचे अधिपती होते. ते दरवर्षी डोमगावला आपल्या गुरूंच्या दर्शनास गेले की कल्याणस्वामींना विचारायचे ते समर्थांच्या अस्थीविसर्जनाबद्दल. पण दरवेळेस कल्याणस्वामींचे डोळे पाणावायचे आणि म्हणायचे,' बघू नंतर, आत्ता सगळीकडे अनाचार चालला असून चाफळहून काशीला एवढ्या मोठ्या प्रवासात स्वामींच्या अस्थी मुगलांच्या ताब्यात गेल्या तर?' मग त्या कल्पनेने केशवस्वामी गप्प होत. नंतर सगळीकडे वातावरण शांत झाल्यावर केशवस्वामींनी चाफळच्या वृंदावनातून समर्थांच्या अस्थी नेण्यासाठी काढल्याच आणि कल्याणस्वामींना एकदा अस्थीदर्शन मिळावे म्हणून ते थेट डोमगावला निघाले. तो दिवस होता शके १६३६ आषाढ शुध्द १३ म्हणजेच सन १७३४. पण हाच दिवस कल्याणस्वामींचा अखेरचा दिवस ठरला. जशा इकडे चाफळला केशवस्वामींनी समर्थांच्या अस्थी वृंदावनातून बाहेर काढल्या, त्याक्षणी डोमगावला कल्याणस्वामींनी आपला देह ठेवला. विचित्र योगायोग म्हणावा?

का गुरू–शिष्यांच्या एकरूपतेची प्रशंसा करावी? परंड्यास येताच त्यांना कल्याणस्वामींच्या निर्याणाची वार्ता समजली आणि ते लगोलग डोमगावला पोहोचले. या प्रसंगाने केशवस्वामी कोलमडले. आपल्यामुळे कल्याणस्वामींनी देह ठेवला, हा सल त्यांच्या मनात कायमचा रूतला. ते समाधीवर मस्तक ठेवून रडू लागले. या संदर्भात श्री. सुनिल चिंचोलकर लिहितात,'' त्या समाधीतून त्यांना एकच ध्वनी ऐकू आला,'' शोक आवर, समर्थांच्या अस्थीसवेच माझ्या अस्थींचे विसर्जन कर. ''[२१२] कल्याणस्वामींनी आपल्या शिष्याला आज्ञा केली की,' माझ्या गुरूंच्या आणि माझ्या अस्थी एकत्रच विसर्जन कराव्यात. ' काय गुरू–शिष्यांचे नाते आहे हे! ३२वर्षे समर्थांच्या अस्थी तशाच होत्या. त्यानंतर कल्याणस्वामींचे तेवढा काळ केवढे मोठे कार्य पार पडले आणि नंतर दोघांच्याही अस्थी एकदमच एकत्र होऊन गंगेला मिळाल्या. कल्याणस्वामींनी गुरूसेवेचा आदर्श समाजापुढे कायमस्वरूपी ठेवला. खरंच धन्य ते गुरू आणि धन्य त्यांचा शिष्य.

### मठाची सद्यस्थिती

सध्या डोमगाव मठाचे अधिपती 'श्री. सीताराम जहागीरदार रामदासी' असून त्यांचे बंधू, पुतणे हेही सर्वजण मठाचे कार्य करतात. डोमगाव मठात नियमितपणे दासबोध पारायणे चालू असतात. शिवाय रामनवमी, हनुमानजयंती असे उत्सवही उत्साहात पार पडतात. मठ कायम कार्यरत रहावा, समर्थांच्या कार्याचा, संप्रदायाचा प्रसार व्हावा यासाठी हे सर्वजण क्रियाशील आहेत.

'परंडा' मठाचे मठाधिपती 'श्री. पुरूषोत्तम शंकरराव वैद्य' हे आहेत. डोमगाव मठाप्रमाणेच या मठाचेही कार्य व्यवस्थित चालू आहे.

### ४.६.४ उद्धवस्वामी – टाकळी व इंदूरबोधन मठ

समर्थांचा पहिला शिष्य जो त्याच्या खूपच लहान वयात झाला आणि हेच उद्धवस्वामी ज्यांना समर्थांच्या जीवनात खूप मोठे स्थान होते. उद्धवस्वामी अधिपती असलेला हा आद्य मठ सर्वात पहिला मठ. समर्थप्रतापकार गिरीधरस्वामी 'समर्थप्रताप' ग्रंथात लिहितात,'' उद्धव बाळकासी समर्थे उध्र्वपादे धरिले। प्रपंची प्रपंची होसी परमार्थी होसी पुसिले। वैराग्य दक्षितें

बाळपणीं कर्णी उपदेशिले। सत्पात्र केले भूमंडळी।। ''[२१३] उद्धवस्वामींची मठ परंपरा ही ब्रह्मचारी शिष्यपरंपरा आहे. श्री. प्रमोद संत यांनी 'आंध्रपरिसरातील समर्थ संप्रदाय' यात दिली आहे.

''समर्थ → उध्दव → भीम → शिवराम → रामचंद्र → गोविंदराम → रघुनाथ → गंगाराम → नारायण → दिनकर ''[२१४]

## उद्धवस्वामींचे चरित्र

उद्धव स्वामींचा जन्म नाशिक जिल्ह्यात टाकळी येथील दंशक पंचक या छोट्याश्या खेड्यात शके १५४९ च्या आसपास, सन १६२५ ते १६२७ च्या आसपास असावा. उद्धवस्वामी हे समर्थांचे पहिले शिष्य. उद्धवस्वामींच्या जन्माची कथा ही विलक्षण आहे. त्यांचा जन्म म्हणजे समर्थांच्या पुरःश्चरण काळातील एक महत्त्वाची घटना होती. समर्थांचे टाकळीमधे पुरःश्चरण चालू होते. एक दिवस ते ध्यानस्थ स्थितीत होते. जवळच दशक पंचक खेड्यात गिरीधर कुलकर्णी या तरूणाचा आजारपणात मृत्यू झाला. त्या गावात स्मशानभूमी नसल्याने टाकळीतील संगमावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी त्याला नेले होते. त्याची तरूण पत्नी अन्नपूर्णा ही सती जाण्यास सिध्द झाली होती. त्यावेळी ध्यानात मग्न असलेल्या समर्थांना तिने पाहिले आणि त्यांना वाकून नमस्कार केला. ध्यानावस्थेत असताना समर्थ अधोमुख असल्याने नकळत त्यांनी अन्नपूर्णेला 'अष्टपुत्र सौभाग्यवती भवः' असा आशीर्वाद दिला. हा आशीर्वाद ऐकताच अन्नपूर्णा चमकली. ह्यावर तिने समर्थांना विचारले, हा आशीर्वाद पुढील जन्मासाठी आहे का? हे ऐकून समर्थांनी डोळे उघडून पाहिले आणि हा कोणता प्रसंग चालू आहे ह्याची त्यांना जाणीव झाली. या संदर्भात श्री. शंकर अभ्यंकर लिहितात,'' आपल्या मुखाने प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र बोलले ह्याची समर्थांना खात्री होती. त्यामुळे गिरीधर कुलकर्णीच्या शवावर गोदावरीचे पवित्र पाणी प्रभू रामचंद्रांना आळवून त्यांनी शिंपडले आणि मृत्यू पावलेला गिरीधर कुलकर्णी जिवंत झाला. ''[२१५] समर्थांनी आपल्या सामर्थ्याने अन्नपूर्णेला दिलेला आशीर्वाद खराच होणार होता. कुलकर्णी दाम्पत्याने मोठ्या आदराने समर्थांच्या चरणावर डोके ठेवले. त्या दोघांनाही अत्यानंद झाला होता. या काळापर्यंत गिरीधर आणि अन्नपूर्णा यांना मूलबाळ झाले नव्हते. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' संगमाहून निघताना गिरीधरपंत व त्यांची पत्नी अन्नपूर्णाबाई यांनी मनाशी संकल्प करून तो श्री सद्गुरू चरणी लगेच निवेदनही केला की,' प्रथम जो मुलगा होईल तो

श्रीचरणी अर्पण करू. ''[२१६] ह्याच बरोबर समर्थांनी त्यांना दहा पुत्र होतील हा ही आशीर्वाद दिला होता. त्याप्रमाणे त्यांना पुढे दहा पुत्र होऊन त्यांचे आडनाव 'दशपुत्रे' झाले.

हरखून गेलेल्या अन्नपूर्णाबाईंना यथावकाश दिवस गेले आणि त्यांनी एका छान मुलाला जन्म दिला, तोच हा उद्धव. केलेल्या निश्चयाची पूर्तता करण्यासाठी दोघांनीही उद्धवाला समर्थांच्या चरणावर ठेवले आणि सांगितले,'की हा पुत्र ठरविल्याप्रमाणे तुम्हाला अर्पण करीत आहोत.' समर्थही खूप आनंदले, अर्थात त्यांनी अंतर्ज्ञानाने जाणले असेलच की हा आपला मानस पुत्र आहे. आणि आपल्या पुढील योजलेल्या कार्यातील एक महत्त्वाचे रत्नही आहे. मात्र एवढ्या लहान मुलाला आईची गरज असल्याने तो सध्या आईवडिलांकडेच राहू दे आणि थोडा मोठा झाल्यावर माझ्याकडे सोपवा असे समर्थांनी त्यांना समजावले. उद्धवची मुंज समर्थांच्या उपस्थितीत झाली. उपनयन संस्कारानंतर त्याच्या माता-पित्याने त्याला गुरूच्या अर्थात समर्थांच्या स्वाधीन केले. त्यानंतर उद्धव कायमचा समर्थांचा झाला. समर्थांचे सर्व कार्य नियोजनबध्द असल्याने उद्धवाला आपल्याकडे ठेवून त्याची जबाबदारी घेण्याचा मानस वेगळा होता. त्यामुळे उद्धवाची जडणघडण समर्थांनी तशीच चांगल्या रीतीने करायला सुरवात केली. पुरःश्चरणानंतर समर्थ तीर्थाटनाला निघणार होते. तेव्हा निघतानाच आपल्या कार्याची सुरूवात टाकळीमध्ये करून जावी असा त्यांचा मानस होता. पुरःश्चरणाच्या अखेरच्या पर्वात त्यांनी उद्धववर संस्कार करायला सुरूवात केली होती.

समर्थ स्वतःच ज्ञानी होते, सुसंस्कृत होते, विवेक-वैराग्याची त्यांनी कास धरली होती, त्यांची दूरदृष्टी, अगदी वाखाणण्यासारखी होती शिवाय नियोजनबध्द जीवनकार्य त्यांना अपेक्षित होते. त्याप्रमाणेच त्यांनी उद्धवला घडवायला सुरूवात केली, कारण तीर्थाटनातून बारा वर्षांनी परत आल्यावर हा उद्धव चांगला तयार झालेला शिष्य त्यांना हवा होता. अतिशय निरागस, सुविचारी-सुशिल अशा आई-वडिलांचा मुलगा असल्याने समर्थांची शिकवण लवकरच त्याच्यावर बिंबायला लागली. समर्थ स्वतः त्याच्याकडून लेखन-वाचन करून घ्यायचे. अक्षरसुध्दा सुवाच्च करवून घेण्यावर समर्थांनी भर दिला. मनन-चिंतनाची गोडी आपोआपच त्याला लागली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समर्थांनी विवेक-वैराग्य ह्याची आवश्यकता पटवून दिली. अतिशय आडाखेबध्द दिनचर्या त्याला सांगितली. उद्धवाला उपासनेची गोडी लागावी म्हणून

त्यांनी पुरःश्चरणाला जाताना उद्धवालाही न्यायला सुरूवात केली. पुरःश्चरणामुळे आपले सामर्थ्य वाढते हा विचार त्याच्यावर लहानपणीच रूजवला. उद्धव समर्थांबरोबरच पुरःश्चरण करू लागला आणि भिक्षेलाही जाऊ लागला. रोज भिक्षा मागण्यापेक्षा आठवड्यातून एकदाच कोरडी भिक्षा आपण का आणत नाही हा उद्धवच्या बालमनाला प्रश्न पडला होता. पण समर्थांनी उद्धवला '' आधि मधे पडो नये। जड भिक्षा मागू नये। भजनमार्ग मोडू नये। निसंगपणे।। '' हे सांगून भिक्षेचे महत्व पटवून दिले. एक उत्तम शिष्य, निस्पृह, महंत म्हणून उद्धव संस्कारी व्हायला लागला. मूळचीच तल्लख बुध्दी, पाठांतर शक्ती, आज्ञाधारकता असे गुण अंगी असल्याने उद्धवाची जडण-घडण समर्थांच्या अपेक्षेप्रमाणे होऊ लागली. तीर्थाटनाला निघण्याआधी समर्थांनी उध्दवाच्या मनाची तयारी करायला सुरूवात केली. बारा वर्षाच्या काळात उद्धवाला काय करायचे आहे ह्याची कल्पना दिली आणि त्या अनुषंगाने मारूतीरायाची आणि ह्या पहिल्या मठाची स्थापना केली.

टाकळीच्या मठाची स्थापना म्हणजे समर्थांच्या नियोजित कार्यातील पहिलेच पाऊल होते. उद्धवाला भविष्यकाळात जे कार्य करायचे होते त्याची पूर्व तयारी म्हणजे हा नियोजित मठ, ज्या गावात बारा वर्ष वास्तव्य केले त्या गावातील लोकांसाठी हा मठ आणि सामाजिक भूमिकेतील पहिला हा मठ. अशा दृष्टीने ह्या मठाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. लहान उद्धवाला पुढील बारा वर्षे उपासना करण्यासाठी समर्थांनी गोमय, माती वगैरे मिश्रणापासून मारूतीची मूर्ती तयार केली आणि विधीयुक्त प्राणप्रतिष्ठा, महारूद्राभिषेक, महापूजा होऊन मारूतीरायांची स्थापना झाली. हनुमान जयंतीचा मोठा उत्सव झाला. समर्थांनी स्वहस्ते उध्दवला मेखळा, वस्त्र दिली, आपल्या पादुका दिल्या आणि उपदेश केला. मारूतीरायाच्या उपासनेत कधी खंड पडून द्यायचा नाही, तेच तुला कायम सहाय्य करतील, तुझ्या कार्य सेवेत पाठीशी उभे राहतील असा विश्वास समर्थांनी उद्धवाला दिला. सर्व मठाची सूत्रे उद्धववर सोपविली आणि उद्धव हा समर्थांच्या पहिल्या मठाचा, संप्रदायातील पहिला मठाधिपती झाला. पहिला महंत होण्याचा मान हा उद्धवचा होता. या संदर्भात श्री. सुधीर शिरवाडकर लिहितात,'' अशा प्रकारे श्री समर्थांच्या जीवनकार्यातील त्यांनी स्वहस्ते स्थापन केलेला श्रीक्षेत्र टाकळी येथील पहिला गोमय हनुमान, स्थापना केलेल्या पहिल्या पादुका, पहिला रामदासी संप्रदायाचा मठ, श्री उद्धवस्वामी पहिले शिष्य व टाकळी मठाचे पहिले अधिपती. अशी ही सर्व बाबतीत पहिल्या क्रमांकांचे स्थान

असलेली श्रीसमर्थांची तपोभूमी श्रीक्षेत्र टाकळी म्हणजे 'प्रथमस्य प्रथमं टाकळी स्थानम्. ''[२१७] गावातील समस्त लोकांना समर्थ म्हणाले, हे पहिले मठपती, पहिले महंत. अशा रीतीने लहानशा उद्धवने मठाची सूत्रे स्वीकारली आणि उद्धव ' उद्धवस्वामी' झाले आणि त्याच रात्री समर्थांनी टाकळी सोडली. अर्थात जाताना समर्थांनी उद्धवस्वामींना अनुष्ठान, पुरःश्चरण आणि उपासना करायला सांगितली होतीच आणि संप्रदायाचे कार्यही सुरू करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे उद्धवस्वामींनीही समर्थांचे आदेश तंतोतंत पाळण्याचा निर्धार केला होताच. त्यांचे आपल्या गुरूवर प्रचंड प्रेम होते, आदर होता आणि त्याचबरोबर गुरूनिष्ठा कधीही सोडायची नाही हे तर त्यांनी मनोमनी आधीपासूनच ठरविले होते. एवढ्या लहान वयातील उद्धवाची गुरूनिष्ठा, समज चांगली शिकवण त्याच्या भविष्यकाळात वेळोवेळी दिसली. तीर्थाटन काळात म्हणजे बारा वर्षाच्या काळात समर्थांनी उध्दवस्वामींना एक पत्र लिहिले. ते पत्र 'टाकळीचे आज्ञापत्र' म्हटले जाते. या संदर्भात श्री. सुधीर शिरवाडकर लिहितात,'' श्री. उद्धवस्वामींनी टाकळी येथे एकटे राहून संप्रदाय प्रचाराच्या कार्याला सुरूवात केली तेव्हा संघटना कशी करावी याचे मार्गदर्शन करणारे एक पत्र श्रीसमर्थांनी श्री उद्धवांना पाठविले होते. 'काही एक समदाय करणे। याविषयी आलस्य न करणे। आलस्य करता उदंडे उणे। दिसेल परमार्थी।।१।। पोहणार बुडते तारावे। सामर्थ्ये बुडो नेदावे।। मूर्ख ते शहाणे करावे। विवेकी पुरूषि।।२।। सोयऱ्या धायऱ्याची मुले। तीक्ष्ण बुध्दीची सखोल। तयासि बोलणे मृदू बोले। करीत जावे।।३।। त्यांचा संसार समाचार। पुसत जावा विस्तार। उदंड सांगता तत्पर। होऊन ऐकावे।।४।। दुःख सांगता दुःख जाते। त्यांचे दुःख हळू होते। मग ते सवेचि धरिते। मित्रभाव।।५।। निकट मैत्री बरी होता। मग त्यासी न्यावे एकांता। म्हणावे का भगवंता। काहीतरी भजावे।।६।। मान्य होती जप सांगावा। मग तो इकडे पाठवून द्यावा। मग त्याचा सकळ गोवा। उगऊ आम्ही।।७।। ''[२१८] या एका पत्रात केलेले समर्थांचे उपदेश उद्धवस्वामींनाी खरोखरीच आचरणातून सिध्द करून दाखवले आणि उत्कृष्ट कार्य केले.

उद्धवस्वामींनीसुध्दा समर्थांप्रमाणेच कठोर अनुष्ठान करण्यास सुरूवात केली. पहिल्या प्रहरी उठून गायत्रीमंत्राचे पुरःश्चरण, रामनामजप असे उपासनेचे व्रत त्यानी पार पाडले. तपाने सामर्थ्य वाढते हे समर्थांचे वचन त्यांनी आचरणात आणले. आपल्या गुरूंशी एकरूप व एकनिष्ठ असलेल्या उद्धवस्वामींचे आचरण अगदी त्यांच्या सारखेच होते. लवकरच गावातील लोक त्यांच्या या तपोसामर्थ्यांने प्रभावित झाले. जेवढी समर्थांबद्दल त्यांना आदर होता, त्यांच्यावर जेवढी श्रध्दा

होती लोकांची तेवढीच श्रध्दा उद्धवस्वामींवर बसली ही गोष्ट खरंच अभिमानास्पद होती. उद्धवस्वामींना आपल्या संप्रदायाचा हेतू बरोबर उमगला होता. त्यातून गुरूनिष्ठेच्या बळावर त्यांचे हेतू सफल व्हायला लागले. लहानपणापासून त्यांनीही कधी आळसाला जवळ येऊन दिले नाही. लोकांना त्यांनी भक्तीभार्गावरून चालायला शिकविले, उपासनेची गोडी लावली, मारूतीरायांचे आदर्श त्यांच्यासमोर ठेवले. रामनवमी, हनुमानजयंतीचे उत्सव समारंभपूर्वक साजरे केल्याने समाज आपोआपच त्यांच्याकडे आणि त्यांच्या कार्याकडे आकर्षिला गेला. अर्थातच संप्रदायाचे कार्य उद्धवस्वामींकडून विस्तारू लागले.

उद्धवस्वामींनी तीक्ष्ण व चाणाक्ष बुद्धीची चुणचुणीत मुले पाहून त्यांच्यावर योग्य संस्कार करून शिकवण देऊन त्यांना सर्व बाबतीत तरबेज करण्याकडे लक्ष पुरविले. त्यांच्याकडूनही स्तोत्र–पठण करण्यावर भर दिला. याचेच फळ म्हणजे पुढच्या काळात प्रचंड शिष्य समुदाय उद्धवस्वामींनी जमविला. एकदा सज्जनगडावर समर्थांना भेटायला जाताना जवळजवळ ७०० शिष्य बरोबर होते असा उल्लेख आहे. उद्धवस्वामी स्वतः अनेक ग्रंथ लिहून काढत. त्याच्या प्रती तयार करीत. त्यांच्या मठात अनेक ग्रथांची, दासबोधाची टिपणे मिळाली. 'विवेकसिंधू' या ग्रंथाची उद्धवस्वामींच्या अक्षरातील प्रत धुळे येथे समर्थ वाग्देवात मंदिरात आहे. समर्थ तीर्थाटन संपवून टाकळीला परत येईपर्यंत उद्धवस्वामी विशीचे झाले होते. प्रत्येक बाबतीत तरबेज झाले होते. नंतर समर्थांच्या सान्निध्यात आल्यावर उद्धवस्वामी कीर्तनकलेत प्रवीण झाले. संप्रदायाच्या–महंताच्या लक्षणांमध्ये समर्थांनी संगीत–गायन कला आवश्यक असल्याचे सांगितल्याने उद्धवस्वामींनी संगीताची कला उत्कृष्ट रितीने अवगत केली. त्यांचा कीर्तनाचा व्यासंग अतिशय दांडगा होता. त्यांचे कीर्तन एवढे प्रभावी होते की स्वतः मारूतीराया त्यांच्या पाठीमागे उभे राहून कीर्तनाला साथ करीत. अनेक प्रसंग उद्धवस्वामींच्या गुणांची, सुस्वभावाची, कार्याची ओळख करून देतात. समर्थांनी बलसंपदा आणि बलोपासना यावर खूप भर दिला होता. शरीर, मन अत्यंत कणखर असणे आवश्यक आहे याची जाण करून देत. उद्धवस्वामी तर फारच लहानपणी समर्थांच्या सान्निध्यात राहिले होते. त्यामुळे त्यांना स्वतःलाच सुदृढ शरीर असण्यासाठी व्यायामाची गोडी लागली होती. त्याप्रमाणे उद्धवस्वामींचे शरीर, मनाने खूप कणखर झाले होते. याचा उपयोग उद्धवस्वामींना एका मुसलमान अंमलदाराला शह देताना झाला होता. उद्धवस्वामी एकदा माहुली मुक्कामी कृष्णा–वेण्णा संगमावर स्नान–संध्या करीत असताना तेथिल

मुसलमान अंमलदाराने त्यांना पकडून नेऊन तुरूंगात टाकले आणि जबरदस्तीने मुस्लिम धर्म स्वीकारण्यासाठी त्यांना सात दिवसांची मुदत दिली. अगदी अन्नपाणीसुध्दा पुरवायचे नाही अशी दक्षता त्या अंमलदाराने घेतली. जेणेकरून उपासमारी सहन न होऊन उद्धवस्वामी धर्म बदलतील. मात्र समर्थांचा हा पट्टशिष्य मनाने, शरीराने इतका खंबीर होता तो कशालाही बधेना. अंमलदाराच्या या योजनेवर त्यांनी तर पाणीच फिरवले. समर्थांना ही वार्ता समजताच ते साठ–सत्तर बलदंड शिष्य घेऊन माहुलीत आले आणि ठाणेदाराच्या माणसांना सोट्याने मारले. अशाने अंमलदार फारच घाबरला. अर्थात उद्धवस्वामींची सुटका झालीच. यावरून एक लक्षात येते की त्यावेळी मुसलमानांच्या या वृत्तीमुळे लोकांना नदीवर स्नान–संध्या करण्यालाही भिती वाटत होती. श्री. सुनिल चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' म्हणून शिवराज्याभिषकासमयी झालेला आनंद व्यक्त करताना समर्थ म्हणतात उदंड जाहले पाणी। स्नानसंध्या करावया। जपतप अनुष्ठानी। आनंद वनभुवनी।। या काव्याचा संदर्भ उद्धवाच्या कथेशी आहे. हे लक्षात घ्यायला हवे. ''[२१९]

उद्धवस्वामींना समर्थांची किती काळजी वाटायची आणि उद्धवस्वामींचे नाव समर्थांनी 'शिवराम' कसे ठेवले. हे एकाच प्रसंगातून दिसते. समर्थ सज्जनगडावर मुक्कामी असताना एकदा शिवरायांनी समर्थांना एक शृंगारलेला उमदा घोडा दिला. समर्थही आवर्जून घोड्यावर स्वार झाले, पण घोडा भरधाव निघाला. समर्थांच्या मागे सर्व शिष्य मंडळी धावू शकले, पण शेवटपर्यंत मात्र दोनच शिष्य त्यांच्या मागे धावू लागले, ते म्हणजे उद्धवस्वामी आणि कल्याणस्वामी. उद्धवस्वामींच्या सद्गुरूंच्या प्रेमापोटी एकच विचार आला तो म्हणजे 'सद्गुरूंना एवढी रपेट मारल्यावर मधेच तहान लागली तर?' यासाठी ते पाण्याचा तुंबा घेऊन मागे धावत होते. घोडा वठणीवर आला तोपर्यंत समर्थांना खूपच तहान लागली होती. त्वरीत उद्धवस्वामींनी समर्थांना पाण्याचा तुंबा दिला. समर्थांचा हा लाडका शिष्य आपल्या मागे आपल्या तहानेच्या काळजीने धावत आहे. हे उमगल्याने त्यांना गहिवरून तर आलेच, पण ते उद्धवस्वामींवर खूप प्रसन्न झाले आणि त्याक्षणी समर्थांनी त्यांचे नाव 'शिवराम' ठेवले. या संदर्भात श्री. ब. दा. पळणीटकरगुरूजी लिहितात,'' उद्धवाच्या पदातूनही 'शिव' किंवा 'शिवराम' असा स्वतःचा उल्लेख सापडतो. समर्थांच्या निकट सानिध्यातील एकनिष्ठ सेवकात उद्धवगोसावी प्रमुख होते. ''[२२०]

समर्थ तीर्थाटनाला गेल्यावर जो उद्धवस्वामींना बारा वर्षे विरह सहन करायला लागला आणि ते टाकळीला परत आल्यावर उद्धवस्वामींना किती आनंद झाला याचे एक उदाहरण आहे. जेव्हा तीर्थाटन पूर्ण केल्यावर समर्थ बारा वर्षांनी नाशिक पंचवटीला पुन्हा रामरायच्या दर्शनाला आले, तेव्हा त्या वार्तेने उद्धवस्वामींचे मन त्या गुरूमाऊलीच्या दर्शनाच्या ओढीने तगमगू लागले, त्यांच्या भेटीला आतुरले. समर्थांच्या स्वागताची तयारी उद्धवस्वामींनी गावकऱ्यांच्या सहाय्याने अशी केली की समर्थ सुध्दा आपला पहिला मठ मठाधिपती आणि टाकळीत झालेल्या या कार्याची प्रगती पाहून कमालीचे संतुष्ट झाले होते. समर्थ टाकळीला आल्यावर उद्धवस्वामींनी टाकळीच्या वेशीपासून समर्थांना शोभायात्रेतून मठापर्यंत आणले होते. तब्बल एका तपानंतर समर्थ आपल्या मानसपुत्राला बघत होते. डॉ. सौ. साधना गोखले या संदर्भात लिहितात,'' समर्थ गावाच्या वेशीपाशी येतात उद्धवस्वामींनी समर्थांच्या पायावर लोटांगण घातले. सद्गुरू-सत्शिष्याची ती अपूर्व भेट सारे गावकरी कौतुक भरल्या नजरेने पहात होते. ''[२२१]

उद्धवस्वामींचा कीर्तनाचा व्यासंग दांडगा होता. ते अतिशय उत्तम कीर्तन करीत . त्यांचे कीर्तन सुश्राव्य तर असेच त्याचबरोबर भक्ती, नामघोष, तेवढेच प्रबोधनानेही ओथंबलेले असे. त्यात त्यांची संगीतकला तर विलक्षण उठून दिसत असे. लोकांच्या मनाची पकड घेण्यात उद्धवस्वामी तरबेज होते. एकदा हुर्मुजी मेखळा लेवून उद्धवस्वामी तल्लीनतेने कीर्तन करत होते, समोर समर्थ बसले होते. समर्थांनी एकाएकी उद्धवस्वामींच्या मेखळेत शेंदूर लागलेला पाहिला. त्यांनी निरखून पाहिले तर समर्थांना मारूतीराया स्वतः कीर्तनात टाळ घेऊन साथीला उभे राहिले होते. समर्थ उभे राहिले आणि उद्धवस्वामींची कीर्तनसेवा पाहून धन्य झाले. तेव्हा समर्थांनी उद्धवस्वामींना नेहमी बसूनच कीर्तन करावे अशी आज्ञा केली कारण मारूतीरायांना एवढे तास साथीला उभे रहायला लागते. श्री. प्रमोद संत या संदर्भात लिहितात,'' तेव्हापासून टाकळी येथे उद्धवपरंपरेत कीर्तनारंभी व शेवटी मागे नमस्कार करणयाची पध्दत जडली. ''[२२२]

एकदा उद्धवस्वामींना उत्कट इच्छा झाली की आपल्या सर्व शिष्यांना सद्गुरू समर्थांचे दर्शन घडवावे. त्याप्रमाणे उद्धवस्वामी आपल्या तब्बल ७०० शिष्यांना घेऊन सज्जनगडला समर्थ भेटीसाठी आले. भगव्या वस्त्रातील हा शिष्यसुदाय आणि त्यांचे नेतृत्त्व करणारे

उद्धवस्वामी पाहून समर्थ समाधान पावले. ते स्वतः या सर्वांच्या स्वागतासाठी गडाच्या महाद्वारात सामोरे आले हे पाहून उद्धवस्वामीही धन्य झाले. यावरून समजते की उद्धवस्वामींना केवढा मान होता. समर्थ प्रतापकार श्री. गिरीधरस्वामी म्हणतात,'' उद्धवें सप्तशत भगवे निस्पृह अतित आणिले। समर्थांसी श्रीसज्जन पर्वती निवेदन केले। आपण येकाकी गुप्त स्वरूपें सेवक लीळे। सुलीन येकांत दर्शने घेतली।। ''[२२३] टाकळीच्या काही काळाच्या वास्तव्यानंतर समर्थांनी उद्धवस्वामींना स्वतःजवळ बोलवून घेतले. त्यानंतर जवळजवळ समर्थांच्या निर्वाणापर्यंत उद्धवस्वामी समर्थांच्या सानिध्यात होते. समर्थांनी अनेक वेळा उद्धवस्वामींवर अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपवल्या. त्या त्यांनी समर्थपणे पेलल्या होत्या. चाफळला श्रीराम मंदिराच्या बांधकामाच्यावेळी, उद्धवस्वामी तेथे होते, कऱ्हाड प्रांतात संप्रदायाच्या कामासाठी गेले होते. शिवथरच्या घळीची पाहणी करायला दिवाकर गोसावींबरोबर उद्धवस्वामी होते. तर शिवथरघळला दासबोध लेखनासाठी असलेल्या मुक्कामात उद्धवस्वामीसुध्दा समर्थांसमवेत होते. शिवराय आग्र्याला अटकेत असताना समर्थांनी राज्यभर जी जनजागृतीची मोहिम राबवली त्यात उद्धवस्वामींनी पण मोठा परिसर पादाक्रांत करून त्या चळवळीत सहभाग घेतला होता. समर्थांचा अंतकाळ जवळ येत चालला आणि एवढेच नाही तर तो दिवसही उद्धवस्वामींना उमगला. एवढे त्यांचे सामर्थ्य आणि गुरूचरणी मनोभावे सेवा होती. त्यांच्या जन्मापासूनच ते समर्थांच्या जीवनाला समर्पित झाले होते. त्यामुळे मानसपुत्र म्हणून समर्थांना अग्नी द्यायची जबाबदारी उद्धवस्वामींवर आली होती. यातून उद्धवस्वामींचे संप्रदायातील स्थान, समर्थांच्या जीवनातील स्थान किती उच्च होते हे लक्षात येते.

एकाच वेळी दोन मठांचे तेही अगदी भिन्न प्रांतात असलेल्या मठाधिपती होण्याचे भाग्य उद्धवस्वामींना लाभले. यातून समर्थांना उद्धवस्वामींप्रती वाटणार विश्वास आणि खात्री दिसते. इंदूरबोधन हे महाराष्ट्रापासून लांबचा परप्रांत तेही मुघलांच्या सत्तेखाली असताना समर्थांनी तेथे मठ स्थापला. उद्धवस्वामींना तेथे राहून मठाची जबाबदारी घ्यायला सांगितली आणि उद्धवस्वामींनी ती समर्थापणे सांभाळली. ब्रह्मचारी मठाधिपती परंपरा असलेल्या या मठाची परंपरा श्री प्रमोद संत यांनी 'आंध्रप्रदेशातील समर्थ संप्रदाय' यात दिली आहे.

''श्रीसमर्थ ⟶ उद्धवस्वामि ⟶ माधवस्वामि ⟶ गोविंद महाराज ⟶ अनंतबुवा ⟶ नरसिंह ⟶

रामकृष्ण → रामचंद्र → जयराम → आत्माराम → वामन उपाख्य→ श्रीरामबुवा → राजारामबुवा → श्रीसमर्थदास महाराज उपाख्य केशवबुवा (बोरगावचे)→ कल्याण महाराज → दिनकर महाराज (विद्यमान) ''[२२४]

एकदा समर्थ उद्धवस्वामींना बरोबर घेऊन जांबला घरी गेले होते. माहूरगडला रेणूकादेवीचे आणि दत्तात्रयांचे दर्शन घेऊन इंदूरबोधन (निजामाबाद) मार्गाजवळ येत होते. त्यांचा इंदूरबोधन येथे मुक्काम पडला होता. जवळच काही अंतरावरील सारंगपूर येथे एक घटना घडली आणि सारंगपूर येथे मारूतीरायांची अर्थात इंदूरबोधनमठाची स्थापना झाली. इंदूरबोधन हा निसर्गतःच रमणीय, हिरवाईने नटलेला आणि अतिशय रमणीय परिसर. खाली मंदिराच्या मागे एक मोठा डोंगर आणि डोंगरावरून पाण्याचा मोठा झोत पडत आहे. तसेच झोत पडणाऱ्या जागी कंड्यात बसायला मोकळी जागा आणि शेजारीच तलाव असे निसर्गसुंदर ठिकाण. परंतु त्या वर्षी तिथे भीषण दुष्काळ पडला आणि सर्व प्रजा त्यात होरपळायला लागली. या दुष्काळाच्या सावटाबरोबरच मुघलराज्याचेही सावट होतेच. तेथील मुसलमान अधिकाऱ्यांनी ब्राह्मणांना छळण्याच्या हेतून वेठीस धरले. 'तुम्ही केलेल्या देवाच्या प्रार्थनेमुळे पाऊस पडतो असे ऐकून आहे तर आता पावसासाठी प्रार्थना करून पाऊस पडतो का बघू.' असे बोलून त्या यवनांनी ब्राह्मणांना एका कोरड्या पडत चाललेल्या तलावात बळजबरीने उभे केले आणि त्यांना अनुष्ठान करण्यासाठी धमकावले. या संदर्भात डॉ. सौ. साधना गोखले लिहितात,'' जोवर पाऊस पडत नाही तोवर पाण्यातून बाहेर यायचे नाही. आलात तर खबरदार. एकेकाचं मस्तक उडवीन. ''[२२५] तेथील प्रजेवर या यवनांनी एवढी हुकूमत होती की ते ब्राह्मण चळाचळा कापायला लागले आणि खूप काळ उन्हातान्हात अनुष्ठान करीत राहिले. इकडे इंदूरबोधन मध्ये समर्थ आणि उद्धवस्वामींना हे वृत्त समजले. उद्धवस्वामींनी ही घटना पाहिली आणि ताबडतोब समर्थांना सांगितली. ते दोघेही तलावाकाठी आले आणि समर्थ त्या ब्राह्मणांची स्थिती पाहून कळवळले. समर्थांनी एका खडकावर प्रतापमारूतीचे चित्र रेखाटून आपल्या छाटीने ते झाकून टाकले आणि त्यास महारूद्राचा अभिषेक करायला सांगितला. अभिषेक, पूजा, नेवैद्य, आरती हे सर्व संपन्न झाल्यावर नक्की पर्जन्यराजा कृपा करेल असे आश्वासन दिल्यावर त्या ब्राह्मणांच्या जीवात जीव आला. त्यांनी रूद्राभिषेक करून पूजादी सर्व विधी संपन्न केल्यावर खरोखरीच पाऊस पडला.

त्यानंतर समर्थांनी खडकावर झाकलेली छाटी बाजूला केली तर मारूतीरायांची स्वयंभू मूर्ती तेथे नजरेस पडली. 'श्रीबडाराम एवं सारंगपूर श्रीहनुमानमठ' मध्ये यासंदर्भात असा उल्लेख आहे की,'' तेजोमय वीरश्रीहनुमानजीकी मूर्ती स्वयंभूत होकर अपनेआप बडे तेज प्रभाव में उतर गयी थी। उसकी आरती पूजा होने के पश्चात वहा अच्छा सा मंदिर बनवाकर सारंगपूर हनुमान मठ की प्रथम स्थापना शके १५७३ में हो गई। ''[२२६]

अशा रीतीने तेलंगणा प्रांतात समर्थांनी मारूतीरायाची स्थापना १६५१–५२ च्या सुमारास केली आणि मठ उभारला. या प्रसंगाने यवनी अधिकारी प्रभावित झाले.

सारंगपूर येथे मारूतीरायांची स्थापना झाली. तर इंदूरबोधन येथे श्रीरामरायांचे मंदिर स्थापन झाले. चाफळच्या श्रीराम मंदिरासाठी समर्थांनी राजस्थानातील कारागीरांना राम–लक्ष्मण–सीतेच्या मूर्ती घडवायला सांगितल्या. परंतु समर्थांना स्वप्नात श्रीरामांनी दृष्टांत देऊन अंगापूरच्या डोहातील माझ्या मूर्तीची स्थापना करा अशी आज्ञा दिली आणि त्याप्रमाणे अंगापूरच्या डोहातील मूर्तींची चाफळ मंदिरात स्थापना झाली. यथावकाश राजस्थानच्या कारागिरांनी राम–लक्ष्मण–सीतेच्या मूर्ती घडवून आणल्या. मग या मूर्ती पाहून सारंगपूरचा मारूतीराया रामरायाची वाट पहात आहे असे समजून त्या मूर्ती सारंगपूर जवळील इंदूरबोधन म्हणजेच निजामाबाद येथे स्थापन झाल्या. सारंगपूरच्या घटनेने प्रभावित झालेल्या ग्रामस्थांनी या मंदिरासाठी जमिन उपलब्ध करून दिली. अशा रीतीने सन १६५४ च्या दरम्यान इदूरबोधनचा हा मठ स्थापन झाला.

अधिपती म्हणून या मठाची जबाबदारी समर्थांनी उद्धवस्वामींवर सोपवली ही जबाबदारी पेलताना एकीकडे समर्थांचा वियोग होणार म्हणून उद्धवस्वामींचे अंतःकरण खूप जड झाले. पण समर्थांचा या प्रांतात मठ स्थापनेचा हेतू त्यांच्या कार्याशीच निगडीत होता. गुरूच्या योजनेवर उद्धवस्वामींचा विश्वास होता म्हणून मठपतीची सूत्रे त्यांनी आपल्या ताब्यात घेऊन आपल्या कार्याला सुरुवात केली. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ या उक्तीला त्यांनी न्याय दिला. मुख्य म्हणजे देशस्थितीला आणि त्या प्रातांतील सामाजिक स्थितीला जाणून त्यांनी तेथील तरूण वर्गावर लक्ष केंद्रित केले. सूर्यनमस्कार, व्यायामाचे इतर प्रकारामुळे बलसंपदा कशी वाढते, शारीरिक क्षमता कशी आवश्यक आहे, तन–मन कसे खंबीर रहायला हवे या सर्वांची जाणीव त्यांनी समाजात

निर्माण केली. अर्थातच श्रीरामप्रभू, मारूतीराया यांच्या चरित्राची ओळख करून देऊन या पराक्रमी देवतांचे आदर्श लोकांसमोर ठेवले. यामुळे उद्धवस्वामींनी लोकांच्या मानसिक स्थितीत अमूलाग्र बदल करायचा प्रयत्न यशस्वी होऊ लागला. परप्रांतात राहून लोकांचा संग्रह, त्यांचे संघटन करणे, शिष्य परिवार तयार करून संप्रदायाचा प्रसार करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. पण प्रयत्नांनी उद्धवस्वामींनी मोठे उद्दिष्ट साध्य केले. शिवराय आग्र्याहून परत येताना इंदूरबोधनमार्गे परत आले होते.

गिरीधरस्वामींनी समर्थप्रताप या ग्रंथात दोन ओव्यातून उद्धवस्वामींबद्दल जे लिहिले ते अगदी महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात,'' उद्धवनामा पट्टाभिमानी। पूर्व पश्चिम गोदातीर अवनि। उत्कट यात्रा चालवी जनीं। श्रीगुरूचरणीं मर्यादे।। ''[२२७]

## उद्धवस्वामींची वाङ्मय संपदा

उद्धवस्वामींनी एक समर्थचरित्र लिहिल्याचा उल्लेख आहे. तसेच त्यांनी काही काव्यरचनाही केल्या होत्या. त्यांची काही टिपणे सुध्दा आहेत. उद्धवस्वामींनी समर्थांच्या वियोगामुळे लिहिलेले पत्र तर अगदी भावपूर्ण आहे. एकदा एक यवन उद्धवस्वामींच्या इंदूरबोधन या त्यांच्या मठात आला होता आणि नंतर तो समर्थांकडे जाणार होता तेव्हा समर्थांच्या आठवणीने व्याकूळ झालेल्या उद्धवस्वामींनी समर्थांना एक पत्र लिहून त्या भक्ताला द्यायला सांगितले. नऊ ओव्यांनी बध्द असलेले पत्र म्हणजे उद्धवस्वामींचे समर्थांवर असलेले नितांत प्रेम, श्रध्दा, व्याकुळता, विरह दर्शविणारे आहे. पत्रातील काही ओव्या म्हणजे उद्धवस्वामींच्या अंतःकरणाचा आरसा आहे. श्री. सुनील चिंचोलकर यांनी,'चिंता करितो विश्वाची' यात हे पत्र नमूद केले आहे. '' गुरूराजराया ब्रह्मरूपा दयाळा। दयासागरा धाव वेगे कृपाळा। अनाथा दिना कारणे तू कुवासा। महाराजया सद्गुरू रामदासा।।१।। तुझे रूप पाहावया आस मोठी। तरी दाखवी रूप तत्काळ दृष्टी। जशी बाळका माय तू धाव तैसा। महाराजया सद्गुरू रामदासा।।२।। म्हणे उद्धवासि त्वा हाती धरावे। सदासर्वदा अंतरी प्रेम द्यावे। उपेक्षू नका स्वामी दासासि हंसा। महाराजया सद्गुरू रामदासा।।९।। ''[२२८] उद्धवस्वामींचे काव्य वेगळ्या प्रकारचे आहे. त्यात समर्थांच्या वाङ्मय सौंदर्याची थोडी झाक आहे. त्यातील रचना सोपी, सुलभ, रसाळ आणि नादमयही आहे आणि तेवढीच अंतःकरणालाही भिडते. इंदूरबोधनला समर्थ आणि उद्धवस्वामी

असताना ज्या पार्श्वभूमीवर सारंगपूर आणि इंदूबोधन मठ स्थापन झाले त्या पार्श्वभूमीवर 'नाराजलेला पर्जन्यराजा' यावर उद्धवस्वामींनी 'शिवराम' या नावाने काव्य केले आहे, ते म्हणजे मेघराजाला विचारलेला एक प्रकारचा जाबच आहे. शिवाय ते निसर्गाच्या किती निकट होते याचेही दर्शन या काव्यातून होते. दहा ओव्यातील या दोन ओव्या आहेत. श्री. प्रमोद संत यांनी 'आंध्रप्रदेशातील समर्थ संप्रदाय' यात नमूद केल्या आहेत. '' तुजविण बहु कष्टी लोक हे फार झाले। न पवसि जगदीशा मेघ तां काय केले। तिळभरि स्थळ कांही अल्पही भिजवीना। पडत विज भूमीचे पोटही रीझवेना।।१।। विनवित दिन तूझा शिव हा रामपाई। त्वरित मज कृपेनें नीववावें उपाई। मग तुज करणें जें तां सुखें तें करावें। परी मज हिण दीनासारिखें नाद खावें।।१०।। ''[२२९] उद्धवस्वामींनी स्वतः ती दुष्काळ परिस्थिती पाहिली. लोकांचे हाल पाहिले. यवनी अधिकाऱ्यांनी ब्राह्मणांना धारेवर धरलेले पाहिले. त्यामुळे त्यांचे मन जसे द्रवले, तसे ते मेघराजाशी संवाद साधतात आणि प्रसन्न होऊन प्रजेवर आता तरी कृपा कर असे विनवितात. ह्या श्लोकांना 'मेघाचे श्लोक' म्हणून संबोधले आहे आणि ते श्लोक प्रजेप्रती असलेल्या चिंतेने भरले आहेत. उद्धवस्वामींचा हा गुण अगदी वाखाणण्यासारखा आहे.

समर्थांनी आपल्या शिष्यांना अतिशय उत्तम शिकवण दिली यात वादच नाही. त्यांच्या शिष्यांनी ती शिकवण अंगी बाणवून कार्यही उत्तम केले. मग उद्धवस्वामी तरी कसे अपवाद ठरतील? त्यांनी समर्थांच्या या शिकवणीवर काही नोंदी लिहून ठेवल्या. त्यात त्यांनी बध्द, मुमुक्ष, साधक, सिध्द, निंदक या संबंधी निरूपणे लिहिली तर गुरूपरंपरा, प्रासादिक उत्पन्न आणि शास्त्रज्ञ याप्रकारच्या ज्ञानी लोकांबद्दलही लिहले आहे. परबोध करायची लक्षणे तर त्यांनी फारच उत्तम रित्या सांगितली आहेत. श्री अनंतदास रामदासी यांनी 'श्रीदासायन'मध्ये नमूद केली आहे,'' ।।दुसऱ्याची वृत्ती राखोन बोलणें। प्रांजळ अर्थेविण बोलों नये।।१।। निरूपणाचे वेळेसी मनुष्य निजले अथवा त्याचे चित्त व्यग्र जालें तरी नवरसिक बोलोनी त्याची वृत्ती स्वस्थ करून निरूपण चालवावें।।२।। ''[२३०] किती सोप्या सरळ साध्या शब्दात मात्र खूपच महत्त्वाचा उपदेश यातून केला आहे. काव्यनिर्मितीत उद्धवस्वामींनीही काही मनोरंजक डफ गाणी रचली. त्यात त्यांचा काव्यनिर्मितीतील एक वेगळा पैलू समोर येतो.

उद्धवस्वामींच्या जीवनात एक अंतर्मुख करणारी, त्यांचे मन हेलावून टाकणारी घटना घडली. समर्थांच्या अवतार समाप्तीच्या काळात उद्धवस्वामी समर्थांच्या समवेतच होते. त्यांच्या निर्वाणापर्यंत समर्थ जाणार या कल्पनेने, जाणिवेने उद्धवस्वामी काळजावर दगड ठेवून जगत होते. स्वप्नातही समर्थांच्या जाण्याची कल्पना न करू शकणाऱ्या उद्धवस्वामींनाच समर्थांचा मानसपुत्र या नात्याने समर्थांच्या देहाला अग्नी द्यावा लागला. मनाला दुःख देणारी ही गोष्ट उध्दवस्वामींना जड अंतःकरणाने पचवावी लागली. उद्धवस्वामींचा अधिकार खूप मोठा होता. तसेच एक मानसपुत्र या नात्याने ते खरोखरच समर्थांशी एकरून झाले होते. स्वतःचा अंतकाळ जवळ आला आहे हे जसे समर्थांना स्वतःला उमगले अगदी तसेच समर्थांचा अवतार आता संपणार हे पहिल्यांदा उद्धवस्वामींना समजले. उद्धवस्वामींनी समर्थांना जे पत्र एका भक्ताबरोबर पाठविले त्याचे उत्तरही समर्थांनी पत्राद्वारे उद्धवस्वामींना दिले आणि भेटीला यावे असा असाही निरोप धाडला. त्यानंतर उद्धवस्वामी समर्थांबरोबर सज्ञनगडावर वेळ व्यतित करू लागले. शिवरायांच्या अंतानंतर आता आपणही अवतार संपवणार याची जाणीव समर्थांना झाली होती. आणि त्याच उदासीन अवस्थेत समर्थांनी एक श्लोक म्हणला श्री. प्रमोद संत यांनी 'आंध्रपरिसरातील समर्थ संप्रदाय'यात तो नमूद केला आहे. '' रघुकुलटिळकाचा वेळ सन्नीध आला। तदुपरी भजनाचा पाहिजे सांग केला।'' उद्धवाने समर्थ नवमीला देह ठेवणार हे ओळखले व समर्थांचा श्लोक पूर्ण केला,'' अनुदिन नवमी हे मानसी आठवावी। बहुत लगबगीने कार्यसिध्दी करावी।। ''[२३१] समर्थांच्या निर्याणानंतर आपले पिता, गुरू या जगात नाही म्हणल्यावर उद्धवस्वामी फारच सुन्न झाले. समर्थांनंतर सज्ञनगडाची व्यवस्था आक्कास्वामी, दिवाकर गोसावींबरोबरच उद्धवस्वामींवर पण पडली. पण सज्ञनगडावर समर्थांविना उद्धवस्वामींचे मन अजिबात लागेना शिवाय उत्तराधिकारी पदावरून सुध्दा तिथे वाद व्हायला लागले. श्री. सुधीर शिरवाडकर या संदर्भात लिहितात,'' दिवाकर गोसावी (महाबळेश्वर) हे श्री समर्थांचे उत्तराधिकारी ठरले. जेष्ठतेचा खरा मान असूनही उद्धवस्वामींना वंचित रहावे लागले. ''[२३२] यानंतर दुःखाने व्यथीत होऊन उद्धवस्वामी टाकळीच्या मठात परत आले. आपले कार्य सुरू ठेवले. त्याबरोबरच एकांतात राहून तपश्चर्या सुरू केली. ह्या शेवटच्या काळात त्यांना एक मात्र समाधान होते की समर्थांच्या आज्ञेप्रमाणे आपण कायम वागलो, त्यांचे उपदेश अंमलात आणले, आपल्या वर्तनाने त्यांना नेहमीच समाधानी ठेवले. एक मानसपुत्र आणि एक शिष्य म्हणून आपण आदर्श ठरलो, या

विचाराने तरी त्यांना तृप्तता जाणवत होती आणि याच समाधानाने ते आपल्या आयुष्याच्या अखेरीला सामोरे गेले. या संदर्भात श्री. सुधीर शिरवाडकर लिहितात,'' अतिशय तृप्त अंतःकरणाने श्री. उद्धवस्वामींनी फाल्गुन शुध्द प्रतिपदेला सकाळी ६ वाजता इ. स. १७०९ साली वयाच्या ८६व्या वर्षी देह ठेवला. ते श्रीसमर्थ चरणी विलिन झाले. ''[२३३]

### मठाची सद्यस्थिती


टाकळी मठाची सर्व व्यवस्था आता श्री. सुधीर शिरवाडकर हे पहात आहेत. मठात रामनवमी आणि हनुमान जयंतीचे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होतात. तसेच त्या अनुषंगाने मठात उपासनाही होतात. या मठाचा कायापालट करण्यात श्री. शिरवाडकरांचा मोठा हातभार आहे. इंदूरबोधन मठाचे अधिपती दिनकरस्वामी रामदासी आहेत. या मठातही रामनवमी उत्सव, हनुमानजयंती उत्सव साजरे होतात. नित्यनियमाने उपासना चालू रहाते.

### ४.६.५ दिवाकर गोसावी – महाबळेश्वर मठ

महाबळेश्वरचे दिवाकर गोसावी म्हणजे महाबळेश्वरचे नांव सार्थ करणारे , समर्थांचे शिष्य महाबळेश्वर मठाचे अधिपती. बुध्दीने महाबळ आणि समर्थांनी त्यांच्या राजकारणासाठी कार्य करण्यासाठी तयार केलेला एक मोहरा. समर्थप्रतापकार गिरीधर गोसावी 'समर्थप्रताप' या ग्रंथात म्हणतात,'' दिवाकरनामा शिवगणद्वारीं। नाना जीव संकल्प विकल्प तमवारी।भैरव रामचंद्र पुत्र देवद्वारीं। पुराणीक निर्धारीं समर्थांचे।। ''[२३४]

### दिवाकर गोसावी यांची वंशपरंपरा

दिवाकर गोसावी यांची वंशपरंपरा विद्यमान मठाधिपती दिवाकर देशपांडे यांनी अशी दिली आहे



रामचंद्र वासुदेव रामकृष्ण

रामचंद्र → सदाशिव

सदाशिव → सीताराम, शिवराम

शिवराम → बाळकृष्ण → दत्तात्रय

दत्तात्रय → अशोक उर्फ अनंत, अरूण उर्फ दिवाकर, अनिल उर्फ बाळकृष्ण ''[२३५]

**दिवाकर गोसावींचे चरित्र**

दिवाकर हे शामभटांचे नातू. शामभट हे महाबळेश्वरचे उपाध्ये होते. तसेच शिवरायांच्या माँसाहेब म्हणजेच जिजाऊँच्या काळापासून राजकारणाशी आणि भोसले घराण्याशी त्यांचे चांगले संबंध होते. दिवाकर भट यांचा जन्म शके १५४८ म्हणजेच इ.स.१६२६मध्ये झाला. पूर्वीपासूनच घराण्यात महाबळेश्वरच्या अतिबळेश्वर आणि महाबळेश्वर या दोन्ही मंदिराची पूजाअर्चा, उपाध्येपण असल्याने दिवाकरभटांनाही उपासनेची गोडी होतीच. ह्याचबरोबर आजोबा आणि वडील रामचंद्रभट यांच्यासारखेच राजकारणाचे गुण त्यांच्यात आले तसेच दिवाकरभट बुध्दीने अतिशय तल्लख होते, अर्थातच महाबळ होते. त्याकाळचे महाबळेश्वरचे अरण्य म्हणजे किती घनदाट असेल याची कल्पना आपल्याला आहेच. अशा या जंगलाची, अरण्याची दिवाकरभटांना खूप माहितीही होती. दिवाकरभट आणि त्यांचे बंधू अनंतभट महाबळेश्वराचे आणि अतिबळेश्वराचे पुजारी होते. अतिशय तरतरीत, अंगी भस्म चर्चिलेले, स्वभावाने नम्र असलेले हे बंधू समर्थ महाबळेश्वरला असताना अनेक दिवस त्यांची दैनंदिनी जवळून पहात होते. पिराजी नावाच्या एका धनगराबरोबर समर्थ रोज महाबळेश्वराचे अरण्य पालथे घालत होते, रानंच्या रानं धुंडाळत होते. याचे अपार कुतूहल तर त्यांना होतेच आणि समर्थांच्या व्यक्तीमत्वाची भुरळ दोघांनाही पडली होती. एक दिवस दोघांनीही समर्थांची भेट घेण्याचा निश्चय करून देऊळवाड्यात त्यांची वाट बघत थांबले. समर्थ आल्यावर समर्थांना नमस्कार करून त्यांनी प्रांजळपणे समर्थांना सांगितले की,'रोज रानोरानं भटकत असण्यामागे काही विशेष हेतू आहे का? याचे कुतूहल पुरविण्यासाठी तुमची भेट घ्यायचे ठरविले. अर्थातच समर्थांनी स्पष्ट केले की, कशाचाही शोध नाही तर केवळ वनस्पती वृक्षवेलींची माहिती होण्यासाठी त्यांचा परिचय घेण्यासाठी रानं धुंडाळत आहे. यावर

समर्थांनी काव्यातून केलेला एक आविष्कार पाहून दिवाकरभट आणि अनंतभट चकित तर झालेच. शिवाय समर्थांबद्दल त्यांना एक वेगळीच ओढ वाटू लागली. समर्थ कुणी सामान्य नाही, एक अलौकिक व्यक्ती आहेत याची जाणीव दिवाकरभटांना होऊन त्यांनी समर्थांना घरी यायची विनंती केली. या संदर्भात श्री. गो. नी. दांडेकर लिहितात,'' यजमानकृत्य तर करावेच लागतें. मात्र ते उरकल्यावर आम्हांस आपणाबरोबर असू द्यावे. ''[२३६] 'अंतरमनातील खुणा अंर्तनिष्ठच जाणतो' या उक्तीप्रमाणे समर्थांनी त्वरीत आनंदाने होकार दिला.

यानंतर दिवाकरभट समर्थांचा अनुग्रह मिळावा यासाठी प्रयत्न करू लागले. समर्थांनी लगेचच होकार न देता काही काळाने दिवाकरभटांची परीक्षा घेऊन त्यांना अनुग्रह द्यायचे ठरविले. अर्थातच त्या सर्व काळात समर्थ दिवाकरभटांची पारख करतच होते. सततच्या आग्रहावरून शेवटी समर्थांनी अनुग्रहासाठी एक दिवस आणि स्थळ निश्चित केले. त्याप्रमाणे दिवाकरभट पूजासाहित्य घेऊन उत्साहाने त्या स्थळी पोहोचले. पण समोरचे दृष्य भयावह होते. समर्थ एका दगडावर निजले होते आणि त्यांच्या पायाशी दोन वाघ गुरगुरत बसले होते. मात्र पुढे जावयास मन धजवेना आणि परत फिरावे तर अनुग्रह कसा मिळणार या दोलायमान मनस्थितीत ते काही क्षण उभे राहिले पण त्यांच्या तल्लख बुध्दीने जो विचार केला यावरूनच त्यांच्या विचारशक्तीची साक्ष पटते. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,'' हे वाघ श्रीगुरूपादपद्माश्रित आहेत. अर्थात आपले गुरूबंधूच आहेत, झटकन जाऊन श्रीचरणांवर मस्तक ठेवावे झाले. काय व्हायचे असेल ते होईल. ''[२३७] धाडसाने दिवाकरभटांनी समर्थांच्या पायांवर मस्तक ठेवले आणि विधिवत गुरूपूजन करून त्यांचा अनुग्रह घेतला. एव्हाना समर्थांनी जाणले होते की दिवाकरभट हा कर्तृत्ववान, बुध्दीवान आहे, मठाच्या पारिपत्य अधिकारायोग्य आणि राजकारणाच्या कार्यातील हा एक महत्त्वाचा मोहरा ठरेल. अर्थात समर्थांनी योजलेले कार्य दिवाकरभटांनी यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेऊन दाखविले यात शंकाच नाही.

समर्थ महाबळेश्वरच्या अरण्यात जसे निसर्ग निरीक्षण करत होते तसेच तेथील समाजाचेही परीक्षण करत होतेच. एकदा एक घटना घडली. पांडवगडच्या सुभानराजे देशमुखांकडे निजामशाहीची कौलपत्र होती आणि वाई प्रांताचा सुभेदार या नात्याने आलेल्या अफझलखानाची त्यांनी सरबराई केली. सुभानराजे आणि समर्थ यांच्यात अशी काही चर्चा झाली की समर्थ

उद्वेगाने रानात दूरवर निघून गेले. दिवाकरभटही त्यांच्या मागोमाग गेले. दोन दिवसांनी समर्थांचा शोध दिवाकरभट, अनंतभट देशमुख अशा लोकांनी घेतला तेव्हा एका कड्यापाशी समर्थ दिसले. दिवाकरभटांच्या वडिलांनी कबूल केले की केवळ विचारांचा बोध नसल्याने ते भरकटत होते. मग मात्र समर्थांनाही वाईट वाटले की, येथे आपली गरज असताना आपण अशा तऱ्हेने निघून गेलो.

जेव्हा समर्थ महाबळेश्वर सोडून पुढील कार्यासाठी कृष्णातीराची प्रदक्षिणा करण्यास अर्थातच कृष्णातीरी कार्यकेंद्र उभारण्यासाठी जागा निश्चित करायला निघाले तेव्हा दिवाकरभटही त्यांना आपल्याबरोबर घेऊन जाण्याची गळ घालतात. कारण या काळात दिवाकरभट सतत समर्थांबरोबर असायचे आणि त्यांचा वियोग कसा सहन करायचा या विचाराने ते बेचैन झाले. तेव्हा समर्थ त्यांची समजूत घालतात. श्री. दिवाकर देशपांडे या संदर्भात लिहितात,'' प्रदक्षिणा पूर्ण करणेस येथे (क्षेत्र महाबळेश्वरी) येईन, त्यावेळी तुला नेईन. तुझ्यासारख्यांची गरज आहेच. तू येथे अनुष्ठान कर, मी येईपर्यंत. ''[२३८]

प्रत्येक ठिकाणी उपासनेसाठी समाजात बदल घडविण्यासाठी समर्थ मारूती मंदिर स्थापन करून मठाची उभारणी करीत असतच. त्याप्रमाणे अफझलखानासारखा नीच सुभेदार तेथे असताना या मोक्याच्या ठिकाणी मठ–मंदिर असणे आवश्यकच होते. शिवाय हा परिसर शिवरायांच्या संपर्कात येणार होता. या मंदिरामधून प्रतापगड दिसतो. त्यामुळे महाबळेश्वरकरांसाठी समर्थांनी स्वतः पाथरवटाकडून प्रतापमारूतीची मूर्ती घडवून घेतली आणि मंदिर स्थापन करून मोठ्या दिमाखदार सोहळ्यात मारूतीरायाची प्राणप्रतिष्ठा केली. याचबरोबर समर्थांनी दिवाकरभटांना आपल्या पादुका, श्रीरामपंचायतन, शाळीग्राम दिला. त्यामुळे मूळचेच पुजारी असल्याने मोठ्या भक्तीभावाने दिवाकरभटांनी मारूतीरायांची उपासना केली. दिवाकरभटांना नंतर समर्थांनी घेऊन जाण्याचे ठरविल्यानंतर त्यांचे बंधू अनंतभट यांच्याकडे या मठाची व्यवस्था सोपविली.

## दिवाकर गोसावींचे कार्य

समर्थांनी योजल्याप्रमाणे कृष्णाप्रदक्षिणा पूर्ण केल्यावर मसूर येथे उत्सव ठरविला तेव्हा त्यांनी दिवाकरभटांना बोलावून घेतले. या संप्रदायातील प्रवेशाने दिवाकरभट ह्यांना गोसावी ही पदवी लागून ते दिवाकर गोसावी झाले आणि खऱ्या अर्थाने त्यांची समर्थांबरोबर त्यांच्याकडे

वाटचाल सुरू झाली. समर्थांनी हुषार आणि व्यवहारदक्ष असलेल्या दिवाकर गोसावींबद्दल जे काही उद्गार काढले ते खूप विलक्षण आहेत. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' दिवाकर म्हणजे दुराखी मोहोरा. हा महाबळेश्वरकर आहे. त्याची बुध्दीही महाबळ आहे. राजद्वारी कित्येक प्रसंगी पाठवावयास योग्य. त्याचे हाती राजगृहीचा कार्यभाग संपादून घेणे उचित.''[२३९] खरोखरच दिवाकर गोसावी म्हणजे समर्थ आणि शिवराय यांच्या कार्यातील अतिशय महत्त्वाचा दुवा होते. समर्थ हयात असताना आणि त्यांच्या निर्वाणानंतरही दिवाकर गोसावी यांनी सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे, विचारपूर्वकच पेलल्या होत्या. शिवथर घळ म्हणजेच सुंदर मठात कल्याणस्वामी, उध्दवस्वामी, विठ्ठल गोसावी, भानजी गोसावी, चिमणाबाई वगैरे महत्त्वाच्या महंतासमक्ष राजकारणाचा विडा म्हणजेच तांबूल दिवाकर गोसावींना मिळाला होता. सर्व श्रीस्थळांचा पारपत्य अधिकार दिवाकर गोसावींना प्राप्त झाला ओता. स्वतः शिवरायांच्या एका पत्रात, अधिकारांचा उल्लेख आहे. या संदर्भात श्री. दिवाकर देशपांडे म्हणतात,'' वरकड श्रींचे शिष्यवर्ग बहुत आहेत परंतु हे धर्मकृती श्रीचे उभय स्थलीचे वेदमूर्ती दिवाकर गोसावी यांचे स्वाधीन केले आहे. ''[२४०] 'उदंड करावे परी गुप्तरूपे' हा समर्थांचा उपदेश दिवाकर गोसावी अगदी कसोशीने पाळीत. कारण आपले कार्य हे राष्ट्रीय कार्य आहे आणि प्रपंच, परमार्थाबरोबरच याही कार्याचे महत्त्व त्यांनी दिवाकर गोसावींना पटवून दिले होते. कार्य करीत असताना दिवाकर गोसावी खरोखरीच कमालीची गुप्तता बाळगायचे. समर्थ आणि शिवरायांच्या अनेक चर्चांमध्ये दिवाकर गोसावींना मात्र भाग घ्यायला परवानगी असायची. यावरून त्यांची योग्यता आणि सांप्रदायातील स्थान समजते.

समर्थांची आणि शिवरायांची जी पहिली भेट झाली त्यात दिवाकर गोसावींचा मोठा सहभाग होता. राजव्यवहारात दिवाकर गोसावी महत्त्वाची एक व्यक्ती, कार्यकर्ता या नात्यानेच, समर्थांचे शिवरायांना लिहिलेले पहिले पत्र दिवाकर गोसावी स्वतः शिवरायांकडे घेऊन गेले होते. पत्राच्या महत्त्वाच्या ओवी म्हणजे ''निश्चयाचा महामेरू। बहु जनांस आधारू। अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।' शिवराय स्वतःचा श्रीमंत योगी म्हणून उल्लेख केलेला पाहून जेवढे भारावले तेवढेच 'तुमचे देशी वास्तव्य केले। परी वर्तमान नाही घेतले। ऋणानुबंध विस्मरण झालें। काय नेणों।।' या ओळींनी त्यांच्या जीवाची घालमेल झाली आणि याचे साक्षीदार दिवाकर गोसावीच होते. त्याक्षणी शिवराय दिवाकर गोसावींबरोबरच समर्थांना भेटण्यासाठी चाफळला

निघाले. शिवसमर्थांच्या या पहिल्या अविस्मरणीय, गहिवरून टाकणाऱ्या क्षणाचेही साक्षीदार दिवाकर गोसावीच होते.

शिवथरघळ या स्थळाची सर्वप्रथम पाहणी करताना दिवाकर गोसावी आणि उध्दव गोसावी गेले होते. समर्थांना एकांतवासाचे विशेषतः डोंगरघळींचे खूपच आकर्षण होते. त्यामुळे कोकणातील एका गृहस्थानी जेव्हा शिवथरच्या गुहेची माहिती सांगितली तेव्हा तो मुलुख जावळीच्या मोऱ्यांचा असून त्यांचे व शिवरायांचे म्हणजेच भोसले घराण्याशी वैर असल्याचीही माहिती दिवाकर गोसावींजवळ होती. तेथे प्रत्यक्ष पाहणी करून आल्यावर दिवाकर गोसावींनी समर्थांना या घळीचे भौगोलिक, नैसर्गिक, ऐतिहासिक वर्णन अगदी चोख आणि सुरेख रीतीने सांगितले होते.

समर्थ संप्रदायात संप्रदायाच्या जबाबदाऱ्या एका महंताला मोठ्या सामर्थ्याने पार पाडाव्या लागतात आणि समर्थांच्या तालमीत तयार झालेले महंत कुठेच बोट ठेवायला जागा ठेवत नसत. समर्थांनी संप्रदायाच्या कार्यात राजकारण करण्याचा विडा उचलला होता, जे योजले होते त्यात राजकारणात महत्त्वाची भूमिका अतिशय जबाबदारीने वागणारा, व्यवहारदक्ष असणारा असा मोहरा, खंदा कार्यकर्ता हवा होता. अवघ्या १८–१९व्या वर्षी म्हणजे ऐन तरूणपणीच दिवाकर गोसावींची भेट समर्थांबरोबर झाली आणि समर्थांच्या व्यक्तीमत्वाने ते प्रेरित झाले. त्यावेळेपासून समर्थांच्या निर्याणापर्यंत दिवाकर गोसावी समर्थांएवढेच स्वराज्याच्या कार्यात महत्त्वाचा वाटा उचलत होते. प्रत्येक काम त्यांनी तत्परतेने, हुषारीने, विवेकाने पार पाडले आहे. कृष्णातीरी आल्यापासून ते शिवरायांचा राज्याभिषेकापर्यंत समर्थांचे जे अप्रत्यक्ष राजकारण होते त्यात भागीदार होण्याचे भाग्य दिवाकर गोसावींना मिळाले. अगदी छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक सोहळासुध्दा दिवाकर गोसावींनी अनिमिष नेत्रांनी पाहिला. एवढेच नव्हे तर राज्याभिषेकाच्या समारंभात रामचंद्र अमात्यांबरोबरीने पाटावर बसवून त्यांचा सन्मान केला होता. त्या अपूर्व क्षणांचे वर्णन दिवाकर गोसावींनी जेवढ्या सुंदर शब्दात केले तेवढ्याच तृप्तीने ते समर्थांनी ऐकले. श्री. गो. नी. दांडेकर या संदर्भात लिहितात,'' मुहूर्तपात्र भरले, आणि राजे अतिशय नम्रतेनें हाती विष्णूमूर्ति घेऊन, धनुष्यबाण खांद्यावर लेऊन, सिंहासनास पाय न लावता सिंहारूढ झाले. तत्क्षणी नगारे, कर्णे, शिंगे, चौघडे, संबळी सर्वांचा जो नाद उठला तो आकाश भेदून पैल पोचला.

''[२४१] वर्णन करताना दिवाकर गोसावींना किती धन्यता वाटली असेल आणि आपले आयुष्य सार्थकी लागल्याच्या भावना त्यांच्या मनी दाटून आल्या असतील.

समर्थांच्या निर्याणानंतर जवळजवळ २६वर्षे दिवाकर गोसावी राजदरबारात, सज्ञनगडावर राहून सर्व कारभार बघत होते. मात्र पुढे शिष्यत्वांवरून सज्ञनगडावर कलह सुरू झाले. आक्काबाईही त्यांच्या समवेत सज्ञनगडावर राहून सर्व कारभार बघत होत्या. या दोघांच्या सल्लामसलतीने समर्थांचे बंधू श्रेष्ठ यांच्या मुलांना त्यांनी बोलावून घेतले आणि त्यांच्या हाती कार्य सोपविले. त्यानंतर दिवाकर गोसावींनी सज्ञनगडावरील वास्तव्य संपवून महाबळेश्वरला परत आले. शिवाजीमहाराजांपासून, संभाजीमहाराज आणि राजाराम महाराजांपर्यंत दिवाकर गोसावींनी राजकारणाच्या कार्यात समर्थांच्या आदेशानुसार लक्ष घातले होते. दिवाकर गोसावी जरी महाबळेश्वरला परत जायला निघाले तरी तिथे सामाजिक आणि राजकीय स्थिती गढूळायला लागली होती, त्यामुळे ते अज्ञातस्थळी राहू लागले. मग त्यांना  राजकीय अभयपत्र मिळाल्यावर ते महाबळेश्वराला आले आणि शेवटपर्यंत ते तेथेच वास्तव्यास राहिले. त्यांचे निर्वाणही महाबळेश्वरलाच झाले.

अशा रीतीने दिवाकर गोसावींनी आपले सर्व आयुष्य समर्थ संप्रदायासाठी वेचले. एवढेच नव्हे तर त्यांचे बंधू अनंतभट, पुत्र रामचंद्रभट, भैरवभट अगदी त्यांचे व्याही रघुनाथभट या सर्वांनी संप्रदायाचे कार्य केले आहे.

महाबळेश्वरला हे समर्थ स्थापित मारूती मंदिर चांगल्या स्थितीत असून त्या खालच्या भागात असलेला मठ मात्र मोडकळीस आला आहे. काही सरकारी आणि संस्थांच्या घडामोडीत मठातील वस्तू दिवाकर गोसावींचे वंशज श्री अरूण उर्फ दिवाकर देशपांडे, पुणे यांच्या निवासस्थानी असून मोठ्या भक्तीभावाने आणि तन्मयतेने पूजल्या जात आहेत. श्री दिवाकर देशपांडे यांनी मठाची, दिवाकर गोसावींची खूप माहिती मिळविली आहे. तसेच त्याकाळात दिवाकर गोसावींना मिळालेल्या सनदांच्या प्रती गोळा केल्या आहेत. शिवाजी महाराजांपासूनचा संपूर्ण पत्रव्यवहार हाताळला आहे.

पुढील काळात श्री. दिवाकर देशपांडे यांचा मठ नव्याने बांधायचा मानस आहे. समर्थांच्या पादुका, कुबडी, दंड त्यांनी दिलेल्या रामपंचायतन, शाळीग्राम, शिवाजीमहाराजांचा तुंबा,

दासबोधाची प्रत वगैरे वस्तू मूळ मठात म्हणजे मूळ स्थानी स्थलांतरीत करावयाच्या आहेत. याव्यतिरिक्त समर्थ संप्रदायाच्या संपूर्ण ग्रंथावलीचे पुनरूज्जीवन करण्याची त्यांची योजना आहे. यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

### ४.६.६ दत्तात्रयस्वामी शिरगांवकर – शिरगाव मठ

दत्तात्रयस्वामी हे कल्याणस्वामींचे धाकटे बंधू. ते कल्याणस्वामींसारखेच हुशार, चुणचुणीत होते समर्थांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी आपले कार्य केले. समर्थ प्रतापकार श्री. गिरीधरस्वामी लिहितात,'' कल्याणनामा वाढला शिष्यसंतानें। दत्तात्रय बंधु पुत्रसंतानें। उभयपक्षीं लोकांसी भजनें। केली वृदांवने सत्कीर्ति।। ''[२४२] दत्तात्रयस्वामीं यांची वंशपरंपरा 'दत्तात्रयस्वामी शिरगांवकर, शिरगाव, त्रिशताब्दी पुण्यतीथी स्मरणिकेत' अशी दिली आहे.

''समर्थ

↓ योगीराज श्री कल्याणस्वामी

↓ श्री दत्तात्रयस्वामी (बंधू आणि शिष्य)

↓

श्रीराघवस्वामी (पुत्र व शिष्य)

↓

श्री येशवंतस्वामी (पुत्र व शिष्य)

↓

श्री लक्ष्मणस्वामी (पुत्र व शिष्य)

↓

श्री मनोहरआबा महाराज (पुत्र व शिष्य)

↓

श्री यशवंत(बाळासाहेब)महाराज(पुत्र व शिष्य)

↓

श्री लक्ष्मणमहाराज (पुत्र व शिष्य)

↓

श्रीवासुदेव(बापुसाहेब)महाराज ((पुत्र व शिष्य)

↓

श्री यशवंत (बाबाराजे) व श्री बाळाराजे

↓

वर्तमान वंशज ''[२४३]

### दत्तात्रय स्वामींचे चरित्र

दत्तात्रय कृष्णाजी कुलकर्णी, अंबाजीचा म्हणजेच कल्याणस्वामींचा धाकटा भाऊ म्हणजे दत्तात्रय. कोल्हापूरला कृष्णाजीपंत आणि राधाबाई यांची ही दोन मुले आपली आई रखुमाबाई, मामांकडे म्हणजे पाराजीपंत बर्वे कडे राहत होते. समर्थांच्या नजरेत अंबाजी तर भरलाच होता. जेव्हा समर्थांनी पिराजीपंतांकडे अंबाजीची गुरूदक्षिणा म्हणून मागणी केली, तेव्हा पाराजीपंतांनी त्यांना सांगितले,'ह्या भाच्यांवर माझी सत्ता नाही तर मी फक्त संगोपन करीत आहे. तुम्ही त्यांच्या आईला विचारा.' तेव्हा रखुमाईसुध्दा खूप भारावल्या होत्या, त्यामुळे त्यांच्या मनात विचार आला की अंबाजीला तर समर्थांच्या स्वाधीन करावेच, पण आपणही त्यांचा अनुग्रह घेऊन त्यांच्या समवेत गेलो तर आपण आणि आपला दुसरा पुत्र दत्तात्रय याचाही उध्दार होईल. या संदर्भात श्री. सुनील चिंचोलकर लिहितात,'' महाराज अंबाजी नेता आणि आम्हा दोघांसी टाकीता, आम्ही ऐसा काय अपराध केला? तुम्ही दीन वत्सल आहात, कृपेचे सागर आहात. आम्ही शरणागत आहोत. आम्हा तिघांचा स्वीकार करावा. ''[२४४]

समर्थही चांगल्या सद्‌गुणी मुलांची पारख करून त्यांना आपल्या संप्रदायात कसे समाविष्ट करून घेता येईल हे बघतच असत. त्यामुळे ही दोन मुले आणि त्यांची आई आपल्या कार्यात सहभागी होतील याचा समर्थांनाही तेवढाच आनंद झाला. ते या दोन शिष्यांना त्यांच्या आईसह घेऊन निघाले. मसूरला रामनवमी उत्सव साजरा करायचा म्हणून ते मसूरला निघाले. कऱ्हाडजवळ त्यांनी खंडोबाच्या पालीजवळ असलेल्या ' शिरगाव ' या गावी दत्तात्रय आणि रखमाबाईंना ठेवले. शिरगांव मध्ये गोमय मारूतीची स्थापना केली. ते मंदिर म्हणजेच हा शिरगांव मठ दत्तात्रय आणि रखमाबाई तेथेच वास्तव्याला राहिल्या आणि समर्थही काही काळ तेथेच राहिले. तेथील मठाची व्यवस्था नीट लावल्यावर ते अंबाजीसह पुढे निघाले. एवढेच नव्हे तर पुढील काळात दत्तात्रयस्वामींच्या मुलाची म्हणजे राघवची मुंज समर्थांच्या मांडीवर झाली होती.

शिरगांव म्हणजे एक तर ज्या क्षेत्रात संप्रदायाचे कार्य सुरू करायचे तेथील एक गांव आणि शिरगांवचे ग्रामदैवत म्हणजे भैरवनाग हे शंकराचा अवतार. त्यामुळे ही भूमी श्रीरामांच्या उपासनेसाठी अगदी योग्य आणि परिपूर्ण आहे असे वाटून समर्थांनी हा मठ स्थापन केला. समर्थांनी दत्तात्रयाला आईसह या मठात ठेवले. कारण रखमाबाईंचीही इच्छा होती की मुलांचा

संसार व्हावा, तरी समर्थांची त्याबाबतीतील योजना ठरलेलीच होती. दोन्ही भावंडे परमार्थी असल्याने त्यांनी दोन्ही भावंडांना सांगितले की एकाने ब्रह्मचर्य स्विकारावे आणि एकाने संसारीक व्हावे. यावर अंबाजी त्वरीत उत्तरला,'' मी ब्रह्मचारी राहणार. त्यावर समर्थांनी निर्णय दिला की दत्तात्रयाने गृहस्थाश्रम स्विकारावा. मात्र दत्तात्रयालाही सांसारीक व्हायचे नव्हते. म्हणून दत्तात्रय पण म्हणाला, ''अंबाजीला ब्रह्मचर्य देता मला का नाही? भविष्यातील पिढी कशावरून कार्य करेलच?'' यावर समर्थांचे उत्तर म्हणजे आश्वासकच होते. दत्तात्रयस्वामी शिरगांवकर, शिरगांव त्रिशताब्दी पुण्यतीथी स्मरणिकेत असा उल्लेख आहे,'' तू लग्न कर, तुझ्या पुढील आठ पिढ्यांची जबाबदारी माझी. यांच्याकडुन हेच कार्य पुढे चालेल. ''[२४५]

दत्तात्रयाची लहानपणची जडणघडण समर्थांनी शिरगाव येथे केली. नियमित लेखन, वाचन, पाठांतर, ग्रंथांची नक्कल उतरविणे यावर समर्थांनी भर दिला. दररोज पाचशे ओव्यांचे लिखाण करण्याचा आदेश समर्थांनी त्याला दिला होता आणि त्या आदेशाचे पालन दत्तात्रयाने तंतोतंत केले. या शिवाय मठ व्यवस्था, संप्रदायाचे कार्य, विस्तार याकडेही कसे लक्ष द्यावे याचे शिक्षण दिले. समर्थांनी स्वतः दत्तात्रयाचे लग्न लावून दिले. संसार थाटून दिला, आणि अंबाजीसह ते पुढे मार्गस्थ झाले.

अशा प्रकारे शिरगांवमठाचे मठाधिपती दत्तात्रयस्वामी झाले. दत्तात्रयस्वामींचे वडीलबंधू कल्याणस्वामी पित्याच्या ठिकाणी असतात म्हणजेच समर्थ हे दत्तात्रय स्वामींचे आजोबाच. समर्थांचे लाडके कल्याणस्वामी नंतर लांब गेले, परंतु हे लाडकं लेकरू मात्र कायम जवळ ठेवले. तसं पहायला गेलं तर प्रत्येक आजोबांचं नातवावर जास्तच प्रेम असतं.

दत्तात्रयस्वामी एवढ्या लहान वयात मठाधिपती झाले, तरी पण समर्थांवर असलेली निष्ठा, प्रेम, विश्वास, गुरूभक्ती याच्या जोरावर मठाची व्यवस्था अगदी उत्तम ठेवली. लोकसंग्रह वाढवून समाजाला उपासनेकडे वळविले, समाजप्रबोधन केले. लहान मुले, तरूण यांना बलसंपदेचे महत्त्व पटवून दिले, अनेक ग्रंथांच्या नकला त्यांनी उतरवून काढल्या. ज्या राजकीय हेतूने समर्थांनी दत्तात्रयस्वामी यांना शिरगांवमधे ठेवले तो हेतू त्यांनी कायम स्मरणात ठेवला आणि त्याप्रमाणेच ते जबाबदारी पार पाडत राहिले. खरं तर शिरगांवच्या जवळच दोन महत्त्वाची स्थाने होती. एक म्हणजे पालीचा खंडोबा आणि मंगरूळ पीर. या प्रांतात मुस्लीम राजवटींचा

प्रभाव फारच वाढू लागला होता. पालीच्या जत्रेस गर्दी न होता मंगरूळपीरच्या जत्रेला मात्र लोक जाऊ लागले, त्यामुळे पालीच्या खंडोबाचे जत्रेचे महत्त्व वाढवावे आणि या प्रांतात एक प्रचारकेन्द्रच उभारावे यासाठी समर्थांनी शिरगांव मठाची स्थापना करून हा राजकीय हेतू दत्तात्रयस्वामींकरवी साध्य केरून घेतला.

## दत्तात्रयस्वामींचे कार्य

दत्तात्रयस्वामींची बुद्धी तल्लख होती, ते ज्ञानी होते. मुख्य म्हणजे आपल्या जबाबदारींची सतत जाणीव ठेवून होते. आपला सर्वात जास्त वेळ देऊन त्यांनी संप्रदायाचा प्रसार खूप मोठ्या प्रमाणावर केला. त्या प्रांतातील लोकांना पुन्हा एकदा हिंदूधर्माचे महत्त्व सांगून त्याकडे वळविले. याचबरोबर मठाजवळील शेती पण ते जातीने करीत. समर्थ आणि कल्याणस्वामी नेहमी शिरगांवी जात असत. त्यामुळे दत्तात्रयस्वामी आपल्या कार्यामध्ये नेहमीच त्यांचे विचार घेत. समर्थांच्या अनेक स्फुट ग्रंथांचे लेखन दत्तात्रयस्वामींनी मठातच केले आहे. उदा. 'चवदाशत रामायण.'

काही प्रसंगातून दत्तात्रयस्वामींची सद्‌गुरूनिष्ठा, आपले बंधूप्रेम अशा गोष्टी ठळकपणे दिसतात. शिरगांव मठाच्या जवळच्याच भागात एक घळ होती. समर्थांना तिथे वास्तव्याला जायचे होते आणि तिथे तर वाघाचेही वास्तव्य होते. तेव्हा समर्थांनी दत्तात्रयस्वामींना, त्या वाघाला,'समर्थांना या ठिकाणी मुक्कामाला यायचे आहे तेव्हा तू आपल्या कुटुंबासह दुसरीकडे कुठेतरी रहायला जा' असा निरोप देण्याची आज्ञा दिली. दत्तात्रयस्वामींची आपल्या गुरूंवर नितांत श्रध्दा असल्यामुळे ते तडक या आज्ञेचे पालन करायला निघाले. गावांतील लोक मात्र दत्तात्रयस्वामींना घळीत जायला एकीकडे रोखत होतेच आणि वाघाला काय निरोप देतात का? तो तुमची काय गत करेल याची कल्पना आहे ना, अशी चेष्टाही करत होते. परंतु दत्तात्रयस्वामी न घाबरता, आत्मविश्वासाने थेट घळीत गेले आणि मोठ्या आवाजात ओरडून म्हणाले,'वाघोबा माझे सद्‌गुरू, समर्थ यांना इथे वास्तव्याला यायचे आहे, तेव्हा तुम्ही येथून लगेच निघून जावे, 'अशी माझ्या गुरूंची आज्ञा आहे. हे ऐकून वाघानेही एवढ्या मोठ्याने डरकाळी फोडली की आजूबाजूचा अवघा परिसर भयभीत झाला. गावकऱ्यांस वाटले दत्तात्रयस्वामींना वाघाने खलास करून टाकले, पण समर्थांचा आशीर्वाद असलेले, सद्‌गुरूंची आज्ञा पाळण्यासाठी अजिबात भिती न बाळगणारे आणि आवेशात सांगणारे दत्तात्रयस्वामी बघून वाघ आपल्या परिवारासह तेथून

चूपचाप निघून गेला. अगदी जाताना घळीतील हाडकंसुध्दा गोळा करून जागा स्वच्छ करून दिली. दत्तात्रयस्वामी शिरगांवकर, शिरगांव, त्रिशताब्दी पुण्यतिथी स्मरणिकेत असे नमूद केले आहे की, '' तरी मग भय काय? जरी कृपा करील गुरू माय' त्याचे प्रत्यंतर बाळपणीच दत्तात्रयांनी दाखवून दिले.''[२४६]

दत्तात्रयस्वामी आणि कल्याणस्वामींचे एकमेकांवर नितांत प्रेम होते. अगदी शेवटपर्यंत ते प्रेम दोघांनीही अबाधित ठेवले होते. बऱ्याचवेळा दत्तात्रयस्वामींकडे आर्थिक ओढाताण व्हायची. एकदा याच प्रेमापोटी कल्याणस्वामींनी एका कृत्यामुळे समर्थांचा रागसुध्दा सहन केला होता. एकदा मोहिमेवर शिवराय आजारी असताना समर्थांचे तीर्थ घेऊन कल्याणस्वामी छावणीत गेले. तीर्थ प्राशन झाल्यावर शिवराय कल्याणस्वामींना म्हणाले की, मठासाठी काही हवे असल्यास सांगा. ' तेव्हा कल्याणस्वामींनी सहजपणे सांगितले की,' धाकटे बंधू दत्तात्रय स्वामींच्या शिरगांव मठातील गोधनाची दुष्काळात वाताहात झाली. तेव्हा अकरा गाई हव्या होत्या. ' शिवरायांनी सुध्दा लगेचच गोधन तेही सवत्स शिरगांवला पाठविण्यास सांगितले. खरं तर हा प्रसंग कल्याणस्वामींच्या बंधूप्रेमामुळेच निरागसतेने घडला होता. मात्र समर्थांनी कल्याणस्वामींची कानउघडणी केली कारण दिवाकर गोसावींकडे ही राजदरबाराची कामे असताना कल्याणस्वामींनी त्यात दखल घेतली, इतके प्रेम या बंधूमध्ये होते.

एकदा समर्थांनी दत्तात्रयस्वामींना पारगावच्या मौनीबाबांकडे पाठविले आणि जाताना अकरा खारका त्यांना देण्यासाठी म्हणून बरोबर दिल्या. परंतु दत्तात्रयस्वामी एक जाणते गुरूभक्त असल्याने चमत्कार करणाऱ्या त्या मौनीबाबांचा चमत्कार खरंच काय आहे ते बघण्यासाठी त्यांनी दहाच खारका मौनीबाबांच्यासमोर ठेवल्या. परंतु मौनीबाबांनी अंतर्ज्ञानाने जाणले आणि समर्थांनी दिलेल्या सर्व अकरा खारकांचा प्रसाद ठेवायला सांगितला आणि खोटं का वागता म्हणून विचारले. हे ऐकल्यावर दत्तात्रयस्वामी जरी वरमले तरी त्यांची मौनीबाबांचे चमत्कार जाणून घ्यायची इच्छा होती.

दत्तात्रयस्वामींनी शेवटपर्यंत आपली गुरूनिष्ठा जपली. आपले सर्व आयुष्य संप्रदायाच्या कार्यासाठी वेचले. समर्थांच्या प्रत्येक आज्ञेचे पालन केले. समर्थांनी घालून दिलेले आदर्श कायम तंतोतंत पाळले. शिरगांव मठ स्थापन झाल्यापासून तेथील समाजपरिस्थितीचे भान ठेवून कार्य

केले. अशा या निष्ठावान शिष्याला समर्थांनी चाफळच्या रामजन्मत्सवात लळीताचा अधिकार दिला होता. हा अधिकार म्हणजे खरंच मोठा मान होता. इ.स.१७१७ मध्ये फाल्गुन वद्य दशमीला समाधी घेतली.

**मठाची सद्यस्थिती**

ग्वाल्हेरला मठ स्थापन झाल्यापासून दत्तात्रयस्वामींपासून पाचव्या पिढीचे मठाधिपती आबामहाराज यांच्यापासून आत्ताच्या पिढीपर्यंत शिरगांव मठाचे व्यवस्थापन ग्वाल्हेरमठाच्या अखत्यारीत होत आहे. विद्यमान मठाधिपती उपेन्द्रमहाराज शिरगांवकर असून शिरगांव मठाच्या विकासाकडे, जीर्णोध्दाराकडे लक्ष देत आहेत. दरवर्षी दत्तात्रयस्वामींचा पुण्यतिथी उत्सव मठात साजरा केला जातो, गल्या २२ वर्षांपासून दासबोध पठण होते. एवढे लहान गाव असूनही या उत्सवात काकड आरती, पूजापाठ, दासबोध पारायण, अन्नसंतर्पण, उपासना, कीर्तन, जागर, भिक्षा अशा अनेक प्रथा अजूनही साजऱ्या केल्या जातात. मुख्य म्हणजे या कार्यक्रमात तरूणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे. एवढेच नाही तर ग्वाल्हेर मठातूनही कितीतरी भाविक येथे येतात. असा ग्वाल्हेर मठ यात सक्रिय आहे. मठाचा जीर्णोध्दार व्हावा आणि एक भक्तनिवास असावे यासाठी ग्वाल्हेर मठाचे प्रयत्न चालू आहेत. वर्षातून एकदा जे संप्रदायाचे मठाधिपती संमेलन होते. ते गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात शिरगांवला पार पडले. हे वर्ष म्हणजे दत्तात्रयस्वामींची त्रिशताब्दी पुण्यतिथी होती. अनेक सोयींची कमतरता या लहान गावात असूनसुध्दा ग्वाल्हेर मठ आणि शिरगांवचे ग्रामस्थ यांनी तीन चार दिवसाचे भरगच्च कार्यक्रम आखले होते. होमहवन, रामनामाने पहिल्या दिवसाची सुरूवात होऊन कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा साजरा झाला. शिवाजीमहाराज मोरे, मोहनबुवा रामदासी, सावेत महाराज यांची भाषणे, तर श्री. मधुसुदन नेने, श्री. रमण चितळे, श्री. नंदकुमार मराठे, सज्जनगडचे योगेशबुवा रामदासी, डोमगावचे श्री. सचिन जहागीरदार यांची 'समर्थ रामदास एक मुक्त चिंतन' या विषयावर चर्चासत्रे झाली. समर्थ वाङ्मयातून दिसणारे पैलू यावर डॉ. ज्योत्स्ना कोल्हटकर, नीलाताई अभ्यंकर आणि मनीषा बाठे यांचे विचार मांडले गेले. दररोज श्रीरामांवरील भक्तीगीतांचे सादरीकरण हे एक वेगळेपण त्यात होते. भरतबुवा रामदासी, प्रमोद महाराज, जगताप आणि चारूदत्तबुवा आफळे यांची अप्रतिम कीर्तने सादर झाली. मठाधिपती संमेलनाचे अध्यक्ष म्हणून सज्जनगड संस्थानचे अध्यक्ष भूषणस्वामी यांनी भाषण केले. तसेच इतर अनेक मठाधिपतींनीही त्यांचे विचार, त्या

मठांची माहिती सांगितली गेली. अतिशय आयोजनबध्द अशा त्या संमेलनाला समर्थभक्तांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### ४.६.७ भीमस्वामी – तंजावर मठ

महाराष्ट्राबाहेरील प्रांतामध्येही समर्थशिष्यपरिवार आणि मठांची निर्मिती झाली होती. तामिळनाडूमधील तंजावर मठ खूप महत्त्वाचा आहे. या मठाचे कार्य मोठे असून त्या मठाधिपत्याखालीही अजून मठ स्थापन झाले. मठाचे प्रथम अधिकारी भीमस्वामी हे महाराष्ट्रातूनच तिकडे संप्रदायाच्या कार्यासाठी गेले.

समर्थांनी भीमस्वामींना मठाधिपती केले. पुढे भीमस्वामींनंतर त्यांच्या मेहुण्याचा वंश चालला. त्यांच्या मेहूण्याचे नाव भीमराज गोसावी होते, त्यामुळे त्या मठाला भीमराज गोसावी मठ म्हणूनही ओळखले जाते.

### भीमस्वामींचे चरित्र

भीमस्वामींचा जन्म इ.स.१६३६ च्या सुमाराचा आहे. भीमस्वामी म्हणजे मसूर मठाचे बाजीपंत आणि सतीबाई यांचा मानलेला मुलगा. समर्थ मसूर येथे मुक्कामी असताना बाजीपंत आणि सतीबाईंना जेव्हा अनुग्रह देत होते तेव्हा त्यांचा पुत्रवत भाचा भीम उर्फ भिकोबा उर्फ भिकजी हाही तिथेच होता. अनुग्रहाचा प्रसंग तो बघत असताना, दहा–बारा वर्षाच्या भीमच्या मनात आले सर्व जण नमस्कार करत आहेत. का बरं? त्याने काय होते?, यावर समर्थ जे सांगतील ते ऐकले तर मग हवे ते समर्थ देतील अशी त्याची समजूत घातली. यावर भीम समर्थांना म्हणला,' सांगा काय करू?' समर्थांनी विहिरीत उडी टाकायची आज्ञा केली तर भीमने ताबडतोब विहिरीत उडी टाकली. पण त्या पोराचा प्राण गेला तर आपण निमित्त होऊ म्हणून समर्थांनी त्याच्यामागोमाग उडी टाकली. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,'' उडी घेतल्याचे मात्र भिकाजीला स्मरण होते. पुढे विहिरीच्या आत मंदिर, त्यात सिंहासनारूढ स्वामी आणि जवळ आपण उभा असे भिकाजीस दिसले. ''[२४७]

या भीमचे खरंच खूप कौतुक होते. निरागसतेने विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरावर केवळ त्याने विहिरीत उडी मारली. कोणताही उध्दटपणा त्याने दाखविला नाही, शंका घेतली नाही, पण ज्यावेळेस समर्थांच्या आज्ञेचे पालन त्याने त्वरीत केले तेव्हा समर्थ त्याच्यावर खुष झाले

असतील आणि हा आपला एक नवीन शिष्य होऊ शकतो ह्याचीही खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली असणार. स्वप्नातच समर्थांनी भीमला अनुग्रह दिला. दोघेही विहिरीबाहेर आल्यावर भीमच्या चेहऱ्यावर खूप समाधान दिसत होते, तर समर्थांनाही एक नवा उत्तम शिष्य मिळाल्याचा आनंद झाला होता. समर्थांनी लगेचच बाजीपंत आणि सतीबाई ह्यांच्याकडे भीम आपल्या संप्रदायात सामील व्हावा अशी इच्छा व्यक्त केली आणि भिक्षेत वा गुरूदक्षिणेत त्यांनी भीमची मागणी केली. बाजीपंत आणि सतीबाईंना तर अगदी त्यांचे भाग्य उजळले असे वाटले. समर्थांना मसूर मध्ये हे भीमरूपाने हे रत्न मिळाले. त्या दांपत्यानेही मोठ्या मनाने भीमला समर्थांच्या हवाली केले. पुढे ह्याच भीमला तंजावरच्या मठाचे अधिपतीपद दिले आणि हा भीम भीमस्वामी तंजावरकर झाला.

त्यानंतर भीमने मसूर सोडले आणि बराच काळ तो समर्थांच्या सानिध्यातच राहिला. समर्थांनी भीमला तो पुढे मठाधिपतीची जबाबदारी घेईल अशा प्रकारे शिकवण देऊन तरबेज केले.

भीमस्वामीसुध्दा अतिशय सुदृढ, विशाल व्यक्तीमत्त्वाचे रूबाबदार होते. ते स्वतः उत्तम चित्र काढायचे. त्यांनी स्वतःचेच एक चित्र नंतर पुढे तंजावरला असताना काढले. ते अजूनही मठात आहे. श्री. सेतू माधवराव पगडी या संदर्भात लिहितात,'' त्यांचे चित्र म्हणजे शिवकालीन पोर्ट्रेट पेंटिंगचा उत्कृष्ठ नमुना म्हणून महाराष्ट्राला परिचित आहे. ''[२४८]

समर्थ तमिळनाडूत तंजावरला गेले असताना तेथे त्यांची व्यंकोजीराजे भोसले ह्यांच्याशी भेट झाली होती आणि व्यंकोजीराजांनी समर्थांचा अनुग्रह घेतला होता. व्यंकोजीराजांची इच्छा होती की समर्थांनी तेथेच रहावे मात्र एकेच ठिकाणी वास्तव्य न करणे हे समर्थांचे मूळ तत्त्व होते, त्यामुळे समर्थांनी काही काळ तेथे राहून मठ स्थापना केली. आणि भीमस्वामींची ह्या तंजावरच्या मठात मठाधिपती म्हणून नेमणूक केली.

**भीमस्वामींचे कार्य**

त्यावेळी तंजावरमध्ये सुध्दा सांप्रदायिक कार्याची आवश्यकता होती. शिवाय तंजावरमधे खुद्द भोसलेंचा राजाश्रय मिळणार होता. भीमस्वामी समर्थांची आज्ञा शिरसावंद्य मानून एवढया लांब तंजावरमधे मठाचे कार्य सांभाळण्यासाठी गेले. तंजावरच्या मठात स्थापन झालेला मारूती,

तर रामचक्र, झेंडा, कफनी, पंचमुखी झोळी ह्या अजूनही अस्तित्वात आहेत, त्या समर्थांनी स्वतः भीमस्वामींना तंजावरला जाताना दिल्या आहेत. भीमस्वामींनी स्वहस्ते लिहिलेला दासबोध ग्रंथ मठात आहे. भीमस्वामी जसे उत्तम देहयष्टीचे, प्रसन्न, व्यक्तीमत्त्वाचे होते तसेच त्यांची वाणी अगदी प्रासादिक होती. महंताच्या सर्व लक्षणात ते तरबेज होते, कीर्तनकलेतही ते वाकबगार होते. त्यांच्या रसाळ वाणीने आणि व्यक्तीमत्त्वामुळे त्यांची कीर्तने खूप रंगत अस. त्यामुळे सर्व लोक भारावून जाऊन त्यांचे कीर्तन ऐकत. यायोगे भीमस्वामींनी तंजावरमधील लोकांना कीर्तनातून उत्तम प्रबोधन केले. तेव्हापासून त्यांचा स्वतःचा, अर्थातच संप्रदायाचा शिष्यसमुदाय वाढत गेला. तेथील भाषेवरही त्यांनी प्रभूत्व मिळविले. तेथील संप्रदायाला इतकी बळकटी आली आणि विस्तार झाला की तंजावरमध्येच त्या परिसरात नवीन मठ स्थापन झाले. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' तंजावरला समर्थसंप्रदायाचे एकूण पाच मठ आहेत. मुख्य मठ तंजावर येथील भीमस्वामींचा त्यांच्या तीन शिष्यांचे तीन मठ आणि अनंत मौनींच्या परंपरेतील सेतुरामबबांचा एक मठ, असे हे पाच मठ होत. ''[२४९]

तीन शिष्यांचे मठ हे रामस्वामी, गोविंदबालस्वामी आणि आत्मारामस्वामी यांचे. त्यापैकी रामस्वामींच्या मठात समर्थांची झोळी, गोविंदस्वामींच्या मठात पादुका असून आत्मारामस्वामींच्या मठात कुबडी आहे. हे सर्व मठ प्रथम भीमस्वामींच्या अखत्यारीत होते. भीमस्वामींप्रमाणेच त्यांचेही शिष्य सद्‌गुणी होते. त्यांनी सुध्दा संप्रदायाचा विस्तार करायला सहाय्य केले आहे. तंजावरसारख्या परप्रांतात, परभाषेच्या समाजातसुध्दा भीमस्वामींनी आपला ठसा उमटविला. समर्थांनी दिलेली जबाबदारी भीमस्वामींनी पार पाडलीच पण संप्रदायाचे जे कार्य त्यांनी केले आहे, त्यावरून त्यांचा अधिकार आणि योग्यता किती मोठी आहे हे लक्षात येते. भीमस्वामी सांसारीक असले तरी समर्थांची भक्ती तेवढ्याच निष्ठेने ते करत होते. दूरवर जाऊनही ते कार्यापासून, निष्ठेपासून थोडेही लांब झाले नाहीत. एवढ्या लहान वयात घर साडून, समर्थसंप्रदायात राहून, परप्रांतात जाऊन उत्तम कार्य करणे काही सोपे नव्हते. ते भीमस्वामींनी यशस्वीपणे करून दाखविले.

भीमस्वामींची वाङ्मयनिर्मिती फार काही नाही. परंतु ज्या काही रचना त्यांनी केल्या त्या त्यांच्या वाणीप्रमाणेच अत्यंत प्रासादिक, मनाला भिडणाऱ्या आहेत.

वयाच्या अवघ्या दहाव्या–बाराव्या वर्षीच भीमस्वामींना समर्थांचा अनुग्रह मिळाला आणि तेव्हाच ते मसूर सोडून समर्थांच्याच सहवासात राहिले आणि त्यांच्या तालमीत पूर्ण तयार झाले. लहानपणापासूनचा बराचसा काळ ते समर्थांबरोबर राहिले, त्यामुळे त्यांचा प्रेमभाव फारच दृढ झाला. समर्थांनी त्यांना तंजावरला दूरवर पाठविल्यावर त्यांना समर्थांचा खूप विरह सहन करावा लागला. सतत समर्थांची आठवण त्यांच्या मनात भरून राहिल्याने त्याच मनस्थितीत भीमस्वामींनी समर्थांना खूप सुरेख आणि भावनिक शब्दात एक पत्र लिहिले. श्री. सेतू माधवराव पगडी यांनी 'श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय' यामध्ये या पत्राचा समावेश केला आहे.

'' कसे दुर्भरे आणिले या स्थळाला। पदीं स्वामिच्या थोर वियोग झाला। जगीं धन्य त्या लाभली पायसेवा। जसे ते मला पूर्व माझाचि ठेवा। ''[२५०]

समर्थांची आज्ञा शिरसावंद्य मानून भीमस्वामी तंजावरला जाऊन संप्रदायाचे कार्य उत्तमरीतीने, निष्ठेने करत होते. तरी कुठे तरीसुध्दा कुठेतरी समर्थांच्या वियोगाचे दुःख भीमस्वामींना होत होते. या पत्रातून समर्थांनी त्याची मनाची अवस्था जाणली. यास समर्थांनी त्यांना जे उत्तर दिले तेही फारच समर्पक होते. नियोजित कार्य संपादन करण्यासाठी तेथे गेल्यावर आपल्या विरहामुळे मन संतुलन बिघडलेले समर्थांना अजिबात मान्य झाले नाही. 'प्रपंच, परमार्थ, राजकारण, श्रवण–मनन यांत लक्ष घातले तर हा वियोग जाणवणार नाही. तुम्हाला तिथे खूप कार्य करायचे आहे.' अशा आशयाचे पत्र समर्थांनी भीमस्वामींना पाठवून जरी त्यांची कानउघडणी केली, तरी आपलीही तशीच मनाची परिस्थिती आहे हेही समर्थांनी कबूल केले.

भीमस्वामींनी समर्थांचे एक लहानसे चरित्रही लिहिले आहे. त्यांचे पन्नास ओव्यांचे एक काव्य समर्थांच्या अंतकाळच्या प्रसंगावर आधारलेले आहे. पन्नास ओव्यांची शब्दरचना, शब्द,प्रसंगाचे वर्णन अतिशय सुंदर अगदी ह्रदयाला भिडणारे आहे. त्यातील काही ओव्या श्री. शंकर देव यांनी 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात नमूद केल्या आहेत.'' माघ व।।९ जाणे पाहे परधामी। केला निश्चय अंतर्यामी। भावे ऐसा।।१४।। या उपरि बाहेर येणे। ना घडे बहुत बोलणे। श्रींचे कार्य श्रीस्मरणे। करीत जावे।।१५।। ''[२५१] समर्थांच्या निर्याणानंतर सज्जनगडला जेव्हा भीमस्वामी आले होते तेव्हा इतर शिष्यांकडून सर्व प्रसंग जाणून त्यांनी ही मनाला स्पर्श

करणारी काव्य रचना केली. भीमस्वामींना भरपूर आयुष्य लाभले. त्यांचे निर्याण वयाच्या ९९व्या वर्षी झाले. म्हणजे इ.स. १७३५ च्या सुमारास. शेवटपर्यंत भीमस्वामींचे आयुष्य समर्थांच्या भक्तीने, निष्ठेने भरलेले होते आणि शेवटपर्यंत संप्रदायाचे कार्य ते करीत राहिले. भीमस्वामींची समाधी तंजावर मठापासून अगदी जवळच बांधली आहे.

### मठाची सद्यस्थिती

तंजावर मठाचे आत्ताचे मठाधिपती रामचंद्र भीमराज गोसावी–केसकर असून ते मठाची व्यवस्था उत्तम रीतीने सांभाळत आहेत. त्यावेळी तंजावरचा मठ मोठा होता आणि तेवढाच कार्यरतही होता. आतासुध्दा त्याच जबाबदारीने या मठाची व्यवस्था पाहिली जाते. तंजावर येथील हा मुख्य मठ असल्याने येथे समर्थभक्तांची कायम वर्दळ असते. मराठी आणि तमीळ या दोन्ही भाषांनी हा मठ कार्यरत ठेवला आहे. श्रीरामजन्म, हनुमानजयंती हे उत्सव येथे उत्साहाने पार पडतात. नित्योपासनेबरोबरच इतर अनेक उपक्रम येथे चालू असतात. तंजावर मठात समर्थ साहित्य विपुल प्रमाणावर असून त्याची जोपासना अगदी व्यवस्थित चालू आहे. शिवाय त्याचा प्रसार केला जातो. दरवर्षी होणाऱ्या मठाधिपतींच्या संमेलनाला स्वतः रामचंद्र गोसावी उपस्थित राहतात.

### ४.६.८ अंबिकाबाई – राशिवडे व वाळवे मठ

समर्थांच्या स्त्री शिष्यांमध्ये महंत होण्याचे भाग्य वेणाबाईंबरोबर अंबिकाबाईंनाही लाभले. समर्थांच्या महान शिष्यांमध्ये जसा उध्दव स्वामींना दोन मठांच्या मठाधिपत्याचा मान मिळाला तसाच अंबिकाबाईंनाही दोन मठांच्या अधिपती होण्याचा मान मिळाला होता, राशिवडे आणि वाळवे मठांचा.

समर्थ प्रतापकार गिरिधरस्वामी लिहितात,'' अंबिका नामें कोरान्नि विजयपुरी। वातावर्ती पातली कृष्णातीरीं। करवीरप्रांती हरिभक्ती बरी। शिष्य संप्रदाये केली हो।। ''[२५२]

यांची शिष्य परंपरा श्री. प्रमोद संत यांनी 'समर्थ स्थापित दैवते' यात दिली आहे.

''समर्थ
↓
अंबिकाबाई
↓ ↓ ↓

आक्का ऊर्फ भीऊबाई(मठ राशिवडे)     काशीबाई मठ वाळवे

↓

मल्हारबुवा→गिरिबुवा→ व्यंकोजीबुवा→

मोरेश्वर→बाळाजी (पुत्र)→रामचंद्र→ बळवंत→रघुनाथबुवा ''[२५३]

अंबिकाबाई या मूळच्या विजापूरच्या होत्या. त्याचे आडनाव कोरान्ने होते. महाराष्ट्रात आल्यावर कोल्हापूर प्रांतात त्यांची आणि समर्थांची भेट झाली. त्यानंतर समर्थांनी अंबिकाबाईंना अनुग्रह दिला. त्याचबरोबर समर्थांनी त्यांना आत्मज्ञानही करून दिले. समर्थांच्या आज्ञेवरून एकाच वेळी कोल्हापूरमध्ये 'राशिवडे' येथे आणि सांगलीमध्ये 'वाळवे' येथे असे दोन मठ स्थापन झाले. या दोन्ही मठांचे अधिपत्य समर्थांनी अंबिकाबाईंना करायला सांगितले.

अंबिकाबाईंचे चरित्र फारसे उपलब्ध नाही. परंतु समर्थांचा अनुग्रह झाल्यावर अंबिकाबाईंनी हरिभक्तीबरोबरच रामरायाच्या उपासनेवर भर दिला.

**अंबिकाबाईंचे कार्य**

अंबिकाबाईंचे मुख्य कार्य म्हणजे राशिवडे आणि वाळवे दोन्ही प्रांतात रामरायांच्या उपासनेचे महत्त्व त्यांनी लोकांना पटवून दिले त्यामुळे तेथील लोकांना उपासनेची गोडी लागली. त्यांची मनं संप्रदायाकडे वळू लागली. अंबिकाबाईंनी स्वतः ब्रह्मज्ञानाचा अभ्यास केला. अतिशय परखड स्वभाव असल्याने त्यांना कोणत्या गोष्टीचे जरासे भय नसे. त्यामुळे संप्रदायात त्यांची एक वेगळी प्रतिमा निर्माण झाली. समर्थांच्या उपदेशावरून समाजकार्य करून अंबिकाबाईंनी यशस्वीरित्या राष्ट्रकार्य साधले होते. अंबिकाबाई अभ्यासाने आणि ज्ञानाने परिपूर्ण असल्याने 'दासबोध' ग्रंथाचे निरूपण त्या उत्कृष्टरीत्या करीत.

भिऊबाई आणि काशीबाई या त्यांच्या दोन शिष्या होत्या. भिऊबाईंना राशिवडे मठाची आणि काशीबाईंना वाळवे मठाची व्यवस्था बघायला सांगून स्वतः दोन्ही मठांचे अधिपत्य यशस्वीपणे करीत होत्या. काशिबाईंनंतर त्यांचे शिष्य मल्हारबुवा मठाची व्यवस्था पाहू लागले आणि पुढे मात्र दोन्ही मठांची शिष्य परंपरा वेगवेगळी न रहाता, एकच शिष्य दोन्ही मठ सांभाळू लागल्या समर्थांनी एकाचवेळी दोन मठांच्या मठाधिपती होण्याचा मान अंबिकाबाईंना दिला. यावरूनच त्यांचा अधिकार आणि योग्यता कळते.

इ.स. १८५१ मध्ये त्यांच्या शिष्य परंपरेतील 'राघवदास' या शिष्याने आपल्या 'वेदमनोगत' या ग्रंथात अंबिकाबाईंच्या कार्याचा उल्लेख केला आहे. त्या ग्रंथातील काही ओव्या 'श्रीदासायन'मध्ये श्री. अनंतदास रामदासी यांनी समाविष्ट केल्या आहेत.''(रामदासांनी) अंबिकाबाई लागून। आत्मज्ञान प्रबोधिले।।१।। चवदा शिष्य जालिया वरत। अंबिकाबाईस ज्ञानयुक्त। श्रीरामदासस्वामी समर्थ। महामंत्रापत उपदेशिती।।२।। ब्रह्माभ्यास करिता बरी। जाली पूर्ण साक्षात्कारी। मग ती जगामाझारी। पिशाच्यापरी रहातसे।।३।। ''[२५४]

अंबिकाबाईंनी ग्रंथरचना केली नाही. परंतु त्या काव्यरचना करीत असत. त्यापैकी एक काव्य उपलब्ध असून त्यात त्यांच्या काव्यातील सामर्थ्य, प्रासादिकता, त्याचप्रमाणे गोडवा असून ते असे आहे. श्री. प्रमोद संत त्यांच्या 'समर्थ स्थापित दैवते' या ग्रंथात ही रचना दिली आहे.

''मी सद्‌गुरू घरची सैरी। शोभत्ये बरी।।धृ।। बाई मज गोल्हाटी गे रहाणे। तेथूनि श्रीहाटी मज पाहणे। रामदासाश्रय म्यां केला। म्हणवुनि विलास सर्वही जाला। अंबी न विसरे गुरूप्रदाला प्रतिता खरी।।२।। ''[२५५]

अंबिकाबाईंच्या या काव्यरचनेत गोडवा, प्रासादिकता, तसेच आपल्या गुरूरायांप्रती असलेली भक्ती, आपल्या आयुष्यातील त्यांचे महत्त्व सांगतात, तर आपल्या गुरूला अर्थातच समर्थांना कधीही न विसरण्याची प्रतिज्ञा त्या घेतात. यावरून त्यांच्या विचारांतील भव्यताही दिसून येते. मात्र त्यांच्या बाकी आयुष्याबद्दल आणि निर्याणाबद्दल उल्लेख सापडत नाही.

### ४.६.९ सीतारामबुवा – चिपळूण मठ

महाराष्ट्रात सर्व प्रथम कृष्णातीरेच्या भोवतालच्या परिसरात समर्थांनी कार्याचे बीज रोवले. सातारा, सांगली, कोल्हापूर वगैरे जो प्रांत होता तो शिवरायांच्या स्वराज्य विस्ताराचा मुख्य प्रांत होता, त्यामुळे समर्थांचे कार्य इथे सर्वप्रथम विस्तारले गेले आणि त्यानंतर महाराष्ट्रातील इतर प्रांतात समर्थांचे कार्य सुरू झाले. समर्थांचे मठ, संप्रदायाचा प्रसार आदी गोष्टी चांगल्या तऱ्हेने रूजत चालल्या.

चिपळूण मठाच्या निर्मितीवरून एक गोष्ट लक्षात येते की, शिवरायांच्या स्वराज्याच्या विस्तारात मुख्य प्रांताबरोबरच स्वराज्यातील इतर प्रदेशांकडेही समर्थांनी लक्ष पुरविले.

## मठनिर्मिती

पुढे कोकण प्रांतामध्ये मठ स्थापना होण्याचा योग आलाच. एकदा समर्थ चाफळला शिष्यांसमवेत असताना एक अनोळखी गृहस्थ कोकणातून समर्थांच्या दर्शनास आले. तळकोकणातून निघून अशीच तीर्थक्षेत्रे बघत असताना समर्थांची ख्याती ऐकून ते गृहस्थ समर्थांची एकवार भेट घेऊन आपल्याकडील परिस्थितीची चर्चा करू असा मानस घेवून आले. समर्थांनी त्यांची कोकण प्रांत, तेथील देशस्थिती, रामोपासना चालते का? अशा काही प्रश्नांनी विचारपूस केली. खर तर ते गृहस्थ एकूण भांबावलेले, काहीसे भयभीत दिसत होते. पण समर्थांनी त्यांची ही मनस्थिती ओळखून अभय दिले, आणि निर्धास्तपणे तेथील परिस्थिती मांडण्याची विनंती केली. समर्थांच्या आश्वासनाने त्या गृहस्थांना धीर आला आणि त्यांनी तेथील सर्व परिस्थिती सविस्तरपणे सांगितली.

कोकणातील पोर्तुगीजांच्या मुलखात पोर्तुगीजांनी धुमाकूळ घातला होता. सगळीकडे जुलूम–अत्याचार–अन्यायाने कहर केला होता. सर्व जनता पोर्तुगीजांच्या अंमलाखाली इतकी भरडली जात होती की, भजन–पूजन, कीर्तन–नामस्मरण यापासून सर्व लोक कैक दूर होते. त्या गृहस्थांच्या तोंडचे एक वाक्य मात्र समर्थांच्या अंतःकरणाला भिडले. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' कुठली रामभक्ती नि कुठलं काय? मला वाटते, आपल्या इथला भजनानंद पाहून तिकडून राम इथंच येऊन विसावला. ''[२५६]

हे सर्व ऐकल्यावर समर्थ त्या प्रांतात जायला का विलंब लावणार? त्यांनी ताबडतोब कोकणात जायचा निर्णय घेतला. चाफळवरून निघाल्यावर तळकोकणात उतरताना घाटमाथ्यावरील मंदिरात प्रत्यक्ष जगदंबेने प्रकट होऊन त्यांना दर्शन दिले. तोपर्यंत कल्याणस्वामी अकरा शिष्यांसह शोध घेत आले. निनाई देवालयात भोजनादी प्रसाद मिळाल्यावर समर्थांनी सर्व शिष्यांना माघारी जायला सांगून आपल्या बरोबर सीताराम या शिष्याला घेतले आणि पुढील कोकण प्रवास सुरू झाला. समाजाप्रती असलेले प्रेम, स्वराज्यासाठी कितीही कष्ट सोसायची त्यांची तयारी होती त्यामुळे पोर्तुगीजांच्या अन्यायाला विरोध करण्याची तजवीज करायला समर्थ तत्परतेने निघाले होते. कोकणात पोहोचल्यावर सीतारामांबरोबर अवघ्या समुद्रकाठावर संचार केला, सर्व परिस्थिती प्रत्यक्ष पाहिली आणि ते चिपळूण मध्ये पोहोचले.

परशुरामांचे दर्शन घेऊन समर्थांनी चिपळूण मठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. फक्त मठ स्थापना हा त्यांचा हेतू नव्हता. तेथील लोकांचे प्रबोधन करणे हाही हेतू होता किंबहूना त्याची गरज होती. त्याप्रमाणे समर्थांनी मठ स्थापला आणि सीताराम यांना मठाधिपती म्हणून नेमले. समर्थ सीताराम यांच्यासह अनेक दिवस चिपळूणमधे राहिले. कोकणची भाषा अवगत केली आणि त्यांच्या भाषेत समाजाला शिकवण द्यायला सुरूवात केली.

काही काळ व्यतीत केल्यावर समर्थांनी सीतारामबुवा यांच्या ताब्यात मठ दिला. मुळातच सीतारामबुवाही समर्थांचे पक्के शिष्य होते, संप्रदायाप्रती समर्थांशी एकनिष्ठ होते. त्यांच्यामुळे इतक्या दूर चिपळूण भागात मठस्थापना करून आपल्या हातात अधिपत्य दिले आहे म्हणजे ही मोठी जबाबदारी आहे ह्याची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. स्वराज्य स्थापनेत शिवरायांचे स्वतःचे आरमार हे समर्थांचेही स्वप्न होते. त्या मार्गातील हा महत्त्वाचा टप्पा होता आणि कोकणच्या इतर परिसरातही स्वराज्याचा विस्तार ह्या दोन्ही दृष्टीने इथे संप्रदायाचे कार्य करायचे आहे हे जाणून सीतारामबुवांनी कार्यास प्रारंभ केला.

## सीतारामबुवांचे कार्य

धर्मसंस्थापना, तेथील समाजास प्रबोधन करणे, लोकांना अन्यायाविरूध्द लढण्यास प्रवृत्त करणे आणि पोर्तुगीजांवर जरब बसविणे ह्या चारही महत्त्वाच्या भूमिका त्यांनी पार पाडल्या. त्यामुळे कोकाणात आरमार आणि स्वराज्यास हा भाग जोडून घ्यायला मदत झाली. तसेच मंदिरात श्रीरामराया आणि मारूतीराया यांची उपासना करून लोकांना भक्तीमार्ग दाखविला, त्यांना भजन–नामस्मरणाची गोडी लावली. ह्या पराक्रमी देवतांचा आदर्श आणि उपासना यांच्यामुळे समाजाची मानसिकता बदलायला लागली. शिष्यसंप्रदाय तयार झाला. अशा तऱ्हेने पोर्तुगीजांचे वर्चस्व असूनही तिथे धर्मसंस्थापना होण्यात सीतारामबुवांचा मोठा सहभाग होता. एवढ्या भयावह समाज परिस्थितीत सीतारामबुवा उभे राहिले ते अखेरपर्यंत त्यांनी रामोपासना करून संप्रदायाचे खूप मोठे कार्य केले. सीतारामबुवांनी काही ग्रंथलेखन केले नाही, पण ते कवी होते. त्यांचे फार काही काव्य उपलब्ध नसले तरी त्यांचे एक 'अन्वय व्यतिरेक' हे प्रकरण उपलब्ध आहे. खरं तर हा गहन विषय आहे पण तो त्यांनी सोपा करून सांगितला आहे.

सीतारामबुवांच्या जन्म–मृत्यूच्या काळाचा, शिष्य परंपरेचा तपशील मिळत नाही. मात्र अखेरपर्यंत सीतारामबुवा चिपळूण येथेच राहिले.

### ४.६.१० बाजीगोसावी – शिरवळ मठ

समर्थभक्त, समर्थशिष्य बाजी गोसावी हे जातीने मराठा होते, त्यांचे उपनाव तांबे असे होते. पाली मठाच्या रंगनाथ गोसावींचे हे पुत्र. समर्थांनी शिरवळ येथे मठ स्थापून बाजी गोसावी यांच्या ताब्यात दिला. त्यांचा जन्म शक, समर्थांनी अनुग्रह दिल्याचा काळ उपलब्ध नाही. परंतु त्यांचा मृत्यू इ.स. १७०५ च्या सुमारास मार्गशिर्ष वद्य अष्टमीला झाला.

जेव्हा वाई, कण्हेरी वगैरे प्रांतात संप्रदायाचे कार्य चालू होते. तेव्हाच बाजी गोसावी यांना समर्थांनी मठ स्थापून दिला. शिरवळला नीरा नदीच्या काठी बाजी गोसावींचा मठ आहे. बाजी गोसावी स्वतः रामभक्त होते. संप्रदायाच्या विस्तारासाठी या मठाची निर्मिती झाली आणि बाजी गोसावींनी त्यांना नेमून दिलेले कार्य व्यवस्थितपणे पार पाडले.

त्यांची योग्यता किती होती ह्याचे प्रत्यंतर एका घटनेवरून समजते. बाजी गोसावी समाधिस्त झाल्यानंतर काही काळाने म्हणजे जवळ जवळ सोळा–सतरा वर्षांनी त्यांचे समाधी वृंदावन डोलू लागले होते. अर्थात शिरवळ आणि आसपासच्या गावातील लोकांनीच नव्हे तर राजपुरूषांनीही हे प्रत्यक्ष पाहिले होते. श्री. अनंतदास रामदासी यांनी एका मजकूराचा उल्लेख 'श्रीदासायन' या ग्रंथात केला आहे.'' आपले बाप बाजी गोसावी सत्पुरूष होते, ते पूर्वी शांत जाले, त्यांचे वृंदावन कसबे मजकुरी बांधले आहे ते सांप्रत गत वर्षापासून डोलत आहे. हा चमत्कार बहुता लोकांनी पाहिला आहे. ''[२५७] बाजी गोसावींचा पुत्र रामजी गोसावी यांनी ही माहिती स्वतः सातारा येथे कळविली होती. शिरवळ म्हणजे शिवरायांचाच मुलूख होता. त्यामुळे त्या परिस्थितीला अनुसरून स्वराज्याच्या कार्यासाठी हा मठ झाला हे नक्की.

सद्यस्थितीत ह्या समाधीची दुरूस्ती करावयाची अत्यंत गरज आहे.

### ४.६.११ वासुदेव गोसावी – कण्हेरी मठ


वासुदेवगोसावींचा मठ कण्हेरी येथे आहे. सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यात वाई, भोर आणि मांढरदेव याच्या माथ्यावर सह्याद्रीच्या कुशीत 'कण्हेरी' वसले आहे. सह्याद्रीमुळे हे गाव

अतिशय रमणीय आहे. तसेच समर्थांच्या चाफळ या केद्रांच्याही जवळ आहे. समर्थांनी स्वतः वासुदेव गोसावींना मठ स्थापून दिला आणि तेथे मठाधिपती बनवले.

'समर्थप्रताप'कार गिरीधरस्वामी लिहितात,'' वासुदेवनामा अनुष्ठानी। समर्थ प्रतिभा म्हणती जनी। उत्कट परमार्थ विस्तारूनी। समर्थ चरणी लीन राहे।। ''[२५८]

श्री प्रमोद संत यांनी 'समर्थ स्थापित दैवते' या ग्रंथात मठ परंपरा दिली आहे.

कण्हेरी मठाची परंपरा – श्री समर्थ → वासुदेवस्वामी → माधवस्वामी → पुरुषोत्तमस्वामी → पुरुषोत्तमस्वामी → भीमाजीबुवा → जयरामबुवा → हरीबुवा




## वासुदेव गोसावींचे चरित्र

वासुदेव गोसावींचे मूळ नाव सदाशिवशास्त्री येवलेकर. येवले येथील 'देव' या उपनावाच्या यजुर्वेदी घराण्यातील हा तरूण ब्राह्मण. शास्त्रार्थात सदाशिवशास्त्री पारंगत होते. त्यांचे षट्शास्त्रांचे अध्ययन काशीस झाले. शास्त्रार्थाच्या सभेत त्यांनी आपल्या गुरूंनाही जिंकले होते. एवढे त्यांचे पांडित्य होते. त्यांच्या गुरूंनी त्यांचे कौतुक केले आणि दिग्विजयार्थ संचारास जाण्याची आज्ञा

केली. त्याप्रमाणे सदाशिवशास्त्री सर्वदूर शास्त्रार्थ करीत निघाले. पुढे पुढे त्यांना आपल्या पांडित्याचा, आपल्या वादविवाद करू शकणाऱ्या बुद्धीचा गर्व निर्माण झाला. शास्त्रार्थ करायला सभेला निघताना आपल्या जानव्यास सुरी बांधून आणि दिवसाही मशाली लावून जात. त्यांची प्रतिज्ञाच असायची की सभेतून जयपत्र घेऊनच परत येईन आणि हरलो तर स्वहस्ते मशाल विझवून सुरीने जीभ कापून टाकीन. एवढी त्यांना खात्री असे आणि गर्वही असे.

दिग्विजयार्थ संचार करीत करीत सदाशिवशास्त्री दक्षिणेत आले आणि छत्रपती शिवरायांचे नाव ऐकून त्यांनी ठरविले की छत्रपतींच्या दरबारातील पंडिताला शास्त्रार्थामध्ये जिंकून जयपत्र घ्यावे. शिवरायांनी गागाभट्टांना सदाशिवशास्त्रींची इच्छा सांगितली. गागाभट्टांनीही हुशारीने सर्व माहिती करून घेतली आणि सभा दुसऱ्या दिवशी घ्यायची ठरविली, पण त्या रात्री सदाशिवशास्त्री यांची भेट घेतली. गागाभट्टांनी शास्त्रींना असे सुचविले की,'' तुम्ही काशीस अध्ययन केलेले दिग्गज पंडित आहात आणि माझेही अध्ययन काशीसच झाले आहे, म्हणजे सभेत कुणीही जिंकले तरी नांव काशीक्षेत्राचेच येईल, त्यात विशेष काहीच नसेल. त्यापेक्षा छत्रपतींचे गुरू रामदासस्वामी असून त्यांचा मान खूप मोठा आहे. त्यांच्याकडून तुम्हाला जयपत्र मिळेल तर ते जास्त भूषणास्पद असेल. ''

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी दरबारात सदाशिवशास्त्रींनी छत्रपतींना म्हणाले की,'' आपले गुरू रामदासस्वामी यांच्याशी मला शास्त्रार्थ करायचा आहे. '' छत्रपतींनी त्यांना समजावले की ते स्वामी रानावनात, जंगलात वास करतात, शिवाय त्यांचा आणि आपला मार्ग वेगळा असल्याने तुम्ही शास्त्रार्थ गागाभट्टांशी करा. त्यावेळी गागाभट्टांनी मात्र सदाशिवशास्त्रींच्या म्हणण्याला अनुमोदन दिले. शास्त्रींच्या हट्टामुळे शिवराय त्या दोघांसह समर्थांकडे चाफळ येथे गेले. तेव्हा समर्थ रामघळीत होते. रामघळीकडे जाताना रस्त्यातच कल्याणस्वामी भेटले आणि त्यांच्याबरोबर शिवराय, गागाभट्ट, सदाशिवशास्त्री अणि राजांचा लवाजमा असे सगळे निघाले. समर्थ रस्त्यातच कडेला एका मोठ्या खडकावर बसले होते. कल्याणस्वामी आणि शिवरायांनी समर्थांना नमस्कार केला. समर्थांनी सदाशिवशास्त्रींना नमस्कार केला तर ते आढ्यतेने समर्थांना म्हणाले,'' वादविवादात आपली बरोबरी झाली तरंच नमस्कार म्हणू नाही तर आशीर्वाद म्हणू. '' त्यावर समर्थ म्हणतात,'' तुम्ही तर साक्षात भूदेव, आपण आम्हास आशीर्वाद म्हणणेच योग्य '' त्यावर

शास्त्री उत्तरतात,'' आम्हास वादभिक्षा हवी. शास्त्राचे सभेत आमचा जय झाला तर आम्ही जयपत्र घेऊ आणि आपण आम्हांस जिंकल्यास आम्ही आपल्याला नमस्कार करू, ही पेटती मशाल हाताने विझवू आणि या सुरीने जीभ कापून टाकू. '' त्यामुळे एक तर वाद घाला नाही तर जयपत्र द्या. '' शास्त्रींचा ताठा काही केल्या कमी होत नव्हता. ते तर आग्रहासच पेटले होते. ते ऐकत नाही म्हणल्यावर समर्थांनी कल्याणस्वामींना तिकडून जाणाऱ्या एका भैरू नावाच्या मोळीविक्याला बोलवायला सांगितले. भैरूच्या समोर समर्थांनी एक रेघ ओढली आणि त्याला ओलांडायला सांगितले. असे तीन वेळा केले आणि समर्थ त्याला तू कोण आहे असे विचारत. त्याने एकदा 'वैश्य', दुसऱ्यांदा 'क्षत्रिय' आणि तिसऱ्यांदा 'ब्राह्मण' आहे असे सांगितले. त्यावर समर्थांनी सदाशिवशास्त्रींना शास्त्रीय वादाचा पूर्वपक्ष करायला सांगितले त्यात भैरूने शास्त्रींना तीन वेळा हरवले. मग समर्थांनी सदाशिवशास्त्रींना वाद घालायला सांगितला. या अद्‌भूत प्रसंगाने शास्त्री पुरते गोंधळून गेले आणि त्यांच्या मनात विचार आला, मी जयपत्र घ्यायला आलो गागाभट्टांकडे, त्यांनी ते समर्थांवर सोपवले आणि समर्थांच्यापुढेच एका अंत्यजाकडून हरायची वेळ आली. त्यांचा मेंदू लख्ख झाला आणि एका थोर साधूपुरूषाचा आपल्या हातून घोर अपमान झाला, याची जाणीव होऊन त्यानी समर्थांच्या पायावर लोळण घेतली आणि प्रतिज्ञेप्रमाणे स्वतःच्या हाताने मशाल विझवली, जानव्यास बांधलेली सुरी काढून जीभ कापणार तेवढ्यात समर्थांनी कल्याणस्वामींकरवी शास्त्रींना या कृत्यापासून अडवले. कल्याणास्वामींनी त्यांचा हात धरल्यावर शास्त्रींचे अकल्याण थोडीच होणार होते? मग समर्थांनी शास्त्रींची समजूत घातली. श्री. प्रमोद संत या संदर्भात लिहितात,'' समर्थ म्हणाले, शास्त्रीबुवा पंडित खूप आहेत पण कुणालाही देशाची चिंता नाही. आपल्या विद्वत्तेच्या अहंकारात ते चूर आहेत. धर्मस्थापनेच्या या कार्यात आपल्या सारख्यांनी योगदान द्यावे व धर्मस्थापना झाल्यावर मग शांतपणे शास्त्रार्थ करीत बसावा. आज राष्ट्राला आपली गरज आहे. ''[२६०]

समर्थांनी हेरले की त्यांच्या विद्वत्तेचा उपयोग आपल्या संप्रदायाच्या आणि सामाजिक कार्यात होईल. म्हणून समर्थांनी शास्त्रींना क्षमा केली. एवढा मोठा प्रसंग घडून सुध्दा समर्थांनी आपल्याला क्षमा केली हे जाणल्यावर सदाशिवशास्त्री गहिवरले आणि त्यांनीच समर्थांना आपल्याला शिष्य करून घेऊन नवीन नांव द्यावे आणि संप्रदायात सामावून घ्यावे अशी नम्रतेने विनंती केली.

या दोन्ही प्रसंगांनी सर्व जण अवाक् झाले. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,'' याच प्रसंगी सदाशिवशास्त्री शरण येऊन समर्थांचा अनुग्रह घेते झाले. त्यांचे नाव समर्थांनी वासुदेव गोसावी असे ठेवून त्यांना शिरवळ जवळ मौजे कण्हेरी येथे राहण्यास सांगितले. समर्थांनी 'राजेश्री हस्ते म्हणजे शिवरायांच्या हस्ते कण्हेरीत मठ करून देवविला.'असे भक्तमंजरीमालेत म्हणले आहे. ''[२६१]

वासुदेव गोसावी प्रौढ वयात समर्थांचे शिष्य झाले. त्यानंतर मात्र त्यांनी समर्थकृपेने आणि स्वतःच्या प्रयत्नांनी वैराग्य आणि भक्ती इतकी साधली की त्यांची गुरूनिष्ठा पूर्णपणे बहरली आणि प्रतिसमर्थ म्हणून त्यांना कीर्ती मिळाली. मुख्य म्हणजे प्रत्यक्ष शिवराय त्यांना समर्थांच्या ठिकाणी मानत होते. शिवराय कित्येक वेळा समर्थांच्या भेटीसाठी तळमळत पण दर वेळेस समर्थांची भेट होणे शक्य नसे, तेव्हा शिवराय वासुदेवशास्त्रींचे दर्शन घेत आणि खरंचच केवळ त्यांच्या दर्शनाने, त्यांच्याशी बोलण्याने शिवरायांची तगमग थांबत असे, एवढा अधिकार वासुदेव गोसावींनी प्राप्त करून घेतला. एक सदाशिवशास्त्री येवलेकर, काशीस अध्यापन केलेला अतिशय गर्विष्ठ असलेला, विद्वान ब्राह्मण 'प्रतिसमर्थ' म्हणून मान्यता पावला. गिरीधरस्वामी 'समर्थ प्रताप'मध्ये म्हणतात,'' शिवराज वासुदेवमहंतासी पाही। अतिदर्शनलालसांसी श्रेष्ठासी वियोग नाहीं। येऱ्हविं कोण्हासी ही समर्थ वियोग न सोसवे कांहीं। ध्यानीं मनीं चिंतनीं सर्वदा।। ''[२६२]

वासुदेव गोसावी आणि समर्थांचा एकमेकांबरोबरचा सहवास चांगल्यापैकी होता. जरी समर्थांनी वासुदेव गोसावींना मठ स्थापून देऊन मठाधिपती केले तरी समर्थांचे त्यांच्याकडे लक्ष असायचे. काही प्रसंग असे सांगतात की वासुदेव गोसावींचे पांडित्य जेव्हा जेव्हा त्यांना आपल्या मार्गावरून थोडे घसरायला लावी तेव्हा तेव्हा समर्थांनी वासुदेव गोसावींना त्यांची चूक दर्शवून दिली आणि योग्य तो मार्गही दाखवून दिला.

एकदा वासुदेव गोसावींनी जपपद्धतीतच बदल केला व वेगेळ्या प्रकारच्या जपपध्दतीचे पुस्तक तयार केले आणि समर्थांना अगदी नमस्कारपूर्वक अर्पण केले तेव्हा समर्थांनी 'योग्य केलेस' असे म्हणून पुस्तक परत केले आणि तेथून उठून गेले त्याचवेळी वासुदेव गोसावींची वाणी बंद पडली. आपल्या हातून काही तरी चूक झाली असे त्यांच्या लक्षात आल्यावर समर्थ म्हणतात, '' श्रींच्या आज्ञेप्रमाणे याला मंत्र मिळूनही त्याने गुरूवचनावर अविश्वास दाखविला

आणि जातीचाच पंडित असल्यामुळे ग्रंथाद्वारे स्वतःची नवीन जपपध्दती निर्माण केली. आपले पांडित्य अभिमानाने मिरविले. त्यामुळे श्रींनीच त्याला शासन केले आहे. '' परंतु स्वतः आक्का, इतर शिष्यमंडळींच्या विनंतीमुळे समर्थांनी वासुदेव गोसावींवर कृपा केली आणि गोसावींची वाचा परत आली. या प्रसंगामुळे वासुदेव गोसावींनी गुरूसामर्थ्य काय आहे हे जाणले.

भाषाभिमानाच्या एका प्रसंगी समर्थांनी सातव्या समासाचे उदाहरण वासुदेव गोसावींना दिले, मात्र सातवा समास किती वेळा वाचला तरी त्यांच्या मनात शंका रहातच होती की चतुर्दश–ब्रह्म–निरूपणाला ग्रंथाधार कशाचा आहे. पण समर्थांना विचारण्याचे धाडस काही वासुदेव गोसावींना होईना, म्हणून युक्तीने त्यांनी समर्थांना विनंती केली की, समर्थांनी पारायणाच्या वेळेस स्वतः त्याचा अर्थ सांगावा. चतुर्दश ब्रह्माचे निरूपण ऐकूनही गोसावी समाधान पावले नाहीत, पण सारख्याच शंका काढण्याच्या खोडीने समर्थ चिडले आणि महारूद्र रूप घेऊन जमिनीवर शेपूट आपटले आणि भुभुकार करून शंका निरसन झाले का? असे गोसावींना विचारले तेव्हा तिन्ही वेळा गोसावी 'होय' म्हणतात, परत पहिले रूप धारण केल्यावर 'नाही' म्हणतात. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,''महाराज' वासुदेव म्हणाले,'' त्या महारूद्रासमोर कोण बोलणार? ''[२६३] तेव्हा समर्थांनी पंडितास बृहदारण्यकोपनिषद पाहण्यास सांगून त्यांचे समाधान केले.

समर्थांनी वेळोवेळी जसे वासुदेव गोसावींचे कौतुक केले आहे तेवढीच समजही दिली आहे. समर्थांना गोसावींच्या पांडित्याचा गर्वही घालवायचा होता आणि त्यांच्या पुढच्या कार्यात त्याचा अडथळा न येता ते व्यवस्थित करता यावे याचाही प्रयत्न होता. त्यामुळे समर्थ नेहमीच त्यांची परिक्षा घेत असत. अर्थातच समर्थ कुणालाच तावून सुलाखून घेतल्याशिवाय त्याला योग्य पैलू पाडल्या शिवाय मठाची आणि महंताची जबाबदारी देत नसत.

असेच एकदा समर्थ शिष्यमंडळींना बरोबर घेऊन चर्चा करीत बसले होते आणि त्यांनी प्रश्न केला की, ''माया सत्य आहे की मिथ्या?'' तर वासुदेव गोसावींनी लगेच हेच उत्तर दिले की 'माया मिथ्या आहे.' समर्थांनी तीनदा विचारूनही वासुदेव गोसावी हेच उत्तर देत होते. पुढे एकदा एक गारूडी सापाचे खेळ दाखवित होता. एका वादीचा त्याने सर्प करून दाखविला आणि वासुदेव गोसावींना विचारले,'साप खोटा की खरा?' त्यांनी खोटा म्हणल्यावर समर्थ त्यांना

हातात धरायला सांगतात. वासुदेव गोसावी साप हातात घेतात पण तो साप त्यांच्या हाताला विळखा घालतो. मग समर्थांच्या आज्ञेने गारूडी सापाची परत वादी करतो आणि वासुदेव गोसावी सुटतात. यानंतरही समर्थ वासुदेव गोसावींना विचारतात, 'साप खोटा की खरा?' यावर ते उत्तरतात,'' वादीचा साप खोटा.' यावर बरीच उलटसुलट प्रश्नोत्तरे झाली. अशा प्रकारे समर्थांनी अनेक प्रसंगातून, चर्चांमधून वासुदेव गोसावींना तत्वज्ञान शिकविले आणि वासुदेव गोसावींनीही समर्थांनी दिलेले ज्ञान ग्रहण केले.

शिवराय एकदा पन्हाळा गडावर होते. तेव्हा वासुदेवस्वामी काही कामानिमित्त त्यांना भेटायला गेले होते. दोघेजण बराच वेळ बोलत होते. अनेक चर्चा त्यांच्यात झाल्या. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' त्यावेळी शिवरायांनी भले भगवद्भक्त देखिले'' असे उद्‌गार त्यांच्या संदर्भात काढले होते. ''[२६४] यावरून स्वतः छत्रपतींना त्यांच्यात समर्थ दिसतात म्हणजे वासुदेव गोसावींची केवढी मोठी योग्यता होती याची आपल्याला जाणीव होते.

## वासुदेव गोसावींचे कार्य

कण्हेरी येथील मठात मठाधिपती म्हणून नेमणूक झाल्यानंतर वासुदेव गोसावींनी उत्तम रीतीने मठ सांभाळला. अफझलखानाच्या वाईतील स्वारीच्या वेळी वासुदेव गोसावींनी शिवरायांना अनेक प्रकारे मदत केली आहे. मुख्य म्हणजे अनेक गुप्त खबरा त्यांनी मिळविल्या होत्या. खर तर अफझलखान विजापूरहून निघाला आहे ही खबर प्रथम वासुदेव गोसावींना मिळाली होती आणि ती खबर त्यांनी अतिशय गुप्ततेने समर्थांपर्यंत पोहोचविली.

वासुदेव गोसावींनी आपला शिष्यसंप्रदाय मोठ्या प्रमाणावर वाढविला. त्यांच्या हाताखाली अनेक शिष्य तयार झाले. श्री. प्रमोद संत या संदर्भात लिहितात,''वासुदेव गोसावींनी हजारो शिष्य निर्माण केले असे भीमस्वामी म्हणतात,'' वासुदेवबाबा पंडित निस्पृह। तेणे शिष्य पाहे बहु केले। हजारो हजार शिष्यही जाहले। मंत्रा पालटिले बुध्दीबळे।। ''[२६५]

वासुदेव गोसावींनी संप्रदायासाठी खूप कार्य केले आहे. त्यांच्या विद्येचा, बुध्दीच्या जोरावर गोसावींचा कण्हेरी मठ मोठी मान्यता पावला. समर्थांनी ज्या विश्वासाने सदाशिवशास्त्रींसारख्या गर्विष्ठ, अहंकारी विद्वानाला आपल्या संप्रदायात सामावून घेतले,

त्याच्यावर मठाची, एका सामाजिक कार्याची, वाईसारख्या संवेदनशील प्रांतात मोठ्या सावधानतेने, दक्षतेने स्वराज्याच्या कामात हातभार लावण्यासाठी जी जबाबदारी टाकली त्या विश्वासाला सदाशिवशास्त्री येवलेकर अर्थात वासुदेव गोसावी पात्र ठरले. शास्त्रार्थाच्या प्रसंगी समर्थांनी जेव्हा मोळीविक्याला बोलावण्याआधी कल्याणस्वामींकडे पाहिले तेव्हा कल्याणस्वामींनाही समजला त्यांच्या दृष्टीचा अर्थ. कल्याणस्वामींना त्याचे सांकेतिक भाषेत त्याचे उत्तर दिले. समर्थ चरित्रामृतात लिहिले आहे की,'' कल्याण म्हणाले पात्र योग्य आहे पण गाठी झाल्या आहेत. तेवढ्या दूर करणे जरूरीचे आहे. ''[२६६] खरंच, समर्थांनी या सर्व गाठी अगदी सहजपणे सोडविल्या आणि एक अस्सल कार्यकर्ता तयार केला भविष्यात या कार्यकर्त्यानेही भरभरून तेवढेच कार्य संपादले. जसे शिवरायांना वासुदेव गोसावींना पाहिल्यावर त्यांच्यात समर्थच दिसायचे, तसंच लोकांनाही वाटे. त्यांनाही वासुदेव गोसावींमधे समर्थांची छबी दिसे त्यामुळे पुढे वासुदेव गोसावींना खूप मान मिळाला.

## वासुदेव गोसावींची वाङ्मयसंपदा

वासुदेव गोसावींनी काही ग्रंथरचना केल्या होत्या. जो ग्रंथ समर्थांनी नाकारला ते एका प्रसंगात लिहिले आहेच. तो ग्रंथ रामाच्या उपासनेविषयी होता आणि ''रामार्चन चंद्रिका'' या संस्कृत ग्रंथावर आधारीत होता. समर्थांनी वासुदेव गोसावींना इतर समाजासाठी, धर्माची तत्त्वे यावर सुगम काव्य करायला सांगितले होते. परंतु त्यांचे कोणतेच ग्रंथ उपलब्ध होऊ शकले नाहीत. वासुदेव गोसावी खरं तर अत्यंत बुध्दीमान, विद्वान म्हणजे त्यांनी वाङ्मय लेखनही भरपूर केले असणार. परंतु सन १७६२–६३ च्या सुमारास गमाजी यमाजी या मुतालिकाने कण्हेरीचा मठ लुटला, जाळपोळ केली. मठाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले तेव्हा सर्व हस्तलिखित त्यात नष्ट झाली.

शिवरायांनी वासुदेव गोसावींच्या कण्हेरी मठास दोन वेळा सनद दिली आहे. काही जमिनी इनाम दिल्या आहेत नंतर संभाजी राजांनी सुध्दा मठाला सनद, जमिनी दिल्या आहेत. असे हे समर्थांचे महंत वासुदेव गोसावी कण्हेरी येथे समाधीस्त झाले. आजही त्यांच्या समधीमंदीरात एक शिलालेख मिळतो. वासुदेव गोसावींनीही त्रयोदशाक्षरी मंत्र जपला. याची साक्ष म्हणजे एका चिऱ्यावर श्रीरामांचा हा मंत्र कोरलेला दिसतो.

## मठाची सद्यस्थिती

मठाचे आत्ताचे मठाधिपती श्री. जयराम नारायण इनामदार रामदासी आहेत. त्यांचे वयोमान झाल्याकारणाने त्यांच्या बरोबरीने त्यांचे पुतणे उल्हास गोसावी इनामदार रामदास हेही कार्य बघतात. या सर्व इनामदार रामदासींनी मठाचा जीर्णोध्दार करून त्याचा कायापालट केला आहे. रामनवमी, हनुमानजयांती हे उत्सव येथे साजरे होतात, त्याचप्रमाणे नित्योपासना येथे चालू असते.

या मठाचे अजून एक विशेष म्हणजे सज्जनगडावर दरवर्षी जो दहा दिवसांचा दासनवमीचा उत्सव होतो त्यावेळी सकाळी आणि संध्याकाळी समर्थांची पालखी निघते तेव्हा देवघरातून समर्थांची जी मूर्ती पालखीत ठेवली जाते, ती मूर्ती ठेवण्याचा मान या कण्हेरी मठाचा आहे.

भविष्यकाळात मठाचे कार्य अजून वाढविण्याचा त्यांचा मानस आहे.

## ४.६.१२ देवदास महाराज – दादेगांव मठ

अहमदनगर जिल्ह्यातील दादेगाव येथील मठाचे ते मठापती होते. दादेगाव हे नगरपासून ४०–४५ कि.मी. अंतरावर आहे.

समर्थप्रतापकार' गिरीधरस्वामी या संदर्भात लिहितात,'' देविदासनामा येकासनी। नगरप्रांत रामउपासनी।मूर्तिस्थापना करूनि जनीं। वैभवभजनीं परमार्थे।। ''[२६७]

गिरीधरस्वामींनी समर्थप्रतापामध्ये देवदास महाराज यांचा उल्लेख केला आहे. श्री. प्रमोद संत यांनी 'बीड जिल्ह्यातील समर्थ संप्रदाय' यात मठपरंपरा अशी दिली आहे.

''समर्थ→ देवदास → कृष्णाजी →जनार्दन→ दाजी → आत्माराम →नारायण→रंगनाथ ''[२६८]

एकदा अहमदनगर प्रांतात समर्थ संचार करीत असताना त्यांना देवदास भेटले. देवदास अत्यंत तेजस्वी असे होते आणि एक उत्तम कवी होते. समर्थांना त्यांच्यात निष्ठा दिसली. तसेच सामाजिक कार्याची तळमळही त्यांच्यात पहावयास मिळाली. निजामशाहीच्या या मुलूखात हा शिष्य फार चांगले काम करू शकेल याची समर्थांना खात्री पटली. त्यामुळे समर्थांनी देवदासांना शिष्य करून घेतले. समर्थांनी स्वतः श्रीरामचंद्राच्या मूर्ती मंदिरात स्थापित केल्या आणि

गोमयाचा मारूती स्थापन केला. त्यानंतर हे मंदिर म्हणजेच हा मठ देवदास यांच्या ताब्यात दिला.

## देवदास महाराजांचे कार्य

त्या काळात अहमदनगर प्रांतात निजामशाहीचा अंमल होता. मोठ्या प्रमाणात तिथे यवनांनी उच्छाद मांडला होता. बळजबरीने धर्मांतर करून घेण्याचा यवनांचा मोठा प्रयत्न चालू होता. देवदास महाराज यांना स्वधर्म आणि स्वदेश याचा प्रचंड अभिमान होता. त्यामुळे ते सरळ सरळ मुसलमानांना भिडायचे, त्यांच्याशी परखडपणे बोलायचे, अगदी संभाजीमहाराज आणि राजाराममहाराजांच्या कारकिर्दीतसुध्दा ते कणखर राहिले होते. स्वाभिमानी असलेले देवदास महाराज महाभयंकर अशा यवनांना खडे सवाल करण्यासही मागे पुढे पहात नसत. यामुळे निजामशाही सत्तेवर, ह्या यवनांवर देवदासांची चांगली जरब बसली होती. श्री. र. रा. गोसावी या संदर्भात लिहितात,'' निजामशाहीची सत्ता डळमळीत करण्यात देवदासांचे बरेच प्रयत्न कारणीभूत झाले असावेत असे समर्थ भक्त देव म्हणतात. ''[२६९]

## देवदास महाराजांची वाङ्मय परंपरा

देवदासांचे महाराजांचे वाङ्मय खूप आहे. ते उत्तम कवी असल्या कारणाने त्यांची काव्य निर्मिती मोठी आहे. समर्थ जसे आपल्या प्रत्येक कार्याचे श्रेय रामरायाला देत असत तसेच देवदास महाराजांच्याही बाबतीत होते. ते म्हणत, 'रामराया असताना आपण का चिंता करायची? तोच आपली चिंता वाहील.' त्यांच्या रचना प्रासादिक आहेत. देवदासमहाराजांची काव्य अगदी समर्थांच्या काव्यांएवढी जवळची वाटतात. त्यांची भाषा अगदी सरळ, सोपी, सुबोध आणि तेवढीच गोड, प्रेमळ आहे. सत्कार्योत्तेजक सभा येथील बाडांकात त्यांची काही अष्टके उपलब्ध झाली आहेत. ती 'रामदास आणि रामदासी' यात दिली आहेत. त्यातील काही ओव्या खालीलप्रमाण,

'' क्षयो दुर्जनाचा करी कोण आतां। शिरी रामराणा असे काय चिंता। असे निश्चय या मनाच्या स्वभावे। रघुनायका तें कळे तें करावे।१।। पदी गुंतली वासना हे सुटेना। मनी प्रीत हे लागली ते तुटेना। म्हणे देवदासु उपेक्षा नसावी। रघुनायका सर्व चिंता असावी।।५। ''[२७०]।

या काव्यात समर्थांची छाप दिसतेच. त्यांच्या प्रमाणेच देवदासांनाही वाटते दुर्जनांचा नाश आता होणारच. रामरायांला त्याची चिंता आहे. शिवाय ते म्हणतात, रघुनायका मी तुझा दास आहे. आता हा देह तुझ्या हातात आहे. आता या देहाचे काही होवो, एकदा मी या रामरायाचे चरण धरले आहेत. ते कदापि सोडणार नाही, माझा हा देह झडेल पण मी रामरायाला धरून ठेवेन. माझी सर्व इच्छा या रघुनायकाच्या चरणात आहे, या रामरायाची मला फार गोडी लागली आहे, त्याच्यावर माझे प्रेम जडले आहे. त्या देवदासाची उपेक्षा रामा तू करू नकोस, सर्व चिंता तुलाच आहे.

या एका अष्टकातच लक्षात येते की त्यांचे काव्य किती गोड, मधुर आहे. त्यांनी रामरायाला सर्वस्वच वाहिले आहे. त्याच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे.

त्यांची रचना अगदी मनाच्या श्लोकांसारखीच आहे. ही रचना असलेली परिस्थिती दुःखी झालेल्या मनाची आहे. संकटाची छाया जीवनावर आहे. अशा परिस्थितीत राघवाची करूणा भाकली आहे. सुरवातीची ओळच फार गोड आहे, त्यांनी 'प्रीत छाया' हा सुंदर शब्द वापरला आहे. समर्थांच्या करूणाष्टकांसारखी म्हणण्यापेक्षा हे एक करूणाष्टकच आहे. ते फक्त रघुनायकाला शरण जातात. रघुनायकावर त्यांची नितांत श्रध्दा आणि विश्वास आहे. 'सत्कार्योत्तेजक सभेच्या' काडंकातील हे दुसरे अष्टक,'' भवे तापलो प्रीतछाया करावी। कृपाळूपणे सर्व चिंता हरावी। मज संकटी सोडवावे समर्था। रघुनायका मागणे हेंचि आता।।१।। ''[२७१]

देवदास महाराज या अष्टकात किती प्रामाणिकपणे, अंतःकरणपूर्वक रघुनाथाला प्रार्थना करतात. स्वतःला ते रघुनायकाचा दास म्हणवून घेतात. 'सत्कार्योत्तेजक सभेच्या' काणड्कातील हे तिसरे अष्टक,'' बहुलोक हो रे तुम्हा कां विकारी। नसे ज्ञान काही तुम्हां का भिकारी। तुम्हांला कळेना कसे काय कीजे। देह कारणी का न लावा चि वोजें।।१।। स्वयें हे प्रचीती असे देवदास। म्हणोनी करा राघवाची च आशा। मनुष्यास तें मानणे काय आतां। रघुनायकाला असे सर्व चिंता।।६।। ''[२७२]

देवदास महाराज जनांना उद्देशून म्हणतात,'' ज्ञान जो प्राप्त करून घेत नाही तो खरंच दीन आहे. तुम्हाला कां कळत नाही काय करावे, हा देह कारणी लागला पाहिजे. सुख कुठ दिसत नाही आणि दुःख काही सोसवत नाही. अशा दुःखात काय सुचणार? लोकांचा हेवा न करता

रघुनायकाचे सदा स्मरण करावे. रघुनायकाला आपल्या भक्तांचे, दीनांचे दुःख पहावत नाही. तो त्यांच्या सुखाकडे नक्की लक्ष देतो. मला स्वतःला राघवाच्या अशा कृपेची प्रचिती आहे. त्यामुळे राघवाचे स्मरण करावे, त्या रामरायाला सर्वांची चिंता आहे.

अतिशय साध्या, सोप्या पण रसाळ भाषेत भाकलेली देवदासमहाराजांची ही करूणा विलक्षण आहे. ही करूणा नक्कीच मनाला भिडते. 'सत्कार्योत्तेजक सभेच्या' काण्डातील हे चौथे अष्टक,'' रघुनायकावीण हा प्राण फुटे। अकस्मात तो आठवे कंठ दाटे। तयावीण आणीक कोठें क्रमेना। अखंडीत हा ध्यास माझा तुटेना।।१।। मनामाजि हव्यास त्या राघवाचा। नसे स्वस्थ हे वीट वाटे जनाचा। म्हणे देवदासु लळा पाळि देवा। असेना तयीं आठऊ हा असावा।।५।। ''[२७३]

किती रसाळ, प्रेमाचा ओलावा असलेली ही अष्टके अगदी अंतःकरणात भिडतात. त्यात विलक्षण आर्तता आहे. देवदास महाराजांच्या अखंड श्वासात केवळ रघुनायक आहेत. त्यांना या रघुनायकाविना सर्व फिके वाटे. त्याच्या शिवाय हे जीवनाची वाट चालणेही अवघड वाटे. पुढे देवदास महाराज म्हणतात, मनात जे जे योजले जाते, ते तसे घडतेच असे नाही, रामरायाची कृपा असल्याशिवाय खरे सुख थोडीच मिळणार आहे. या अष्टकात ते स्वतःला देवदासु म्हणत असून त्यांना जगाचा वीट येतो असे वाटते. फक्त राघवाचाच ध्यास आणि हव्यास. फक्त त्याचाच लळा. हे अष्टक वाचले की आपण संभ्रमातच पडतो, की हे काव्य समर्थांचे आहे का? इतके हे गुरूशिष्य एकत्र आहेत, अगदी समर्थांचाच बाणा त्यांच्याही काव्यात जाणवतो.

देवदासांचा अभंग भावपूर्ण आहे. असे वाटते की समर्थांची त्यांच्यावर कृपा झाली आणि जीवनाला कशी कलाटणी मिळाली त्याबद्दल देवदास सांगतात. समर्थांसारखा सद्‌गुरू भेटला, त्रिविध ताप अगदी धुळीला मिळाले, रामानामाचे रसायन गवसले, त्या अद्‌भूत रसायनाने दुःखाचा विसर पडला. त्यांनी किती मनापासून ही रचना केली आहे. असे वाटते की त्यांच्या पहिल्या वर्तनाची त्यांनी प्रांजळपणे कबुली दिली आहे.

देवदास महाराजांनी मठ तर अतिशय उत्तमरित्या सांभाळलाच. शिष्यसंप्रदाय वाढविला आणि मोलाचे कार्य म्हणजे प्रत्यक्ष निजामशाही मुलुखात, तेथेच मठाचे कार्य संपादिले आणि निजामशाहीच्या जुलुमांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. देवदास महाराजांची समाधी तेथेच

आहे आणि मागे मारूतीचे मंदिर आहे. समाधी आणि मारूती दोन्हींवर तेल ओतण्याची पध्दत आहे. यावरूनच देवदास महाराजांचे महत्व कळते.

### ४.६.१३ आण्णाप्पा नीलंगेकर – अण्णाप्पा गोसावी उर्फ आनंदस्वामी, नीलंगे मठ

आनंदस्वामींचा मठ नीलंगे येथे आहे. नीलंगे हे लातूरजवळ आहे. नीलंगेच्या नीलकंठेश्वराच्या पुरातन देवालयाजवळ आहे.

'समर्थप्रतापकार' गिरीधरस्वामी लिहितात,'' आणपा नामें महंत। नाना उत्तम गुणे आलंकृत। शिष्यसमुदायें कित्तेक प्रांत। उध्दरिला कीर्ति।। ''[२७४]

गिरीधरस्वामीं 'समर्थप्रताप' मध्ये आणपा म्हणजे आण्णापा यांचा उल्लेख करतात. दुसऱ्या ओळीत गिरीधरस्वामींनी त्यांचे वर्णन उत्तम गुणांनी अलंकृत असे केले आहे. यावरून तर जाणीव होतेच की या गुणांमुळे आण्णाप्पांनी नक्कीच उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांची सगळीकडे कीर्ती पसरली म्हणजे त्यांचे मठकार्य, त्यांच्या शिष्यसमुदायाचे कार्य सर्वदूर पसरले त्यामुळे त्यांचे कार्य उत्कृष्ट आहे.

सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात ती नमूद केली आहे. काडंकातील आण्णाप्पांची मठ परंपरा अशी आहे.

''समर्थ → आण्णाप्पा → जयराम → रामाजी → हरि → मनोहर → कोनेर

''कोनेर

- बापूजी → बाबाजी → आण्णाजी
- बाळाजी → आप्पाजी → महारुद्र → आप्पाजी ''[२७५]
- आत्माराम → तात्याजी, हरी

## आण्णांप्पांचे चरित्र

आण्णांप्पा उर्फ आनंदस्वामी यांनी समर्थांनी सोपवलेली महंती यशस्वीरीत्या पार पाडली. बत्तीस शिराळ्याचे आण्णाप्पा यांचे गोत्र कौंडिल्य. वयाच्या अगदी तरूणपणी म्हणजे केवळ अठराव्या वर्षीच आण्णाप्पांचे मन घरात रमेनासे झाले, त्यांचे घरात लक्ष न लागण्याचे कारण म्हणजे त्यांना संसाराचे असारत्व जाणवले आणि समर्थांच्या ओढीने ते थेट समर्थांकडे धाव घेऊन त्यांना शरण गेले. समर्थांनी आण्णाप्पांना जवळ केले. समर्थांच्या सहवासात आण्णाप्पांना बराच काळ रहायला मिळाले. त्यामुळे संप्रदायाची बीजे त्यांच्यात रूजली आणि संप्रदायाच्या तत्वात, कार्यात ते पूर्ण मग्न झाले. खालील प्रसंगावरून एक लक्षात येईल की आण्णाप्पा खूप प्रामाणिक, निर्मळ मनाचे होते. खरं तर ज्या वयात संसार करायचा, गृहस्थाश्रमात रमायचे, त्या वयात ही दिशा शोधून ते आध्यात्माकडे, समर्थसंप्रदायाकडे वळले. एका राष्ट्रकार्याच्या स्फूर्तीने त्यांनी एक वेगळे पाऊल उचलले.

एकदा चाफळला समर्थ असताना वसंतोत्सव चालू होता. वसंतोत्सवाच्या शेवटच्या पर्वात स्वतः शिवराय आणि बाकी शिष्यमंडळी समर्थांचे म्हणजे सद्गुरूंचे पूजन करण्यासाठी चाफळला आली. सद्गुरूंच्या पूजेसाठी प्रत्येकाने आपापले पूजासाहित्य आणून पूजेची सिध्दता केली. समर्थांनी त्या सर्वांचा हेतू जाणला आणि सर्वांना आज्ञा केली की सर्वप्रथम श्रीरामाचे पूजन व्हावयास हवे. मग श्रेष्ठांची पूजा आणि शेवटी आमच्याकडे यावे. ही तर प्रत्यक्ष गुरूंची आज्ञा. पण आण्णाप्पांना याची काही कल्पनाच नव्हती. ते थेट समर्थांसमोर पूजा करण्यासाठी उभे ठाकले. अर्थात समर्थांना आण्णाप्पाना हे काही माहीत नाही याची जाणीव होती आणि त्यांच्या निष्ठेने, निरागसतेने समर्थ अगदी भारावून गेले होते. कोणतीही आडकाठी न करता समर्थांनी आण्णांप्पांनी केलेली विधीवत पूजा स्वीकारली. साष्टांग नमन करण्यासाठी आण्णाप्पा उठले पण समर्थांनी त्यांचा हात धरून पुन्हा आपल्या समोर बसविले आणि त्यांची पूजा करायला सुरूवात केली. यावरून सहज लक्षात येते ते म्हणजे समर्थांनी आपल्या शिष्याला दिलेला केवढा मोठा मान, एक अधिकार. समर्थांनी जेव्हा आण्णांप्पाच्या सर्वांगाला चंदनाची उटी लावली, मंगलाक्षता लावल्या आणि आपल्या गळ्यातला हार आण्णाप्पांच्या गळ्यात घातला तेव्हा तर आण्णाप्पा किती धन्य झाले असतील. समर्थांच्या समोर ठेवलेले फराळाचे पदार्थांचे स्वतः थोडे ग्रहण करून

बाकीचा प्रसाद आण्णाप्पांना दिल्यावर तर आण्णाप्पा फारच संकोचले. प्रत्यक्ष समर्थांच्या हस्ते पूजन होऊन प्रसाद मिळाल्याने त्यांने मन अगदी प्रसन्न झाले होते आणि त्याच क्षणी आपले जीवन कृतार्थ झाले याची जाणीव त्यांना झाली.

दुसऱ्या दिवशी पहाटे सर्वांनी प्रातःकर्मे सुरू झाली. पण आण्णाप्पा मात्र एका बाजूला बसून रडायला लागले. समर्थांनी त्यांच्या जवळ जाऊन रडण्याचे कारण विचारले अतिशय भरल्या अंतःकरणाने आण्णाप्पांनी समर्थांना नमस्कार केला आणि म्हणाले, मी किती पुण्यवान आहे. माझ्यासारख्या एका पामराला तुम्ही धन्य केले. तुमच्या स्वतःच्या करांनी तुम्ही पूजन केल्याने माझी गात्र न् गात्र पावन झाली आहेत. पुढे अतिशय निरागसतेने आण्णाप्पा म्हणतात, पण स्नान केल्यावर तुम्ही लावलेली उटी पाण्याने कायमची निघून जाईल याचे वाईट वाटते. समर्थांनी त्यावर आण्णाप्पांची फार छान रीतीने समजूत घातली. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' धुवोन जातां हें जळें पूजन। ऐसाचि आनंदु असेल पूर्ण। दाटेल सुवासु आंगीचा निघोन।पात्र कीर्तीचा होसील।। ''[२७६] समर्थांनी या शब्दात घातलेली आण्णाप्पांची समजूत म्हणजे प्रत्यक्ष वरदानच होते. समर्थ म्हणतात, ही उटी पाण्याने धुवून जाईल हे खरं, पण ती अंगाच्या बाहेर आहे, धुवून गेली तरी काही वाईट वाटण्याचे कारण नाही. उटीचा सुगंध गेला तरी तुझ्या कीर्तीचा सुगंध इथून पुढे पसरेल. समर्थांचा हा आशीर्वाद ऐकून आण्णाप्पांचे चित्त हर्षाने फुलले आणि आता पुढील कार्यास ते तत्पर झाले. दुसऱ्या दिवशी आण्णाप्पांचे जीवन बदलायला सुरूवात होणार होती. स्वतः समर्थांनी आण्णाप्पांनाा मेखला, छाटी, दासबोध, काठी, झोळी दिली आणि महंतीस निघण्याची आज्ञा दिली. याचप्रसंगी समर्थांना आणि आण्णाप्पांना खूप आनंद झाला. तेव्हा समर्थांनी आण्णाप्पांचे नाव 'आनंद' ठेवले. अशा रीतीने समर्थांच्या सानिध्यात राहिलेले 'आनंदस्वामी' उर्फ आनंदमूर्ति भ्रमंतीला महंतीचे कार्य करण्यासाठी चाफळहून निघाले ते समर्थांच्या आशीर्वादाने राष्ट्रोध्दाराला हातभार लावण्यासाठी. युवावस्थेत असताना आण्णांप्पांनी समर्थांच्या चरणी वाहून घेतले तर प्रपंच करण्याच्या वयात ते राष्ट्रकार्याठी तत्पर झाले.

अशा रीतीने तरूण वयात झालेले समर्थांचे शिष्य आणि पुढील काळात मठाधिपती झालेले आण्णाप्पा खरोखरीच वेगळे होते.

## आण्णाप्पांचे कार्य

समर्थांचा कृपाशिर्वाद घेऊन आनंदस्वामी देशांतराला निघाले. त्यांची कालक्रमणा पण अगदी साधी, प्रामाणिक, निस्पृहपणे केलेली होती. आनंदस्वामींच्या चरित्रातील त्यांचे जे श्लोक सापडले आहेत ते त्यांच्या कालक्रमणेविषयी आहेत. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,'' उपाधी नसे पाहतां ज्यास काहीं। विना राघवांवाचुनी काम नाहीं। बहूतापरीचे बहू ते विकारी। असंभाव्य ते तारिले देह धारी।।१।। ''[२७७]

आनंदस्वामींचे दैनंदिन जीवन अगदी समर्थांच्या दैनंदिन जीवनाप्रमाणेच होते. आनंदस्वामी कोणतीही उपाधी न लावता रघुरायाच्या चिंतनात वेळ घालवत. धीराने, उदारतेने, अत्यंत निस्पृहपणे ते वागत. मूळातच भक्ती, ज्ञान, वैराग्य त्यांच्यात भिनलेच होते. स्वभावतःच आनंदस्वामीमध्ये स्वधर्माचाराने वागण्याची वृत्ती होतीच. धर्मानुकूल कर्मे ते करीत त्यामुळे लोकांनाही अशाच प्रकारे सन्मार्ग दाखवित. केवळ देहासाठी भिक्षेचा आहार म्हणजेच आळणी पानग्यांचे ते सेवन करीत. असाच संचार करीत करीत ते देवगावला आले. तेथेच रानावनात अनेक दिवस वास्तव्य अणि हरिकथा नामस्मरण यात ते सतत मग्न असायचे.

आनंदस्वामींना मुळातच संसारात रस नव्हता. शिवाय समर्थांच्या प्रेरणेने, राष्ट्रोध्दाराच्या विचाराने ते विलक्षणरीत्या भारले होते. त्या विचाराने आणि समर्थांनी दिलेल्या उपदेशाला स्मरत 'आनंदस्वामी' हे स्वामींनी दिलेले नवीन नांव धारण करून ते भ्रमंतीस, महंती करण्यास निघाले. त्या काळात लोकांना सन्मार्गी लावण्याची गरच होती. आध्यात्माकडे त्यांना वळवायचे होते. त्याप्रमाणे लोकांना त्यांनी नामस्मरण, भक्तीची, उपासनेची गोडी लावली, त्यांना कुमार्गावरून सन्मार्गाकडे वळविले, ज्ञानाचे वैराग्याचे सामर्थ्य पटवून दिले. अर्थात बराच काळ ते सर्वदूर संचार करीत होते. काही काळाने ते समर्थांच्या आज्ञेवरून नीलंग्यास येऊन मठ स्थापून राहिले. समर्थांचा उपदेश लोकांना सांगून त्यांचा उद्धार करण्याचा प्रयत्न आनंदस्वामींनी सदैव केला. त्यांच्या या मठाखाली अकरा मठ झाले.

आनंदस्वामींचे तसे काही वाङ्मय उपलब्ध नाही. त्यांच्या मठात अनेक समर्थशिष्यांचे ग्रंथ मिळाले पण त्यांनी जी दासबोधाची प्रत तयार केली ती उपलब्ध झाली. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी'या ग्रंथात उल्लेख केला आहे.

'' भज भावे श्रीगुरूराया रे।।धृ।। कृपाअंजन घालूनि नयनीं। वारि भयानक माया रे।।१।। सस्वरूपी मन उन्मन जाले। निरसुनिया सविकाया रे।।२।। आनंदस्वामी परात्परदाता। केली कृपेचि छाया रे।।३।। ''[२७८]

आनंदस्वामींचे केवळ हे एकच पद उपलब्ध झाले आहे. आनंदस्वामींची समाधी नीलंगे गावाच्या बाहेर एका शेतात आहे. त्यांचा पुण्यतीथीचा दिवस होता मार्गशीर्ष वद्य तृतीया हे शेत मठाला इनाम म्हणून मिळाले. आनंदस्वामींच्या समाधीवर 'श्रीराम' लिहिलेले आहे.

नंतर मात्र काही काळानंतर गादीच्या, मठाच्या अधिकारावरुन, उत्पन्नावरून खूप वाद झाले. तेव्हा छत्रपती किंवा श्रीमंत यांनी त्यात मध्यस्थी केली.

### मठाची सद्यस्थिती

या मठाचे सध्याचे मठाधिपती श्री. सुधीर श्रीधरराव रामदासी हे आहेत. श्रीरामजन्मोत्सव व हनुमानजयंती असे उत्सव सध्या साजरे केले जातात.

### ४.६.१४ त्रिंबकराज – भालगांव मठ

भालगाव मठ हा मनमाड–हैद्राबाद मार्गावर करमाळा आणि चिखलठाण या गावाजवळ अतिशय रमणीय स्थळी स्थापला आहे. मठाभोवती कोटाच्या भिंती बांधल्या असून मठाची जागा अतिशय प्रशस्त आहे. 'समर्थ प्रतापकार' श्री. गिरीधरस्वामी लिहितात,'' त्रिंबक वासुदेव मौज फकिरी। उदंड बागबागायत करी। समाधि घेतसे पर्वतावरी। गोदावरीच्या उत्तरे।। ''[२७९]

त्रिंबकराज हे भालगाव मठाचे मठाधिपती. त्यांची शिष्य परंपरा अशी आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात खालीलप्रमाणे आहे.

''समर्थ→त्रिंबकराज → हरिहर →खंडेराव →रघुवीरस्वामीरस्वामी →विश्वासराव उर्फ रावसाहेब → रघुवीरस्वामी उर्फ नानासाहेब →रंगराव उर्फ आबासाहेब

↓

विश्वासराव    पंडितराव ''[२८०]

## त्रिबंकराजांचे कार्य

या प्रातांतील हा एक महत्त्वाचा मठ होता. त्या परिसरातील संप्रदायाच्या कार्यासाठी समर्थांनी हा मठ स्थापन केला. त्रिंबकराजांनी संप्रदायाचे कार्य यशस्वीरीत्या पार पाडले. मुख्य म्हणजे त्यांनी संप्रदायाचा विस्तार केला आणि शिष्यसंप्रदायही वाढविला.

त्रिंबकराज हे कवी होते. संप्रदायाच्या कार्याबरोबरच त्यांनी काव्यलेखनही केले. त्यांनी भालगांव मठात इतरही काही ग्रंथ आणि वाङ्मय त्यांनी संग्रही ठेवले होते.

त्रिबंकराजांच्या तीन कविता अगदी सुरेख आणि लयबध्द आहेत. अर्थात या कवित अतिशय अर्थपूर्णही आहेत ही एक त्यांची अलंकारबध्द कविता ' रामदास आणि रामदासी 'या ग्रंथात आहे.''सारासार पाहा विचार। पाहों जना सांपडे सार। न पाहतां होतें असार ।।धृ।। अलक्ष असावे। निगृण व्हावे। विवेक सांगती गगनासी जावें। अंतरिक्ष दक्षचि व्हावे।।१।। धूर्त तार्किक त्याला चि कळे। कळोनिया मग तो वळे। वळे वळे कळोनी वळे।।२।। तर शेवटच्या चरणात ते म्हणतात,'' दास त्रिंबक साक्षेपी अेक। ठाईं पाडिले अदृश्य देख। नित्य नित्य निर्भय निःशंक।।४।। ''[२८१]

अजून एक कवितेत ते म्हणतात, '' त्रिंबका अंतरी येक तोडिजे संसार दुःख। देईं देईं भजन सुख। हें चि हें मागतो देव।। ''[२८२]

त्रिंबकराजांचा एक शिष्य होता, विठा. त्यांना दासविठा म्हणत असत. त्यांनी त्रिंबकराजांवर एक पद लिहिले आहे. त्रिंबकराज कसे होते, त्यांचे गुण कसे होते, असे त्यांचे स्वरूप ह्या दासविठांनी इतके सुरेख शब्दात केले की त्यावरून त्रिंबकराजांची योग्यता कळते. पहिल्या ध्रुवपदातच त्रिंबकराजांचे स्वरूप आपल्या डोळ्यासमोर येते. हे पद 'रामदास आणि रामदासी ' यात आहे.'' त्रिंबकांचे रूप कैसे पाहें वो। चालत चमकत कैसे आहे वो।।धृ।। तर शेवटच्या चरणात त्रिंबकराजांचे व्यक्तीमत्त्व नजरेसमोर येते,'' चित्ररंत्नाकित अंगी मेखळा। केशर निडळी शोभे टिळा। कसोनी पीतांबर कटीं तटीं पिवळा। पुण्यपुरूष तो सृष्टीत विरूळा वाटे त्रिंबक पहावा।।५।। ''[२८३]

त्रिंबकराजांच्या जन्म–मृत्यू बद्दल जास्त माहिती मिळत नाही. परंतु त्यांचे निर्याण मार्गशीर्ष शुध्द अष्टमीला झाले. त्यांची समाधी, वृंदावन हे मठापासूनच अगदी जवळ एका डोंगरावर आहे.

**मठाची सद्यस्थिती**

भालगांव मठाचे सध्याचे मठाधिपती श्री.सुरेश सर्वोत्तमराव भालगांवकर (रामदासी) हे आहेत. श्रीरामनवमी, हनुमानजयंती, दासनवमी असे उत्सव येथे साजरे केले जातात. नाथगव्हाण आणि ढवळापुरी या दोन गावांच्या जहागिरीचे उत्पन्न मठाला मिळते.

### ४.६.१५ बालकराम उर्फ रामठेंगा – कारंजा मठ

बालकराम उर्फ रामठेंगा यांचा मठ वऱ्हाड प्रांतात कारंजा या गांवी आहे.

समर्थ त्यांच्या तीर्थाटनाच्या काळात कारंजा येथे गेले असताना त्यांनी हा मठ स्थापन केला असावा. माहूरच्या जवळ असलेले कारंजे आता सामान्य गाव आणि फक्त श्रीदत्तात्रेय अवतार श्रीनृसिंहसरस्वती यांचे जन्मस्थळ म्हणून महत्वाचे आहे. तेव्हा कारंजे गाव अतिशय संपत्तीवान शहर होते. त्याशिवाय व्यापारी शहर म्हणूनही त्याचा लौकिक होता. एक संपन्न, धन–दौलत मुबलक असलेल्या कारंजे येथे शिवरायांची कृपादृष्टी वळली होती.

'समर्थप्रतापकार' गिरीधरस्वामी लिहितात,'' बाळकरामा नामा छंद सवाई। श्रीगुरूप्रताप वर्णी कांही। उभय संतांने भक्तियुक्त पाही। श्रीरामसमर्थ संकीर्तनी।। ''[२८४]

या मठाची परंपरा खालीलप्रमाणे आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात दिली आहे.

''समर्थ → बालकराम → रोकडाराम → बापुस्वामी → सखाराम → लक्ष्मण → मारूती

मारूती ↓ : जेष्ठपुत्र, रामभाऊ, गणपती

जेष्ठपुत्र ↓ सखाराम ↓ सीताराम''[२८५]

**बालकराम यांचे चरित्र**

बालकराम यांचे उपनाम 'कळवे' होते. बालकराम म्हणजे यजुर्वेदी, माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण. बालकरामांचे पूर्वज जांब जवळील आष्टीचे, बालकरामांचे वडील केशोबाबा आणि आई गोदाई. सिंदखेड हे एक इतिहास प्रसिध्द गांव आहे. आष्टा सोडून तिथे स्थायिक झाले. सिंदखेडही आष्टी पण जवळच आहे. बालकरामांचे जन्मस्थळ म्हणजे सिंदखेडच. पुढच्या काळात उपद्रव झाल्याने ते पुसद या गावी पत्नी साळूबाईंसह रहायला गेले. पुसदला बालकरामांनी मठ बांधला आणि आपला शिष्यसमुदाय वाढविला. संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. तिथे पुस नदीच्या तीरावर रोकडा मारूती आहे. तिथे असताना त्यांना पुत्र झाला म्हणून त्याचे नाव रोकडाराम ठेवले. पुढे काही वर्षांनी बालकराम, रोकडाराम कुटुंबीय पुसद सोडून कायमचे कारंजा वऱ्हाड येथे रहायला आले. श्री. प्रमोद संत या संदर्भात लिहितात,'' कारंजा येथे डेंबाळपाटीवर मारूतीची स्थापना केली व गावात मठ स्थापिला. गुरूमंदिराच्या बाजूलाच हा मठ आहे. ''[२८६]

**बालकरामांची वाङ्मय संपदा**

बालकरामांनी केलेली वाङ्मयनिर्मिती बऱ्याच प्रमाणावर आहे आणि तेवढीच उत्कृष्टही आहे. आपल्या वाङ्मयात बालकरामांनी अनेक वाङ्मयप्रकार हाताळले आहेत. कथा, आख्यान, चरित्र, महात्म्य, आरत्या, अभंग, स्फुट श्लोक असे अनेक प्रकारचे वाङ्मय बालकरामांनी रचले आहे. त्यांचे हरिश्चंद्र आख्यान श्लोकबध्द आणि अधूनमधून पदे असलेले हरिश्चंद्रावरचे आख्यान हे ७२ श्लोकांचे आहे. तर 'पार्वती लक्ष्मी संवाद' संवादरूपी असलेले ७२ श्लोक आहेत. पार्वती आणि लक्ष्मी या एकमेकींची निंदा कशी करतात याचे वर्णन या संवादात आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात हे वर्णन दिले आहे. '' अशा निंदिती येकमेकीसी पाहे। नसे अंतरीं क्रोधकौतूक आहे। मनीं जाणती दोघ ही येक असे। म्हणे बाळरामी च हे वर्म भासे।। ''[२८७]

या दोन पहिल्या ओळीच किती सुंदर आहेत. क्रोध आणि कौतूक दोन्ही एकाच वेळी त्यांनी केले आहे. या दोघी एकच आहेत पण रूप वेगळी आहेत. तर पुढच्याही ओव्या अर्थपूर्ण आहेत.

'चंद्रहास्यकथा' ही ओवीबध्द असून त्यात गुरूला करूणाकरू म्हटले आहे. तरी ही कथा पूर्ण उपलब्ध नाही. शेवटच्या ओवीतून थोडीफार कल्पना येते की दुष्ट बुध्दीचे निवारण करणारा धर्मपरायण सज्ञन आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात याचा समावेश आहे. '' इति श्री चंद्रहास्यकथन। दुष्ट बुधीनिवारण। धर्म परायण सज्ञन। चंद्रहांस्य भूषण भल्यांचें।। ''[२८८] 'शंकरविवाह' हे ओवीबध्द आख्यान असून ८२ श्लोकांचे आहे. त्यातील शेवटच्या दोन ओव्या अशा आहेत. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात नमूद केल्या आहेत. '' बाळक रादासी शरण। जालें दोघांचे येकपण। सद्‌गुरूकृपेने लग्न। गेले लागोनि निश्चळी।।८१।। लोक म्हणती रामठेंग्यासी । वदणे नाही हरासी । म्हणोनी गुरू रामदासी ।। शिवकथेसी बोलविले ।।८२।। ''[२८९]

सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात इतर रचनांची नावे अशी दिली आहेत. बालकरामांनी गजगौरी, पार्वती स्वयंवर, द्रौपदी, सुदाम, वामन, रेणूका अशी ही काही लहान चरित्रे लिहिली आहेत.

'कथाकल्पकेदार' '' या प्रकरणाच्या शेवटच्या चार श्लोकांत बाळकरामांनी स्वतःचे थोडेसे वृत्त निवेदिले आहे. '' कथा पूर्ण जाली गुरूच्या कृपेने। गुरू रामदासास अर्पीत जाणे। असे दास हा सांप्रदाई जयाचा। रघूनाथ गातां कवी दोष कैचा।। असे जन्मला बाळ हा सिंदखेडी। उपद्रव आसते स्थळी राम सांडी। म्हणोनी पुशग्रामवासी च आहे। जना नावडे राम तो येक साहे।। विनंती असी बोलिजे बाळरामे। जनीं बोलती रामठेंगा चि नामें। यजुर्वेद हा मध्यशाखा जयाची। कवित्वी असे बुध्दी प्रागल्भ कैची।। असे धाकुटा कोवळी बुद्धि जाणा। अशी वीनती सज्ञनालागि माना।। वसे शुध ना बघ ना राम जाणे। सुखें राम घेणें मुखे राम देणें।। ''[२९०]

सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात 'एकादशी' प्रकरण दिलले आहे. यात ११२ श्लोक आहेत. यातही स्वतःचे आत्मवृत्त ते सांगतात. ''कृपा रामदासे करावी जयाला। भवाब्धी असे पायउतार त्याला। समीरासुतें राहणे त्याजपासी। खुणा जाणिजे वर्त येकादसीसी।। तयाचा असे सांप्रदाई लघुसा। अहो गौतमीतीर आस्टीस वासा।कुळी कळवियाच्या असे जन्म जाला। असे नाम (ब)ल्लाळ सवज्ञा तयाला।।१०८।। तया पुत्र जो (के) शऊ नाम

जाणा। वरे सूत त्या हो गणे. . . ।(त)यापासुनी बाळकुराम जाला। सदा(राम) त्या उदरा पुत्र आला।।१०९।। ''[२९१]

तुळजाभवानी कुलदैवत असलेले बालकराम कुऱ्हाडी गावी पण वास्तव्यास होते, त्रिपुरापुरीही राहिले. त्यांना त्र्यंबकलाही जायची इच्छा होती. पण त्यांचे पुत्र रोकडाराम यांनी कायमचा मुक्काम कारंज्यासच केला होता.

त्यांचे 'गोपीचंद आख्यान' एकूण सहा प्रसंगाचे असून त्यात मराठी व हिंदुस्थानी दोन्ही श्लोक आहेत. 'हनुमंत भेटी', 'अंगदाशिष्टाई' ही त्यांची पदे आहेत. बालकरामांच्या एकूण १५१ सवाया आहेत. त्यांच्या प्रत्येक सवाई मध्ये 'रामठेंगा गुरूग्यानसे मस्त हौ राम लेणा यही राम देणा।' असा शेवट आहे. बहुतेक सर्व काव्य त्यांनी रामठेंगा या टोपणनावाने लिहिले आहे.

'श्रीसद्गुरूपदेश' मध्ये समर्थांनी जो बालकरामांना उपदेश केला आहे तो त्यांनी ५४ श्लोकांमध्ये अतिशय सुंदररीत्या गुंफला आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात त्याचा समावेश आहे. '' गुरूनाथ हे सांगती शिष्यवर्गा। विचारें बरें सांडि रे उपस्वर्गा। गुरू बोलती बाळरामा विचारी। तुला बोधितो बुध्दी हे हीतकारी।। ''[२९२]

हा सद्गुरूउपदेश बालकरामांनी किती सुंदर लिहिला आहे. त्यांच्या प्रासादिक, आर्जवता असलेल्या भाषेत गोडवा पण आहे. त्यांच्या शब्दावरूनच समजते की बालकराम सद्गुरूकृपेने प्रत्यक्ष समर्थांनी त्यांना केलेल्या उपदेशाने किती कृतार्थ झाले आहेत.

बालकरामांची अनेक स्फुटपदे आहेत. समर्थकृपेने कृतार्थ झालेले बालकराम रामरायाला क्षणभर पण विसरत नाहीत. रामरायाचे गुणगान करण्याची त्यांच्या जीवाला, मनाला, गोडीच लागली होती. त्यांना वाटे की रामरायाविण हे जीवन व्यर्थ आहे. त्यामुळे त्यांच्या पदातून समर्थांचा महिम आणि प्रभूरामचंद्रांची भक्ती ओतप्रोत भरलेली आहे.

बालकरामांनी पण खूप आरत्या रचल्या आहेत. त्यातील दोन महत्वाच्या आरत्या म्हणजे एक समर्थांची आणि दुसरी ग्रंथराज दासबोधाची. सत्कार्योत्तेजक सभेच्या 'रामदास आणि रामदासी' या ग्रंथात हे वर्णन दिले आहे.

‘‘जयदेव जयदेव जय सद्‌गुरूराजा। आरत माझें पुरवी मुळिंच्या मूळबीजा।।धृ।। दासांप्रति बोधाया सगुण दिसतोसी। गुणतीता अगुणा सर्वातीत होसी। ’’

‘‘ जयदेव जयदेव जय दासबोधा। आरति आरत माझे जय सद्‌गुरूवरदा।।धृ।।
सद्‌गुरूवरदा आपदा नाशी भवबाधा। कर्म उपासन ज्ञान प्रबोध आनंदा। ’’[२९३]

या दोन्ही आरत्यांमध्ये बाळकरामांची शब्दरचना खूप आगळीवेगळी वाटते. ग्रंथराज दासबोधाच्या आरतीमधील शेवटची ओळ ‘बाळकरामी रूप हे दासबोधाचे’ ही रचना तर फारच सुंदर आहे. बाळकराम समर्थांना जेवढे महत्त्व देतात तेवढाच त्यांना ग्रंथराज दासबोध महत्त्वाचा वाटतो.

बालकरामांची पदे, आरत्या, स्फुट श्लोक जसे अर्थपूर्ण आणि उत्कृष्ट आहेत, तसेच त्यांचे अभंगही खूप वेगळ्या रचनेचे वाटतात. तरीही त्यांच्या भावनातील आर्तता रामरायामयच आहे. त्यातील काही अभंग असे आहेत. बालकरामांचे स्फूट श्लोक पण मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यातील समर्थांच्या निर्वाण काळचा एक श्लोक आहे. त्यात समर्थांच्या निर्वाणाची तिथी आणि वेळ दर्शविली आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या ‘रामदास आणि रामदासी’ या ग्रंथात तो श्लोक नमूद केला आहे. ‘‘ माघ वद्य नवमीस शुध्द दीस साधिला। प्रातःकाळ काळवेळ डंका राम वाजला। रामी रामदास भास वास रामी पावला। बाळराम घेणें देणें गुरूब्रह्मी आटला।।१।। ’’[२९४]

### ४.६.१६ रोकडाराम – कारंजा मठ

रोकडाराम म्हणजे बाळकराम यांचे पुत्र. बाळकराम पुसद हे गाव सोडून आले तेव्हा रोकडारामही त्यांच्याबरोबरच आले. कारंजाच्या या मठातच रोकडाराम यांची समाधी आहे.

‘बालकराम’ हे कारंजा येथे स्थायिक झाले. तरी त्या मानाने तिथे त्यांचे वास्तव्य कमी झाले. त्यांच्यापेक्षा जास्त काळ रोकडाराम हे तिथे वास्तव्यास राहिले होते. श्री. प्रमोद संत म्हणतात,‘‘ त्यामुळे रोकडारामांचा मठ म्हणूनच हा मठ ओळखला जातो. त्यांच्या कारकिर्दीतच कारंजाचा मठ बराच पुढे आला. ’’[२९५] रोकडाराम यांनी आपल्या उत्तम कार्याने आपल्या वडिलांचे नाव सार्थ केले. सर्वार्थाने त्यांनी मठाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

बाळकराम यांच्या चरित्रात आपण पाहिलेच आहे की पुसद या गावात ते रहात असताना पुसदमध्ये असलेल्या रोकडा मारूतीच्या प्रसादाने त्यांना मुलगा झाला. म्हणजेच रोकडारामांचा जन्म झाला. मारूतीरायांचा आशीर्वाद, म्हणजे रोकडारामांना समर्थांचा पण आशीर्वाद असणारच. त्यामुळे रोकडारामांनाही श्रीरामराया आणि मारूती यांच्या उपासनेची गोडी लागली. मठाच्या कार्यात त्यांचा खूप सहभाग व्हायला लागला. बाळकराम बराच काळ इतर ठिकाणी वास्तव्यास जात असत. त्यामुळे मठाची जबाबदारी रोकडारामांवर पडत असे. त्यावेळी मठाच्या उभारणीपासून ते त्याच्या विस्तारकार्यापर्यंतच्या काळात रोकडारामांनी खूप प्रयत्न करून त्यांनी कार्यसिध्दीही केली आहे.

रोकडारामांनी केलेले सांप्रदायिक कार्य खूप महत्वाचे आहे. आपले पिता बाळकरामांएवढेच ते पण कर्तृत्ववान होते. मठाचे सर्व कार्य त्यांनी केवळ भिक्षेच्या मिळकतीवर केले आहे. जसे समर्थांनी पण एका उत्सवाच्या कार्यसिध्दीसाठी भिक्षा गोळा करण्यासाठी मनाच्या श्लोकांची रचना केली आणि शिष्यांना ते श्लोक म्हणून भिक्षा मागायला पाठविले. अगदी तसेच रोकडाराम यांनी पण केले आहे. अगदी गोड शब्दात त्यांचे हे काव्य फारच सुंदर आहे. प्रमोद संत यांनी 'समर्थस्थापित दैवते' यात हे काव्य दिले आहे,

'' सिताराम लक्ष्मण भरत भाऊ। महाराज शत्रुघ्न हा देवराऊ। हनुमंत हा स्वामी देवाधिदेऊ। बरी भीक या देवळा काम लाऊ।।१।। बहु फिरतो पाहिली फार गाऊ(गावे)। बरे लोक मी पाहिले म्या सदेऊ(सदैव)। सदा सर्वदा रोकडा राम गाऊ। बरी भीक या देऊळा काम लाऊ। ''[२९६]

भिक्षा मागण्यासाठी केलेल्या या कवनात रोकडारामांनी श्रीरामचंद्राचे बंधू लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांनाही महत्व दिले आहे तर हनुमंताला त्यांनी स्वामी म्हणून संबोधले आहे. शिवाय ही भिक्षा या मठाच्या, मंदिराच्या कारणास्तव घेतली जात आहे याचेही स्पष्टीकरण ते देतात. यावरून रोकडारामांचे पारदर्शक मन ध्यानात येते. त्यावेळी रोकडाराम यांनीही खूप संचार केला आहे आणि भिक्षाकार्यासाठी झटले आहेत.

रोकडारामांची तशी काही फार वाङ्मय निर्मिती झाली नाही. त्यांनी समर्थांच्या स्तवनावर काही पदे लिहिली आहेत. समर्थांची आरती सुध्दा रचली आहे. रोकडारामांनी सुध्दा स्वहस्ते

दासबोधाची प्रत तयार केली होती. ती धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरामध्ये उपलब्ध आहे. त्याचीच एक प्रत कारंजे मठात आहे.

रोकडाराम कथा, कीर्तन करण्यात प्रवीण होते. त्यांचे कथा, कीर्तन खूप श्रवणीय असे. श्रोत्यांना खिळवून ठेवण्याची ताकद त्यांच्यात होती. अर्थातच समाजप्रबोधनाचे कार्य त्यांनी कीर्तनाद्वारे यशस्वी केले. त्यातील बहुतेक श्लोक रचना त्यांच्या स्वतःच्या असायच्या. यावरून रोकडारामांचे कीर्तनातील कार्य लक्षात येते.

मात्र रोकडाराम यांचा एक शिष्य माधव, यांनी रोकडारामांवर श्लोक,पदे रचली आहेत. या शिवाय कारंजा मठाचे उत्सव आणि रोकडाराम यांची स्वतःची रामनवमी उत्सव पध्दती अर्थात कशा प्रकारे उत्सव साजरा करीत असत याचे वर्णन केले आहे.

६ मे १७६६ ही रोकडारामांची पुण्यतिथी आहे.

### ४.६.१७ अनंतबुवा मेथवडेकर – मेथवडे मठ

अनंतबुवा कुलकर्णी मेथवडेकर म्हणजेच 'अनंतबुवा कुलकर्णी' हे मेथवडे येथील रहिवासी. ते मेथवडे गावातील कुलकर्णी होते. मेथवडे हे गांव पंढरपूर जवळ सांगोला तालुक्यात आहे.

'समर्थप्रतापकार' गिरीधरस्वामी लिहितात,'' अनंतनामा पंचक्रोशी पंढरी। श्रीगुरूचरणी निष्ठाबरी। उदंड समर्थपरमार्थ विस्तारी। उभय संतानें सृष्टीमध्ये।। ''[२९७]

### अनंतबुवांचे चरित्र

एकदा समर्थ पंढरपूरच्या यात्रेहून निघाले आणि परतीच्या प्रवासात मेथवडे या गांवी मुक्कामाला थांबले. आणि माण नदीच्या एका मोठ्या खडकावर लव्हाळ्याचा मांडव घालून तेथेच वास्तव्य करू लागले. तेव्हापासून मांडवा खडक म्हणून ती जागा प्रसिध्द आहे. अर्थातच भिक्षा मागण्यासाठी समर्थांचे शिष्य मेथवडे गांवात जायचे. असेच एक दिवस कल्याणस्वामी आणि इतर काही शिष्य भिक्षा मागताना त्यांना त्या गांवचे कुलकर्णी असलेले अनंतबुवा भेटले. समर्थांबद्दल त्यांना माहिती झाल्यावर अनंतबुवांना समर्थांचे दर्शन घ्यायची तीव्र इच्छा झाली, म्हणून ते सुध्दा

कल्याणस्वामींबरोबर निघाले. नदीच्या काठावर ते आले. खरं तर पुराच्या पाण्याने माण नदी दुधडीभरून वाहत होती आणि पाण्याला खूप ओढ होती. पण कल्याणस्वामी आणि इतर शिष्य पोहण्यात तरबेज असल्याने त्यांनी तर नदीत उड्या टाकून मांडव खडकाकडे जायला सुरूवात केली. त्याचबरोबर अनंतबुवासुध्दा केवळ समर्थ भेटीच्या ओढीने पुराच्या पाण्यात पोहून समर्थांपर्यंत पोहोचले. समर्थ अनंतबुवांच्या निष्ठेवर आणि त्यांच्या तीव्र इच्छेने एवढे धाडस करण्यावर अगदी प्रसन्न झाले. या संदर्भात श्री. अनंतदास रामदासी लिहितात,'' अनंतबुवांची निष्ठा पाहून समर्थांनी त्यांस अनुग्रह दिला. ''[२९८]

एकदा समर्थांना तिथे नदीत स्नान करीत असताना विठ्ठल–रखुमाईच्या मूर्ती मिळाल्या. अनंतबुवा पंढरपूरच्या सानिध्यात होतेच. शिवाय विठ्ठलभक्तही होतेच. त्यामुळे त्या मूर्ती समर्थांनी अनंतबुवांच्या स्वाधीन केल्या. समर्थांनी तिथे मठ स्थापन केला आणि अनंतबुवांना तेथील मठाधिपती केले. त्याच वेळी जवळच 'देवळे' या गावात समर्थांनी मारुतीचीही स्थापना केली. आणि तीही जबाबदारी अनंतबुवांवर सोपविली. जेव्हा समर्थांनी अनंतबुवांना ही जबाबदारी घ्यायला सांगितली तेव्हा अनंतबुवांनी अशी इच्छा प्रकट केली की मारूतीरायानेही त्यांना आदेश द्यावा. अर्थातच समर्थांच्या कृपेने अनंतबुवांची ही इच्छा पूर्ण झाली. त्यांना स्वतः मारूतीरायांनी दर्शन दिले. त्यानंतर अनंतबुवांनी या मंदिराची जबाबदारी स्विकारली. त्यांच्या पुढच्या पिढ्यांनीही ही परंपरा चालू ठेवली.

अनंतबुवा समर्थांच्या आदेशाप्रमाणे पंढरीची वारी नियमितपणे करत. रामनवमीला फक्त मेथवडे मठात गोपाळकाला होतो. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' समर्थांनी चाफळच्या रामनवमी उत्सवात गोपाळकाला कधी केला नाही. मात्र पंढरपुरला गोपाळकाल्याची पध्दत असल्यामुळे या मेथवड्याच्या मठात समर्थांनी गोपाळकाल्याची पध्दत सुरू केली. ''[२९९]

अनंतबुवांनी शिष्यसमुदाय केला किंवा वाढविली याची कुठेच नोंद नाही. परंतु त्या भागातील हा एक महत्वाचा मठ होता. आणि शेवटपर्यंत समर्थांवरील त्यांची निष्ठा अपूर्व होती. मठाची जबाबदारी त्यांनी व्यवस्थित पार पाडलीच, शिवाय परमार्थांची शिकवण लोकांना दिली. त्याचे महत्व समजातून सांगितले.

### ४.६.१८ रंगनाथ गोसावी – पाली मठ

दत्तात्रयस्वामींच्या शिरगांव मठाच्या अगदी जवळ हा पालीचा मठ आहे. समर्थप्रतापकार गिरीधरस्वामी लिहितात,'' रंगबोध रंगमूर्ति संकीर्तने। परम विलासी जनपद मानें। पुढे पुढे विरक्त अतिमानें। उभय संतानें गुणकिर्ती।। ''[३००]

### रंगनाथ गोसावींचे चरित्र

रंगनाथ गोसावी यांचे उपनाम अडसूळ, पवाराची निगडी येथे हा अडसूळ परिवार स्थायिक होता. रंगनाथ गोसावी हे मराठा जातीचे होते.

रंगनाथ गोसावी हे उत्तम गायक होते. कीर्तनकार होते. त्यांच्या सुंदर आवाजामुळे, गायनकलेमुळे त्यांच्या कीर्तनात विलक्षण रंगत भरलेली असे. यामुळे समर्थांची त्यांच्यावर खूप मर्जी होती. कीर्तनात प्रवीण असले तरी रंगनाथ गोसावींना फार व्यसने होती. त्यामुळे संप्रदायात त्यांना 'रंगोबा' म्हणूनच संबोधत. चाफळच्या एका रामनवमी उत्सवात त्यांचे कीर्तन ठेवले होते. स्वतः समर्थ समोर कीर्तन ऐकायला बसले होते. त्या दिवशीचे रंगनाथ गोसावींचे कीर्तन इतके अप्रतिम झाले की त्या दिवशीच्या कीर्तनाने त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. त्यांच्या सुंदर कीर्तनाने समर्थ खूप प्रसन्न झाले, खूप हर्षभरीत झाले. त्यामुळे कीर्तनानंतर समर्थ म्हणाले, '' रंगोबा आजचे कीर्तन ऐकून स्वतः श्रीस म्हणजे रामरायास खूप संतोष झाले आहे, रामराया तुझ्यावर प्रसन्न झाले आहेत, तुला काय हवे ते माग. '' यावर रंगनाथ गोसावी सुध्दा विलक्षण भारावले. स्वतः रंगनाथ गोसावींनाही आपल्या व्यसनांची जाणीव होती. आपण कधीतरी व्यसनमुक्त व्हायलाच हवे असे त्यांना वाटायचे. श्री. सुनील चिंचोलकर या संदर्भात लिहितात,'' रंगनाथ गोसावी यांचा तो भाग्योदयाचा क्षण होता. काही तरी भौतिक यश मागितले असते तर नुकसान झाले असते. पण रंगोबा समर्थांना म्हणतात, 'महाराज माझ्या दुर्व्यसनांना कारणीभूत असलेले माझे पूर्वसंचित नाहीसे करा. ''[३०१] हे ऐकून समर्थांना गहिवरून आले. समर्थांनी विचार केला रंगोबाला पूर्वजन्मीच्या वाईट कृतींची ही शिक्षा या जन्मात भोगायला लागत आहे. त्यावेळी मग समर्थांनी रंगनाथ गोसावींना आशीर्वाद दिला की,' पूर्वसंचितापासून मुक्त होशील! '' आणि खरंच समर्थांच्या कृपेने रंगनाथ गोसावींची सर्व वाईट व्यसनांपासून पूर्णपणे मुक्तता झाली.

रंगोबाचे जीवन धन्य होऊन तो खराखुरा 'रंगनाथ गोसावी' झाला. शिवाय समर्थांनी त्यांना अजून एक आगळावेगळा आशीर्वाद दिला. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात, '' बहुत बरे, यातूनही तू मुक्त झालास. त्याची खूण हीच की, तू तीर्थ दिले असता अडलेल्या बाळंतिणीची मुक्तता होईल. ''[३०२] समर्थांनी साताराजवळील 'पाली' येथे मठ स्थापन केला आणि रंगनाथ गोसावींना मठपती केले. रंगनाथ गोसावींनी हा मठ समर्थपणे सांभाळला. तसेच शिष्यसमुदायही वाढविला. त्यांच्या रामजी, त्रिबंक, प्रल्हाद, अनंत आणि भगवंत अशा शिष्याची नावे सापडतात.

रंगनाथ गोसावींना दोन मुलगे होते. एक मल्हारी आणि दुसरा बाजी. मल्हार आणि बाजी हे दोघेही समर्थशिष्यच होते. मल्हार गोसावींनी काही दिवस हा पालीच्या मठाची व्यवस्था पाहिली आणि नंतर परळी मठाची व्यवस्था पहायला तिथे गेले तर बाजी गोसावी पुढे शिरवळच्या मठाचे मठपती झाले. मल्हार गोसावी आणि बाजी गोसावी दोघेही पाली मठ सोडून गेल्यानंतर रंगनाथ गोसावींची शिष्या चियाबाईने मठाची व्यवस्था बघितली आणि तिच्यानंतर शिष्य गणेश गोसावी आणि धोंडोबा गोसावी ढवळे यांच्याकडे मठ व्यवस्था आली. मठ असलेले पाली, उंब्रज वगैरे गावी १२० बिघे जमीन यांच्याकडे होती. यावरून एक लक्षात येते की बहुजन समाजातील लोक सुध्दा समर्थांच्या संप्रदायात होते. रंगनाथ गोसावी चैत्र वद्य अष्टमीला समाधीस्थ झाले.

### मठाची सद्यस्थिती

सध्या हे मंदिर जुन्या स्थितीत असून येथे रामनवमी उत्सव आणि हनुमानजयंती उत्सव येथील ग्रामस्थ पार पाडतात.

## ४.६.१९ सतीबाई कुलकर्णी – शहापूर मठ

मसूरजवळ असलेले शहापूर हे एक लहान खेडं, बाजीपंत उर्फ कमलाजीपंत शहापूरकर आणि त्यांच्या पत्नी सतीबाई हे एका मोठ्या वाड्यात रहात होते. माणसांनी भरलेला वाडा गुण्या–गोविंदाने रहात होता. बाजीपंत हे आदिलशाही चाकरीत होते, त्यामुळे ते फारसे आध्यात्मिकही नव्हते आणि त्यांच्याकडे सुबत्ताही नांदत होती. त्यांची पत्नी सतीबाई यांचेही आध्यात्मिक विचार वेगळे होते.

समर्थ एकदा रांजणखिंडीजवळील एका टेकडीवर वास्तव्याला असताना शहापूरमधे भिक्षा मागायला जात. असेच एक दिवस ते शहापूरकरांच्या वाड्यासमोर येऊन 'श्रीराम जयराम जयजयराम' असा घोष करून भिक्षा मागत होते. सतीबाई वाड्याच्या दरवाज्यात आल्या, मात्र त्या संतापल्या होत्या, त्यांच्या आध्यात्मिकतेत श्रीरामाचा जप बसत नव्हता. त्यांची अशी समजूत होती की भरल्या घरात जप करू नये, कारण माणसाच्या अंतयात्रेच्यावेळीच रामनाम घेतात. त्यांनी समर्थांना भिक्षा न देताच परतवून लावले शिवाय सक्त ताकीद दिली या घरात रामनामाचा उच्चार चालणार नाही. तरी पण समर्थ पुढे अनेक दिवस त्यांच्या वाड्यात भिक्षा मागायला जात आणि रामाचे नाव घेत. मात्र एक दिवस समर्थांना वाड्यातील वातावरण चिंतायुक्त दिसले. चौकशी केल्यावर समजले की, वाड्यातील मालकांना म्हणजेच बाजीपंतांना अधिकाऱ्याने पकडून नेले आहे. गावातील वसूलीच्या हिशेबात घोटाळा असल्याचा त्यांच्यावर आरोप होता. समर्थ वाड्यावर रोज येऊन भिक्षा मागताना रामनाम घेत म्हणूनच हे संकट आले असा सतीबाईंचा समज झाला होता. समर्थ सतीबाईंना म्हणाले,''माझ्यामुळे जर तुमच्यावर हे संकट आले असेल तर तुमच्या मालकांना सोडवून आणण्याची जबाबदारी माझी. आजपासून अकरावे दिवशी ते घरी सुखरूप परत येतील. त्या बदल्यात तुम्ही काय भिक्षा घालाल.' हा बैरागी इतक्या आत्मविश्वासाने बोलतोय म्हटल्यावर त्यांच्याही मनात आशा उत्पन्न झाली. त्यावर सीताबाई समर्थांना म्हणाल्या,'' तुम्ही मागाल ते देईन, देवाला अलंकार करीन, कळस चढवीन. '' मात्र समर्थांना असे काही नकोच होते. त्यांना या घरात रामभक्ती घडावी असेच वाटत होते.' श्रीसमर्थ चरणामृत ' या ग्रंथात म्हणले आहे की, समर्थ म्हणाले,'' सोने-रूपे आम्हां मृत्तिकेसमान - तेव्हा आम्हांस हवी असलेली भिक्षा तुम्ही तिरस्कार करता ते रामनाम नेहमी घरात घ्यावं ही आहे. ''[३०३]

तोपर्यंत सतीबाई सावरल्या होत्या, त्यांनी हे म्हणणे त्वरित मान्य केले. त्यानंतर समर्थांनी विजापूर दरबारात एका कारकूनाच्या वेषात जाऊन हिशेबाचे काम करून बाजीपंताना सोडविले. बाजीपंतांनी चौकशी केल्यावर समर्थ त्यांना सांगतात की, मी दासोपंत, तुमच्या मंडळींनी आणि सासऱ्यांनी मला पाठविले आहे. शहापूरच्या वेशीपर्यंत समर्थ त्या वेषात बाजीपंतांबरोबर येतात. बाजीपंत भरभर पुढे चालत येतात आणि मागे वळून बघतात तर दासोपंत दिसलेच नाहीत. बाजीपंत घरी गेले तो दिवस होता अकरावा. सर्व घर आनंदले. बाजीपंतांनी

दासोपंतांबद्दल चौकशी केल्यानंतर त्यांना समजले की सतीबाई आणि त्यांच्या वडिलांनी कुणालाच दरबारात पाठविले नव्हते, तेव्हा सतीबाईच्या मनात लख्ख प्रकाश पडला की हे कार्य केवळ समर्थांचे. त्यांनी बाजीपंतांना सर्व प्रसंग सांगितले आणि ही सर्व समर्थ कृपा असल्याचा निर्वाळा दिला.

त्यानंतर सतीबाई आणि बाजीपंत समर्थ भिक्षेला घरी यायची वाट पाहू लागल्या. समर्थांनी रामनामोच्चार करीतच वाड्यात प्रवेश केला आणि सतीबाई आणि बाजीपंतांनी समर्थांच्या पायावर डोके ठेवले, अगदी त्यांच्या आनंदाश्रूंनी समर्थांच्या चरणावर अभिषेक झाला. त्यांच्याकडे समर्थांनी प्रसन्न अंतःकरणाने भोजन केले आणि त्या दोघांनाही अनुग्रह दिला. तेव्हापासून सतीबाई समर्थांचे दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसत. खरं तर समर्थ एका जागीच फार काळ रहात नसत, त्यामुळे अनेकवेळा सतीबाईंना उपास घडे. एकदा समर्थ चंद्रगिरीच्या घळीत मुक्कामाला होते. पावसाळ्याचे दिवस असूनही सतीबाई समर्थांना शोधत शोधत घळीपर्यंत पोहोचल्या तर तिथे दोन वाघ गुरगुरत असलेले दिसले आणि पलिकडे समर्थ ध्यानावस्थेत दिसले. मात्र अजिबात न घाबरता सद्‌गुरूदर्शनाच्या ओढीने त्या समर्थांपाशी पोहोचून त्यांचे चरण दर्शन घेतले. हा प्रसंग सतीबाईंचे धैर्य दाखवतो. तेवढीच आपल्या गुरूंवर असलेली निष्ठाही दाखवतो. सतीबाईंचा हा विश्वास अगदी वाखाणण्यासारखा आहे. समर्थ सतीबाईंना म्हणाले,'मला खूप भूक लागली आहे. त्यावेळी सतीबाईंनी भाजणीचे थोडे पीठ आणले होते. पण थालीपीठ करायची सोय नव्हती. समर्थांनी जवळच जागा दाखविली तर तिथे स्वयंपाकाचे सर्व साहित्य होते. सतीबाईंनी अगदी आनंदाने सर्व साग्रसंगीत स्वयंपाक करून समर्थांना जेवायला वाढले. समर्थांनी त्यांना सांगितले की,' एकदाच ताट वाढायचे आणि परत वाढायला न येता वळूनही बघायचे नाही, तरीसुध्दा सतीबाईंना शंका येत होती आपण सर्व व्यवस्थित वाढले ना? म्हणून त्यांनी मागे वळून बघितले तर समर्थांसमवेत स्वतः मारूतीराय जेवायला बसले होते. हे अलौकीक दृष्य पाहून त्यांचे त्या तेजाने डोळे दिपले, त्या मूच्छित झाल्या. समर्थांनी त्यांना सावध केले आणि कोणताही निग्रह, नेम न करण्याची सूचना केली, त्या किती भाग्यवान आहेत हे दर्शविले. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात,'' परमानंदात बाईचे भोजन झाल्यावर समर्थ तिला म्हणतात,'' मोठ्या भाग्याने तुला हे दर्शन घडले. आता यापुढे असला निग्रहाचा नेम ठेवू नकोस. ''[३०४]

या प्रसंगातून सतीबाईंची निष्ठा, गुरूप्रेम जाणवते. त्यामुळे त्यांना मारूतीरायाचे दर्शन झाले. समर्थांनी समजावून सुध्दा सतीबाईंना एका गोष्टीचे वाईट वाटत होते की नेहमी समर्थांचे दर्शन होणार नाही. तेव्हा समर्थांनी सतीबाईंच्या म्हणजे शहापूरकर वाड्यातच मारूतीरायाची स्थापना केली. श्री. अनंतदास रामदासी या संदर्भात लिहितात की,'' तेथे स्वतःसाठी संध्यामठी बांधून घेतली आणि बाईच्या घरातच प्रतापमारूतीचे स्थापून स्वहस्ते अर्चा करून बाईस आज्ञापिले की, अतःपर उपोषणे करू नयेत. श्रीमूर्तीची पूजा करून तीर्थ घेऊन भोजन करीत जावे, मनाला येणाऱ्या शंका त्यांनाच निवेदन केल्यास दूर होतील. ''[३०५]

अशा रीतीने रामनाम घेणे केवळ अशुभ आहे, भरल्या–नांदत्या घरात कोणी हे नांव घेऊ नये असे वाटणाऱ्या सतीबाई रामभक्त होतात, समर्थांची सेवा करतात, समर्थांनी स्थापन केलेला हा शहापूरकर वाड्यातील मठ सांभाळला. आदिलशहाच्या या प्रांतात मारूतीरायांचे मंदिर आणि मठांचे कार्य हे काही सोपे नव्हते, मात्र सतीबाईंनी समर्थपणे या मठाची धुरा सांभाळली. संपूर्ण गावाला रामभक्तीची गोडी लावली. आजूबाजूच्या गावांमध्येही सतीबाईंनी समर्थांच्या संप्रदायाचा, कार्याचा विस्तार केला. एक रामनाम अशुभ मानणारी स्त्री समर्थांच्या मठाची अधिपती झाली. केवळ रामनामच घेऊन पुढील आयुष्य न कंठता सतीबाईंनी मठाची व्यवस्था पाहिली. श्री. शंकर श्रीकृष्ण देव या संदर्भात लिहितात,'' नंतर तेवढेच घर नव्हे, तर सारा गाव आणि गावेच्या गावे समर्थांच्या भजनीं लागली. ''[३०६]

आजही हा मठ अस्तित्वात असून त्या जून्या वाड्यात मारूतीरायाचे अस्तित्व टिकून आहे. सध्या ह्या मठाचे अधिपती श्री राजेंद्र कुलकर्णी असून श्रीरामनवमी, हनुमानजयंती, दासनवमी असे उत्सव उत्साहाने साजरे होतात. पंचक्रोशीतील लोक मठात येऊन उपासना करतात.

### ४.७ समारोप

सर्वार्थाने श्रीरामांचा दास असणारे 'समर्थ म्हणजे नारायण सूर्योपासक ठोसर घराण्यात जन्मलेले तेविसावे पुरूष. सूर्याजीपंत आणि राणूबाई या तपस्वी दांपत्याला प्रत्यक्ष सूर्यनारायण आणि श्रीरामचंद्रांच्या वरदानाने मंदशेकडून गंगाधर म्हणजे 'श्रेष्ठ' आणि मारूतीअंशेकडून नारायण

म्हणजे 'समर्थ' हे दोन पुत्र झाले. हाच नारायण भविष्यात समर्थ होऊन एक संत, योगी, तपस्वी आणि संघटक म्हणून ओळखला गेला. अतिशय हूड, खोडकर नारायण लहानपणीच प्रत्येक कृतीतून कर्तृत्वाची चुणूक दाखवित होता. लहानपणीच त्याने अनेक चमत्कार करून दाखविले. प्रत्यक्ष रामचंद्रांचा अनुग्रह नारायणाने मिळविला, तेव्हा श्रीरामचंद्रांनी नारायणाला जगदोद्धार करण्याचा उपदेश केला. त्यामुळे विवाह–बंधनात न अडकता, मंडपातून पलायन करून नारायणाने गोदावरी नदीच्या पात्रात उडी घेतली आणि उगमाच्या दिशेने जाऊन नाशिकला पंचवटीत जाऊन रामरायाचे दर्शन घेतले. पुन्हा एकदा श्रीरामांचा आशीर्वाद आणि धर्मसंस्थापनेची आज्ञा घेऊन टाकळीला गोदावरी–नंदिनीच्या संगमावर बारा वर्षे खडतर तपःश्चर्या केली. अध्ययन केले. या काळात समर्थांच्या आयुष्यात तीन प्रमुख घटना घडल्या आणि त्यांच्या सामाजिक कार्याची बीजे तेव्हाच रोवली गेली. त्या नियोजित कार्यासाठी देशातील सर्व स्थितीचे अवलोकन करण्यासाठी पुढील बारा वर्षे तीर्थाटन केले. अनेक अनुभव घेत देशाची धार्मिक, सामाजिक, राजकीय स्थिती अभ्यासली आणि महाराष्ट्रात परत येऊन कृष्णातीरी स्थिरावले. याच प्रांतांत सामाजिक चळवळीला सुरूवात करून मारूतीमंदिरे स्थापन केली, कीर्तन–प्रवचनातून समाजप्रबोधन केले. पराक्रमी देवतांचे आदर्श समाजासमोर ठेवले. सामाजिक कार्यातून पुढे स्वधर्मसंस्थापना आणि स्वराज्यसंस्थापनेच्या उद्दिष्टाला त्यांचे मोठे सहाय्य झाले. 'शिव–समर्थ' एकत्र येऊन आनंदवनभुवनाचे स्वप्न साकारल्यावर काही वर्षातच शिवरायांचा अवतार संपला आणि अवघ्या दोन वर्षांनीच समर्थांनीही त्यांचा अवतार संपविला. हे कार्य करतानाच एकीकडे समर्थांनी दासबोध, आत्माराम, मनोबोध वगैरे वाङ्मयाची निर्मिती केली आणि त्यातूनही मोठे प्रबोधन केले.

मराठीत जे पाच प्रमुख संप्रदाय आहेत. त्यात नाथ, महानुभव, वारकरी, दत्त आणि रामदासी संप्रदायांचा समावेश होतो. 'नाथ' संप्रदायाच्या गोरखनाथांनी शुध्द योगमार्गाला वेगळे वळण दिले. 'महानुभाव' संप्रदायाचे प्रवर्तक चक्रधरस्वामी यांनी बहुजन समाजालाही परमार्थाकडे वळविले. वारकरी संप्रदायाचे प्रवर्तन भक्त पुंडलिकाने केले होते. त्यात संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी लोकांच्या मनात आध्यात्मिक बैठक निर्माण करून दुबळ्या मनांना उन्मन केले. प्राचीन काळापासून प्रचलित असलेल्या दत्तोपासनेला नृसिंहसरस्वती आणि श्रीस्वामी समर्थांनी यवनी जुलुमांना आळा घातला आणि कुमार्गी लोकांना सन्मार्गावर आणले. या

सर्वात 'समर्थ' अथवा 'रामदासी' संप्रदायाचे स्थान वेगळे आहे. आध्यात्माएवढेच त्याचे महत्त्वाचे कार्य हे सामाजिक होते. समाजप्रबोधनात या संप्रदायाचा मोठा वाटा आहे. या पाचही प्रमुख संप्रदायाची वाङ्मयीन संपदा अफाट आहे.

श्रीरामचंद्रांचा आशीर्वाद आणि मारूतीरायांचा अंश असलेल्या समर्थांनी मोठे सामाजिक कार्य केले. टाकळीच्या पुरःश्चरण समयी आणि तीर्थाटन काळात समर्थांची पूर्ण आध्यात्मिक जडणघडण झाली होती आणि सामाजिक कार्याचे नियोजनही तेव्हाच झाले होते. कृष्णातीरी सामाजिक कार्याचा आरंभ होऊन त्या परिसरात त्यांना दिनकर गोसावी, कल्याणस्वामी, वेण्णास्वामी अशी शिष्यरूपी रत्ने सापडली. पुढे संप्रदायाला संघटनात्मक कार्य करण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि राजकीय हेतून चाफळ मंदिर उभारले. समर्थ–शिवराय एकत्र येऊन संघटनात्मक कार्य सुरू झाले. समर्थांनी चतुःसूत्रीवर आधारलेले कार्य केले. हरिकथा निरूपणातून समाजाला भक्तीमार्ग दाखविला. समाजात राहून राजकारण साधायला शिकविले. प्रापंचिक–सामाजिक जीवनात सावधपणा कसा हवा हे सांगितले आणि याच जोडीला साक्षेप म्हणजे प्रयत्न यावर भर द्यायला प्रवृत्त केले. अशा प्रकारे समर्थांनी अद्वितीय सामाजिक कार्य केले.

स्वधर्मसंस्थापना, स्वराज्यनिर्मितीसाठी सामाजिक स्थित्यंतर घडवून आणण्याच्या उद्दिष्टाने समर्थांनी मठनिर्मिती केली आणि सामाजिक चळवळीचे कार्य करण्याकरता त्यांनी महंतनिर्मिती केली. महंताबद्दलचे आडाखे आणि आवश्यक गुण समर्थांनी स्पष्ट केले आणि तशीच त्यांची जडणघडण केली. त्यामुळे समर्थांच्या महंतांनी मोठ्या प्रमाणावर समाजप्रबोधन केले. सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या हेतूने समर्थांनी जे मठ स्थापन केले. त्यामुळे परमार्थ क्षेत्रात प्रगती झाली आणि समाज स्वराज्यभिमुख झाला.

समर्थांनी त्या त्या प्रांतात सांप्रदायिक कार्याची गरज असल्याने मठ स्थापले, स्वराज्यस्थापनेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या प्रांतात समर्थांनी मठनिर्मिती करून त्याचे अधिपतीपद तावून–सुलाखून निघालेल्या महंतांना दिले म्हणजे वेणाबाई – मिरज, दिनकरस्वामी – तिसगाव, कल्याणस्वामी – डोमगांव व परंडा, उद्धवस्वामी – टाकळी व इंदूरबोधन, दिवाकर गोसावी – महाबळेश्वर, दत्तात्रयस्वामी – शिरगांव, यात पुढील एका पिढीने ग्वाल्हेर येथे मठ

स्थापन केला. भीमस्वामी – तंजावर, अंबिकाबाई – राशिवडे व वाळवे, सीतारामबुवा – चिपळूण, बाजीगोसावी – शिरवळ, वासुदेव गोसावी – कण्हेरी, देवदास महाराज – दादेगांव, आण्णाप्पा उर्फ आनंदस्वामी – निलंगे, त्रिंबकराज – मालगांव, बालकराम आणि रोकडाराम – कारंजे, अनंतबुवा मेथवडेकर – मेथवडे, रंगनाथ गोसावी – पाली, सतीबाई – शहापूर यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या सर्व महंतांनी आपले कार्य मठाद्वारे पार पाडले. त्यांनी समाजप्रबोधन केले, शिष्यपरिवार वाढविला, नविन मठ स्थापले, मुस्लिमसत्तांच्या अंमलाखालीसुध्दा उत्कृष्ट समाजकार्य केले. स्वधर्मसंस्थापना आणि स्वराज्यसंस्थापनेच्या कार्यात मोठ्या प्रमाणावर समाजकारण आणि राजकारण केले. याचबरोबर या महंतांनी अनेक महत्त्वाच्या ग्रंथरचना केल्या, अनेक प्रकारचे वाङ्मय हाताळले.

### ४.८ संदर्भ : प्रकरण चौथे


१) 'चिंता करितो विश्वाची' सुनील चिंचोलकर, श्री गंधर्व वेद प्रकाशन पुणे, चतुर्थ्यावृत्ती, १५ ऑगस्ट २००९, पृ. क्र. २५

२) तत्रैव, पृ.क्र. २७

३) 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', अनंतदास रामदासी, मोरया प्रकाशन, डोंबिवली (पूर्व), तृतीय आवृत्ती, १३ ऑगस्ट २००९, पृ. क्र. २६

४) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. ३०

५) उनि – 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', पृ. क्र.२७

६) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. ३१

७) तत्रैव, पृ. क्र. ३२

८) तत्रैव, पृ. क्र. ३२

९) उनि – 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', पृ. क्र. २९

१०) तत्रैव, पृ. क्र.३२

११) तत्रैव, पृ. क्र.३२

१२) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. ३४

१३) उनि – 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', पृ. क्र.३६

१४) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. ४०

१५) 'दास डोंगरी राहतो' गोपाळ नीलकण्ठ दाण्डेकर, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाऊस, ठाणे (प), अकरावी आवृत्ती, जून २०१२, पृ. क्र. १

१६) तत्रैव, पृ. क्र. ८१

१७) उनि – 'श्रीदासायन', पृ. क्र. ४७

१८) उनि – 'दास डोंगरी राहतो', पृ. क्र. ३

१९) उनि – 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', पृ. क्र. ४८

२०) तत्रैव, पृ. क्र. ४८

२१) 'समर्थ रामदास',शंकर वासुदेव अभ्यंकर, आदित्य प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २४ ऑगस्ट २०१६, पृ. क्र. ११

२२) उनि – 'दास डोंगरी राहतो', पृ. क्र. १०

२३) उनि – 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', पृ. क्र. ५१

२४) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. ५८

२५) उनि – 'श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)', पृ. क्र. ५१

२६) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. १३–१४

२७) 'श्रीगिरीधरकृत समर्थप्रताप', प्रकाशक चिटणीस सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, तिसरी आवृत्ती, १४ जानेवारी २००५, पृ. क्र. ११

२८) 'राजगुरू समर्थ रामदास ' डॉ. शं. दा. पेंडसे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३ पृ. क्र. ५

२९) उनि – 'श्री गिरीधरकृत समर्थप्रताप', पृ. क्र. १२

३०) उनि – 'दास डोंगरी राहतो', पृ. क्र. १२

३१) उनि – 'श्री गिरीधरकृत समर्थप्रताप', पृ. क्र. १५

३२) तत्रैव, पृ. क्र. १६

३३) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. १६

३४) उनि – ‘श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)’, पृ. क्र. ५८

३५) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. ७२

३६) उनि – ‘समर्थ रामदास’, पृ. क्र. २३

३७) तत्रैव, पृ. क्र. २४

३८) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. ८९

३९) उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. ६५

४०) तत्रैव, पृ. क्र. ८२

४१) उनि – ‘श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)’, पृ. क्र. ७७

४२) ‘पाच संत चरित्रे’, गोपाळ नीलकण्ठ दांडेकर, ,मॅजेस्टीक पब्लिशिंग हाऊस,ठाणे, जानेवारी २०११, पृ. क्र. २७

४३) उनि – ‘श्री गिरीधरकृत समर्थप्रताप’, पृ. क्र.१८

४४) उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. १३७–१३८

४५) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. १३०

४६) ‘प्रथमस्य प्रथमं टाकळी स्थानम्’, सुधीर शिरवाडकर, श्रीसमर्थ सेवा मंडळ, नाशिक,प्रथम आवृत्ती, श्रीहनुमान जयंती २०१७, पृ. क्र. ५०

४७) ‘आनंदवनभुवनी’, शुभांगी भडभडे, सुयोग प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५/४/२०१६ पृ. क्र. ३८४ जानेवारी २०१०, पृ. क्र. ३८४

४८) ‘श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन(पत्रद्वारा)’, श्री. हा. वा. केळकर, पुणे, २६वे पुनःमुद्रण, जानेवारी २०१०, पृ. क्र.

४९) 'श्रीसमर्थ रामदासस्वामी विरचित सार्थ दासबोध', श्रीसमर्थ ग्रंथ भवन, पुणे, प्रकाशक श्री. ना. ढवळे, सप्तमावृत्ती, वर्षप्रतिपदा शक १८९८, पृ. क्र. ४२२

५०) तत्रैव, पृ. क्र. ४४४

५१) 'भावार्थ दासबोध परिचय (पत्रद्वारा)', प्रकाशन श्री. व सौ. केंदूरकर, पुणे, आवृत्ती १ली, १०-९-१९९६, पृ. क्र. ४९

५२) उनि – 'श्रीसमर्थ रामदासस्वामी विरचित सार्थ दासबोध', पृ. क्र. ४७५

५३) तत्रैव, पृ. क्र. ७३९

५४) 'दासबोध प्रवेश' (पत्रद्वारा), श्री. हा. वा. केळकर पुणे, पृ. क्र. ६५

५५) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. २२०

५६) 'श्री समर्थ रामदासकृत आत्माराम', प्रा. के. वि. बेलसरे, श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, आवृत्ती नववी, गुढी पाडवा शके १९३२ सन २०१०, पृ. क्र. ९१

५७) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. २३२

५८) तत्रैव, पृ. क्र. २५५

५९) तत्रैव, पृ. क्र. २३८

६०) 'समर्थ श्रीरामदास विरचित सार्थ करूणाष्टके', श्रीसमर्थ ग्रंथभवन, पुणे, पहिली आवृत्ती, ५ फेब्रुवारी २०१७, पृ. क्र. ६०

६१) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. ३०५

६२) 'समग्र समर्थ साहित्य', प्रकाशक ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर, दादर-मुंबई, प्रथमावृत्ती, रविवार ५ एप्रिल १९९८, पृ. क्र. ३२

६३)	उनि – ‘समर्थ रामदास’, पृ. क्र. ५०७

६४)	उनि – ‘समग्र समर्थ साहित्य’ पृ. क्र.३३

६५)	‘श्री ज्ञानेश्वरी’ गीताप्रेस’, गोरखपूर, तिसावे पुनर्मुद्रण, पृ. क्र. ५०६

६६)	‘महाराष्ट्रातील पंथ’ सुहास आगरकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २ नोव्हेंबर २००९, पृ. क्र. १३

६७)	तत्रैव, पृ. क्र. २०

६८)	‘पाच भक्ती संप्रदाय’, र. रा. गोसावी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, १५ ऑगस्ट २००८, पृ. क्र. २८

६९)	तत्रैव, पृ. क्र. ५८

७०)	तत्रैव, पृ. क्र. ९८

७१)	तत्रैव, पृ. क्र. १०४

७२)	उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र. ५५

७३)	उनि – ‘पाच भक्ती संप्रदाय’, पृ. क्र. १३८

७४)	तत्रैव, पृ. क्र. १७६

७५)	तत्रैव, पृ. क्र. १७५

७६)	उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र. ७७

७७)	उनि – ‘पाच भक्ती संप्रदाय’, पृ. क्र. २३४

७८)	उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र. ८२

७९)	उनि – ‘पाच भक्ती संप्रदाय’, पृ. क्र. १९८

८०) तत्रैव, पृ. क्र.२०३

८१) तत्रैव, पृ. क्र. २११

८२) तत्रैव, पृ. क्र. २३९

८३) उनि – 'महाराष्ट्रातील पंथ', पृ. क्र. २४

८४) 'महाराष्ट्र संस्कृती', डॉ. पुरूषोत्तम गणेश सहस्त्रबुध्दे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, १९७९, पृ. क्र. ३२९

८५) 'श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय', र. रा. गोसावी, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, ऑगस्ट १९८१, पृ. क्र. १२८–१२९

८६) 'श्री समर्थांच्या सामाजिक जाणीवा', सौ. कुमुदिनी देशपांडे, सत्कार्यात्तेजक सभा, धुळे, प्रथमावृत्ती, श्रीदासनवमी शके १९२३, पृ. क्र. ३३

८७) तत्रैव, पृ. क्र.३३

८८) उनि – 'समग्र समर्थ साहित्य', पृ. क्र. ८७७.

८९) उनि – 'श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय', पृ. क्र. ४४

९०) उनि – 'समर्थ रामदास' पृ. क्र. ३८३

९१) तत्रैव, पृ. क्र. ३८४

९२) उनि – 'महाराष्ट्रातील पंथ', पृ. क्र. ४०

९३) 'सामर्थ्ययोगी रामदास', प्रभाकर पूजारी, समर्थ व्यासपीठ, पुणे, द्वितीय आवृत्ती, सन २०००, पृ. क्र. ४९

९४) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. ३९७

९५)  उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र.४९

९६)  उनि – ‘समर्थ रामदास’, पृ. क्र. ४०५

९७)  तत्रैव,  पृ. क्र. ४०७

९८)  ‘रामदास’, प्रा. श. श्री. पुराणिक, चंद्रकला प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च १९९६, पृ. क्र. १८६

९९)  तत्रैव,  पृ. क्र. १६६

१००) उनि – ‘श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय’, पृ. क्र. १४०

१०१) उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र. ४६

१०२) उनि – ‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणीवा‘, पृ. क्र. १००

१०३) उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र. ४७

१०४) उनि – ‘श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय’, पृ. क्र. १४४

१०५) उनि – ‘पाच भक्ती संप्रदाय’, पृ. क्र. २९६

१०६) उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ’, पृ. क्र. ४१

१०७) उनि – ‘श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय’, पृ. क्र. १३७

१०८) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. ५०

१०९) उनि – ‘गिरिधरकृत समर्थप्रताप’, पृ. क्र. १५,१६

११०) उनि – ‘श्री दासायन’, पृ. क्र. ५५

१११) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. ८७

११२) उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. ६८

११३)  उनि – ‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणिवा’, पृ. क्र. ३४

११४)  उनि – ‘समग्र समर्थ साहित्य’, पृ. क्र. ८७७

११५)  उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. १३५

११६)  उनि – ‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणिवा’, पृ .क्र. ४६

११७)  उनि – ‘चिंता करितो विश्वाची’ पृ. क्र. १६१

११८)  उनि – ‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ९७

११९)  उनि – ‘दास डोंगरी राहतो’, जून २०१२ पृ. क्र. १८७

१२०)  उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. १९७

१२१)  तत्रैव, पृ. क्र. २०८

१२२)  उनि – ‘श्री दासायन’, (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ११७

१२३)  उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. २०८

१२४)  उनि – ‘दास डोंगरी राहतो’, जून २०१२ पृ. क्र. २१३

१२५)  उनि – ‘समर्थ रामदास’, पृ. क्र. २८५

१२६)  उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. २४७

१२७)  उनि – ‘श्री दासायन’, (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ.क्र.१९१

१२८)  तत्रैव, पृ. क्र. २२६

१२९)  उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. २५८

१३०) उनि – ‘श्रीसमर्थ रामदासस्वामी विरचित सार्थ दासबोध’, पृ. क्र. ४४८

१३१) उनि – ‘राजगुरू समर्थ रामदास’, पृ. क्र. ९३

१३२) उनि – ‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणिवा’, पृ. क्र. ८०

१३३) तत्रैव, पृ. क्र. ८७

१३४) तत्रैव, पृ. क्र. १०३

१३५) उनि – ‘श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय’, पृ. क्र. २७

१३६) उनि – ‘श्रीसमर्थ रामदासस्वामी विरचित सार्थ दासबोध’, पृ. क्र. ४५१

१३७) तत्रैव, पृ. क्र. ४७०

१३८) तत्रैव, पृ. क्र. ४७१

१३९) तत्रैव, पृ. क्र. ४८५

१४०) तत्रैव, पृ. क्र. ५६८

१४१) तत्रैव, पृ. क्र. ५८४

१४२) उनि – ‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. १६३

१४३) उनि – ‘रामदास’, पृ. क्र. २०६

१४४) तत्रैव, पृ. क्र. २०६–२०७

१४५) उनि – ‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणिवा‘, पृ. क्र. ४६

१४६) उनि – ‘महाराष्ट्रातील पंथ‘, पृ. क्र. ४३

१४७) उनि – ‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणिवा‘, पृ. क्र. १४

१४८) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘, पृ. क्र. ६८

१४९) ‘मराठी संतकवयित्री’, प्राचार्य या. के. यादव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,

८ मार्च २०१२, पृ. क्र. १३५

१५०) उनि –‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. १०६

१५१) उनि – ‘मराठी संतकवयित्री’, पृ. क्र. १३७

१५२) उनि – ‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. १०६

१५३) ‘वेणा पावली पूर्णविराम‘, सुनील चिंचोलकर, मोरया प्रकाशन, डोंबिवली(पूर्व), द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट २००९, पृ. क्र ५२

१५४) उनि – ‘मराठी संतकवयित्री’, पृ. क्र. १४०

१५५) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘ सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ८०

१५६) उनि – ‘वेणा पावली पूर्णविराम‘, पृ. क्र. १२०

१५७) तत्रैव, पृ. क्र १२५

१५८) उनि – ‘मराठी संतकवयित्री’, पृ. क्र. १४३

१५९) उनि – ‘वेणा पावली पूर्णविराम‘, पृ. क्र १०६

१६०) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘, सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ७०

१६१) उनि – ‘वेणा पावली पूर्णविराम‘, पृ. क्र ११७

१६२) उनि – ‘मराठी संतकवयित्री’, पृ. क्र.१४५

१६३) ‘श्री सीता स्वयंवर‘, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, लोकव्रत प्रकाशन, सातारा, द्वितीय आवृत्ती, ११/११/२०१०, पृ. क्र. ३१

१६४) तत्रैव, पृ. क्र. ५६

१६५) तत्रैव, पृ. क्र. १०६

१६६) तत्रैव, पृ. क्र. १६०

१६७) 'श्री वेणी कवन आणि पंचीकरण', सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, द्वितीयावृत्ती, १५/०५/२०११, पृ. क्र. १

१६८) तत्रैव, पृ. क्र. ७

१६९) उनि – 'श्री सीता स्वयंवर', सत्करर्योत्तेजक सभा, पृ. क्र. १३

१७०) उनि – 'मराठी संतकवयित्री', पृ. क्र. १५४

१७१) तत्रैव, पृ. क्र. १६०

१७२) तत्रैव, पृ. क्र. १६१

१७३) तत्रैव, पृ. क्र. १५०

१७४) उनि – 'श्री वेणी कवन आणि पंचीकरण', पृ. क्र. ५६

१७५) तत्रैव, पृ. क्र. १७

१७६) उनि – 'गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप', सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ५९

१७७) 'श्री स्वानुभव दिनकर', सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, आणि दिनकर मठ, तिसगांव, द्वितीयावृत्ती, गुरूपौर्णिमा, राज्याभिषेक शक ३८२ (३१/०७/२०१५), पृ. क्र. २२

१७८) उनि – 'श्री दासायन', (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ३३८

१७९) उनि – 'श्री स्वानुभव दिनकर', सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ८

१८०) उनि – 'श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय' पृ. क्र. ६२

१८१) उनि – ‘श्री स्वानुभव दिनकर’, सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ८

१८२) तत्रैव,‘ पृ. क्र. ६९

१८३) ‘मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास’, डॉ. प्रल्हाद नरहर जोशी, नितीन प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १५ ऑगस्ट १९७२, पृ. क्र. २९३

१८४) उनि – ‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ३३८

१८५) तत्रैव, पृ. क्र. ३३९

१८६) उनि – ‘श्री स्वानुभव दिनकर’, पृ. क्र. ८

१८७) तत्रैव, पृ. क्र. ८

१८८) तत्रैव, पृ. क्र. १२

१८९) तत्रैव, पृ. क्र. ३२

१९०) तत्रैव, पृ. क्र. ७८

१९१) तत्रैव, पृ. क्र. १३६

१९२) तत्रैव,  पृ. क्र. २८२

१९३) तत्रैव, पृ. क्र. २९४

१९४) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘, सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ५७

१९५) ‘रामदास आणि रामदासी’, ‘श्री सांप्रदायिक विविध विषय, प्रथम खंड सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, १८३९ वैशाख शुध्द २, पृ. क्र. २७५

१९६) ‘कल्याणा, छाटी उडाली’, सुनील चिंचोलकर, मोरया प्रकाशन, डोंबिवली(पूर्व),

तिसरी आवृत्ती, २००८, पृ. क्र. ८

१९७) तत्रैव, पृ. क्र. १२

१९८) उनि – 'दास डोंगरी राहतो', पृ. क्र. २०६

१९९) 'श्री समर्थ चरित्रामृत', श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, प्रकाशक श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, आवृत्ती सवीसावी, दसरा २०१५, पृ. क्र. १३४

२००) उनि – 'श्री दासायन' (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ३१८

२०१) उनि – 'कल्याणा, छाटी उडाली', पृ. क्र. ८०/८१

२०२) 'श्री समर्थशिष्य कल्याण' सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, मोरया प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती,२०१३, पृ. क्र. २०१

२०३) उनि – 'कल्याणा, छाटी उडाली', पृ. क्र. ८५

२०४) उनि – 'श्री समर्थशिष्य कल्याण', पृ. क्र. २४९

२०५) उनि – 'कल्याणा, छाटी उडाली', पृ. क्र. ८७

२०६) तत्रैव, पृ. क्र. ९२.

२०७) उनि – 'श्री समर्थशिष्य कल्याण', पृ. क्र. २३६–२३७

२०८) तत्रैव, पृ. क्र. २०

२०९) तत्रैव, पृ. क्र. ४६

२१०) तत्रैव, पृ. क्र. १७१

२११) उनि – 'कल्याणा, छाटी उडाली', पृ. क्र. ९०

२१२) तत्रैव, पृ. क्र. ९४

२१३) उनि – 'गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप', पृ. क्र. ६०

२१४) 'आंध्र परिसरातील समर्थ संप्रदाय', प्रमोद दामोदर संत, प्रकाशक सौ. सुप्रिया प्र संत, नागपूर, प्रथमावृत्ती, श्रीशिवराज्याभिषेक दिन राजशक ३३९, पृ. क्र. ७७

२१५) उनि – 'समर्थ रामदास', पृ. क्र. २४

२१६) उनि – 'श्री दासायन' (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ६२.

२१७) 'प्रथमस्थ प्रथमं टाकळी स्थानम्', सुधीर शिरवाडकर, श्रीसमर्थ रामदास सेवा मंडळ नाशिक प्रथमावृत्ती, श्रीहनुमान जयंती, २०१७ पृ. क्र. ४२

२१८) तत्रैव, पृ. क्र. ४८

२१९) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. २०२

२२०) उनि – 'श्री समर्थ चरितामृत', पृ. क्र. १३१

२२१) 'समर्थांचा मानसपुत्र उद्धवस्वामी', डॉ. सौ. साधना सुधाकर गोखले, प्रकाशिका– डॉ. सौ. साधना सुधाकर गोखले, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१७ पृ. क्र. ३०

२२२) उनि – 'आंध्र परिसरातील समर्थ संप्रदाय', पृ. क्र. ७७

२२३) उनि – 'गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप', पृ. क्र. ५३

२२४) उनि – 'आंध्र परिसरातील समर्थ संप्रदाय', पृ. क्र. ७६

२२५) उनि – 'समर्थांचा मानसपुत्र उद्धवस्वामी', पृ. क्र. ३४

२२६) 'श्री बडाराम एवम् श्रीसारंगपूर हनुमान मठ–३६५ सालोंकी मठ परंपराका परिचय,

इंदूरबोधन(निजामाबाद) तेलंगणा, पृ. क्र. २

२२७) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘, पृ. क्र. ५७

२२८) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. ३०१

२२९) उनि – ‘आंध्र परिसरातील समर्थ संप्रदाय’, पृ. क्र. ८०

२३०) उनि – ‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ३५४

२३१) उनि – ‘आंध्र परिसरातील समर्थ संप्रदाय’, पृ. क्र. ८१

२३२) उनि – ‘प्रथमस्थ प्रथमं टाकळी स्थानम्’, पृ.क्र. ५१–५२.

२३३) तत्रैव, पृ. क्र. ५२

२३४) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘, पृ. क्र. ५८.

२३५) मठाधिपती श्री. दिवाकर देशपांडे यांचे लिखित, पृ. क्र. १

२३६) उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. १५३

२३७) उनि – ‘श्री दासायन’ (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ३४२

२३८) उनि – मठाधिपती श्री. दिवाकर देशपांडे यांचे लिखित, पृ. क्र. ३

२३९) उनि – ‘चिंता करितो विश्वाची’, पृ. क्र. १६२.

२४०) उनि – मठाधिपती श्री. दिवाकर देशपांडे यांचे लिखित, पृ. क्र. १

२४१) उनि – ‘दास डोंगरी राहतो’, पृ. क्र. २७३

२४२) उनि – ‘गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप‘, पृ. क्र. ५७

२४३) 'दत्तात्रयस्वामी शिरगांवकर', शिरगाव त्रिशताब्दी पुण्यतिथी स्मरणिका, ऑक्टोबर २०१७

२४४) उनि – 'कल्याणा, छाटी उडाली', पृ. क्र. ९७.

२४५) उनि – 'दत्तात्रयस्वामी शिरगावकर', शिरगाव त्रिशताब्दी पुण्यतिथी स्मरणिका

२४६) तत्रैव,

२४७) उनि – 'श्री दासायन' (सप्तकाण्डात्मक चरित्र), पृ. क्र. ११३–११४.

२४८) 'श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय' श्री. सेतू माधवराव पगडी, परचुरे प्रकाशन, गिरगांव, मुंबई, प्रथमावृत्ती.१३ ऑगस्ट १९८५, पृ. क्र. २१८

२४९) उनि – 'श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय', पृ. क्र. ६५.

२५०) तत्रैव, पृ. क्र. २१७.

२५१) उनि – 'रामदास आणि रामदासी', श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड, पृ. क्र. १४६,१४७,१४८

२५२) उनि – 'गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप', पृ. क्र. ६६

२५३) 'समर्थस्थापित दैवते' श्री. प्रमोद संत, प्रकाशक सौ. सुप्रिया प्रमोद संत, नागपूर, आवृत्ती पहिली, २५ ऑक्टोबर २००७, पृ. क्र. १६२

२५४) उनि – 'श्री दासायन', पृ. क्र. ३६८

२५५) उनि – 'समर्थस्थापित दैवते', पृ. क्र. १६४

२५६) उनि – 'श्री दासायन', पृ. क्र. ३९०

२५७) तत्रैव, पृ. क्र. ३४७

२५८) उनि – 'गिरीधरकृत श्री समर्थ प्रताप', पृ. क्र. ५७

२५९) उनि – 'समर्थस्थापित दैवते', पृ. क्र. १६७

२६०) तत्रैव, पृ. क्र. १६५

२६१) उनि – 'श्रीदासायन', पृ. क्र. ३३१

२६२) उनि – 'श्री गिरीधरकृत समर्थप्रताप', पृ. क्र. ५५

२६३) उनि – 'श्रीदासायन' पृ. क्र. ३३३

२६४) उनि – 'श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय', पृ. क्र. ५९

२६५) उनि – 'समर्थस्थापित दैवते', पृ. क्र. १६७

२६६) उनि – 'श्रीसमर्थ चरित्रामृत' पृ. क्र. १४०

२६७) उनि – 'श्री गिरीधरकृत समर्थप्रताप', सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ५९

२६८) ' बीड जिल्ह्यातील समर्थ संप्रदाय ', श्री. प्रमोद संत, प्रकाशिका सौ. सुप्रिया संत, प्रथमावृत्ती, गुढीपाडवा २०१७, पृ. क्र. ३३

२६९) उनि – ' पाच भक्तीसंप्रदाय', पृ. क्र. ३४८

२७०) उनि – 'रामदास आीण रामदासी', श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड,पृ. क्र. २६४, २३५

२७१) तत्रैव, पृ. क्र. २३५

२७२) तत्रैव पृ. क्र. २३६

२७३) तत्रैव, पृ. क्र. २३६,२३७

२७४) उनि – ‘श्री गिरीधरकृत समर्थप्रताप’, सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ५८

२७५) उनि – ‘रामदास आणि रामदासी’, श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड, पृ. क्र. १०५

२७६) उनि – ‘श्रीदासायन’ पृ. क्र. ३४७

२७७) तत्रैव, पृ. क्र. ३४८

२७८) उनि – ‘रामदास आणि रामदासी’, श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड,पृ. क्र. ११०

२७९) उनि – ‘श्री गिरीधरकृत समर्थप्रताप’, सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ६०

२८०) उनि – ‘रामदास आणि रामदासी’, श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड, पृ. क्र. ८८

२८१) तत्रैव, पृ. क्र. ९२

२८२) तत्रैव, पृ. क्र. ९३

२८३) तत्रैव, पृ. क्र. ९३

२८४) उनि – ‘श्री गिरीधरकृत समर्थप्रताप’, पृ. क्र. ६१

२८५) उनि – ‘रामदास आणि रामदासी’, श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड, पृ. क्र. ५४

२८६) उनि – ‘समर्थस्थापित दैवते’, पृ. क्र. १९३

२८७) उनि – ‘रामदास आणि रामदासी’, श्री सांप्रदायिक विविध विषय प्रथमखंड, पृ. क्र. ५४

२८८) तत्रैव, पृ. क्र. ५५

२८९) तत्रैव, पृ. क्र. ५५

२९०) तत्रैव, पृ. क्र. ५५,५६

२९१) तत्रैव, पृ. क्र. ५६,५७

२९२) तत्रैव, पृ. क्र. ६०

२९३) तत्रैव, पृ. क्र. ६१,६२

२९४) तत्रैव, पृ. क्र. ६३

२९५) उनि – 'समर्थस्थापित दैवते' पृ. क्र. १५७

२९६) तत्रैव, पृ. क्र. १५७

२९७) उनि – 'श्री गिरीधरकृत समर्थप्रताप', पृ. क्र. ६१

२९८) उनि – 'श्रीदासायन', पृ. क्र. ३३६

२९९) उनि – 'चिंता करितो विश्वाची' पृ. क्र. ३८५

३००) उनि – 'श्री गिरीधरकृत समर्थप्रताप', सत्कार्योत्तेजक सभा, पृ. क्र. ५७

३०१) उनि – 'चिंता करितो विश्वाची', पृ. क्र. ३८६–३८७

३०२) उनि – 'श्रीदासायन', पृ. क्र. ३४४

३०३) उनि – 'श्रीसमर्थचरितामृत', पृ. क्र. ३८

३०४) उनि – 'श्रीदासायन', पृ. क्र. १०२

३०५) तत्रैव, पृ. क्र. १०२

३०६) उनि – 'श्रीसमर्थावतार' पृ. क्र. ३३१

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

## ५.० प्रस्तावना

स्वधर्म संस्थापना आणि स्वराज्यनिर्मितीची अत्यंत आवश्यकता असण्याच्या काळात समर्थ रामदास कणखरपणे उभे राहिले. तल्लख बुद्धीमत्ता, सारासार विवेक, दूरदृष्टी, पूर्णपणे निर्भय आणि कणखर असणाऱ्या समर्थांनी सामाजिक दृष्टी ठेवूनच जीवनकार्य केले. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी त्यांनी घर सोडले, त्यानंतर बारा वर्षे त्यांनी पुरःश्चरण केले, अत्यंत खडतर अशी तपश्चर्या केली. या काळात त्यांनी अनेक कडू प्रसंग झेलले, लोकांची कुचेष्टा सहन केली पण त्याचवेळी ते अजून कणखर होत होते, त्यांची विशिष्ट प्रकारची जडणघडण होत होती. पुढील बारा वर्षे त्यांनी देशात तीर्थाटन केले. त्या बारा वर्षात संपूर्ण देशाच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचे अवलोकन केले. अनेक प्रसंग त्यांनी प्रत्यक्ष पाहिले तेव्हाच त्यांची सामाजिक कार्याची योजना तयार होत होती. परकीय यवनी सत्तांच्या जुलुमाखाली सतत वावरणारी जनता पाहिली आणि त्यांचेही काळीज पिळवटून निघाले. या विळख्यातून समाजाला सोडवायचे, त्यास प्रबोधन करायचे हा त्यांनी निश्चय केला.

आपल्या कार्याला बैठक हवी म्हणून समर्थांनी ' स्वरूप संप्रदाय ' अर्थातच ' रामदासी संप्रदाय ' प्रवर्तित केला. त्याआधीच्या काळापासून जे संप्रदाय आपल्याकडे प्रचलित होते, त्यापेक्षा अतिशय वेगळा असा संप्रदाय सामाजिक भूमिकेवरच लक्ष केंद्रित करणार होता. लोकसंग्रह करून उत्तमोत्तम शिष्य मिळवून त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरू केले. श्रीरामचंद्रांसारख्या पराक्रमी देवतांचा आदर्श समाजासमोर ठेवून कीर्तन–प्रवचन या माध्यमातून प्रबोधन करीत लोकांची मने अन्यायाविरूध्द बंड करण्यासाठी तयार केली. त्यांची मनं कणखर, निर्भय केली. स्वतंत्र स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न त्यांच्या मनात फुलवले. हरिकथानिरूपण, राजकारण, सावधानता आणि साक्षेप याची बैठक आपल्या सामाजिक कार्याला देऊन समर्थांनी लोकांना शिकवण दिली. सामाजिक भूमिकेत त्यांचे एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे उत्तमोत्तम महंत तयार करणे आणि मठनिर्मिती करून मठांना आपल्या संप्रदायाचे प्रसार – प्रचार –

आभ्यासकेंद्राचे स्वरूप देणे. कृष्णातीरी त्यांचे मुख्य कार्य पार पडत होते कारण मसूर परगणा शहाजीराजांनी त्यांना कार्यासाठी देऊ केला होता आणि त्याच प्रांतात शिवाजीमहाराज स्वराज्यनिर्मितीसाठी झटत होते. तेथेच त्यांची भेट होऊन दोघांचे स्वप्न साकारणार होते. त्यामुळे या सर्व भोवतालच्या प्रदेशात समर्थांनी योग्य स्थळांची निवड करून मठ स्थापना केली. अधिपती म्हणून महंतांची नियुक्ती केली. या मठांद्वारे महंतांनी संप्रदायाचा प्रसार केला. लोकांना परमार्थ तर शिकविलाच पण त्याचबरोबर शिवरायांच्यासाठी अप्रत्यक्ष राजकारण करून, सामाजिक दृष्टीकोन ठेवून स्वराज्याप्रती त्यांची मने तयार केली. समर्थांच्या आणि शिष्य–महंतांच्या कार्याला यश आले आणि ‘ आनंदवनभुवन ’ पुन्हा एकदा निर्मिले गेले.

त्याचवेळी समर्थांनी उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती केली. त्यातील त्यांचे तत्त्वज्ञान अतिशय उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या महंतांनी खूप सुंदर वाङ्मयलेखन केले आहे. अशारीतीने सर्व संतांमध्ये समर्थांचा ठसा वेगळेपणाने उमटला आहे. आध्यात्माबरोबरच समाज कसा सुखी होईल, परकीय सत्ता झुगारल्या जाऊन स्वधर्म संस्थापना आणि स्वतंत्र राज्य कसे निर्माण होईल हे त्यांचे ध्ये होते. अत्यंत असाधारण अशी त्यांची सामाजिक भूमिका होती. वेण्णास्वामी, कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, दिनकरस्वामी, दिवाकर गोसावी, वासुदेव गोसावी, भीमस्वामी अशा अनेक महंतांनी समर्थांनी स्थापन करून दिलेल्या मठांद्वारे सामाजिक कार्याची भूमिका यशस्वीरित्या पार पाडली.

## ५.१ संशोधन अभ्यासाचे फलित

पहिले प्रकरण प्रस्तावनेचे असून त्यामध्ये संशोधनाच्या अभ्यासामागील भूमिका, विषयाचे महत्त्व आणि बैठक, विषय निवडीचे कारण, संशोधन समस्या, संशोधनाची ध्येये आणि उद्दिष्टे व संशोधनाची गृहितके स्पष्ट केली आहेत.

दुसऱ्या प्रकरणात संशोधनाचे सर्वेक्षण स्पष्ट केले आहे. या विषयावर यापूर्वी काय अभ्यास केला गेला आहे याचा आढावा घेतला आहे.

तिसऱ्या प्रकरणात समर्थांचे चरित्र, कार्य आणि वाङ्मय, समर्थांचा सामाजिक दृष्टीकोन या गोष्टी लक्षात घेऊन, संशोधनाचा अभ्यास कसा केला आहे ते मांडले आहे.

चौथ्या प्रकरणात समर्थांचे चरित्र आणि वाङ्मय, मराठीतील पाच संप्रदाय, समर्थांचे सामाजिक कार्य, समर्थांची महंत आणि मठ निर्मिती आणि समर्थांचे प्रमुख मठ आणि मठाधिपती यांचा अभ्यास केला आहे.

पूर्वापार सूर्यापासना आणि रामोपासना असणाऱ्या घराण्यात सूर्याजीपंत आणि राणूबाई या दांपत्यापोटी समर्थांचा जन्म झाला. रामनवमीच्या दिवशी रामजन्माच्यावेळेसच त्यांचा जन्म झाला. त्यामुळे हे बालक आगळेवेगळे आहे, प्रत्यक्ष रामरायांचा आशीर्वाद असलेले आहे याची सर्वांनाच खात्री पटली. समर्थांच्या प्रखर बुद्धीमत्तेची साक्ष त्यांच्या शिक्षणावरूनच प्रथम लक्षात येते. केवळ काही दिवसातच ते लिहायला–वाचायला शिकले. एकपाठी असल्याने घोकंपट्टी त्यांनी कधी केलीच नाही. घरीच वाचन–मनन केले. ' सतत उद्यागशीलता ' हा त्यांचा महत्त्वाचा पैलू दिसतो तो त्यांच्या सततच्या उनाडपणा, खोडकरपणा, हूडपणा यातून. पुढे समाजाला बलसंपदेचे महत्त्व जे त्यांनी पटवून दिले होते, त्यापूर्वी लहानपणी ते स्वतः शारीरीक संपदेत पुढे होते. सूर्यनमस्कार, पोहणे, पळणे, उड्या मारणे यातूनच ते बलसंपन्न झाले होते. बालपणात त्यांनी अनेक चमत्कारांचे दर्शन घडवित आपल्या असामान्य व्यक्तीमत्त्वाचे दर्शनही घडवले. भविष्यकाळात धर्मसंस्थापना करायची आहे असा आशीर्वाद आणि उपदेश प्रत्यक्ष रामचंद्रांकडून मिळाला असल्याने आपल्या कार्याची जाण असणारे समर्थ स्वतःच्या लग्नमंडपातून अतिशय सावधपणाने निसटले ते गोदावरी नदीतून कधी पोहून तर कधी कडेने चालत अवघ्या काही दिवसातच नाशिक पंचवटीस पोहोचले, यातून त्यांची पोहण्याची आणि चालण्याची क्षमता दिसते. पंचवटीच्या श्रीरामरायांचे दर्शन आणि आज्ञा घेऊन समर्थांनी टाकळी येथे स्थिरावून बारा वर्षे पुरःश्चरण आणि खडतर तपश्चर्येला प्रारंभ केला. एवढ्या लहानपणी घर सोडून ही तपश्चर्या केली. त्यांच्या 'चिंता करितो विश्वाची' याची नांदीच होती. या काळात तीन विलक्षण प्रसंगातून त्यांची जाण कळते, ते जाणण्याची क्षमता कळते. ते तीन प्रसंग म्हणजे नाशिकला खेळोजीराजे भोसले यांच्या पत्नीला यवनांनी पळविले, शहाजीराजांची भेट आणि गिरीधरपंत कुलकर्णी यांना श्रीकृपेने जीवनदान दिले. पुढे त्यांनी बारा वर्षे संपूर्ण देशात भ्रमंती करून देशाची सर्व स्थिती पाहिली, तिचा अभ्यास केला. वयाची २४ ते ३६ हा बारा वर्षाचा काळ म्हणजे आपल्या आयुष्याचे ध्येय, कार्याचे नियोजन पक्के होण्याचा होता. त्याचप्रमाणे ते शहाजीराजांच्या सल्ल्याने कृष्णातीरी परत आले.

कृष्णातीरावर आल्यानंतरच्या काळात त्यांची दूरदृष्टी आणि उत्तम नियोजन याची साक्ष पटते, या काळात कृष्णातीराचा संपूर्ण परिसर पालथा घालून त्यांनी अनेक शिष्य गोळा केले. मंदिरांची स्थापना केली. कथा–कीर्तनातून समाजप्रबोधनाची सुरूवात केली. शिवरायांची भेट घेऊन वेळोवळी त्यांना मार्गदर्शन केले. त्यांना राजधर्म सांगितला आणि राजकारणात अप्रत्यक्षपणे मोठे सहाय्य केले. महंतांना मठाधिपती करून संप्रदायाचा प्रचार, लोकशिक्षणावर भर दिला. हे सर्व कार्य चालले होते ते स्वधर्म संस्थापना आणि स्वराज्यनिर्मिती करून आनंदवनभुवन निर्माण करण्याचे, जे शिव–समर्थ या दोघांचे स्वप्न होते ते साकार झाले. मात्र वयाच्या अवघ्या पन्नासाव्या वर्षीच शिवरायांचे निर्याण झाले आणि आपलेही कार्य समाप्त होण्याची जाणीव समर्थांना झाली. त्यानंतर दोन वर्षातच समर्थांनी सज्जनगडावर देह ठेवला आणि आपला अवतार संपविला.

समर्थांच्या सामाजिक कार्यात त्यांचे कर्तृत्व दिसते त्यांच्या वाङ्मयीन कार्यातही दिसते. दासबोध, आत्माराम, मनोबोध, रामायण ही त्यांची वाङ्मय निर्मिती सर्वात्कृष्ट, जगाला ज्ञान देणारी तसेच त्यांची करूणाष्टके, आनंदवनभुवनी, पत्ररचना यातून वेगळा ठसा उमटला आहे. वाङ्मयाचे सर्व प्रकार त्यांनी हाताळले आहेत. आपल्या वाङ्मयातूनही त्यांची सामाजिक भूमिका स्पष्ट दिसते.

मराठीतील, महाराष्ट्रातील पाच संप्रदाय नाथ, महानुभाव, वारकरी आणि दत्त यांचे प्रवर्तन, त्या त्या प्रवर्तकांचे चरित्र, कार्य, संप्रदायाचे महत्त्व, वाङ्मयीन संपदा याबरोबरच समर्थांचा ' रामदासी ' संप्रदाय यांच्या अत्यंत आगळ्यावेगळ्या तत्त्वांवर आधारलेले प्रवर्तन आणि महत्त्व याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. इ. स. ९ व्या, १० व्या शतकात गोरक्षनाथांनी नाथ संप्रदाय प्रवर्तित केला. शुद्ध योगमार्गाच्या आचरणाला त्यांनी महत्त्वाचे वळण दिल्याचे दिसते. वर्णभेद, रूढी, कर्मठपणा याला परमतत्त्व अनुभूती निर्माण केल्यामुळे समकालीन व उत्तरकालीन असणाऱ्या संप्रदायांवर नाथ संप्रदायाचा प्रभाव पडत होता. परंतु संप्रदायातील नियमांचे कठोर पालन समाज करू शकला नाही आणि तांत्रिक साधना, शक्तीपूजा याकडे वळून विकृतीकडे झुकला. पुढे मात्र त्याचा प्रभाव कमी झाला. संप्रदायातील वाङ्मयावरून योगमार्ग आचारावर आधारलेले तत्त्वज्ञान समोर येते.

तेजस्वी व्यक्तीमत्त्व आणि वैराग्य असलेल्या चक्रधरस्वामींनी यादव राजांच्या काळात महानुभवसंप्रदायाचे प्रवर्तन केले. द्वैती असलेल्या या संप्रदायाने बहुजन समाजालाही परमार्थाकडे वळवून जनतेचा आत्मविकास केला. धर्मप्रचारार्थ कार्य करूनही पुढे शुचित्त्व–अशुचित्व, स्त्रियांना असलेली संन्यासाची मुभा या प्रवृत्ती धुडकावून टाकण्याच्या प्रवृत्तीने समाज या संप्रदायापासून दूर जाऊ लागला. सांप्रदायिकांनी महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगणारी वाङ्मयनिर्मिती केली.

अजुनही वारकरी संप्रदायाच प्रभाव समाजावर आहे कारण लक्षात येते की संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकारामांनी तत्कालीन लोकांच्या मनात आध्यात्मिक बैठक निर्माण करून दुबळ्या मनांना उन्मन केले, समाजाला व्यसनमुक्त करायचे कार्यही केले. वारकरी संप्रदायातील संत, स्त्री संत यांनी अतिशय भावपूर्ण, अर्थपूर्ण अशी वाङ्मय निर्मिती केली आहे.

प्राचीन काळापासून प्रचलित असलेल्या दत्तोपासनेला सांप्रदायिक स्वरूप नृसिंहसरस्वतींनी दिले. एकाच वेळी तीन राज्यात दत्तसंप्रदाय प्रभावशाली झाला. श्रीपादवल्लभ, नृसिंहसरस्वती आणि स्वामी समर्थ या अवतारी पुरूषांनी यवनी सत्तेच्या जुलमांना नियंत्रित केले, लोकांना आध्यात्मिक ज्ञान देऊन सन्मार्गी लावले. मात्र संप्रदायातील कडक उपासना, आचरण, सोवळे–ओवळे, कर्मठपणा सर्वसाधारण लोकांना पेलवला नाही, त्यामुळे दत्तसंप्रदायाचा प्रभाव कमी होऊ लागला.

रामदासी संप्रदायाचा अभ्यास करण्यासाठी या चारही संप्रदायांचा आढावा घेतला. सर्व संप्रदाय तत्कालीन स्थितीप्रमाणे कार्यरत होते. पण समर्थांच्या काळात यवनी सत्तांचा अंमल फारच होता. केवळ सामाजिक दृष्टीकोन ठेवून कार्यरत राहिलेला रामदासी संप्रदाय अत्यंत वेगळा आणि प्रभावशाली ठरला. समर्थांनी जरी कृष्णातीरी राहून संप्रदाय प्रवर्तित केला तरी त्यापूर्वी त्यांनी संपूर्ण देशाच्या परिस्थितीचे अवलोकन केले आणि त्याचा अभ्यास करूनच संप्रदायाच्या कार्याचे नियोजन केले. तब्बल वीस लक्षणांनी युक्त असलेल्या संप्रदायात समर्थांनी शुध्द उपासना, वैराग्य आणि गुरूपरंपरेला महत्त्व दिल्याचे लक्षात येते. फक्त पराक्रमी देवतांना आराध्य दैवत मानले गेले. या संप्रदायाचे वाङ्मय परिपूर्ण, अर्थपूर्ण असून प्रचंड प्रमाणावर निर्मिले आहे.

समर्थांची सामाजिक भूमिका काय होती, त्या कार्याची बैठक कोणती होती, कार्यपूर्ती कशी झाली हेही मांडले आहे.

समर्थांचा सामाजिक दृष्टीकोन, समाजाप्रती असलेली तळमळ ही त्यांच्या बालपणातील अनेक प्रसंगातून दिसते. स्वतःच्या लग्नाबद्दल आईला शिताफीने वचन देणाऱ्या समर्थांनी मंगलाष्टकांच्या वेळेसच विश्वाची चिंता करण्यासाठी पलायन करण्याचे धाडस दाखविले आहे. मूळातच वेरागी अंगी असल्याने समर्थांनी बारा वर्षे कठोर तपश्चर्या केली, बारा वर्षे देशात संचार करून सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थिती पाहिली. आयुष्यातील या चोवीस वर्षाच्या काळात त्यांनी परिस्थितीचा खूप अभ्यास केलेला त्यांच्या पुढच्या भूमिकेवरून समजतो.

कृष्णातीरी आपल्या सामाजिक कार्याची सुरूवात करून कार्याला सांप्रदायिक स्वरूप दिले. कथा–कीर्तन–प्रवचन करून समाजाला कणखर बनविण्यासाठी प्रयत्न केलाच, परंतु हे एवढे अप्रत्यक्ष राजकारणही तेवढे सोपे नव्हते. त्यामुळे समर्थांनी शिष्यनिर्मिती केली, त्या शिष्यांना सर्व गुणसंपन्न केले. त्यांचे सामाजिक कार्य म्हणजे मोठा व्याप होता, चळवळ होती. त्यासाठी सर्व प्रांतात मठनिर्मिती करून त्यांना सामाजिक चळवळीचे केंद्र म्हणून महत्त्व दिले आणि तरबेज झालेल्या महंतांची त्या मठांवर अधिपती म्हणून नेमणूक केली. या महंतांनी संप्रदायाचा सर्वार्थानी प्रसार करून मोठे समाजकार्य पार पाडले आहे.

समर्थांची कार्यपध्दती अगदी वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्या प्रत्येक कृतीला पाया असायचा, एक सामाजिक दृष्टीकोन असायचा. त्यामुळे समाजप्रबोधनासाठी चतुःसूत्रीचा पाया योजला. हरिकथा निरूपणातून समाजाला भक्तीमार्ग दाखविला. दुसरे म्हणजे राजकारण, त्यातून समाजाने स्वराज्यनिर्मितीसाठी अप्रत्यक्ष राजकारण कसे करावे हे शिकविले. सामाजिक जीवनात प्रत्येक गोष्टीत सावधानता हवी हे त्यांचे तिसरे सूत्र होते, तर त्यांचे चौथे सूत्र खूप महत्त्वाचे होते ते म्हणजे सतत प्रयत्न, प्रयत्नशीलता, उद्योगशीलता हे होते. स्वधर्मसंस्थापना आणि स्वराज्यनिर्मितीच्या कार्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यामुळे त्यांचे सामाजिक कार्य विशेष उल्लेखनीय होते.

समर्थांची महंतनिर्मिती आणि मठनिर्मिती अभ्यासली आहे. तत्कालीन परिस्थितीत याची खूप आवश्यकता होती म्हणून समर्थांनी अतिशय नियोजनबद्ध अशी ही निर्मिती केली आहे. अर्थातच त्यांच्या महंतांनी समर्थांच्या सामाजिक दृष्टीकोनाला न्याय दिला आहे.

समर्थांनी शिष्य आणि महंत यातील फरक स्पष्ट केला. महंत म्हणजे त्यांना मठाधिपती होण्याचा, अजून मठनिर्मिती करायचा आणि शिष्यनिर्मितीचा अधिकार होता. समर्थांचे शिष्य चांगले तावून–सुलाखून निघालेले असायचे. लिहिणे–वाचणे, प्रचिती, अनुभव, संगीतज्ञान, प्रबोध, वैराग्य, राजकारण, अव्यग्रता, प्रसंगाची जाण अशा गुणांनी युक्त असायचे. समर्थांची महंतनिर्मिती आडाखेबध्द होती. केवळ यामुळेच महंतांनी कार्य करताना दुःखी, दरिद्री लोकांच्या मनावर फुंकर घातली. त्यांचा उद्धटपणा, राग सोसण्याची तयारी ठेवून अवघड प्रसंगही हातोटीने, संमजसपणे हाताळण्याची शिकवण समर्थांनी महंतांना दिलीच होती. अशा गुणांच्या जोरावरच महंतांनी ज्ञान दिले, समाजप्रबोधन केले, मठांना सामाजिक चळवळीच्या केंद्राचे स्वरूप दिले.

समर्थांनी केलेले सामाजिक कार्य खूप व्यापक असल्याने त्यांनी मठनिर्मिती केली, त्यायोगेच एवढी मोठी क्रांती घडली. स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी मठनिर्मिती ही महाराष्ट्र परिसरात आणि मुख्यत्त्वेकरून शिवरायांच्या मुलुखातच झाली आहे. समर्थांनी मठांचे जाळेच पसरविले होते. या मठांचा उपयोग समर्थांनी आध्यात्माचे, प्रबोधनाचे केंद्र बनवून राजकारणात पूर्णपणे सहभागी होण्यासाठी केला असे लक्षात येते.

महाराष्ट्रातील आणि प्रामुख्याने कृष्णातीर म्हणजेच सातारा, सांगली, कोल्हापूर, तर अहमदनगर, सोलापूर, पंढरपूर, नाशिक, कोकण, कऱ्हाड, दक्षिणेतील तंजावर, मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर या प्रांतातील मठांवर प्रकाश टाकला आहे कारण समर्थांच्या सामाजिक कार्याचा हेतूच प्रामुख्याने स्वराज्यनिर्मिती हा होता आणि हे प्रांत तत्कालीन परिस्थितीत परकियांच्या वर्चस्वाखाली होते. या सर्व मठांचा अभ्यास करताना लक्षात येते की त्यावेळी सहेतुकच हे मठस्थापन झाले. त्याशिवाय त्या मठांवर अधिपती म्हणून कोणत्या महंताची नेमणूक करायची या मागे सुद्धा समर्थांचा हेतू दिसून येतो.

सातारा, सांगली, कोल्हापूर, कोकण या परिसरात वेणास्वामी – मिरज, दिवाकर गोसावी – महाबळेश्वर, दत्तात्रय गोसावी – शिरगांव, अंबिकाबाई – राशिवडे आणि वाळवे, बाजी गोसावी – शिरवळ, वासुदेव गोसावी – कण्हेरी, सीताबाई – शहापूर, सीतारामबुवा – चिपळूण. हे मठ आणि महंत अभ्यासले आहेत. तर अहमदनगर, सोलापूर, नाशिक, लातूर अशा प्रांतातील बाळकराम व रोकडाराम – कारंजे, त्रिंबकराज – भालगांव, आण्णाप्पा निलंगेकर – निलंगे,

दिनकर स्वामी – तिसगांव, कल्याणस्वामी – डोमगांव आणि परंडा, देवदास महाराज – दादेगांव, अनंतबुवा – मेथवडे, उद्धव गोसावी – टाकळी, हे मठ आणि महंत अभ्यासले. याशिवाय दक्षिणेत भीमस्वामी – तंजावर, उद्धवस्वामी – इंदूरबोधन ( उद्धवस्वामी दोन मठांचे मठाधिपती होत ) आणि मध्यप्रदेशमध्ये दत्तात्रय गोसावींच्या परंपरेतील ग्वाल्हेर मठ अभ्यासले आहेत. या मठातील मठाधिपतींनी त्या त्या प्रांतात आवश्यकतेप्रमाणे संप्रदायाचे कार्य सामाजिक हेतू ठेवूनच केले आहे, ते सुध्दा यशस्वीरितीने. या जोडीला अनेक महंतांनी अतिशय उल्लेखनीय अशी वाङ्मयीन संपदाही निर्माण केली, त्याचाही दर्जा खूप उच्च आहे.

## ५.२ निष्कर्ष

समर्थ रामदासांचे चरित्र, वाङ्मय, मराठीतील प्रमुख संप्रदाय, समर्थांची सामाजिक भूमिका समर्थांची महंत आणि मठनिर्मिती, प्रमुख मठ आणि मठाधिपती यांचा अभ्यास केल्यावर पुढील निष्कर्ष हाती येतात.

- समर्थांचा जन्म म्हणजे सूर्योपासक ठोसर घराण्यास प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांचा आशीर्वाद होता. मारूतीरायांचा अवतार असलेल्या समर्थांची त्यांच्या एवढीच रामरायांवर श्रध्दा होती.
- समर्थांच्या बाबतीत ' शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी ' ही उक्ती तंतोतंत जुळते कारण सूर्याजीपंत आणि राणूबाई या सत्शील, धार्मिक, सदाचारी दांपत्याच्या पोटी समर्थांसारखा महान तपस्वी जन्मला.
- सूर्याजीपंत आणि राणूबाईंनीही मिळालेल्या वरदानाची जाण ठेवून समर्थांवर उत्तम संस्कार केले. समर्थांनीही आपल्या घराण्यातील सूर्योपासना आणि रामोपासना शेवटपर्यंत निष्ठेने केली.
- समर्थांनी स्वतःचे बालपण नुसते खोड्या करण्यात, उनाडपणा करण्यात घालवले नाही तर त्यातूनच चालणे, बोलणे. पोहणे, सूर्यनमस्कार याद्वारे स्वतःची शारिरिक जडण–घडण होण्याकडे हेतूपूर्वक लक्ष दिले. प्रखर बुद्धीमत्ता, युक्तीवाद, दूरदृष्टी याचे प्रत्यंतर त्यांच्या लहानपणात दिसते.

- लहानपणापासूनच समर्थ आपल्याहूनही लहान मुलांशी जवळीक साधत. तसेच मोठेपणीही शिष्य निवडताना लहान मुलेच ते निवडत कारण त्यांचे संस्कारक्षम मन आणि शरीर असते.
- लहानपणी सुद्धा समर्थांनी अनेक चमत्कार दाखविले पण ते चांगल्या हेतूनेच केले.
- उपासना करताना त्यासाठी बैठक हवी या हेतूने त्यांनी लहानपणीच श्रेष्ठांजवळ अनुग्रहासाठी हट्ट धरला, श्रेष्ठ तयार होत नाहीत म्हणल्यावर गावाबाहेरील मारूतीमंदिरात अनेक दिवस ध्यानस्थ बसले. स्वतः मारूतीराय प्रकट होऊन त्यांनी श्रीरामचंद्रांना प्रकट व्हायला सांगितले आणि प्रत्यक्ष रामरायांकडून समर्थांना अनुग्रह मिळाला, प्रभूरामचंद्रच त्यांचे गुरू झाले. यातून लहानपणापासूनच समर्थांची मोठी योग्यता होती याचा प्रत्यय येतो.
- समर्थांना स्वतःला नेहमीच जाण असायची की आपल्याला पुढे संसारात न पडता समाजाचा उद्धार करायचा आहे. ते कधीही आईने केलेल्या विवाहाच्या आग्रहाला भुलले नाहीत उलट अत्यंत हुशारीने वचन देऊन ऐन मंगलाष्टकांच्या वेळी तिथून सटकले.
- विवाह मंडपातून पलायन केल्यावर नाशिक पंचवटी कुठे आहे हे माहित नव्हते पण गोदावरीचा उगम तिथे आहे म्हणजे आपल्याला प्रवाहाच्या उलट्या दिशेने उगमाकडे जायचे आहे, यात समर्थांच्या बुद्धीची चुणुक  दिसते.
- केवळ काही दिवसातच वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी समर्थांनी गोदावरी नदी पोहून तर कधी कडेने चालत जाऊन नाशिकपर्यंतचा पल्ला गाठला, यातून त्यांच्या लहानपणातीलन शारिरीक सामर्थ्याची झलक दिसते.
- टाकळीच्या पुरःश्चरणात ब्राह्ममुहुर्तावर उठून नदीत उभे राहून गायत्रीमंत्रांचा जप, त्रयोदशाक्षरी मंत्रांचा जप केला. त्याचबरोबर शेकडो सूर्यनमस्कार घातले. केवळ भिक्षेवर निर्वाह, खडतर तपश्चर्या, यात त्यांची निष्ठा आणि आत्मविश्वास दिसतो. लोकांची कुचेष्टा सहन करताना आपल्या निश्चयापासून ते तसूभरही ढळले नाहीत.
- टाकळीला शहाजीराजांच्या भेटीत जी भविष्ययोजना ठरली त्याचा अभ्यास करण्यासाठी तब्बल बारा वर्षे देशभर संचार करून देशस्थितीचे अवलोकन केले. यात त्यांची दूरदृष्टी, नियोजनपूर्वक कार्य, निर्भयता, कणखरपणा, शारिरीक सामर्थ्य, आत्मविश्वास असे अनेक गुण प्रकर्षाने दिसतात.

- कृष्णातीरी आगमन केल्यानंतर वाई, महाबळेश्वर, ब्रह्मारण्य या परिसरात केवळ न हिंडता आपल्या सामाजिक भूमिकेच्या दृष्टीतूनच या परिसराची पाहणी केली, निसर्गाचा अभ्यास केला, गडकिल्ल्यांची माहिती करून घेतली, लोकांशी जवळीक साधली. यातूनच त्यांच्या कार्याची विचारपूर्वक केलेली सुरूवात दिसते.
- स्वधर्म संस्थापना, स्वराज्यनिर्मिती, स्वतंत्रराज्याचा जाणता राजा, ह्यासाठी अप्रत्यक्ष राजकारण करून, समाजप्रबोधन करून प्रत्यक्ष शिवरायांना राजधर्म शिकवून सहाय्य केले. हे कार्य त्यांनी अत्यंत निष्ठेने पार पाडले आहे. समर्थांचे आनंदवनभुवनाचे स्वप्न साकार होण्यास याचीच मदत झाली.
- समर्थांना स्वतःच्या अवतारसमाप्तीची जाणीव झाली ती शिवरायांच्या निर्वाणानंतर. तेव्हा स्वराज्याच्या भविष्यासाठी, संप्रदायाच्या भविष्यासाठी अनेक योजना आखून दिल्या, शिष्य–महंतांना मार्गदर्शन केले. संभाजीराजांना योग्य मार्गदर्शन केले. ही त्यांची भविष्यातील योजनांची आखणी कौतुकास्पद आहे.
- प्रत्यक्ष सामाजिक कार्य करताना समाजाला तत्त्वज्ञान, आध्यात्ममार्ग, कर्तव्यनिष्ठा अशा गोष्टी समजाविण्यासाठी उत्कृष्टवाङ्मयीन संपदा निर्माण केली. अनुभव आणि प्रचिती या दोन तत्त्वांवर आधारलेले वाङ्मय समर्थांनी पिढ्यान्‌पिढ्या या तत्त्वज्ञानाचा प्रसार होईल या हेतूनेच निर्मिले. यातून त्यांचे हे वाङ्मयीन कर्तृत्व किती वाखाणण्यासारखे आहे याची साक्ष पटते.
- आपल्या स्वरूप संप्रदायाचे प्रवर्तन करताना समर्थांनी इतर प्रमुख म्हणजे नाथ, महानुभव, वारकरी, दत्त या संप्रदायातीलही उत्तम तत्त्वज्ञानाला महत्त्व दिले आहे.
- प्रत्येक सांप्रदायिकाची योग्य जडण–घडण झालीच पाहिजे यावर समर्थांनी भर दिला. वीस लक्षणांनी परिपूर्ण संप्रदायात समर्थांनी प्रत्येक शिष्य परिपूर्ण असण्यावर त्यांचा कटाक्ष होता. कोणा ऐऱ्यागैऱ्याला त्यांनी हेतूपूर्वक सामावून घेतले नाही.
- समर्थांचा संघटना या तत्त्वावरच मोठा विश्वास होता, त्यामुळे समर्थांनी स्वतः संघटनात्मक कार्यालाच प्राधान्य दिले आणि प्रत्येक शिष्याकडून संघटनात्मक कार्य करून घेण्यावर भर देऊन त्यांनाही तीच शिकवण दिली.

- समर्थ नेहमी सर्वदूर संचार करीत, त्यामुळे संप्रदायाचे कार्य व्यवस्थित होण्यासाठीच त्यांनी चाफळ, शिवथरघळ, सज्ज्नगड ही केंद्रे उभारली. तरीसुद्धा समर्थांनी स्थापलेले सर्व मठ हे चळवळीचे केंद्रच पाहिजे यावर भर दिला.
- समर्थांनी केलेले सामाजिक कार्य असाधारण आहे. त्या कार्यात हरिकथा, राजकारण, सावधपणा आणि साक्षेप याची शास्त्रशुद्ध बैठक दिली आहे. यातून त्यांचे नियोजनबद्ध कार्य दिसते.
- सामाजिक स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी समर्थांनी महंत आणि मठनिर्मिती करून एक मोठी सामाजिक चळवळ उभारून एक मोठे आव्हानात्मक कार्य केले, याची जाणीव होते, त्याची साक्ष पटते.
- समर्थांनी कधी कोणाला सहजपणे शिष्य केले नाही, महंतीपद दिले नाही. तर सर्व कसोट्यांमध्ये उत्तीर्ण झाले तरच त्यांना संप्रदायात प्रवेश देत यावरून त्यांनी शिष्य निर्मितीत हयगय केला नसल्याचा निर्वाळा मिळतो. कोणतीही सूट न देता त्यांना तावून–सुलाखूनच संप्रदायाच्या जबाबदाऱ्या दिल्या.
- समर्थांनी मठनिर्मिती करून, महंतांची मठाधिपती नेमणूक करून फक्त जबाबदाऱ्या न टाकता, त्यांच्या कार्यावर वेळोवळी लक्ष दिले. दरवर्षी आपल्या कामाचा वृत्तांत देण्याचा त्यांनी दंडक घालून दिला होता. यातूनच त्यांची नियोजनबध्दता पुन्हा एकदा लक्षात येते.
- समर्थांनी आपले कार्य प्रामुख्याने कृष्णातीरी विस्तारले. जरी शहाजीराजांच्या सल्ला–मसलतीने हा कार्यारंभ केला तरी तत्पूर्वी त्या परिसराचा, निसर्गाचा त्यांनी आधी अभ्यास केला. शिवरायांचे कार्यही याच प्रांतात चालू आहे आणि स्वराज्यसंस्थापनेच्या दृष्टीने हा प्रांत महत्त्वाचा आहे याची खात्री पटल्यावरच समर्थांनी त्याप्रमाणे योजना राबवण्यास सुरूवात केली, यात त्यांची विलक्षण बुद्धमत्ता दिसते.
- वेणास्वामी, दिनकरस्वामी, कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, दिवाकर गोसावी, दत्तात्रयस्वामी, भीमस्वामी, अंबिकाबाई. सीतारामबुवा, बाजी गोसावी, वासुदेव गोसावी, देवदास महाराज, आणाप्पा निलंगेकर, त्रिंबकराज, बाळकराम, रोकडाराम, अनंतबुवा मेथवडेकर, रंगनाथ

गोसावी, सतीबाई यांचा चरित्र–कार्य–वाङ्मय याचा अभ्यास करताना त्यांचे अनेक गुण प्रकर्षाने समोर येतात.

- वर नमूद केलेले समर्थांचे हे मठाधिपती अत्यंत निष्ठावान होते. आपल्या कार्याशी आणि गुरूशी ते एकरूप झालेले दिसतात. आज्ञापालन हा त्यांचा महत्त्वाचा गुण होता. हे सर्व मठाधिपती अतिशय निष्ठावान, सदाचारी, कर्तव्यनिष्ठ, विवेकी असेच होते असे अनेक प्रसंगातून दिसते.
- सर्व मठाधिपतींनी समर्थांनी दिलेल्या जबाबदारीची सतत जाणीव ठेवल्याचे दिसते. या जबाबदाऱ्या पार पाडताना बुद्धीचा योग्य वापर केलेला दिसतो. कधीही बुद्धीचा विपरीत वापर केलेला आढळत नाही. प्रत्येक कार्याबद्दलच्या सामाजिक दृष्टीकोनाची जाणीव ठेवलेली दिसते.
- या मठाधिपतींनी संप्रदायाच्या विस्ताराचे कार्य, शिष्य–निर्मितीचे कार्य, मठांचे कार्य अतिशय योग्य प्रकारेच नाही तर उत्कृष्ट रीतीने केले आहे.
- संप्रदायाच्या कार्याबरोबरच बऱ्याच मठाधिपतींनी विपुल प्रमाणात वाङ्मयनिर्मिती केली. संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ–लेखन, काव्य–लेखन केले. प्रत्येकाची स्वतंत्र लेखनशैली होती. त्याच्यात त्यांची प्रासादिकता जाणवते.
- प्रत्येक मठाधिपतींनी आपल्या गुरूसारखेच सामाजिक भान ठेवूनच आपली कार्यपूर्ती केल्याचे त्यांच्या कार्यातून जाणवते

  एकूणच या विषयाचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की, समर्थांच्या आणि या मठाधिपतींच्या कार्यात वेगळेपणा आहे.

### ५.३ संशोधनाची पुढील दिशा आणि आधुनिक काळातील त्याचा उपयोग

या विषयावरील संशोधन खूप महत्त्वाचे आहे. जरी काळ बदलत चालला असला तरी मूलभूत गोष्टी तशाच असतात. समर्थांची भूमिका पूर्णपणे सामाजिक होती, हे या अभ्यासातून लक्षात येतेच. या भूमिकेत सर्वप्रथम समाजातील लोकांचे मानसिक स्थित्यंतर आवश्यक होते. शारिरीक क्षमताही तेवढीच महत्त्वाची होती. या दोन्ही गोष्टी बदलत्या काळातही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत.

पुढील काळात, जे मठ कार्यरत आहेत, त्यांचे कार्य असेच चालू राहिले पाहिजे, तसेच जे मठ नुसत्या मंदिराच्या स्थितीत आहेत, तिथे दैनंदिन उपासना, कीर्तने, प्रवचने, संस्कार केंद्रे वगैरे चालू केली तर त्या परिसरातील समाज पुन्हा याकडे वळविता येईल. काही मठ असे आहेत की जे मंदिराच्या स्थितीतही नाहीत, मोडकळीस आले आहेत, त्या मठांचा जीर्णोध्दार करून ते कार्यरत करण्यात येतील. अशा रीतीने मठांचे पुनर्वसन अतिशय गरजेचे आहे.

हे मठ जवळजवळ साडेतीनशे–चारशे वर्षापूर्वी स्थापन झाले असले तरी त्यांचे कार्य अजूनही म्हणजे या काळातही उपयोगी आहे आणि आवश्यकही आहे. कारण हे युग कितीही अधुनिक असले तरी प्रत्येक व्यक्ती ही सुसंस्कृतच हवी. लहानपणीच त्याच्यावर उत्तम संस्कार व्हायला पाहिजेत. मानसिक दुर्बलता न येता तो सबल असणेच गरजेचे आहे. तसेच मन निर्भय, कणखर हवे. त्याचबरोबर शारिरीक क्षमताही तेवढीच महत्त्वाची आहे. उत्कृष्ट बलसंपदेसाठी व्यायामाची गोडी लावणे आवश्यक आहेच. आध्यात्माचीही जोड याला मिळाली तर या आधुनिक काळात समाज उत्तमच घडेल. या आधुनिक काळात अनेक प्रगत सुविधा अत्यंत उपयोगी आहेत. उदा. फोन, कम्पुटर, इंटरनेट. पण लहानमुले त्यांच्या आधीन होत आहेत. त्यांचे मन संस्कार, उत्तम शारिरीक संपदा आणि सर्वांगीण मानसिक जडण–घडण यापासून दूर होत आहे. पण समर्थांनी जसे काळानुरूप बदल स्वीकारले आणि उत्तम रीतीने सामाजिक स्थित्यंतर घडविले, तसेच काळानुरूप बदल करून या मठांद्वारे उत्तम समाज घडविता येईल.

# संदर्भग्रंथसूची

# संदर्भग्रंथ सूची


१) **'आनंदवनभुवनी'**, शुभांगी भडभडे, सुयोग प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५/४/२०१६

२) **'आंध्र परिसरातील समर्थ संप्रदाय'**, प्रमोद दामोदर संत, प्रकाशक सौ. सुप्रिया प्र. संत, नागपूर, प्रथमावृत्ती, श्रीशिवराज्याभिषेक दिन राजशक ३३९.

३) **'कल्याणा, छाटी उडाली'**, सुनील चिंचोलकर, मोरया प्रकाशन, डोंबिवली(पूर्व), तिसरी आवृत्ती, २००८.

४) **'गिरीधरकृत समर्थप्रताप'**, प्रकाशक चिटणीस, सत्कोंत्तेजक सभा, धुळे, तिसरी आवृत्ती, १४ जानेवारी,२००५.

५) **'चिंता करितो विश्वाची'**, सुनील चिंचोळकर, श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, चतुर्थ्यावृत्ती, १५ ऑगस्ट २००९.

६) **'दत्तात्रयस्वामी शिरगांवकर'**, शिरगाव त्रिशताब्दी पुण्यतिथी स्मरणिका, ऑक्टोबर २०१७

७) **'दास डोंगरी राहतो'**, गोपाळ नीलकण्ठ दाण्डेकर, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाऊस ठाणे (प), अकरावी आवृत्ती, जून २०१२.

८) **'दासबोध प्रवेश'**, (पत्रद्वारा), श्री. हा. वा. केळकर पुणे.

९) **'पाच भक्ती संप्रदाय'**, र. रा. गोसावी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, १५ ऑगस्ट २००८.

१०) **'पाच संत चरित्रे'**, गोपाळ नीलकण्ठ दांडेकर, ,मॅजेस्टीक पब्लिशिंग हाऊस,ठाणे, जानेवारी २०११.

११) **‘प्रथमस्य प्रथमं टाकळी स्थानम्’**, सुधीर शिरवाडकर, श्रीसमर्थ सेवा मंडळ, नाशिक, प्रथम आवृत्ती, श्रीहनुमान जयंती २०१७.

१२) **‘भावार्थ दासबोध परिचय (पत्रद्वारा)’**, प्रकाशन श्री. व सौ. केंदूरकर, पुणे आवृत्ती १ली, १०–९–१९९६,.

१३) **‘मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास’**, डॉ. प्रल्हाद नरहर जोशी, नितीन प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १५ ऑगस्ट १९७२.

१४) **‘मराठी संतकवयित्री’**, प्राचार्य या.के. यादव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, ८ मार्च २०१२.

१५) **‘मठाधिपती’**, श्री. दिवाकर देशपांडे यांचे लिखित.

१६) **‘महाराष्ट्र संस्कृती’**, डॉ. पुरूषोत्तम गणेश सहस्त्रबुध्दे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, १९७९.

१७) **‘महाराष्ट्रातील पंथ’**, सुहास आगरकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २ नोव्हेंबर २००९

१८) **‘राजगुरू समर्थ रामदास’**, डॉ. शं. दा. पेंडसे, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती,२००३.

१९) **‘रामदास आणि रामदासी’**, ‘श्री सांप्रदायिक विविध विषय, प्रथम खंड’ सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, १८३९ वैशाख शुध्द २.

२०) **‘रामदास’**, प्रा. श. श्री. पुराणिक, चंद्रकला प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च १९९६.

२१) **‘वेणा पावली पूर्णविराम’**, सुनील चिंचोलकर, मोरया प्रकाशन, डोंबिवली(पूर्व), द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट २००९.

२२)  **‘समर्थ रामदास’**, शंकर वासुदेव अभ्यंकर, आदित्य प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती,२४ ऑगस्ट २०१६, पृ.क्र.११

२३)  **‘समर्थ श्रीरामदास विरचित सार्थ करूणाष्टके’**, श्रीसमर्थ ग्रंथभवन, पुणे, पहिली आवृत्ती, ५ फेब्रुवारी २०१७.

२४)  **‘समर्थांचा मानसपुत्र उद्धवस्वामी’**, डॉ. सौ. साधना सुधाकर गोखले, प्रकाशिका– डॉ. सौ. साधना सुधाकर गोखले, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१७.

२५)  **‘समर्थस्थापित दैवते’**, श्री. प्रमोद संत, प्रकाशक सौ. प्रमोद संत, नागपूर, आवृत्ती पहिली, २५ ऑक्टोबर २००७.

२६)  **‘समग्र समर्थ साहित्य’**, प्रकाशक ज्योर्तिभास्कर जयंत साळगावकर, दादर–मुंबई, प्रथमावृत्ती, रविवार ५ एप्रिल १९९८.

२७)  **‘सामर्थ्ययोगी रामदास’**, प्रभाकर पूजारी, समर्थ व्यासपीठ, पुणे,द्वितीय आवृत्ती, सन २०००

२८)  **‘सेतूमाधवपगडी’**, परचुरे प्रकाशन, गिरगांव, मुंबई, प्रथमावृत्ती. १३ ऑगस्ट १९८५.

२९)  **‘श्री समर्थशिष्य कल्याण’**, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, मोरया प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २०१३.

३०)  **‘श्री बडाराम एवम् श्रीसारंगपूर हनुमान मठ’**–३६५ सालोंकी मठ परंपरा का परिचय, इंदूरबोधन(निजामाबाद) तेलंगणा,

३१)  **‘श्री वेणी कवन आणि पंचीकरण’**, सत्कार्योत्तेजक सभा, द्वितीयावृत्ती, धुळे १५.५.२०११

३२)  **‘श्रीदासायन (सप्तकाण्डात्मक चरित्र)’**, अंतदास रामदासी, मोरया प्रकाशन डोंबिवली (पूर्व) तृतीय आवृत्ती, १३ ऑगस्ट २००९.

३३) **‘श्री गिरीधरकृत समर्थप्रताप’**, प्रकाशक चिटणीस, सत्कोंत्तेजक सभा धुळे तिसरी आवृत्ती, १४ जानेवारी,२००५.

३४) **‘श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन(पत्रद्वारा)’**, श्री. हा. वा. केळकर, पुणे २६वे पुनःमुद्रण, जानेवारी २०१०.

३५) **‘श्री समर्थ रामदासकृत आत्माराम’**, प्रा. के. वि. बेलसरे, श्री समर्थ सेवा मंडळ, सज्ञनगड, आवृत्ती नववी, गुढी पाडवा शके १९३२ सन २०१०.

३६) **‘श्री ज्ञानेश्वरी’ गीताप्रेस’**, गोरखपूर, तिसावे पुनर्मुद्रण

३७) **‘श्री समर्थांच्या सामाजिक जाणीवा’** सौ. कुमुदिनी देशपांडे, सत्कार्यात्तेजक सभा, धुळे, प्रथमावृत्ती, श्रीदासनवमी शके १९२३.

३८) **‘श्रीसमर्थावतार’**, श्री. शंकर श्रीकृष्ण देव, प्रकाशक केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, गिरगांव मुंबई, दुसरी आवृत्ती,१९८९.

३९) **‘श्रीसमर्थ चरित्रामृत’**, श्री समर्थ सेवा मंडळ, सज्ञनगड, प्रकाशक श्री समर्थ सेवा मंडळ, सज्ञनगड, आवृत्ती सव्हीसावी, दसरा २०१५.

४०) **‘श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय’**, र.रा.गोसावी, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, ऑगस्ट १९८१.

४१) **‘श्री स्वानुभव दिनकर’**, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे आणि दिनकर मठ, तिसगांव, द्वितीयावृत्ती, गुरूपौर्णिमा, राज्याभिषेक शक ३८२ (३१/०७/२०१५)

४२) **‘श्री सीता स्वयंवर’**, सत्करयोत्तेजक सभा, धुळे, लोकव्रत प्रकाशन’, सातारा द्वितीव आवृत्ती ११/११/२०१०.

४३) **‘श्रीसमर्थ रामदासस्वामी विरचित सार्थ दासबोध’**, श्रीसमर्थ ग्रंथभवन, प्रकाशक श्री. ना. ढवळे, पुणे, सप्तमावृत्ती, वर्ष प्रतिपदा, शक १८९८.

# परिशिष्ट

# परिशिष्ट

## अ) मुलाखत : कौस्तुभबुवा रामदासी – मिरज मठाधिपती

❖ नांव : कौस्तुभबुवा रामदासी

शिक्षण : बी.ई.

❖ आपले जन्मगांव कोणते?

माझे जन्मगांव मिरज हे आहे.

❖ आपले शिक्षण कोठे झाले?

माझे शालेय शिक्षण मिरज येथे झाले आणि पुढील शिक्षण कोल्हापूर येथे झाले.

❖ या मठाचे मठाधिपद आपण कधी स्विकारले?

वयाच्या तेराव्या वर्षी, जवळजवळ २५–२६ वर्षापूर्वी.

❖ आपल्याला समर्थसेवेची गोडी कशी लागली?

लहानपणापासून रामोपासनेची गोडी उत्पन्न झाली होती. शिक्षणानंतर बारा वर्षे सज्ज्नगडावर राहून समर्थसेवा केली .

❖ आपण समर्थसेवेबरोबर अजून काय अध्ययन केले?

कीर्तनकला अवगत केली, अनेक ग्रंथाचे अध्ययन करताना हे ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी कीर्तन–प्रवचन हे माध्यम आहे हे जाणले.

❖ या मिरजमठाच्या निर्मितीबद्दल आपण काय सांगाल?

समर्थांनी हेतुपूर्वक हा मठ स्थापन केला. मिरजमध्ये तेव्हा दिलीलखानचा अंमल होता. धर्मांतरासाठी त्याने हिंदूना वेठीस धरले होते मात्र एका प्रसंगातून समर्थांनी स्वतःच

दिलिलखानला असा धडा शिकविला की दिलीखानने त्यांना मान देऊन ' मिरजमध्येच मठ स्थापन करून वास्तव्य करा ' असा मानस व्यक्त केला. तेव्हा समर्थांनी चाणाक्षपणे, हुशारीने असे सांगितले की ' मी एका ठिकाणी वास्तव्य करत नाही. पण मठ स्थापन करीन.' वेणाबाई मिरजच्याच होत्या. तोपर्यंत त्याही संप्रदायाचे कार्य करण्याबद्दल परिपक्व झाल्या होत्या. तेव्हा त्यांना वेणाबाईंच्या सासू-सासऱ्यांच्या वाड्यातच मारूती स्थापन केला आणि अशा तऱ्हेने मठस्थापना करून वेणास्वामींना मठाधिपती केले. त्याशिवाय यायोगे आपोआपच मुस्लिमांचा वचक कमी होईल आणि संप्रदायाचे कार्य विस्तारेल हा त्यांचा हेतू होता.

❖ आपण हे मठाधिपती म्हणून कार्य करत आहात त्यामागची भूमिका काय आहे?

समर्थ एक महान व्यक्तीमत्त्व आहे. त्यांचे कार्य थोर असून संघटनात्मक आहे. मिरजमध्येच बालपण गेल्याने समर्थ समजत गेले. त्यानंतर वेणास्वामींचे पूर्ण चरित्र-कार्य समजले. तेव्हा या मठाचे कार्य पुढे न्यावे ही प्रबळ इच्छा लहानपणीच मनात रूजली. तेव्हा वेण्णास्वामींचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचेल, समर्थांचे कार्यही सर्वांना समजेल, संप्रदायाचे अस्तित्त्व टिकून त्याचा प्रसार होईल, लोकांच्या मानसिकतेत नव्याने बदल होईल अशी भूमिका घेतली आहे.

❖ सध्या मठाचे काय कार्य चालू आहे? आता कोणते उपक्रम चालू आहेत?

आता मठ बारा महिने कार्यरत असतो. आबालवृध्दांसाठी रोज नित्यापासना चालू असते. रोज प्रवचन-निरूपण केले जाते. कीर्तने होतात. तसेच कीर्तनाची शिबीरे घेऊन, परिक्षेनंतर प्रमाणपत्रही दिले जाते. चातुर्मास, चैत्रमास आणि अधिकमासात अजून इतर उपक्रम, कार्यक्रम राबविले जातात. तसेच सार्वजनिक उपक्रमांतर्गत आता सामुदायिक मुंज सोहळासुध्दा आयोजित केला जात आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे सज्ज्नगड पायी पादुका दौरा मिरजपासून पायी पादुका दौरा होतो. तो सज्ज्नगडला समाप्त होतो.

❖ या सर्व उपक्रमांत लोकांचा कसा प्रतिसाद आहे?

या सर्व उपक्रमांत लोकांचा उत्तम प्रतिसाद आहे. नित्योपासनेपासून कीर्तन–प्रवचन यात लोकांचा सहभाग असतो. अनेकजण याचा लाभ घेतात. मिरज व्यतिरिक्तही इतर अनेक जिल्ह्यांतूनही लोकांची उपस्थिती आणि प्रतिसाद मिळतो.

❖ आपल्या भविष्यातील काय योजना आहेत?

समर्थांप्रती खूप मोठे कार्य करायचे आहे. समर्थांचा सामाजिक भूमिकेचा वारसा चालवायचा असून त्याच दृष्टीकोनातून कार्याचा विस्तार करायचा आहे. काळाच्या गरजेनुसार कार्यशैलीत बदल करून लहान मुले आणि तरूण पिढीलाही रामोपासनेकडे, आध्यात्माकडे प्रवृत्त करायचे आहे. श्रीरामचंद्र आणि हनुमंतांच्या उपासनेद्वारे लोकांचे मानसिक आणि शारिरीक बळ वाढवायचे आहे. समर्थांच्या सामाजिक चळवळीत जे स्थान चाफळ, सज्ज्नगड या स्थानांना होते तसेच स्थान वेणास्वामींच्या मिरज मठाचे व्हावे अशी मनापासून तीव्र इच्छा आहे. अर्थात यासाठी मठाचा जीर्णोध्दार होणे गरजेचे आहे. त्यासाठीही प्रयत्न चालू आहेत.

❖ समाजाला तुम्ही काय आवाहन कराल?

मी सर्वांना सांगू इच्छितो की, एक राष्ट्रीय आणि महान संत समर्थ रामदास यांचे चरित्र–कार्य–वाङ्मय सर्वांनी जाणून घ्यावे. त्यांची सामाजिक भूमिका समजावून घ्यावी. त्यांच्यासारखेच निर्भय, कणखर, कर्तृत्त्ववान व्हावे तसेच वेणास्वामींचे गुरूनिष्ठा, आज्ञापालन, कर्तव्यनिष्ठा, विवेकविचार, आत्मविश्वास असे अनेक गुण समजून घ्यावे. स्त्रियांनी त्यांचा आदर्श ठेवावा. श्रद्धा आणि भक्ती यांना सदैव मनात जागृत ठेवावे.

आपण उत्कृष्ट माहिती दिली, मठाचे कार्य आणि भूमिका समजावून दिली, याबद्दल आपले मनःपूर्वक आभार.